# माणूस

दिवाळी १९६२

मूल्य २।। रुपये






वर्ष दुसरें, अंक सहावा-सातवा
नोव्हेंबर व डिसेंबर १९६२

: संपादक :
श्री. ग. माजगांवकर

## स्वरूपदर्शन


| | |
|---|---|
| | शनवारवाड्यांतील शमादान....ब. मो. पुरंदरे |
| **कथा** | अरविंद गोखले, शंकर पाटील, वा. वा. पाटणकर, मोती नंदी, मधु मंगेश कर्णिक, वि. ग. कानिटकर, भीमराव कुलकर्णी, श्रीपाद काळे |
| **काव्य** | मधुकर केचे, सरिता पदकी, सुधाकर देशमुख, श्री, ज्ञानेश्वर शंभरकर, रमेश धोंगडे, यशवंत पारखी, शांताराम भास्कर, राम गोसावी, नरेंद्र पराडकर, सौ. इंदिरा कुलकर्णी, यशवंत भिमाले आणि सुरेश भट |
| | द. भि. कुलकर्णी....१९ कविता–एक दर्शन |
| **ललित-लेख** | ना. ह. आपटे....दिशाशून्य जीवनाचे पडसाद, एम्. ए. कुलकर्णी....काशिनाथपंत देवल यांचा जीवनपट, पु. ना. ओक....नेताजींचें महाप्रयाण |
| **ऐतिहासिक कादंबरी** | कळलें आतां अंतर....दा. सी. देसाई |
| **रंगभूमि–चित्रपट** | सौ. सुधा करमरकर....वसंत भालेकर, एका सुंदर शरीराची शोकांतिका....रंगा मराठे |
| **धन्य तूंचि कांता** | वि. स. खांडेकर, एस्. एम्. जोशी, केशवराव भोळे, अशोककुमार, य. गो. जोशी, अमर वर्मा, उद्योगपति गोगटे, वसंत जोगळेकर, खंडू रांगणेकर आणि मनमोहन |
| **सजावट** | मुखपृष्ठ....महाराष्ट्र-लक्ष्मी कोयना....दीनानाथ दलाल, अंतरंग....दत्ता महाबळेश्वरकर |


या अंकाची किंमत अडीच रुपये : वार्षिक वर्गणी आठ रुपये

या अंकांत व्यक्त झालेल्या मतांशीं संपादक सहमत असतातच असें नाहीं. सर्व हक्क सुरक्षित.

आभिराष्ट्रेण वर्धताम्




# संपादकीय

चालूं वर्ष हें महाराष्ट्रांत कोयनेचें वर्ष म्हणून नोंदलें जाणार आहे. कोयना योजनेचा आरंभ ही महाराष्ट्राच्या दृष्टीनें एक फार मोठी क्रांतिकारक घटना आहे. 'दारिद्री' म्हणून आजवर गाजलेल्या महाराष्ट्राचें दारिद्र्य या महत्त्वाच्या प्रकल्पामुळें नाहींसें होणार आहे. शतकानुशतकें अंधारांत असणारीं आमचीं खेडीं कोयनेच्या विजेनें झगमगूं लागणार आहेत. केवळ 'हर हर महादेवाच्या' रणगर्जनांनीं दुमदुमणारा येथील आसमंत यापुढें यंत्रांच्या घरघराटांनींहि भरून जाणार आहे. अनेक पिढ्यांचें स्वप्न आतां साकार होत आहे. ज्यांनीं या योजनेचा पन्नास वर्षांपूर्वीं पुरस्कार केला, तिच्यासाठीं चळवळी केल्या, जनतेंत जागृति निर्माण केली, योजनेचे आराखडे तयार केले, तिच्यासाठीं अवश्य तें द्रव्यसहाय्य व साधनसामग्री उपलब्ध करून दिली त्या सर्व प्रवर्तकांच्या, उद्योगपतींच्या, स्थापत्यविशारदांच्या, राजकीय नेत्यांच्या परिश्रमांचें हें फळ मराठी जनतेच्या हातीं आतां लाभत आहे. या क्रांतिकारक व मंगल प्रसंगाची मराठी जनतेला जाणीव व्हावी या कल्पनेनें या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठाची योजना करण्यांत आलेली आहे. महाराष्ट्रांत लक्ष्मीचा उदय होण्याचा हा मंगल क्षण आहे. आणि दिवाळी हा आमचा लक्ष्मीपूजनाचा सणहि आहे. आमच्या घरीं-दारीं जिच्या आशीर्वादानें लक्ष्मी नांदणार आहे त्या कोयनामायच्या अभिवादनाला आणि पूजनाला यापेक्षां अधिक समर्पक व अधिक उचित असा मुहूर्त शोधूनहि सांपडला नसता. आमच्या असंख्य वाचकांना आणि हितचिंतकांना ही मुखपृष्ठ कल्पना आवडावी अशी अपेक्षा आहे.

बहिरंगाप्रमाणें अंतरंगहि विशेष योजनेनें सजवलेलें आहे. दिवाळी अंकांत विचारप्रबोधनापेक्षा आनंद निर्मितीवर अधिक भर द्यायचा असतो. पण आनंद म्हणजे निःसत्व व सुमार साहित्याची मेजवानी नव्हे हेंहि ध्यानांत घेणें जरूर आहे. सणावारी चार घडी मौजेंत घालवतांनाहि कोणी आपलें व्यक्तिमत्त्व विसरत नसतो. किंवा आपला नेहमींचा आकारप्रकार, आवडीनिवडी संवयी यांना रजा देत नसतो. 'माणूस' च्या दिवाळी अंकांत असणारी विविधता, प्रमाणबद्धता, साहित्य निवडतांना बाळगलेली सत्वाची व स्वत्वाची दृष्टि याहि अंकांत कायम ठेवलेली चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत येईल. म्हणूनच थोडा आत्मप्रौढीचा दोष पत्करूनहि आम्ही असें म्हणूं इच्छितों कीं 'हा संपन्न व सकस असा दिवाळी अंक आहे.'

अर्थात् या अंकाच्या सिद्धतेला अनेकांचा हातभार लागावा हें स्वाभाविकच आहे. विशेषतः "धन्य तूंचि कांता" हा विभाग सजविण्यासाठीं 'माणूस' ला अनेकांचें सहाय्य मागावें लागलें व तें मिळालेंहि. त्यांतल्या त्यांत आमचे मुंबईचे मित्र श्री. वसंत भालेकर व वि. वि. करमरकर व पुण्याचे श्री. सुधीर दामले यांचा नामोल्लेख करणें अगत्याचेंच आहे.

मुखपृष्ठावरील कोयनेचा पार्श्वभाग सजवतांना वालचंद उद्योग समूहातर्फे प्रकाशित झालेल्या कांहीं चित्रांचा थोडा उपयोग करावा लागलेला आहे. याबद्दल समूहाच्या प्रकाशनाधिकाऱ्यांचे आम्ही ऋणी आहोंत.

— संपादक

[ दिवाळी अंकासाठीं निवड झालेल्या साहित्यापैकीं श्री. मधुकर परांजपे व श्री. वि. वि. करमरकर यांचें साहित्य पृष्ठसंख्येवरील मर्यादेमुळें या अंकांत समाविष्ट होऊं शकलें नाहीं. तें पुढील अंकांत प्रसिद्ध होईल. ]

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रकटी ।
तैसी सद्बुद्धि हे येकुटी । म्हणो नये ॥

—श्रीज्ञानेश्वरी

अंतरीं सद्भावना ठेवून कार्यास प्रारंभ केला कीं, यशःप्राप्ति ठेवलेलीच. कै. आगाशे यांची कळकळीची विनंति व अविरत श्रम व मध्यमवर्गानें त्यांना दिलेलें सहकार्य यामुळें हा कारखाना यशस्वी होऊन मध्यमवर्गीयांचें भूषण झाला आहे. कै. आगाशे यांचेंच धोरण पुढें चालवून संचालक–मंडळ कंपनीचें कार्य नेटानें पुढें चालवीत आहे.

नवीन हंगाम नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत सुरू होईल.

## आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो !



—ः संचालक मंडळ ः—

श्री. शं. ल. लिमये, बी. एस्सी., एल्. एल्. बी., वकील
अध्यक्ष

श्री. म. ग. भादुले, बी.एस्सी. एल्. एल. बी., वकील
श्री. रामराव माधवराव देशमुख,
बी. ए., एल्. एल्. बी. (कँट.), बार-अॅट-लॉ, एम्. पी.
श्री. वि. कृ. साठे, बी. ए. ( टिळक )
माजी पुरवठा मंत्री, मुंबई राज्य

श्री. ग. ह. सबनीस
श्री. श्री. र. केसकर, वकील
श्री. ज. चं. आगाशे
श्री. गो न. जोशी,
बी. एस्सी.

श्री. के. त्र्यं. चाफेकर, बी. ई., ए. एम्. आय्. ई.
मॅनेजर





# शनवारवाड्यांतील शमादान

ब. मो. पुरंदरे

श्रीमंतांच्या नगारखान्यांत सनईचौघडा वाजत होता. दरवाजाला तोरण लागलं होतं. तोरणाच्या वर ऋध्दिसिध्दीसह गणराजानें आसन मांडलं होतं.

तीन दालनी भव्य आरसेमहाल झगमगत होता. हंड्या झुंबरांतून प्रकाश निथळत होता. मधल्या दालनांत नवऱ्या मुलाचं सीमांतपूजन चालू होतं. डाव्या–उजव्या बाजूला मखमली गालिचा-वरून भरजरी शालूशेल्यांची नाजूक घाईगर्दी चालू होती. गुलाब आणि मोगरा घमघमत होता. कमरे इतक्या उंचीच्या नक्षीदार रुपेरी झाडावर शेंकडों उदबत्त्या सुगंध उधळीत लवलवत होत्या. सहारंगी झुंबरांचे पैलूदार लोलक चमचमत होते अन् हळुवारपणें किणकिणत होते. महालाला अगणित सुंदर सुंदर मेहरबदार कमानी होत्या. सरळ ओळींत दिल्लीशाही सुरुदार खांब डौलांत उभे होते. प्रत्येक कमानीच्या मध्यभागीं एकेक हंडी लोंबत होती. रेशमाच्या कनाती झुळझुळत होत्या. प्रत्येक खांबावर मोठ्या झोकांत रंगीबेरंगी शमादानें झगमगत होतीं. गालिचांवर वावरणाऱ्या भरजरी शालू पैठण्यांचीं प्रतिबिंबं हंड्या झुंबरांत तरळत होतीं.

एका सुंदर लालसर शमादानांत असंच एका सोनचाफी सौंदर्याचं प्रतिबिंब अलगद हंसत होतं. एका सुरुदार खांबावर तें शमादान तेवत होतं. गोंडेदार रेशमी कनात वाऱ्यावर मंद हलत होती. नजीकच वीतभर उंचीच्या चंदनी मंचावर सावरीची मसनद घातलेली होती. मसनदीवरचा निळा मखमाली लोड अगदीं हळुवार दबला होता. लोडावरून बुट्टीदार शेल्याची उलगडलेली घडी जरा उगीच घरंगळली होती अन् त्या शेल्याच्या घडीवर गोरापान डावा दंड सहज थोडासा विसांवला होता. हिरव्या चोळीचा भरजरी कांठ आणि सोन्याची वाकी त्या गोऱ्यापान दंडाला घट्ट बिलगली होती. पिवळ्या गुलाब-कळीसारख्या नितळ गळ्यांत मोती रुळत होते. अस्मानी रंगाच्या शालूचा झगमगीत लफ्फेदार पदर पेशवाई दिमाख दाखवीत होता. काळ्याभोर केंसांच्या डौलदार खोप्यांत मोठ्या नाजूक ऐटींत खुलत होतीं, सोन्याची मूद, राखडी आणि अग्रफुलं. कानांत मोत्याच्या बुगड्या आणि भोकरं डुलत होतीं. सोन्याच्या गोठतोड्यांनीं हात भारावले होते. नाकांत नथ, बोटांत मोहरेची अंगठी आणि पायाच्या बोटांत जोडवीं नकळत जणूं जाणीव करून देत होतीं कीं, लहान असलों तरी आम्हीहि कांहीं कमी नाहीं !

त्या केशरी यौवनकांतीवर हे सारे वस्त्रालंकार फार फार खुलत होते. पण सर्वांत खुलत होतं, गोऱ्यापान भाळीं रेखलेलं चंद्रकोरी कुंकू आणि ओठांवर सहज उमललेलं तें प्रसन्न हास्य ! शमादानातील ज्योत हलत होती, डोलत होती आणि मसनदीवरील ह्या सोनचाफी सौंदर्याचं प्रतिबिंब अलगत तरळत होतं त्या शमादानांत. सनईचे सूर, सुगंधी धूर आणि प्रकाशाचे सप्तरंग त्या मुग्ध मधुर हंसतमुखाभंवतीं नाचत होते.

गालिचावर विहीणवर्दळ चालू होती. कनातीपलीकडे सीमांतपूज-नाचे विधि चालू होते. तेवढ्यांत तें शमादान चमकलं. चांदीचं मोठं थोरलं चकचकीत ताम्हन मसनदीपुढं ठेवलं गेलं. ताम्हनांत अगदीं छोटासा चांदीचा चौरंग ठेवला गेला. मसनदीवरचं गोरंपान उजवं पाऊल ताम्हनांतल्या त्या चौरंगावर उतरलं. विहिणींचीं पांच बोटं चौरंगावरच्या त्या पावलावरून हळूंच फिरलीं आणि कनोजी अत्त-राचा एकदम घमघमाट पसरला. केशरी अबीराची पिंजर त्या पावला-वर पडली. चांदीच्या गंगाळांत चांदीचा तांब्या बुडबुड करीत बुडाला आणि त्या तांब्यांतून कढत पाण्याची धार चौरंगावरील पावलावर बरसूं लागली. धार थांबली आणि भरजरी शालूचा नेसता पदर त्या ओल्या पावलावर पडला. गोठतोड्यांनी भारावलेल्या दोन हातांनीं तें पाऊल त्या भरजरी पदराखालीं टिपलं गेलं. उजवं पाऊल धुवून पुसून झालं.

“ आतां डावं पाऊल ! ”

विहिणीनीं हंसून डावं पाऊल धुण्यासाठीं चौरंगावर ठेवण्याची विनंती केली. सीमांतपूजनाच्या वेळीं नवऱ्यामुलीच्या आईनें नवऱ्या-मुलाच्या आईचे पाय धुण्याचा मान असतो ना ! उजवं पाऊल धुतलं मुलीच्या आईनें–

"डावं पाऊल आतां!"

"अ-नको! उजवंच पुरे! माझ्या डाव्या पायाला जरा बरं नाहीं!"

चौरंगावरून आपलं उजवं पाऊल मसनदीवर घेत श्रीमंत काशी-बाईसाहेब म्हणाल्या. त्या लोडाशी हळूंच मागें सरकत किंचित् हंसल्या.

"असं? बरं नाही? बर बरं, चालेल तेवढं!"

हंसून विहिणीनीं ताम्हन चौरंग बाजूला ओढला आणि मुलाकडच्या इतर मानकरणींचे पाय धुण्याकरिता त्या वळल्या. बायकांच्या गर्दीत विहिणी जरा बाजूला झाल्या अन् लामणदिवा हातांत घेतलेली कुणी तरी श्वास ओढून नथेचा झुपका सांवरीत दुसरीच्या कानाशी हळूच म्हणाली,

"मुलाच्या आईला इसब आहे! डाव्या पायावर!"

"अगबाई! हो कां?"

हं, होय! श्रीमंत सौभाग्यवती काशीबाईसाहेबांच्या डाव्या पायाला इसब झालं होत. अतिशय त्रास होत होता त्यांना त्यामुळें त्यांच्या हौसेला आणि उत्साहाला पायबंद पडला होता. नाहीं तर त्या स्वतःच्या प्रत्यक्ष मुलाच्या लग्नांत अशा एका जागी लोडाशीं बसून राहिल्या असत्या? अहं! अगदीं अशक्य! मसनदीवर बसल्या बसल्या आपल्या मुलाच्या सीमांतपूजनाच्या सोहाळा त्या बघत होत्या.

सीमांतपूजन साजरं होत होतं. मघल्या भव्य महालांत भरजरीच्या खाशा मसनदीवर नवरा मुलगा ऐटींत बसला होता. वैदिकाचे मत्र-विधि च लू होते वधूपक्षाची आणि वरपक्षाची नातलग पुरुष मंडळी आणि सरदार दरखदार बसले होते. जागोजाग खांबापाशी हुजरे, भालदार आणि चोपदार उभे होते. गाद्या, गिरद्या, लोड, तकिये, गालिचे, कनाती इत्यादि फरास अतिशय भरगच्च आणि मोलाचा होता. मोठमोठ्या चांदीच्या तबकांत पानविड्यांचें साहित्य ठेवलें होतें. अत्तरदाण्या, गुलाबदाण्याचीं तार्टे-तबकें वेगळी होतीं.

दरबारची झाडून सारी बडी बडी सरदार मण्डळी दुतर्फा बसली होती. मेहेंदळे, मुजुमदार, पुरंदरे, जाधवराव, घोरपडे,-आणि सगळे! आणि त्यातच एका गादीवर, लोडाशी टेकून एक गोरीपान आणि भरदार खांद्याबांध्याची तरुण व्यक्ति, हातात घवघवीत गुलाबाचं फूल हुंगीत बसलेली होती. प्रत्येकाचं लक्ष आलटून पालटून ह्याच तरुण पुरुषाकडे जात होतं. टपोरे हसरे डोळे, सरळ सळसळीत नाक, भव्य कपाळ, बेतांत पण फारच झोकदार मिशा आणि एकूण सारा रुबाब जवानीचा! मर्दानी सौन्दर्याचा! फार तोला-मोलाची ही तरुण आसामी होती. समारंभाला आलेल्या प्रत्यकानें ह्या मर्दानी तरुणाला मुजरे केले आणि नव्यानें त्या समारंभात दाखल होणारा प्रत्येकजण मुजरा करीत होता त्याच तेजःपुंज तरुणाला. कोण, कोण ह्या मातब्बर तरुण पुरुष?

हा मातब्बर तरुण पुरुष म्हणजे खुद्द व्याहीच! नवऱ्या मुलाचा बाप! प्रत्यक्ष पंत प्रधान! श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे! अन् त्या शमादानांत प्रतिबिंब ज्याचं तरळतं आहे, विहिणींनी ज्याच फक्त एकच पाऊल धुतलं-त्या श्रीमंत काशीबाईसाहेबांच्या व श्रीमंत बाजीरावसाहेबांच्या मुलाच लग्न निघालं आहे पेशव्याच्या घरीं. नवऱ्यामुलाचं नाव आहे-बाळाजीराव उर्फ नानासाहेब. नवऱ्या मुलाचं वय आहे नऊ वर्षांत पुरेपूर?

पेशव्याचा मुलगा, सावकार रास्त्याची मुलगी. लग्न ठरविण्यांत मध्यस्थ प्रत्यक्ष छत्रपति शाहू महाराज! प्रत्येक विधि मोठ्या हौसेनें आणि थाटामाटांत साजरा होत होता. श्रीमताचे धाकटे बन्धू चिमाजी-आप्पा महालाच्या प्रवेशद्वाराशीं आगत-स्वागत करायला जातीनं उभे होते.

व्याही व्याही एकमेकाना नारळ आणि अलिंगन देऊन भेटले, वरपूजा झाली. वरदक्षणा झाली. मान झाले, पान झाले. मुलाच्या मामानीं, सीमांतपूजनाचा साज सजलेल्या नवऱ्या मुलाला कडेवर उचलून घेतलं आणि नमस्कारासाठीं श्रीमंत बाजीरावसाहेबांशी आणलं. अंगावरचे दागिने, डोक्यावरची पगडी, त्यावर बांधलेल्या मुंडावळ्या आणि अंगावरचा फुलांचा पोशाख सांवरीत सांभाळीत नवरदेवानीं श्रीमताना वाकून नमस्कार केला. श्रीमंतांना फार फार कौतुक वाटलं. त्याचं लक्ष त्या तिकडे बसलेल्या काशीबाईसाहेबांकडे गेलं. श्रीमंतांची आणि बाईसाहेबांची नजरानजर झाली. दोघांच्याहि गालीं अगदीं न-कळत खुदकन् हसूं उमटून गेलं. ह्या हंसण्याचा अर्थ कळला त्यांचा त्यांनाच! श्रीमतानीं नानासाहेबांच्या पाठीवर हात फिरवून आशी-र्वाद दिला. मामानीं हंसत हंसत नवरदेवांना उचललं आणि वरमाई-पाशी आणलं. बाईसाहेबानी पुत्राला हृदयीं धरल. त्याचे डोळे आनंदा-श्रूंनी भरून आले.

वरच्या शमादानान हें मायलेकराचे कौतुक उचलून घेतलेलंच होतं. बाईसाहेब मग मामांना म्हणाल्या, "आंत सासूबाई बसल्या आहेत.' बाळाला नमस्कारासाठी न्यायचं त्याच्यापुढें. मीहि येतेच बरोबर!"

"अग ताई, तूं कशाला घेतेस दगदग? मी नेऊन आणतो! तूं बैस! तुझा पाय!"

"अहं, त्यांत काय! चल येते."

मामांनीं नानासाहेबाला कडेवर घेतलं. पायाच्या वेदना आंतल्या आंत सोशीत बाईसाहेब मंचावरून उठल्या. ना यातल्या एक-दोघींनीं आधाराला हात पुढं केला. तेव्हां हंसत हंसत त्यानीं म्हटलें, 'नको नको!' त्या मुखावर हसत होत्या, पण पायाच्या वेदनांमुळें आंतल्या आंत कण्हत होत्या.

आंतल्या दालनांत कांहीं विकेशा प्रौढवृद्ध विधवा स्त्रिया बसल्या होत्या. त्यांत नवरदेवाची आजी-वडिलाची आई होती. नातू नमस्का-राला आलेला पाहून राधाआजीला आनंद झाला. कौतुक उफाळून आलं. मागोमाग काशीबाईसाहेब येतच होत्या. नानासाहेबाला आजीनें आशीर्वाद दिला.

"उदंड औक्षाचा हो! सुखी हो बाळा? अग, सूनबाई नंतर नानाची दृष्ट काढायला विसरू नकोस हो! मला अगदीं तुझ्या नि बाजीरावच्या लग्नाची सई होतेय बघ! अगदी अस्सा दिसत होता तो तुमच्या लग्नांत!"

आणि मग खरोखरच बाईसाहेबांना आपलं लग्न आठवलं. म्हणजे अंधुक अंधुक आठवलं! फार लहान होत्या त्या,त्या वेळीं. पण 'स्वारी' लग्नात अगदीं अश्शीच दिसत होती हे सासूबाईंचे शब्द ऐकतांच न कळत त्या नानासाहेबांकडे बघतच राहिल्या -म्हणजे आपल्या लग्नांत 'स्वारी' अगदीं अश्शीच दिसत होती ह?-त्याना गमत वाटली. येत असलेल हंसूं त्यानीं फुटूं दिलं नाहीं. पण त्याना वाटलं, नानाला एकदा हृदयाशी घट्ट धराव!

मामांनीं नानाला कडेवरून परत महालांत मसनदीवर आणून बसवल. बाईसाहेबहि आपल्या लोडाशीं येऊन बसल्या.

सीमांत पूजनाचे सर्व विधि संपले.

आणि संगीताच्या साथीची वाद्यें घेऊन नबाबी पोषाखांतील पांच-सहा बजवय्ये महालात प्रवेशले. त्यानीं लांवूनच आदबीनें लवून मुजरे केले. नंतर त्या सर्वांनी महालांत सभोवार लवत्या मानानीं आदब बजावली. अन् धुंद सुगंधाबरोबर सारंगीचे सूर महालात दरवळूं लागले. पखवाजावर थाप पडली. खणखणीत बोल उमटू लागले. चांदीच्या नाजूक झांजाची झिणझीण उठली. पखवाज घुमूं लागला. बांसरी, टिपरी आणि सारंगी पखवाजाच्या तालावर सूर उठवू लागल्या. उस्तादानें मान हलवीत हलवीत आणि तळहातावर टाळीने ठेका देत देत तोंडानें सुस्पष्ट उच्चारात तोड्याचे 'बोल' म्हणावयास सुरुवात केली.—

ना दिग दिग दिग ना दिग दिग दिग ना दिग दिग दिग थै ऽ
ना दिग दिग दिग ना दिग दिग दिग ना दिग दिग दिग थै ऽ
दिग दिग ता थै तत् तत् तत् त्राम् थै त्राम् थै त्राम् थै ऽ
दिग दिग ता थै तत् तत् तत् त्राम् थै त्राम् थै त्राम् थै ऽ
दिग दिग ता थै तत् तत् तत् त्राम् थै त्राम् थै त्राम थै ऽ

आणि याच 'बोलांच्या' तालावर पैंजणांची रेखीव झिणझीण उमटूं लागली. एकूण एक डोळे महालाच्या प्रवेशकमानीकडे टंवकारले गेले. त्या नक्षीदार मेहरबी भव्य कमानींत बिजलीच्या चापल्यानें दोन गोरीं गोरीपान पावलं थय थय थय थय नाचत प्रकटलीं. महाल निश्चल, निःशब्द झाला. मलमलीची निळसर बुट्टीदार सलवार झळाळत होती. पारदर्शक गुलाबी ओढणी माथ्यावरून धुक्यासारखी सळसळत होती. गळ्यांतले, कानांतले आणि काळ्याभोर केसांवरचे मोत्याचे जाळीदार अलंकार गुलाबी ओढणीतून आणि पांढरे पांढरे शुभ्र मोतीदार दात गुलाबी ओठातून एकमेकांशी स्पर्धा करीत होते. हसता–नाचता एखादी भिवई सर्रकन् चढे, गालीं खळी पडे, ऊर धडधडे, ओढणी वाऱ्यावर उडे, अन् अंगठीतले खडे, चमकून जात. ह्यात पावलावरची मेंदी जणू आतल्या रक्तातूनच बाहेर झिरपत होती. तिच्या बिजलीच्या चापल्यानें तिचे पाय थयथयत होते. पायांतील पैंजण झणझणत होते. पखवाजीच्या बोटांची आणि तिच्या पावलांची स्पर्धा लागली होती. मेंदीनें लालावलेल्या तिच्या हातांच्या पाकळ्या वादळांत सांपडलेल्या गुलमोहरासारख्या लवलवत होत्या. त्या नाजूक, निमुळत्या बोटाची झालर झुळझुळत होती. सारं अंग अंग समादानातील ज्योतीप्रमाणें लवत होत तिचं. छे! तिचा देह हाडामांसाचा नसावाच! पायांत पैंजण बांधून जणू धूम्रवलयच नाचत होतं. त्या सुगंधी धूम्रवलयाला कुणीतरी जणू फुंकर घालीत होतं, अन् ह्या उलट सुलट गिरक्या, मुरके, हरकती, कप आणि थयथयाट सठत होते.

भोंवऱ्याला जाळी गुंडाळून सपकन् उभा हात मारावा अन मग तो भोंवरा गररंकन् फिरत तड तड तड तड नाचत जावा, त्याप्रमाणें ती त्या भव्य कमानीतून झर्रकन एकदम महालाच्या ऐन मध्यावर येऊन नाचूं लागली. महालातील साऱ्या हालचाली थांबल्या होत्या. प्रत्येकाच्या डोळ्यांतील बाहुल्याच तेवढ्या, त्या यौवनेच्या नर्तनानुसार हलत होत्या. ती सहज नाचत होती. हंसत हंसत नाचत होती. विलक्षण चापल्य! जणू ती नाचत नव्हतीच, वाऱ्याने तिचा प्रत्येक अवयव लवलवत होता अन् तिच्या पायाखालची जमीनच फिरत होती.! झुंबराच्या लोलकांतून परावर्तित होणाऱ्या रंगीबेरंगी किरणांची पिचकारी नाचता नाचता मधूनच तिच्या केशरी गालावर पडे अन् तिच्या हास्याला वेगळीच किनार जडे.

बायकांच्या दालनांतहि अगदी चुप्प स्तब्धता झाली होती. विहिणी, मानकरणी आणि करवल्या स्वतःला पार विसरून गेल्या होत्या. त्या नाचणाऱ्या पोरीनें सर्वांना नजरकैद करून टाकल होत. समादानात अवघ्या महालाचं प्रतिबिंब चित्रासारखं स्तब्ध दिसत होत. फक्त ती अप्सरा त्या प्रतिबिंबांत नाचत होती. श्रीमंत बाईसाहेबदेखील तो नाच पहाण्यांत तल्लीन झाल्या होत्या. तें पदलालित्य बघताना स्वतःच्या पायाचा दाह त्या विसरून गेल्या होत्या. ही नाचणारी मुलगी आज प्रथमच दिसत होती. तिचं मुलायम लावण्य पाहून बाईसाहेब विस्मितच झाल्या होत्या. त्यांची नजर सहज बाजीरावसाहेबांकडे गेली. स्वारी अगदी चित्रासारखी एकाग्र टक लावून नाच बघत होती. पापणीसुद्धां लवत नव्हती. बाईसाहेबांना आपल्या 'शिपाई स्वारीची' ध्यानस्थ रसिकता पाहून गंमतच वाटली. दरबारात नाच–गाणीं होत, पण 'स्वारी' इतकी तल्लीन कधी होत नसे. स्वारीला आवड भाल्या, बर्च्यांचा नाच बघायची अन् तलवारीनें 'तान' मारायची! आजची ही 'इकडची' एकाग्रता पाहून बाईसाहेबांच्या नथेखाली स्मित उमटून गेलं.

खरोखरच श्रीमंत गिरफ्तार झाले होते. तिच्या नजरेचे किरण स्वाभाविकच त्यांच्या मुखावर पडत. ती झटकन् मुरकून नजर फिरवी· श्रीमंतांच्या चेहऱ्यावर स्मिताचे तरल तरंग उठत आणि पगडीवरचा मोत्याचा तुरा अगदी हलकेच डुलला जाई.

तिच्या नाचाचा व वाद्याच्या गतीपेक्षाहि वेगानें वेळ धांवत होता. भान नव्हतं कोणालाहि. तिनें लय कमालीत नेली. साथीदारांना घाम फुटला होता. पखवाज्याच्या बोटाचा पराभव झाला होता. तिनें पावलाचा झणत्कार उठवीत टाचा उचावल्या आणि पावलांच्या बोटांवर एकदम दबून तिनें जमिनीपासून तीन वीत उंच उशी घेतली अन् अक्षरशः भिंगरीप्रमाणे तिचा देह गिरक्या घेऊ लागला. तिच्या अस्मानी सलवारीचा झोळ तिच्या कमरेभवती वर्तुळाकार उडू लागला. बघणारांना भोवळ यावी इतक्या गतीनें ती भिंगरी भिरभिरत होती. महालांतील श्वासोच्छ्वास थबकले क्षण दोन क्षण,


* स्वातंत्र्यदिनीं प्रसिद्ध झाला *

महाराष्ट्राची भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा इतिहास, सीमा प्रश्न वगैरे विषयावरील गाजलेल्या लेखांचा संग्रह

**महाराष्ट्राचें मन :** किंमत : २ रु. ट. ख. वेगळा
आकर्षक मुखपृष्ठ

: लेखक :
पु. रा. बेहरे

प्रस्तावना : श्री यशवंतराव चव्हाण
( महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री )

एका प्रतीसाठीं रुपये पावणेतीन. व्ही पी. नाहीं.

बलवंत पुस्तक भांडार, गिरगांव नाका, मुंबई ४.

चार क्षण, सात, आठ, दहा क्षण ! कितीतरी वेळ ! अन् वाद्यांची साथ आणि तिचीं पावलं एकदम थांबली. दोन्ही टाचा आणि दोन्ही हात छताकडे ताठ उचावलेल्या स्थितींत, माथ्यावरल्या झुंबराकडे पाहत ती चित्रासारखी नि:स्तब्ध उभी राहिली अन् क्षणभरानें तिनें श्रीमंतांना लवून कुर्निसात केला.

आतांपर्यंत मुग्ध होऊन गेलेल्या त्या महालांत कौतुकाची कुजबूज सुरू झाली. बायकांतहि कौतुक खळाळूं लागलं.

खुद्द श्रीमंतांची तबियत निहायत खूष झाली. त्यांनीं हंसून मान डोलाविली. निळोपंत मुजुमदारानी मुशाहिऱ्याचं रुमालाखालीं झाकलेलं ताट श्रीमंतांपुढं धरलं. श्रीमंतांनीं ताटाला स्पर्श केला. मुजुमदारानी तें ताट त्या नाचणाऱ्या युवतीच्या हातीं दिलं. डाव्या तळहातावर ताट घेऊन, मान झुकवीत, उजव्या हाताने पुन्हा तिनें कुर्निसात केला. एकहि शब्द न बोलता श्रीमंत हंसून मान डोलावीत होते. त्यांच्या पगडीवरचा शिरपेंच चमकत होता. कुर्निसात करतांना तिची श्रीमंतांशी नजरानजर झाली. ती लाजून एकदम खालीं झुकली. श्रीमंतानीं आपल्या मांडीवरचं गुलाबाचं फूल उचललं आणि नाकापाशीं नेलं. तेवढ्यांत तिनें वर नजर उचलली. अर्धोन्मीलित गुलाबाच्या पाकळीला श्रीमंतांचे ओठ स्पर्श करतांना तिला दिसले असावेत. तिचं अंग शहारलं होतं. ती लाजून चूर झाली होती. तिनें झटकन् डोक्यावरची झिरझिरीत ओढणी दोन बोटांनीं तोंडावर ओढली. अन् कुर्निसात करीत करीत ती मागें मागें पावलं टाकीत गेली. पायातली पैंजणे हळूं आवाज करीत गेलीं. पण तिच्या चेहऱ्यावरचं गोड हास्यहि विरघळत विरघळत गेलं. ती गंभीर झाली. ती वळून कमानीकडे चालत गेली. कमानीच्या कनातीजवळ एक इसम उभा होता. त्याच्या हाती तिनें तें मुशाहिऱ्याचं ताट दिलं. महालाच्या पायऱ्या उतरत आपल्या साथीदारांसह ती निघून गेली. ताट घेतलेला तो इसमहि त्या सर्वांच्या मागोमाग गेला.

ती गेली. पण तिच्या पायांतील पैंजणाची रिमझिम त्या महालांत अजूनहि रेंगाळत होती, महालांत पान-सुपारी आणि अत्तर गुलाब दिला जात होता. गुलाबपाण्याचे तुषार उडत होते. नगारखान्यात कर्णे आणि डंका वाजत होता.

सीमांतपूजनाचा समारंभ संपला.

लग्नासाठीं आलेल्या छोट्या मोठ्या पाहुण्यारावळ्यांची जेवणंखाणं आवरेपर्यंत जवळजवळ मध्यरात्र झाली. वाड्यांत हळूहळू सामसूम झाली. श्रीमंत बाजीरावसाहेब आपल्या खाशा महालात आले. पलंगाच्या शेजारी पंधरा पाकळ्यांची समई तेवत होती. जवळच चौरंगावर चांदीचं पानदान होतं. श्रीमंतांच्या डोळ्यांपुढें अजून ती मुलगी नाचतच होती ! ते महालांत येऊन पलंगावर बसतात न बसतात, तोंच हळूहळू पावलं टाकीत काशीबाईसाहेबहि चांदीचं तांब्या फुलपात्र घेऊन आल्या. श्रीमंतांनी हसत हंसत मिस्किलपणाने म्हटलंच,

" यावं यावं विहिणी !"

बाईसाहेब लाजून हसल्या. श्रीमंत पलंगावरच्या लोडाशीं रेलले अन् म्हणाले,

" मान पान झाला विहिणीचा मनासारखा ?"

चौरंगावरचं पानदान पलंगावर घेत बाईसाहेब म्हणाल्या,

" आमचा बाई मान पान भारी सोपा ! एक पाय धुतला कीं संपलं काम !"

आणि मग दोघेहि हंसले. पण आपल्या लाडक्या बायकोचा, पायाच्या दुखण्यामुळं जिथं तिथं होणारा विरस जाणवून श्रीमंतांच्या चेहऱ्यावर क्षणात खिन्न कणव उमटून गेली. ते हसता हंसता थांबले. स्तब्ध झाले. बाईसाहेबांच्या नजरेंतून ही त्यांची खिन्नता सुटली नाहीं. विषय बदलवीत त्या चटकन् म्हणाल्या,

" किती बाई लहानपणीं सासूपण आलं हें !"

" हौस असते ना तुम्हा बायकांना सासूपणाची ! व्हा, सासू व्हा ! "

पांच कळीदार पानांना केशरी चुना लावीत बाईसाहेब म्हणाल्या,

" केवढीशी बाई सून ! पांच वर्षांची ! लग्न म्हणजे काय अन् नवरा कशाशी खातात हें तरी कळतंय का तिला ?"

" कळेल कीं पुढें ! आपल्या लग्नाच्या वेळीं तुला तरी कुठं कळत होतं ? अं ? पण मग पुढं हळूं हळूं कळायला लागलंच ना, नवरा कशाशी खातात तें ?"

" इश्श ! भारी बाई थट्टा !"

श्रीमंत मोठ्यानें हसले.

" म्हणजे, खोटं बोलतोय मी ? सांग, तुला नेमकं केव्हां कळायला लागलं ?"

" हु ! पुरे !"

" सांग ना ! ए, सांग सांग ना !"

" सांगूं ? पण नको बाई ! मी नाहीं !"

" अहा ! इतका काय मान चढला ? तुझे मान पान तुझ्या विहिणीच्या पुढं ! हं सांग !"

" इश्श ! काय ?"

" मी तुझा नवरा आहे हें तुला केव्हा कळायला लागलं ?"

" मी आपली बायको आहे हें मला जेव्हां समजलं, तेव्हां !"

" अग, पण तें तरी केव्हा ?"

" मी आपल्याला पाहून पहिल्यांदा जेव्हां खरीखुरी लाजलें, तेव्हां !"

श्रीमंतहि उत्तरं ऐकून हंसले अन् म्हणाले,

" मुत्सद्दी आहेस ! राजकारणं तुला चांगलीं समजतील !"

" तो विषय पुरुषांचा ! तुम्हां पुरुषाना फक्त राजकारणातलं समजतं ! आम्हा बायकाना अंतःकरणातलं समजतं !"

" अस्सं ? मग ओळख पाहूं माझ्या अंत:करणात काय आहे तें ?"

" तिथं मी आहे !"

बाईसाहेबांनी हळूच उत्तर दिलं. श्रीमंत हें उत्तर ऐकून मनापासून हसले. ते कौतुकानें बाईसाहेबाकडे बघत राहिले. बाईसाहेबानीं पानाची गोविंद घडी घालून विडा श्रीमंतांच्या पुढें केला. पण श्रीमंतानी हात पुढें करायच्या ऐवजी तोंडाचा ' आ ' पुढें केला !

" इश्श ! अजून लहानपण सपलं नाही ?"

" अहं ! आत्ताशी सुरू झालय !"

" सून येणार आतां !"

" मुलगा लौकर झाला म्हणून सून लौकर येतीय ! मुलगा जरा उशीरा झाला असता तर–! पण तुझी घाई ना सारी !"

" बाई बाई ! स्वारीच्या जिभेला हाडच नाहीं !

बाईसाहेबांनीं श्रीमंतांच्या तोंडात विडा कोंबला ! विडा दातांखाली घेत श्रीमंत म्हणाले,

" अग, आत्ताशी माझ्या वयाची अठ्ठाविशी अन् तुझ्या वयाची ऽ–?"

" चोविशी !"

# ही अमूल्य देणगी

शुभप्रसंगीं देणगी देण्याचा प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत कधीं ना कधीं येतोच. अशा प्रसंगीं पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज देणगी कूपनें भेट द्या. इतर देणग्यामध्यें आणि या देणगीमध्यें फरक असा कीं, ही देणगी उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाते. ५, १०, ५०, १०० आणि १००० रुपये किंमतीचीं ही देणगी कूपनें पोस्ट ऑफिसांत मिळतात आणि नंतर त्याबद्दल १२ वर्षें मुदतीचीं राष्ट्रीय योजना बचत सर्टिफिकेटें मिळतात. या सर्टिफिकेटांवर आकर्षक दरानें प्राप्तिकरमुक्त व्याज मिळतें.

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज देणगी कूपनें

SMALL SAVINGS SS SERVE THE STATE & YOUR FAMILY

**शुभप्रसंगीं द्यावयाची शुभभेट**




महाराष्ट्र सरकारच्या
अल्पबचत संचालनालयातर्फे प्रकाशित

" हो ना ? मग म्हातारं व्हायला अजून आपल्याला खूप अवकाश आहे ! जगायचं अन् जागायच खरं वय तें हेंच !"

" खटयाळ वय ! खोडकर वय !"

" सरळ सरळ म्हण ना ! —गध्दे पंचविशीच्या सरहद्दीवरच वय !"

बाईसाहेब नुसत्या हंसल्या. तेवढ्यांत श्रीमंताना आठवण झाली. सांवरून बसत एकदम त्यानी म्हटलं,

"– पण आजचा नाच कसा होता ? "

" नाच छान होता अन् नाचणारीण त्याहून छान होती ! खरंच बाई, असं रूप पाहिलं नव्हतं कधी !"

" बेशक ! लाजवाब !– पण एका स्त्रीनें दुसऱ्या स्त्रीचं रूप-लावण्य विनतक्रार कबूल केल्याचं जगातलं हें पहिलंच उदाहरण !"

" मीं कशाबद्दल कुणाचा हेवा करावा ? माझ्याएवढी भाग्यवान कोण ? पार्वतीच भाग्य लाभलं आहे मला !"

" *त्या पार्वतीला एक सवत होती म्हणे !*"

" स्वारीचा विडा खूप रंगला आहे आज !"

" तुझ्या हातचा विडा नेहमीच रंगतो !"

बाईसाहेबांचं हास्य मावळत गेलं. त्याची मान खालीं गेली.

" काय झालं ? तुझ्या डोळ्यांत पाणी ? काय झालं ? बोल ना ?" बाईसाहेबांना हुंदका आला. दाटल्या गळ्यानें त्या म्हणाल्या,
" मला भारी भारी वाईट वाटतं, माझ्या ह्या लगडेपणामुळं मी स्वारीच्या तरुणपणांत रंगू शकत नाही ! स्वारींना पुरेपुर सुख देऊं शकत नाही ! काय करू मी !"

" हुं ! वेडी !"

श्रीमतांनीं झरकन् बाईसाहेबांना जवळ ओढलं आणि विडा न खातांच बाईसाहेबांचे ओठ रंगले !

महालांत अंधार झाला !

●●

पहाट केव्हां झाली तें समजलंच नाही !

लग्नाचा दिवस. ब्रह्मवृंदाची आणि वऱ्हाडी मंडळींची धांदल सुरू झाली. मूळ आलं. नवरामुलगा लग्नाला निघाला. बाईसाहेब अगदीं मागें मेण्यांत होत्या. त्याना चालवत नव्हतं. श्रीमंत आणि चिमाजी-आप्पा पायी चालले होते.

लग्न थाटांत झालं. रात्रीं हत्तीवरून वरात निघाली. भिकाजी नाईक रास्ते सावकाराची मुलगी श्रीमंत बाजीरावसाहेब पेशव्यांची सून झाली. लक्ष्मीपूजन झालं. सूनबाईचं नाव ठेवण्यांत आलं ' गोपिका ' !

श्रीमतांनीं, चिमाजीआप्पांनी आणि मुलीच्या आईवडलांनीं नवरानवरीला मांडीवर घेऊन त्यांच्या मुखीं साखर घातली. बाईसाहेबानी फक्त सुनेला मांडीवर घेतल. मुलाला खालीं गालिचावर बसावं लागल ! उपाय नव्हता !

मुलाच्या नांवाची साखर वाटण्यांत आली आणि महालांत पैंजण झणकारीत कालचीच वीज अवतरली. साथीदारांचीं वाद्यें वाजू लागलीं आणि ती नृत्यधारा मृगनक्षत्रासारखी थयथय नाचू लागली. ती हसत होती. पण कालच्या तिच्या हसण्यांतली प्रफुल्लता आज दिसत नव्हती, श्रीमताच्या नजरेला नजर जाऊ द्यायच ती टाळीत असावी. अन् त्यातून जेव्हां चुकून नजरा मिळत होत्या, तेव्हां तिच्या मुखावर व्याकुळता उमटत होती. कसली तरी आर्तता तिच्या नजरेंतून ओसंडत होती. अन् आपल्याच खिन्नतेची जणूं जाणीव होतांच ती चंद्रबळानें हंसू आणीत होती.

नाच संपला आणि तिनें ओढणीचा पदर पसरून एकदम गालिचावर मस्तक टेकविलं. मुशाहिऱ्याचं ताट आलं. तें घेऊन तिनें कुर्निसात केला. तिच्या डोळ्यांत दंवबिंदूसारखे अश्रू चमकत असल्याचा भास झाला. मुशाहिऱ्याचं ताट कमानीच्या कडेला उभ्या असलेल्या त्या कालच्याच इसमापाशी पोहोंचलं. श्रीमंतांच्या मनांत काहीं तरी कालवाकालव झाली.

पानसुपारी झाली. मुलीकडची मंडळी डोळे टिपीत परतली. लेकाची आणि सुनेची बाईसाहेबांनीं दृष्ट काढली. त्यांना वाटलं, मुलाबरोबर स्वारीचीहि दृष्ट काढावी ! नंतर त्या मुलाना घेऊन देवघरांत गेल्या. मागोमाग श्रीमंतहि कौतुक पाहत गेले. देवाला नमस्कार करून क्षणभर बाईसाहेब उभ्या राहिल्या. नंतर मुलांच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाल्या

" चला बाळांनो ?"

वळून बघतात तों श्रीमत पाठीमागें उभे !

" काय मागितलस देवापाशीं ?"

" म्हटलं, आमच्यासारखाच सुखाचा संसार होऊं दे मुलांचा ! कुणाचीहि दृष्ट लागूं देऊं नकोस !"

" हं हं ! मला वाटलं, नातवडं लौकर येऊं दे म्हणून म्हणालीस कीं काय !"

" इश्श !"

–आणि लग्न–सोहळा संपला !

रोजचा राजकारणी संसार सुरू झाला. खलबतखान्यांत हिंदुस्थानच्या राजकारणाचे मनसुबे घुमूं लागले. खासे श्रीमत, मुख्य कारभारी अंबाजीपत पुरदरे, बाबा पुरंदरे, चिमाजी आप्पासाहेब, बाबूराव मल्हार वगैरे मंडळीची राजकारणी अनुष्ठानें सुरू झाली. रोज रात्री खलबत चालूच होती.

रात्रीचा पहिला प्रहर उलटला होता. श्रीमंत, चिमाजी अप्पासाहेब आणि इतर मुत्सद्दी खलबतखान्यांत बोलत बसले होते. श्रीमंतांना झोंपावयाला जाण्यास खूप उशीर होणार हें उघड दिसत होतं. बाईसाहेबांचा आजवरचा अनुभवहि तसाच होता. म्हणून बाईसाहेब सहज देवघराशेजारच्या खोलींत गालिचावर बसून मोगऱ्याच्या कळ्याचा गजरा गुंफीत होत्या. शेजारीं एक शमादान तेवत होतं. बराच वेळ झाला. दोन–तीन गजरे गुंफले त्यानीं. फुलं सपली. रात्र खूप चढली होती. त्याच्या डोळ्यावर झापड येत होती. जाभया येत होत्या. पण अजून खलबतखाना सपला नव्हता. श्रीमत आपल्या झोंपावयाच्या महालात आले नव्हते. त्या सहज लोडाशी लवडल्या आणि आणि क्षणांत त्यांना झोंप लागली. अगदीं गाढ झोंप लागली. किती वेळ गेला हें त्यांना समजलं नाही, समजणं शक्यहि नव्हत. त्याना गाढ झोंप लागली होती. अन् मधेंच अचानक जाग्या झाल्या. शमादान जळत होत, गजरे ताटांत तसेच होते. पायाला अतिशय कंड सुटली होती. खरं म्हणजे ह्या दाहामुळेंच त्या जाग्या झाल्या होत्या. त्या लगेच उठल्या. पायाला त्रास होत होता. तशाच कांहीशा लगडत श्रीमंताच्या महालाकडे जाण्यास निघाल्या. श्रीमतांचा महाल जवळच होता. महालांत दिवा जळत असल्याच दिसत होत. खालच्या मजल्यावर पहारेकऱ्याची चाहूल ऐकूं येत होती. बाकी सर्वत्र सामसूम होती.

बाईसाहेब महालाच्या दाराशीं आल्या आणि त्यांनीं दारावरचा किनखापी पडदा अलगद बाजूला केला अन्–अन् त्या दचकल्याच ! त्यांच्या हृदयांत धडधडूं लागलं. त्यांना भोंवळ आल्यासारख झालं. क्षणभर त्यांचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसेना ! पण तें स्वप्न नव्हतं. साक्षात हलतं बोलतं सत्य होत तें ! श्रीमंत मचकावर बसले होते. ती–ती लग्नात नाचलेली मुलगी जमिनीवर पालथी मांडी घालून बसली होती. तिनें आपले हात श्रीमंताच्या पावलावर ठेवले होते अन् आपल मस्तक श्रीमंताच्या गुडघ्यावर टेकवलं होत. ती हुंदके देत होती. शेजारीच समईची ज्योत जळत होती. ती स्फुंदत स्फुंदत कसं बसं बोलत होती,

" अब मैं क्या करूं ? प्यार करण हा गुन्हा आहे कां ? तक्‌सीर माफ कीजिये हुजूर ! तक्‌सीर माफ कीजिये ! "

आणि तिला हुंदका फुटला.

आणि श्रीमंतानीं तिच्या केंसांतून आपलीं बोटें फिरवली. त्यांनीं तिला थोपटलं अन् समईवर फुंकर घातली ! अंधार ! अंधार ! बाईसाहेबांच्या डोळ्यापुढें अंधारी आली. त्यांच्या सर्वांगाला घाम सुटला. जीभेला कोरड पडली. त्यांना वाटलं. आपण पडणार, भिंतीचा आधार घेत कशाबशा त्या माघारी परतल्या. लंगडत, लंगडत, तोल सांवरीत त्या आधीच्या खोलीत आल्या आणि त्यानी लोडावर अंग टाकलं. लोडावर आसवं घरंगळू लागली. स्फुंद स्फुंदून त्या रडूं लागल्या. त्यांच्या सर्व सुखावर वीज कोसळली होती. जीवनातला सगळा सगळा आनंद अचानक गहाळ झाला होता. कल्पनाहि नव्हती अशी. अखेर दृष्ट लागली ! पुन्हा पुन्हा त्या आठवूं लागल्या, आपण पाहिलं तें सत्य कीं भास ? भास कसा असेल ? आपल्या पायांनीं चालत जाऊन आपल्या डोळ्यानीं पाहिलं. तिचे शब्द आपल्या कानानी ऐकले. स्वारीनीं आपल्या हातांनीं तिला थोपटलं, स्वत: दिवा विझवला ! काय बघितलं मी हें ? माझ्या डोळ्यादेखत एका नायकिणीने माझ्या सुखसर्वस्वावर दरवडा घातला ! कधी वाटलं नव्हतं, असं कधी घडेल म्हणून.

लोडावर डोकं घुसळून त्या रडू लागल्या. जखम त्यांच्या वर्मावर होती. मध्यरात्रीची वेळ. एकट्या रडत होत्या. सात्वन कोण करणार ? कोणात तें सामर्थ्य होत ? ज्याच्यांत तें सामर्थ्य होत ते त्या पोरीच्या बाहुपाशात–! असह्य असह्य वेदना ! पायाच्या वेदना तुच्छ त्यापुढें. ह्याच्या लाखपट वेदना.

कोणत्याहि औषधानं ह्सब बरं होत नाहीं. वाढतच जातं. बाईसाहेबांचा अनुभव तसाच होता. पाय फदफदला होता सबंध ! कधीहि बर न होणारं दुखण सोशीत होत्या त्या. आज त्यांच्या हृदयालाच भयंकर ह्सब जडलं ! असाध्य !

असाध्य ? खरंच असाध्य ?

बाईसाहेब मान वर करून बघत होत्या. पलीकडे शमादान जळत होतं. सदैव त्यांच हंसरं चाफेकळी रूप पहायची संवय झालेल्या शमादानाला आज त्यांचं अचानक परमावधीचं दुःखी विकल रूप बघायची वेळ आली होती. किती तरी वेळ त्या शमादानातील शमेकडे सुन्न होऊन बघत होत्या. आठवतील तेवढा आपल्या सौभाग्याचा सुखी खेळ आठवूं लागल्या. आपल्या सुखावर स्वारींकडून असा कधींसुद्धां तडा पडला नव्हता, शितोडा पडला नव्हता. प्रत्यक्षांत तर नाहीच; स्वप्नांतसुद्धां नाहीं.

अन् पुन्हा मुसमुसून आसवांची संतत धार ! लोडावर आसवं झिरपत होतीं. दंडावरचा चोळीचा काठहि चिंब झाला होता. बाईसाहेबांच्या डोळ्यांपुढें सतत तेंच दृश्य फिरफिरून धांवत होतं. श्रीमंतांच्या गुडघ्यावर डोकं टेकविलेली ती पोरगी. तिच्या केंसांतून फिरणारा श्रीमंताचा हात. दिव्यावरची फुंकर ! अंधार ! अन् आसवाची धार ! पुन्हा ती पोरगी ! केंसातून फिरणारा आपल्या खास सत्तेचा हात ! पुन्हा ती फुंकर ! पुन्हा अंधार ! पुन्हा आसवं ! हुंदके ! वेदना ! वेदना एकच. आपल्यावर आजपर्यंत अपरंपार प्रेम करणाऱ्या " स्वारीचं " प्रेम आपण गमावून बसलों !

—आणि त्यांची सहज नजर त्या मोगरीच्या गजऱ्यावर गेली. सुईच्या वेदना सहन करून दोऱ्यात गुफल्या गेलेल्या मुक्या कळ्या किंचित् उमलल्या होत्या. मंद सुवास लहरत होता. त्या कळ्यांच्या गजऱ्याकडे त्या किती तरी वेळ बघतच राहिल्या. शमादान जळतच होतं. ज्योत जळत होती. हलत होती. डोलत होती. सर्व प्रकाश पडला होता. कमी नव्हता, जास्त नव्हता. किती वेळ जळणार होती ती शमादानातील शमा ? तेल संपेपर्यंत किंवा रात्र संपेपर्यंत ! पण तें तिलाहिं माहीत नव्हतं. ती जळतच होती.

आणि शून्य नजरेनें पाहत, लोडावर पडल्या पडल्या बाईसाहेबांना तशीच झोंप लागून गेली. खिडक्या उघड्या होत्या. गारवा वाढत होता.

●●

ललत रागांतील सनईचे सूर लहरूं लागले. वाड्याचा नगारखाना निनादूं लागला. चांगलं उजाडलं. आपोआप डोळे उघडले गेले. बाईसाहेबांनीं लोडावरून मान उंचावली. अंगावरची शाल बाजूला करीत त्या उठून बसल्या. अन् त्याना आठवलं कीं, आपल्याला न कळत झोंप लागून गेली. पण त्यावेळीं आपल्या अंगावर पांघरूण नव्हतं ! कुणी पांघरली ही शाल ? स्वारीनीं–? नाहीं, नाही ! शक्य नाहीं ! सासूबाईंनीच कदाचित्–! पण स्वारीच्या महालातील ही शाल सासूबाई कशा आणतील, कदाचित् नानानें कधीं मधीं उचलून नेली असेल सासूबाईंच्या खोलींत. स्वारी आतां आपल्याला शाल पांघरील ? अहं ! तें भाग्य आतां संपलं आहे ! आजवर ह्याच शालीच्या उबेंत–! बाईसाहेबाना हुंदका आला. त्यानीं ती शाल हृदयाशीं धरली.

खोलीत सुगंध घमघमत होता. रात्रींच्या त्या गजऱ्यांतील मुक्या कळ्या पूर्ण उमलून हसत होत्या. डोळे पुशीत बाईसाहेब उठल्या. शमादान विझलेलं होतं. त्यांतील तेलच संपलेलं होत ! केव्हां विझलं कोण जाणें ! तेल संपेपर्यंत जळत राहिलं. अन् संपल्या क्षणीहि टाहो न फोडता गुपचूप विझून गेलं ! बिचारं !

बाईसाहेबांनीं गजऱ्याचं ताट उचललं. अन् त्याच क्षणी त्यांच्या लक्षांत आलं की, एक गजरा कमी आहे ! कुणी नेला ?

हुजऱ्या पाजऱ्यांची वर्दळ सुरु झाली होती. सासूबाई अंग धुवून त्याच्या खोलीत जपाला बसल्या होत्या. दिवस वर चढत होता. दुखऱ्या पायानें हळूं हळू बाईसाहेब हलत होत्या. रोजच्यासारख्याच पण आज मात्र उदास, खिन्न.

तेवढ्यांत खाली दरवाजावर घोड्यांच्या टापा वाजल्या, रोजच्या नेमाप्रमाणें श्रीमंत स्वत: आणि चिमाजी आप्पासाहेब रपेटीला जाऊन परतले होते. रपेटीहून आल्यावर श्रीमंत स्नानासाठीं येत. शागीर्द गंगाळात पाणी उपसून, आबदारखान्यातील स्नानाच्या प्रचंड दगडी

चौरंगापाशीं ठेवीत. ' शंभो हर हर असा ' गाजावाजा करीत. हंसत खेळत श्रीमंताची अंघोळ चाले. अंग पुसून श्रीमंत पाटावर उभे राहतात न राहतात तोंच स्वतः बाईसाहेब रेशमी जर्द पितांबराची घडी आणून त्याच्या निऱ्या करून श्रीमंतांच्या हातात देत. खोडकर स्वभावानुसार श्रीमताचा कांही तरी थट्टा विनोद चालेच.

आज काहीच घडल नाही ! श्रीमत आले. मुकाटयाने अघोळ केली. पचा आणि नंतर पितावरहि शागीर्दानेच आणून दिला ! श्रीमत जरा चमकलेच. पितांबर नेसून ते देवघरांत गेले. चादीच्या भव्य देव्हाऱ्यांत ताज्या फुलाची पूजा सजवलेली होती, नदादीप जळत होते. तबकांतील तुळशी अन् फुलं त्यांनीं देवाला वाहिलीं. आणि सध्या केली. तीर्थ घेतलं. बाहेर आले. आंतल्या दालनाच्या बारीक जाळीदार खिडकींतून बाईसाहेबांनीं आसूसलेल्या नजरेनें श्रीमंताकडे पाहिलं. जर्द केसरी पितावर, गळयांत सोन्याचा गोफ आणि गोरापान देह ! खरोखर रतीनेहि भाळावं ! बाईसाहेबाच्या मनांत कल्लोळ उठला. ह्या देखण्या तारुण्याची, ह्या दिलदार हृदयाची, ह्या पुरुषोत्तमाची मी कालपर्यंत लाडकी राणी होते. स्वामिनी होते. आज नाहीं ! बाईसाहेब मटकन् खालींच बसल्या.

बाहेर चौरंगावर दुधानें भरलेला चादीचा गडवा होता. बसायला आणि टेकायलाहि पाट होता. पण रोजच्याप्रमाणें बाईसाहेब जवळ नव्हत्या. हें सारं शागीर्दानें मांडलं. बाईसाहेब बाहेर आल्याच नाहीत. श्रीमंतांच्या हातांत शागीर्दानेंच धोतराच्या निऱ्या दिल्या. श्रीमत धोतर नेसले. त्यांनीं दुधाचा गडवा तोंडाला लावला. अन् त्याना आंतून हुंदका ऐकूं आला ! बाईसाहेब आत रडत होत्या. श्रीमंताच्या ओठापाशीं दुधाचा गडवा थबकला. पण लगेच तो घटाघटा पिऊन ते झटकन् उठले. आतल्या दालनांत डोकावण्याचं त्याना धारिष्ट झालें नाहीं, ते आपल्या महालाकडे झपाटयानें निघून गेले, मागोमाग कपडयांची तारटें घेऊन हुजरे धांवतच होते.

अस्वस्थ मनानें श्रीमंतांच्या येरझारा महालांत चालू होत्या. त्याना बाईसाहेबाची गैरहजेरी आणि हुदका फार जाणवत होता. ती नाचणारी पोरगी–मस्तानी–रात्रीं आपल्या महालांत होती ! ' ही ' तर दुसरीकडेच झोंपली होती. उघडी. आपणच तिला शाल पांघरली. गजरा नेला. मग हिला समजलं कसं ?–पण तिला समजलं असेलच का ? कीं केवळ रात्री आपण तिला जाग केल नाही म्हणून रुसली आहे ?–पण तिला, मस्तानीचं अन् आपलं गुपित समजलं नसलं तरी आपण होऊनच सांगावं का ? छे छे, नको ? तिला काय वाटेल ? कस सागाव ? कस सांगाव ? सोपी गोष्ट आहे ही ?–पण आपण सरळ मनांच्या निष्पाप प्रेमळ पत्नीला फसवतों आहोत ! फसवलंच आहे !

श्रीमंत सुन्न झाले. एका बाजूला अपरपार प्रेम करणारी थोर योग्यतेची, शालीन, सुकुमार धर्मपत्नी. दुसऱ्या बाजूला आर्त प्रेमानें विव्हल झालेली अन् विव्हल करून गेलेली निष्पाप गोड मस्तानी अन् कमलततूंच्या दुहेरी पाशांत आणि अवघड पेचात सापडलेले पत प्रधान बाजीराव !

श्रीमंत रात्रीच्या त्या मंचकावर बसले. रात्रीची ती आशातुर नजरेनें ओढणीचा पदर दोन्हीं हातात धरून काहींतरी मागायला येणारी मस्तानी त्याच्या डोळयापुढें आली. तिच तें पहिल वाक्य त्याच्या कानाशीं साद घालू लागलं,

".. इस नाचीज कनीज को मस्तानी कहते हैं !"

तिची व्याकूळ नजर आत्तांहि श्रीमंतांचं हृदय हलवूं लागली.–तिचा शब्दन् शब्द त्यांच्या कानांत घुमूं लागला.

"...हुजूर ह्या अफाट दुनियेंत मी अकेली आहे ! कुण्णी नाहीं मला ! आई नाहीं, बाप नाहीं ! जीव लावून प्यार करणारं कुण्णी नाही. माझे आईबाप कोण होते, तें मला बिलकूल माहित नाहीं. ते जिंदे आहेत की मरून गेलेत तेंहि माहित नाहीं ! मला याद येतेय तेव्हांपासून आजतक मीं अब्बाजीपाशीच आहे. त्यांनींच मला उस्तादाकडून गाण्यानाचण्याची तालीम दिली. मला वाटू लागलं की, आपल्याला आई नसली तरी बाप आहे, अब्बाजीच आपले बाप ! माझ्यासारख्या काहीं मासूम छोकऱ्या त्यांच्यापाशीं आहेत. त्यातल्या जुन्या जातात ! नव्या येतात! आतां माझ्यावरहि पाळी आली आहे ! जो माझी जादासे जादा कीमत करून अब्बाजीला पैका मोजील त्याच्या दावणीला मी बांधली जाईन ! ज्याना मी बाप समजत होते ते मला विकणार आहेत ! माझ्यासारख्या मासूम पोरी वयांत येईपर्यंत पोसून, नंतर त्या विकून पैका कमावण्याचा धंदा आहे त्यांचा ! ...मी लोकाचे घरससार बघते. पक्षाचेहि किलबिलते संसार बघते... मला फार फार वाटतं कीं, आपणहि कुणाची तरी औरत व्हाव ! आपली शादी व्हावी ! खूब खूब प्यार करावी. कुणीतरी मला जवळ घेऊन आपल म्हणावं ! लेकीन हुजूर मालूम है...कुणाच्याहि ससारातील खानदानी इज्जतीची औरत होणं माझ्या तकदीरात नाही ! में जानती हूँ मै कौन हूँ ! एक नाचनेंवाली ! एक गानेवाली ! एक नाचीज लवंडी !......खुदाने खैर केली. ही रूपदौलत त्यानें मला बहाल केली. पण मला आईबाप दिले नाहीत !......हुजूर मैं सचमूच कहती हुँ...मला वेड लागलंय ...आपलं वेड लागलय मला ! नाचण्याच्यावेळी माझी नजर आपल्या नजरेकडे गेली...तोच पहिला क्षण !...मी माझी जान, माझं दिल, माझं हुस्न आपल्या पायावर कुर्बान केल... आतां मरेन मी आपल्यासाठी, आपल्या पायाशी ! मला काही कांहीं नको ? बटकी म्हणून राहीन...कुठेंहि ठेवा, कसंहि वागवा, वाटलं तर मारून टाका !...आपल्या हातून हसत हंसत मरण सोसीन मी...पण मला जिवंतपणीं दूर लोटू नका ! मी भीक मागत्ये. काहीहि नको, मला प्यार हवी ! आपली बटीक म्हणून मरण हवं ! प्यार करणं हा गुन्हा आहे का ? तख्सीर माफ ! हुजूर तख्सीर माफ !"

—आणि न कळत श्रीमंताचे डोळे मिटले गेले. रात्री दिवा विझवल्यानतर झाला तसा अधारच जणू त्याचे डोळे झांकून गेला. त्यांचं अंग शहारलं. गोड झिणझिण्या ओठावर उठल्या. गुलाबाच्या पाकळया अगाअगाला बिलगून गल्या. एका क्षणांत कालची ती सारी धुंद गुलाबी रात्र त्यांना मिठी मारून गेली ! ओठांवरून जीभ फिरवीत गेली !

श्रीमंतानी डोळे उघडले. त्यांचं लक्ष पलगाकडं गेलं, त्याच काळीज चरकलं. पलंगावर सौभाग्यसपन्न काशीबाईसाहेब विडा करीत बसल्या असल्याचा त्यांना भास झाला. त्याच कोमल हास्य, गोड बोलणं, चाफेकळी लावण्य आणि त्याच्या प्रीतीचं अविरत बरसणार सात्विक चांदणं त्यांच्या कानामनाला स्पर्शून गेलं.

" ...मग ओळख पाहू माझ्या अंतःकरणात काय आहे तें ? "

" तिथं मी आहे ! "

तिथं—इथं—इथं, ह्या बाजीरावाच्या अंतःकरणांत आपलं स्थान आढळ आहे, असं समजतीय आपली बायको !

" ...मीं कशाबद्दल कुणाचा हेवा करावा ? मला पार्वतीचं भाग्य लाभल आहे ! " .

आणि त्यानंतर आपण तिला गमतीनें उत्तर दिलं,

" त्या पार्वतीला एक सवत होती म्हणे ! "

आपण खरोखरच सवत आणली. तिला ! एक मुसलमानीण ! एक नाचणारीण ! एका नायकिणीच्या—अन् अन् आपल्याहि सुखाकरितां आपण आपल्या देव्हाऱ्यांतल्या देवतेला दुखवलं आहे. एका निष्पाप कोमल मनाला फसवलं आहे ! आजवर रणांगणांत अजिंक्य ठरलेला हा बाजीराव आज एका नायकिणीकडून जिंकला गेला आहे ! राजकारणांतहि नीति न सोडणारा बाजीराव आज लग्नाच्या बायकोला फसवतोय् ! चुकतंय हें समजतंय, पण काळजाला गळ लागलाय ! मन आणि शरीर मस्तानीकडे खेचलं जातंय ! काय करावं ?

" सरकार, सदरेवर आप्पासाहेब सरकार आन् कारभारी येऊन बसल्याती ! वाट बघत्याती ! दिल्लीच्या थैल्या आल्याती ! "

डोळ्यांसमोर खासबारदार मुजरा करीत आला तरी श्रीमंतांच्या ध्यानांत आलं नाहीं. तो बोलूं लागला तेव्हां ते भानावर आले अन् म्हणाले,

" असं ? निघालोंच म्हणून वर्दी दे ! "

शेल्याची घडी खांद्यावरून डाव्या हातावर टाकून श्रीमंत सदरेवर गेले. दोन प्रहरपर्यंत तेथें राजकारणं चालू होतीं. नंतर ते भोजनास उठले. खास पंगतीला चिमाजी आप्पासाहेब, छोटे नानासाहेब आणि कांहीं बडे दरबारी पाहुणे होते. थाट पेशवाईचा होता. श्रीमंतांचं लक्ष मुदपाकखान्याच्या दाराकडे वारंवार जात होतं. पानें पूर्ण वाढून झालीं होतीं. फक्त तूप वाढण्याचं राहिलं होतं. खानदानी रिवाज असा कीं, सबंध पंगत सुरुवातीपासून अखेरपर्यंत वाढप्यांनीं वाढायची फक्त सुरुवातीलाच पहिलं तूप खुद्द गृहिणीनें—श्रीमंत काशीबाईसाहेबांनीं वाढायचं. श्रीमंतांची नजर बाईसाहेबांच्या दर्शनासाठीं त्या उंबरठ्याजवळ घोळत होती. उत्कंठाहि होती अन् धाकधुकहि होती. अन् तुपाची झारी आली ! बाईसाहेब नाहीं—धाकट्या वहिनीसाहेब चिमाजी आप्पांच्या पत्नी, चांदीची झारी घेऊन तूप वाढायला आल्या! श्रीमंतांना वाईटहि वाटलं अन् बरंहि वाटलं ! पण 'ही' कां आली नाहीं, याची चुटपुटहि लागली त्यांना.

भोजनोत्तर वामकुक्षीसाठीं श्रीमंत महालांत गेले. बाईसाहेब न चुकतां विडा करून देण्यासाठीं येत. आज फक्त तयार विडा तबकांत ठेवून हुजऱ्याबरोबर आला ! श्रीमंतांची खात्री झाली ! आपलं गुपित हिला समजलेलं असलं पाहिजे ! आतां ? पुढं काय ? तिची समजूत घालायची ? कोणत्या तोंडानें ? काय सांगायचं तिला ?—नाहींतर मस्तानीला दूर करायची ! कायमची ! नाहीं नाहीं ! तें शक्य नाहीं ! पाण्याबाहेर काढलेल्या मासुळीसारखी तडफडत मरेल ती ! अन्-अन् आपलीहि अवस्था—?

बाईसाहेबांची अवस्था व्याकुळ हरिणीसारखी झाली होती. सारी दुपार चोरून मुकाट्यानें रडण्यांत गेली. त्यांची अपेक्षा होती कीं, स्वारी आपल्याला येऊन भेटेल. निदान चौकशी करील. तसं घडलं




नाहीं ? त्यांना फारच वेदना झाल्या. कालपर्यंत आपल्यावर समुद्रा-एवढं प्रेम करणारं हृदय, एका रात्रींत एका नायकिणीनें एका घोटांत पिऊन टाकलं ? त्यांना या उपेक्षेच्याच वेदना भयंकर होत होत्या.

रात्र झाली !

बाईसाहेब देवघराशेजारच्या खोलींत गालिचावर पहुडल्या. तोच गालिचा. तोच लोड. त्याच बाईसाहेब अन् तेंच शेजारी शमादान ! तसेच अश्रू अन् तसेच हुंदके !

तिकडे श्रीमंतांचा रंगमहाल रंगला होता ! जवानीचं वादळ सुसाट सुटलं होतं. इकडे बाईसाहेबांच्या गालाखालीं लोड भिजत होता.

शेजारीं शमादान जळत होतं. त्याचं काळीज करपळत होत. किती तरी वेळ, मध्यरात्र उलटून गेली तरीहि, त्या जाग्याच होत्या. सर्वस्व संपल्यासारख्या उघड्या पडल्या होत्या. त्यांचं हक्काचं पांघरूण एका नायकिणीनें हिसकावून नेलं होतं. शमादानातील जळत्या शमेकडे त्या सुन्नपणें बघत पडल्या होत्या. ती शमा प्रश्नचिन्हासारखी त्यांच्यासमोर हलत होती. नाचत होती. त्यांचं प्रतिबिंब शमादानाच्या काचेवर तरळत होतं. त्याचंच प्रतिबिंब त्याना प्रश्न विचारूं लागलं. स्वतःच्या प्रतिबिंबाला त्या उत्तरं देऊं लागल्या.

" तुझ्या पतीकडून असं कां झालं ह्याचा तूं कधीं विचार केलास कां ? "

" हें असं कां झालं ? कां झालं ? त्यांचं तर माझ्यावर फार फार प्रेम होतं ! "

" अग, हें असं होणारच ! तारुण्यानें रसरसलेल्या तुझ्या पतीच्या खेळांत तूं शरीरानें समरस होऊं शकत नाहीस ! सांग शकतेस कां ?"

" नाहीं होऊं शकत ! माझा दोष नाहीं तो ! इसब नांवाच्या मगरीनें माझा पाय पकडला आहे ! गिळलाच आहे सारा ! "

" तें दुखण बरं करण्यासाठीं तुझ्या पतीनें आजवर थोडे कां उपाय केले ? मनःपूर्वक केले, होय न ?"

" होय, केले ! पण मी लुळीदुबळी झाले म्हणून मला त्यांनीं असं कण्हत टाकून कुठल्या कोणा उनाड मैनेबरोबर रममाण व्हायच ? ह्याच कां धर्म ? "

" खरं आहे तुझं ग ! पण हें वय, हें शरीर— विशेषतः पुरुषाचं शरीर भारी अवखळ असतं. अग, कित्येकदा मनान नसतानासुद्धां हें पुरुषाचं शरीर मोहाकडे खेचलं जातं. तुझे पती म्हणजे कोणी ऋषि-मुनी का आहेत ? आणि ऋषिमुनी असलेल्या विश्वामित्राचीहि केवढी दाणादाण उडाली ! माहीत आहे ना तुला ?"

" नको नको ती पुराणातलीं उदाहरण ! आतां मी काय करूं ?"

" तू अजून नीट विचार कर ! विवेक कर !"

" म्हणजे विचार अन् विवेक करण्याची जबाबदारी फक्त माझ्या-वरच ? त्याच्यावर नाहीं ?"

" त्याच्यावरहि असेल ! पण तुझ्या वांट्याचा विचार तुझा तुलाच केला पाहिजे ! अग बघ, तुझे विलक्षण कर्तबगार आणि पार्थपराक्रमी पति वर्षातले आठ आठ, दहा दहा महिने रणांगणावर असतात. ते उपभोगलोलुप असते तर आजवर असंख्य स्त्रियांचे जनानखाने त्यांनीं सजवले नसते का ? तें त्याना सहज शक्य नव्हत का ? त्याबद्दल कोणीं त्याना नावंहि ठेवलीं नसतो. कारण भवतींच जग तेंच करीत आहे. तो एक राजमान्य आणि समाजमान्य छंद आहे. अन राजकर्त्यांच्या बाबतींत तर धर्माचीहि थोडी-फार मान्यता आहेचना ? असं असूनहि आज वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षापर्यंत तुझ्याशिवाय इतर स्त्रीच्या सावलीकडे तरी त्यांनीं बघितलं का ? हिशेब कर ! तुझा संसार सुरू झाल्यापासून, म्हणजे गल्या दहा वर्षांत ते तुझ्या सहवासांत किती राहिले ? फारच थोडे ! सारं जीवन केवळ घोड्यावर, रणांगणावर, तलवारीच्या धारेवर ! आणि इथून पुढेंहि असेच अधून मधून स्त्रीसुख अनुभविणार— अन् तूं ही अशी दुर्दैवानं घायाळ ! लुळी पांगळी ! सांग, त्याला तें तरी सुख पुरेसं लाभलं का ? लाभेल कां ? खांद्यावर पडलेली दख्खनच्या दौलतीची अवघड जबाबदारी दिल्लीला दिपवीत अशा दिमाखांत ते सांभाळताहेत. केवढा अभिमान वाटतो तुला ! होय ना ? मग क्षणभर स्वतःच्या सुखाचा विचार बाजूला ठेऊन त्यांच्याहि सुखाचा विचार कर ! तुझं त्यांच्यावर खरं प्रेम आहे ना ? मग तर त्या प्रेमाच्या पूर्तीतला हाहि एक भाग जाणून तुझ्या मनाचे कांहीं हट्ट सोड ! काहीं हक्क सोड ! त्यांच्या सुखांत तुझंहि सुख विलीन करून टाक ! खरं प्रेम तागडी घेऊन मोजलं जात नाहीं ! डोळे पुसून आहुती दे ! "

" होय ग होय ! खरंच आहे हें ! पण मी माझ्या सुखाचे हात अंचवायला स्वारीसाठीं कोणत्याहि क्षणीं पूर्वींच तयार झाले नसते कां ? त्यानीं मला विचारायला— निदान सांगायला हवं होतं ! मीं त्यांना 'नको' म्हटलं नसतं ! पण माझ्या न कळत मला अंधारांत ठेवून असं करायला नको होतं. मी त्याची बायको ना ?"

" हं ! म्हणूनच कदाचित त्या मुलीबद्दल तुला विचारायला त्याना धीर झाला नसेल ! सांगायला मन बुजलं असेल ! अन् तूंच सांग, अशा गोष्टी लग्नाच्या बायकोला विचारणं, सांगणं सोपं असत कां ? सुसंगत असतं का ..? अशा प्रसंगीं माणूस चोरूनच वागतो ! चुकलं त्यांचं ! चुकतं माणूस ! मन मोठं कर तुझं ! शमादानासारखं ! ह्या जळत्या शमेसारखं ! बघ, कशी जळतीय सर्वांच्या सुखासाठीं ! आहे काहीं कुरबूर ?"

किती तरी वेळ बाईसाहेब त्या शमादानाकडे बघत होत्या. त्यांचंच प्रतिबिंब त्यांच्याच केसांवरून हात फिरवीत होतं, बाईसाहेबांच्या अंतःकरणांतून ओठापर्यंत न कळत शब्द घरंगळत आले.

" मी स्वारीच्या सुखाकरितां झटलं पाहिजे ! "

अन् शमादानाकडे बघतां बघताच त्यांना झोंप लागून गेली. गाढ झोंप !

अन् आपल्याला लहान मुलासारखं थोपटून कुणीतरी झोंपवीत आहे, असा अर्धवट स्वप्नांत, अर्धवट जागेपणीं बाईसाहेबांना भास झाला. त्या दचकून जाग्या झाल्या. अन् बघतांत तो खरोखरच श्रीमंत आपल्याला हळूवार हातानें थोपटीत आहेत अन् आपल्या डोक्या-खाली त्यांची उबदार मांडी आहे, असं त्याना दिसल. अंगावर पांघरुणहि घातलेलं होतं. शमादान तेवत होतं. थोपटीत थोपटीत श्रीमंत म्हणत होते,

" झोंप ! झोंप ! "

केवढा, केवढा आनंद झाला बाईसाहेबांना ! त्यांना गहिंवरून आलं. मोठ्या कष्टानें त्यानी तो गहिंवर आवरला. तरीहि एक हुंदका उफाळून आलाच. त्यानीं आपलं मस्तक श्रीमंताच्या मांडीवर घुसळलं, कुशींत खुपसलं आणि आपल्या दोन्ही हाताचा विळखा श्रीमंतांच्या कमरेला घातला. त्याना वाटत होतं मीसुद्धां फार फार सुखी आहे. फार भाग्यवान् आहे. पार्वतीइतकी ! श्रीमंत थोपटीत आणि केसा-वरून हात फिरवीत होते. त्यांचा हात बाईसाहेबांच्या दंडावरून

फिरला. चोळीचा काठ ओला होता ! श्रीमंत लोडाशी रेलले. लोडहि ओला झाला होता ! त्यांनीं डोळे विस्फारून पाहिलं. त्याची खात्री झाली. हे हिचेच अश्रू ! त्यांच्या डोळयांपुढें लोडावर डोकं टेकून उसळसा रडणाऱ्या बायकोची असहाय्य मुद्रा दिसूं लागली. क्षणांत, तिकडे महालांत पलंगावर गाढ झोंपलेल्या मस्तानीची केविलवाणी मुद्रा तरळून गेली. कितीतरी वेळ ते बाईसाहेबाना थोपटीत होते. माडीवर त्या शांत झोंपल्या होत्या. सुखाच्या त्या शिपल्यात बाईसाहेबांना गाढ झोंप लागून गेली. त्याना माडीवरून किंचितहि न हलविता श्रीमंतांनीहि लोडावर अंग टाकलं. लौकरच त्यांनाहि झोप लागली. सर्वांत जास्त जागरण त्यानाच झालं होतं !

सकाळीं ते जागे झाले. त्याच्या अंगावर शाल पांघरलेली होती. बाईसाहेब मात्र कुठेंच नव्हत्या. त्या केव्हां उठून गेल्या कोण जाणे !

श्रीमंत रोजच्याप्रमाणें आप्पाबरोबर रपेटीस गेले. सगतीला हुजूरपागेचे पाच-पन्नास स्वार दौडत होते. केदार वेशीतून स्वारी दौडत गारपिराकडे गेली. दोन तासानीं स्वारी वाड्यावर परत आली. श्रीमंत आपल्या महालाकडे निघाले. खासबारदार पुढें चालला होता. महालापाशी येतांच खासबारदारानें दारावरचा पडदा बाजूला केला. श्रीमंताचे पाऊल दारात पडलें. आणि ते आश्चर्यानें थक्कच झाले. ते बघतच राहिले. महालात लोडाशी शेजारी शेजारी बसून काशीबाईसाहेब आणि मस्तानी गोष्टी बोलत होत्या !

श्रीमंत आंत गेले, मस्तानी लाजून उभी राहिली. तिनें डोक्याबरची झिरझिरीत ओढणी मुखावर ओढली. तिचं वस्त्रगाळ सौंदर्य भरावलेल्या मधाच्या पोवळ्यासारखं ओढणीतून झिरपत होतं. तिनें लवून कुर्निसात केला. श्रीमंत बाईसाहेब आणि मस्तानी आलटून पालटून एकमेकांकडे बघत होते. तिघांच्याहि चेहऱ्यावर स्मित झळकत होतं.

कोणीच कांही बोलत नव्हतं. त्यांच्या स्मितांतच सारा अर्थ सामावला होता. मस्तानीने श्रीमंताना आणि बाईसाहेबाना हसून कुर्निसात करीत म्हटलं,

" इजाजत फर्माइये हुजूर ! "

आणि अदबीनें ती महालाबाहेर पडली. वाड्याबाहेर पडली. तिला पोहोंचवायला श्रीमंताचा खासबारदार मागोमाग आला होता. दूरसा उभा असलेला तिचा मेणा भोयानीं जवळ आणला. ती मेण्यात बसली. दरवाजावरचे हशम कुतुहलानें, पण चोरट्या नजरेनें बघत होते. मेण्यावरचा पडदा पडला. मेणा पर्वतीकडे चालूं लागला. पर्वतीजवळच श्रीमंताचा खास बाग होता. त्या पर्वतीबागेंतील हवेलीत श्रीमंतानी मस्तानीची रहाण्याची व्यवस्था केली होती. तिचा मुक्काम तेथें होता.

श्रीमंताना बाईसाहेबांशी कांहींतरी बोलायचं होतं पण त्यांना शब्दच सुचत नसावेत. बाईसाहेब त्याच्याकडे स्निग्ध नजरेनें बघत होत्या. श्रीमंत जवळ आले अन् म्हणाले,

" रागावलीस "

" कोणत्या तोंडानें सांगू ?"

" नाही ! फार वाईट वाटलं ! मला कधीं कांहीच सांगितलं नाहीं स्वारीनं ! "

" मीं 'नको' म्हटलं नसतं ! "

श्रीमंतानी चमकून त्याच्याकडे पाहिलं.

" मला कल्पना नव्हती ! मीं तुला ओळखलंच नाहीं ! मला क्षमा—"

बाईसाहेबांनीं श्रीमंतांच्या ओठांवर बोटं ठेवली. त्या चटकन् म्हणाल्या,

" स्वारीचं स्नान व्हायचय ! भूकहि लागली असेल ! —मी वाट बघतेय ! लौकर यावं ! "

महालाबाहेर जात जात त्या बोलत होत्या. श्रीमंत त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत राहिले होते. किनाऱ्यावरून समुद्राकडे पहाव तसं.

—चार-आठ दिवस गेले. मस्तानी कधीं श्रीमंताच्या महालात रात्री मुक्कामाला असे. कधी श्रीमंतच पर्वतीबागेंतून उशिरा रात्री परतत. वाड्याच्या आणि दरबारच्या कान्याकोपऱ्यात हळूं हळूं कुजबूज सुरूं झाली होती. आप्पासाहेबाच्याहि कानावर उडत उडत काहीतरी पडत होत. श्रीमंताच्या मातुःश्री राधाबाईसाहेब याच्याहि कानांवर गुणगुण गेली होती. पण ' चार घटका मौजेखातर असेल काही तरी ' असं त्याना वाटलं. हे ' वस्त्र ' रावाच्या अंगाला कायमच गुंडाळल जात आहे, याची त्याना कल्पना नसावी. स्वतः बाईसाहेबाच्या वागण्या-बोलण्यात संथपणा, शांतपणा आला होता. त्याची आनंदी मुद्रा हसतच होती. पण पूर्वीसारखं ते हास्य खळाळत नव्हतं. त्यांत फार भारदस्तपणा आला होता.

आणि पुण्याच्या ब्रह्मवृंदांच्याहि भिवया एके दिवशीं वर चढल्या —पण आश्चर्यानें ! रागाचे शब्द अजून कुठूनहि उठले नव्हते आणि एके दिवशी सायंकाळीं.——

औरंगाबादेहून साडणीस्वार तांतडीची थैली घेऊन पुण्याला वाड्यावर आला. चिमाजी आप्पांनी थैली घेतली. निजामी दरबारांतील वकिलाकडून काहीं महत्वाचीं राजकारणें आली होतीं. थैली घेऊन आप्पा जातीनं श्रीमंतांच्या महालाकडे निघाले. दिवेलागण झाली होती. महालाच्या दारावर राबतेबदीसाठीं हशम उभा होता. आप्पा येतांच हशमानें मुजरा करीत म्हटल,

" सरकार, महालामदी थोरल सरकार येकलंच न्हाईत?"

" मग कोण आहे दुसरं ?"

आतां काय जबाब द्यावा ? हशम गडबला. घुटमळला.

" सरकार, दुसर बी हाये कुनी तरी ! "

" कोण आहे दुसरं ? माहित नाहीं तुला ?"

रागीट आवाजात आप्पानी विचारलं. हशमाच्या तोंडून शब्दच फुटेना. तेवढ्यात दाराचा पडदा हालला अन् ओढणी पुढें ओढीत मस्तानी बाहेर पडली ! खाली मान घालून ती झपझप निघून गेली. आप्पा विस्मित आणि करड्या नजरेनें बघत बघत पुटपुटले,

" ही मुसलमानीण कोण ?"

" श्रीमंत वहिनीबाईसाहेबाची सवत ! "

मागून अगदीं बारीक दबल्या आवाजांत आप्पांच्या कानांवर शब्द पडले. आप्पानी रागानें मागें वळून पाहिलं. पत्राच्या आणखी दोन राजकारणी थैल्या घेऊन बाबा पुरदरे उभे होते !

" बाबा ?"

" मी म्हणतोय तें खर आहे ? स्वामीनी तपास करावा "

बाबा पुरदरे आप्पाच्या कानात पुटपुटले. आप्पाना ह्या गोष्टीची चाहूल लागली होती. आज तर तिला श्रीमंताच्या महालातून बाहेर

पडतांना प्रत्यक्ष पाहिलं. त्यांनीं बाबाना चिडून दबल्या आवाजांत विचारलं,

"बाबा, नेहमीं कुठं असते ही ?"

"श्रीमतांनी तिला पर्वतीबागेंत 'ठेवलंय'!"

ह्यावर नुसतच 'हुं' म्हणून आप्पा श्रीमंताच्या महालांत गेले. मागोमाग बाबाहि गेले. आप्पा जरा बेचैन झाले होते. थैलीचे जाबसाल त्यांनी श्रीमंतांना पुसले. पण भारी त्रासिक सुरांत पुसले. श्रीमंतांनीं त्यांना विचारलच शेवटीं,

"आप्पा तुझी प्रकृति बरी नाहीं का ?"

कांहीच उत्तर न देता आप्पा भराभरा निघून गेले. श्रीमतांना आप्पांचं हें तुटक वागणं जाणवलं. पण त्याचा अन्वयार्थ त्यांच्या कांहींच लक्षांत आला नाहीं. बाबा पुरंदऱ्यांनीं आणलेल्या थैल्यांतील पत्रें वाचलीं. श्रीमंतानीं त्यांना त्यावरचे निर्णयहि सांगितले. पण लगेच बाबांना म्हणाले,

"बाबा, आज आप्पाची तबियत जरा गरम दिसली ! नाहीं ?"

"हां श्रीमंत !"

"कां रागावलाय आप्पा ? कारण समजलंय का ?"

"अ-अ-नाहीं श्रीमंत !"

माहीत होतं, तरीहि स्पष्ट बोलायची बाबांची हिम्मत झाली नाहीं. श्रीमंतावर बाबाचं प्रेम फार. एका नायकिणीचा पगडा त्यांच्यावर पडावा हें त्यांना कससंच वाटत होतं. शब्द ओठांवर येत होते तरीहि ते मागें ओढून बाबा श्रीमंतांच्या महालांतून बाहेर पडले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दूत घेऊन श्रीमंत सदरेवर निघाले, सदरेवर बाबा पुरंदरे आणि सहा-सात कारकून कामांत गढले होते. श्रीमताच्या नांवाची भालदारानें ललकारी देतांच, सर्वांच्या लेखण्या तात्डतोब थांबल्या. भराभर सर्वजण उभे राहिले. बाबा चार पावलं पुढें गेले. श्रीमंतांनीं सदरेवर प्रवेश करतांच सर्वांनी लवून मुजरे केले. बाबा मुजरा करीत मागें सरकले. श्रीमंत हंसतमुखानें गादीवर लोडाशी बसले. पुन्हा कामकाजाला सुरुवात झाली. चार-पांच कलमांचा फडशा होतोय तोंच दारावरच्या भालदारानें चिमाजी आप्पासाहेबांच्या नांवाची ललकारी दिली. बाबा चट्कन चार पावलं सामोरे गेले. कारकून मुजऱ्याला उभे राहिले, अन् काहींशा रागीट मुद्रेनें आप्पा झपझप पावल टाकीत आंत आले. त्यांनीं श्रीमंतांना मुजरा केला अन् एक पत्र श्रीमतांच्या हातात दिलं. रागेंरागें इकडे तिकडे बघत ते क्षणभर उभे राहिले. श्रीमंत पत्र वाचीत होते. अन् कांहींच न बोलतां आप्पा झपझप निघून गेले ! तें पत्र मस्तानीच्या 'मालकाचं' होत ! त्यानें पत्रात मस्तानीच्या 'किंमतीची रक्कम' अद्याप पावलेली नाहीं म्हणून श्रीमतांना आठवण केली होती !

हं ! आप्पांच्या कालच्या अन् आत्तांच्या त्रासिकपणाची कल्पना आतां आली !—मस्तानी पसत नसावी आप्पाना !

मस्तानीच्या मालकानें लिहिलेल्या पत्राचा आशय असा होता—

"...श्रीमत साहेबांशी मस्तानी आहे, हें पाहून समाधानच वाटत आहे. परतु पोरीचा पैका मला अद्याप पावला नाहीं. लोक बोलतील कीं, श्रीमत साहेबानी पोर हिरावून नेली ! तरी पोरीचा पैका मजला मिळावा, असा सेवेसी अर्ज आहे.

"......"

श्रीमंतानीं काहीं न बोलतां पत्र बाबाच्या हातीं दिलं. बाबांनीं तें वाचलं. म्हणजे अजून मस्तानीच्या खरेदीचा सौदा पुरा व्हावयाचाच आहे; अन् जर सौदा फिसकटला तर ही ब्याद आपोआप श्रीमंतांपासून दूर जाईल, असं बाबांना वाटलं. पण जर खरेदी होऊन मस्तानी आली तर—तर—तर ती कायमचीच घरांत शिरणार, हें नक्की झालं !

"बाबा, रक्कम देऊन टाकून सौदा पुरा करा !"

श्रीमंतांनीं आज्ञा केली. बाबांच्या मनात जरा धस्स् झाल. त्यानीं अदबीनें विचारलं,

"श्रीमत रक्कम किती आहे ? पत्रांत उल्लेख नाहीं !"

"जी ठरेल ती ! कमी असो वा जास्त असो सौदा तोडूं नका !"

"अ-अ-म्हणजे-कांही नाही तसं-पण श्रीमत हा सौदा करायचाच काय ?"

"कां ? पेंच कुठें आला ?"

"अ-अ-नाही ! पण-म्हणजे-ती मुलगी-अ नाहीं-त्या बाई-बाईसाहेब मु-मुसलमान आहेत म्हणून—!"

"आमची मंजुरी आहे !"

आतां काय बोलायचं बाबा चुप झाले. त्यांच्या काळजांत कालवा. कालव झाली. ही बाई मुसलमान–श्रीमंत तिच्या पाशांत गुंतत चालले आहेत. ब्राह्मणाच्या घरांत, पंतप्रधानाच्या घरांत एक मुसलमान रखेली ?—बाबांचं डोकं गरगरायला लागलं. पुढचीं सारी लक्षणं त्यांच्या डोळ्यांपुढें उभीं राहिलीं. श्रीमताच्या आणि बाईसाहेबांच्या सुखी संसारात हा बिब्बा पडतोय, ब्राह्मणाच्या घरांत भ्रष्टाकाराला निमत्रण होतं हें बाबांना दिसूं लागलं.

चिमाजी आप्पाचीहि उलघाल होऊ लागली होती ती याच कारणासाठीं. मातु:श्री राधाबाईसाहेबाचे डोळे वटारले गेले तें याच कारणासाठी. पुण्यातील ब्रह्मवृंदाचे डोळे लाल होऊं लागले तें याच कारणासाठीं ! मस्तानी मुसलमान आहे ! श्रीमतांना बाईच ठेवायचीय् ? ठेवा ! ठेवा एक का, पन्नास ठेवा ! कोण नको म्हणतोय ! पण शोधून शोधली ती ही मुसलमानीण ? सारा भ्रष्टाकार मांडणार ही अवदसा !

पण श्रीमतांना बोलायचं कोणीं ?

मस्तानीचा सौदा पुरा झाला ! शनिवारवाड्यांत मुत्सद्दीमंडळापासून ते कारकून हशमांपर्यंत मस्तानीविषयी बारीक कुजबूज सुरू झाली होती. अन् साताऱ्याला राजवाड्यांत छत्रपति शाहूमहाराजाच्या कानापर्यंत पेशव्याच्या ह्या भरजरी अगवस्त्राच्या बातम्या जाऊन पोहोंचल्या होत्या.

चिमाजी आप्पाना वाटत होती एकच आशा. जर वहिनीसाहेबांनींच श्रीमतांवर निषेधाची जळजळीत आग पाखडली तर हा रावसाहेबांना लागलेला मस्तानीचा छंद सुटेल ! त्याना वहिनीसाहेबांबद्दलहि मोठं नवल वाटत होतं ही असली भ्रष्ट संगत नवऱ्याला लागलीय, ही अवदसा घरात शिरलीय, तरीहि वहिनीसाहेब शातच ! पण त्यांच्यापाशी तरी हा विषय काढायचा कसा ?

आणि मग आप्पांनी फार फार विचार केला. त्यांनाहि वाटलं—आवडत नव्हतं, तरी वाटल कीं, मस्तानी दूर राहतीय, रावसाहेब तिला दूर ठेवूनच तिच्याशी संबंध ठेवताहेत. त्यातल्या त्यांत हें समाधानचं ! तूर्त कोणालाच दुखवूं नये ! नाही तरी इतक्या आग्रही किंमतीनें त्यानीं तिला विकत घेतलंय, तेव्हां ते सहज तिला विसरतील हें असंभवनीयच. तूर्त राहूं द्या !

आणि वादळ उठायच्या आंतच शांत झालं !

एके दिवशीं सकाळीं श्रीमंत पांच-पन्नास स्वारांनिशी पर्वतीबागेंत गले. स्वार बागेबाहेर थांबले. श्रीमंतांचा घोडा दौडत बागेंत गेला. झाडाला बांधलेल्या झोपाळयावर मस्तानी झोके घेत होती. श्रीमंतांना दौडत येतांना दिसतांच तिचा झोका थांबला. ती पळत पळत आली श्रीमंत घोडयावरून उतरले. तिनें घोडयाच्या मानेवर थोपटीत म्हटलें,

" किती दिवसांनीं घोडा हातीं लागलाय ! बसूं या कां ?"

" तुला घोडयावर बसता येतं ?"

उत्तर न देतांच मस्तानीनें घोडयावर टांग टाकली. श्रीमंतांनीं लगेच दुसरा एक घोडा आणविला. स्वत: त्यावर स्वार झाले. अन् घोडे दौडत सुटले. दिव्याच्या घाटाकडे. मागोमाग कांहीं अंतर राखून श्रीमंतांचे खास घोडस्वार येतच होते. मस्तानी श्रीमंतांच्या बरोबरीनें घोडा फेंकीत होती· दोघांची शर्यतच लागली. तिची रिकीब श्रीमंतांच्या रिकीबीपेक्षां बोटभरहि मागें पडत नव्हती. तिची ओढणी वाऱ्यावर उडत होती. केंसांच्या रेशिमलडी उलगडून स्वैर नाचत होत्या. हंसत हंसत तीं दोघंहि दौडत होतीं.

दिव्याच्या घाटाखालीं वडकी नांवाच्या गांवाजवळ डोंगरांच्या कुशींत श्रीमंतांनीं घोडा नेला. आणि एका विशाल तलावाच्या काठांवर दोघांचेहि घोडे थांबले. सोळा कोनांचा सायसंगीन तलाव होता. वो. बांधकाम चालू होतं, श्रीमंतांनींच हा तलाव बांधायला काढला होता, निळया निळया पाण्यावर लहान लहान लाटा उठत होत्या. मस्तानी घोडयावरून उडी टाकून पळत पळत तलावाच्या कांठावर गेली मागोमाग श्रीमंतहि आले. काठाच्या चौथऱ्यावरून तिचें प्रतिबिंब खालीं पाण्यांत हलत होतें. ती जवळ गेली, खालीं वांकली. पाण्यांत मासळया खेळत होत्या. ती हंसत हंसत मजा बघत होती. मासळया झिम्मड उडवीत होत्या. श्रीमंत हंसले अन् म्हणाले,

" तुझ्या ओठांचं प्रतिबिंबि पाहून त्या मासळयांना वाटलंय कीं, डाळींबाचे दाणेच पाण्यांत पडले आहेत !"

मस्तानी लाजून हंसली. तिनें विचारलं,

" ह्या तलावाचं नांव काय ?"

" अजून नांव ठेवलं नाहीं !"

" कोणतं नांव देणार तलावाला ?"

" मस्तानी तलाव !"

ती पुन्हा लाजली, अन् मग किती तरी वेळ तळयाच्या कांठानें भटकून तीं दोघं परतलीं. मस्तानी अतिशय आनंदांत होती. आतां आपण हक्कानें श्रीमंतांचे झालों आहोंत, हा तिचा आनंद होता पण एकदम तिच्या मनांत प्रश्न आला कीं, आपण श्रीमंतांचे हक्काचे झालों हें खरें, पण श्रीमंत आपल्या हक्काचे झाले कां ? ● ●

चार महिने उलटले.

शनिवारवाडयांत निरनिराळीं बांधकामं चालली होतीं. श्रीमंतांनीं ईशान्य कोपऱ्यांत एक सुंदर महाल बांधण्यासहि सुरुवात केली होती. कोणासाठीं माहीत आहे ?– मस्तानीकरितां ! शू: ऽ ऽ ! मोठयानें बोलायचं नाहीं ! गुपित आहे तें !

श्रीमंतांचे आणि मस्तानीचे दिवस आनंदांत जात होते बाईसाहेब पायावर फुंकर घालीत होत्या, त्यांच्या पायावर नानापरीनें उपचार चालू होते. औषध, तोडगे, नवस–सर्व कांहीं. पण पायाला उतार नव्हता. पाय अगदीं दुबळा झाला होता. बेडी ठोकल्यासारखा.

मस्तानीच्या पायांत विजली नाचत होती. ती नाचूं लागली कीं, श्रीमंत भान विसरून जात. तिचा आवाजहि गोड होता. श्रीमंत मंत्रमुग्ध होऊन जात.

बाईसाहेब फार फार दक्षता घेत, चुकूनहि श्रीमंतांच्या कानावर आपल्या वेदनेचा हुंदका जाऊं नये ह्याची. औषधाचा त्यांना अगदीं वीट आला होता.

श्रीमंत मस्तानीकडे गेले कीं, तबकांत सुंदर रंगीबेरंगी पेले भरून ती श्रीमंतांपुढें घेऊन येई, अवीट गोडी होती त्या पेल्यांत. निरनिराळया तऱ्हेचीं सरबतं करण्यांत मस्तानी फारच कुशल होती. श्रीमंत मस्तानीकडे गेले कीं, साक्षात् रसराज शृंगार सप्तरंगांनीं रंगपंचमी खेळत राही. कधीं पैंजणांच्या रिमझिमाटांत ऊर्वशी अवतरे. कधीं गोड आलापांच्या प्रपाताखालीं ते न्हाऊन निघत. कधीं सरबतें, कधीं मादक गप्पागोष्टी अन् सारं काहीं ! ––

श्रीमंत बाईसाहेबांच्या महालांत आलें कीं, ?– पण चुकूनहि कधीं बाईसाहेबांना त्यांनीं उदास, रडवेलं पाहिलं नाहीं. पायांतलं दुखणं पायांत ठेवून त्या हंसत, बोलत. तिथं सप्तरंग नव्हते. नाच नव्हता. गाणं नव्हतं. तिथल्या शब्दांत, हंसण्यांत आणि हालचालींत भक्तिरस होता. अथांग ! शृंगार होता, पण सात्विक शांत ! बाईसाहेबांना आपरंपार आनंद होत होता. एकाच गोष्टीचा. मस्तानीसारख्या घमघमत्या हिरव्या चाफ्याच्या सहवासांत राहूनहि स्वारी माझ्यासारख्या तुळसमंजिरीला कधींहि विसरत नाहीं ! बस् ! सर्व कांहीं पावल, लाभलं !

(पृष्ठ २० वर चालू)

सॅन्टोमिक्स किलोझोन व जाई काजळाचे निर्माते.

बक्षिस! बक्षिस!

व्यापाऱ्यांनी कॅलेंडरें व माल यांच्या संयुक्त बक्षिस योजनेसाठीं लिहावें

वेस्टर्न इंडिया केमिकल कंपनी मुंबई-२



# आकाशगंगा

सुरेश भट

**स्पंद पहिला**

जन्मलों तेव्हांच नेत्रीं
आंसवें घेऊन आलों !
'दे तुझी आकाशगंगा....'
बोल, मी केव्हां म्हणालों ! ॥ १ ॥

[ राहशी माझ्यांत जेव्हां
पुष्पगंधासारखी तूं—
सांग, मी मागून आतां
कोणता साधीन हेतू ! ] ॥ २ ॥

घेतला मीं श्वास तेव्हां
कंठ होता कापलेला !
पोळलेला प्राण माझा
बोलण्याआधींच गेला ! ॥ ३ ॥

एकदां.... होती जराशी
माझिया रक्तांत लाली !
अन् वसंताच्या लकेरी
न्हात होत्या भोंवतालीं ! ॥ ४ ॥

एकदां.... केव्हांतरी मी
चांदण्यामाजीं बुडालों !
एकदां.... कोठेंतरी मी
अमृताचा संग झालों ! ॥ ५ ॥

आज या वेड्या मनाचा
जोगिया गाऊन झाला !
दूरच्या हांकेप्रमाणें
ऐकतों आतां स्वतःला ! ॥ ६ ॥

घेऊनी आसूड हातीं
लागलें आयुष्य मागें !
[ हाय माझ्या हुंदक्यांनीं
जाहलें दुर्दैव जागें ! ] ॥ ७ ॥

कां बरें मातींत माझ्या
एकही अश्रू ढळावा !
....एकट्याच्या काळरात्रीं
काजवाही आढळावा ! ॥ ८ ॥

गीत हें घायाळ माझें
लावुनी माझ्या उराशीं
मी असा दाही दिशांना
हिंडतों आहे उपाशी ! ॥ ९ ॥

तूं न यावें सोबतीला
—शाप माझ्या पयाचा !
चाललों घेऊन हातीं
हात माझ्या वेदनेचा ! ॥ १० ॥

फोडुनी टाहो कुणाला
लाभला येथें जिव्हाळा ?
....माणसांच्या सावल्यांचा
देश हा आहे निराळा ! ॥ ११ ॥

येथल्या संभावितांचीं
पाठ शास्त्रें अन् पुराणें !
माणसाचें दुःख माझें....
तें तसें प्रेताप्रमाणें ! ॥ १२ ॥

माझियासाठीं हिताच्या
सांगती ते चार गोष्टी !
—जे शितें खाती सुखाच्या
अन्नछत्रांतील उष्टीं ! ॥ १३ ॥

पांगळ्या पायांत माझ्या
ठोकल्या त्यांनींच बेड्या !
बोलले कानांत कोणी—
'तूं असा जाशील वेड्या !' ॥ १४ ॥

फाटक्या झोळींत माझ्या
ओतिशी तूं चंद्रतारे ?
पाहिले नाहींस कां हे
येथले चौक्या पहारे ? ॥ १५ ॥

मी मला सोडून आलों
मागल्या मार्गे कधींचा....
थांबला तेव्हांच तेथें
अर्थ माझ्या सोसण्याचा ! ॥ १६ ॥

पेटल्या कोठून वक्षीं
आठवांच्या दीपमाळा ?
[ कां गडे केलास तूं हा
माझियासाठीं उजाळा ? ] ॥ १७ ॥

हारलों आहे तरीही
कैफ माझा ओसरेना !
हें तुला ठाऊक नाहीं....
मी विझोनीही विझेना ! ॥ १८ ॥

नीज येता झोंपतों मी
घेऊनी वारा उशाला !
गात अंगाई उठे या
रोमारोमांतून ज्वाला ! ॥ १९ ॥

कां गडे माझ्याकडे ही
कोर चंद्राची कलावी ?
कां गडे माझ्या दिशेनें
वाट काळाची चुकावी ? ॥ २० ॥

हें खरें ? माझा मला मी
लागलों होतों स्मराया ?
[ —अन् गजांआडून कांहीं
धुंद ओळी गुणगुणाया ? ] ॥ २१ ॥

हाय, अस्तित्वास माझ्या
काय हें झालें कळेना !
वाजतें पाऊल माझें....
चेहरा माझा दिसेना ! ॥ २२ ॥

प्रश्नचिन्हासारखा मी....
उत्तरें शोधून झालीं !
—सांगण्या आलेंच नाहीं
हें निळें आभाळ खालीं ! ॥ २३ ॥

आज माझें शून्य गाई
डोलतो ऐकून मीही !
[ मात्र अस्ताईसमोरी
अंतरा आलाच नाहीं ! ] ॥ २४ ॥

त्या अबोलीच्या फुलांना
सांग तूं माझी खुशाली !
अन् पुन्हा हें सांग त्यांना—
'हांसतांना भेट झाली !' ॥ २५ ॥

(क्रमशः)

## शनिवारवाड्यांतील शमादान... ( पृष्ठ १७ वरून चालू )

आणि बाईसाहेबांना आणखी एका गोष्टीचा मोठा अभिमान वाटत होता, मस्तानी स्वारीच्या संगतींत येऊनहि तिच्या सहवासामुळें स्वारीचं लक्ष राजकारणांतून विचलीत झालेलं नाहीं, ह्या गोष्टीचा.

● ●

चिमाजी आप्पा गुजराथवरील स्वारी फत्ते करून परत आले. आप्पांनीं पावागड जिंकला होता. आप्पांच्या फौजा पुण्यांत आल्या. जरिपटका आणि नौबत हत्तीवरून शनिवारवाड्यापुढें आले. त्यांचं लक्ष डावीकडच्यां चौकांत गेलं. पूर्वी रिकाम्या असलेल्या चौकांत सुंदर डौलदार महाल बांधून पुरा झालेला त्यांना दिसला !

आप्पा प्रथम देवघरांत गेले. नंतर काशीबाईसाहेबांना नमस्कार झाले. त्यानीं नमस्कार केला. बाईसाहेबांनीं आशीर्वाद दिला.

"शतायुषी व्हा भावजी ! तुमच्या विजयाचीं पत्रं वेळोवेळीं येत होतीं. फार आनंद व्हायचा ! सासुबाई तर कौतुकानें म्हणाल्या, 'माझीं मुलं तर राम-लक्ष्मणासारखी आहेत !'"

"अ–पण, रावसाहेब साताऱ्याहून कधीं येणार आहेत ?"

"सांगून झालंय कीं, आठ दिवसात !"

"–आणि वहिनी, महाल छान झालेला दिसतोय हं ! खास तुमच्यासाठीं दिसतोय ?"

"अ–हं हं ! पण मला काय करायचाय एवढा महाल ?"

"मग कोण रहातंय सध्यां तिथं ?"

"मस्तानी !"

"मस्तानी ? शनिवारवाड्यांत मस्तानी ?"

"हं ! तिच्यासाठीच बांधलाय !"

"म्हणजे ती मुसलमानीण आतां आपल्या रहात्या वाड्यांत आली ? आणि वहिनी, तुम्हाला हें रावाचं वागणं पसंत आहे ?"

"स्वारीचं सुख त्यांत आहे!"

"वहिनी, वहिनी, पण तुमच्या सुखाचं काय ?"

"भावजी खरच सांगत्यें, मी फार सुखी आहे ! स्वारीचं सुख तेंच माझं सुख !"

"हरे राम ! नाहीं वहिनी, ही जळती चूड आपल्या घरांत नको. रावसाहेब यायच्या आत तिला वाड्यातून काढून परत पर्वतीबागेंत–"

"मस्तानी साताऱ्याला गेली आहे. स्वारीनं तिला आपल्याबरोबर नेलंय !"

"छान ! उत्तम ! छत्रपतीच्या दर्शनाला जातांना बरोबर हें अंग-वस्त्र ! काय, चाललंय काय हें ?"

"तिला नसेल का इच्छा होत स्वारीबरोबर जाण्याची ?"

"वहिनी, तुमचीहि कमाल आहे !"

"काय झाल ?"

"नवऱ्यावरहि प्रेम करतां अन् सवतीवरहि प्रेम करतां ?"

"भावजी, आपण आपल्या आपल्या माणसाचीं मनं सांभाळलीं पाहिजेत ! नको का ?"

"मनं सांभाळीत बसायचं कीं राज्य सांभाळायचं? वहिनी, रावाच्या हातात मराठी दौलतीची शिक्के कट्यार आहे ! जबाब-दारीची समशेर आहे !"

"पण ती समशेर एका बाईपायीं बोथट बनणार नाहीं अन् ढिलाहि पडणार नाहीं भावजी !"

"कशावरून ?"

"भावजी, स्वारी तशी नाहीं !"

"पण होईल त्या बयेमुळं !"

"केवळ एका स्त्रीमळं स्वारीचं राजकारणांत दुर्लक्ष होईल असं कसं म्हणतां ? स्त्रीमुळच दुर्लक्ष व्हायचं असत तर गेल्या नऊ वर्षी-यहि नसतं कां झालं माझ्यामुळ ? स्वारींना आपण समजून घेतलं पाहिजे ! साभाळून घेतलं पाहिजे ! स्वारीकरितां मस्तानीलाहि आपण, मर्यादा सांभाळून, शक्य तेवढं सामावून घेतल पाहिजे आप-ल्यांत ! नाहीं का भावजी ?"

"तें कांहीं नाही ! ही आग आत्तांच विझवली पाहिजे ! मस्ता-नीला दूर केलंच पाहिजे ! माझा राव जसा होता तस्सा परत हवाय!

"अगदीं जशी होती ना, तशीच सुस्वरूप अल्लाद आहे स्वारी ! भावजी, मस्तानीची जर जबरदस्तीनें ताटातूट केली तर स्वारी खंता-वेल ! अन् मस्तानीहि स्वारीसाठीं खंत घेईल !"

"चांगलं ! म्हणजे पुन्हा तुम्हांला काळजी दोघांचीहि !"

"भावजी, तुम्हाला बायकांची मनं नाही समजायचीं !–जाऊं द्या सारं भावजी सध्या ! मला आधी सागा, तुम्हीं जाऊबाईंना भेटलांत कां ? सासूबाई इथं नाहींत. नाशकाला गेल्यात. जाऊबाईंचे दिवस अगदीं भरत आलेत. अवघडल्यात त्या. प्रकृतीहि बरी नाहीं. तुम्ही स्वारीवरून आलांत. फार फार आनंद झाला मला. माझ्यापेक्षांहि जाऊबाईंना केवढा तरी आनंद झाला असेल ! आधीं त्यांना भेटा ! बायकांचीं मन तुम्हा पुरुषांना कधीं कळायचीं नाहीत ! जा लौकर?"

आप्पा खरोखरच झटकन् उठले ? त्यांची बायको गरोदर होती. तिचे दिवस अगदीं भरत आले होते. बाईसाहेबांनी आप्पाना मोठ्या गोड युक्तीनें परतवलं. पण त्यांच्या काळजांत रुखरुख सुरू झाली. खरंच, आतां शनिवारवाड्यांत वादळ उठणार कां ?

अंधार पडत चालला होता. त्या शून्य नजरेनें खिडकीतून आभाळाकडे बघत उभ्या होत्या. किती तरी वेळ. महालातली समई आणि शमादान पेटवून दिवट्या केव्हा येऊन गेला हें त्यांच्या लक्षांतहि आलं नाहीं.

मस्तानीसह श्रीमंत आणि बाबा पुरदरे साताऱ्याहून पुण्यास आले. आप्पांची आणि त्याची भेट झाली. गुजराथेंतील बुलद विजयाबद्दल श्रीमंतानी आप्पाच मनसोक्त कौतुक केलं. दोघेंहि भाऊ भाऊ एक-मेकाच्या सहवासांत पार पार सारं जग विसरून गेले. श्रीमंतांना मस्तानीचीसुद्धां आठवण झाली नाहीं ! अन् आप्पासुद्धा मस्तानीला विसरले ! ! चार घटका कशा गेल्या तें कोणालाच समजलं नाहीं.

आप्पा स्नानासाठीं उठले. त्यांना खिडकीतून तो मस्तानीमहाल दिसला ! महालाच्या सज्जात हातांवर दाणे घेऊन ती उभी होती. एक गिरेंबाज कबुतर तिच्या बोटावर बसून तिच्या तळहातावरचे दाणे टिपीत होतं. एक कबुतर तिच्या खांद्यावर बसलं होत अन् पंखांत चोच खुपशीत होत.

आणि आप्पाच्या डोक्यांत झिणझिण्या उठल्या ! जें घडणार नाहीं असं त्यांना वाटत होतं, तेच घडल होतं. जी मस्तानी पेशव्यांच्या घरापासून दहा पावल दूर राहील असं वाटल होत, ती मस्तानी शनिवारवाड्यात शिरली होती अखेर ! आप्पानीं मान वळवून श्रीमंताना विचारलच,

"राव, नवीन महाल कोणासाठीं ?"

"मस्तानीसाठीं ! ती रहाते तिथ !"

( पृष्ठ १२१ वर चालू )



# आगोळ

अ र विं द  गो ख ले

तालुक्याचं ठिकाण दहा वर्षांच्या कालावधींत जितकं बदललें तितकं तें गांव बदललं होतं. मोटर स्टँड मोठा झाला होताच, पण बाजारपेठहि गजबजली होती. रेडियोचा धडाका वाढला होता. नव्या इमारती व नवीं माणसं ठायीं ठायीं दिसत होतीं. रस्त्यानें जाणाऱ्यांत स्त्रियांचं प्रमाण अधिक वाटत होतं. दहा वर्षांत बरंच बदललं होतं. नाहीं म्हणायला स्टँडजवळचं गुल्मोहराचं झाड व त्याखालची आंधळी भिकारीण तीच, तशीच होती. बाजारच्या रस्त्यावरचं अण्णाचं चहा-भज्याचं होटेल अजून चालूं होतं. शंकराच्या देवळापुढील नंदीवर लहानपणीं स्वार होण्याचा मुलांचा खेळ आजहि सुरू होता. मधल्या आळींत शिरतांना येणारा ओल्या मातीचा व उग्र चांफ्याचा मिश्र, मंद वारा अजून रेंगाळत होता.

मधली आळी ओलांडून माधव मामाच्या घराशी आला. तें चंद्रमौळी घर, जुनाट दिंडी दरवाजा, उजव्या पिवळ्या भिंतीवरचं पर्वत तोलणारं मारुतीचं चित्र, घराशेजारचा ओढ— सगळं समोर दिसतांच आपल्या मनांत काय भावना येतात यांचा तो अंदाज करूं लागला. आजोळची ओढ, आईची आठवण—पोटरीवर डांस चावला व पाय वर घेऊन माधव पोटरी कराकरा खाजवूं लागला. पांच तासांच्या प्रवासानें अंग अगदीं आंबून गेलं. एका हातातली बॅग सांवरीत दुसऱ्या हातानें त्यानें जोरानें कडी वाजविली.

बराच वेळ कुणीं दार उघडलं नाही. मामा कुठें गेले? मामी, तारी, आजी...तारीला त्यानें वर्षापूर्वी पाहिलं,तरी होतं. पण आजीची गेल्या दहा वर्षांत भेटहि नव्हती. किती म्हातारी झाली असेल तीहि. काय वाटेल तिला? आई गेल्यावर माधवला मांडीवर घेऊन ती रडली. माधवनें परत घाईनें दार ठोठावलं.

दार उघडलं. मामा, मामी, तारी, आजी सगळेच दारांत गोळा झाले. उन्हाच्या झोतात उभ्या असलेल्या माधवला मामांनीं प्रथम ओळखलं नाही. पण दुसऱ्या क्षणीच ते हंसून म्हणाले, "माधव होय! ये, ये, अरे, पत्र तरी धाडायचंस. आम्हाला वाटलं, आतां येत नाहीस् तूं. ये ना—"

आजोळचीं सगळीं माणसं एकदम भेटलीं, दार उघडतांच आंतली ओसरी, अंधेरं माजघर, सैपाकघराचं दार, मागील दारच्या झुडपांचा वास समोर आला नि माधवला एकदम विचित्र झालं. हेंच चित्र आपण आज चार दिवस रेखाटत होतो? हेंच पाहण्यासाठीं आपण घर सोडून, मित्रांचा सहलीच्या बेत तोडून, आपल्या आईचं मन मोडून इतकं दूर आलो कां? त्याला कळेना. त्या गोंधळांत आजीला नि मामामामींना नमस्कार करायचंहि तो विसरला. तसाच आत गेला. ओसरीवरच्या जुनाट बांकड्यावर बॅग ठेवून तिथेंच बसला.

"अरे, आंत ये ना—तूं कोणी परका कां आहेस? ये ना—" मामा त्याची बॅग उचलून माजघरांत जात म्हणाले. मामा होते तसेच होते. कधीं कधीं शहरात आलें कीं न चुकतां ते घरीं येत. बाबाशीं बोलत, माधवच्या अंगावरून हात फिरवीत व खाऊला रुपया देत जेवायचं आमंत्रण काहीतरी सबब सांगून टाळीत व निघून जात. मामांना तो दर सहा-आठ महिन्यानीं पाहत होता. तारीलाहि गेल्या सालीं त्याने एका लग्नात पाहिलं होतं. पण मामीचं नि आजीचं दर्शन नव्हतं. मामी किती सुटल्या होत्या. अन् आजी पार वाळली होती. माधव आजीकडे वेड्यासारखा पाहात राहिला.

मामांनीं त्याची बॅग आत नेऊन ठेवली. मामीनी आंतून लगबगीनें भाकर तुकडा आणून त्याला ओवाळलं. अजून तो आजीकडेच पाहात होता. ती म्हणे, थेट आईसारखी दिसते. रंगारूपांत,आवाजात व हालचालीत मायलेकी अगदीं सारख्या होत्या. आई जगती वाचती तर कांहीं वर्षांनीं अशीच दिसली असती. आई आतां कशी दिसली असती? आजी कांही वर्षांपूर्वी कशी होती? आईचं रूप तो हळूहळू विसरूं लागला होता. तिची रोज आठवण येणंहि चुकत होतं. आजीच्या अधुक डोळ्यांत पाणी भरलं आहे असं माधवला वाटलं व तो गलबलून गेला. जावं नि आजीला मिठी मारावी. 'आई' म्हणून ओरडावं व खूप रडावं असं त्याला वाटलं. आजीनी आई गेल्यावर त्याला मांडीवर घेऊन हंबरडा फोडला तें आठवलं व तो थिजून गेला. रडायला, आईची आठवण काढायला तो लहान कां होता? चांगला मॅट्रिकची परीक्षा देऊन आला होता. नव्या आईच्या मायेच्या उबेंत होता—"तोंड धुतों—' म्हणून माधव म्हणाला. मोरीकडे गेला.

माधवच्या आगमनानें तें ओल आलेलं जुनाट घर उजळून गेलं. मथीचा मुलगा आला म्हणून मथीच्या आईचा जीव उमलून आला. लेक गेल्यावर आपल्या नातवाचं तोंड तिच्या दृष्टीस पडलं नव्हतं. दर वर्षीं उन्हाळ्याच्या सुट्टींत आजोळी येण्यासाठीं ती त्याला पत्र टाकी, पण तो कधीं आला नाहीं. लवकरच त्याला सावत्र आई आली आणि मग लेकरूं आपल्याला कायमचं अंतरलं असं त्या माऊलीला वाटल. माधवला त्या बयेनें छळावं अन् मग अखेर कायमचं आजोळी धाडाव अशींहि विचित्र स्वप्नं तिनें चितारलीं. पण दिवस लोटले नि माधवचे पाय कांही आजोळी लागले नाहींत. तो सावत्र आईच्या छत्राखालीं वाढूं लागला, कधीं मधीं नानू शहरांत गेला की त्याला भेटून येई, माधव मजेंत आहे—हें त्याच्या तोंडून ऐकल कीं समाधान मानाव की खेद करावा हें त्या लेकीच्या दुःखांत अजून गुरफटलेल्या बाईला कळत नसे. मथी गेली. एकुलती एक लेक गेली अन् मग तिचा एकटा मुलगा माधवहि दुरावला. म्हातारी आसवं ढाळी नि दिवस ढकली. अन् आतां अचानक नातू आला. चागला मोठा झालेला. मॅट्रिक होणारा मुलगा आला. आजीची मुद्रा उजळली- अंगांत बळ आलं. सगळ घर त्यामुळें गजबजल्यासारखं झालं.

"किती मोठा दिसतो नाही—? उंच झालाय् चांगलाच! सोळावं लागलं मला वाटतं त्याला—" मामी चहा करीत म्हणाल्या.

"सोळावं सरलं त्याला पुसाच्या महिन्यांत मथीला जाऊनच दहा वर्सं होतील आतां—" डोळ्याला पदर न लावतां आजी म्हणाली.

"दहा वर्षांनी आला. आधीच आला असता पण त्या बाईनीं नको जाऊं म्हटलं असेल. आतां मोठा झाला म्हणून येऊं शकला—" नवऱ्याला नि सासूला आवडेल असं बोलावं ह्या उद्देशानें मामी म्हणाल्या.

विहिरीच्या थंड,वेगळ्या चवीच्या पाण्यानें तोंड धुतल्यावर माधवला बरं वाटलं. धुळींतल्या, उन्हातल्या, गर्दीतल्या प्रवासाचा शीण गेला व टवटवीत झालं. वर्षभर केलेल्या अभ्यासाचा, जागरणाचा, गाईडांचा, व परीक्षाचा त्रास आटोपल्यासारखं झालं. ह्या नव्या वातावरणांत, मायेच्या माणसांत दोन आठवडे तरी काढायच्या कल्पनेनें तो सुखावला. टॉवेलानें तोंड पुशीत बाहेर आला नि मामीच बोलणं त्याच्या कानी आलं. मामींनीं त्याला पाहतांच हंसरा, आर्जवी चेहरा केला. मामीच्या लग्नातल्या, तारी झाली तेव्हांच्या— अशा कांहीं किरकोळ आठवणी— बाकी मामीचा त्याचा संबंध आला नव्हता. त्याचं बघण नि बोलणं एकदम माधवाच्या मनावर व्रण उठवून गेलं. त्याला आवड नव्हती, आकांक्षा नव्हती तरी संस्कृतचे मास्तर त्याला खास वर्गात येण्यासाठी, शंकरशेठ शिष्यवृत्तीसाठीं प्रयत्न कर म्हणून पाठीस लागावयाचे त्याची त्याला आठवण झाली.

एकदम त्याला वाटलं कीं, सगळ्यांना खणखणीत आवाजात बजावून सांगावं कीं, मी तुमचाच आहे, तुमच प्रेम मला हवंय्. पण अशी एकसारखी करूणा दाखवू नका. माझी परवड होत आहे, मी अभागी आहे असं बोलूं नका. सावत्र आईचं माझं उणेपण काढू नका. मला आई नाही, सावत्र आईनीं प्रथम दुस्वास केला, मी खूप सहन केल— सारं खरं! पण तें आतां संपल, एका घरांत राहून, झगडून अखेर एकमेकांना सभाळून घेतलं आहे. माझी

नवी आई मला आतां त्रास देत नाही. देऊं शकत नाही. मी तिला आवडत नाहीं असं नाहीं. मीहि तिचा मान ठेवतो. अखेर ती आतां आईच्या ठिकाणीं आहे–तिला बोललं कीं माझ्या वडिलांना बोलल्यासारखं होतं. तेवढं करूं नका ! हें माझ्या आईचं घर, माझं आजोळ आहे इतकीच जाणीव मला बाळगूं द्या–

पण तो कांहींच बोलला नाहीं. मामाच्या जवळ झोपाळयावर बसला. तारीनें पुढें केलेली पोह्याची बशी घेऊन मुकाटयानें खाऊ लागला.

माधव मनापासून खात होता. झोपाळा हळूवार झुलत होता. पोह्यांतील कडीलिंबाचा नि स्टोव्हवरील चहाचा वास सुटला होता. संध्याकाळच्या झुळका चोहोकडे चिमण्यासारख्या धांदल करीत होत्या. कसं प्रसन्न, तृप्त वाटत होतं. आजी डोळे मिटून व तारी नजरेनें मामा–भाच्याचा संवाद ऐकत होत्या.

" बाबूराव बरे आहेत ना ? "

" हूं–"

" पेपर्स कसे गेले ?"

" चागलें. इंग्रजीचा जरा जड गेला–"

" पास सहज होशील तू !–मग काय बेत आहे ? मुंबईला शिकायला जायचं नक्की कां ?–"

" पास तर होऊं दे. मग अॅडमिशन् मिळायला हवी. पण गेलों तर मुंबईलाच जाईन–"

" म्हणजे घर सोडावं लागणार ! अन् मुंबईत होस्टेलमध्येंच राहावं लागणार. एकटयानं, इतकं दूर जायचं म्हणजे–"

" मामा, मी आतां लहान कां आहे ? होस्टेल लाईफहि मला एकदां अनुभवायचंय्–"

माधव दूर जाणार, एकटा राहणार ह्याची बोच सगळयानाच लागली. इतक्या दिवसानीं आला, अन् आतां अधिकच दूर चालला. सावत्र आईपासून बाजूला होणार एवढीच त्यांतल्या त्यात समाधानाची बाब होती.

खाणंपिणं आटोपून माधव मामांच्या बरोबर सगळं घर हिंडून माडीवर गेला. मामा बोलत होते. घराबद्दल, भिंतीवरच्या फोटोंबद्दल सागत होते आणि माधवला एकदां पाहिलेली मुंबई व न पाहिलेलं होस्टेल डोळयांपुढें दिसत होतं. कितीतरी दिवस रंगवलेली स्वप्नं आतां महिनाभरात साकार होणार होतीं. मुंबईच्या मायानगरींत तो राहणार होता. लोकल गाडया, अपोलो बंदर, चौपाटी, ब्रेबोर्न स्टेडियम, सिनेमा-नाटकं, डायऱ्फॅनचे शर्ट व पिकू पिकूची पॅंट. होस्टेलमध्यें ऐटींत राहणार होता. शाळेचा जाच नाहीं, घरची कटकट नाहीं. आईनीं ओरडायचं, सुलीनी भांडायचं–कसलाच वैताग नाहीं–

कटकट वैताग–माधव स्वत:शींच चमकला. वैताग काय म्हणून ! आपल्या घरीं तो राजा होता. वडील किती लाड करीत. आई सख्खी नाहीं हें सागूनहि खरं वाटत नसे. मॅट्रिकच्या परीक्षेचे वेळीं किती काळजी दाखवलीन् तिनें. अन् छोटया सुशीवर त्याचा जीव होता. माधवला एकाएकी आपल्या घराची तीव्र ओढ लागली. आई चागलं म्हणत होती की कशाला त्या खेडेगांवीं चालला आहेस म्हणून. पण आपण एकाएकी भावनाविवश झालों. मराठीच्या मास्तरानीं म्हणून दाखविलेल्या कविता आवडल्या, माधव ज्यूलियनाच आईच काव्य घोळूं लागलं नि तिरीमिरीनें आपण इथें आलों उगाच ! अकारण...

" हा बघ फोटो. तुझा.. नि मथूचा. तुझ्या आईचा..." मामानीं कोनाडयातले फोटो उचलले व धूळ झटकून त्याच्यापुढें धरले.

नीट दिसावं म्हणून तो खिडकीशीं गेला व ते तांबुसलेले जुने फोटो डोळे फाडून पाहूं लागला. त्याचा जरीची टोपी व कानांत डूल घातलेला एक फोटो–तो फोटो बाबांनीं काढला होता. व त्याच्या घरीं होता. बाकीचे मात्र त्याला नवीन होते. एक-दोन ग्रुप फोटो त्यानें मागाहून पाहायला म्हणून बाजूला केले व फ्रेम केलेला आपल्या आईचा फोटो डोळयांपुढं धरला.

" मथी. नक्षत्रासारखी होती. गोरीपान नि चवळीसारखी. दृष्ट लागायची तिला नेहमीं. अखेर दृष्टच लागली..." आजी जिना चढून वर आली होती व माधव मथूचा फोटो पाहत आहे हे दुरून ओळखूनच म्हणाली.

चित्रपटांतल्या एखाद्या सुदर दृश्यास व्हायोलीनच्या आर्त स्वराची साथ मिळावी तशी आजीच्या कापऱ्या आवाजानें आईच्या चित्राला मोहकतेची झळाळी दिली. मोहकतेची व कारुण्याची. आईचा फोटो माधवच्या घरी नव्हता, वडिलाच्या टेबलावर एक होता पण तो पूर्वींच कधीतरी नाहीसा झाला. आईला फोटोंतसुद्धा त्यानें गेल्या दहा वर्षांत पाहिलं नव्हतं. अन् आतां तिची प्रतिमा त्याच्या पुढयात होती. लग्न झाल्यावर लगेच काढलेल्या, दागिन्यानें मढवलेला, शात, प्रसन्न मुद्रेचा मधुरेचा फोटो. खरंच ती लावण्यवती होती. सुस्वभावी वाटत होती. ती त्याची आई-सख्खी आई ! तो आईकडे पाहत होता नि आई त्याच्याकडे ! टक लावून ती माधवकडे पाहत होती. अन् कांहींतरी सांगत होती. माधवचा श्वास जोरात होऊं लागला–माझ्यावर रागावलास– ? मला विसरलास ?... काय म्हणत होती ती ?– माधवचं हृदय भरून आलं. आई वारली हें खरं वाटेनासं झालं. आई इथेंच कुठेंतरी आहे, आपल्याला घेऊन आजोळी आली आहे...

" नाना, तुमच्याकडे कुणी आलंय्–" तारीनें खालून ओरडून मामाना सांगितलं व माधवची समाधी भंगली. कोनाडयांत फोटो परत ठेवून देतांना त्याला म्हणावंसं वाटलं की, तेवढा तो फोटो मला द्या. मी होस्टेलमध्यें गेलों की टेबलावर ठेवीन. आईची तेवढीच आठवण ! पण तो बोलला नाही. आईला विसरायची त्याला संवयच लागलेली होती. तो फोटो घरीं कुणी पाहिला तर ? होस्टेलमध्यें त्यानें नीट ठेवला नाही तर ?

मामा खालीं गेले अन् मग आजी कांहीं बडबडेल रडेल म्हणून तोहि जिना उतरूं लागला. ह्याच जिन्यावरून तो अगदी लहानपणीं पडला होता. कपाळावर खोकेचा व्रण आहे तो तेव्हाचाच. ह्याच जिन्यांत.–

अन् मग आजोळच्या अनेक आठवणी आल्या. ज्वारीची पोतीं घेऊन दाराशीं उभ्या असलेल्या बैलगाडयाचा हुरडा खायला गेला असतां


एका युवकाची विकासकथा

**विद्यालंकार**

लेखक : प्रभाकर इनामदार

मूल्य १ रु. २० न. पै.

श्वापदांच्या भावकथा

**परसूच्या पशुकथा**

लेखक : वसंत सबनीस

मूल्य दोन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

वडिलांना चावलेला विंचू, माजघरांतल्या कोपऱ्यांत तारीबरोबर खेळलेली भातुकली, माडीवरचं आईचं अंथरुण, अखेरच्या आजारांत येणारे वैद्यबुवा, ती पहाटे गेली तेव्हां घरांत झालेला कालवा, वडिलांनीं त्याला परत नेलं तेव्हां...

विचारांच्या नादांत तो खालीं आला, मागील दारीं आला व उभा राहिला. बाजूच्या अंधेऱ्या खोलींत तो जन्मला होता व बालपणांतले कितीतरी दिवस इथें वाढला होता. ह्या परसदारी ठर—

बाजूला उभी असलेली तारी म्हणाली, "पाहिलीस–मीं कशी बाग केली आहे–"

चार मोगरीची, चार तगरीचीं, एक गुलाबाचं नि कांहीं बिनफुलाचीं झाडं परसांत वाढत होतीं. ताराकडे प्रथमच त्यानें निरखून पाहिलं. खूप मोठी वाटत होती ती. पातळ नेसू लागली होती व माना वेळावीत होती. तो नव्हता कां मोठा, कॉलेजमध्यें जाणारा झाला ?

"तूं लावलीस ?"

"हो. मला परत गेल्यावर चांगलं फुलझाडांचं बीं धाडशील ? डेलीया, गुलछडी... मला बागेची फार हौस आहे. वेळहि छान जातो–"

"तू शाळा सोडलीस म्हणे. परीक्षेला का नाहीं बसत ? दहावींत होतीस ना ?"

"मला आवडत नाहीं. गणित येत नाही. फक्त चित्रकला शिकावीसं वाटतं !"

कलावंत! माधवच्या मनांत कुणी निनादलं- तारीबद्दल त्याला एकदम आपलेपणा वाटला. तो म्हणाला,

"चित्रं काढतेस तूं ? मला दाखव तुझीं चित्रं. चल–"

तारा लाजली. हंसून म्हणाली."घाई काय आहे. दाखवीन मग. तूं राहणार आहेस नं खूप दिवस–"

खूप दिवस राहण्याचं ओझं एकदम माधवला जाणवलं तो निपटल्यासारखं म्हणाला,

"दोन-चार दिवस राहीन. आणिक चैन नाहीं पडणार."

"का बरं ? आम्ही–"

"तुम्हीं आहांत ग सारीं. म्हणून तर आलों मी. पण इतके दिवस इथं काय करूं ?–"

"आपल्या घरीं काय करायचं असतं ? खायप्यायचं, आराम करायचा. आजी तुला सोडायची नाहीं. तुझ्या नांवाचा जप करतेय् ती. तुला सारखी जवळ घेऊन बसेल–"

एकाएकीं, अकारण माधवला आजीचा दुस्वास वाटला. तिच्या मिठीच्या भयानें तो धायकुता झाला. आपल्या घरांतली खोली, मित्रानीं रस्त्यावरून मारलेल्या शिट्या, सायकलवरची भ्रमंति, पार्कवर दिसणाऱ्या वर्गांतल्या पोरी...तो कसाबसा ताराला म्हणाला, "आत जाऊ या, मला तहान लागली आहे–"

देवघराशीं आजी बसली होती. दुभत्याच्या फडताळाशी काम करणाऱ्या मामीला म्हणत होती "तारीबरोबर बागेंत आहे तो. पाहिलेस दोघं कसे बोलत उभे आहेत. आपल्यांत आते मामे भावंडांची लग्नं होतात...मथीचा मुलगा इथें गुंतला जाईल...आपल्या घरांत राहील"

माधवला पाणी द्यायला पुढें झालेली तारी तें ऐकून लाजली व कुठेंतरी पळून गेली. माधवच्या घशाला जास्तच कोरड पडली. पण पाणी प्यायला देवघराशी जायच टाळून पुढील दारीं गेला. आजीच्या बोलण्याने त्याला कसंसच झाल. कडू कडू झाल. मामे बहिणीशी अशिक्षित गावढळ मुलीशी लग्न करायची कल्पनाच असह्य होती. सुली–तशीच तारी ! सुलीलादेखील तो आपल्याला आणिक एक बहिण आहे म्हणून कधीं सांगत असे, एक-दोन भाऊबिजेला तारीला ओवाळणी पाठवायचा त्यानें प्रयत्नहि केला होता. त्याच्यासारख्या कॉलेजमध्यें जाणाऱ्या हुशार मुलानें...छे, त्याच्या डोळ्यांपुढें स्कर्टमधल्या, दोन वेण्यावाल्या अनेक मुली आल्या. पुन्हा वाटलं, इथून निघून जावं ! आजोळशी अडकवून ठेवण्याचा हा डाव...

मामा कुणाला तरी पोहचायला दिंडीतून बाहेर पडत होते. 'ओळखलत कां ह्याला ? भाचा माझा. मथूताईचा मुलगा. सुट्टीला आलाय–' त्या वृद्ध गृहस्थाला ते म्हणाले त्या इसमानें न ओळखतां नमस्कार केला. माधवनें उलटून नमस्कार केला. ते दोघंहि मग रस्त्याला लागले. वळणावरून ओल्या मातीचा व उग्र चाफ्याचा मंद, मिश्र वास घेऊन कातरवेळची झुळुक आली. माधवच्या मरगळलेल्या कोंवळ्या भावनावर फुंकर घातली गेली.

क्षणकाल त्याच्या मनांतली अढी दूर झाली. त्याचं काळीज मऊ झालं. आजीचा आटापिटा तो समजूं शकला. आईच्या आईचं प्रेम त्याच्यावर पांखर घालीत होतं. इतका वेळ टाळकं, पण आतां देवघरांत जाऊन आजीच्या मांडीवर डोकं टेकून बसावंसं त्याला वाटलं. कसलं मॅट्रिक, कसलं मोठेपण ! लहानपणीं तिच्या मांडीवर बसूनच तो जेवीत असे. त्याला आजीची दया आली, भाबडया तारीची दया आली, त्या जीर्ण, कौलारू वास्तूची दया आली. इथें वाढलेल्या मुलीसाठी आणि इथें जन्मलेल्या तिच्या अपत्यासाठी तें सारें वात्सल्याचा वर्षाव करूं पाहत होते. इतकं प्रेम, इतकं भाग्य कुणाला लाभेल ? हें सारं असतांना कशाला त्यानें सावत्र आईची आजवर मनधरणी केली ? नि आतां बकाल मुंबईत एकाकी राहायचं ठरवलं ? इथल्या मायेच्या चौघडीवरच......

आजीच्या कुशींत शिरावं, तारीबरोबर बागेंत हिंडावं, माजघरांत झोके काढावेत— ह्या वृध्द इसमाच्या मागोमाग गांवात जावं. नंदीवर स्वार व्हावं. अण्णाकडे भजी खावीं. स्टॅंडवर रमावं कुणी ओळखीचं आहे कां हे पहात मधली आळी व बाजार हिंडावा, आपल्या आजोळचीं...

घरांत परतावं की रस्त्यावर जावं ह्याचा माधव विचार करीत उभा राहिला. नुसता उभाच राहिला. अन् मग चोहोंकडे अंधार वाढल्याचं त्याच्या लक्षांत आलं. पुन्हा कसं कोंदट, खिन्न, परकं वाटूं लागलं. करपलेल्या कोवळ्या भावना फुंकर मारून फुलवल्या तरी त्या फार काळ टिकणार नाहींत हें त्याला उमगलं. इथें आपल्याला उबग येईल. तारी, मामी, खुरटी बाग नि अंधेरा जिना, आडवाटेचं गांव–छें इथें आपला जीव गुंतणार नाहीं. एकदां आलों, पुन्हा इथें यावयाचं नाही ! आईच्या आठवणी, आजोळची ओढ सारं कल्पनेत होतं तेंच ठीक होतं. सावत्र आईचा सहवास, आजोळचा इतक्या वर्षांचा दुरावा, नि आता पुढचं भरारीचं आयुष्य... कसं ह्या वस्तूशी परत एकजीव व्हायचं ? प्रथम आई आयुष्यांतून गेली; नि आतां आजोळ मनांतून दुरावलं...

माधव विलक्षण खिन्न झाला. रडवा झाला. आईचा फोटोंतला आर्जवी चेहरा त्याच्या डोळ्यांपुढें तरळला. मामाचं घर चारी बाजूंनीं त्याला घरूं लागलं. अपरंपार मायेनें तो घोळून गेला. आणि त्याच वेळेला ह्या वातावरणांतून दूर जावं म्हणून कासावीस झाला.

●●●



# रीत-रिवाज

• • • • • • •

शंकर पाटील

• • • • • • •

मांदिशाचा बाबू रानांत तंबाखूचा खुडा करीत बसला होता आठ–आठ, नऊ–नऊ पानं झाडाला ठेवून शेंडा मोडण्यांत तो गर्क झाला होता. खालीं बघून आपलं काम करीत होता. आणि एकाएकी बांधावरनं हळी आली– “ बाबू, बाबू ऽ ऽ ”

हातांतलं काम सोडून बाबूनं चटकन् वर बघितलं. मान वळवून बघतोय, तर वाड्यावरला शिपाई हातांत एक काठी घेऊन बांधाला उभा राहिलाय् ! त्याला बघून बाबू मनीं चरकला ! आपल्याच मनाला म्हणाला–

“ बायला, ह्यो शिपाई आणि कां आला असंल ? एकाएकीं वाड्यावरलं बोलावणं कां यावं ?”

असं मनांत म्हणतच बाबू मांदिशा उठला. आणि विचार करत बांधाजवळ आला. शिपायाकडं बघून म्हणाला,

“ का गा गोपाळा, काय भानगड ?” हातांतल्या काठीवर हनुवटी टेकवून गोपाळा बोलला.–

“ बाकीची भानगड काय मला म्हाईत न्हाई. असशील तसा लागोलग तुला घेऊन याला सांगितलंय. ”

बाबू गांगरलाच ! एकवार खांकरून त्यानं विचारलं,–

“ म्हंजे पाटलांनीं बोलीवलंय व्हय् ?” गोपाळा हंसून म्हणाला–

“ मग काय माझ्या बानं लावून दिलंय काय मला ?”

“ तसं न्हवं–”

“ बोलत बसूं नगो, आटीप. ”

गोपाळानं असा तगादा लावला. आणि एकाएकी वाड्यावरचं बोलावणं कां यावं हें न कळून हडबडलेला बाबू खुळ्यागत तोंडाकडच बघत राहिला. गोपाळानं विचारलं,–

" तुला आटीप म्हटल्यावर आणि तोंडाकडं काय बगत ऱ्हायलास रं ?"

गोपाळा कांहीं थांगपत्ता लागू देईना झाला. त्यानं नुसता तगादा तेवढा सुरुं केला. आणि बाबू मादिशाचं हातपायच उरावर आल्यागत झालं ! वर खोंवलेलं धोतर खालीं सोडून उभं न रहाता, त्या बांधालाच त्यानं खालीं बैठक मारली. आणि कमरेचा बटवा काढून हातांत घेतला. गोपाळा उगच बघत राहिला होता. आणि हात पुढं काढून बाबू म्हणाला,—

" घ्या, तंबाखू घ्या. "

तसा गोपाळा तावला. आवाज चढवून म्हणाला,–

" तुला लगोलग चल म्हंतोय, तर तूं आपला माडी घालून बसाय लागलायस व्हय हितं ? म्हंजे येळ लागला, तर तुज्यासंगं आमालावी चार जोडं मिळावंत म्हंतोस काय ?"

गोपाळच्या रागाचा पारा चढलेला बघून, हातांत काढून घेतलेला बटवा, तबाखू न खातांच त्यानं कमरेला खोंचला. आणि कसा–बसा उठून उभा रहात तो म्हणाला.–

" त्या झाडाखालीं पैरण काढून ठेवल्यालं हाय. त्ये तरी अंगांत घालूं कां नगो ?

" जा, आटीप लवकर "

गोपाळनं परवानगी दिली आणि पैरण घालायला बाबू झाडाकडं निघाला. मनांत येऊं लागलं–काय भानगड असंल ? कसली अदावत असल ?–हाच एक विचार घोळवत बाबू झाडाखालीं येऊन उभा राहिला. पैरण आणि पायताण ठेवून दिली होती. भाकरी खाल्लेलं फडकहि तियंच धुऊन वाळत घातलं होतं. त्यानं दगड बाजूला केला आणि पैरण उचलून अंगात घातली. पायांत पायताण घातली. भाकरीचं फडकं गोळा करून खिशात कोंबलं आणि आता गोपाळाबरोबर वाड्याकडं जायचं तर पायच उचलेना...कापरच भरल्यागत झालं. असं घाबरणं साहजिक होतं. आजन्मात कधी वाड्यावरचं बोलावणं आलं नव्हतं. कधीं कसली भानगड नव्हती. वाड्यांत जायचं तर तें वर्षातनं एकदां ! तेंहि दसऱ्याला सोनं द्यायच्या निमित्तानं. असं एकदां सोनं द्यायला जायचं,तर वाड्यांत शिरतांना भीति वाटायची ! पायरीवर सोनं ठेवून केव्हां एकदां तियनं निसटीन असं व्हायचं ! आणि आतां शिपाई बोलवायला रानांत आला म्हटल्यावर पोटांत धावरा पडेल नाहींतर काय होईल ? पण आतां बोलावणं आल्यावर जाणं भाग होतं. अंगांत पैरण घालून तो तयार झाला. आणि चेहेरा काळाठिक्कर करून तो गोपाळला म्हणाला–

" चल बाबा. "

गोपाळा खुदकन् हंसला. आणि त्याच्या तोंडाकडं बघत म्हणाला–

" एवढा काय घाबरतुयस र ?"

" घाबरूं नको तर मग काय करूं ?"

" काय झाल घाबरायला ?"

" वाड्यावरचं बोलावणं आलय म्हंतोस......"

" म्हंतोस कसलं ? मग आलयच कीं !"

" म्हणून घाबरलोय बा !"

" असं व्हय ?" असं म्हणून गोपाळा म्हणाला–

" तुला एकट्याला घेऊन यायला सांगितलं न्हाई. "

हें ऐकून होतं नव्हतं तेंहि पाणी पळाल्यागत झालं. आणि बाबू मादिशान विचारलं,–

" आणि कुणाला घेऊन याला सांगितलं ?"

गोपाळा पुन: हंसला, आणि न बोलतां त्याचा अवतार बघत उभा राहिला. विनवून विचारल्यागत हात जोडून बाबू म्हणाला,–

" बाबा, काय भानगड हाय हें तरी सांग " आणि मग गोपाळानं विचारलं,–

" तुझी बैलगाडी कुटं रानांत हाय का गांवात ?"

" गाडी जोडून कशाला रानांत येऊं ? काय वैरण तरी न्हा हाय गाडीतनं ? सकाळधरनं खुडा करत बसलोंय "

" बरं असू दे, चल झटक्यान् "

पाय न उचलतां बाबूनं विचारलं,

" पर बैलगाडीचं काय ? तिची काय चौकशी ?" गोपाळा म्हणाला,

" तुझी बैलगाडी घेऊन तुला बोलीवलंय गा. "

जर धीर आल्यागत झाला. मगापासून पडलेलं कोडं, जरा सुटल्यागत झालं. बाबु मादिशाची पळावू गाडी होती. जोडी नामी जमली होती ! आसपासच्या दहा खेड्यांत दुसऱ्या कुणाची अशी बैलगाडीच नव्हती. जियं शर्यतीला जावं तियं मादिशाच्या गाडीचा नंबर ठेवल्यासारखा येत होता ! अशी त्याची ख्याती पसरलेली होती. ह्या वर्षाभरांत त्यानं आपल नांव केलं होतं. अशा ह्या बाबूला बैलगाडी घेऊन लगोलग बोलावलंय असं म्हटल्यावर त्याच्या मनांत आलं–कुठं तरी झटक्यान् जायचं असल, आणि म्हणून बोलावणं पाठवून दिल असंल. असा अदाज करून त्यानं विचारल,

" कुठं परगावाला जायचंय व्हय ?"

" असाच काही तरी बेत दिसतोय, उशीर लावूं नगोस, चल बगूं."

मनांतली धास्ती गेली आणि उलट नवा हुरूप आल्यागत झाला. बैलगाड्यांना तोटा नसतांना आपल्या गाडीला बोलवायला लावून द्यावा, म्हणजे एक महत्त्व मिळाल्यागत झाल. आणि चटाटा पाय उचलत शिपायाबरोबर बाबू गावात आला. घराकडं जाऊन त्यानं गोठ्यांतले बैल सोडले. आणि पाणी प्यायलासुद्धां तो घरांत न थांबता गाडी जोडून वाड्यावर आला. गाडी जाऊन दरवाज्यापुढें उभी राहती न राहती, एवढ्यांत एकानं गादी गाडींत आणून पसरली. दुसऱ्यानं दोन तक्के आणले. पाठोपाठ फेटा बांधलेले पाटील अगांत खाकी कोट घालून दारात येऊन उभे राहिले, त्याना समोर आलेलं बघून त्यानं खाली वाकून मुजरा केला आणि पाटलानी विचारलं,

" बाबू, तारदाळला जायचंय, किती येळांत न्हेशील ? "

बाबू गाडीपुढ जूं धरून उभा राहिला होता. पाटलाचा हा सवाल ऐकून त्याला स्फुरण चढल्यागत झालं. तो जरा पुढं आला आणि एका अंगावर थाप मारून म्हणाला.–

" हरणं हायेत धनी हो ! किती येळांत नेऊं सांगा ? " पाटील तोंडाकडे बघून हंसले. आणि बाबूला म्हणाले,–

" हरणं हैत म्हणूनच तुला गाडी घीऊन बोलीवलंय ! "

बाबूहि हंसला मग पाटील चढून गाडीत बसले. त्यांच्या मागोमाग धाकटे पाटीलहि गाडीत चढले. बापलेक दोघे असे गाडींत बसले आणि बावकडा धरून उभा राहिलेला शिपाईच बाबूला म्हणाला.–

" हां, चढ आतां गाडींत. "

बाबू हातांत कासरं धरून गाडीत बसला.

वाडयातली सगळीं माणसं दाराच्या तोंडाशी येऊन उभीं राहिलीं होती. त्यांच्याकडे बघून पाटील म्हणाले–

" काय काळजी करत बसू नगा. बाबू मांदिशाची गाडी हाय. आत्तां बगतां बगतां जाऊन पोंचूं आणि गेल्या गेल्या कसं हाय आणि काय हाय हें तुमाला माघारी कळीवतो. हीच गाडी माघारी येईल. "

थोरल्या आई मान हलवत बाहेर आल्या. आणि गाडीजवळ येऊन डोळयाला पदर लावून म्हणाल्या.–

" कसं हाय बगा. न्हाई तर लगेच कोल्हापूरला घेऊन जावा. कुचमत ठेवू नगा. "

" तुमी काळजी करू नका. आतां काय करायचं तें मी बगतो. " असं म्हणून पाटलांनी बाबूला इशारा दिला, हातांतले कासरे हलले. आणि गाडी सुरू झाली. गांवातून बाहेर पडेपर्यंत बाबूनं कासरे ओढून धरले होते. वेस मागें पडली आणि माळवाट लागली. बाबूनं कासरे ढिले सोडले. आणि शेपटीना हात लावला. त्यासरशी खोंडानीं उड्डाण घेतल धुरळा उडवत गाडी निघाली. रेसची घोडी पळावीत तसे खोंड पळत होते. गाडी चौक पडली होती ! पायाखालची वाट सारखी मागें पळत होती. आणि खोंड पुढं धांवत होते. बसलेल्या माणसांना आगीनगाडीत बसल्यागत वाटत होत. तोंड वर करून बघावं तर रानं, माळं भोंवतीनं फिरताना दिसत होतीं. शेताचे माळाचे, बांधाचे लहान–लहान तुकडे, समोर उगवल्यागत वाटत होते आणि गाडी जवळ गेली की मागें पळत होते. एखादं वळण आलं, मुरा आला म्हणजे भर वेगात असलेले खोड आवरत नव्हते आणि कासऱ्यांची ओढ लागून हाताची पळकी निघत होती. मुरा ओलांडला की कासरे पुन्हा ढिले पडत होते आणि थावलेलं वारं पुन्हा सुटाव तशी गाडी वेग घेत होती. भान विसरलेला बाबू, बैलांच्या पाठीवर पालथा पडून गाडी हाणत होता. त्यानं आपल बूड कांहीं खालीं टेकवलं नव्हतं. एका हातानं बावकडयाचा आधार घेऊन तो असा ओणवाच उभा होता. आणि तो जसा उसकेल तसे बैल उडी घेत होते. आणि बैल उडी घेतील तशी चाकं हात–हातभर उंची घेत होतीं. नुस्ती खडाडत होतीं ! भिंगरी फिरल्यागत चाक फिरत होतीं. आणि वादळ सुटल्यागत धुराळा उठत होता. भुईवरनं एक विमान निघालं होतं ! गाडी हाकणारा बहाद्दर बेभान झाला होता. खोंड तापले होते. त्याचे पाय भुईला ठरत नव्हते. बाबू पालथा पडून गाडी हाणत होता आणि त्याच्या डोक्याचा पटका ठिकाणावर नव्हता. कुठल्या शर्यतींतसुद्धां तो एवढा भुलला नव्हता. अशी भूल त्याला पडली होती. खुद्द गांववाले पाटील त्याच्या गाडीत बसले होते. आणि आपल्या बैलाची करामत दाखवण्यांत त्याची मति गुग झाली होती. त्याला दुसरं तिसरं काहींच सुचत नव्हतं. एक दारूचा अंमल चढावा तशी त्याची अवस्था झाली होती. बाबू खुळा झाला होता, निच्चळ खुळा !

बघता बघतां पाच–सहा मैलाची माळवाट संपली. मोकळा माळ मागें गेला. आणि दुतर्फा शेतं असलेली गाडीवाट लागली. पायाखालची चाकोरी धड नव्हती. जागजागी खड्डे होते. चाकं हादरू लागलीं. गाडीचा पाळणा हिंदकळूं लागला. गचागच बावकडें पाठीला बडवूं लागलें. आणि पाटलानं इशारा दिला,–

" बेतानं रं बाबा. न्हाईतर काय म्हत्यात त्यांतली गत हुईल! लवकर जाऊन पोचायचं न्हाईल बाजूला आणि वाटतच खेळखंडोबा करूनठेवशील. जरा बेतान हाण, बेतानं. "

बाबूनं कासरे ओढून धरले. आणि मागें बघून कसनुसं हंसत तो म्हणाला,–

" धनी, काय काळजी करूं नका. जनावरं लई शानी हैत. "

" त्ये झालं रं. " असं म्हणून पाटील बोलले,–

" नवी वाट हाय. एखांदा मुरा असतो, दगड लागतो. गाडी उलाटली तर काय करायचं ? "

जीभ चावल्यागत करून बाबू बूड टेकवून सप्पय बसला. आणि नीट पुढं ध्यान देऊन म्हणाला,–

" छे. छे. तसलं काहीं मनांत सुधीक आणू नका सरकार ! एक पालखीत बसल्यागत निर्धास्त बसा. तुमच्या केंसाला धक्का लागला तर इचारा. "

" त्यें झालं रं. मग काय इचारा ? एकदां एक गोष्ट व्हायची ती झाल्यावर भरून येती ? म्हणून तुला सांगितलं आपलं "

हिरमोड झाल्यागत बाबू गप्पच झाला. न बोलतां आपला गाडी हाकू लागला. आणि मग पाटीलच त्याला म्हणाले,–

" तुला गाडी पळवूं नगो असं म्हणत न्हाई. वाट चांगली असली, काय धोका नसला म्हजे पळंवकी. लवकर जाऊन पोंचावं म्हणून तर मुद्दाम तुझी गाडी आणायला सांगितली. "

मुठभर मांस अगावर आल्यागत झालं ! अवघड वाट जाऊन चांगली वाट पायाखालीं लागली. आणि बाबूनं शेपटीला हात लावून खोंड उसकले. एका हातानं बावकडा धरून तो बैलांच्या पाठीला हात लावू लागला. खोंड उडी घेऊं लागलं. चाकं हादरू लागलीं. पाळणा हिंदकळूं लागला. कचवचत बाबूनं मागें वळून बघितलं. पाटलानी मान हलवून सांगितल–

" काय घाबरू नगो. पळीव तूं. " आणि एका हातान चुटकी वाजवत पाटील बोलले,–

" लवकर पल्ला गाटायचा बग. नुस्तं उसकुं नगो, हातांत कोयंडा घ. "

" मारावं लागत न्हाई धनी. नुस्तं उसकलं म्हजें त्यास्नी फुरं हाय. "

" बोलू नगो. हाण तूं गाडी हाण. "

बाबू पुन्हा पालथा पडला. वशिड गवसून चावकाचे तडाखे हाणले आणि विस्त्याच्या खेंडागत खोंड तापले. हरणानं उडी घ्यावी, तशी ते उडी घेऊं लागले. एक मोटार पळावी तशी गाडी पळूं लागली. धूर सोडत इजिन जाव तशी धूळ उठवत गाडी निघाली. बाबूचं भान हरपलं ! आणि खण्ण् अशी धाव वाजली ? एकाएकी बाबू सावध झाला. आणि जाब विचारावा तसं पाटलानी विचारलं,–

" काय झालं काय रं ? "

' हो ऽ ऱ्या म्हणत ' त्यानें कासरे ओढून धरले. गाडी आवरली. दोन्ही चाकाच्या धावेकडे नीट पारखून बघितलं आणि तो म्हणाला,

" काय न्हाई. नुसती दगडावर जरा धाव वाजली. "

" तुटली न्हाई न्हवं ? "

" छे, छे. तुटंल कशी सरकार ?"

" काय तरी झालं सवरलं म्हंजे आणि खोळंबा हुईल बाबा. सगळा इस्कोट होऊन बसेल !"

बाबूनं कासरे ढिले सोडले. बैल चारहि पायांवर उडी घेऊं लागले. एक चेंडू उडी घेत जावा तशी गाडी पुढं निघाली. आणि मागं बघून बाबू सांगूं लागला,—

" तसं काय सुदीक मनांत आणूं नका सरकार. "

" बाबा, येळ काय सांगून येती ! त्यांत तुझी पळावू गाडी. कुठं भकली–संवरली, काय करायचं ?"

पाटलाच्या बरोबर मोकळया मनानं अघळपघळ बोलायचं म्हणजे अवघडच होतं. कारणापुरतं बोलतांनासुद्धां जीव धाक धुक धाक धुक करायचा पण, गाडी भकेल बिकेल असं पाटील म्हणाले, आणि बाबू गाडी आवरून सांगूं लागला,–

" गाडी भकण्याचं नांवच काडूं नगा ! "

येवढ बोलून तो थांबला नाहीं. त्याला डिवचल्यागत झालं होतं. आणि आपल्या बैलगाडीची तारीफ करीत तो सांगूं लागला,–

" सरकार, ह्या जोडीनं घा शर्ती जितल्या. अजून कुठं नंबर सोडला न्हाई. आतां शर्यत म्हटली म्हंजे जनावरं बेफाम होत्यात. गाड्या भकल्यात, उलटत्यात. नाना तऱ्हा होत्यात. ईस गाडचा शर्यतीला आल्या असल्या. तर निदान घा गाड्यांचा असा खेळखंडोबा होतो, पर आमच्या गाडीचं कवा असं ऐकलंयसा ?"

पाटील हंसून म्हणाले,–

" तें काय न्हाई खरं ? पर तुला आपली एक सूचना दिली. "

" तुमी अगदी निर्वास्त बसा. " आणि पाटील म्हणाले,–

" वाट चागली हाय, पळीव आतां. "

पाटलांनीं आज्ञा केली, बाबूनं कासरे ढिले सोडले, शेपटींना हात लावला. बैल उडी घेऊं लागले. वारं सुटलं, आणि मावळतीकडं बघून पाटलांनीं विचारलं,–

" दीस बुडायला तारदाळला जाऊन पोचूं कारं बाबू ?"

बाबूनं दिवसाकड बघितलं आणि हातांतला कोयंडा आभाळाकडं दाखवत तो म्हणाला,

" दीस बुडूस्तर कशाला थांबायचं ? दिवस असा असा हाय तंवरच जाऊन पोचू की, "

" मग हाण तर गाडी ! "

बाबू उठून उभा राहिला. एका हातानें बावकडा धरला. आणि बैलांच्या पाठीवर पालथं पडून त्यानं बैल उसकले. गाडी चौक सुटली आणि बाबू हातातला कोयंडा फिरवत आरडू लागला— तो ओरडेल तसे बैल उडी घेऊं लागले आणि भोंवतालची रानमाळं फिरूं लागलीं. बाबूनं बावकड्यावरच बूड टेकवलं. आणि एक पाय दांडीला व दुसरा पाय बावकड्याच्या खुटीला लावून त्यानं चाबकाचे दोन तडाखे लगावले आणि खोंड बेफाम झाले. चाकं भुईला चाकं ठरेना झालीं. आणि मागं पळणारी वाट डोळयांना दिसेना झाली. नुसती वर उडालेली धूळ तेवढी दिसत होती...

दिवस असा कलला होता, आणि गांव आलं ! तारदाळच होतं. बाबूनं एकदा दिवसाकडं बघितलं. एकदां गांवाकडं बघितलं आणि मान वळवून पाटलाकडं बघत तो म्हणाला,

" सरकार, तारदाळ आलं की ! " पाटील कांहीं बोलले नाहींत. त्यांचा चेहरा मोहोरा सगळा बदलला होता. आपल्याच विचारांत ते दंग होऊन गेले होते. त्रस्त झाले होते. उदास दिसत होते. त्यांना तिकडचा घोर लागला होता, ते तरी काय बोलणार ?

पाटलांच्या वाड्यापुढं गाडी उभी राहिली. थोरले पाटील धाकटे पाटील दोघं काळजी करतच खालीं उतरले. आणि न बोलतांच वाड्यांत गेले. बाबूनं गाडी सोडली. बैलाचे कासरे गाडीच्या चाकालाच गुतवले आणि इतक्यांत पाटीलच बाहेर आले आणि गाडी सोडलेली बघून ते म्हणाले,

" गाडी सोडून आतां बसू नगोस. मागचीं माणसं वाट बघत असतील. त्यास्नी जाऊन लगेच सांगाया पायजे "

" काय सागायचं ?"

" काय काळजी करूं नका, असं जाऊन सांग म्हंजे झालं !"

" एवढंच सांगायचं ?"

" हां तेवढंच सांगायचं. म्हणावं आतां काळजीचं कारण न्हाई. आणि दोन-चार दिवस आमी दोघंबी इथं थाबतो. काय काळजी करूं नका एवढं सांग "

बाबूनं मान हलवली. तंबाखू खावी म्हणून हातांत घेतलेला बटवा पुन्हा तसाच कमरेला खोचला. आणि तो उठला. चाकाला गुंतवलेले बैल सोडून तो गाडी जोडू लाला. आणि पाटील म्हणाले,

" थांब जरा. आतां च्या हुईल. च्या घेऊन मग जा, म्हणं. तंवर वाटल्यास बैलास्नीबी पानी दाव. "

बाबू हसला. आणि गाडीच जूं उचलून बैलांच्या खांद्यावर ठेवत म्हणाला,

" मालक, आतां च्या पेत बसत न्हाई. तिकडं वाट बघत असतील. आईसाब काळजी करत बसलं असतील. आणि मग एक कपभर च्यासाठी हितं येळ मोडू व्हय ? ह्यो च्या म्हत्वाचा का लवकर जाऊन सांगावा द्याचं म्हत्वाच ? " अस म्हणून त्यानं बैल गाडीला जोडले. आणि हातात कासरे घेऊन एका चाकाच्या आरीवर पाय देऊन चटकन् तो वर चढून बसला. गाडी वळवून उभी केली. आणि मुजरा करून म्हणाला–

" जाउं मालक ? "

" अरं, बैलास्नी पाणी तरी दावायचं होतंस ? पळून पळून दमेल असतील "

बाबू बोलला–

आतां पाणी दावलं, तर पोटं फुगतील. त्यास्नी पळाय याचं न्हाई. आतां गांवांत जाऊनच पानी दावणार. "

असं म्हणून तो परवानगीची वाट बघत राहिला. आणि मान हलवून पाटील म्हणाले–

" बरं मग जा तर आतां. जसा आलास तसा जा जरा धाईनं. "

" आतां जाऊन पोचतों बगा !" असं म्हणून बाबू निघाला. गाडी गावांतनं बाहेर पडली. गांव मागं राहिल. आणि गाडीवाट लागली. बाबूला लवकर जाऊन सांगावा द्यायचा होता. मागं लोक

वाट बघत बसले होते. पाटलांनीहि लवकर जायला सांगितलं होतं. केव्हां जाऊन गांव गांठू आणि वाड्यापुढं जाऊन गाडी उभी करूं, असं त्याला झालं होतं. तो गाडींत उठून उभा राहिला. आणि बैलांच्याकडं बघून म्हणाला,

"वाघांनो, कसं पळतां मला बघायचं हाय! हां हां म्हंता जाऊन पोचायचं बगा. आईसाब काळजी करत बसल्या असतील. त्यांचा जीव टांगणीला लागला असंल. एक इमान सुटल्यागत सुटाय पायजे. जातां वक्तिं गाडीत पाटील होतं, त्याचा धाक हुता. काय तरी हुईल सवरल अशी मलाबी धास्ती वाटत हुती बाबांनो! आता तसली काय काळजी न्हाई. कुणाचा धाक न्हाई, बगूं, उचला पाय. घ्या उड्डाण......"

बैलांनीं उड्डाण घेतलं. बाबूनं वरनं कोयंड्याचे तडाखे लगावले. चाबूक कडाडला. आणि भान विसरून खोंड चौक पडले. भुईसपाट पळूं लागले. भुईवरनं एक वीज जावी तसे जाऊं लागले...

कडुसं टळून अंधार पडला होता. आणि बाबूची गाडी वाड्यापुढं येऊन उभी राहिली. गाडीचा आवाज ऐकून देवडीवरचा शिपाई दारांतन बाहेर आला. आणि बाबूच्या तोंडाकडं बघतच राहिला! बाबूनं खालीं उडी टाकली. आणि शिपायाकडं बघून तो हंसला. शिपाई म्हणाला,–

"इतक्यांत कसा आलास रं? गेलास कवा आणि आलास कवा? आमाला वाटलं, तुला कायतरीमध्यान रात हुईल."

बाबू म्हणाला,–

"जा आधी. मी आलोंय् म्हणून आईसायबास्नी सांग जा."

वर्दी द्यायला शिपाई आंत गेला. आणि पाठोपाठ बाबूहि आंत चौकांत जाऊन उभा राहिला.

आईसाहेब आंतनं बाहेर आल्या. आणि बाबूला बघून त्यांनीं विचारलं–

"आलास बाबा? काय सांगावा घेऊन आलास?"

बाबू म्हणाला,–

"काय काळजी करू नका असं सांगितलंयू" आणि एवढं सांगून तो गप उभा राहिला. आईसाहेबांनीं पुन्हा विचारलं,–

"आणि काय सांगितलं न्हाई?"

"काय काळजी करायचं कारन न्हाई, असं सांगा म्हणलं. एवढंच सांगितलंय्"

"त्ये न्हवं. पर आतां कसं काय, काय करणार, कुठं ऱ्याचं? हें काय बोलल का न्हाई?"

बाबू मान हलवून म्हणाला,–

"त्यें काय बोललं न्हाईत. नुसतं काळजी करूं नका एवढंच सांगितलं"

आईसाहेब त्याच्या तोंडाकडं बघत राहिल्या. आणि कपाळाला आंठ्या घालून म्हणाल्या,

"त्यांनीं एवढंच सांगितलंय, आणि तेवढंच सांगत तूं आलास व्हय? हितनं तिथवर गेलायसा, आणि हिकडं काळजी करत बसलोय. सांगावा घेऊन याचं तर जरा सगळं इच्चारून याचं न्हाईं बाबा?"

बाबू म्हणाला,

"एवढंच जाऊन सांग असं त्यांनी सांगितलं"

"अरं, त्यांनी सांगितलं हें खरं, पर तूं सांगावा घेऊन येणार हुतास. एकाला दोन गोष्टी इचारायला तुला तोंड न्हवतं? त्याचा जीव एक सुचित नसंल. काय सांगाव, काय संवरावं हें त्यास्नी कळलं नसंल पर तू आपुनहुन इचारूने हुतास का रं? सांगाकाम्यागत नुसता गेलास आणि आलास व्हय?"

एकदम् आठवण झाल्यागत करून बाबू म्हणाला,–

"एक चार दिवस तिकडं ऱ्हाईन, असं एक सांगाय सांगितलंय."

फाडकन् आई म्हणाल्या,–

"हें सांगायचं इसरला असतास तर चाललं असतं की! त्यें लई म्हत्वाचं न्हवतं बाबा. काय चार दिस ऱ्हाईनात ऱ्हाईतर! आठ दिस ऱ्हाईनात! त्यांची कोण एवडी काळजी करतं? पर जें सांगायच तें नीट इचारून घेऊन आला ऱ्हाईस, आणि दुसरच सांगत बसलाईस!"

बाबू कचवचल्यागत बोलला,–

"गेलो ते लगीच मागारी फिरलों."

"नांव केलंस बाबा! जरा नीट इचारून घेऊन आला असतास तर काय लई येंळ मोडला असता? कशाला थांबशील तिथं तू?"

मान खालीं घालून बाबू गपच उभा राहिला आणि मग आईच म्हणाल्या,–"आतां हितं तरी कां येळ मोडतोस? मागच्यावडीन धावत पळत आलाईस, जा जा घरात जाऊन थंड बस जा!" हेटाळल्यागत झालेला बाबू खालमानेनं माघारीं वळला आणि वाड्याबाहेर आल्यावर बैलाकडं बघून त्यानं घोंबला डोळ्याला लावला.

•••


## समाज प्रबोधन संस्था

**१२४२, सदाशिव पेठ, पुणे २.**

| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | २.६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·०६ |
| राजकीय पक्षांसाठीं आचारसंहिता : (सं. निबंध) | २·०० |
| अंतरीक्ष प्रवास : ना. वा. कोगेकर | २·०० |

## पांढरे डाग

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू.

नकली वैद्यांपासून सावध राहावें.

वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन (माणू.)

मु. पो. मंगरूळपीर. जि. अकोला (महाराष्ट्र.)



~~~~~~~~* * * *

## वा. वा. पाटणकर

* * * *~~~~~~~~

मनदेवचें घनदाट अरण्य सोडून, मी उमं-
ड्याच्या लहानशा वंदींत कां आले ही कहाणी मी कुणाकुणाला सांगणार ? मी एक परित्यक्ता आहे, हें सांगण्याची मला लाज वाटते. ते दिवस आठवले कीं, आजहि माझ्या डोळ्यांत पाणी येतें. दिवस-रात्र आम्ही एक-मेकांच्या सहवासांत अगदीं जवळ जवळ बसून होतों. मी क्षणभरहि डोळ्यांआड झालेली त्यांना खपत नसे. माझ्यासमोर बसून माझ्याकड नुसते बघत राहण्याचेंहि त्यांना विलक्षण वेड होतें. मलाहि माझ्या सौंदर्यां-तील जादूबद्दल खूप गर्व वाटत असे. असें वाटें कीं, आमचें सारें जीवन अशाच सुंदर प्रणयांत व्यतीत होणार; पण कुणाचा प्रणय चिरकाल टिकला आहे ? शेवटीं असेंच वाटूं लागतें कीं, प्रणय ही एक निसर्गानें प्राण्याच्या डोळ्यांत फेकलेली धूळ आहे. लबाड निसर्गानें, आपल्या इष्टप्राप्तीकरितां प्राण्यां-वर घातलेली ही एक अजब मोहिनी आहे. निसर्गाच्या कार्यसिद्धीबरोबर या प्रणयाचाहि अंत होतो. हेंच जर सत्य असेल तर मी तरी त्यांना कोणता दोष देऊं ? आणि स्वतःला परित्यक्ता समजून कोठपर्यंत वाईट वाटून घेऊं ? आपल्याला सत्य नको असतें, आपला भ्रम दूर केल्याबद्दलच आपण इतरांस नेहमीं दोषी ठरवतों, वढेंच.

ते माझे प्रियकर नव्हते, मी त्यांची प्रेयसीहि नव्हते, आणि म्हणूनच आज मी परित्यक्ताहि नाहीं. माझ्या ह्या लहानशा वंदींत मन-सोक्त विहार करणारी मी वाघीण आहे. जीवनाकरितां कुणाच्या तरी प्रेमाचा आधार लागत असतो, ही कल्पना सपशेल झूट आहे. आपण जगांत एकटे आलों, एकटेच जाणार. मग एकटेंच जीवन कंठण्याला आपणहि कां तयार असूं नये. ह्या एकटेपणामध्यें वैफ-ल्याची भावना नसून, आपल्या असीम सामर्थ्याचाच प्रत्यय येत असतो; असा मला अनुभव येऊं लागला.
~~~~~~~~

हे खरें कीं, अधून मधून गतायुष्याचा स्मृतिपट नकळत माझ्या डोळ्यांसमोरून तरळूं लागतो. आणि तेवढ्यापुरतें वाईटहि वाटतें. फिरून मन सांगते कीं, त्या मोहास बळी पडूं नकोस. तुझी आतां कोणालाच जरूर उरली नाहीं. हेच शब्द त्या दिवशीं त्यांनींहि उच्चारले होते. ज्या दिवशीं आमची कार्यक्रमाची ताटातूट झाली त्या दिवशी विशेष असें कांहींच घडलें नव्हतें. मला दूर लोटल्यासारखें करून गृहस्थ सरळ निघून गेला ! मी नुसती बघतच राहिले. तो परत येत नाहीं अशी खात्री झाल्यावर, मलाच राहवलें नाहीं. मी त्याच्या जवळ धांवत गेले, वाटलें, त्याला एकदां शेवटचें विचारावे तरी; कीं, असें माझ्या हातून काय घडलें होतें ? त्याला विनवून परत आणावें, वेळ पडल्यास त्याची क्षमा मागावी, इतकें सर्व मनाशीं ठरवलें होतें. त्याने मागें वळूनहि पाहिलें नाहीं. एक शब्दहि न बोलतां जणूं तो एवढेंच बोलला—तुझी आतां जरूर उरली नाहीं. किती भयंकर आहे हा शब्द. या एका शब्दाच्या जन्माबरोबर संपूर्ण जीवन उध्वस्त होतें. नाम रूपात्मक अखिल विश्वाला व्यापून राहणाऱ्या अदृश्य ब्रम्ह्याप्रमाणेंच याहि शब्दाची विलक्षण व्याप्ती आहे ! प्रत्येकजण खरें पाहिलें असतांना एकमेकाला हेंच सांगत असतो, "तुझी आतां जरूर नाहीं" जरूर नसतांना एकमेकांच्या सहवासांत एक क्षणहि न राहणें हा आम्हां श्वापदांचा मुळीं स्वभावच आहे जरूर नसतांना कवटाळून बसण्याचें नाटक फक्त माणसांनींच दाखवावें हा "जरूर नाहीं" चा अभिप्राय आम्हीं श्वापदें एकमेकांला निःसंकोचपणें प्रसंगानुसार दाखवीत असतो.

माणसें आम्हां पशूंना कांहींहि म्हणोत, पण एक गोष्ट मात्र कोणालाच अमान्य करता येणार नाही. ती म्हणजे वंचनेचा संपूर्ण अभाव. श्वापदे आणि माणसें यांमधला हाच फार मोठा भेद होय.

"धर्मो ही तेषांम अधिको विशेषो" असें म्हणून मनुष्यप्राण्यानें आपलें वैशिष्टय दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. यांत थोडा बदल करून मी तर साफ असें म्हणेन कीं, "शाम्यम् ही तेषाम अधिको विशेषो"

हेंच वचन जास्त सार्थ आहे. आपल्या बुद्धीप्रभावानें नुसते एकमेकाला फसविण्यापलीकडे माणसानें कोणते दिवे लावले आहेत ?

त्यापेक्षां असें सरळ सोडून गेलेल्या प्रियकराबद्दल मला जास्ती आदर वाटतो.

ते निघून गेले मग कुणाकरिता मी ह्याच जंगलांत रहायचे ? "जरूर नाहीं" ची जाणीव; निसर्ग, दोघांनाहि एकाच वेळीं कां आणून देत नाहीं, न कळे ! लहानपणी आईनेंहि असेंच केलें होतें. आम्हांला ती हवी होती, तिला आमची जरूर नव्हती. अशा विपण्ण मनःस्थितींत मीं जंगल सोडलें आणि वाट दिसेल तिकडे जाऊं लागले. कुठें तरी दूर निघून जावें एवढेंच मला समजत होतें. आणि शेवटीं या लहानशा बंदींत येऊन पोंहचले. हा भू-भाग मला माहितीचा नव्हता. पण या जंगलांत पाऊल ठेवल्याबरोबर जें माझें स्वागत झालें तें मी विसरणार नाहीं.

साळुंक्या आणि कावळे माझ्या डोक्यावर सारखे उडत राहून भेदरल्याप्रमाणें आवाज काढूं लागले. तूं आम्हांला इथेंहि नकोस. येथून लवकर जा कशी, तुझी आम्हांला जरुर नाहीं. असेंच जणू ते मला सांगत. मीं त्यांचें काय केलें होतें ? त्यांना माझ्यापासून कोणतें भय होतें ? ते असे कां वागतात ? यांपैकीं मला कशाचाहि उलगडा होईना.

एका नाल्याच्या कांठाकांठानें मी सारखी चालले होते. थोडें अंतर—जाते न जाते तोंच झाडाच्या फांदीवर इकडून तिकडे उड्या घेत कांहीं वानरेंहि माझ्या अंगावर खेकसूं लागलीं. माझा तिरस्कार होणार नाहीं, अशी एक तरी जागा कुठें असेल काय, याचा मी चालता चालता विचार करूं लागले. साळुंक्या कावळे आणि वानरें यांनीं माझ्याशीं असें वर्तन करण्यांत निसर्गाचा फार मोठा हेतू आहे हें माझ्या जरा उशीरा ध्यानांत आलें इतर श्वापदांना वाघापासून सुरक्षित ठेवण्याची निसर्गाची, ही एक अजब युक्ति आहे. पांखरांचा आणि वानरांचा असा कोलाहल ऐकल्यावर गैरसावध असलेल्या श्वापदांची साहजिकच तिकडे दृष्टि जाते. आणि ह्याबरोबरच वाघाचें अस्तित्वहि त्यांच्या नजरेस येतें. माझ्या पूर्वीच्या जंगलांत इतका त्रास नव्हता. परिचयामुळें म्हणा, किंवा इतर कांहीं कारणानें म्हणा, पण तिथलीं पांखरें आणि वानरें माझा इतका पाठपुरावा करीत नसत. या जंगलांत पट्टेदार वाघ क्वचि-




त्च येत असल्यामुळें वरील प्रकार घडला असावा, असा मीं तर्क बांधला. कांहीं जरी असलें तरी यामुळें मला या जंगलांत शिकार मिळणें मुष्किलीचें होऊन बसलें. जिथें जाईन तिथें पांखरें नाहीं तर वानरें माझ्या आगमनाची दवंडी दिल्याशिवाय राहत नसत.

ही अगदीं लहान बंदी होती. गर्द झाडी किंवा वृक्षराजी असें येथें कांहींच नव्हतें. बंदीच्या तिन्ही बाजूंनीं पडीक जमिनी आणि शेतें होतीं. माझ्या अस्तित्वाची कल्पना असल्यामुळें हरीण, रोही, डुकरें इत्यादि प्राणी शेताच्या आश्रयानें राहूं लागले आणि सूर्यास्त होतांच सरळ मोकळ्या मैदानावरच जाऊन उभे राहूं लागले. दिवसा शिकार करावी तर पांखरांचा आणि वानरांचा उपसर्ग, आणि रात्रीं शिकार करावी तर श्वापदें शेतांत निघून गेलेलीं...

अशा परिस्थितींत मला उपवास पडूं लागले. एक दिवस भुकेनें व्याकूळ होऊन मी अशीच हिंडत असता बंदीलगतच्या एका कुरणांत

मला गाई, म्हैशींचा एक कळप चरतांना दिसला. मी कशीतरी लपत छपत तेथपर्यंत गेले. एखादें तरी ढोर चुकून कळपांतून बाजूला जाईल अशी माझी अपेक्षा होती. पण तसें कांहीं घडलें नाही. एक गुराखी मात्र आपल्या कळपापासून दूर एका झाडाखालीं स्वस्थ उताणा निजला होता. त्याच्या जवळपास एक–दोन गाई पण चरत होत्या. त्याची दृष्टि चुकवून या गुराख्यास तेथून उचलून न्यावें. असें मी ठरवलें. मी दबत दबत कशीतरी तेथपर्यंत गेले. आणि त्या गुराख्याच्या पोटात दांत खुपसून त्याला उचलणार, इतक्यात जवळच्या दोन गाई शिंगें रोखून माझ्याकडे वेगानें धांवत आल्या. जबड्यांत काय सांपडेल ते धरून मी त्याच पावली एकदम मागें पळून आले. आणि झाडाआड जाऊन माझी शिकार निरखून पाहूं लागले. माझ्या तोंडांत सांपडलेली शिकार दुसरी तिसरी कांहीं नसून त्या गुराख्याची भली मोठी आणि वजनदार अशी चंची होती. इतकें धैर्य करूनहि अखेर मला खाण्यासारखें कांहींच मिळालें नव्हतें. पण तोंच गुराखी त्या चंचीकरितां माझ्याकडे धांवत येतांना मी पाहिला. मला त्या गुराख्याची कमाल वाटते. थोडें दूर उभे राहून ढोराला हांकलावें त्याप्रमाणें तो मला हद् हद् करूं लागला. त्याला प्राणाची पर्वा उरलेली नव्हती. कारण त्या चंचीत त्याच्या संबंध आयुष्याची कमाई म्हणजे २० रु. त्यानें जपून बांधून ठेवले होते. मी एकदम सरळ त्याच्या अंगावर धांवत जाऊन त्याच्या खांद्यावर पंजा ठेवते न ठेवते तोंच मघांच्या गाई फिरून माझ्या अंगावर आल्या. आणि एकीनें तर माझ्या फऱ्यावरच शिंगांची धडक मारली, मी अर्थातच जीव घेऊन पळून गेले. मनुष्यप्राण्यावर हा माझा पहिला हल्ला होता, आणि तोहि मी केवळ भुकेनें व्याकुळ झाल्यामुळेंच केला होता.

खरं म्हणजे आम्ही मनुष्यप्राण्यावर कधींच हल्ला करीत नाहीं. उपवासानें कांहीं सुचेनासें झालें तरच आम्ही माणसावर तुटून पडू. आम्ही जखमी असल्यास आणि खास आमच्याकडेच आमचा शोध घेण्यास कोणी येत असल्यास आम्ही त्याच्यावर हल्ला करूं. वार्धक्यानें अपंग झालेला वाघहि माणसावर जाऊन पडेल. आम्हीं मारलेलें श्वापद कोणी हिरावून नेत असल्यास आम्ही त्याला खतम केल्याशिवाय राहणार नाहीं. वरील प्रसंग सोडल्यास माणसांना आमच्यापासून भिण्याचें कांहींच कारण नाहीं. एवढें खरें कीं, एकदां माणसावर आमचा हात पडल्यास आम्हांला तो फार आवडूं लागतो. माणसाच्या मांसांत कांहीं विलक्षण रुचि आहे, म्हणून नव्हे तर, त्याची (माणसाची) शिकार सुलभ आहे म्हणून आम्हांला तो फार आवडतो.

गुराख्याला जखमी केल्याचा गवगवा सगळीकडे पसरला आणि माझीच शिकार करण्याचे प्रयत्न सुरु झाले. बंदीतूनच एक मोटारचा रस्ता आहे. या रस्त्याच्या कांठावरील झाडांवर मचाणं बांधण्यांत येत. जिवंत हेला एखाद्या झाडाला बांधून कांहीं शिकारी मचाणावर बसूनहि रहात. माझ्या हें सर्व लक्षांत येत असे. मीं कधींच हेला मारण्याचा प्रयत्न केला नाहीं. गुराख्याच्या अनुभवापासुन माझ्या मनांतली माणसाबद्दलची भीति पार उडून गेली होती. रस्त्याखालील एका पुलांत लपून बसून मी रस्त्यावरूनच जाणाऱ्या एकट्या दुकट्या माणसास उचलून नेत असे. आतां माझा भुकेचा प्रश्न सुटून गेला होता. मचाणावरून शिकार करणारे शिकारीहि कंटाळून गेले होतें. जंगलांत माझा शोध करीत पायीं हिंडण्याचें धैर्य असेल असा मनुष्य निर्माण होईपर्यंत मला कशाचेंहि भय नव्हतें. वाटेल तिथें 'जिम कारबेट' सांपडतो असें नाहीं हें जरी खरें असेल; तरी जिम कारबेटपेक्षांहि जास्त धैर्य आणि शौर्य असणारे लोक नसतातच असें नव्हे.

नवीन शिकाऱ्यांचा एक मोठा वर्ग असा आहे कीं, ज्यांच्यासमोर जिम कारबेट म्हणजे कांहीं माल नव्हे! एक दिवस पहाते तों माझ्या जंगलांत पांच नवीन लोक मला फिरतांना दिसले. त्यांच्या लांब लांब गप्पा मला स्पष्ट ऐकू येत होत्या. त्यांच्या गप्पांवरून हे बरेच नवीन शिकारी असावेत असा मीं तर्क बांधला. आतां तर यांपैकीं एखादा शिकारीच माझ्या भक्षस्थानी पडणार, अशी आशाहि माझ्या मनांत चमकून गेली. याना दिवसभर असेंच हिंडू देऊन रात्री अंधार पडल्यावर यांची खबर घ्यावी असे मीहि ठरवलें होतें. तरी पण ते आपल्या दृष्टिपंथात राहतील येवढें अंतर ठेवून त्यांना न कळत मी त्यांच्या मागोमाग जाऊं लागले. चुकून माकून एखादा मागें राहिल्यास त्याला अलगद उचलून नेऊन वाघाचें कौशल्य काय आहे हें एकदां त्यांना दाखवावें असें माझ्या मनांत येई. त्यांचे आपआपसांत मनसुबे चालले होते. वाघ एकदम कोणाच्या अंगावर चालून गेल्यास, बाकीच्यांनीं त्या माणसाची पर्वा न करता गोळ्या चालवाव्यात. असे ते म्हणत. नरमांसभक्षक वाघ गोळ्या मारायला असा सहजासहजीं दिसत नसतो, हें त्या बिचाऱ्यांना माहीत नसावें. इतकेंच नव्हे, तर आपण सगळे वाघाला दिसलों आहोंत आणि वाघच आपल्यामागें सारखा येत आहे– याची त्याना जाणीवहि नव्हती. जसजसा अंधार पडू लागला तसतशी ही मंडळी मोटारीच्या रस्त्याकडे जाऊं लागली आणि पूर्ण अंधार पडेपर्यंत हे सर्वजण रस्त्यावर पोंहोचलेहि. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बंदी होती. रस्त्यावरून ही मंडळी आतां गावाकडें परतली होती. तरी पण यांना अजून तीन मैल बंदीतूनच जावयाचें होतें. मी मात्र त्यांच्या उजवीकडे रस्त्याच्या खालच्या बाजूनें त्याना समांतर अशी चालत होते. ह्या तीन मैलांमध्ये केव्हांतरी कोणी एखादा एकटाच गांठला जाईल अशी मला आशा होती.

पण या मंडळींनीं एक गोष्ट निश्चित ठरवून ठेवली होती. आणि ती ही कीं, सगळ्यांनीं अगदीं एकत्र चालावयाचें. इतक्यांत आमच्या समोरून चितळाचा (ठिपके असलेले हरीण) कळप मोठ्या वेगानें रस्त्याच्या उजव्या बाजूकडून डाव्या बाजूकडे पळत गेला. त्यातील नर सारखा आरोळ्या मारीत होता. ह्या कळपाला मी नक्कीच दिसले होते. वाघ पाहिला कीं यांतील नर मोठमोठ्याने ओरडूं लागतो व आपल्या मादयांना एकत्रित (करून) जमवून दूर घेऊन जातो. ही सांबरांची पण संवय आहे. असा आवाज करीत एखादा कळप धांवू लागल्यास त्याच्यामागें वाघ असलाच पाहिजे असा तर्क अनुभवी शिकारी बांधतात. या शिकारी मंडळींना या घटनेचा काहीच अर्थ कळला नव्हता. यावरून हे लोक अगदींच नवीन शिकारी आहेत. या माझ्या तर्कास दुजोराच मिळाला.

काहीं वेळानें या लोकांनीं आपल्या टोळीचें विभाजन केलें. तिघेजण मागें आणि दोघेजण पुढें. मागील मंडळीत दोन बंदूकवाले आणि एक टॉर्चवाला असे होते. पुढील दोघांत एक टॉर्चवाला होता व दुसऱ्याच्या हातांत रायफल होती. रायफलवाल्याच्या डोक्यावर हेडलाईटहि बांधलेला होता. मागच्या मंडळीनी रस्त्याच्या डाव्या बाजूकडील जंगलात टॉर्चचा उजेड

टाकीत जावयाचें व पुढील दोघांनीं रस्त्याची उजवी बाजू सांभाळावयाची असें ठरलें होतें. या प्रमाणें एकमेकांत साधारण १० कदमाचें अंतर ठेवून, या दोन्ही टोळचा आतां शिस्तीनें चालूं लागल्या. पुढल्या दोन लोकांपैकीं कुणाच्या टॉर्चचा उजेड माझ्या तोंडावर पडल्यास मी डोळे मिटून घेत असे. टॉर्चच्या प्रकाशांत माझे डोळे चमकू नयेत याची खबरदारी घेत असे.

रात्रीच्या वेळीं या टार्चच्या प्रकाशांत दूरचें श्वापदें जरी ओळखता आलें नाहीं, तरी त्याचे डोळे चमकू लागतात. डोळचांवरच प्रकाश पडल्या कारणानें दिपून जाऊन श्वापद दहा–पांच क्षण वेडचासारखें नुसतें प्रकाशाकडे बघूं लागते......

निरनिराळचा श्वापदांच्या डोळचांत निरनिराळचा रंगाची चमक दिसूं लागते. रानडुकराचे डोळे प्रकाशांत लालसर दिसूं लागतात. हरणादिकाचे डोळे शुक्राच्या चांदणीसारखे चमकूं लागतात. आम्हां वाघांच्या डोळचांत एक प्रकारची हिरवी-निळी झांक असते. डोळचांवर प्रकाश टाकून दिपविलेल्या श्वापदावर गोळचा झाडण्यांत येतात हें माझ्यासारख्या अनुभवी वाघिणीला कुणीं सांगावयाला नको होतें. आणि म्हणूनच प्रकाशाचा झोत आला कीं, मी चटकन् डोळे मिटून घेत होते. एक-दीड मैल असें चालून गेल्यावर हवी असलेली संधि मिळाली. रस्त्याच्या डाव्या बाजूला प्रकाश टाकीत चालणाऱ्या टोळीला दूर कोठें तरी डोळे चमकतांना दिसले. त्यामुळें ही मागची टोळी तिथेंच थबकून उभी राहिली. पुढचे दोघेजण मात्र तसेंच पुढें पुढें चालूं लागले. मागचे लोक मागेंच थाबले आहेत हे त्याच्या ध्यानात आलें नाहीं. दिवसभर जगल धुडूनहि वाघ न मिळाल्यामुळें आतां त्याची भेट होणें असंभवनीय आहे असें ह्या मडळीना वाटू लागलें होतें; आणि म्हणूनच ही सर्व मंडळी आतां गाफिलपणें चालली होती. समोरच्या दोघांनीं तर आतां उजवीकडे प्रकाश टाकणेंहि जवळ जवळ बद केलें होतें. त्यामुळें त्यांच्या उजव्या बाजूकडे असलेल्या मला आता अंधारांतून चालण्याला आयतेंच फावलें होतें. हेडलाईटवाला तर रस्त्याच्या डाव्या बाजूकडेच प्रकाश टाकीत चितळाची गंमत पाहण्यांत व्यग्र झाला होता. माझा सुगावा लागल्यामुळें हा कळपहि शिकाऱ्याच्याच आश्रयानें हळूंहळूं चालत होता. माणसाच्या आश्रयानें आपण जोपर्यंत आहोंत, तोपर्यंत वाघांपासून आपण सुरक्षित आहों याची त्या कळपाला पूर्ण कल्पना होती. आतां एकच गोष्ट शिल्लक राहिली होती. ती म्हणजे ह्या पुढच्या दोन माणसांत अतर पडण्याची. तीहि संधि लवकर मिळाली.

मागचे लोक मागेंच थांबले आहेत हें लक्ष्यांत आल्यावर पुढच्या दोघांपैकी एक मनुष्य मागें येऊन मागच्या मंडळींत सामील झाला. खरोखर त्यानें असें करायला नको होतें. पण वाघ मिळण्याची आशा जवळ जवळ नष्ट झाल्यामुळें आपल्या सोबत्यांस एकटें सोडून जाण्यास कांही हरकत नसावी असें त्यास वाटलें असावें—

तो तसाच मागें येताच मी थोडें पुढें जाऊन एक सौम्य गर्जना करून ह्या एकटचा माणसाच्या समोर ५-७ कदमांवर येऊन उभी राहिले. माझी ती लहानशी गर्जना ऐकल्याबरोबर हा मनुष्य इतका चमकला कीं, त्या झटक्यासरशी त्याचा लाईट घसरून त्याच्या गळचांत आला व त्याचा प्रकाश आतां त्याच्याच पायांवर पडू लागला. मी या मनुष्यावर हल्ला करण्यास दबते न दबते तोंच दोन-तीन विजेऱ्याचा प्रकाश माझ्या डोळचांवर एकदम पडला. मी तशीच आणखी थोडी दबले. तों अगदीं माझ्या समोरच रस्त्यावर रायफलवाल्यानें गोळी झाडली. मीं तत्काळ एक लांब उडी घेऊन जगलांत ( अदृश्य ) झाले. माझ्या सबंध दिवसाचे श्रम वायां गेले होते. प्रत्येकाचा मृत्यू अखेर कांहीं एक अज्ञात शक्ति ठरवीत असते. हेंच खरें. त्या क्षणाला जर विजेऱ्यांचा झोत माझ्या डोळचांवर न पडता तर मी त्या शिकाऱ्यास सहजच उचलून नेलें असते. कांहीं वेळ निरीक्षण केल्यावर ज्या श्वापदाचे डोळे चमकत होते. तें श्वापद कोल्हा आहे असें लक्षांत आल्याबरोबर मागील मडळीनें तो नाद सोडून सहज उजवीकडे जों प्रकाश टाकला, तों बरोबर माझ्या डोळचांवर पडावा हा नियतीचाच खेळ नव्हे काय ? निसर्गाला जसे त्या शिकाऱ्यास वांचवायचें होतें, तसेच मलाहि वांचवायचें होतें. शिकाऱ्याचा लाईट जर असा गळचांत आला नसता, तर पांच सात कदमांवरूनहि गोळी अशी चुकण्याचा कांहींच संभव नव्हता. दुसऱ्याहि एका दृष्टीनें जें झालें, तें एका परीनें योग्यच झाले. या माणसाला मारून टाकण्यांत मी एक माणूसच मारणार होतें असें नसून, भावी काळातील एका शायराची हत्या करण्याचें पाप माझ्या माथी आलें असतें.

या प्रसंगानें या मडळीच्या मनांत धसका बसण्याऐवजी त्यांना जास्तीच स्फुरण चढल्यासारखें दिसलें. काय वाटेल तें होवो उद्यां खूप माणसें एकत्रित करून या वाघाला हाक्यातून बाहेर काढावयाचेंच. असें बडबडत ही मडळी चालू लागली. असे हाके तर मीं कित्येक पाहिले होते. हाका सुरू होण्याचें आंतच तेथून पळून जाण्याची युक्ति मला पूर्ण साधलेली होती...

कांही झालं तरी मचाणाकडे जावयाचें नाहीं असा मीहि निश्चय केला होता. वेळ आलीच तर हाका फोडून निघून जावयाचें असें मीहि ठरवलें होतें. दुसरे दिवशीच्या हाक्याचा विचार करीत ही मंडळी जशी जंगलाच्या बाहेर पडली, तशीच मीहि रात्रभर माझ्या योजना आंखीत होते. दुसरा दिवस उजाडला. सकाळी ९ वाजेपर्यंत जंगलाच्या बाहेर वारद गांवची दोनशें–अडीचशें मंडळी हाक्याकरिता मोठ्या उत्साहानें जमली होती. ह्या सगळचांच्या बोलण्यात विलक्षण त्वेश होता. त्याच गांवच्या वाघ्या वंजाऱ्याला मीं नुकतेंच खाऊन टाकलें होतें. आणि त्यामुळें त्याचा पुरा सूड घेण्याचें या लोकानीं ठरविलें होतें. जंगलामध्यें दोन ठिकाणी मचाणें बांधण्यांत आलीं होतीं. हाकेवाल्यांनीं मला मचाणाकडे हाकलून न्यावयाचे होतें. मी ज्या रस्त्याने मचाणाकडे जाईन असा अंदाज होता. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या झाडावर, अधूनमधून कांही माणसें उंच बसलीं होतीं. हाक्यांतून एखाद्या बाजूनें मी निसटून जाऊं लागल्यास जवळच्या झाडावरील माणसानें नुसती टाळी वाजवली की सामान्य वाघाप्रमाणे मी भिऊन जाईन आणि मचाणाकडे जाऊं लागेन असा त्या मडळीचा कयास होता. नरभक्षक वाघाशीं असे नेहमीचे उपाय चालत नसतात हें त्यांना माहीत नव्हतें. या जंगलामध्यें “मारुतीचा खोसा” या नांवाचा एक खोलगट भाग आहे. आम्हां वाघाची निवांत बसण्याची ती अत्यंत आवडती जागा आहे. या जंगलांत येणारा प्रत्येक वाघ हीच जागा पसत करतो. आणि मरेपर्यंत ती सोडत नाहीं. एका वाघाला ज्या कांहीं विशिष्ट कारणामुळें एक जागा आवडली

असतें, त्याच कारणामूळें दुसऱ्याहि वाघाला तीच जागा आवडते. आणि म्हणूनच आम्हा श्वापदांच्या, जंगलातील जागा अशा निश्चित झालेल्या असतात. एखाद्या विशिष्ट जंगलात एक वाघ ज्या ठिकाणीं जाऊन पाणी पितो *आणि ज्या रस्त्यानें शिकार शोधण्याकरितां* आरंभ करतो, तसाच दुसराहि वाघ करील...

वाघाचीं नुसत्या वस्तीचीच ठिकाणें निश्चत होतात असें नव्हे तर त्याचीं पाणी पिण्याचीं ठिकाणें आणि त्याचे हिंडण्याचे रस्तेहि ठरून गेलेले असतात. काही विशिष्ट कारणें घडल्याशिवाय त्यात बदल होत नसतो. जंगलाचा *अनुभव* असणाऱ्या लोकाना वरील गोष्टीची जाणीव असते. आणि म्हणूनच मी 'मारुतीच्या खोऱ्यांत' आलें, अशी कल्पना करून हे लोक आतां त्याच खोऱ्यात हाका करतील हा माझा अंदाज अचूक होता. म्हणूनच माणसांचा चहाळ आल्यावरोबर हाका सुरु होण्याच्या आधीं मी दूर निघून गेलें. *आणि एका खालगट जागेत* झुडपांच्या आड लपून बसलें. शिकारी लोक आपआपल्या मचाणांवर जाऊन बसले. वर सांगितल्याप्रमाणें झाडाझाडांवरून माणसेहि उंच चढून बसलीं होतीं. माझ्यापासून वीस ते पंचवीस कदमावर असलेल्या दोन निरनिराळ्या एका रांगेतील झाडांवर दोन लोक चढतांना मीं पाहिले. *एकाला तर मीं ओळखलेच.* काल ज्यानें माझ्यावर गोळी चालवली होती, तोच मनुष्य माझ्या समोरच्या झाडावर चढून बसला होता. त्या माणसापासून आणखी दहा ते पंधरा फूट अंतरावर असलेल्या झाडावर दुसराहि एक पटकेवाला माणूस चढून बसला होता. मी त्यांच्या इतक्या जवळ आहे हें *त्याच्या लक्षातहि आलें नव्हतें.* आसमंतांत जर इतकीं कांही माणसें नसतीं तर मीं त्या दोघापैकीं एकाला केव्हाच उचलून नेलें असतें सर्व व्यवस्था झाल्यावर माझ्यामागून लांबवरून 'मारुतीच्या खोऱ्या' कडून हाका सुरू झाला. प्रथम मोराचा एक मोठा कळप हाका सुरू होताच फडऽऽ फडऽऽ करीत माझ्या समोरून *मचाणांकडे गेला.* दुसरें कोणतेंहि श्वापद हाक्यांत निघालें नाहीं. हाका सुरू होताच मी माझ्या झुडपाआड उभी राहिलें. तोंच त्या पटकेवाल्याचें लक्ष्य माझ्याकडें गेलें. तो भीतीनें थरथर कांपत होता. त्याचें झाडहि कांपरें भरल्यासारखें खलखल् हालूं लागलें. सागाच्या एका लहान फोकाट्यावर *तो माणूस कसातरी उभा होता.*

त्या झाडापासूनच मला चट्कन नाल्यांत उतरता येणें शक्य होतें. अलिकडच्या झाडावरील कालच्या त्या शिकाऱ्याचें माझ्याकडे लक्ष जाण्याअगोदर मला तेथून निघून जावयाला हवें होतें. कालचा शिकारी त्या हलणाऱ्या झाडाकडे *पाहून पटकेवाल्याला न* घाबरण्याबद्दल हाताने खूण करीत होता. हाका नुकताच कुठें सुरू झाला होता. त्यामुळें इतक्या लवकर वाघ तेथपर्यंत येईल अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. मीं मोठ्यानें गर्जना करून त्या हलणाऱ्या झाडाकडे उडी घेतली; आणि तेथून दुसरी उडी नाल्यांत घेऊन *अदृश्य झाले. माझ्यामागोमाग कालच्या* गृहस्थानें गोळी झाडली, पण ती सरळ त्या सागाच्या बुंध्यांत घुसली....

वाघ बाजूला निघून जाऊं नये म्हणून बसविलेल्या माणसापैकी एकाकडून बंदुक झाडली जावी याचें सगळ्यांनाच आश्चर्य वाटलें. हाक्यांत निघालेला वाघ तर कोणीच *पाहिलेला नव्हता, जो वाघ मुळीं हाक्यांतच* निघाला नाहीं. त्याच्यावर बाजूस बसलेल्या मंडळींपैकीं एकानें बार का काढावा हें कोणासच समजेना. हाकेवाले स्तब्ध आपल्या जागीं उभे राहिले; मचाणवाले तर अतिशय बुचकळ्यांत पडले. शेवटीं बंदुक चालविणारा गृहस्थ झाडाखालीं उतरला, आणि त्यानें *सर्वांस हाका मारून एके ठिकाणी जमा* केलें. वाघ हाका सुरू होण्याच्या अगोदर जवळ येऊन बसला होता, आणि त्यावर घाईघाईनें मारलेली गोळी साफ हुकली होती, असे हा शिकारी सर्वांना समजावून सांगत होता. तशी गोळी जर मारली नसती तर कदाचित त्या पटकेवाल्याला वाघानें झाडावरून ओढले *असते, असें हा शिकारी आपले समर्थन* करीत होता. पण इतक्या जवळचा वाघ चुकल्याबद्दल बाकीचे लोक त्याला उघड दोष देऊ लागले...

वाघाचा फिरून उलट हाका घेण्यास आतां कोणीहि तयार नव्हतें. पाच-दहा कदमाच्या अतरावरून दोनदा गोळी चुकल्याबद्दल त्याला सर्वांनीं दोष देणें सहाजिकच होतें. मचाणें सोडण्यात आलीं. आणि सर्व हाकेवाले परत घरी जाण्याची तयारी करूं लागले. शिकारी मंडळी तर अतिशय हिरमुसली झाली होती. पण इतक्यांत हाकेवाल्यापैकीं कांहीं जणांनीं एक आनदाची बातमी आणली. हाका करीत असतांना, एका झुडपाच्या आड त्यांना एक नुकतीच *मारून टाकलेली गाय* दिसली. गाईचा एक फरा अर्धामुर्धा खाल्ला आहे, असें त्यांनीं सांगितलें. या शिकारी मंडळींनी या बातमीचा पूर्ण उपयोग करून घ्यावयाचें ठरविलें. लागलीच गाईच्या गाऱ्यावर एक एक मचाण बांधले गेलें. आणि दोघांखेरीज बाकी सर्वजण गाईपासून पन्नासा–साठ यार्ड अंतरावर जाऊन बसले. मचाण इतकें व्यवस्थित बांधलें गेलें होतें कीं, सहजासहजीं तें दृष्टीस पडूं नये. मचाण बांधते वेळी मी इतकी लांब निघून गेलें कीं, मला मचाण बांधण्याचा चहाळसुद्धां बिलकुल ऐकूं आला नाहीं.—

मीं ही गाय सकाळींच मारून ठेवली होती. आणि ती खात असतांनाच हाकेवाल्यांची *चाहूल लागल्यामुळें मी* तेथून निघून गेले होते. एकदा हाकेवाल्याची कटकट निघून गेली कीं, मग सावकाश येऊन ती गाय खावी असें माझ्या मनांत होतें. शक्य तर आम्ही मारलेल्या जनावरापासून कधींच दूर जाऊन बसत नाहीं. पोटभर खाणें झालें तरीहि आम्हाला त्या मृत श्वापदाचें संरक्षण करीत बसावें लागतें. नाहींतर गिधाडें, कावळे, आणि साळुंक्या, वगैरे त्या श्वापदांचा केव्हांच फन्ना उडवितात. मारलेलें जनावर अगदीं निर्जन अशा ठिकाणीं उचलून नेणें शक्य नसल्यास आम्ही त्या मृत पशूस तेथेंच टाकून दूर आमच्या राहत्या ठिकाणीं निघून जातों. आणि सूर्यास्ताच्या सुमारास फिरून परत तें जनावर खाऊं लागतों. आज *मला ह्या* हाक्यामुळें गाय सोडून जावें लागलें होतें. सूर्यास्त झाल्यानंतर मी गाईकडे येण्यास निघाले. पाहतें तों गाईपासून पन्नास-साठ यार्डांवर मचांचे सर्व हाकेवाले एके ठिकाणीं बसून गप्पागोष्टी करीत आहेत. मी या शिकाऱ्यांना अननुभवी समजत होते खरी, पण शेवटीं *या लोकांनी रचलेला डाव माझ्या* लक्षांत आला नाहीं. नरभक्षक वाघाची शिकार हा धैर्यापेक्षा बुद्धिमत्तेचाच खेळ जास्ती आहे. वाघ आणि शिकारी एकमेकांशी असे अनपेक्षित डावपेंच खेळत असतात. यांत ज्याची बुद्धिमत्ता कमी पडते तो बळी जातो. गाऱ्याकडे परत येत असतां गाऱ्याच्या आसमंतातील *प्रत्येक गोष्टीचें सूक्ष्म निरीक्षण* करण्याची आम्हांला उपजतच संवय आहे. एखाद्या हावरटासारखे विशेष विचार न करता गाऱ्यावर जाण्याची जशी बिबट वाघांना

( पान ४० वर चालू )

# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.



# जुन्या वाड्यांतून

: लेखक :

मो ती नं दी

अशोक अन् गीता पोंचलें जवळजवळ संध्याकाळ उलटून गेल्यावर. गल्लींत शिरल्यावर घर हुडकून काढायला मुळींच वेळ लागला नाहीं. भला थोरला वाडा.

कडी वाजवून वाट बघावी लागली. मनगटावरल्या घड्याळांत वेळ बघून गीता म्हणाली, "थोडंसं आधींच आलों वाटतं."

"कांहीं हरकत नाहीं."

अशोकनं परत कडी वाजवली. आवाज न होतां एकच दार किंचित् हाललं. फट झाली. एक डोकं बाहेर आलं. त्यांना बघून खालच्या आवाजांत म्हणालं, "कोण पाहिजे."

"आम्हीं अजयबाबूंच्या कडनं आलोंय्." असं म्हणून अशोक पुढं झाला.

"कोण अजयबाबू."

"तुमचे मित्र. मास्तर."

दाराची फट जास्ती रुंदावून तो माणूस म्हणाला, "या."

अंधार होता. दिवा लागायच्या आधींच त्यांना जाणवलं, आपण एका खूप जुन्या वाड्यांत आलोंय्, वास. खूप दिवस भिजवून ठेवलेल्या कपड्यासारखा दमट. उजेडांत बघितलं. अवास्तव मोठ्या पायावर भिंती. जाड लांकडी दरवाजा. वरती अजस्र कडीपाट. खालीं शहाबादी फरशी.

कमी पॉवरचा दिवा. हा जुनाट वाडा. अन् तो माणूस.

"या."

आमंत्रण केल्यासारखा त्यानं हात पुढं केला. आवाजाची पट्टी खालची. ते मागोमाग गेले. तो त्यांना एका खोलींत घेऊन गेला. कोंपऱ्यांत एक भरभक्कम टेबल. अन् थोड्याशा खुर्च्या.

"बसा."

ते बसले नाहींत.

"थोडीशी वाट पहावी लागेल तुम्हांला. खोली आत्तां रिकामी नाहीं. एंगेज्ड्."

"मग—"

अशोकनं गीताकडं बघितलं.

"तुमच्याकडं एकच खोली आहे?"

"अं हो."

नम्रपणं त्यानं गीताच्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

"मग—"

गीतानं अशोककडं बघितलं.

"पण मीं तर ऐकलं होतं, कीं गेल्यावर लगेच मिळेल म्हणून."

"ती आतां जुनी गोष्ट झाली. तेव्हां इतक्या लोकांना माहितहि नव्हतं. मी पण विश्वासानं खोली देत नव्हतों. शिवाय तेव्हां मला जरूरहि नव्हती इतकी."

"आलांच आहांत तर तसेच कशाला जातां. तेहि पण आणखी एका तासानं खोली सोडतीलच कीं."

"मग त्यापेक्षां आम्ही थोडसं फिरून येतों. एका तासांत येतोंच."

मनगटावरलं घड्याळ बघतां-बघतां गीता म्हणाली, "तुला डॉक्टरांच्याकडं जायचं होतं ना? तें काम उरकून टाक मग तेवढ्यांत."

अशोक कांहीं बोलणार, त्याच्या आधींच तो माणूस म्हणाला, "पण तेवढ्यांत दुसरं कुणी आलं, तर त्यांना बसवून ठेवतां यायचं नाहीं मला."

मिट्‌मिट् करत बघतोय्. अशोकनं दृष्टि त्याच्यावरनं काढली. तो खांकरला. रुमाल बाहेर काढून त्यानं नाक शिंकरलं. थंडपणं अलगद म्हणाला, "ठीक आहे."

खुर्ची ओढून गीताला पण त्यानं बसायची खूण केली. हें सगळं करायला जितका वेळ लागला, तेवढ्यांत त्यानं विचार करून टाकला होता. बाहेर जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

"तुम्ही बसा तर मग. मी आंत जातों."

तो माणूस निघून जात होता. गीतानं बोलावलं.

"एक ग्लास पाणी मिळूं शकेल का?"

"वा वा! कां नाहीं."

घाईघाईनं तो बाहेर गेला गीता म्हणाली, "तूं कां गेला नाहींस?"

"कुठं?"

"डॉक्टरांच्या कडं. आमांश म्हणजे भारी घाणेरडा असतो. सुरुवातीलाच बरा करावा, हें बरं."

"एक दिवस उशीर झाला, तर असं कांहीं नकसान व्हायचं नाहीं."

वाद थांबवण्याकरतां पायावर पाय टाकून अशोकनं सिगारेट-केस उघडली. नाहीं. केस त्यानं जोरांत बंद केली.

" कुठं चाललास ?"

" सिगारेट आणतों. इतका वेळ सिगारेट न ओढतां बसणं जमायचं नाहीं. "

अशोक निघून गेला. गीता पाय हलवायला लागली. पाणी घेऊन तो माणूस आला. मागं एक छोटा पोरगा. अर्थात् दाराशीं उभी राहून गीता दिसल्याबरोबर तो पळून गेला.

गीता म्हणाली, " तुमचा ?"

" हो. ते कुठं गेले ?"

" सिगारेट आणायला. "

पर्समधनं व्हिटॅमिनची गोळी काढून तोंड वर करून गीतानं ती अलगद तोंडांत टाकली. सगळं पाणी पिऊन पदरान तोंड पुसलं.

" बरं-बिरं नाहीं वाटतं ?"

" नाही ह्या रोजच खातें. शरीर टिकवून धरण्याकरतां. इलाज काय दुसरा ?"

बोलणं न वाढवतां तो माणूस निघून जात होता. गीतानं बोलावलं. " महिन्यामागं तुम्हांला कितीसे सुटतात हो ? अर्थात् असं विचारणं तसं बरं नाहीं. पण तरी तुमची हरकत नसेल तर—"

" नाहीं नाहीं. हरकत कसली. ठीक चालतं एकदरींत. "

" फारसं कष्ट नाहीं पडत ?"

" दुकानांत जातों. बाजारांत जातों. आधीं मास्तरी करत होतों. आतां सोडून दिल्याय्. आतां करतोंय् तें काय असं वाईट आहे ?"

" तुमचं ठीक आहे. "

गीताच्या वर्मी घाव घातला गेला जणूं. थोडावेळ थांबून तो माणूस निघून गेला. एकटं बसून रहावं लागल्यावर सगळे जें करतात, तेंच गीतानंहि केलं. मान वळवून इकडं-तिकडं बघायला सुरुवात केली. बघण्याजोगं कांहीच नाहीं. खोली मोठी आहे. बल्ब चाळीसचा असेल बहुतेक. भिंती बुरसटलेल्या. गिलावा पडून गेलाय्. चुन्याचा रंग तांबडा झालाय्. त्यामुळं सबंध खोलीच घाणेरडी वाटते. गीताच्या डाव्या हाताच्या भिंतीत एक बंद खिडकी. ही खिडकी नक्कीच त्या खोलीची असणार. जिथं जाण्याकरतां म्हणून आपण आलोंय्. तिला कुतूहल वाटलं. खिडकीच्या पलीकडं नक्कीच एक पुरुष अन् एक बाई. आत्तां ते काय करतायत्. त्यांचा संबंध काय इत्यादी विचारांत ती गुंग व्हायला लागली. शेवटीं काटछाट होऊन विचार अशा एका जागी जाऊन पोंचले कीं, मग चंचलता जाणवल्यावांचून गीताला राहवलच नाहीं.

ती उठून खिडकीशी गेली. शब्दाचा किंवा आवाजाचा एखादा तुकडा ऐकण्याच्या आशेनं तिनं खिडकीला कान लावला. पण रस्त्यावरनं जोरजोरात बोलत-बोलत कुणीतरी गेल. लांब कुठल्याशा घरांत कुणीतरी जोरांत ओरडलं. भांडं पडल्याचा आवाज झाला. आंतच बहुतेक. निराश होऊन ती खिडकीपासनं बाजूला झाली. तेवढ्यांतच अशोक परत आला. तोंडांत जळती सिगरेट.

" दुकान म्हणजे थेट ट्रामलाईनच्या तिथं. "

अशोकच्या शेजारच्या खुर्चीवरच गीता बसली.

" ह्या खोलीचासुद्धां त्याला उपयोग करून घेतां आला कसता की. तेवढीच मिळकत वाढली असती. " अशोकनं जोरांत सिगारेटचा झुरका घेतला.

" वाढली असती. पण मग आपण वाट बघत कुठ बसलों असतों. "

अशोकनं विचार केला. त्याला पटलं.

" पण खोली चांगली निवांत आहे. "

" रस्त्याच्या बाजूची खिडकी बंद केली तर. "

अशोकनं उठून रस्त्याच्या कडेची एकुलती एक खिडकी बंद करून टाकली. तो दारहि पण बद करायला जात होता. गीतानं हात धरून अडवलं.

" तें बरं व्हायचं नाहीं. "

" कां. तुझा विरोध आहे. "

" हो. त्याला फसवल्यासारखं होईल. भाडं न देतां तशीच खोली आपण वापरली, तर—म्हणजे त्याच्या उपजीविकेच एवढं एकच साधन आहे. त्यामुळं फसवल्यासारखंच होईल. नाहीं का ? "

अशोकनं विचार केला. पण एकमत व्हावंसं त्याला वाटलं नाहीं.

" होईल कदाचित्. पण तसे पैसे काय तें मोठ्या चांगल्या मार्गानं मिळवतायत्. भाड्यानं खोली देण्याचं नाही म्हणत मी. पण भाडं भरमसाट आहे, म्हणून. तासाला पांच रुपये. म्हणजे दिवसाला, घर वीस तासांना शभर. म्हणजे महिन्याला तीन हजार रुपये होतात. त्याच्या बदल्यात इथं येणाऱ्यांना काय मिळतं ? आपल्याला काय मिळणाराय् ?"

" चल्. तें आत्तांच कसं सांगतां येईल. अजून त्या खोलींत कुठं गेलोय् आपण. "

" समज, गेलोय्. समज, ही खोली तीच आहे. फक्त आपण दोघं. मग काय केलं असतं आपण ?"

अधारांतनं अचानक प्रखर उजेडांत आल्या सारखं गीताला झालं. उजेड सहन करण्याकरतां मान हलवत डोळे मिच्मिच् करत ती म्हणाली, " कां ? ज्याच्या करतां आलोंय्, तेंच केलं असतं. "

" तुझं बोलण ऐकून वाटतंय्, पंचवीसच्या पुढं वय वाढलं नाहीं तुझं. इतक्या सहज सगळं बोलतां येतं तुला. "

" मग काय, महापुरुषासारखं वगैरे बोलायला हव वाटतं ? आपण इथं कां आलोय्, हें तुला माहित आहे. त्यांत परत विचारण्यासारखं काय आहे ?"

कांहीं न बोलतां अशोक सिगरेट ओढायला लागला. गीता खवळली होती. मधनं—मधनं अशोक हें असंच करतो. बोलतो, अन् स्वतः थांबून जातो. सज्जन माणसाचा आव आणून योग्य—अयोग्य, बरोबर—चूक वगैरे बद्दल बोलायला सुरुवात करतो. त्यामुळं ऐकणाऱ्या माणसाला, आपण अगदीं तुच्छ आहोंत, असं वाटल्यावाचून रहात नाहीं.

थोड्या वेळानं अशोक म्हणाला, " एवढ्या वेळांत डॉक्टराच्याकडं जातां आलं असतं, असं वाटायला लागलंय्. "

गीतानं बोलण्यांत भाग घेतला नाही. पायावर पाय टाकून ती रेलून बसली. लक्ष नसल्याचा भाव चेहऱ्यावर आणला. विचारांत गढल्याचा.

एकदम् अशोक धडपडत उठून शर्ट झटकायला लागला. त्यानं वर बघितल. " माती पडत्याय्. "

खुर्ची गीताच्या आणखी जवळ ओढून अशोकनं जागा बदलली.

" कसल्या पडक्या घरांत आलोय् !"

" यायचं नव्हतंस. "

गीता रागान म्हणाली. ती दाराकडं बघत राहिली. अशोक दबल्या आवाजात हसला.

" नाहीं. इतके दिवस फक्त बोलतच होतों तें सगळ बोलणं आकाशांत पसरून टाकल असत, तर आकाश झाकलं गेल असतं. समुद्रांत फेकून दिल असतं, तर समुद्र

भरून गेला असता. आतां बोलायला बरं वाटत नाहीं. प्रेम, दया, माया यांच्याविषयीं बोललं तर बोलतां येतं. पण कांहीं उपयोग नाहीं. इतकं जुनं होऊन गेलंयू सगळं. तुला नाहीं वाटत असं ? "

गीतानं उत्तर दिलं दिलं नाहीं. पण रागाचा भाव अजिबात गेला. तिनं अशोक-कडं बघितलं.

" मी बघितलंय्, माणूस म्हणजे एक गुता-गुतीचं यंत्र आहे. जळण पुरवलं तर चालतो. जळण संपलं कीं थांबतो. आपलं जळण संपून गेलंय्. "

" टाळ्या देऊं कां ! "

" कां ?"

" माणसाबद्दलचा हा शोध अद्भुत आहे, म्हणून. "

" मग तूंच सांग, आपण इथं आलों, ह्याच्यामागं कांहीं तर्कसंगत कारण आहे ? "

" ओः अशोक. " गीता उठून मागं येऊन उभी राह्यली. मान झुकवून कानांत म्हणाली, " तर्कसंगत कारण ? नाहीं नाहीं. परत जाऊं या ? "

" कुठं ? अशोकनं मान वळवायचा प्रयत्न केला. आणखी थोडंसं झुकून गीता म्हणाली, " कुठंहि. "

अशोक थोडावेळ बघत राह्यला. कोरडं हंसला. तें बघून गळयाभंवतीं हात घालून गीतानं त्याचं चुंबन घेतलं. तोंड बाजूला घेतल्यावरोबर अशोक म्हणाला, " सडक्या बटाट्याचा वास. दांत घासले नाहींस ? "

गीता खजिल झाली. तिला रागहि आला. थरथरत्या आवाजांत म्हणाली, " वास तुझ्या गंजीफ्रॉकचादेखील येत असेल. "

" असेल. पण गंजीफ्रॉक मला ह्या क्षणाला काढून टाकतां येईल. "

" त्याच्याशीं काय करायचंय् मला. तुझ्या अंगाचा वास हुंगण्याची माझी इच्छा नाहीं. "

" नाहीं, तर मग इथं कां आल्यायस ? "

उत्तर देण्याकरतां गीतानं तीक्ष्ण नजरेनं बघितलं. आवाज पिळवटून कांपवून म्हणाली, " मी आल्याय्, कीं तूंच मला इथं आणलंयस. खूप दिवसांपूर्वी कुणाशीं तरी माझं लग्न होऊं शकलं असतं. तूच होऊं दिलं नाहींस. थोडं थांब, वाट पहा, पैसे थोडे जास्ती मिळायला लागले कीं लगेंच लग्न करीन. आलय् करतां ? "

" गीता, परत तेंच तुझं बोलणं. हें सगळं खूपदां बोलून झालंय्, आतां आपलं लग्न झालं, तर असा काय फायदा होणाराय् ?"

" दोघांची मिळकत एकत्र होईल."

" अन् हृदयं ? "

" ती तर जोडलेलीं आहेतच. "

" मग काय जरूर आहे लग्नाची. लग्न म्हणजे कांही संसारांतली मिळकत वाढवणं नाहीं अर्थात् एक सोय होईल. उघडपणं तुला घेऊन खोलीत शिरून कडी लावलां येईल."

" ठीक आहे ही काय थोडीथोडकी सोय झाली. मग इथं येऊन ह्या पडक्या घरांत बसून वाट बघावी लागणार नाहीं. तेवढ्या-करतां पैसेहि खर्चावे लागणार नाहीत. तूं विचार करून बघ. लग्न केल्यानं जास्ती फायदा फार तर होत नसेल, पण मिळकत जास्ती होते. पैसे वांचवणं म्हणजेच पैसे मिळवणं. "

वळून येऊन गीता आपल्या खुर्चीवर बसली. चेहऱ्यावर, डोळ्यांत excitement अशोक किंचित् आश्चर्यचकित झालेला, विचारग्रस्तहि.

" आमच्या तिसऱ्या मजल्यावरील खोली खूप सोयीची आहे. "

" भाड्यानं देशील ? "

" कां अन् कुणाला ? " गीता थक्क झाली.

" मला. आपल्याला.पैसे मीच देईन. म्हणजे मग ह्या माणसाला पैसे द्यावे लागायचे नाहींत. घरचे पैसे घरांतच राहतील ? "

अशोक थट्टा करतोय् कीं काय, हें कळण्या-करतां गीता गप्पच राह्यली. शेवटी म्हणाली, " तू खोल विचार करून बघत नाहींयस् अजिबात. कधीं-ना-कधीं आपण म्हातारे होणारच, तेव्हां मग आपल्याला काम करतां यायचं नाहीं. पैसेहि मिळायचे नाहींत. बरं, आतां मिळतायत् ते पैसेहि असे इतके नाहीत, की शिल्लक—" गीता थांबली. कारण, तो माणूस अचानक आंत आला, गीता एकदम थांबली, म्हणून तिला वाटलं, कीं आपण कांहींतरी भलचंच बोलत होतों असं वाटायचं कदाचित ह्याला, म्हणून निवळ कांहींतरी बोलावं म्हणून ती म्हणाली "वरनं माती पडत्याय्. "

त्या माणसानं वरती बघितलदेखील नाहीं. म्हणाला, " पडते. खूप जुनं घर आहे ना. परवां एक तुळई पडली. चुलीत घालून टाकली. एका वेळचा जळणाचा खर्च वांचला" असं म्हणून तो हंसला. परत म्हणाला, " तरी ह्या खोलीचा कडीपाट चांगला आहे. "

खळ् ठक्. बाहेरच्या दवाज्याची कडी वाजली तो माणूस निघून गेला.

अशोकनं मनटावरल घड्याळ पाह्यलं

" किती अवकाश आहे. "

" थोडा. " उत्तरांतनं अशोकनं जाणीव करून दिली कीं, आपण आतां कंटाळलोंय्.

माणूस परत खोलीत आला. मागं दोघं, पुरुष गोरा, स्वच्छ धोतर-पंजाबी. आडव्या अंगाचा. नजरेंत भरण्याजोगे फक्त डोळे. खूप मोठ्ठे. संबंध चेहऱ्यांत उठून दिसतात. बाव-ळटपणाची छटा. कांहीं चूक नसतांना थोबा-डींत खाल्ल्यावर दिसणारी. बाईच्या केंसांत सिंदूर. हाताची हाडं अन् बोटांच्या शिरा वर आलेल्या. फक्त हिरव्या बांगड्या अन् पितळी बांगड्या. कडेवर सहा-एक महिन्याचं मूल. मूल ह्या खोलींत शोभत नाहीं.

" आपल्याला थांबावं लागेल. हे आधीं आलेयत. "

त्या माणसानं बोटानं अशोक अन् गीताला दाखवलं. ते दोघं भयंकर दबकल्यासारखे झाले. बसलेल्या आवाजांत पुरुषानं विचारलं " किती वेळ. "

" एक तास. "

आईनं अस्फुट आवाज केला. पुरुषानं तिच्याकडं पाह्यल्याबरोबर लगेंच नजर खालीं आणून तिनं मुलाकडं बघितलं.

" अर्थात् ह्यांनीं जर आधीं जाऊं दिलं, तर आपल्याला जातां येईल. "

माणूस बाहेर निघून गेला. आंतनं लहान मुलगा एकदां डोकावला. सिगारेट पेटवतां-पेटवतां अशोकच्या लक्षांत आलं, पुरुष आपल्याकडंच बघतोय्. म्हणजे मनांतल्या-मनांत बोलण्याकरतां शब्द जुळवतोय्, तो काय म्हणाणाराय्, अशोकला माहित आहे. आधीं जाण्याकरतां किरकिर सुरु करेल. संडासांत जाताना आपल्याला बघिलंत कीं, पुतण्ये-पुतण्यादेखील नेमकं असंच करतात. तेव्हांसारखा आतांहि त्याला संताप आला.

धूर सोडून अशोकनं बघितलं. सरळ-सरळ असभ्यपणें. मुलाला पाजण्याकरतां बाई बटणं काढत्याय, नजर काढावीच लागली.

" तुम्ही जवळच राहता ?"

पुरुष विचारतोय्. राख झाडून अशोक " हो " म्हणाला

" तुम्ही ?" आतां गीतानं विचारलं.

"खूप लांब."

"मुलाला आणलंय्‌त तें"

एकदां पुरुषाकडं बघून घेऊन बाईनं उत्तर दिलं, "आणल्यावांचून इलाजच नव्हता."

"ह्या माझ्या पत्नी नव्हेत." लगोलग पुरुषानं जोड दिली.

आतां अशोक लक्षं देऊन ऐकायला लागला. त्याच्या मनांत अभिरुचि न् कुतहूल याची चांगलीच लढाई जुंपली होती. काही-का-होईना एकदां निकाल लागायला हवा होता. गीतानं मदत केली.

"मग तुम्ही इथं कसे आलांत ?"

हा प्रश्न आपल्यासमोर उभा ठाकणाराय्, हें जणूं पुरुषानं गृहीतच धरलं होतं. उत्तर त्यानं तयार ठेवलं होतं.

"आम्ही शेजारीं-शेजारीं राहतों. हिला चार अन् मला सहा मुलं आहेत. तान्हया मुलाला घेऊन बाहेर पडलं, म्हणजे कुणाला संशय येत नाही. शिवाय एवढयाशा मुलाला ठेवून तरी कुणापाशीं येणार ?"

"पण मुलाला घेऊनच तुम्ही त्या खोलींत जाणार ?"

"इलाज काय ?"

अशोक ताठ होऊन बसला, आश्चर्यचकित होऊन गीता पण त्याच्याकडं बघत होती. बाई पेंगल्याय्. पोराला झोंप लागल्याय्. स्तन तोंडातनं सुटून गेलाय्. छातीपाशीं कणकेच्या लिबलिबीत गोळ्यासारखा मांसाचा गोळा लोंबतोय्.

"एक विचारूं कां" पुरुष म्हणाला.

"माहित आहे. तुम्हांला आधी जायचंय्."

"हो. उशीर झाला तर हिचा नवरा परत आलेला असेल कदाचित्. फार किरकिरा स्वभाव आहे."

"तुम्ही इथं कां आलांत."

आ वासून पुरुष अशोककडं बघत राहला. तोंडांत मारल्यासारखा चेहरा. भुताकडं बघत असल्यासारखा. प्रश्न प्राजळ करायची जरूर अशोकला जाणवली. "तुमचे संबंध कसे आहेत, तें कळलं म्हणजे मग विचार करून बघतां येईल."

"आमच्या दोघांचीहि फार इच्छा होती. काही पदरात पडल नाहीं. दोघहि वैतागलेले. हा वैताग घालवण्याकरतां आम्ही प्रयत्न करतोंय्"

झोपेंत चाळवत मूल रडायला लागलं. बाईनं स्तन परत तोंडांत खुपसला. मग चारी बाजूला बघून परत ती पेंगायला लागली. पुरुषानं सिगरेटकरतां हात अशोकच्या पुढं धरला.

खोलीच्या बाहेर चपलांचा आवाज आला. कुणीतरी निघून जातंय्. माणूस घाईघाईनं खोलींत आला. "या. खोली रिकामी झाल्याय्."

"जरा थांबा.. कुणीं जायचं तें आधीं ठरूं दे."

"आमचा वेळ म्हणजेच पैसा. वायां गेलेल्या वेळाचे पैसे कोण देईल."

"मी." चवताळून अशोक म्हणाला, "मी देईन." मग तो पुरुषाला म्हणाला, "आमचीहि पण इच्छा होती. नंतर मिळायचं नाहीं बहुतेक, म्हणून आतां अगदीं निःस्पृह बनलोंय्. अजून कांहीं मिळतसं वाटतं तुम्हांला ?"

भूत पाह्यलेले डोळे आतां जणूं दिशा हरवून बसले

"अनीतीनं वागल्याबद्दल विवेकाची टोंचणी नाहीं लागत ?"

"हे पहा," खांकरून त्या जुनाट घराचा मालक असलेला तो माणूस म्हणाला, "हें पहा, असल्या प्रकारची चर्चा इथं व्हावी, हें मला पसंत नाहीं." स्वर चागलाच दटावणीचा. अशोकसुद्धां घाबरला. पेंगणं थांबवून कुजबुजत बाई कांहीतरी म्हणाली. उत्तरादाखल पुरुष कांहींतरी म्हणाला. मग तो अशोकला म्हणाला, "आम्ही जातों तर मग. एक तास उशीर झाला, तर मला कांही नाहीं, पण तिला तें शक्यच नाहीं."

ते उठून उभे राह्यलेले बघून अशोक घाईघाईनं म्हणाला, "एक मिनिट. आम्हीं बोलून घेतों." खिडकीशीं जाऊन अशोकनं खुणेनं गीताला बोलावलं. गीता प्रश्नानिशी हजर झाली.

"म्हणजे काय ? ते आधीं जाणार ?"

"जाऊं देत. त्यांना आपण वाईट कृत्य करतोय्सं वाटतय्. म्हणून अधःपतनापास्नं स्वत:चं रक्षण करण्याकरता त्यांनी तान्ह्या मुलाला बरोबर आणलय्. पण आपण तसं होऊं देणार नाहीं. त्याना जाऊं देत. आपण मुलाला ठेवून घेऊं या."

"म्हणजे आपण इतका वेळ वाट बघितली, तें सगळं फुकटच गेलं." अशोकसारखं दबल्या आवाजांत गीता वाद घालायला लागली. "आपल्या जगायच्या शेवटच्या अर्थापास्नदेखील आपण वंचितच राहणार?"

"अग, असं कां म्हणतेस. तुमच्या गच्चीवरली खोली तर मिळेलच कीं. अन् लग्न झाल्यावर तर मग काहीच अडचण नाहीं. आपण लग्न करूंया खर्चहि वांचेल. नाहीं कां ?"

त्या जुनाट वाडयाच्या मालकाचं परत तगादा लावला. "कांहींतरी ठरवून टाका एकदां."

"हो. त्यानाच अगोदर जाऊं दे." पुढं येऊन मुलाला घेण्याकरतां अशोकनं हात पुढं केले. बाई आश्चर्यचकित झाली. पुरुष कृतज्ञ. चेहऱ्यावर–डोळ्यांत तो भाव आणायच्या ते आधीच अशोकच्या हातांत मूल देऊन जवळ जवळ पळतच खोलीतनं बाहेर पडले.

हात बदलल्याच्या धक्क्यानं मुलानं झोंप सोडली. एकदम् त्यानं तारस्वरांत किंचाळायला सुरुवात केली. अशोक त्याला डोलवायला लागला. त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मुलाला गीताकडं केलं.

"माझ्याकडं कां म्हणून ?"

"पहा ना गप्प करतां येतंय् कीं नाही तें."

गीताच्या कडेवर आल्यावर मूल लगेंच गप्प झालं. गीता हंसली. तिनं पाह्यलं, अशोकचे डोळेहि हंसरे.

"भारी सुंदर आहे ! पण अशक्त अन् घाणेरडं आहे."

"पुरेसं खायला मिळत नसेल बहुतेक !"

तोंड खालीं वांकवून गीता मुलाला पाह्यला लागली. पिट्पिट् करत बघतंय्. एकदां चुळबुळलं उल्टं–सुल्टं व्हायला बघतंय्. गीतानं जोरांत दाबून धरलं. पडायचं नाहींतर. दम लागून पोरानं परत किंचाळायला सुरुवात केली. आतां जास्तीच कर्कश्श स्वरांत. उचकी लागल्यासारखं. श्वास घ्यायला त्रास होतोय् वाटतं.

गीतानं अशोककडं बघितलं. अशोक तिच्याकडंच बघत होता. टक लावून. बघतां –बघता एकदम् गीताच्या अंगावर शहारे आले.

"काय हवंय् तुला ? काय् हवंय् ?"

अशोक कांहीं बोलला नाहीं.

"नाहीं नाहीं. तें मला जमायचं नाहीं. तें मला जमायचं नाही रडं दे ह्याला." ओरडून

बोलायचं असतांनाहि गीताच्या तोंडून शब्द जोरांत बाहेर पडले नाहींत. गळा जड झाला होता. नजर अंधुक. अशोकनं मान खालीं घालून टेवली होती. मुलाला त्याच्या मांडी-वर ठेवून गीता शेजारीं उभी राहली.

" गीता, आपल्याला परत नव्यानं सुरुवात करायला लागणारसं वाटतंय् " जणूं मुलाला ऐकवण्याकरतांच अशोक हें म्हणाला. थंड, मऊ, पश्चाताप झालेला आवाज. " नाहीतर हें रडतच बसेल. ह्याला गप्प करण्याचा कांहीच उपाय मला पण ठाऊक नाही ग. "

गळून जाऊन गीता शेजारी मट्दिशी बसली. उचकी काढल्यासारखं मूल रडत राह्यलं.

[ अनुवादक : अशोक शहाणे ]

●●●

## डावपेंच

( पान ३४ वरून चालू )

सवंय असते.तशी आम्हां पट्टेदार वाघांना नाहीं. गाऱ्यावर आम्हीं असें एकदम साडसूड जाऊन. पडत नाहीं. कोणतेच भय नाहीं अशी खात्री झाल्याशिवाय आम्ही गाऱ्याच्या आसपास कधीच जात नाहीं. गाऱ्याजवळ असलेल्या झाडाचें तर आम्ही सूक्ष्म निरीक्षण करीत असतों. पण आज माणसानें आमच्यावर मात केली होती. मचाणाकडे लक्ष जाऊं नये म्हणून या शिकाऱ्यानें त्या सर्व माणसास जवळपासच बसवून ठेवले होते. सहाजिकच माझें सर्व लक्ष ह्या माणसाच्या गप्पांकडेच होतें. पुष्कळ वेळ अशी वाट पाहिल्यानंतर मला सहाजिक असें वाटलें कीं, हळूच तो गारा दूर उचलून नेण्यास कांहींच हरकत नाहीं. मी अर्थातच झाडाकडे लक्ष देण्याचें साफ विसरून गेले होते. दबत दबत मी ह्या गाऱ्याकडे आले. त्या गाईची मान धरून तिला ओढूं लागले......

थोड्याच वेळांत मी तिला खाली टाकून माणसाच्या जमावाकडे लक्ष ठेवीत निःशंकपणें खाऊं लागले. असें वाटले कीं, तिला दूर ओढून तरी नेण्याची काय जरूर आहे ? मी फऱ्याचा एक लचका तोडते न तोडते तोंच, माझ्या समोरून एक गोळी झाडली गेली. त्या प्रहारानें पळतां पळताहि मी निरखून पाहिलें. ती गोळी त्याच माणसानें मारली होती; की जो माझ्या कालच्या हल्ल्यांतून वांचला होता........

●●●

## सुकामेवा ... ... ... ... ... रमेश के. सहस्रबुद्धे

### चिमुकला संपादक

आपल्या उत्कृष्ट भाषाशैलीमुळें लोकांच्या अत्यंत आवडत्या असलेल्या ' सिद्दीक ' या वृत्तपत्राच्या संपादकाचा लाहोर शहरीं सत्कार-समारंभ होणार होता. अध्यक्षस्थान तत्कालिन प्रसिद्ध उर्दू कवि इकबाल् हे मंडित करणार होते.

आपल्या आवडत्या वर्तमानपत्राच्या संपादकाबद्दल लोकांना फारशी माहिती नव्हती. त्यामुळें त्याला पाहण्यासाठीं या समारंभास स्त्री-पुरुषांची अतोनात गर्दी झाली होती. आपला आवडता संपादक कसा दिसत असेल ? त्याचें वय काय असेल वगैरे गोष्टींबद्दल उपस्थितांत फारच कुतुहल निर्माण झालें होतें.

संपादक महाशय व्यासपीठावर येत आहेत असें कळतांच त्यांना पाहण्यास अनेक लोक मोठ्या उत्सुकतेनें पुढें सरसावले. संपादकाला पाहतांच त्यांनी संपादकाबद्दल केलेल्या कल्पना क्लिन बोल्ड झाल्या होत्या. कारण हा संपादक म्हणजे अवघें सतरा वर्षांचें लहानसें पोरगें होतें.

संपादक बोलावयास उठले. हा एवढासा पोरगा काय व्याख्यान देणार असा विचार करून समारंभास जमलेल्या उपस्थितांपैकीं अनेक जण तेथून काढतां पाय घेऊं लागले. पण या इवल्याशा तरुणानें क्षणांतच आपल्या प्रासादिक वाणीनें साऱ्या श्रोतृवर्गाचीं अंतःकरणें काबीज केलीं. समारंभांतून उठून जावयाची इच्छा असलेले तसेच परत जागेवर बसले.

व्याख्यान संपलें. श्रोतृवर्गानें टाळ्यांचा कडकडाट केला. या छोट्या मुलाच्या व्याख्यानानें भारावून गेलेले अध्यक्ष कवि इकबाल् यांनीं व्याख्यान संपतांच मोठ्या प्रेमानें या संपादकाला मिठी मारली. ते म्हणाले, " बेटा, तूं बहोत तेज है। तेरा नाम जरूर उँचा रहेगा "

—आणि अध्यक्षांनीं काढलेले शब्द पुढें खरोखरीच अक्षरशः खरे ठरले. कोण होता तो चिमुकला संपादक ? माहीत आहे ? नाहीं ना ? तो संपादक म्हणजे आपले माजी शिक्षणमंत्री " मौलाना अबुल कलम् आझाद " हे होत.

●●●

### थापाड्या अध्यक्ष

अमेरिकेचा अध्यक्ष प्रे. विल्सन हा लहानपणीं अत्यंत थापाड्या होता. अमेरिकेचा अध्यक्ष झाल्यानतर ते आपल्या आवडत्या मावशीला भेटावयास गेले. ही मावशी या सुमारास बरीच म्हातारी झालेली होती. विल्सनला लहानपणीं या मावशीचा खूपच लळा होता. या त्याच्या मावशीला म्हातारपणामुळें कमी ऐकूं येत असे.

विल्सनला पाहतांच तिनें त्याला आपल्या अगदीं जवळ बसवून घेतलें. म्हातारीला आपला भाचा आला म्हणून अत्यंत आनंद झाला होता. मोठ्या प्रेमानें विल्सनच्या पाठीवर थाप मारीत तिनें विचारलें " बाळा, हल्ली तूं काय करतोस ?"

विल्सननें ओरडून सांगितलें, " मावशी, मी आतां अमेरिकेचा अध्यक्ष झालों आहे."

हें ऐकतांच मोठमोठ्यानें हंसत म्हातारी म्हणाली, " शाबास रे गड्या, अजून तूं पूर्वींसारखाच थापा मारतोस हं. अरे, हा तुझा थापा मारण्याचा स्वभाव बदलणार तरी केव्हां ?"

●●●



# ऐवज

मधु मंगेश कर्णिक

शंकर पोस्टमननें साटमिणीच्या खळ्यांत पाऊल टाकलें नि तो क्षणभर तसाच उभा राहिला. त्याचीं पावलें आपोआप घुटमळलीं. तो उभा राहून साटमिणीच्या. त्या मोडकळीस आलेल्या घराकडे पाहूं लागला. त्या घराची पडवी कोसळायला आली होती. छप्पर ढांसळलें होतें नि भिंती भेगाळल्या होत्या. नळ्यावर तेरडे वाढले होते. ओसरीला पावसाळ्यांत दाटलेलें शेवाळ तसेंच चिकटलेलें होतें. त्या घराचा भेसूर अवतार बघून शंकर पोस्टमन मनाशीं थोडासा हलला. म्हणाला, " घराला धनी उरला नाहीं, म्हणजे कशी दशा होते बघा–तीन महिन्यांपूर्वीं साटमिणीचा मुलगा मुंबईला वारला, त्या बातमीचें पत्र घेऊन शंकर या घराच्या पावळींत आला होता. त्यानंतर तो आज प्रथमच इथें पुन्हा येत होता. तीन महिन्यांत साटमिणीचें एके काळीं नीटनेटकें दिसणारें घर कसें पार दुर्दशेला पोंचलें होतें...

शंकर खाकरला दोन बोटाची तोंडाशी फट करून थुकला आणि पुढें सरकला. साटमिणीचें दार बंद होतें. घरांत सामसूम दिसत होती. थोडा वेळ वाट बघून शंकरनें दार ठोठावलें.

कुणाचीच जाग नव्हती.

दाराला आतून कडी नव्हती. शंकरनें दाराचे फळें लोटले नि तो पडवीत शिरला.

" साटमिणी ऽ – "

" कोन हा ऽ ऽ – " आंतून क्षीण आवाजांत साटमीण बोलली.

" मी शॅंकर...शॅंकर पोस्टमेन अशी जरा भायर ये साटमिणी..."

साटमीण कांहीं बोलली नाहीं. आंत सगळा काळोखच होता. ती कुठें बसून बोलतें आहे, हें बाहेरच्या उजेडांतून आलेल्या शंकरला समजेना.

" शॅंकरा ऽ बावा, असो भितूरच येरे... माज्यानं नाय भायेर येववत–" म्हातारी अधिकच क्षीण आवाजांत म्हणाली, तशी शंकर आंत गेला. भिंतीला धरून त्यानें थळई गांठली नि डोळे चोळीत नीट पाहिलें. साटमीण म्हातारी भिंतीकडेच्या अंथरुणावर बसली होती. फटफटीत तोंटाची ती विधवा बाई अंथरूणावरून दिसेनाशी झाली होती. तीन महिन्यात तिची ही अशी दशा झाली होती. मिरगापूर्वी आपण दरमहा मुलाकडून येणारी हिची मनीऑर्डर पेड करण्यासाठीं येत असू, तेव्हां ही कशी उमेदवार दिसायची. अधूनमधून हिच्या मुलाचें पत्र येई.... तें द्यायला आपण आलो की हिचा चेहरा कसा रसरशीत दिसे... नि मुलगा एकाएकी वारल्याची बातमी येतांच, काय अवस्था झाली हिची...'म्हातारी आता फार दिवस जगेलसें वाटत नाहीं–' शंकर मनाशीं म्हणाला नि साटमिणींच्या पुढ्यांत हळूच बसला.

" साटमिणी, तुकां पोष्टांत येवूक होयां वांयच–"

साटमीण भकास डोळ्यांनीं बघतच राहिली.

" तुज्या नावाचा इन्शुर्ड इलांहा पोष्टात... तां आंगठो लाव्न घेव्क हो, यां... इन्शुर्ड मोटया रकमेचा आसा...हजार रुपये आसत... माका पेड करण्याची ऑर्डर नाय्...नायतर मीच आणून दिलं आसतंय्..पन तुकां येव्चां लागतलां... पोष्टमास्तर सोता पेड करनार इन्शुर्ड दोघेजण चांगले साक्षीदार लागतले–" शंकरनें भराभर सगळें काहीं सांगून टाकले.

म्हातारी निर्विकार चेहऱ्यानें शंकरकडे बघत होती. शंकरला वाटलें होतें; आपल्या नांवानें हजार रुपये आल्याची बातमी ऐकतांच दु:खाने खचलेली म्हातारी सांवरून बसेल...तिला उभारी वाटेल. आपल्याबरोबर तरातरा चालत ती पोष्टांत येईल. पॅडवर आंगठा दाबून तो नीट उठविल... रुपयाचें पुडकें पदरांत बांधून लगबगीनं घरीं येईल... पण तसें कांहीं झालें नाहीं. म्हातारी कांहीं कळलेंच नाहीं अशा चेहऱ्यानें बघत होती. शंकर पुन्हा बोलला–, जरा मोठ्यानेंच बोलला.–

" म्यें, अशी बघतस् काय ? तुज्या नांवची रक्कम इलीहा पोष्टांत...हजार रुपये... तुजे हक्काचे पैशे आसत ते..." मग थोड्या हलक्या आवाजात तो म्हणाला, " बाळाजीन विमो उतरलल्यान् ना ? तेच पैसे इलेहत ते... विमाकंपनीन पाठवल्यान हत..."

म्हातारीनें मान हलवली, पिसडलेल्या कोंबड्यासारखी तिची हडकुळी दिसणारी मान तशींच हलत राहिली. मग ती हळू हळू म्हणाली–" काय करूची आसा ती रक्कम आतां ? माजो आधार गेलो... घराचो चिरो कोसाळलो; थंय् रुपये घेव्न मी काय करूं ?" बोलतां बोलतां म्हातारीचा गळा भरून आला. ती हमसाहमशी रडूं लागली. रडतां रडतां बोलूं लागलीं तरण्याताठ्या लेकाचा एकुलता एक आधार गेल्यानें ती वेडीपिशी झाली होती. आणि आपलें दु:ख ती बोलत होती. तिचें सांत्वन कसें करावे हें शंकरला समजत नव्हतें.

" तां सगळां खरां...पन जन रीतीपरमान वागाक होयां...ते पैशे तुका घेवूकच होयें..." शंकर म्हणाला.

" आग लाव त्या पैशांक...कांडा लाव् पेटव अनि–पैशे घेंव्न माजो पोटचो गोळो कसो माकां मेंटात्...माजो बावा गेलों नि आतां हे पैशे येतहत...काय करूं मी ? खंय्च्या तोंडान् घरावाहेर पडूं ?" म्हातारीला कढामागून कढ येत होते नि ती काळजांतलें साठलेले दु ख बाहेर सोडीत होती... रडतां रडतां सांगत होती. तिचा लेक या सराईला घरीं येणार होता. चांगली चार महिन्यांची रजा काढून येणार होता...शेतीभातीचीं कामें आटोपतांच घर दुरुस्तीचें काम हातीं घेणार होता. ठाकठीक करून मग लग्नाचें जमेल का पहाणार होता.

म्हातारीनें मुलगी पण बघून ठेवली होती साकेडीच्या सावंताची मुलगी तिनें टेहेळून ठेवली होती. मुलगी कशी लक्ष्मीसारखी होती. गरीबाघरची असली तरी रूपागुणांनीं सरस होती. साटमाच्या घरांत सून म्हणून शोभून दिसणार होती. बाळाजी साटमाला बायको म्हणून शोभून दिसणार होती... पण सगळे बेत तसेच राहिले होते. बाळाजी मुंबईला गेला तो गेलाच. आणि आज त्याच्या विम्याच्या पैशांची खबर घेऊन शंकर पोष्टमन आला होता. काय करायचें–होतें पैशे घेऊन आतां ? कशासाठीं या दु:खावर अशा डागण्या घ्यायच्या ? काय करायचें त्या रुपयांचं ? मी म्हातारी आज आहे, उद्यां नाहीं नको मला ते रुपयें...मी मुळींच घराबाहेर पडणार नाहीं. लेक गेला त्याच वाटेनें आजची उद्यां निघून जाईन...झिजून...खंगून ...रडत भेकत मरून जाईन...

म्हातारी दु:खाला वाव करून देत होती. आणि बिचारा शंकर निमूटपणें ऐकत होता. शेवटीं तो उठला, नि म्हणाला–" साटमिणी, मी तरी बाये काय सांगू ? पैशे तुजे ! मालकीण तूं...पण असो आकांत करूं नुको... पैसे घे नि म्हातारपनचे दिवस सुखांत काड... घर मोडलांहा तां नीट कर आनि सुखान् घरांत बस्. रडत बसान् काय गेलेली गोष्ट पुन्हा येनार ? बाळाजी आज आसतो तर माकां ह्या बोलाचां लागलांच नसता...पन जगराहाटीकडे बगूचा लागतां...

शंकर उठला आणि निघून गेला. साटमींण म्हातारी त्या बंद अधेऱ्या घरांत आपलें दु ख उगाळीत बसून राहिली.

पोस्टमास्तरनें दोन दिवस वाट पाहिली. म्हातारी पोस्टांत येण्याचें चिन्ह दिसेना. तिच्या मनाची अवस्था ओळखून अखेरीस पोस्टमास्तरनें दोन साक्षीदार घेतले नि तो स्वत:च साटमिणीच्या घरीं इन्शुर्ड घेऊन आला. साक्षीदारांसमक्ष त्यानें सीलबंद लखोटा म्हातारीच्या हातांत दिला. तिचा अंगठा हवा तिथें उठवून घेतला, नि चार सांत्वनाच्या गोष्टी सांगून पोस्टमास्तर निघून गेला.

थरथरत्या बोटांनीं तो जाडजूड लखोटा चांचपीत साटमीण म्हातारी बसली होती. त्या लखोट्याचें काय करायचें हेच तिला समजत नव्हतें. थोडथोडके नव्हे; एक हजार रुपये तिचा लेक तिच्यासाठीं मागें ठेवून गेला

होता. काय करायचे ह्या एवढ्या पैशांचें ? बाळा, रुपयांची अशी रास माझ्या हातांत देऊन तू कुठें गेलास ? त्यापेक्षां तूं जगतावांचतास तर भिकाऱ्याच्या दळिद्रांतहि आपण आनंदानें राहिलों असतों—

बाहेर कुणाची तरी पावलें वाजली तशी साटमिणीने तो लखोटा उशाखालीं ठेवला नि ती पाहूं लागली. कोण आलें या आडवेळीं ?

" काकी, जागी आसस की झोंपलहस् ?" रघुनाथनें आंत येत विचारलें.

साटमिणीनें डोळ्यांवर हात पालथा ठेवून पाहिलें तेव्हां ओळख पटली. तिचा पुतण्या रघुनाथ होता. रघुनाथ आला. तिच्या पायगती बसला. तिच्या तोंडाकडे टक लावून बघत त्यानें हलकेच विचारलें—

" पोस्टमास्तर हल्ललो व्हंय् ?"

" आँ ऽ–" साटमिणीने दचकून विचारलें.

" नाय–मी इच्यारतय्, पोस्टमास्तर येवून गेलो न्हंय् सकाळीं ?"

" होय, हल्ललो–"

" काम झाला ?"

साटमीण कांहीं बोलली नाही.

मग रघुनाथनें पुन्हा विचारलें–"इन्शुर्ड दिल्यान् ना ? माकां सकाळीं कोनतरी सांगत होतो, तुज्या काकींचां पोष्टांत इन्शुर्ड इलह त्तूं साक्षीदार म्हनून जा... मी म्हटलां नको रे बाबा तेवडां ! पैशाचां काम आसां तां– आमीं पुतणें झालो तरी उद्यां तुमी लोक म्हनशात चुलतेक ठकवून गेले पुतणे–कसां !" रघुनाथ बोलत होता. आणि त्याची चुलती ऐकत होती. ती कांहीच बोलत नव्हती.

" रक्कम बरोबर आसा ना ? मोजून बगितलं ?"

" आँ–ऽ " साटमिणीनें पुन्हा झोपेंत असल्यासारखें विचारलें. तिचे पुतण्याच्या बोलण्याकडे ध्यानच नव्हतें.

" नाय, म्हंतय रुपये नीट मेजून घेतलं की नाय? नायतर रांडेच्चे पोष्टवाले फसवतीत... म्हनून इच्यारतंय्– थोडीथोडको रक्कम व्हय ती... हजार रुपये म्हनजे येवस्तीत मेजून घेवक होये... तुकां अशी दुक्कांत बगून फसवीत कोनतरी––"

तरी म्हातारी बोलत नव्हती. हिला झालं आहे तरी काय ? हिनें रुपये घेतले कीं नाहीं ? नि घेतले असले तर ठेवले कुठें ? ह्या मोडक्या घरांत हजार रुपये घेऊन ही म्हातारी राहणार कशी ?...म्हातारी नुसती आपल्या तोंडाकडे बघतच बसली आहे... रघुनाथ मग हलकेंच पुढें सरकला. चुलतीच्या अथरुणावर बसत तो तिच्या कानात म्हणाला " आमचे दाजी म्हना हुते तुका जावन येक परस्न इच्यार म्हनान...काकी, इच्यारूं ? दाजी इच्चारीत होते, आमकां पांचशे रुपये कर्जाव देशीत काय हटक चुलतेक...आमको वायच पैशाची नड होती... कमळ्याचा लगीन ठरवलांहा मारगशीरांत तेकां आयती तुजी रक्कम उपेगी पडली असती..."

रघुनाथ आपल्या येण्याचा हेतू चुलतीच्या कानांत स्पष्ट करीत होता आणि त्याची चुलती मात्र हुं का चू करीत नव्हती. रघुनाथ घेवटीं कंटाळून स्वस्थ बसला. बऱ्याच वेळानें साटमिण म्हणाली.

" आमच्याचां पन लगीन मारगशीरांतच करुचो बेत हुतो...आतां काय बोलून ?" आणि एवढें म्हणता म्हणतां तिनें डोळ्यांला पदर लावला. मुलाच्या आठवणी काढीत ती रडूं लागली. रघुनाथला काहीं सुचेनासें झालें.

बराच वेळ झाला तशी रघुनाथ उठला नि चालूं लागला. जातांना दार लावून घेत तो म्हणाला—

" जातंय् गे काकी ! सांबाळून न्हव–"

दार लावून रघुनाथ बाहेर–घराबाहेर पडला. आणि साटमिणीनें उशाखालचा लखोटा बाहेर काढला. त्याच्यावर तांबडी लाख जागोजाग डकवली होती. तो कसा उघडावा, हें तिला समजेना. तिनें मग अथरूणांतलें एक पातळ चिरगुट काढलें. नि त्याच्या चिंध्या करून त्यांत तो लखोटा नीट गुडाळला. एकावर एक वेढे देऊन तो बंदिस्त केला नि उशाखालच्या तेलकट चिरगुटांत तो नाहीसा करून त्यावर फाटक्या तुटक्या गोधड्या घालून ती नेहमींसारखी झोपून गेली.

दोन दिवसांनी तिचा भाऊ आला.भाच्याच्या मृत्युनंतर तो एकदां येऊन गेला होता. त्यानंतर तो आज प्रथमच येत होता. आल्याबरोबर त्यानें पिशवीतून मुद्दाम बहिणीसाठी आणलेल्या वस्तू बाहेर काढून तिच्यासमोर मांडल्या. निलगिरीची बाटली, बामाची डबी, झालेच तर खायची पानें नि सुपाऱ्या आणि चहाची भुकीसुद्धां. म्हाताऱ्या निराधार बहिणीला नेहमीं लागणाऱ्या ह्या वस्तू भावानें आठवणीनें आणल्या होत्या. भाऊ मग तिच्या शेजारी बसून म्हणाला–

" लय दिवस झाले तुकां भेटून... तेवा म्हटलां आज जावचा नि नदरेनं समक्ष बगून खुशाली काडूची...आक्का बरा हस्, ना—"

साटमीण काही बोलली नाही, भावाच्या तोंडाकडे बघत ती स्वस्थ बसली.

" अगो, तू असा किती दिवस बसतलऽऽ ? आता दु:ख आस्ते आस्ते इसराक होयां... काळजार धोडो बोडूक होयो... आपल्या नशीबांत नाय तेकां काय करनार ? " भाऊ बहिणीचं सांत्वन करू लागला. तीन महिने लोटले तरी ती दु:खांतून मोकळी झाली नव्हती काय म्हणावें हिला! असें करून कसे चालेल? आतां हिनें बोलले–चाललें पाहिजे. व्यवहार पाहिला पाहिजे... भावाला मध्येंच त्या महत्वाच्या कामगिरीची आठवण झाली.तिच्याचसाठी तर तो आला होता.

" आका एक इच्यारूं ? "

त्याची बहिण पूर्वीच्याच भकास नजरेनं त्याच्याकडे पाहात होती.

" बाळाजीच्या इम्याचे पैशे गावले ही बातमी खरी ? कोनसो माकां फोंड्याच्या बाजारांत सांगत हुतो... म्हणला समक्षच जावन इच्चारचां— "

साटमीण कांहींच बोलत नव्हती. मग तिच्या भावानेंच बोलायला सुरुवात केली. स्वतःच्या घरच्या अडचणी, लोकांचें झालेलें कर्ज, बैलांशिवाय रिकामे पडलेलें जोत, दुरुस्तीला आलेलें घर, आणि सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे गळ्याला लागेपर्यंत वाढलेली चेडवें... म्हात्याधुत्या झालेल्या दोन लेकी नि त्याचीं पैशाशिवाय अडलेली लग्नें... हे सगळे व्याप साटमिणीचा भाऊ बहिणीला आठवून आठवून सांगत होता. मध्येंच तिच्या दु:खानें गहिंवरत होता. स्वतःच्या दरिद्रीपणाला वैतागत एका मागून एक अनेक कर्मकहाण्या सागत होता, सगळ्यांतून सुटायला पैसा हवा होता. पैसा... शें-पांचशें रुपये......

बोलतां बोलतां तो थोडा पुढें सरकला नि बहिणीच्या कानालगत येऊन म्हणाला–

" तां खांदे,; रक्कम नीट जपून ठेवल ह ऽ ऽ ना ?"

साटमीण त्यावर काहीं बोलली नाहीं. थोडास चिडूनच मग भाऊ बोलला– "तूं अशी तोंडात मिठाची चूळ घेवून बसलस तर माकां समाजनार काय ?त्वौंड उघडून बोलशीत तर समजात...माजां आयक...पैशे घरांत ठेवू नुको...कोनातरी इस्वासू मानसाजवळ ठेवक्

दी...ह्या असल्या मोडक्या घरांत जोखम घेअन न्हव्शी नि आमकां घोर लावशी- "

तरीहि बहीण कांही बोलत नव्ह ी. हिला खूळबोळ तर लागले नाहीं ? भाऊ मग आडपडदा न ठेवतां स्पष्टपणें म्हाला-

" नायतर माजेजवळ ठेवलस तरी चालात... मीं सांबाळून ठेवीन...तुका लागतीत तशे मांका कळव...बिनघोर आणून पोचवींन- पन अशी जोखीम पोटाशीं घेवून एकटी न्हवां नुको- "

त्याच्या बहिणीला खूळ लागलें होतें, यात शंकाच नव्हती. ती चकार शब्दानें बोलत नव्हती. शेवटीं भाऊ जायला निघाला, जातांना कडवटपणें म्हणाला-" तुझी मर्जी लगात् तसां कर-पन येक सांगतंय...तुका आतां आधार कोनाचो हा ? तुझीं भाचरां हीच तुकां जवळची...तेंचा कल्याण करूचा इलां मनांत तर बग..."

भाऊ निराश होऊन परत फिरला.

साटमिणीनें अंथरूणाखालचा लखोटा बाहेर काढला नि तो पोटाशीं बांधून ठेवला. कुठेंहि जरी ती जाती, तरी तो आतां तिच्यापाशीच राहाणार होता...

चार-आठ दिवस तसेच गेले नि तिनें पांदीतून जाणाऱ्या शंकर पोस्टमनला वईवरुन हांक मारून बोलावलें. शंकर आला. हलकेंच तिच्या शेजारी बसला.

" शंकरा,ह्यो लाखोटो फोड-" पोटाशीं बांधून ठेवलेला तो लखोटा तिने त्याच्या हाती देत म्हटलें, शंकरला आश्चर्य वाटलें.

" आजू ह्या पाकीट फोडूक नाय् ?कमाल आसा तुजी-"

" कोनासठी फोडू माज्या बाबा ? " म्हातारी फुटक्या आवाजांत बोलली आणि शंकर पाकीट कसें फोडतो ते बारकाईनें पाहूं लागली. शंकरनें चाकूनें लाख खरवडून काढली. मग एका बाजूनें लखोटचाचे तोंड काळजीपूर्वक उघडलें. आतल्या टणक दोऱ्याची गांठ तोडली नि शंभरा शंभराच्या दहा हिरव्यागार नोटा साटमिणीच्या हातांत दिल्या...

ह्या नोटा हातांत घेऊन साटमिणीनें उगाचच मोजल्यासारखें केलें. त्यांवर हात फिरवतां फिरवता ती शंकरला म्हणाली-" साकेडीक जानारो कोन गांवांत रे ?"

" साकेडीक कोनाहारी ? "

" सावंताच्या घराकडे जानारो ? "

" चौकशी करूक होयी. गावतीत कोनतरी बाजारकरी..." शंकरने उत्तर दिलें. मग कुतुहलानें त्यानें विचार विचारलें-" साकेडीच्या सावंतकडे काय तुजां काम, साटमिणी-ऽ"

" हे रुपये माजे न्हयु ! सावंताच्या मुली-बरोबर माज्या लेकाचा लगीन ठरलेलां... ह्या असां कर्म फुटतां नसतां, तर मार्गशीर्षांत सावंताचा चेड् माजी सून होवुन ह्या घरांत येनार होता...पन लगीन नाय् झालां तरी ती माजी सूनच...तिच्या हातांत हे रुपये हे मी देनार नि सांगनार...चेड्वा, हे घे नि बापसाक तुज्या लग्नांत खर्च करूक सांग !...ह्या पैशांनीं त्यां पोरीचां लगीन झालेलां माज्या कानार पडलां, मगे मी सुखान् डोळे मिटीन-" सटामिणीला पुन्हा रडूं फुटले. पैसे खर्च करण्याच्या तिच्या विलक्षण कल्पनेनें शंकरहि विस्मित झाला. कांहीं न बोलतां मग तो तिथून उठला.

साटमिणीला साकेडीला जाण्यासाठीं कोणी सोबत मिळण्यापूर्वींच खुद्द सावंतच तिच्या घरीं येऊन ठेपले. त्यांची मुलगी साटमिणीची सून होणार होती... पण नशीब बापडीचें, दुसरे काय ?...

सावंत आले नि पडवींतल्या माच्यावर बसले. म्हातारीचा ओघ जाईपर्यंत त्याना तसेंच बसावे लागणार होतें. थोडचा वेळान ते आंत आले. खाली मान घालून बोलूं लागले-

" नशीबांत होतां तसां घड्ला ! तुमचो तेका विशाज नाय... आमच्याच चेडवाचा नशीव...फुटक्या पन घरांत ठेव्चा हा ? तेच्या डोकीवर अक्षता टाकूकच होयो-"

म्हतारी निमूटपणें ऐकत होती. तिची उत्सुकता बळावली होती सावंत काय म्हणतात ते तिला ऐकायचें होतें. त्यांचें बरोबरच होतें; मुलीला जन्मभर कुंवार कशी ठेवणार ? कुणाशी तरी तिचें लग्न जुळवायलाच हवें... पण सावंतानी कुणशी सोयरीक जुळवली, हें कळून घेण्यासाठी साटमीण उत्सुक होती... " सावंत तिच्या घरी आले, हें बरोबर झालं " साटमिणीच्या घराशी असलेले त्याचे ऋणानुबंध लक्षांत घेतां, तिला सगळें तपशीलवार सांगून... तिच्या संमतीनेंच सारें घडवून आणण्यांत माणुसकी होती,... साटमीण बसल्याबसल्या मनाशी म्हणत होती. सावंत आले, हे किती बरे झालें...

" ता सगळां खरा, पण मुख्य गोष्ट बाकी हा..." सावंत खालच्या मानेनें बोलत होतें.

बाकी कसली ? तुमी काय अनमान करूं नुको... पोरीचा कल्याण होयत यंय तिका लोटून द्या... पाटीकुडें बगुं नुको... आमचे आशीर्वाद हत-" साटमीण म्हणाली.

" वायचं नड होती...म्हंताना तुमचेंहारी येवचा लागला... कोनतरी म्हणालो, तुमची रक्कम इलिहा...तेवा म्हटलां मागूचे पांचशें रुपये कर्जाव... आजचे उद्यां फेडून टाकीन... " सावंत कोरडेपणीं बोलत होतें. धंदेवाईक सावकाराकडे कर्जबाजाऱ्यानें जावें तसें ते साटमिणीकडे आले होते नि कर्ज मागत होतें.

साटमिणीला अगावर घर कोसळून पडल्यासारखें वाटलें. सावंत अशा कांहीं कामासाठीं येतील, असें स्वप्नांतहि तिला वाटलें नव्हतें. सावंताच्या बोलण्यानें ती दुमंगून गेली. लेकाच्या मरणाच्या बातमीचं वाटलें, त्याहून अधिक दुःख तिला यावेळीं वाटलें.तिला वाटलें होतें- सावंत येतील नि म्हणतील- म्हातान्यें, माझ्या कमनशिबी चेडवाचें लगीन अमक्या तमक्या फलाण्याशी जमवतो आहे. तुझा काहीं संबंध आतां राहीला नाहीं. हें खरें-पण मनाला राहवेना म्हणून आलो. तुझ्या कानावर सगळी हकीकत-घालावी आणि तुझ्या तोंडचा आशीर्वाद लेकराला मागावा यासाठी आलों. डोळ्यातलें पाणी पुसून आशीर्वाद दे... मग आपण म्हणू- काय म्हणू ? काही सुचणारच नाही बोलायला. मग आपण उठू. लखोटचांतल्या नोटा बाहेर काढून सावंताच्या मुलीच्या हातात देऊं नि तिला घट्ट मिठी मारून म्हणूं, " पोरी, तूं माझी सून होणार होतीस... पण देवाच्या मनात नाहीं... कुठेंहि असें. सुखांत अस म्हणजे झालें... हे रुपये घाल बापसाच्या हातावर नि म्हणावं, लाव हें लग्नाच्या खर्चाला-"

पण साटमिणीचे हे सगळे विचार मनांतल्या मनांतच जिरायचे होते. वाळूतल्या पाण्याच्या धारेप्रमाणें. अखेरीस सावंतसुद्धां तिच्या हातात आलेल्या पैशावरच नजर ठेवून आले होते.

साटमिणीने घशांत आलेला कोरडा अवंढा कष्टाने मागें लोटला नि ती सावरून बसली.

सावत उमेदीने बोलत होते-

" एवडी सोय करा, तुमचांच चेडू म्हना... अनमान करुं नको...लय मागत नाय्... पाचशेच होये... दोन वरसात फेडून टाकीन..."

म्हातारी भकास चेहरा करून सावंतांच्या तोंडाकडे बघत राहिली. जणु तिला कांहीं समजतच नव्हतें. जणु कांहीं तिला सावंताचें बोलणें ऐकूंच येत नव्हतें...सावंतांनीं तपशीलवार सगळें सांगितलें नि ते आशेनें पाहूं लागले. साटमीण आतां उठेल; डोळ्यांतलें पाणी पुशीत घरांत जाईल, पेटी उघडील नि पांचशेच्या नोटा आपल्या हातांत आणून देईल, असा अंदाज बांधीत होते...

पण म्हातारी हालचाल करीत नव्हती. तिच्या चेहऱ्यावर कसलेंच चिन्ह नव्हतें. भकास आणि धुतलेल्या पाथरीसारखा निर्विकार चेहरा करून ती शून्य मुद्रेनें बसली होती.

सावंतांनीं शेवटीं न राहवून विचारलें—

" मग काय, करतास एवडी मेहरबानी ?"

मग साटमिण म्हातारीनें मान वर केली जळत्या नजरेनें पुढ्यांत बसलेल्याा सावंताकडे पाहिलें नि ती कडाडली—

" सावंतानूं ! तुमच्या अंगार काळे केंस ऱ्हवले नाय् आतां...माज्याखालोखाल तुमचां वयोमान झाला...पन तुमका ह्या बोलना सोभत नाय...येळपरसंग काय नि तुमचो हेतू काय ? मी माज्या दुःखांत अनि तुमकां सुचतात पैंशे...आग लावा त्या पैशांका... कांडा लावा त्या रकमेक...ही कामगिरी घेवन तुमी ह्या घराची पावळी चडशात असा वाटला नव्हतां माका— "

सावंतानीं रुमाल बांधला नि खालच्या मानेनें ते न बोलतां निघाले.

सावंत खळ्याबाहेर पडले नि मागे न बघतां घराच्या रस्त्याला लागले...ते पार नजरेआड होतांच साटमीण म्हातारी तिरीमिरीनें उठली अंथरुणाखालीं ठेवलेल्या त्या नोटा तिनें बाहेर काढल्या नि ती रांधपघरांतल्या मोठ्या लांकडी पेटीशीं आली. ताकत लावून तिनें पेटीचें गंजलेलें कुलूप उघडलें. पेटीचें जड झांकण तिनें भिंतीशीं उभें केलें आणि आंतला एक जस्ताचा रिकामा डबा काढला. त्या डब्यांत त्या नोटा नीट घडी करून ठेवून तिनें पेटीचें झांकण बंद केलें. पुन्हा पेटीला कुलूप लावलें. कुलपाची चावी गळ्यांतल्या तुळशीच्या माळेंत ओंवली आणि ती बाहेर आली. बाहेर बळईत असलेलें अंथरूण तिनें घरांत नेलें. नि ते त्या रुंद प्रशस्त पेटीवर पसरलें. एकाद्या माच्यावर पसरावें तसें नि ती पेटीवर चढून बसली—

बसल्या बसल्या तिची नजर वरच्या कौलाराकडे गेली. छप्पर जागोजाग कोसळलें होतें. ठिकठिकाणीं भोसके पडले होते नि त्यांतून उजेड आंत येत होता.

पेटींत नीट लपवून ठेवलेल्या त्या धनावर साटमीण म्हातारी भुजंगाप्रमाणें बसून मनांत म्हणाली— ' घर लवकर दुरुस्त करून घेतले पाहिजे. अशा मोडक्या घरांत एवढा ऐवज घेऊन राहाणें बरें नाहीं— '

● ● ●


# प्रोफिशियण्ट शॉर्टहॅण्ड ॲण्ड टाइपरायटिंग इन्स्टिट्यूट

६८६ बुधवार पेठ, पुणें २.

**( सरकारमान्य संस्था )**

## आमचीं वैशिष्ट्यें

- नवीन मशिन्स
- तज्ज्ञ शिक्षकवर्ग
- शॉर्टहॅण्डसाठीं मौलिक ग्रंथालय
- विद्यार्थिनींसाठीं स्वतंत्र सोय

फोन : ७७३७६

प्राचार्य आर. डी. मोंढे

आम्ही काय वाटेल तें करूं ! बाकीचे हे सगळे आहेत तरी कोण ? कुणी शेहेचाळीस तीन पंचायशी–शंभर दहा एकशें-चाळीस...देशमुख, कान्हेरे, बर्वे फार फार तर चारशें...आमची विगिनीगच आठशें...! या सगळ्यांत आम्हांला एकच माणूस बरा वाटतो...! बरा वाटतो–जगदाळे ! ज्या दोन गोष्टीशी आमचा तंटा नाहीं त्यांतला एक हा जगदाळे आणि दुसरा आमचा टायगर...! कसं आहे आमच्या कुत्र्याचं नांव–? आम्हीच ठेवलंय् तें ! शेपूट कधी पायांत नाही. प्रश्नचिन्हाच्या आकड्यासारखी उमललेली वांकडी पण ताठ !– इतराचा आमचा अनुभवच आहे मुळीं–जरा सूट दिली कीं, लागलींच डोक्यावर चढायला लागतात. म्हणूनच पहिल्यापासून धोरण ठेवलं आहे. कुणाला म्हणून फारसं जवळ करायचं नाही. आणि प्रत्येकाच्या खात्यात आपला असा माणूस ठेवायचा. उशिरा कोण येतो, लवकर कोण येतो...आमच्या विरुद्ध कोण बोलतो–नाहींतर शिस्त रहायची कशी... ?

ट्री ऽ ऽ...ग्

" अरे, जगदाळेंना बोलाव– "

हा माणूस आहे म्हणून कसली काळजी नाही. पाठ फिरली तरी इथें काय होतें काय नाही सगळें कसे चोख सांगतो.

" बसा–– "

" काल मी घरीं फोन केला होता साहेब..."

" किती वाजता... ?"

दचकून उपयोग नाही...नाहीतर याला खरंच संशय यायचा कीं, घरीं असून आपण फोन घेतला नाही याचा... "

" चार वाजतां केला होता... तो चीप् प्राडक्टस्‌चा माणूस आला होता. म्हणत होता की, तुम्हांला घरी भेटायच होतं... "

" मग त्याला आज यायला सांगायचं होतं ना ? माणूस कसा वाटतो जगदाळे तुम्हांला–– ?"

" साहेब लाख माणूस आहे. बिझिनेसला चांगला...शिवाय खात्यांतल्या मॅनर्स वगैरे ठाऊक आहेत त्याला...त्याचं पांचशें रुपयांचं बिल न्यायला आला होता..."

" त्याचं बिल अजून दिल नाही...?"

" मीं चार-पांच वेळां त्या रानड्याला सांगितलं की, साहेब रागावतील...बिल काढून टाक..."

ट्री ऽ ऽ...ग् !

" रानड्याना बोलाव ! – "

या रानड्याला एकदां चांगला हिस्का दाखवायला हवा. जगदाळ्यानीं सांगून त्याला अक्कल येत नाहीं म्हणजे काय...

" किती वर्षं झाली हो रानड्यांना इथें ?"

" झालीं...तीन वर्षं होऊन गेली... "

" काय रानडे... चीप प्रॉडक्टस्‌च्या बिलाचं काय झालं... ?"

" फार बिलं पडलीं आहेत साहेब... शिवाय त्याचा मागच्या प्रकरणातला......

" डोंट् टॉक्... ! होपलेस्... ! दोन दोन केसेस् मिक्स करायची सवय आहे तुम्हाला–तुमचा पगार मिळाला नाही तर चालेल का तुम्हांला. संध्याकाळच्या आत तें चीप प्रॉडक्टस् बिल टाका ? तुम्हांला इथें रहायचे आहे कां जायच आहे परभणीला ? पुन: कम्प्लेट आली तर खपणार नाही मला... "

" नाहीं सर...पण... "

" डोंट टॉक...! ! यू कॅन गो...! "

झक्क आवाज लागला ! माझ्यापुढें अर्ग्युमेंट करतो म्हणजे काय––? बदली होऊन पोराबाळांच्या शिक्षणाचे तीन तेरा केले कीं टिपें गाळीत येईल बदली रद्द करा म्हणून सांगायला...! मी म्हणतों, चीप प्रॉडक्टस्‌चा दंड वसूल व्हायचा असेल दुसऱ्या एका प्रकरणात...म्हणून त्याचे हे पैसे अडवायचें काय कारण–? हे पैसे दिले तर दड कसा वसूल करणार हा प्रश्नच निर्माण होत नाही...! नुकसान झाल तर सरकारचं होईलं त्याच्या बापाचं काय जातंय्...

" जगदाळे रूलप्रमाणें दंड या बिलांतून वसूल करावा असे आहे कां हो...? "

" नाहीं साहेब. असा कांहीं रूल नाहीं... म्हणजे करायला हरकत नाही पण केलाच पाहिजे असा रूल नाही..."

" हे लोक रूल नीट वाचत नाहींत. आजच्या आज त्या रानड्याकडून बिल काढून घ्या..."

" त्याचा फोन येईल संध्याकाळपर्यंत तुम्हीं भेटाल कीं नाहीं...सध्याकाळपर्यंत...? "

" थाबा हं, घरीं फोन करून विचारतो ? "

" चार...तीन...सात...पाच...हॅलो, मी साहेब बोलतोय...! आज संध्याकाळी शॉपिंगला जायचं आहे कां...? शॉपिंगचें काय तें सागा...होपलेस ! रात्री पिक्चरचं बघू...! नाहीं ना...ठीक...टायगर झोपला काय––? बांकाखाली बसलाय ? बसू दे... मग आज शॉपिंग नाहीं...ठीक आहे...! तुम्ही त्याला सागा––संध्याकाळी यायला मी घरीं आहे..."

हा जगदाळे तरी लोचटच आहे बसा म्हटलं की,मख्खासारखा बसून रहातो...उलटें पेन तोंडात घालून. आय् हेट् हिम् समटाईम्स...आता काम झाल तरी उठून चालता होणार नाही...ही माणसं परमेश्वर कशी घडवतो कुणास ठाऊक...! बाकी उष्टी पत्रावळ तरी आजकाल कुणाला चाटायला मिळते आहे माझ्या खात्यात... ? जरा कुणाचा संशय आला की आम्ही वळतोंच त्याची गठडी...! खालपासून ब्रायबरी म्हणजे काय–? आमच्यामुळें या जगदाळेच्या खिशात चार पैसे पडत आहेत. हे आम्ही जाणून आहों हें तो जाणून आहे म्हणून ठीक. नाहीतर या जगदाळेला येतच काय–? वर्कशापऐवजीं वॉटर सप्लाय लिहितो आणि वॉटर सप्लाय तिथें नेमका वर्कशाप लिहितो. ही याची अक्कल ! पण अक्कल कमी असलेलो माणसंच नेहमीं जवळ ठेवायचीं ? डुडस् साहेबाच्या मी खास मर्जीतला म्हणून खात्यातली ही मख्खी रिटायर होतां होता त्यानें आम्हाला सांगितली.

" बाकी काय जगदाळे...?"

" मागची बाकी कांही नाही त्याच्याकडे...

" मी विचारलं नाहीं तें तुम्हाला. मी कामाचं विचारतोंय्..."

" नाही साहेब...मला वाटलं...हो–बरी आठवण झाली. आपल्या खात्यात मागें तो इनामदार होता...आठवतो साहेब...?"

" मी जळगावाला असतांना तो बॉम्ब्रेला होता..."

" त्याची..."



# टायगर

* * * * * * * *

वि. ग. कानिटकर

" मग तो बॉम्बेला आला, माझी जळगांवाला बदली झाली...त्याला रिटायर होऊन बरेच दिवस झाले..."

" तो मेला साहेब..."

" अरेंर...मेला ! वाईट झाल...कधी मेला-?"

" तो मेला दहा वर्षांपूर्वीच. त्याची फर्दर ट्रॅजिडी म्हणजे साहेब त्याचा मुलगा पण मेला वर्षापूर्वीच..."

" अस्स...! व्हेरी बॅड्..."

" त्याची विडो बायको परवां भेटायला आली होती..."

" मला भेटली नाही..."

" मीच तिला सागितलं की त्या दिवशीं भेटूं नका...त्या दिवशीं तुम्हीं साहेब, टायगरला हॉस्पिटल्मध्यें नेण्याच्या गडबडीत होता..."

" तो त्या दिवशी सकाळपासून कांहीं खाईना...! भात नाय्...मटण पण नाय्... मग त्याला मोटर मध्यें घातला आणि हॉस्पिटलांत नेला..."

" त्या दिवशीं साहेब ती आली होती..."

" आय् सी...!"

" आपल्याकडे लीव्ह् व्हेकन्सीत...नोकरीसाठी आली होती..."

" ती विडो आहे ना...?"

" ॲक्चुअली ! इनामदारांचा मुलगा ॲक्सिडेंटमध्यें गेला साहेब...!"

" तुम्हीं अर्ज घेऊन ठेवा आणि टाका प्रपोजल..."

गेला एकदांचा. हा माणूस वाटतो तितका मूर्ख नाहीं. इनामदाराच्या बायकोला मला भेटूं दिल नाही, आतां हा तिला नोकरी देईल आणि...जाऊं द्या... कुणावर विश्वास टाकायलाच हवा-! आता एक तास सह्या... सह्या...सह्या ! कागदांचा फडशा पाडतो.

हातानें सह्या चालू आहेत. पण डोक्यात मघाच्या बायकोचा फोनवरचा तुसडा आवाज घुमतो आहे. गेली पधरा वर्षे या बाईनें असा अनेक वेळा मनस्ताप दिला आहे. तिला माझा पैसा आवडतो. माझी मोटर आवडते. फोन, बगला, गडीमाणसं सगळीं आवडतात. माझ्यावर मात्र ती सदा फिसकारलेली असते. गेल्या कित्येक वर्षांत तिनें आपणहून कधी माझं चुंबन घेतलेलंहि मला आठवत नाही. आम्ही आपला श्रृंगाराचा आटापिटा करायचा प्रेताला मिठ्या माराव्या तशा मिठ्या मारायच्या...माझा चेहेरा ओबड ऽ धोबड आहे. त्यावर देवीचे व्रण आहेत...बोलतांना माझे शब्द अडतात... स्वभाव चिरचिरा आहे... आणि तिच्या बाबतीत मी संशयीसुद्धां आहे. पण अखेर मी नवरा आहे. ती माझी बायको आहे. जोपर्यंत तिला माझ्या घरांत रहायचं तोपर्यंत हे अस चालायचं नाही. आम्हाला खपणार नाहीं...

काय लेटर्स कपेअर करतात का झोपा काढतात...?

ट्रींग...

" सुभेदारना बोलावं-"

विंजिंग गिव्हन टू अंडर ऐरिटमेंट...या वाक्याला कांही अर्थ आहे का...? टाइपिस्ट बेअकली...तपासणारा बेअकली-फुकट पगार खातात...

" यस् सर"

" हें वाचा, काय टाईप केलंय...सहीला पाठवण्यापूर्वी वाचता कीं नाहीं कागद-"

" पण सर..."

" चुका करायच्या आणि कबूल करायच नाहीं. या गोष्टी काय मी पाहयच्या-? तुम्हीं पगार म्हणून पैसे घेता कीं कवड्या घेता... नॉन्सेन्स-सगळं रीटाईप करून आणा... गेट् आउट...

" नाही, पण हें लेटर मिस् कुलकर्णींच..."

" तुमचं नाही...?"

" नाही सर-"

" मग आधीं सांगायला काय दांतखिळी बसली होती. कुणाचं कां असेना-तुम्ही रीटाईप करून आणा आणि टाईपिस्टला वॉनिंग द्या..."

" मेमो काढायचा कां--?"

" आधी लेटर आणा--जस्ट नाऊ !"

वायकोचा विचार मनांत आला की अस्सं आमच भान सुटत. कारण नसताना या सुभेदारालाच धारेवर धरला. याला कारण आमची बायको...

जाऊ द्या...आम्ही तरी कुठं तिची एवढी पर्वा करतो. बायको असताना आमचं लक्ष सारखं इकडे तिकडे जात याला कारण तीच आहे. नवरा म्हणजे तिला काय वाटतं--? तसं आमचदेखील अजून वय झालेलं नाहीं. वाटतो तिला इतके आम्हीं कुरुपहि नाही... नाहीतर मालेगांवच्या कामावर असताना... आम्ही तरूण होतो म्हणून सोडा...पण जळगावला प्रमोशनवर गेल्यावर कुसुम साळुंकेला आम्ही घायाळ केलेंच ना...? आणि इथें... मिसेस् लाटकर...कुणी म्हणेल खिशात पैसे असले की या गोष्टी कुणालाहि जमतील...? या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं पैसे खिशांत खुळखुळायला तरी काहीं कर्तृत्व लागतं की नाही...?

मालेगावला चद्राबाईंशीं संबध येईपर्यंत आम्हांलादेखील या गोष्टी भारी अवघड वाटायच्या. पण मालेगावला शिद्राप्पा मस्टरिंग कारकुनानें चद्राबाईला ज्या दिवशीं घरी कामाला पाठविलें त्याच दिवशी आम्हांला या गोष्टीची नाडी गवसली अजून त्या बाईची आठवण बुजत नाहीं. त्या दिवशी तिला उरलेलें सगळें अन्न आधी खायला लावलें. कितीक दिवसांत बिचारी अस चागल जेवली नव्हती. बकाबका ती आत खात होती. आणि मी बाहेरच्या खोलींत पलंगावर पडलेलो होतों. भाडी साफ करून ती परत आली. आणि आम्ही तिचा हात धरला. आमच अन्न खाऊन आधीच ओशाळलेल्या त्या पोरीला आम्हीं पुरत ओशाळं केलं. धडापड झाली पण मामुली. पुढें आम्हीं तिला वेड लावल. आणि तिने आम्हांला. प्रत्येक दिवसाचे आम्हीं दामदुप्पट पैसे दिले...!

" काय आणलंत...? "

" मघाचं लेटर साहेब...! "

" आतां सध्याकाळीं आणा..."

" बर...! "

या प्रकरणात अखेर शिद्राप्पा डोईजड झाला. उलटी उत्तर द्यायला लागला. एक दिवशी कामावरून काढून टाकला झालं. आमच काय वाकडं केल त्यान...? वरती जळगांवला निनावी पत्रं पाठवलीन् आमच्या विरुद्ध..वरच्या साहेबांना आम्ही वर्षाला पाचशें रुपये मोजीत होतों. सगळ्या तक्रारी कचऱ्याच्या पेटीत गेल्या. उलट आम्हांला लवकर प्रमोशन मिळाल...चद्राबाईची आठवण कधी बुजेलस वाटत नाही. दिसायला ती तिरळी होती. काळी होती, दांत पान खाऊन बरबटलेले असत-पण शरीराचें बांक काय होते ! भरलेले खादे, बाळतपणातून उठल्यासारखे भरदार स्तन, त्याच्यावरचे काळे लहान चद्रकोर आणि वर उचललेली पिलांच्या चोचीसारखी स्तनाग्रं ! पाठीवरून फिरणारा हात एकदम हातभर उच चढे... एक शंका मात्र येते...शिद्राप्पाशी तिचा नेहेमीचाच...

" एस् ! "

" एम् आय् डिस्टर्बिंग यू...सर...?"

" येस्...नो...नो बसा...! "

" मी परवाच्या टेंडरबद्दल भेटायला आलों आहे..."

" बोला..."

" थोडो टेक्निकल डिफिकल्टी आहे..."

ट्रींग ऽऽऽ ..

" अरे...पी. ए. ना बोलाव..."

" काय आहे...या ठिकाणीं काहींतरीं चूक असावी...या साईझच्या कुशन्स तयारच होत नाहीत साहेब..."

" एस् सर...! "

" वाकडे हे बघा काय म्हणतात...ही इज् माय पी. ए......"

" ओ ऽ ऽ ग्लॅड् टू मीट्...हें पहा या साईजच्या कुशन्स मिळत नाहीत...असं मला वाटत...तेव्हा साईज बदलायला हवा... ! !—"

कुणावर विश्वास टाकावा तर हें अस्सं होत. हा वाकडे...एवढी आठ वर्षं सर्व्हिस झालेला हुषार म्हणून प्रमोट करवला...

" एस्...! सर इथें आपलीच चूक आहे. कांही तरी...! "

" आपली चूक...आतां काय करणार... वाकडे चूक कशी झाली आपली—? मी तुम्हांला नेहमी सागतो की, तुम्ही पर्सनली पहात जा. मी सगळ पाह्यच तर मग तुम्हाला कशाला पी. ए. नेमलेत...? "

" साहेब, टेंडर कॅन्सल कराव लागेल..."

" कॅन्सल कराव लागेल...म्हणजे पुन: जाहिरात, पुन: सगळ करायच...वेस्ट ऑफ टाईम...अँन्ड मनी. आजच्या आज कॅन्स्लेशनची नोटीस द्या..जा पळा..."

" मग आतां आम्ही तूर्त टेंडर भरत नाही. "

" भरूं नका...यू टेक् टी...चहा घेतां...? "

ट्रींग ऽऽ...

" अरे, दोन चहा आण स्पेशल..."

" आमची तुमच्या डिपामेंटमध्यें बिझिनेस् वाढवण्याची इच्छा आहे. आमची फर्म तशी नवीन आहे पण वुइथ युवर हेल्प्..."

" घ्या चहा घ्या...! "

" थँक्स...! "

कसा छान माणूस आहे हा ! टिप टॉप! यग, स्मार्ट...हे जगदाळे आणि वांकडेच कसे आमच्या वांटचाला येतात कुणाला ठाऊक... अशी माणसं खात्यात पाहिजेत...

" सो—आय् टेक् युवर लीव्ह...सी यू सम टाईम्स..."

शेक हॅन्डसाठीं हात हातात धरला. बोटं कशी लाबसडक होती.

ट्रींग ऽऽ...

" वाकडयांना बोलाव "

अशीच लाबसडक बोट मिस् साळुकेची होती. मिस् कुसुम साळुके ! किती भीत भीत आम्ही तिचा हात हातात धरला .. !

" वांकडे...तुम्ही नीट चेक करत नाही आणि आउट सायडरपुढें आपल्या डिपार्टमेंटची अशी अब्रू जाते. ती चूक कशी राहिली टेंडरमध्यें... ?"

" मी त्या दिवशी रजेवर होतों... "

" नेहमी रजेवर जाता कशाला... ? यापुढें तुम्हाला वाटेल तेव्हां रजा मिळणार नाहीं...होपलेस् .. !"

मिस् साळुकेची आठवण झाली कीं, झुडुपात दगड फेंकल्यावर पाखर उडावीं तसे आमचे विचार सैरावैरा होतात. आम्ही तसे दयाळू आहोत परमेश्वरानें आम्हाला कांही कमी दिले नाही. पगाराच्या आठशें रुपायांतले साडेसहाशें आम्हीं चक्क प्रॉव्हिडट फंडांत टाकतों. महिन्याचा सात-आठशें रुपये खर्च सभाळून ! घेणारा एक असला कीं देणारे पन्नास भेटतात ! ! तसा आम्ही कुणाला त्रास देत नाही पण एकदां आम्हीं वाकडे झालों की वाकडे ! मग आमच्यासारखा वाईट माणूस नाहीं. या दयेच्या पायींच आमचा आणि साळुकेचा सबध आला.

हिचा बाप जळगांवला माझ्या हाताखालीं होता. एका डोळ्यात फूल पडलेलें होतें. नेहमीं आजारी आजारी असायचा, एकदां असाच रजा मागायला आला आणि त्याचं सगळ पिवळ शरीर पाहून आम्हाला शका आली.त्याला काविळीनें पछाडले होते, पगारी रजा शिल्लक नव्हती. पगार मिळायला हवा होता. आम्हांला भारी वाईट वाटलें. प्रत्येक माणसाने निदान दोन अडी, भरपूर भाजीपाला, दूध एवढा आहार करायला हवा असें डुडस साहेबाकडून आम्ही शिकलों होतों. फाडकन् त्याला शंभर रुपये दिले आणि त्याला विसरूनहि गेलों. आठ-दहा महिन्यानंतर आम्हांला पुन: त्याची आठवण झाली.

त्या दिवशी असाच पाऊस पिरपिरत होता. रजा होती म्हणून आम्ही क्वार्टरमध्येंच होतो. सध्याकाळ दाटत होती. अशावेळीं कुसुम आली. आम्ही तिला यापूर्वी कधीच पाहिली नव्हती. साळुकेला एवढी मोठी मुलगी असेल हेदेखील आम्हांला माहीत नव्हतें.

तिच्या बापानेंच तिला पुन: पैशांसाठीं पाठवली होती.

यावेळी ती अगाने शिडशिडीत होती. नाक किंचित् वर उचललेलें होतें, जिवणी बारीक होती. डोळे काळे होते. रगहि फारसा उजळ नव्हता. पण घाटाला ठसठशीत होती. निळी थोराड फुल बसलेलं हलकं वायलच पातळ नेसली होती. हातात काचेच्या दोन बागड्या, गळयात मण्याची माळ, आणि कानात कांहीं नाही. केस मात्र छान होते. जाड दोरखड असाव तसा पाठीवर वजनदार शेपटा होता. तिच्या मनगटापर्यंत पोंचत होता. कारण बोलतांना शेपटयाचं जाड टोंक उजव्या हातात धरून ती बोलत होती. ती मॅट्रिकच्या वर्गांत होती. फॉर्मला पैसे हवे होते.

आम्ही पुन: शंभर रुपये दिले. आणि मग जातीनें एके दिवशी साळुकेची प्रकृति पहायला गेलों. येथपर्यंत खरोखरच आमच्या मनात काही नव्हतं. त्याला अथरुणावर पाह्यला अथरुणावर कुणी आहे हेदेखील लांबून कळत नव्हतं. त्या दहा बाय दहाच्या खोलीत अधार गच्च होता. मोरीला घाण सुटलेली होती. आणि त्यांत ते पाप्याचं पितर आंचके देत मरणाची वाट पहात होतं. आमच्या डोळयापुढें तो मेल्यानंतरच चित्र आलं. घरात त्याची तीन-चार पोरं दिसत होतीं. थोराड वाढलेली होती. शाळेबिळेंत असावीत.

मग एकदम लख्खकन् एक कल्पना सुचली. आम्हीं लगेच त्याला सागून टाकल. कुसुम मॅट्रिक पास की नोकरीला लावतो माझे पाय धरून तो रडायला लागला. आम्हांला खरोखरच असल कांही पहावत नाही.

अशी कुसुम आम्हाला भेटली.

" येस् जगदाळे... !"

" साहेब, मुबईचा ट्रक आहे... !"

" हॅलो ऽऽऽ यस् सर, यस् सर, यस् सर, यस् सर, यस् सर... नोट करतो... डेप्युटी मिनिस्टर १४–७ ते २०–७ मिनिस्टर २४-७ ते २६-७ सेक्रेटरी कमिशन ६-८ते९-८

( पान ५५ वर पहा ).



# शांतलिंगाच्या दोन बायका

नेहमींप्रमाणें मुलाणीच्या खुराड्यांतील कोंबड्यानें बांग दिल्यानंतर धानव्वा उठली. अजून सगळीकडे चिडीचिप्प होतें. कुठें कसलीच हालचाल नव्हती. शेजारीं झोंपलेल्या शांतव्वाला हांक मारून तांब्या घऊन जाण्यासाठीं आळस झाडून ती उठली आणि हळूंच ती म्हणाली,

"शांतव्वा, उठायचं ना आतां. फाटेचे पांच वाजले—असतील"

दररोज ह्या वाक्याची चाहूल ऐकून चटकन् शांतव्वा उठून बसायची आणि न बोलतां दरवाजा उघडून पायांत चेपल्या सरकवून उभी राहायची. आज धानव्वाच्या त्या वाक्यानें शेंजारच्या गोधडींत कसलीच हालचाल दिसली नाहीं. आश्चर्याची एक लहानशी लकेर तिच्या मनाला चाटून गेली आणि पुन्हा एकदां मोठ्याने ती म्हणाली,

"शांतव्वा, अग माझ्या सवते, उठ की ग !"

अगदींच प्रेमानं बोलण्याचा प्रसंग आला कीं 'अग माझ्या सवते' असं म्हणण्याची तिची पद्धत ठरून गेली होती आणि तसें म्हटल्याबद्दल शांतव्वालाहि फार बरं वाटायचं.

दुसऱ्यांदा हांक मारूनहि शेजारची गोधडी आपली स्तब्ध आहे असं पाहून धानव्वाला थोडा-फार रागच आला. गेल्या वीस वर्षांत असें कधीं घडलें नव्हतें. आजच आपल्या सवतीला अथरुणांत लोळण्याची हुक्की यावी हें पाहून तिला म्हातारपण लागल्याचें तिच्या लक्षांत आलें.

"शांतव्वाऽ ए शांतव्वाऽ" तिनें जोरजोरानें हांक मारली व शेंवटीं उठून जवळची गोधडी हातानें उडविली.

गोधडी रिकामी पाहून तिला आश्चर्याचा सौम्य धक्का बसला. 'आज ही थेरडी आपल्याला एकटीला सोडून गेली की काय ?' असा प्रश्नहि तिच्या मनांत झोक्यासारखा हिंदकाळत गेला. मग तिच्या लक्षांत आलें कीं, तसें होणें शक्य नव्हतें, अंधाराची शांतव्वाला चांगलीच भीति होती आणि अशा अंधारांत एकटीनं तांब्या घेऊन जाण्याचं धाडस तिच्यांत जन्मजन्मांतरींहि घडणं शक्य नव्हतं. परंतु काल घडलेली घटना तिच्या डोळ्यांसमोर विजेसारखी चमकून गेली आणि म्हातारीनं ती गोष्ट फारच मनाला लावून घतल्यामुळें तसंहि कदाचित घडलं असेल, असं तिला वाटूं लागलं.

क्षणभर विचार करीत डोक्याला हात लावून ती उकिडवी बसून राहिली आणि कांहींशा निश्चयांत ती उठली व पायांत

चेपल्या अडकवून तरातरा ती गांवाबाहेरच्या ओढ्यापर्यंत गेली. रस्ता नेहमींचा पायाखालचा असल्यामुळें ती तरातरा चार-दोन मिनिटातच ओढ्याकांठीं आली. परंतु तेथें कसलीच हालचाल नाहीं हें पाहून मटकन् खालीच बसली.

तिच्या हातापायातील शक्तिच नाहीशी झाल्यासारखी काही वेळ ती तेथें बसून राहिली आणि मग तिला वाटले की, असे मुकाट्याने हातपाय गळून भागणार नाहीं. धावपळ करून शक्य तितक्या लवकर तिचा शोध लावला पाहिजे. शातव्वाखेरीज तिला जगता येणार नव्हतें. आपली सवत असली तरी गेल्या वीस वर्षांत दोघींनी आपापली सुखदुःखें एकमेकांच्या सानिध्यात उगाळली होतीं. त्या दोघींच्या प्रेमापुढें सख्खा बहिणीचेंहि प्रेम कमी पडले असतें.

"शातव्वा, शातव्वा, मला एकटीला सोडून कुठे गेलीस ग तू ?" तिच्या नावाचा धावा करीतच, ठेचकाळत काट्याकुट्यातून फुफाट्यांतून ती घराकडे धांवली. अगणातल्या आडाकडे ती प्रथम गेली. उन्हाळ्यामुळें आडातील सगळेंच पाणी आटले होतें, आणि त्यामुळें आडांत पाहण्यात काही अर्थ नव्हता. ती पळतपळत गोठ्यात जाऊन आली. गोठ्यांतील बैल डोळे झांकून शातपणे रवथ करीत होते. पडक्या माडीवरहि तिनें पाहावयास कमी केलें नाही.

"कुठें ही बया मसणांत गेली कुणास ठाऊक..." म्हणून तिला तिने एक इरसाल शिवी हासडली आणि मागील दारी ती आली. मागीलदारीं लिंबाच्या झाडाच्या फांद्या अगदी स्पष्ट दिसत होत्या. नुकतच थोडंस झुंजुमुजु होऊ लागलं होत. लिंबाच्या झाडावरच्या कोपऱ्यातल्या फादीवर काहीतरी लोंबकळत होतं.

धानव्वा जवळ गेली आणि काय झाल असेल हे तिच्या तावडतोब लक्षात आलें. चाबकाने एका पाठोपाठ फटकारे बसावेत त्याप्रमाणे तिच्या मेंदूवर कांही तीक्ष्ण आघात होत आहेत असं तिला वाटलं आणि बघता बघतां ती पांढरीफटक पडली. आपला कुणी तरी गळा दाबला आहे आणि आपले निर्जीव शरीर उदरांनी कुरतडले जात आहे असे तिला वाटलें आणि बघता–बघताच तिनें डोळे पाढरे केले.

गार वाऱ्याच्या झुळकीमुळें धानव्वा शुद्धिवर आली तेव्हा आदल्या दिवशीच्या घटना तिला अंधुक आठवूं लागल्या आणि त्यामुळें तिला अधिकच गुदमरल्यासारखें होऊं लागलें.

**प्रा. भीमराव कुलकर्णी**

गतजीवनांतल्या आठवणी तिच्या समोर दांत विचकू लागल्या आणि त्यापाठीमागें काहीं विद्रूप सगीत आहे असे तिला वाटूं लागलें.

तिचा नवरा शांतलिंगाप्पा गांवांतला प्रतिष्ठित कोष्टी. लग्न करून दहा वर्षें झाली तरी शांतव्वाच्या पोटी मुलबाळ होत नव्हतें. म्हणून त्यानें धानव्वाशी दुसरे लग्न केले. नव्या नवलाईची नवरी घरी आली तेव्हां तिचें किती कोडकौतुक झालें. धानव्वाच्या प्रत्येक गोष्टीचें कौतुक शांतलिंगाप्पा करूं लागला तेव्हां ती लाजेनें फुलून जाऊं लागली

जोंधळ्याच्या मोठमोठ्या कागदासारख्या तिनें केलेल्या भाकऱ्या खाऊन शातलिंगप्पा समाधानानें ढेकर देत पानावरून उठू लागला. नव्या नवलाईनें श्रावणांत तिनें मंगळागौरी पूजिल्या आणि हिरवंगार इरकली लुगडं नेसून नाकांतली नथ झुलवीत ती गांवाबाहेरचा मैळोचडीमध्यें भल्या पहाटे शांतलिंगाबरोबर स्नान करून श्रावणसोमवारीं सहस्र बिल्वपत्रें वाहू लागली.

ह्या सगळ्या कौतुकामध्यें दुःख वाटत होतें फक्त शातव्वाचे. कुठल्यातरी एका कोपऱ्यात म्लान चेहरा करून अश्रू ढाळीत ती बसलेली असायची, तिचे खोल गेलेले डोळे पाहून धानव्वाला कसेसेंच व्हायचें. मूलबाळ नसलेल्या स्त्रीचें तें दुःख नव्हतें, तर मूलबाळ होण्याची आपली पात्रता नाही, आपण वाझोटी आहोत म्हणून केवळ आपल्याला दोषी ठरवून आपल्या स्त्रीत्वाचा अपमान केला जावा याचें तें दुःख होतें. आपण या घरांत केवळ एक अडगळ आहोत, आपल्या नाकावर टिच्चून नवऱ्याने आपल्याला सवत आणली आहे आणि ती जणू कांहीं आपल्या नाकाला मिरच्या झोंबाव्यात यासाठीं मोठ्या झोकांत मिरवते आहे, याचें तें दुःख होतें. धानव्वा सुरवातीला तें दुःख समजत होता, परंतु म्हणून का तिनेहि सुतकी चेहरा करून वागावें? छे, ते तिला पसत नव्हते. विवाहानतरचें धुंद जीवन तिला अनुभवायचें होतें. इरकलीच्या लुगड्याचा वासच इतका मादक होता कीं, तिच्या जीवनातील उन्मादकतेला तें जणूं कांही आव्हान होतें.

आणि हे आव्हान तिनें आत्ता स्वीकारायचें नाहीं तर मग केव्हां ?

शातलिंगाच्या जीवनांत शातव्वाच्या नशिबाला अपेक्षित फळें आली नव्हतो आणि त्यासाठी तर धानव्वानं त्याच्या जीवनांत प्रवेश केला होता. परतु तिच्याहि नशिबांत पुढें काय लिहिलें होतें कुणास ठाऊक! तिचीहि गति शांतव्वासारखीच होणार नाहीं कशावरून ?

या शेवटच्या प्रश्नानें ती त्यावेळीं केवढी दचकली होती?

कौतुकाचें, नवलाईचे दिवस संपल्यानंतर या प्रश्नाचे खरोखरच तिच्या उरी एक भयानक दुःख घर करून बसलें. गुहेंत शिरलेल्या वाऱ्यानें अभद्र सूर काढावेत, त्याचप्रमाणें तिच्या अतःकरणांतील हें दुःख तीव्र स्वरूप धारण करूं लागलें आणि शांतव्वाच्या अंतःकरणातील यातनाचे चटके तिलाहि जाणवूं लागले. ती जणूं काहीं शातव्वाची समदुःखी बनली. तिला शातव्वाच्या अंतःकरणातील मूक रूदन साऱ्या सवेदनासहित अनुभवता येऊं लागलें. तिच्या आर्ततेच्या उत्कटतेंत आपणहि गटागळ्या खात आहोत असे तिला वाटू लागले आणि एकप्रकारच्या अपार करुणेनं तिने शातव्वाकडे धांव घेतली. शांतव्वाच्या पोळलेल्या अतःकरणातील सूडबुद्धीच्या, सवतीच्या भावनाचा लवकरच निचरा होऊन एक नवा जिव्हाळा, एक नवें प्रेम, तिच्या अंतःकरणात दाटून आलें आणि कितीतरी युगांच्या यातना एकमेकांच्या गळ्यात गळा घालून एकमेकीजवळ उघड करण्यात, त्याप्रमाणें त्याची मनं एकमेकीबद्दलच्या जिव्हाळ्यानं दुथडी भरून वाहू लागली.

आणि मग दोघींनीं मिळून संतति होण्यासाठीं करावयाचे सर्व प्रयत्न करण्यात दंग राहण्याचा विडा उचलला होता.

सोळा सोमवार करून झाले. उपासातापासात त्या दग राहू लागल्या. दारापुढें काहीं दिवस नेमानें सध्याकाळीं पाण्याचे पट्टे ओढून झाले. इरव्वा चेटकिणीच्या सागण्याप्रमाणें काळ्या बाहुल्या लोकाच्या उबरठ्यात टाकून झाल्या. उताऱ्या फाताऱ्याना ऊत आला.कोणी सागितले विंचवाची पिलं गुळातून खावीत. मोठं निगरगट्ट मन करून तेंहि करून पाहिलं. भल्या पहाटे कोणी उठायच्या आत नदीवर नागव्यानं आघोळी करून गावाबाहेरच्या बहिरोबाला प्रदक्षिणाहि झाल्या.

एक ना दोन हजारों गोष्टी झाल्या. परंतु शांतलिंगाच्या घरीं पाळण हालण्याचीं कांहीं

चिन्हें दिसनात. आपल्या कुठल्या प्रयत्नाला यश येत नाही हें पाहून एके दिवशी धानव्वा सहज शांतव्वाला म्हणाली,

"परमेश्वरानं आमच्याबद्दल एवढ निष्ठुर कां व्हावं, काहीं कळत नाहीं."

"अग, परमेश्वर काय करणार बिचारा. आडातच नसलं तर तो पोहऱ्यात कुठून देणार?" शांतव्वा म्हणाली.

"म्हणजे? मी नाहीं समजले तुझं म्हणणं?"

"अग! घरांतला पुरुष पक्का असला तर परमेश्वराकडे जाण्याची मुळीं गरजच नसते."

"अग माझ्या सवते. आज तूं खोड्यात टाकणारे कांहीतरी बोलत आहेस. तुला काय म्हणायच, तें एकदा सरळ म्हण की!"

"आणखी किती सरळ सांगायच तुला! मुलं व्हावीत म्हणून एक सोडून दोन लग्नें केली, परंतु दोन सोडून आणखी चार केली तरी..."

"शांतव्वा–ऽ" धानव्वा एकदम जोरात ओरडली. शांतव्वाच्या बोलण्यातील गर्भितार्थ लक्षात आल्यावर ती चांगलीच अस्वस्थ झाली. खरोखरच शांतव्वा म्हणते तसं काहीं असेल का? आणि नाहीं तरी कशावरून? आपल्या घराण्यात आपल्या सगळ्या बहीणींना इतकी मुलें झाली आणि आपल्याला एकहि का होऊ नये?

'खरच का होऊ नये?'

'शांतव्वा म्हणते तेंच खर असल पाहिजे.'

'आणि मग या जन्मात आपली कूस कधीच उजळणार नाही कां?' घंटेचा नाद चहूकडे घुमावा त्याप्रमाणें तो प्रश्न तिच्या मनांत घुमत राहिला आणि प्रतिध्वनीच्या रूपाने असंख्य प्रश्नांनीं तिला भंडावून सोडले.

धानव्वाच्या मनांत निर्माण झालेला प्रश्न मोठा भेसूर होता. रात्रंदिवस ती त्या प्रश्नाच्या सावलीत वावरूं लागली. ह्या प्रश्नापासून आपली कधीच सुटका होणार नाहीं असे तिच्या मनानें घेतलें. शांतव्वाला आतां चांगलेंच कळून चुकले होतें कीं, या जन्मीं आपण मुलासाठी हपापण्यात अर्थ नाहीं. आणि एखाद्या निराश माणसानें आहे त्या परिस्थितीपुढें मान तुकवून अगतिकपणें येईल तो दिवस पाहावा त्याप्रमाणे आशा–आकांक्षांना तिलांजली देऊन कसेंतरी जिणें जगणें एवढेंच आतां राहिलें. परंतु धानव्वाला तें जिणें पसंत नव्हतें, ती एकवार परिस्थितीशीं निकराचा झगडा देणार होती. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत तो प्रयत्न करणार होती आणि शेवटीं सर्व प्रयत्न करून शांतव्वाचेंच खरें ठरलें असतें तर अशाप्रकारें आपले लूत भरलेल्या कुत्र्यासारखं जिणे ती ओढण्याला तयार नव्हती.

आणि अशा परिस्थितीत गांवात कोणी साक्षात्कारी पुरुष आल्याची वार्ता सगळीकडे वावटळीसारख्या पसरल्या. आसपासच्या लोकांची दर्शनाकरता रीघ लागली. आपापल्या कामना, सिद्धि पूर्ण व्हाव्यात म्हणून त्या सत्पुरुषासमोर लोकांच्या रांगा लागूं लागल्या. धानव्वाला वाटलें, आपणहि एकदा शांतव्वाबरोबर जाऊन त्या सत्पुरुषाला सांकडें घालावें. शांतव्वा अगोदर मुळी यायलाच तयार नव्हती, परंतु धानव्वाच्या आग्रहाखातर ती जायला तयारहि झाली.

गावाबाहेरच्या देवळात ते साधुमहाराज उतरले होते. जवळपास त्यांचा कसलाहि लवाजमा नव्हता. अंगावरील वस्त्राशिवाय त्यांच्याकडे दुसरी वस्तू नव्हती, व कोणीहि काही दिलेले ते मोठ्या निग्रहाने परत करीत होते.

भल्या पहाटे स्नान करून दोघीहि स्वामीच्या दर्शनाला गेल्या. समोर नारळ ठेवून त्यानीं साष्टांग नमस्कार घातला व त्या दोघींना पुढें काहीहि बोलूं न देतां स्वामींनी डोळे उघडून एवढेंच म्हटलें की,

"ताई उठा, तुमच्या मनातील इच्छा लवकरच पुरी होईल." त्या तेजपुंज स्वामीचे ते शब्द ऐकून धानव्वा आनंदाने फुलून निघाली. निराश शांतव्वालाहि क्षणभर पान्हा फुटल्यासारखें वाटले व अंगावर रोमांच उभे राहून कसल्या तरी सुखद अनुभूतीनी ती थोडा वेळ जागेवर खिळून उभी राहिली.

आणि आश्चर्याची गोष्ट ही की, खरोखरच त्या पवित्र स्वामींच्या तोंडचे शब्द खरे ठरूं लागल्याचीं चिन्हे दिसूं लागलीं.

थोड्याच काळानंतर धानव्वाला दिवस गेले आणि किंचित प्रौढतेकडे झुकलेल्या धानव्वाच्या चेहऱ्यावर एक नवी कांति दिसू लागली. शांतव्वा तर या बातमीने इतका सुखावून गेला की, आपल्या मागावर काम करायचें सोडून तो धानव्वाच्या मागें मागें करूं लागला. मोठ्या प्रेमानें पुन्हा एकदा तो तिला न्याहाळू लागला. खरोखरच कळलेली बातमी खरी आहे की नाही याची खात्री करून घेऊं लागला. वारवार तिच्या पोटाला हात लावून बाळाचे अवयव अंदाजू लागला. सहाव्या सातव्या महिन्यात बाळाची पोटात हालचाल होत असलेली पाहून आनंदाने नाचूं लागला. धानव्वाला कुठें ठेऊं नि कुठें नको असें त्याला झाले.

धानव्वाची ओटी भरण्याकरतां चोळखण घेऊन दूरदूरचे नातेवाईक गर्दी करूं लागले. त्या निमित्तानें गावांतल्या बायका नवनवीन लुगडी नेसून तिच्याभोवतीं फेर धरून गाऊं, नाचू लागल्या. डोहाळ जेवणाची गमत घरात चैतन्य फुलवूं लागली आणि लाजत मुग्कत धानव्वा अंतर्यामी पराकोटीची संतुष्ट होत मंद पावलें टाकीत घरभर फिरूं लागली.

या प्रसंगाने तर शांतव्वाची स्थिति फारच चमत्कारिक झाली. मात्र सुतकी चेहरा करून कोपऱ्यात बसावयाचें तिने टाकून दिले आणि इतराच्या उत्साहाने तीहि आपल्या सवतीचें कौतुक करूं लागली. तिची थट्टामस्करी करूं लागली. तिला चांगलें–चुगलें करून खाऊं घालू लागली, तिची जपणूक करू लागली. आपल्या घराण्याचा दिवा जन्माला येत आहे म्हणून आपले स्वत:चें दु:ख विसरून ही बाई मोठ्या निस्वार्थ आनंदात रममाण झाली आहे.

धानव्वाला मुलगा झाला आणि शांतलिंगाच्या घरीं उत्साहाला उधाण भरती आली. शांतलिंगानं त्या दिवशी सगळ्या गावाला पेढे वाटले. बारशाला सारा गाव लोटला.

त्यानंतर धाकटा शंकर घरी रांगू लागला, चालूं लागला, शाळेंत जाऊं लागला. आणि शांतव्वानं धानव्वा इतक्याच ममतेन त्याला जवळ केल, त्याला खाऊमाखू घातलं.

शंकर तर पुढेंपुढें धानव्वापेक्षा शांतव्वाकडेच अधिक असायचा. पाहाणाऱ्याला वाटावं की, तो शांतव्वाचाच आहे. तिनेच त्याला खाऊमाखू घालावें, त्याचे खूप लाड करावेत. त्याला फिरवून आणावें व पटापट मुके घ्यावेत.

शंकर पंधरा वर्षांचा झाला तेव्हां शांतलिंगान मोठ्या थाटामाटानें त्याचें लग्न करून दिलें. घरी धाकटी पारव्वा आली. आणि हळूहळू संसारात ती रममाण झाली. शंकरनेहि वडिलांचा धंदा हळूहळू शिकून घेतला, आणि लौकरच पैशाअडक्याचे सारे व्यवहार तो दक्षतेनें पाहू लागला.

आणि अचानक एके दिवशीं शांतलिंगा मोठ्या समाधानानें हें जग सोडून गेला.

जाताना त्यानें आपल्या सुनेला व मुलाला जवळ बोलाविले आणि दोन्ही म्हातान्याची नीट क ळजी घेण्यास सांगितले.

खराखर त्यांना तस कांहीं सांगण्याची जरुरी नव्हती. शकरची आपल्या दोन्ही आयांवर अपार ममता होती. पारूदेखील आपल्या सास्वाचा बोज राखणारी, त्याच्या सेवेत धन्यता मानणारी होती. ही आपली सख्खी आणि ही आपली सवत सासू हा विकल्प तिच्या मनाला चुकूनहि शिवला नाही.

परतु शातलिगच्या मृत्यूनतर दोन्ही म्हाता-ऱ्यानी संसारातले आपले लक्ष काढून घेतलें. घराच्या अगणात सुताचे धागे जुळविणे किंवा कोपऱ्यात कुठेंतरी सूत गुडाळीत बसणें या खेरीज बाकीची कामे त्यानी सोडून दिली. सुनेन बोलाविले की, दोन वेळा घगाळ भरून चहा व जेवण झाले की, त्या आपल्या पड-वीतल्या खोलीत येऊन दिवसभर बसत. दोघीचे कार्यक्रम ठरलेले असत. फक्त पेरणी कापणीच्या दिवसात कापूस वेचण्यासाठीं शेतावर जावें लागें, तेवढाच काय तो कार्य-क्रमात फरक.

नातवाला माडीवर घेऊन एके दिवशी शातव्वा बसली होती. सध्याकाळची वेळ होती घरी दुसर कोणी नव्हतं. धानव्वा नात-वाला तऱ्हेतऱ्हेचे आवाज काढून हसवीत होती. आणि तिचा नातू शातव्वाच्या माडीवर बसून हवेत हातवारे करीत होता.

सहज धानव्वाच्या मनांत आपल्याला मूल होत नव्हत त्या काळांतल्या आठवणी जाग्या झाल्या. खरोखरच मूल होण्यासाठी आपण किती प्रकार केले हे आठवून तिच्या अगावर कांटा उभा राहिला.

"शातव्वा, किती विचित्र दिवस होते ग ते !"

"कुठले ग, कसले दिवस आठवू लागले तुला ?"

"अग, आपल्याला मूल होत नव्हत आणि हज्जार प्रकार करीत होतों."

"बाई, नशिबात असलेलं कधी चुकतं का? सगळे भोग भोगले पाहिजेत."

"नाही, पण मी म्हणते ते स्वामी त्यावेळी आले नसते तर आपलं घर अस भरल असतं का ? आपल्या नवऱ्यानतर भुतासारख आपण दोघीच या घरांत वावरलो असतो काय ? त्या कल्पनेनेच धानव्वाच्या अगावर शहारे आले होतें. ती तशीच उत्साहात बोलत राहिली, मध्येंच शातव्वा म्हणाली,

"धानव्वा, खरंच त्या स्वामीची बरं ही सगळी पुण्याई. बिचारा आता कुठ हिंडत असेल कुणास ठाऊक ! तो जर या गावीं आला नसता तर खरच तू म्हणतेस तस डुकरासारख आपल्याला राहाव लागलं असत."

"शातव्वा, अग माझ्या सवते, त्यानतर तो पुन्हा कधी या गावात आलाच नव्हता काय ग ?"

"मला तर बाई आठवत नाही. पण आठ वर्षांपूर्वी मी माहेरी गेले होतें त्यावेळीं त्या गावात तो मला दिसला."

"काय आठ वर्षांपूर्वी दिसला आणि तूं मला अजूनपर्यंत कधी एकदाहि बोलली नाहीस ती ?"

"अग, राहिल झाल विसरून. पण समज बोलले असते तर तू काय केल असतस ?"

"काही केल असतं अस नाहीं ग. पण मला पुन्हा एकदां त्याला डोळे भरून पाहावस वाटत. त्याच्या पायावर डोक टेकून 'बाबा रे, ही सगळी तुझी पुण्याई' म्हणून त्याच्या पायावर पोरं घालाविशी वाटतात कु ं असेल तो पुण्यात्मा कुणाला ठाऊक !" आढयाकडे पाहात एक दीर्घ सुस्कारा टाकून धानव्वा बोलत होती.

"धानव्वा, त्याच कसलं एवढ घेऊन बस-लीस ? हिंडत असेल कुठंतरी भिक्षा मागत."

'ते खर ग, पण तू मला साग. तुला भेट-ल्यानंतर तू त्याच्या पाया पडलीस की नाही? त्या सत्पुरुषाला तू पुन्हा पाहिलस, खरोखर किती पुण्यवान ग बाई माझी सवत तू!"

"धानव्वा, कसल पुण्य आणि काय घेऊन बसलीस तू ! मी त्याला लाबूनच पाहिला, थोडेसे वय झाले होतें, परतु चेहरा अजून पूर्वीसारखाच तेजस्वी होता. डोळे झाकून तो देवळाच्या पारावर बसला होता आणि मी तेथें गेलें. डोळे भरून त्याला पाहून घेतलें. त्याचे गोळे, नाक सगळ सगळं नीट पाहून घेतल आणि डोळ्यासमोर धाकटा शकर दिसू लागला. आपल्या शकरला पाहिलं की, सारखी त्या स्वामीची आठवण येते बघ."

स्वामीच्या कृपेन झालेला शकर स्वामी-सारखाच दिसतो या कल्पनेन धानव्वाला अपार आनद झाला. मूल होण्याच्या साऱ्या आशा सपुष्टात आल्यानतर त्या महापुरुषाच्या आशीर्वादाने शकर झाला. त्या महापुरुषाच्या रूपानें आपल्याला श्री शैल मल्लिकार्जुनच भेटला याची तिला मनोमन खात्री होती.

त्या स्वामीचें चित्र डोळ्यासमोर आणण्यात ती दंग होती. इतक्यात शातव्वा म्हणाली, 'धानव्वा, त्या स्वामीची भेट झाल्यानंतर तुझ्यासारखंच रात्रभर मी जागीं होतें. सारखी तळमळत होते सारख मनाला प्रश्न विचारीत होते की, स्वामीचे ते शब्द खरे होतील का ? मला त्या शब्दाची मुळीच मातबरी नव्हती. परतु हळव झालेलं मन उगीचच त्या अशक्य आशेच्या काडीला धरून तरगत होत. तुझ्या बाबतीत त्या स्वामीचे शब्द खरे ठरले. पण..." पुढें तिला बोलविलं नाही. तिनें एक दिर्घ निश्वास टाकला आणि एक प्रकारची आर्तता तिच्या डोळ्यात तरगू लागली

"होय ग माझ्या सवते, असं झाल खरं ! स्वामीच्या आशीर्वादान माझी कूस उसळली आणि तू मात्र तशीच राहिलीस. मला खूप खूप वाटायच की, लवकरच तुझीहि कूस उज-ळेल परतु तस घडल नाही. आपल पुण्य अपुर पडल !"

"हा ऽ तेहि खरच म्हणा ! माझ्या नशिबा-तच मूल नव्हत त्याला स्वामी काय करणार !" शांतव्वा दुखावलेल्या स्वरात बोलली.

"शांतव्वा, तुझ दु:ख मला कळत का नाही? खरोखर, तुझ्याहि पोटीं शातलिंगाचा वशज जन्मला असता तर मला किती आनद झाला असता म्हणून सागू ? बाई, तें दु:ख आजपर्यंत मी उरी जतन केले आहे, त्याचा उच्चार मुद्दाम केला नाही. वाटल, त्या दु खात माझ्या सवतीच उर फाटेल. आता तूच साग की, माझ्या पोटी शांतलिगाचा वशज जन्मला म्हणून मला कधी गर्व झाला का ? माझाच मुलगा म्हणून मी कधी तुझा पाणउतारा केला का ? या घरात सूनबाईन कधी तुला त्याची जाणीव दिली का ?

"नको ग धानव्वा, असं नको बोलूस ? तुझ्यासारखी माय-ममतेची सवत भेटली म्हणून इतकी वर्षं मी जगले. नाहीतर केव्हाच विहिरीत हा जीव लोटून दिला असता."

"मग माझ्या बाई, या तिन्ही सांजच्या वेळीं अशी उदास होऊ नकोस आपण दोघी जोंपर्यंत आहोत तोंपर्यंत हे दु ख मुळांतून उपटून काढू आणि सुखाने राहू !"

"धानव्वा, मी नाही का म्हणतें. परतु आप-ल्याला मूल झाल नाही ही गोष्ट कधीतरी मनांतून जाईल का ? सारख वाटतं राहात की, या शांतलिंगाच्या घरी पाऊल टाकल म्हणून बस्वेश्वरानं ही शिक्षा आपल्याला

दिली का ? शांतलिंगा पुरुष असता तर ... " बोलतां बोलतां तिला खोकल्याची मोठी ढास आली.

" शातव्वा, असं बोलूं नये. किती झाल तरी तोच आपला आधार. तोच आपला परमेश्वर ! "

" तूं काहीहि म्हण धानव्वा, शातलिंग-बद्दल तू सांगतेस तशी भावना माझ्या मनातून केव्हाच आली. त्यानतर केव्हांच त्याच्याकडे त्या भावनेंतून पाहूं शकलें नाही मी. बाई, त्या दिवशीं रात्री तूहि माझ्यासारखीच तळमळत पडली होतीस मी झोपेचं सोंग केलं होत तरी रात्रभर मी जागी होतें. दिवस उजाडण्यापूर्वीच तूं उठलीस आणि अधारातून तरातरा देवळाकडे चालत गेलीस आणि मी भित्री भागुबाई ते धाडस करूं शकलें नाही. बाई,तुझ धाडस तुला पावल. तू आई झालीस. तुझ्या रक्ताचा गोळा या घराचा मालक झाला आणि मी मात्र रडकी-मुडकी या घराला खायला काळ होऊन बसले. "

' शातव्वा, शातव्वा " धानव्वा आवेगानें उठली आणि तिनें शातव्वाच्या तोंडावर हात ठेवला.

" काय झालं सासूबाई ! " धानव्वाचा मोठा आवाज ऐकून बाहेरून पारव्वा धांवतच आली.

" काही नाही ग ! " धानव्वा बोलून गेली. समोरच्या ताव्यातील पाणी घटाघटा पिऊन शातव्वा डोळे मिटून कोपऱ्यांत भिंतीला टेकून बसली. तिचा चेहेरा दमलेला, उदास, भयानक दिसत होता. सुनेला स्वयंपाकपाण्यात मदत करण्यासाठी धानव्वा उठून गेली.

रात्री आपल्या खोलींत धानव्वा आली तेव्हां तिच्या अगोदरच शातव्वा तोंडावर गोधडी घेऊन गाढ झोपी गेली होती. तिच्या शेजारीं लवंडून धानव्वानें पायावर गोधडी घेतली आणि शेजारची चिमणी विझवून अधारात डोळे उघडे ठेऊन ती विचार करूं लागली.

गलीं चाळीस वर्षे शांतव्वानं जी एक भावना मनात बाळगिली होती त्याची कल्पना येऊन ती कामावीस झाली. किती विद्रुप कल्पना शातव्वान आपल्या उरीं बाळगली होती. शातव्वाच्या दृष्टिकोनातून धानव्वा व्यभिचारी होती. केवळ पोटीं पोर यावं म्हणून दुसऱ्याची शेज जवळ करणारी होती.

" व्यभिचार ! " त्या कल्पनेनेंच ती घाबरी झाली. एखाद्या भयानक समंधानें चारी बाजूनीं आवळून गळा दाबावा त्याप्रमाणें ती कल्पना तिला भेवडावूं लागली. खरोखर केवळ पोटीं पुत्र व्हावा म्हणून धानव्वानें व्यभिचार केला होता का ?

धानव्वाला तो दिवस आठवला. देवळांत शांतव्वाबरोबर ती गेली. त्यावेळी त्या सत्पुरुषानें 'तुमच्या इच्छा पूर्ण होतील बाई' म्हणून आशीर्वाद दिला होता. अनेक मंत्रतत्र करून पोळलेल्या तिच्या अंत:करणांत त्यांच्या आशीर्वादानें आशेचा कोंभ फुटला होता तरी त्या आशीर्वादामागील व्यर्थता तिच्या मनाला सारखं विषण्ण करीत होती

खरंच आपली इच्छा पूर्ण होईल का ? या प्रमाणें संबध रात्रभर तिला भंडावलें होतें. रात्रभर डोळघाला डोळा लागला नव्हता. पहांटेच्या सुमारास तिला वाटलें, असेंच उठावें, त्या सत्पुरुषाला विचारावें कीं, तू सांगितलस तें खरंच घडून येईल कां ? खरंच माझी कूस सत्य होईल का ? खरंच माझं भाग्य उदयाला येईल का ?

" खरंच खरंच. अगदीं खरं ऽ ऽ असं घडेल का हो ? " आणि तिला अनिवार इच्छा झाली कीं, ह्या अंधारांत देवळाच्या आवारांत झोंपलेल्या त्या सत्पुरुषाला उठवावें. गदगदां हालवून उठवावें आणि त्याचे पाय घट्ट धरून त्याला मोठ्या निर्धारानं प्रश्न विचारावा. म्हणावं, " बाबारे, तुझ्यामध्यें कांहीं दैवी सामर्थ्य असेल तर खरंच सांग असं कांहीं घडणार आहे कां ? मी आई होणार हें भविष्यात लिहिलें आहे कां ? भारावलेले स्तन लुचूलुचु पिणारं लालचुटूक बाळ माझ्या हाडामांसांतून उगवणार आहे काय ? "

" आणि तसं नसेल तर आतांच सांग. देवळासमोरच्या विहिरीत उद्यां उन पडेपर्यंत एक दुबळं मानवी शरीर तरंगत राहील. त्यापेक्षां त्या शरीरानं जगण्याची धडपड करण्यांत काहीं अर्थ नाहीं."

विचारानं मस्तक भणभणूं लागलं तशी ती ताडकन् उठून आणि अंगावरची गोधडी दूर सारून हळूच दरवाजा उघडून देवळाकडे तरातरा चालू लागली. रस्त्यावर चिटपाखरूं नव्हतं. आणि भयानक काळोखामुळं डोळघात बोट घातलं तरी दिसण्याची मारामार होती.

देवळापर्यंत ती तरातरा चालत आली आणि देऊळ जवळ आल्यानंतर मात्र तिचे पाय लटपटू लागले. देवळात शिरण्याचा धीर होईना. मनांत विचार आला.—

त्या सत्पुरुषाला आपण अशा रात्रीं बेरात्रीं आल्याचें पाहून काय वाटेल ? तुच्छतेनें तो डोळे लाल करून पाहिल किंवा डोळेच गपकन झाकून घेईल ' क्षणभरच ती देवळासमोर रेंगाळली आणि दुसऱ्याच क्षणी मनाचा हिय्या करून ती तीरासारखी आत घुसली. मंदिराच्या गाभाऱ्यात मद दिवा जळत होता. आणि शकरलिंगेश्वराची भव्य पिंडी त्या सौम्य प्रकाशात चकाकत होती.

तिनें चहूबाजूला नजर टाकली, तेव्हा देवळांत कोणीच नसल्याचें तिच्या लक्षात आले. आपल्या पायातलें सारें बळच नाहीसें झालें असल्याची तिला जाणीव झाली. तिनें शकरलिंगाकडे एक नजर टाकली तेव्हा तिला धीर आला आणि आवेगाच्या भरात आपण काय करून बसलों याची कल्पना येताच तिला एकदम रडूच कोसळले अश्रु आवरतां आवरतां तिचा मनांतील पाल चुकचुकली,

' बाई, झालं तें झाल. आता मुलाण्याचा कोंबडा आरवण्याच्या आंत आपल्या अंथरुणांत जाऊन पड. "

धानव्वा आली तशीच धांवत परत फिरली. दरवाजा हळूच उघडून ती अंथरुणांत शिरली आणि थोड्याच वेळात मुलाण्याचा कोंबडा आरवला....

डोळे उघडे ठेऊन धानव्वा विचार करीत होती,तेव्हां तो प्रसग जणू आतां घडत असल्यासारखा तिच्या डोळ्यासमोरून सरकून गेला.

ती तशीच अथरुणात उठून बसली. जोरजोरानं हलवाव आणि शातव्वाला तो प्रसंग ओरडून सांगावा अस तिला झालं. असल्या अधारात शंकरलिंगाच्या पिंडीवर हात ठेवून आपण पवित्र आहोंत म्हणून शपथ घ्यावी. शातव्वाच्या मनांतील किल्मिष धुवून टाकाव असे तिला वाटूं लागलें.

" शातव्वा ह्या घराण्याचा वंशज शांतलिंगाच्या पोटचा आहे. शंकर सातलिंगाप्पाबसण्णावर हें नाव सांगणारा माझा मुलगा खास बसण्णावर घराण्याच्या वशज आहे. माझ्या गळ्याची शपथ. शकरलिंगाची शपथ की, तो बसण्णावर वंशाचा दिवा आहे. तुझ्या मनात असली चमत्कारिक कल्पना आलीच कसली ? शातव्वा, तुझी सवत गरती आहे ग, पतिव्रता आहे ग. तिच्याबद्दल गेली चाळीस वर्षें किती भयंकर कल्पना तूं उरीं बाळगली आहेस ? शांतव्वा ! ही धानव्वा पापी आहे या नजरेन तू माझ्याकडे गेलीं चाळीस वर्षें पाहात आलीस, परंतु ह्या जगातील सगळ्या

(पृष्ठ ६४ वर पहा)

## टायगर....... वि. ग. कानिटकर ( पृष्ठ ४९ वरून )

यस् सर ! तुम्ही कधी येणार...? आठ तारखेला सकाळीं...यस् सर...यस् सर...यस् सर...यस् सर...त्या डी. ओ. चें रिप्लाय पाठवलय् परवांच.. यस् सर...यस् सर..."

" जगदाळे...तुम्ही सकाळीं ही रिझर्वेशन्स बघा...साग मिनिस्टरचा फोन आला होता!"

" फोन मिनिस्टरांचा होता...?"

" नाही हो...पण सांगायला काय जातय, रिझर्वेशन्सना अडचण नाही...आणि हे पहा तो डी. ओ. चा रिप्लाय गेला आहे हें एकदा व्हेरीफाय करा. मी सागितलय् गेला. रिप्लाय नसला गेला तर सी टू इट...!"

आम्हीं कुसुमला नोकरी दिली. बाप गेला तेव्हा दिलेले पैसे बुडाले याबद्दलचा कधी उच्चार केला नाही. आमच्याविषयीं तिला भारी आदर वाटायचा. आमच्या उपकाराचा ओझ्याखाली ती इतकीं वाकली, इतकी वाकली की आम्ही एक दिवशी तिला ऑफिसात सध्याकाळीं थाबवून तिला जवळ ओढली तेव्हा ती खुळ्यासारखी रडायला लागली. मग आम्हाला त्यावेळी कांहीं बोलताहि येईना. रडत रडत पुन: पुन: म्हणाली, ' तुम्ही अस करायला नको होत...तुम्ही असं करायला नको होतं..."

आम्हांलादेखील तिचें हें म्हणणें पटत होते. पण वळत नव्हतं. ती आमच्यापासून लाब जाऊं लागली तेव्हा आम्हीहि इरेला पडलों. पुढें वाटूं लागल की, सुरुवातीचं तिच वागणं सगळ नाटक होतं. नाहींतर आम्हीं केलेल्या पुढल्या सगळ्या गोष्टी तिनें तक्रारीशिवाय मान्यच कशा केल्या...?

याच कुसुमपायी पुढें आम्हांला त्या एम्. बी. बी. एस्. फेल् हजाम डॉक्टरकडे जाव लागल. त्याची बायको क्वालिफाईड होती. आणि हा नुसतां अॅबॉर्शन्स करी ! पण याची एक केसच चारशें पाचशेंची. दवाखान्यांत बायको मात्र सहा आण्याच्या बाटल्या भरत असे. ते सगळच हॉरिबल होत. आम्हीं आधी जाऊन त्याला भेटलों. त्याच्या तोंडातून एक शब्द निघायचा म्हणजे कर्मकठींण. बाकी एक बर झालं. त्यानें फालतू प्रश्न विचारलेच नाहीत. आम्हीहि फारसा खुलासा केला नाही. टकलावरून हात फिरवीत आमच्या डोक्यावरून खिडकीबाहेर पहात तो आमच्याशीं बोलत होता.

चार दिवसांनी सध्याकाळी आम्ही कुसुमला त्याच्याकडे नेली, काही दिवसात तिनें रडून रडून आकात केला होता. माझ्याशी धडपणे अक्षरहि बोलली नव्हती. आम्हीहि ओशाळलेले होतों मला वाटल, डॉक्टराच्या त्या खाटिकखान्यांत ही काही तमाशा करते काय ? दुसऱ्या दिवशी त्याने पैसे घेऊन बोलावले. आम्ही त्याला वर पन्नास रुपये दिले.

त्यानतर आमच्या तिच्या संबंधातले रंगच उडाले. तिला मी डोळ्यापुढें नकोसा झालों. तसा तिनें कधी आमचा अपमान केला नाहीं. पण अपमान डोळ्यानीं करता येतो...न बोलता करतां येतो...मर्मी एखादा शब्द फेंकून करता येतो. आम्हाला पण राग आला मग कटाळून आम्ही तिच्या मॅरेजची खटपट केली. आम्हीं आमच्या हातानीं लग्नापूर्वी तिच्या हातात दोन दोन तोळ्याच्या बागड्या घातल्या.

ट्रींग ऽ ऽ...

"अरे,हे कागद उचल. डिस्पॅचला टाक..."

"येस् मिस् कुलकर्णी...?"

"आमच्याकडे उद्यां सत्यनारायण आहे... तुम्हाला बोलवायला सागितलय् वडिलानीं..."

"किती वाजतां..."

"ऑफिस सुटल्यावर या. उशिरा आलात तरी चालेल...पण यायला हव सर..."

"नक्की येतो–"

"आमचा पत्ता माहीत आहे सर...लिहून देते..."

"लिहून कशाला...ऑफिस सुटल्यावर तुम्हीच चला कारमधून...वुईल ड्रट् डू..."

"हू..."

आम्हाला अस कुणी बोलावलं की नाहीं म्हणताच येत नाही. सत्यनारायण वगैरे असला तर आम्ही इनव्हेरिअॅबली जातो. आमचा स्वत:चा देवावर विश्वास आहे आम्ही स्वत: देवळांतदेखील जातो पुष्कळ वेळां. मनाला शांति रहाते.

मधाशी त्या टू-ट्रेडर्सच्या माणसानी आम्ही चेकहॅंड केला नसता तर कुसुमची आठवणदेखील आज झाली नसती. पण एकदा झाली की फार अस्वस्थ होतो. आम्हाला आमची बायको अशी कधीच करीत नाही. कुसुम करते. तिला आता दोन मुल आहेत. तिचा नवरा आला की आम्हाला भेटून जातो.

आमच प्रत्येक धोरणच अस असत की आमच कुणी काही करू शकत नाही. ढुगणाखालीं अधिकार असला की कसं चौफेर धोरण सुचतं, आम्हाला पैसा आवडतो पण त्यापेक्षा नवी स्त्री जास्त आवडते म्हणूनच जेव्हा चद्राबाई भेटली, कुसुम भेटली तेव्हा पैशाकडे आम्ही पाहिल नाही. जेव्हा आमच्या आयुष्यात बायकोखेरीज कुणी नसतं. तेव्हा फक्त आम्ही पैशावर प्रेम करतो.

आमच दु:ख फक्त एकच आहे आमच्या बायकोला आमची किंमत नाही. तिला माझी मोटार हवी. बगला हवा. नोकरचाकर हवे. पण आमच्याशी धड बोली नाही. आम्हीं घरी पाऊल टाकल की फक्त टायगर अगावर उड्या मारून मारून आमचा जीव हैराण करतो. सारखा पायापायांत फिरतो. आणि आम्हीं व्हराड्यात खुर्ची टाकली की पुढच्या पायात मान खुपसून जवळ बसून रहातो. झोंपतानादेखील टायगरचा चेहेरा आम्हाला समोर लागतो. म्हणून त्याचा फोटोच आम्हीं आमच्या झोंपण्याच्या खोलीत टांगला आहे

●●●

विद्यार्थ्यांस व अभ्यासकांस अत्यंत उपयुक्त

**दर्शन ज्ञानेश्वरी**

संयोजक : वि. ग. कानिटकर

प्रस्तावना : ग. वि केतकर

मूल्य रुपये चार

प्रमुख विक्रेते

**इनामदार बंधू प्रकाशन**

९९१ सदाशिव पेठ, पुणे २.



लहानपणापासून मी असा अनवाणी चाललों आहे. लहानपण माझें अगदीं गरीबींत गेलें. एका अगदीं आडखेड्यांत आमचं घर आहे--घर आहे, असं आपलं उगाच म्हणतों. घर आतां उभं आहे कीं नाहीं, याचा मला खात्री देता येत नाहीं. आणि घर उभं असलं, नांदतं असलं, आंत चार माणसं वावरत असलीं--आल्या-गेल्याला समोरचं दार उघडं दिसत असलं, तरी तें घर आतां माझं नाहीं. त्या वास्तूला माझी आठवण असेल, असंसुद्धां माझ्यानं म्हणवत नाहीं. त्या घराचा नि माझा ऋणानुबंध कधींचा तुटला आहे--वारसा असूनहि त्या घराचा आतां मी कोणीच नाहीं...

--माझ्या लहानपणीं आमच्या घरांत बरींच माणसं होतीं. केसूकाका मला आठवतो ; तो नक्की कोणाचा कोण होता मला किंवा कोणालाच माहीत नाहीं. लग्नकार्यं झाल्या शिवाय त्याचा जन्म इथेंच जात होता. बाया आत्ते आठवते--तीसुद्धा अशीच. पाठीला पोंक आलेलं. लाल आलवणांतल्या त्या बाईला मग पदराची शुद्धच नव्हती. दिवसभर " रामा " म्हणुन देवाला हांका मारी. तिचा पिवळा एक दांत, आणि पांढरे फिके डोळे--चिरल्यासारखा आवाज--ऐकला, कीं कानाला तडे पडावे--असा --तिचा केव्हां तरी वेड लागलेला मुलगा आमच्या घरीं येई. महिना-दोन महिने राही, आणि चिंध्या भरलेली फाटकी पिशवी कांखेला लावून चालायला लागे. केव्हांतरी तो पावसाच्या दिवसांत भटकत असतांना एका मोठ्या वहाळांत वहावला. हें जेव्हां बाया आत्तेला कळलें, तेव्हां तिनें सारें घर हालवून सोडलें--

घरांत माणसें पुष्कळ होतीं, पण घराला अवकळा भरल्यासारखें वाटायचें, गुरांचा गोठा, आणि आमचें घर, यांत कांहीं फरक आहेसा वाटत नव्हता. तशीच ओल, तशीच घाण, आणि तसेच दिवसभर खाऊन रवंथ करणारीं माणसें--

--माझ्या वडिलांची मला आठवण नाहीं. त्यांचा पुसटसा चेहेराहि माझ्या डोळ्यांपुढें येत नाहीं. कुठेंतरी जंगलखात्यांत ते नोकरीला होते--पाठोपाठचीं आम्ही चार भावंडें. वडिल वारले आणि आमच्या हालांना सुरुवात झाली...मला तेव्हां सातवें-आठवें वर्ष होतें--मी नेहमीं गुरांकडे असायचा. त्यांचा राखणा मीच. घराजवळची पाणंद चढलें, कीं, कातळ--मध्यें खाचरांत गवत, आणि अस्ताव्यस्त पडलेले आकारहीन दगड. हिरवें रान शोधीत शोधीत गुरें खूप दूर जायचीं. पळायचीं, आणि मागून अनवाणी पायांनीं मी चालायचा. पुढच्या तळव्यांत कांटा मोडला, किंवा कातळाचे करप लागले, कीं कोण त्रेधा उडायची--आईवर चुलत चुलत्यानें भलभलते आरोप केले--आणि एक दिवस तिन्हीं सांजेची आई आम्हांला घेऊन बाहेर पडली. फिकें चांदणें पडलें होतें...आणि आम्हीं अनवाणी चालत होतों. आई कांहीं बोलत नव्हती. रडत होती. लहानग्या माधवला तिनें कडेवर लोंबकळतें घेतलें होतें, आणि यमूचा हात धरून फरफटल्यासारखी तिला ओढत होती. मी मागून चाललों होतों--आम्हीं आजोळीं पोचलों, तेव्हां मध्यरात्र टळून गेली होती. मामानें आमचें स्वागत नुसत्या जड श्वासानें केलें. आई सांगे, आमचे बाबा मिळवते होते,

# आठवण

श्रीपाद काळे

तेव्हां हजार वस्तूनी हें घर भरत होते...पण मामाचा इलाज नव्हता. त्याच्याच घरांतली आठ-दहा माणसें घराखालचें परसू कसून पोट भरताना त्याच्या तोंडातून फेस यायची वेळ येत होती. वरखर्चाला तो भिक्षुकी करी. त्याला काही येत नव्हतें—पण वेळी पोटासाठी खोटया माना हालवी.

—शेवटी महिन्या दोन–महिन्यानी मामाने आईची सोय इथें लावली. इथे थोरामोठ्यांकडे कामें मिळाली होती. निदान त्या निमिताने आमचे शिक्षण सुरू झाले—

—माझे वार लावलेले होते—मिळेल त्याच्याकडे वार. एक वार तर दीड मैल लांबचा होता...वाट कटाळवाणी होती—दुपारी शाळा सुटली, की भर उन्हातून चालत इतक्या लांब जायचें–यायचे जिवावर यायचे. रस्ता तर वाफा निघतील असा तापलेला असायचा. उघडे पाय नुसते पोळून निघायचे. —आई माझी नेहमीच म्हणायची, बाळ माझा लहानपणापासूनच समजस आहे. शहाणा आहे—त्याला सारे समजते—

—आणि कोणाला आपणहून दुखवायचें माझ्या स्वभावात नाहीच. मीच माझी चूक म्हणून स्वस्थ रहातों, मला पहिल्यापासूनच वाटते, कोणतेच माणूस वाईट नाही. परिस्थितीने माणूस वाईट वागतो—मी आपण होऊन कधी 'भूक' म्हटली नाही...दुःख मनात ठेवायची मला पहिल्यापासूनच सवय... मराठी सातवीत असतांना मी पहिली कविता लिहिली...

• •

—लिहायचा छंद माझा तेव्हापासून वाढत गेला. मॅट्रिक होईपर्यंत मला हे असे अनवाणी दिवस काढावे लागले...भावंडे मोठी होत होती. मला अभ्यास सभाळून इतर धंदे करावे लागत होते. आईच्यान पूर्वीसारखी मेहेनतीची कामे होत नव्हती. एखादा दिवस काम कमी–जास्त झालें की, रात्री तिचें अंग ठणकू लागे. केव्हा केव्हा अंगावरचे पांघरूण थरथरावे अशी थंडी वाजून ताप येई...मी अशाहि परिस्थितीत लिहित होतो. कविता लिहित होतो. कधीं एखादी कथा लिहित होतो. लिहून झालें, की मन मोकळें झाल्यासारखें वाटायचें. दुःखाला तोंड फुटल्यासारखें वाटायचे. थबकून राहिलेलें पाणी मोकळें झाल्यासारखें वाटायचें. नुकती प्रसिद्धि मिळू लागली होती. केव्हा कुठें कोपऱ्यांत जागा मिळायला लागली होती—माझा हा नाद आईला माहीत झाला होता. तिला धन्यधन्य वाटायचें—मला म्हणायची, अशा गुणी मुलाने चांगल्या ठिकाणी जन्म घ्यावा. तिथें त्याच्या आयुष्याचे सोने होतें—इथें मुळातले सोनें असले, तरी माती व्हायची.

मॅट्रिक पास झालो आणि पुढें शिकण्याचा हव्यास मी धरला नाहीं. मी शिकलों असतों, सारे माझ्या अंगवळणी पडलें होतें—उन्हातून वाफा निघणारा धुळीच्या रस्त्यातून चालायला आतां काही वाटत नव्हतें. कधीतरी आवरणाच्या पायाने मला चालायला मिळेल, अशी आशा कोपरा धरून होती. परमेश्वर आयुष्यात म्हणे कधीतरी चांगले दिवस दाखवतो. चांगल्या मनाच्या माणसाचें केव्हाहि म्हणतात चांगलेंच होते—सत्याचाच शेवटी जय असतो—वगैरे...

—मला नोकरी लागली. सुभाषितें कितीहि रसाळ असलीं तरी मला फार वाट न बघता नोकरी लागेल असें मला वाटलें नव्हतें—कारण लहानपणापासून मला तसा अनुभव होता– राख होणें किंवा सोनें होणें हें हातावर अवलंबून असतें—

—मला नोकरी लागली माझा लेखनाचा व्यासंग वाढत गेला. लोकांच्या कानावर माझें नांव दोन-तीन महिन्यानी येऊ लागलें—केव्हा पाच दहा रुपये म. ऑ. नें येऊ लागले. पाठची भावडे एकेक मार्गाला लागलीं. सुभाषितातला थेंब माझ्या वांट्याला येतोसा वाटू लागला. माझ्याकडे कोणी आलें, किंवा आई कथा पुराणाला देवळात गेली, की ओळखीच्या, आणि परकी बायकाना माझें कौतुक ऐकवू लागली. पण हें करता करतां ती फार दिवस जगली नाही...नुकतें मला वाटू लागलें होतें, मला आता उन्ह्या उन्हातून चालायला लागायचे नाही माझ्यावर सावली, नि वारा आहे– अखेर सावली धरणारे झाड आपोआप उमळून पडले—

—त्याच वर्षी माझें लग्न झालें. मला मुली सागून येत होत्या...मी दोन–तीन पाहिल्या... मला त्या का कोण जाणे आवडल्या नाहीत–पण मी पेठ्याची मुलगी पाहिली. पेठें सरकारी नोकर होते—मी त्याना ओळखीत होतो— पण अशा मोठ्या माणसाकडे मी गेलो नव्हतो.. मुलगी मला सागून आली, तेव्हां मला कांहीसे आश्चर्यच वाटलें...पण ज्यांच्या मार्फत पेठे माझ्याकडे आले होते, त्यानी मला सांगितलें, "पेठ्याची तुमच्यावर मर्जी आहे. तुमचा सालसपणा, निर्व्यसनीपणा त्याना फार आवडला—"

पेठ्यांच्या घरीं मी गेलों. दरवाजातून जातांच मला परिटघडीच्या कपड्याची आठवण झाली. इथें सारे व्यवस्थित होतें—टिपीचे होते. कुठें एवढा केर नव्हता. टेबलावरच्या वस्तू जिथल्या तिथे होत्या...कलमदानातल्या पेन्सिलीला छान टोंक काढलेलें होतीं, वर बाशांतून एकहि कोळिष्टक लोंबकळत नव्हते.

—मी मुलगी बघितली. पेठ्याची मुलगी स्वरूपानें सुदर होती. स्वच्छ गोरी होती. कपाळ मोठें होते, आणि केंस काळेशार होते. चालताना पावलें मोजून टाकल्यासारखीं पडत होती. मी कांहीतरी प्रश्न विचारलें, आणि तिनें उत्तरे दिली. तिनें माझ्याकडे केव्हां पाहिलें, मला कळले नाही. आवळा गिळल्यासारखे ओठ धरून ती जमिनीकडे पहात होती.

मीं पसंती कळवली. लग्नाचा खर्च पेठ्यानीच केला, आणि हुंड्याचें म्हणून पांच तोळे सोनें दिले.

विमल माझ्या आयुष्यांत आली, आणि

मला वाटलें, माझ्या आयुष्याची रात्र आतां सरते आहे. आम्ही घरांतून अनवाणी बाहेर पडलों, तेव्हां अशी फिक्या चादण्याची रात्र होती... तेव्हांपासून हा वनवास सुरू झाला...आता ती रात्र सरते आहे-- पहांटेचा हळवा, गार वारा सुटला आहे. कुठें-तरी असख्य कळचा फुलल्या आहेत, आणि माझ्या आयुष्याच्या सुखाच्या दिवसाच्या उगवण्याच्या वेळी गध दरवळतो आहे. या गंधित वातावरणावर मी एक सुरेख कविता लिहिली, आणि पहिल्या भेटीच्या वेळी विमलला मी ती वाचून दाखवू लागलों-पण विमलने हुं कां चू काहीच केले नाहीं...डोळे मिटून तिनें डोकीवरून पांघरूण घेतलें-थोड्या वेळानें मी पाघरूण दूर केले. तिला गदगदां 'हालवीत मीं विचारलें, " ऐकलीस कविता ? "

" हुं—"

" कळली तुला ? "

" मला त्यांतले काही कळत नाही. "

—तिनें मान फिरवली...मग केव्हा तरी ती बोलून गेली, माझ स्थळ तिला अजिबात पसत नव्हत...पण वडिलांच्या सांगण्याविरुद्ध तिला काही करतां आलं नाही.... तिन मला वैतागान विचारलं, " काय काय आहे तुमच्याकडे ? "

" माझ्याकडे प्रतिभा आहे. माझं नांव मराठी वाचकांना माहीत आहे—"

" शी : ! "

" तुला अभिमान वाटायला हवा—"

" कसला अभिमान ? या दोन खोल्यांचा ? कीं तुमच्या दीडशें रुपयांचा ? एक दागिना करता आला नाहीं—साड्याचं लुगडं घेतां आलं नाहीं—"

" थोडी वाट पहा--माझीं पुस्तकं निघतील—एखाद्या सिनेमात माझी पद्यें घेतलीं, गेलीं तर हवा तेवढा पैसा—"

" किती दिवस वाट पहायची ? "

— या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नव्हतें...मीं रंगवलेली पहांट ही ऐन मध्यान्ह आणणारी पहांट होती...या उन्हातून मला आता अनवाणी चालायच होतं.

सोसण हा माझ्या स्वभावाचा मुळीं स्थायीभाव आहे. पतिपत्नी या नात्यान विमल नि मी रहात होतो. परकी माणसाला हेंच नातं ठाऊक होत. विमल माझ्यावर अवलंबून होती. बापाच्या सागण्यावरून मनाविरुद्ध माझ्याशी जगणं तिन पत्करलं होत. ही जाणीव सतत मला टोंचीत होती. मनान वणवणत होतों. रखरखीत उन्हांतून अनवाणी चालत होतों—

आणि विमलला सुखी करण्याचा प्रयत्न करीत होतों. ती सुखी होत नव्हती. वाटेल तेव्हां माझ्यावर वैतागत होती माझ्या परिस्थितीला चिमटे घेत होती. स्वतः घायाळ होत होती—माझ्या मनःस्थितीची जाणीव तिला कधीच होत नव्हती.

—आणि दैवसुद्धां एखाद्या हत्येसारखं माझ्यामागें लागलं होतं. मी बरंच लिहल होतं. शभराच्या आसपास मी कविता लिहिल्या होत्या. पंचवीस-तीस कथा लिहिल्या होत्या. पण माझा कसलाच सग्रह प्रसिद्ध होत नव्हता. मान्यवर मासिकांत मला म्हणावं तस स्थान मिळत नव्हतं...आणि हेंहि खरं, लग्न झाल्यापासून हातांत पेन धरूं नयेसं वाटत होतं—काय लिहायच हेंच कळत नव्हतं मनांत कांहीहि ठेऊन लोकांना रिझवण्याएवढा पक्केपणा माझ्यापाशीं नव्हता काय असेल तें मनात कुढाव—

—लग्न झाल्यानंतर चार-पांच वर्षं ही अशीच काढली. विमलच्यात कांही फरक होत नव्हता. दिवस दिवस ती मोन्या मुकाट्यानें रहात होती. तिच्या गोऱ्या मुखावर हास्य मला कधीच उमगल नाही—विमलच्या अगांत कितीतरी गुण होते. तिचं प्रत्येक काम टिपीचें होते. खोलीच्या बाहेर लहानसे अंगण तिन स्वच्छ केलं होतं. खोलीत कुठें एवढा केर उरूं दिला नव्हता. टेबल नेहमी लावलेलं होत...मी कौतुक करीतच होतों—

—आणि एके दिवशीं आमच्या शेजारी नवं बिऱ्हाड आलं—एक शिक्षिका रहायला आली. तिची आई आणि दोन भावंड...माझं वास्तविक तिकडे लक्ष जायच नव्हे—एक दिवस सध्याकाळी असाच मी कामावरून आलों. चहा घेऊन मी कॉटवर पडलों होतों —पश्चिमेकडची खिडकी उघडी होती. पावसाला नुकतीच सुरुवात झाली होती. पश्चिमेकडून काळें ढग वर वर सरकत होते, आणि मावळत्या सूर्याची प्रसन्न किरणाची सोनेरी किनार ढगावर आली होती. वारा सुटला होता. आणि दुपारी पडून गेलेल्या पावसानें सारें धुवून मोकळें झाल्यासारखें वाटत होतें, पलिकडच्या घराजवळचा गुल्मोहोर अजून फुलतच होता, आणि पावसाच्या माऱ्याने वाकल्यासारखा झाला होता...इतक्यात एक तान माझ्या कानावर पडली. मी कॉटवरून उठलों—भारल्यासारखा बाहेर आलों. जवळच्या उंबऱ्यावरच्या पायठणीवर बसून नवी आलेली शिक्षिका गात होती. तिचा रेघ मारल्यासारखा सूर वर जात होता, आणि दंवबिंदू वेलीवरून खाली सरकत यावे, तसा खाली येत होता. मी तन्मयतेने पहात राहिलो—

—मग त्या शिक्षिकेला कळले--मी कविता करतो. माझें नाव तिला ठाऊक होतें. मला नवल वाटलें, माझ्या दोन कविता तिच्या वहीत उतरलेल्या होत्या—तिची माझी ओळख झाली...तिच्याकडे मोहून घेणारें रूप नव्हतें. काळासांवळा वर्ण, आणि काटकीसारखें शेलाटें अग—तिचें वय बरेच असावे, राबटपणा तिच्या देहावर आला होत--तिने खूप भोगले-सोसलें असावें-आणि तिचे डोळे छान होते--काळीशार बुबुळें चट्कन् भावदर्शी होत—

तिने माझ्या कवितेची वही मागून घेतली. मी घरी आलों, आणि ती घरी आली की, आदवीन आमच्या घरी येई— " गा " म्हटले, की सूर काढी. गातां गातां तन्मय होई.

—माझ कोदटलेलं मन हलक व्हायला लागल. क्लात झालेल्या माझ्या मनाला कुठेतरीं विसावा मिळू लागला—विमल घरी नसताना तिन मला विचारल, " तुमच्या मिसेस्ना तुमच कौतुक नाही का ?"

" तिला नाहीं तेवढीशी आवड—"

" वास्तविक केवढा अभिमान वाटायला हवा होता--" मीं उसासा सोडला—

—असे फार दिवस, गेले नाहीत. एक दिवस विमल मला म्हणाली, " तुम्ही त्या शिक्षिकेशी बोलतां, मी घरात नसताना. हें चांगल नाही—"

" हु—"

" तुम्ही तिच्याशी बोलता कामा नये—"

" बोललों, तर काय होईल ? "

" मी कपाळ आपटून घेईन—"

—दुसऱ्या दिवशी मी घरीं आलों. शेजारची शिक्षिका कसलीतरी सुटी असल्यामुळें घरी होती. माझ्या एका कवितेला ती चाल लावून दाखवणार होती—

विमलने दरवाजा लावून घेतला.

पावसाळा असूनहि गेले चार दिवस रणरणत ऊन पडत होतं—माझ्या आयुष्याचा, अणकुचीदार दगडाचा रस्ता पसरला होता—आणि तगमगणारं माझं मन अनवाणी चालत होतं—!

●●●




# खिडकी

## मुक्तकें

घ्यायलाच हवें या देहांना श्रेय
मनें जुळविण्याचेंच ना त्यांचें ध्येय ?
रंगायला निमित्त नभालाहि लागतें
भल्या पहाटेचे.
म्हणूनच तूं पांघर
या क्षितिजाचा होकार
प्रकाशानें येतील सारे बेढब आकार
तोंवर तरी पांघर तुझा तूंच होकार.

•

येऊं नये पण येते
भलभलती शंका
गाथेस लागलेल्या कसरींसारखी.
घालणार तर घालो झडप
ती नश्वरता...
कशाला करायची पर्वा
त्या सडक्या चिन्हांची ?
सुजूं दे मिठींतच हीं दोन्ही वादळें
पडूं दे किडे तोडूं दे हडे
नाहींच होणार आपण पारखं
शब्दांना झोंबलेल्या अर्थासारखं

•

अंधारास फसवलें होते ना
तुला मी अन् मला तूं ठरवून
की आपण फसलों
त्याला नकळत सत्य सांगून ?
अंधाराइतकें हें नभ नाहीं वेडें
प्रश्नाआधींच घावलें त्याला
बिनचूक उत्तर
वाऱ्यालाहि उमगलें
कोण्या फुलाचें कोणतें अत्तर.

—मधुकर केचे



आंखीव बंदिस्त खिडकी चौरस .
तींत अवकाश दिसतसे
नित्य व्यापांतून टेकून गजाला
लोटते दृष्टीला पलीकडे

सुस्थित रेलले गव्ळ्यांचे चौथरे
ठाकलेलीं घरें चिरेबंदी
ओलीं चिरगुटें धान्यें वाळणारीं
नेटक्या संसारीं नांदणारी

मुकाट बांबूंचा मुर्दाड पहारा
दावितो दरारा अवकाशाहि
त्यांच्यापलिकडे अवकाशा-अंतीं
दिसे निळावन्ती क्षितिजाची

थकली पापणी गालाला भिडतां
व्यापांची ही गर्ता बिचकते
मोजतां अतर भोवंडे नजर
तिला तो आधार खिडकीचा

—सरिता पदकी

# कविता



## कोडें

कधिं बनतों मी तुकाराम
अन रचित बसतों अभंग ओळी
कधिं स्वप्नांच्या विड्या फुंकूनीं
प्रेमवीर कधिं—कधिं मवाली

कधिं बनतों मी पार्थसारथी
जगास सांगत सुटतों गीता
कधिं बनतों मी राघव हळवा
जडाजडाला पुसतों सीता

कधिं बनतों सिद्धार्थ आणखी
निर्वाणीचें चिंतन करितों
कधिं बनतों मी सखाराम अन
रांडा—पोरांसाठीं रडतों

बनतों विश्वामित्र कधीं मी
डोळ्यांवरती ओढून पडदा
आणि लावितों वेड कुणाला
सतार छेडून दिड्–दा–दिड्–दा

असे कोण मी या प्रश्नाचें
अटकेपारीं अडतें घोडें
असे कोण मी याचें मजला
अजून सुटलें नाहीं कोडें

—श्री

## त्या तिथें अवेळीं

सखि, आठवती कां गांवाकडच्या गोष्टी
तें रम्य शिवालय उभें नदीचें कांठीं
तो भोळा शंकर पार्वतीचा ग, सांब
स्मृति उरांत जपणारे ते मंदिर खांब

त्या तिथेंच लपलिस कातिव खांबामागें
मौनास पालवी फुटली लटक्या रागें
जा, येऊं नको, तूं बोलूं नको मजपाशी
पण फितूर नयनीं अवघडल्या जलराशी

लाविला आर्जवुन हनुवटीस मीं हात
अन आंसु लोपले गाभुळल्या गालात
अधरांस मिळालें तिथें आसुचें दान
रंगले मुखीं मग कातावीण जें पान

हें पाहून हंसला एक कवडसा दूर
अन लाज लाजरी लाजुन झाली चूर
गुंतल्या करांतिल कर झाले बेभान
पायांत परतण्या उरलें ना अवसान

बोटात गुंतवित पदराचा तूं शेव
तूं उगा दाविला उतावळीचा भाव
वळलीस मुरडुनी उरीं उसळली लाट
तो हंसला तेव्हां सखे, नदीचा घाट

त्या घाटावरती लोभ तुझा अनिवार
त्या तिथें मिसळले सुरात अपुले सूर
पलिकडे वाजली वेळुवनीं, ग मुरली
अन गौरकेतकी तिथें दंवानें न्हाली

पदराची पडली रातराणीला भूल
त्या तिथेंच गेला निशिगंधाचा तोल
त्या स्थळीं झेलिला छातीवर तव माथा
त्या स्थळीं जाहले श्वास तुक्याची गाथा

तव मधाळबोटें केंसांतुनि ग, फिरलीं
ती स्पर्शपालवी निळ्या जळीं थरथरली
त्या तिथेंच थिजली कणांकणांतून लाज
त्या तिथें अवेळीं धुक्यांत न्हाली सांज

—श्री



## ऐनवेळीं

फुले तुझ्या आठवानें
अंगीं रोमाचांचें लेणें
उमलती पुन्हां सारीं
मौनांतलीं संभाषणें

मूर्त होती पळपळ
नदीकांठ हिरवळ
एकसाथ पडलेले
मनीं वाजतें पाऊल

भेटविती जललाटा
दोन तीरींच्या दो कांठा
आणि उसासत मनीं
संगे मळिल्या ज्या वाटा

भारावला क्षण क्षण
घाली मौनाची वेसण
देवळांत वाजणाऱ्या
कानीं सनईची धून

आधीं ठरवून सारें
कांहीं बोललोंच नाहीं
तरी घुमून निघालें
आसमंत, दिशा दाही

ऐनवेळीं विसरतो
असा गीताचा अंतरा
आणि एकांती फुलतो
असा शब्दांचा फुलोरा

—श्री

## माझें गाणें

जोंवर जळते आहे माती
जोंवर लेतें हिरवें लेणें
भाववहर जोंवरी नभाला
फुलेल तोंवर माझें गाणें

झुरते कोणी कोणासाठीं
घेती शपथा, देती वचनें
मातीवरती या मातीचीं
तोंवर उठतिल अशींच चिन्हें

जोंवर आहे प्रीत जीवनीं
मृत्यूवरती अन् विश्वास
फुलेल तोंवर शब्दफुलोरा
गीतें बनतिल माझे श्वास

जोंवर आहे व्यथा जीवनीं
उरांत जगती कथा नवीन
जगतील तोंवर तप्त वाळुवर
मम शब्दांचे असेच मीन

जोंवर आहे रंग नभाला
जोंवर आहे गंध जगास
अव्यक्तांतिल रस पिळण्याचा
मम शब्दांना असेल ध्यास

ज्या बीजावर पडेल पाणी
धर्म मातिचा त्यास रुजविणें
अदम्य उत्कट क्षणांक्षणांतुन
रुजेल माझें तसेंच गाणें

—श्री

# कविता
## एक दर्शन

**प्रा. द. भि. कुलकर्णी**

माणूस वयांत आला की भलभलते विचार त्याच्या मनांत येऊं लागतात. तरुणाला असं वाटूं लागतं कीं, आपण लग्न करावं आणि वेगळा संसार थाटावा, आईवडिलांची, बहिणी-भावंडांची कुणाकुणाची पर्वा करूं नये. किंवा तरुणीला असं वाटूं लागतं कीं, आयुष्यभर आपण मुळीं लग्नच करूं नये, नुसतं शिकत राहावं. हिंदुस्थानांतलं ज्ञान संपलं कीं इंग्लडला जावं, तिथल्या पदव्या फस्त केल्यावर अमेरिकेस प्रयाण करावं, अमेरिकेहून जर्मनी, तिथून रशिया...पण लग्न मात्र या जन्मांत करूं नये. आणि तरुण तरुणींना असं कांहींच वाटलं नाहीं तर निदान आपण कविता करावी असं तरी वाटतंच वाटतं. यांत दोष मानवाचा नाहीं. असलाच तर तो तारुण्याचा आहे किंवा निसर्गाचा आहे किंवा परमात्म्याचा आहे किंवा आणखी कोणाचा तरी आहे; पण कविता करणाऱ्यांचा खास नाहीं.

शिवाय कविता करणं वा न करणं हा प्रत्येकाचा एकदम खाजगी प्रश्न आहे. त्यांत ढवळाढवळ कुणीं करावी ? आणि केली तरी ती कुणाला खपेल कशी ? कुणीं झालं तरी कां खपवून घ्यावी ? हे कविलोक सरळ आपल्याला जाब विचारणार, " बाबा रे, मी कविता करीन किंवा करणार नाहीं; तो माझा प्रश्न. त्यांत तोंड खुपसायला तुम्हांला कुणीं सांगितलं ? " प्रश्न अगदीं बिनतोड किंवा आपल्या राष्ट्रभाषेंतला शब्द वापरायचा तर थेट ' मुहतोड ' आहे मुद्दा एवढाच कीं, कविता करणें—नकरणें या मूलभूत प्रश्नाबाबत आपण बातचीत न करणें हें उत्तम.

पण मूलभूत नसलेले, मामुली प्रश्न आपण कवींना जरूर विचारूं शकतों. उदाहरणार्थ, आपण या शब्दसृष्टीच्या ईश्वरांना असा सवाल टाकूं, " कविजन हो, तुम्हीं लिहिलेल्या कविता आम्हीं म्हणजे वाचकांनीं वाचाव्यात अशी तरी तुमची इच्छा असते ना ?" या शंकेला नकारार्थी उत्तर सहसा कोणी कवि देणार नाहीं. कारण हे कवि मोठे प्रसिद्धीचे भुकेले असतात. कोणीच नाहीं तरी निदान-संपादक,जुळारी व मुद्रितशोधक यांनीं आपली कविता वाचावीच अशी यांची उत्कट इच्छा असते. एरव्हीं इकडे प्रेमभंगानें हृदय शतधा विदीर्ण झालेले असतांना कविता वाच्य अक्षरांत उतरवून काढणें, मासिकाचा पत्ता शोधून तो पाकिटावर लिहिणें आणि दहा पैसे यंत्रांत टाकून वजनाच्या कार्डाची वाट पाहावी त्या— पद्धतीनें लाल पेटींत कविता टाकून संपादकाच्या पत्राची वाट पाहत राहणें असा कांहीं प्रकार ते करते ना. ही सारी यातायात ते करतात याचा अर्थ आपली कविता केवळ आपल्या वहींत न राहतां ती इतरांच्याहि वाचनांत यावी असें त्यांना वाटत असतें. पण खरंच वाटत असतें कां ? कीं हा आपला भाबडा तर्क ? आपण आपलें म्हणायचें कीं कवि स्वतःसाठीं व वाचकांसाठीं लिहितो व कवीनें लिहीत बसावें प्रसिद्धीसाठीं आणि संपादकांसाठीं. प्रसिद्धीसाठीं म्हणजे प्रसिद्धि मिळविण्यासाठीं एखादा कवि लिहीत असेल तर त्यांत वाईट काय ? फार चांगली गोष्ट आहे ! गंमत एवढीच आहे कीं, प्रसिद्धीकरितां लिहावयाचें म्हटलें तरी पुन्हा तो बेटा वाचक आडवा येतोच— म्हणजे त्याच्याचसाठीं लिहावें लागतें. शिवाय तसें लिहूनहि प्रसिद्धि मिळेलच असें नाहीं. ती काय एवढी सोपी आहे ? अनेक कवींना आपली उभी हयात तिच्यापायीं नासावी लागली आणि कंटाळून हे कवि प्रसिद्धी शोधायला स्वर्गात गेले तेव्हां ती इथें पृथ्वीतलावर येऊन बसली ! एकूण प्रसिद्धीच्या हव्यासानें कवींनी जरूर कविता लिहाव्या असं आपण म्हणूं. कुणाला प्रसिद्धि द्यायला, कुणाचं तोंडभरून कौतुक करायला आपलं काय जातं ? फक्त आपल्या प्रत्येकाच्या मनाआड फुलारलेल्या सुंदर बनांत या कवींच्या कवितांचं बीज पडलं पाहिजे. तिथें हरेक ऋतूंत तें अंकुरलं, तरारलं आणि फुलाफळांनीं लहडलं पाहिजे— एवढीच आपली अट. मात्र या कवींनीं संपादकांसाठीं मुळीच लिहूं नये. संपादकासाठीं लिहिणं म्हणजे छापून येण्यासाठीं लिहिणं. छापून काय जाहिरातीसुद्धा येतात. पण त्या कुणाच्या मनांत जाऊन बसतात. स्वतः संपादकाच्याहि ध्यानांत नसतं कीं, आपल्या अंकांत कुठकुठल्या जाहिराती छापून आल्या तें. पण रांगल्या कवीलाच नव्हे तर चांगल्या न्हात्याधुत्या कवीलादेखील असं वाटत असतं कीं. अमक्या संपादकाला सोज्वळ कविता आवडते— मग लिहा एक. टाका एक विठ्ठलावर नाहींतर खिरस्तावर कविता. आतां त्या दुसऱ्या मासिकांत कविता छापून आणावयाची आहे, त्या संपादकाला दुर्बोध आणि तिरकस कविता हवी असते मग करा शब्दांची, प्रतिमांची खिचडी.

अशाच एकएका मासिकांत छापून येण्याच्या निमित्तानें गांधीवादी राष्ट्रवादी, अश्लील, इत्यादि लेबलांच्या कविता निर्माण होतात. पण चांगली कविता मात्र निर्माण होत नाहीं; मग थोर कवितेची बातच नको. ती कशी निर्माण होते ? कोण सांगेल ? आपल्याला सांगतां येत नाहीं एवढें खास. पूर्ण शरणागति.

मात्र चांगली किंवा थोर कविता आमच्या पुढ्यांत आणून ठेवा. आम्ही ती अचूक ओळखूं. हा आमचा अभिमान नव्हे. हें त्या कवीचें कौतुक. त्या कवितेचें कौतुक. अशी कविता वाचल्याबरोबर एक चमत्कारिक थरथर पाठीच्या कण्यातून धांवत जाईल; कदाचित् आवंढा गिळावासा वाटेल; कदाचित ओठांवरून पुन्हा पुन्हा जीभ फिरेल; कुणाशीं तरी खूप बोलावेसें वाटेल किंवा लांब ढांगा टाकीत गांवाबाहेरच्या तळ्याकांठीं एकाकी बसून राहण्याची इच्छा होईल. अशी कविता आपल्या मनाचाच एक भाग होऊन बसतो—आपली इच्छा असो—नसो. आणि आयुष्यभर आपल्याला साथ देते. ती सुंदरपन वाढविते आणि सुंदरपन वाढलें कीं तीहि वाढते. मग तिचें खरें स्वरूप आपलें आपल्यालाच कळेनासें होतें. कांहीं ओळींनी बांधलेली ती कविता ? कीं त्या चरण चषकांतून आपण जें रसायन ओठीं लावलें व जें आपल्या अंगांअंगांत भिनलें ती खरी कविता ?

### केचे आणि भट

*असें अंगींमनीं भिनून जाण्याचें मधुर विष केच्यांच्या कवितेंत* आहे, " दिंडी गेली पुढें " आणि " पुनवेचा थेंब " हे संग्रह वाचले कीं, त्याची प्रचीति येते. पण ते संग्रह वाचीत असतांना आपल्याला असं वाटलं होतं कीं केचे गुंतून पडले आहेत, ते अभंग छंदांत; प्रयोग करण्याची त्यांना हौस नाहीं. *पण इथे त्यांचीं तीन* " मुक्तकें " पाहून आपला विचार बदलतो, हा त्यांचा अलीकडचाच प्रकार दिसतो " मुक्तक " म्हणजे रचनादृष्ट्या " मुक्त " असा त्याचा अर्थ असावा. कारण या त्यांच्या तीनहि कवितांना श्लोक, चरणसंख्या अक्षरें किंवा मात्रा यांचें बंधन दिसत नाहीं. एक किंचित् बंधन आहे तें अंत्य यमकांचें. पण मराठी कवितेच्या बाबतींत आतां अंत्ययमक न साधणें हेंच कृत्रिमपणाचें ठरेल. पण मुक्तक या शब्दाचा काव्य-शास्त्रीय अर्थ थोडा वेगळाच आहे. चमत्कृतीपूर्ण श्लोक. स्वयंपूर्ण पद्य. प्रासंगिक स्फुट कविता. अशा त्याच्या कांहीं व्याख्या आहेत. शेवटची व्याख्या लाडांची आहे. ती अर्थातें मान्य झाली नाहीं. आधीच्या व्याख्या संस्कृत साहित्यशास्त्रांतील त्यांच्याशीं लाडांची व्याख्या विसंगत. प्रासंगिक स्फुट कवितेला त्यांनीं एखादें नवें नांव द्यावें. त्यांनीं एक जुना परिभाषिक शब्द नव्या अर्थानें वापरून शास्त्रांत गोंधळ कां करावा ? केच्यांनासुद्धा आपण असेंच विनवूं. आपल्या कविताना त्यांना कांहीं वेगळें नांव द्यायचें असलें तर तें त्यांनीं खुशाल द्यावें. पण आमचा परिभाषिक शब्द त्यांनीं वापरूं नये. त्यामुळें शास्त्रांत व वाच-कांच्या मनांत जसा घोटाळा होईल तसाच त्यांच्या कवितेवरहि अन्याय होईल. पण आपल्या मुख्य शंकेच्या मानानें हा पारिभाषेचा मुद्दा अग-दींच गौण ठरावा. एकदम असा नवा काव्यप्रकार वा काव्यरचनाप्रकार निर्माण करण्याचें त्याना अगत्य कां वाटलें ? त्यांनीं करूं नये असें नाहीं; त्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. पण आमची नम्र शंका अशी कीं, त्याची त्यांना गरज कुठल्या कारणानें पडली ? मराठी कवितेंत वैशिष्ट्य-पूर्ण बदल घडवून आणणाऱ्या-मर्ढेकर मुक्तिबोधांना अशी गरज कधीं पडली नाहीं म्हणून विशेष शंका. कीं ही नवी फॅशन ? कुणीं तालचित्रें, मुक्तसुनीतें लिहावीं. कुणीं वात्रटिका लिहाव्या. तशीं केच्यांनीं मुक्तकें लिहिलीं ? अलीकडे मराठी कवितेंत प्रयोगासाठीं प्रयोग किंवा खरें म्हणजे झटपट प्रसिद्धीसाठीं प्रयोग ही साथ फार वाढली आहे. केच्यांनीं, मुक्तिबोधाच्या घरीं जाऊन प्रतिबंधक लस टोचून घ्यावी. काव्यांत प्रयोगाला स्वतंत्र महत्त्व कांहींहि नसतें हें काय त्यांना कोणीं सांगायला हवें ?

केच्यांची कविता सौम्य तर सुरेशभटांची कविता तीक्ष्ण. केचे सतत कुठल्यातरी शक्तीचा आधार शोधणारे तर भट साचा शक्ति पायदळीं तुडविण्यास जणू उत्सुक झालेले. भट मराठीला कांहींतरी वेगळें देऊं शकतील असे फार वाटतें. मात्र त्यांनीं आपलें बळाबळ नेमकें ओळखलें पाहिजे. उर्दू कवितेच्या वाचनानें कीं काय भावना अगदीं टीपेवर नेण्याचें कसब त्यांना सहज साधतें— ती त्यांची प्रकृतीच. त्याबद्दल कोण तक्रार करील ? पण अनुभवाचीं इतर अंगें खालीं लोंबकळत राहतात. भावनेपाठोपाठ फरपापटतात— ही मात्र *तक्रार करण्याजोगी बाब आहे. हें त्यांना टाळतां येणार नाहीं कां ?* त्यांची कविता आज घटकेला वेगळी वाटत असूनहि मला तिचें साम्य दिसतें तें श्रीकृष्ण पोवळे यांच्या वृत्तीशीं, कवितेशीं. केवळ भावा-तिशयता, केवळ धुंदीच नव्हे तर एक चाकोरींतली लय निर्माण केल्यागत दाखवून मध्येंच ती तोडायची व नवी, अपरिचित लय उभारायची हें पोवळ्यांचें— कोणींहि न दाखविलेले— वैशिष्ट्य फार मोलाचें वाटतें; तें भटांजवळ आयतें आहे. भटांजवळ समाजा-भिमुखताहि आहे. मुक्तिबोधांची फळी आज कुणीतरी सांभाळणें जरूर झालें आहे. थोडी कळ सोसली तर भटांना तें साधेल. " हरवलें आयुष्य माझें " ही त्यांची कविता मनांत वाढत राहील अशी आहे.

एखादा माणूस भाग्यवान् असतो. त्याला सहजच आपला वाङ्मयप्रकार गवसतो. अनिल, ना. घ. देशपांडे पु. शि. रेगे हे असे कवि. कुणाला अनेक प्रकारांतून हिंडत हिंडत आपल्या मनाचा शोध घ्यावा लागतो. सरिताबाई पदकींनी प्रथम कविता लिहिल्या आतां त्यांचा संग्रहहि प्रकाशित झाला. मग कथा आणि नाटक या प्रकारांत त्या वावरल्या. हा त्यांचा शोध कीं मुलुखगिरी ? काणेकर अत्रे यांनीं *काव्यलेखन टाकलें, तें साधलें नाहीं म्हणून नव्हे तर ती* वृत्तीच संपली म्हणून. अलीकडे सरिताबाईंचेंहि असेंच झालें असावें असें ' खिडकी ' वाचून वाटूं लागलें आहे. पण नाहीं ! एकतर एखाद्या कवितेवरून असा तर्क करूं नये. शिवाय ' अंघोळीचें स्तोत्र ' ' गुलटं आणं ' हीं त्यांचीं बालगीतें विसरून कसं चालेल ? मात्र जातां जातां पुन्हा एक अडचण आहेच. बालगीतांना खरोखरच कांहीं वाङ्मयीन मूल्य आहे कां ?

या दिवाळी अंकांत आम्ही प्रसिद्ध करीत असलेल्या कवितांचें हें रसग्रहण म्हणजे " माणूस " चा एक अभिनव उपक्रम ठरेल असें वाटतें. जुने व नवे कवि यांचें स्वागत करतील अशी आशा आहे.

—संपादक

### अनुकरणाशी झगडा

बाकीच्या सर्व कवींसंबंधीं महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते सर्व नवीन आहेत आणि तरीहि त्यांना प्रथितयशांच्या अनुकरणाचा फारसा मोह नाहीं सात वर्षापूर्वीचे दिवस आठवतात.नांवे घेत नाहीं पण तेव्हां नवीन कवि अनुकरणानें किती वेडावले होते ! खालचीं नांवें पुसून टाकलीं तर मासिकांतली आपली कविता कोणती हें प्रत्यक्ष कवीलाहि ओळखूं नये इतके ही गोष्ट वाईट असेंच कोणीहि म्हणेल. पण असेंहि वाटतें कीं, अधिकांश कवींच्या दृष्टीनें ही उपयुक्त पायरी ठरते. कुसुमाग्रज,बोरकर, पाडगांवकर हे सारे अनुकरणाच्या रामटेकी वराहाखालून गेलेले आहेत. रामटेकला एक मोठा दगडी वराह आहे. देवळात जायचें म्हणजे त्या वराहाच्या पोटाखालून एकदां सरपटतच जावें लागतें. जो पापी असेल तो म्हणे, त्याच्यातच अडकून पडतो पुण्यात्मे सहज बाहेर पडतात. आळसांतून किंवा प्रसिद्धिलालसेंतून अनुकरण निघालें असेल तर तें वाईट पण एखाद्याची लकब फार आवडल्यामुळें जर तें आलें असेल तर, पहिली पायरी म्हणून चांगलेंच. राम गोसावी, रमेश धोंगडे, शांताराम भास्कर किंवा यशवंत पारखी यांनीं पिसाटपणें कुणाच्या कवितेमागें कधीं धांव घेतली आहे कां ? जें आपल्याला सांगायचें आहे पण सांगतां येत नाहीं तें अमक्यानें सहज-सुभग सांगितलें म्हणून ते प्रेमानें अमुक एका कवीवर कातावले आहेत कां ? नसावें. म्हणूनच त्यांच्या कविता नेव्हुलासारख्या वाटतात— अजून त्यांनीं अंगच धरलेलें नाहीं. अशा प्राथमिक अनुकरणानें आणखी एक गोष्ट साधते. कवीला वेगवेगळ्या स्थूल लयी जाणवूं लागतात. त्यांतून त्यांची स्वतःची लय आपोआप उमलूं शकते. अशी कुणाची कां होईना लय मनवळणी पडली असती तर पराडकरांनी ' अनंत शून्य धुराचें ' असें न म्हणतां ' शून्य अनंत धुराचें ' असें सहजच म्हटलें असतें. ' श्री ' अशा प्राथमिक अनुकरणाशी झगडत आहेत असें वाटतें.

१. उमलतीं पुन्हा सारीं
मौनांतलीं संभाषणें...
२ भारायला क्षणक्षण
घाली मौनाची वेसण...
३. असें कोण मी या प्रश्नाचें
अटकेपाशी अडतें घोडें...
४. पदराची पडली रानराणीला भूल
त्या तिथेच गेला निशिगंधाचा तोल...

अशा ओळींतून पाडगांवकर मर्ढेकर, करंदीकर, बापट या कवींचा वास येतो. पण कवितेला हवा असतो तो तर फक्त कवीच्या व्यक्तित्वाचा असम सुगंध ना ? तो दरवळण्यासाठीं कवीचें मन प्रगल्भ, सौंदर्यक्षम आणि बरेंच कायकायसें असावें लागतें. अनुकरणाबद्दल कांहीं नाहीं. पण श्रींच्या लेखनांत एक तृप्ती, एक आत्मविश्वास दिसतो. तो फार धोकेबाज आहे तो त्यांची जन्मापूर्वी वाढच खुंटवून टाकेल सौ. कुलकर्णी, भिमाले, शंभरकरांचेंहि तसेंच असें होऊं नये. म्हणूनच अशा सफाईदार कवितांपेक्षा सुधाकर देशमुखांची ढळलेली कविताहि दिलासा देते.

पाणी झेपावत जाता
फक्त उघडेल दार
दूर दिसेल रंगली
गर्द बोटांची किनार

अशा एखाद्या कडव्यांत त्यांचें यश त्यांच्याजवळ येऊन जातें. तें त्यांनीं वाढविलें पाहिजे.

या १९ कवितांच्या निमित्तानें आजच्या मराठी कवितेसंबंधींच आपण बोलून गेलों : कविता टाकून इतर वाङ्मयप्रकारांकडे वळणाऱ्या सरिताबाई एकट्याच नव्हेत. त्यांच्या पिढींतील मंगेश पदकी, वसंत सबनीस हे त्यांपैकींच. बापट-पाडगांवकरांच्या संमोहनाला न भुलतां कविता लिहिणारे आज केचेहि एकटेच नव्हेत— म. म. देशपांडे, चित्रे, ग्रेस आहेतच. ( आणि केव्यांप्रमाणें या साऱ्यांना अजून खूप मोठा पल्ला गांठायचा आहे, मोठे धोके अजून पुढेच आहेत. ) अनुकरणानें सुखावून जाणारेहि केवळ श्रीच नाहींत. उ. रा गिरी, शंकर रामाणी, राम शेवालकर हीं त्यांतलीं मोठीं नांवें. लहान लहान कवयित्रींचीं ललित नांवें तर खूपच देतां येतील. पण नको. आणि नेव्हुलासारखी गर्भावस्थेंतील कविताच वाचकांपुढें ठेवणारे कवीहि थोडके नाहींत. हें सर्व नेहमीचें व स्वाभाविक आहे. अलीकडे बोलीकाव्य व वृत्तबद्ध काव्य यांची लाट येत आहे. तिचा मात्र आवाज येथें नाहीं एवढें खरें.

अर्थात् जें आहे नाहीं त्याबद्दल चिंता करण्यासारखे, हुरळून जाण्यासारखें कांहीं आहे का ? नाहींच. फक्त रिकाम्या जागा कोण भरून काढतो व नव्या जागा कोण निर्माण करतो तेंच आपण पाहावयाचें. नाहींतर ज्ञानेश्वर, होनाजी, बालकवि, मर्ढेकर हे आपले आवडते कवि आहेतच.

● ● ●

## शांतलिंगाच्या दोन बायका पृष्ठ ५४ वरून चालू

देवांना साक्षी ठेवून मी सागते आहे कीं, मी पापी नाही. तसली कल्पनादेखील चूकून माझ्या मनांत आली नाही. असली चाडाळ गोष्ट करणारी तुझी सवत नाही ग."

धानव्वा बसल्या बसल्या स्वतःशीच बोलत होती. त्या कल्पनेनें तिला समाधान होत होतें. पहाटे तांब्या घेऊन जातांना शातव्वाला ती हें सगळें सांगणार होती. शांतव्वाच्या मनातील ती घाणेरडी कल्पना ती धुवून काढणार होती. शांतव्वा भरलेल्या मनानं ऐकून घेऊन तिला कवटाळणार होती.

मनावरील भार हलका झाल्यामुळें ती बघतां बघतां झोंपेच्या आधीन झाली.

सकाळचे कोवळं उन अंगणांत पसरलं तसा शंकर उठला. डोक्याला टापशी बांधून हाती तांब्या घेऊन तो मागील दारांतून बाहेर आला. आणि समोरचें दृश्य बघून त्यानें जोरजोरानें बोंब ठोकली.

हां हां म्हणतां ही गर्दी लोटली, निंबाच्या झाडावर शांतलिंगाच्या दोन्ही बायकानीं फास लावून घेतला होता. जिभा बाहेर आलेल्या होत्या. आणि डोळ्यांचीं बुबुळें टंवकारून बघत असल्याचा भास होत होता.

मी मी म्हणणाऱ्यांचीदेखील तें दृश्य पाहून भयानें बोबडी वळत होती.

● ● ●

## हरवलें आयुष्य माझें

हरवलें आयुष्य माझें... राहिले हे भास !
झगमगे शून्यांत माझी आंधळी आरास !
उधळतें आभाळ माझी करपलेली धूळ....
फसवुनी गेला मला क्षण भेटला मधुमास !

दूर काळोखांत माझे विव्हळती आवाज....
तुडवतो माझ्या दिशांचा मज इथे उपहास !
व्यर्थ हा रसरूपगंधाचा तुझा अभिसार—
वेंच तू वाऱ्यावरी माझे अभागी श्वास !

—सुरेश भट

## दोन उधळावीं फुलें

उगा सांधला मीं धागा
गोड शब्दांच्या मायेनें
मन अंधारून जाते
व्यर्थ प्रकाश नादानें

पाणी झेंपावत जातां
फक्त उघडेल दार
दूर दिसेल बंगली
गर्द बोटांची किनार

थरथर ओठांतील
सारे उडतील कण
दोन उधळावीं फुलें
तुवा पापण्या आडुन

—सुधाकर देशमुख

## निळें क्षितिज

निळे क्षितिज स्पर्शतां
उलतात आठवणी
वेड्या चकोराच्या मनीं
एक लाजते चांदणी

वाऱ्यागत कलागती
रात्री कंचनीचा नूर
ऐकूं येतो कधीं मधीं
दूर पावरीचा सूर

स्पर्शे लाघवी सूरांत
झळ वाऱ्याची पायरी
मुग्ध उदाची सुगंधी
ओवी भिनते अंतरीं !

—ज्ञानेश्वर शंभरकर

## गंध मोहिनी

एक कमळ हें फुलतें आहे........
गंधमोहिनी
हले जागती निमिष पापणी
.......इतक्या मधुनी

क्षितिजावर रेंगाळत आहे
.......हळवें कांहीं
.......रंग
छे नव्हें.......

ही तर आहे गंधमोहिनी !
रेखित आहे चित्र कुणाचें.......
मोरपिसांचा करुन कुंचला.......
निजलेल्या वाऱ्याच्या कानीं

अन गुपिताचे गाई गाणें.......
.......गंधमोहिनी
स्वरांस लावुन पराग उटणें !
गंध दरवळे........

........सूरहि घुमले
दाही दिशांच्या कणांकणांतुन
आणि कुणाचे.......
कुणास ठावें.......

.......काय हरवलें
हंसते आहे गंधमोहिनी
हले जागती निमिषपापणी
.......इतक्या मधुनी

.......आणि
जागती पापणी चोळी
नवीन कांहीं
........नकळत आहे
मजला घडलें........

.......एक कमळ हें
........फुललें आहे
........गंधमोहिनी,
........गंधमोहिनी !

—श्री



## चेतना

माझिया आकाशीं
तुझाच प्रकाश
घाली करपाश
प्रेमभावे

माझ्या निरांजनीं
तूंच दिव्य जोत
गातसे आरती
मांगल्याची

माझिया कुंभांत
ओतिशी अमृत
केले मीं सुकृत
पूर्वजन्मीं

माझिया वेलीचें
तूंच गडे फूल
सुगंध चाहूल
जीवनांत

माझी एकतारी
तुझा गोड सूर
लोपलें काहूर
अंतरीचें.

माझिया कुडीची
तूच गे चेतना
राहूं तुझ्याविना
कैसा मी गे?

—राम. श्री. गोसावी

## अंधारलें मन

धरेनें दावावें
दु:ख वक्ष:स्थळीं
आभाळाचे डोळी, पाणी यावें
संध्येनें टाकावी
चूळ शोणिताची
कोर सांत्वनाची, उगवावी
दाटवावें दु:ख
तृणानें दंवांत
हासुनी प्रभात, मोती व्हावें
होता मी हताश
येसी तूं धांवून
अंधारलें मन, उजाडते

—रमेश वामन धोंगडे

## माप

मध्यरात्र श्रावणाची
माझ्या संगती बैसली
जीवनाचीं कर्मकथा
मला सांगाया लागली.... ॥ १ ॥
चराचर हरवलें
अंधाराच्या पापणींत
वादळ—वारा गर्जतो
आभाळाच्या पोकळींत.... ॥ २ ॥
श्वासांची माया सगळी
शीळ जशी सोसाट्याची
जग अजब संगीत
जशी पुंगी गाजराची.... ॥ ३ ॥
जगण्याचे, मरणाचें
सूर फक्त चित्कारती
अनंत शून्य धुराचें
मरणांतुनीं निघती.... ॥ ४ ॥
अर्थ जेवढा शून्याला
तेवढाच जगण्याला
चराचर शून्यमय
माप नाहीं मोजण्याला... ॥ ५ ॥

—नरेन्द्र पराडकर

## माझ्या ज्ञानेशाचा बोल

माझ्या ज्ञानेशाचा बोल । आहे नभाहुनी खोल
ऐरावतापरी डौल । त्रिभुवनीं ।। १ ।।

ज्याचा अर्थ मकरंद । करी रसिकाला धुंद
आणि आगळा सुगंध । वेड लावी ।। २ ।।

जैसी शारद पुनीव । करी किरण वर्षाव
आणि चकोराचा गांव । आनंदला ।। ३ ।।

तैसा ज्ञानेशाचा शब्द । करी रसिकांना लुब्ध
ज्याचा नऊ रसी ओघ । वाहूं लागे ।। ४ ।।

अमृतही गयावया । करी पडे याच्या पाया
म्हणे ज्ञानदेव राया । दया ठेव ।। ५ ।।

आले मराठीच्या दारीं । पांच इंद्रिय भिकारी
म्हणे सुख थोडें तरी । दे व् ऽ माये ।। ६ ।।

स्पर्शे स्पर्श तृप्त झाला । जिव्हा नेत्र कान धाला
नासिकाहीं म्हणें मला । उरूं द्याहो ।। ७ ।।

ज्ञानेशाचा शब्द गोड । वर्षे अमृत-आषाढ
श्रुती–चातकांचे लाड । पुरतील ।। ८ ।।

—यशवंत पारखी

## अशीच व्हावी चूक निखालस

अशीच व्हावी चूक निखालस
नसो कदापी जिला उपरती
अवचित वायू हलवुनी जावा
स्मृतिगंधाची अलगद वस्ती !

अशीच व्हावी चूक निखालस
प्रकाश-छाया वीण चुकावी
आणि कडेच्या नक्षीवरती
स्मितरंगाची लाट फुटावी !

अशीच व्हावी चूक निखालस
मिटुनी जावी शब्द-पाकळी
दोन मनांच्या पणत्यामधुनी
ज्योत फुलावी एक आगळी !

अशीच व्हावी चूक निखालस
पथ तिमिराचा चुकला जावा
हताश होउनी हात टेकितां
पदर उषेचा करांत यावा !

अशीच व्हावी चूक निखालस
शर नयनांतुनि सुटला जावा
आणि रतीच्या गालावरतो
इंद्रधनूंतील ताम्र उरावा !

—शांताराम भास्कर

## "आतां सारे शांत शांत !"

आतां सारे शांत शांत
स्तब्ध सावळ्या डोहांत
चूर चंदेरी चांदणी
निळ्या स्वप्न सांवलींत !

आतां सारे शांत शांत
मिटलेल्या पाकळींत
मधु–मिलिंद जागवी
धुंद सुगंधी पहाट !

आतां सारे शांत शांत
पाणावल्या पापणींत
तुझ्या विरहाचें गीत
आसवांच्या अक्षरांत !

—यशवन्त भिमाले

## 'वळवाच्या पावसाची'

वळवाच्या पावसाची । कळे कां ग वेळ कुणा ।
कधीं येतो आणि–जातो । अनाहूत हा पाहुणा ।।
रिमझीम ना आवडे त्या । सदा यायचा नाचत ।
सांडे उत्साहाची मूठ । एक क्षणाच्या भेटींत ।
कधीं वाटावे अंतरीं । आज येऊंदे ती सर ।
परी कधीं ना यायची । होता मानस अधीर ।।
आणि अचानक बाई । कधी जागवीतो झोंप ।
यावे दौडत दर्शना । तोच कुठें होई गप्प ।।
नको नकळत असा । जाऊ पिसाटापरीस ।
माझ्या आनंदाचा घडा । नको पालथा करून ।।
दोन क्षण थांबून जा । तुज सांठवीतें मनी ।
असा लपंडाव नको । तृप्ती भरूं दे लोचनीं ।।

सौ. इंदिरा कुलकर्णी



# ना. ह. आपटे

# दिशाशून्य जीवनाचें पडसाद

**मा**झा लेखन-प्रपंच मोठा आहे. माझें हें जीवन कसें घडत गेलें ? लेखनकलेकडे माझें लक्ष प्रथमतः कसें व कां गेलें ? त्याचा विकास होण्याकरितां मीं प्रयत्न वा अभ्यास कसा केला ? या घडपडींत मला मार्गदर्शन कोणाकडून झालें ?

या विषयावर आपण सहज लिहूं शकूं असें प्रथम वाटलें. पण प्रत्यक्ष लेख लिहिण्यास बसलों त्यावेळीं मात्र विचार पडला—प्रारंभ कोठून करावा ? थांबावें कुठें ?

या विवंचनेचीं कारणें दोन पहिलें : लेखन संसाराचा बराच मोठा काल ! —दुसरें : या संबंधांत दैवाचा हात किती ? आणि माझ्या कर्तृत्वाचें श्रेय किती याचा उलगडा मला अद्याप झालेला नाहीं.

प्रथम कालाचें स्वरूप पाहूं— माझी पहिली ऐतिहासिक कादंबरी **अजिंक्य तारा**. इ. स. १९०९ मध्यें ती त्या कालांतील वाचकांपुढें आली ! म्हणजे या घटनेला वर्षे होऊन गेलीं त्रेपन्न ! तेव्हांपासून आतांपर्यंत माझीं पुस्तकें झालीं आहेत साठच्या आंत—बाहेर ! —अर्थात हा भारा आज पाहिला म्हणजे माझा मलाच अचंबा वाटतो ! बरें. एवढें वाङ्मय केवळ भारुड म्हणावें तर माझ्या **गृह सौख्य** या निबंधात्मक पुस्तकाच्या बारा आवृत्त्या निघाल्या आहेत. सात-आठ आवृत्त्या निघालेलीं पुस्तकेंहि पांच—सात आहेत ! दोन—तीन आवृत्त्यांचीं तर बहुधा सर्वच आहेत ! हा खुलासा केवळ माहितीकरितां. त्यांत स्वाभिमान निःसंशय आहे पण अहंता लवमात्र नाहीं. वाचकवर्गानें (मागच्या व आतांच्या) प्रेम केलें व आपंगिता दाखविली म्हणून ना. ह. आपटे या सामान्य माणसांतून एक त्या नांवचा लेखक निर्माण झाला ! —आणि हें श्रेय मी माझ्या वाचकांना सदैव देत आलों आहे.

इत्यर्थ असा कीं, अर्ध्या शतकांतील माझ्या आयुष्यांतील या घडामोडी केवळ टिपणांच्या रूपांत तरी आटोपून कशा सांगणार ?

आतां दुसरा मुद्दा: दैवाचा हात व माझें कर्तृत्व !

यांतहि दैवानेंच मात केलेली आहे ! कशी ती पहा—

**मराठी भाषेचे आद्य व प्रख्यात कादंबरीकार व माझ्या दृष्टीनें माझे परात्पर गुरु हरि नारायण आपटे व मी नारायण हरि आपटे या दोन नांवांतील सादृश्य होय !**

या नामसादृश्यामुळें इ. स. १९०९ सालीं सर्व साधारण वाचकांच्या मनांत कोण कुणाचा ? हा गोंधळ निर्माण झाला ! आणि तो इतक्या दीर्घ कालानंतरहि पुसट स्वरूपांत कां होईना चालूं आहे !

यामुळें काय झालें ? पहिल्या एका पुस्तकानेंच मीं नामांकित होऊन बसलों. या वरून असें अनुमान काढतां येतें कीं, दैवानें (कीं सटवीनें ?) मी बडा ठरणार, हें माझ्या बारशालाच ठरवून टाकलें होतें !

दैवाचा हा डाव एवढ्यानेंच पूर्ण झालेला नाहीं. सर्वांच्या परिचयाची ही गोष्ट आहे कीं, पाळण्यांतील नांवाखेरीज मुलांना इतर एक-दोन नांवें चिकटतात. माझें पाळण्यांतील नारायण. पण माझ्या आधीचा माझा एक भाऊ दिवंगत झाला होता. त्याचें नांव विष्णू होतें. तोच मी जन्माला आलों असें मानण्यांत आलें व मी विष्णू हरि झालों.

मी जन्मल्यापासून माझ्या आईला कसलेंतरी दुखणें लागलें होतें. तेव्हां वैद्याचें औषध घेण्याकरितां ती आपल्या माहेरीं म्हणजे (सवालाखी) अष्टें या गांवीं गेली. आमचें मूळ गांव समडोळीं. सांगलीच्या पश्चिमेला तीन-चार मैलांवर आहे. अष्टयाच्या मानानें समडोळी

अगदींच कुग्राम. अगदीं दोन हजारांच्या आतील खेडें. त्या वेळीं अष्टयाला नगरपालिका होती. एक बडे वैद्यहि होते.

या वेळीं आमची आजी होती. आईची आई. तिला दाई म्हणत. ती स्वत: वैद्यकी करी व बाळतिणीहि सोडवी. माझ्या आईचें माहेरचे नाव कृष्णा होतें. दाईनें तेथील सगोबाला (संगमेश्वरला) नवस केला, लेकीला बरें वाटावें म्हणून. कर्मधर्मसंयोगानें माझ्या आईला पुष्कळच बरे वाटू लागलें. तेव्हां त्याचें श्रेय मला मिळावें म्हणून ती मला यशवन्ता म्हणूं लागली ! तिथें मी यशवन्त हरि झालों.

पुढे आईचें दुखणें पुन्हा उलटले. त्यांत ती वारलीहि, अर्थात् मी. अष्टयासच राहिलों. मुंजीला येईपर्यंत. पण पांचवें-सहावे वर्षी मी शाळेंत जाऊं लागलों होतों. मामाच्या तोंडीं माझें नाव यशवन्त. तेव्हां अष्टयाच्या शाळेंत तेंच लागलें. मी यशवन्त हरि ठरलों.

यानंतर माझ्या वडिलांनीं (कर्मधर्मसंयोगानें यांचें नाव हरि नारायणच होते!) मला समडोळीस आणिलें, त्या कालीं या शाळेंतील दाखला त्या शाळेंत लागत होता कीं नाहीं, कोण जाणें. पण समडोळीच्या शाळेंत माझा प्रवेश विष्णु हरी आपटे या नावें झाला.

ही गोष्ट इ. स. १८९५-९६ सालची असावी. त्यावेळी समडोळीस फक्त चार इयत्तापर्यंतच शाळा होती. या इयत्ताना मोडी इयत्ता म्हणत. आणि शहरांतील शाळेच्या वर्गांना बाळबोध म्हणत. ही काय भानगड होती याची मला नीट कल्पना त्यावेळी नव्हती. पण मोडी सात इयत्ता झाल्या की, त्या विद्यार्थ्याला जी परिक्षा द्यावी लागे. तिला मुलकी म्हणत. आतांच्या व्ह. का. पेक्षां ती वेगळी होती. कारकुनी मिळण्यास ती उपयोगी पडे. मोडी अक्षर लिहिणें-वाचणें यावर या परीक्षेचा मोठा भर असे. असो.

समडोळीच्या शाळेंतील शिक्षण मी १८९७ सालीच संपविलें वयाचें आठवें वर्ष संपले असावें. मुंज झाली होती. संध्या अर्धवट येऊं लागली होती. रुद्र व रूपावली याची तोडओळख होत होती. पण तें कांही शालेय शिक्षण नव्हतें. पुढच्या शिक्षणार्थ मला कुठें धाडायचें हा प्रश्न होता. अर्थात् मी ब्राह्मणपुत्र असलों तरी खेडेगावांतील रीतीप्रमाणें मी वर्षभर तरी घरच्या गुरांच्या पाठीमागें रानांत जात होतों !-पण हें ग्राम्यशिक्षण फार लाबलें नाही. हा वेळपर्यंत माझ्यापेक्षा अकरा-बारा वर्षांनी वडील असलेले माझे थोरले बन्धू गणपतराव आपटे हे साताऱ्यास कोर्टांत उमेदवार म्हणून चिकटले होते. त्यांचा विवाह झालेला होता. ते संसार मांडीतच होते.

साताऱ्यास आमची मावशी होती. तिचे यजमान कसल्यातरी सरकारी हुद्यावर होते. यामुळें आमची स्वारी बन्धूच्याकडे येण्याचें निश्चत झालें. १८९९ मध्यें मी साताऱ्यास आलों असें असेन वाटतें.

साताऱ्यास आल्यानंतर मला माझी हुशारी सिद्ध करण्याकरितां तेथील मराठी शाळेंत पुन्हा चवथ्या इयत्तेत बसावें लागलें ! आणि या प्रवेशाच्या वेळी पुन्हा माझ्या नावाची गल्लत झाली. का व कशी झाले हें निदान मला तरी माहीत नाहीं. विष्णू व यशवन्त ही दोन्ही नांवें मागें राहिली आणि मूळ पाळण्यात ठेविलेलें नारायण नांव पुढें आलें, कायम झालें !

यावरून माझें नाव नारायण हरी आपटे असेंच असावें याबद्दल माझें दैव किती जागरूक होते हे सहज करण्यासारखें आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात अशी म्हण आहे. ती जगाच्या प्रत्ययाला यावी असें दैवाने ठरविलें असावे, कोणीं सांगावें ?

सातारा येथें भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून ना. ह. आपटे यांची एकमतानें निवड झाली याबद्दल 'माणूस' त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे.

त्यांच्या लेखन-प्रपंचाचा हा पूर्ववृत्तांत यावेळींच प्रसिद्ध होत आहे हा एक विलक्षण योगायोगच म्हटला पाहिजे !

— संपादक.

त्या कालीं इंग्रजी शिक्षणाला केवढें महत्त्व होतें, हें काय वर्णन करावें ? "इंग्लड देशाची लंदन राजधानी, तेथील सिंहासनी व्हिक्टोरिया अशा अर्थाचें गौरव-गीत सर्वत्र प्रसिद्ध होतें ! त्या कालचा मॅट्रिक विद्यार्थी म्हणजे आजचा एम्. ए. पीएचडी. झालेला विद्वान असें म्हणण्यास हरकत नाहीं. या बोलबाल्यामुळें त्या काली मराठी चार इयत्ता पूर्ण होताच हुशार विद्यार्थी तात्काळ इंग्रजी शाळेंत प्रवेश करी. प्रमुख शहरातून सरकारी हायस्कुलें चालूं झालीं होतीं. प्रवेश मिळविण्याची भानगड कोणाच्या स्वप्नातहि नव्हती. साताऱ्यास एक सरकारी हायस्कूल होतें. शिवाय पुण्याच्या डे. ए. सोसायटीनें सध्याचें भव्य न्यू इंग्लिश स्कूल नुकतेंच स्थापन केले होतें. गुरुवर्य सितारामपंत देवधर शाळेचे मुख्य सचालक म्हणून आले होते. ते हुशार विद्यार्थी हेरून न्यू इंग्लिश स्कूलकडे आकर्षित करीत, दिवंगत बापूसाहेब माटे हे त्यांच्या शिष्यवर्गाच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थी. यानतर एका मागून एक अशा ज्या तुकड्या आल्या त्यात १९०१ च्या एका तुकडींत ना. ह. आपटे याचा समावेश झाला होता.

आतां मला थोडं मागें वळून समडोळी येथील माझ्या घरच्या वातावरणासंबंधी थोडें सागितलें पाहिजे. दोन वर्षांचा असतांनाच मी मातृसुखाला अंतरलों होतों. यानंतर आमच्या मावशीनें साताऱ्यास आणिलें असे सांगतात. मग पुन्हा अष्टयाला गेलों व सहा वर्षाचें वय होईपर्यंत तिथेंच राहिलों व मग समडोळीस घरी आलों.

आमचें कुटुंब बरेंच मोठें होतें. आम्ही सख्खी व चुलत अशा नात्याचीं भावंडेच सात-आठ होतो. घरात सर्वांना आया होत्या. मीच एक मातृहिन. वडिलांनीं त्या कालची रीत पाहातां पुन्हा विवाह करणें शक्य कोटीतले होतें. पण त्यांना दोन मुलगे होते म्हणून म्हणा किंवा संसाराचा लबेदाहि पुन्हा नको म्हणून म्हणा त्यानी पुनर्लग्न केलेच नाहीं. यामुळें खरें म्हणजे त्या चिमुकल्या वयांत मी एकला एक होतों. माझे त्यातल्या त्यांत संगोपन करणारी व मला प्रेमाने पोटाशीं धरणारी एकच व्यक्ति होती. ती म्हणजे माझी सख्खी भावजय-गणपतरावांची पत्नी होय ! पण आधी ती सासुरवाशीण व माझ्यापेक्षां पाचच वर्षांनी मोठी ! अकरा वर्षांची !

त्या आमच्या बकाल कुटुंबात तिचाहि निभाव लागत नव्हता, आमच्या वडिलांचें या बाबीकडे लक्ष होतें. म्हणून ते आपल्या सुनेला तिच्या माहेरी-जवळच्या हरीपुरास—वरचेवर पाठवून देत. त्यावेळीं मीहि तिच्याबरोबर कित्येकदा हरिपूरास जात असे.

हरिपुर पटवर्धन संस्थानिकांच्या हद्दीतला गांव. निव्वळ ब्राह्मण वस्तीचें गांव. कृष्णा—वारणा या दोन नद्यांच्या संगमावर वसलेलें. एक लहानसें क्षेत्रच. मला तें समडोळीपेक्षां मोठें टुमदार व स्वच्छ वाटें. प्रख्यात नाटककार देवल यांचें हें राहातें गांव.

आपल्या वहिनीबरोबर हरिपुरास राहाणें मला मनापासून आवडे. पण शाळेचा काच व वडिलांचा धाक असल्यामुळें मला पुन्हां लौकरच समडोळीस यावें लागे.

समडोळीच्या वास्तव्यांत माझे खाण्या-पिण्याचे साधारणत: हालच झालें. मुद्दाम कोणीं केले असे नव्हे. पण संगोपन नीटसें झालें नाहीं. वडील कुटुंबांतील कर्ते. पण ते बायकांच्या ज्यात काय करूं शकणार ? त्यात ते विधुर. उपन्यासारखेच त्यांना वर्तावें लागे. पण असें असतांहि माझ्या मनाचें संगोपन नीट होईल, माझ्या विद्याभ्यासाची आबाळ न होईल व मला कुसंगत न लागेल या विषयी त्यांनीं पुष्कळ दक्षता घेतल्याचें आज मला आठवतें. त्याच्या सवडीप्रमाणें ते अभ्यासांत लक्ष घालीत, कथापुराणांतील गोष्टी सांगत. आणि अवांतर खूप बोलत. त्यानीं केलेली ही पेरणी मला पुढच्या आयुष्यांत फार चांगली उपयोगी पडली. आजलाहि तें पितृधन माझ्या कामीं येतें आहे व या दृष्टीनें मी आपल्या वडिलांचा मोठा ऋणी आहे.

याच वेळी मला वाचनाचा नाद लागला. एका विचित्र मार्गानें Truth is stranger than fiction असा प्रकार झाला. सहृदय वाचकानीं विश्वास ठेवावा. जें घडलें तेंच सांगतों.

समडोळीला वारणा नदी आहे. गांवांपासून थोडी लांब आहे. पण गांवाला पाण्याची दुसरी काही सोय नाहीं. यामुळें सर्व स्त्री-पुरुषांना व मोठ्या मुलांना आंघोळीकरितां नदीवरच जावें लागे. आम्ही आपटे कुटुंबातील मुलें अशींच नदीवर जात असूं.

आमच्या राहात्या वाड्यापासुन सुमारे पाऊणशें पावलाच्या अंतरावर आमची आळी संपे. त्याकाळीं या टोकाशी एक कौलारू छप्पर, पुढें मोकळें आंगण असलेलें होतें. आमचा नदीला जाण्या—येण्याचा रस्ता या घराला वळसा घालून पुढें जाई.

मी सागतो त्या वेळीं या कौलारू घरांत मोहना जोगतीण या नावाची एक बाई नव्यानेच राहण्यास आली होती. ही पूर्वी मुंबईला राहात होती म्हणे. आणि तिचा धंदा होता कळवतिणीचा.

मला याचा कांहींच उलगडा झाला नाहीं. पण मोहना आमच्या तेयील इतर बायापेक्षां रंगारूपानें व वागण्यांत अगदीं वेगळी होती. एवढें मला आठवतें.

कारण सागतां येत नाही, पण मी आंघोळीला म्हणून नदीकडे निघालों व मोहना आपल्या अंगणांत असली कीं, माझ्याकडें हसत पाहायची व म्हणायची, "काय वामणबुवा, अगुळीला निघाला ?"

मी हसून मान डोलावयाची व लगोटी सावरीत धूम ठोकायची. असे दोन-चारदा झाल्यावर आम्हां दोघात आप्तभाव निर्माण झाला. मोहनेच्या बोलावण्यानें मी तिच्या घरात जाऊन बसू लागलों. खोबरें व खारका असें काहीं खाद्य तिनें आग्रहपूर्वक दिल्यास मी तें घेऊंहि लागलों. या वेळीं मला तिच्याकडे असलेलें हतीमताई हें प्रसिद्ध पुस्तक सहज पाहण्यास मिळालें. पहिलीं दोन-एक पानें तिथेंच बसून वाचलीं. मला तें मोठें आकर्षक वाटलें. मी तें वाचण्याच्या इच्छेनें घरी घेऊन आलों.

त्या कालचा विचार करतां स्वत: मोहनेला लिहिणें-वाचणें कितपत येत होतें, कोण जाणें. पण त्यानतर मला तिच्याकडून—ठकसेन राजपुत्राच्या गोष्टी, गुलबकावली, पद्मावती राजकन्येची गोष्ट व मंजुघोषा इत्यादि पुस्तकें वाचण्यास मिळाली. व तिचा साठा सपला. पण माझ्यावरचा तिचा लोभ चालूं राहिला. मी समडोळीला असेंपर्यंत ती तिथेंच होती. आमचें सख्यहि टिकून होतें.

या अहेतुक व निष्कपट प्रेमाचा उलगडा माझ्या बालबुद्धीला त्या काळी झाला नाहीं. पण पुढच्या वयांत मला उमगून आलें कीं, माझें पोरकेपण व तिच्या हृदयातील मातृत्व याची ती सांगड होती. माझ्या वाचनाचा श्रीगणेशा घालून देणारी माझी ही मार्गदर्शिका मला पुढच्या आयुष्यांत कधींच भेटली नाहीं. हें सांगायला नकोच. पण मला मात्र वाटतें कीं, मी लेखक झाल्याचें तिला कळतें तर मोठीच मौज झाली असती. असो.

माझी ही सहज निर्माण झालेली वाचनप्रियता माझ्या वडिलांच्या ध्यानीं येताच त्याना माझी ती संवय बरी वाटली, मग त्यानीं स्वत:च्या ठेवणीतील कांहीं पुस्तकें मला वाचण्यास दिली. केरूनाना छत्रे याचे बालमित्र. वि. कों. ओक यांचें मधुमक्षिका व त्याच्याच संपादकत्वाखाली निघणाऱ्या बालबोध मासिकाचे काहीं अंक अशीं तीं पुस्तकें होती. माझ्या बालमनाचा विकास होण्यास माझें हें वाचन मोठे उपयुक्त झालें यांत शंका नाहीं.

या विषयीं आणखीहि सांगण्यासारखें पुष्कळ घडलें आहे. पण विस्तारभयास्तव इथेंच थांबतो आणि समडोळी सोडून पुढच्या शिक्षणाकरितां साताऱ्यास आल्यानंतर काय काय घडत गेलें इकडे वळतो.

इ. स. १९०१ सालीं मी सातारा येथें नव्यानेंच स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें प्रविष्ट झालो. हें मी मघा सागितलें आहेच, तोच धागा पुढे चालूं.

मी आतां प्रेमळ बंधु—वहिनींच्या आश्रयास आल्यामुळें माझें संगोपन व पोषण चांगलें होऊं लागलें, हें उघड आहे. शाळेंतील अध्ययनहि सुरळीत चालूं झालें. माझी बुद्धि व धारणाशक्ति चांगली होती. हें माझें मीच सागितल्यास ती दर्पोक्ति ठरूं नये असें वाटतें. यामुळें मी शिक्षक वर्गांतहि आवडता विद्यार्थी ठरलों. अशा प्रकारें माझ्या इंग्रजीच्या पहिल्या तीन इयत्ता सुखांत पार पडल्या. शहरात आल्यामुळें माझी वाचनाची आवड आणखी वाढली. मी मिळेल तें पुस्तक वाचू लागलों. अर्थात् जी आकर्षक वाटत तीच मी पूर्ण वाचत असें.

त्या वेळच्या वाचनांत हरिभाऊंचें 'करमणूक' साप्ताहिक माझ्या फार आवडीचें. लोकमान्याचा 'केसरी' नीट आकलन होत नसें. पण आदरानें चाळून पाही. आरबी भाषेंतील सुरस गोष्टी, हरिभाऊंची—पण लक्षांत कोण घेतो. व उष:काल या पुस्तकांनीं माझ्या मनाची फार मोठी पकड घेतली. उष:कालचीं तर दोन-तीन पारायणें केलीं कथा—कीर्तनें ऐकण्याचाहि मला मोठा नाद लागला. माझ्या वाचनप्रितेला ही फार चागली जोड मिळाली.

त्या काळीं महाराष्ट्रांत नामांकित कीर्तनकार दोन होऊन गेले. एक माहुलीकरबुवा. दुसरे मसुरकरबुवा. दोघाचीं कीतनें बहारीचीं होत. पण मला त्यांतल्या त्यांत मसुरकर बुवाचें कीर्तन विशेष आवडे. ह्या बुवांचा

मोठा भर कविवर्य मोरोपंत यांच्या आर्यावर असे. कीर्तनार्यांच्या या नादामुळें माझें लक्ष, सदैव लोकप्रिय असलेलें नवनीत या कविता सग्रहाकडें वेधलें. नांवाप्रमाणें हें पुस्तक नवनीत (लोणी) च होतें. मला संत वाङमयाची तोंडओळख होण्यास या पुस्तकाचा मोठाच उपयोग झाला.

आज किती धन्यता व कृतज्ञता वाटते याबद्दल !

हें सर्व ठीक घडत गेलें. माझ्या विद्यार्थी जीवनाला अगदी योग्य दिशा लागली म्हणण्यास हरकत नाहीं. पण वाह रे, माझी अदृष्ट देवता ? ती माझ्या भावी आयुष्याचे धागेदोरे कांहीं वेगळयाच पद्धतीनें गुफूं लागली होती ! कसे ?–तें थोडक्यांत दर्शवितों.

त्या काळीं म्हणजे इ. स. १९०२–३ सालीं भारताचें राजकारण येथील प्रजेच्या दृष्टीने ठराविक चाकोरी सोडणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसू लागली होतीं. इग्रजी सत्ता ही केवळ परमेश्वराची कृपा नाहीं. आपलें अदृष्ट आपणच शोधून पाहिलें पाहिजे, असें बहुतेक लोकाधुरिणांना वाटूं लागलें होतें. लोकमान्यांच्या कर्तृत्वशील युगाचा प्रारंभ जोमांत सुरु झाला होता ! आणि या वेळीं ब्रिटिशसत्तेचे भारतांत पाठविलेले प्रतिनिधि होते व्हा. लॉर्ड कर्झन !

ग. ज. या नात्यानें कर्झनसाहेबांची कारकीर्द हिंदुस्थानांत खूपच गाजलेली आहे. त्यांच्या साम्राज्यविषयक उन्मादानें आमच्या मुर्दाड मनाला लाथा दे देऊन जागृत केलें आहे !

या वेळीं महाराष्ट्रांत वाङ्मयरूपानें एक प्रचंड शक्ति निर्माण झाली होती. ती म्हणजे प्रा. शि. म. परांजपे यांच्या काळपत्राचें साप्ताहिक दर्शन होय ! काळकर्त्यांचे निबन्ध म्हणजे काय ? दावानलच तो ! महाराष्ट्रांतील अनेकानेक तरुणांचीं मनें जागीं झाली ! इंग्रजी सत्तेविषयीं जळूं लागलीं.

काळकर्त्यांनीं दर आठवडयाला रणशिंग फुंकलें आणि ललकारी दिली. ब्रिटिशांची मगरमिठी सुटली तरच भारताचा तरणोपाय !

या ललकारीनें ज्या अनेक तरुणांची माथी भडकलीं त्यांत ना. ह. आ. नांवाच्या एक फाटक्या अंगाचा बावळट पोर होता ! त्याचें वय पधरा. म्हणजे त्याची किशोरावस्थाच !–पण संतप्त मनाची भरारी केवढी दांडगी ! खानदेशांत जावें. भिल्लांच्या टोळ्या जमावाव्यात, इंग्रजी सत्तेवर सोडाव्यात, राजस्थानांत जावें ती राजपुतांचें शौर्यानी धैर्ये जागृत करावें. स्वराज्य स्थापावें बंगाल्यांत जावें आणि तेथील क्रांतीकारकांच्या हातांत हात घालून इंग्रजांना हांकलून द्यावे !–एक ना दोन. सारा अविवेकी उन्माद !

परिणाम काय झाला ? माझें अभ्यासावरील मन उडालें ? एका मोठ्या खाईंत उडी घेण्यास मी सिद्ध झालों. माझ्याप्रमाणें माझे कांही स्नेहीहि असेच पिसाटलेले होते ? सर्वांनुमतें ठरलें; आतां घराला, शाळेला, विद्याभ्यासाला राम राम ! चलो दिल्ली !!

मनाच्या अशा गोंधळांत इ. स. १९०४ साल चालूं झालें. मी इंग्रजी चवथ्या इयत्तेंत गेलों. तसें सारे कांहीं ठीक होतें. पण दैवाची गति विचित्र होती. घरांतील मंडळीना वा शाळेंतील गुरुजनांना आमच्या मनःस्थितीचा थांग लागला नाही. आमचें आम्हांलासुद्धां नीट कळलें नाहीं. आणि मग एके दिवशीं ऑगस्ट–सप्टेंबर महिना असावा, मी व समान विचाराचे असे दोन सौंगडी अशा तिघांनीं सातारा सोडला ! पायीं प्रवास करीतच देशाटन करावयाचें असें ठरवून पुण्याचा रस्ता पकडला !

प्रवासाच्या या प्रारंभाला रामकृष्ण जोशी, गोपाळ नातू व मी असें त्रिकूट होतें. चवथे कीं पांचवे दिवशीं आम्ही पुणें गांठलें. या प्रवासांत आमचे जे हाल झाले. त्यातच गोपाळ नातूची गठडी वळली त्यानें रडून भेकून व हातापायापडून घरी परतण्यास आमची परवानगी काढली. ! आम्हीं त्याला ती दिली. एका अटीवर. आमचा थांगपत्ता कोणालाहि लागू द्यावयाचा नाहीं. जर विश्वासघात झाला तर प्राणाशीं गाठ असें त्याला बजावलें !–तो सोडून गेला, राहिलों मी व रामक्या !–उत्तर हिंदुस्थानच्या भटकंतीत तो माझ्याबरोबर वर्ष दीड वर्ष होता ! पुढें तो घरच्या ओढीनें व प्रवासाच्या हालअपेष्टानी कटाळला. आम्ही राजस्थानांत असतांना तो साताऱ्यास परतला. पण दुर्दैवाने त्या सालच्या प्लेगच्या साथीत बळी पडला. राहिलों मी एकटा !

आतां मागें आमच्या घरीं काय झालें ? आमचा शोध घेण्याचा आमच्या आप्तस्वकीयांनी प्रयत्न कसा केला व आम्हीं हुलकावण्या कशा दिल्या या गोष्टी सांगत बसत नाही. आज गोपाळ नातू ह्यांत नाहीं. समविचाराचे जवळचे व दूरचे अनेक सौंगडी व आप्त इष्ट काळाच्या पोटांत विलय पावले आहेत, त्या काळातून या काळांत आला आहे केवळ ना. ह. आ. ! तेव्हां माझ्या एकटयापुरताच मी विचार करतों.

घरांतून निघून जातांच माझ्या शालेय शिक्षणाला कायमचा विराम मिळाला ! सड तुटलेल्या व वाऱ्यांत सांपडलेल्या पतंगाप्रमाणें माझी अवस्था झाली ! दिशाशून्य अशा एका अज्ञात जीवनाकडे मीं धांव घेतली ! अर्थात् या छोटयाशा प्रबन्धांत मी काय काय सांगूं ?–म्हणून आटोप करणें भाग आहे. माझ्यांतून ना. ह. आपटे हा लेखक कसा उपटला ? किंवा माझी ती मनोभूमिका कशी तयार झाली ? एवढें थोडक्यांत सांगणार आहे.

नातू सोडून गेल्यावर आम्ही पुणें सोडलें व नगरवरून मोंगलाईंत शिरलों, दौलताबाद, देवगिरी, वेरूळचीं लेणी पाहात नंतर आम्हीं खानदेशांत घुसलों ! एवढया अडीचशें किंवा तीन साडेतीनशेंवरा—प्रवासानें आपण खुळे तर नाही ? ही जाणीव आम्हाला झाली. तरी भिल्लांच्या वस्तीचा शोध घेतला व ती पदयात्रा सुरू झाली. मिसूडसुद्धां न फुटलेलीं व फाटक्या अंगाचीं पोरें आम्ही. कृष्णवर्णीय असे ते भिल्ल आम्हांला राक्षसच वाटले. त्यांची भाषा आम्हाला कळेना व आमचे थोर विचार त्यांना कळेनात ! पण ती जगली माणसें सालस होती. आमचें पोरकें वय पाहून त्यांना आमची कींवच आली असावी. त्यांनीं आम्हांला भरपूर दुधदुभतें पुरवून चटणी भाकरी पुरविली !

भिल्लांच्या टोळ्या जमवून क्रातियुद्धाचा आरंभ करावयाचा ही आमची कल्पना वाऱ्यावर उडत गेली !–ते दोघे खदे वीर बगालच्या रोखानें पुढें चालले !–दरमजल करीत वगभूमीत आले.

शालेय शिक्षणात आम्ही हें शिकलों होतों कीं, हिंदुस्थान अफाट आहे. तेथें तीस कोटी लोक नांदतात व ते सहा हजार मैलावर राहात असलेल्या इंग्रजाचे गुलाम आहेत ! पण या वस्तुस्थितीचें यथायोग्य व खरे चित्र आम्ही कल्पनेतहि जाणले नव्हतें ! पण हजार मैलाची पदयात्रा घडून येतांच आमचा कैफ उतरत गेला ! आम्ही हिन्दवासी अत्यत दुर्बल, कमालीचे भेकड व आचाराविचारात अगदीं विस्कळीत आहों. त्या मानाने इंग्रजी सत्ता पोलादी ताकदीची आहे, हें आम्ही जाणले !

बंगाल मधला एकच प्रसंग सांगतो. त्या पूर्वी एका गोष्टीचा स्पष्ट खुलासा करतों. माझ्या त्या अज्ञातवासांत व दिशाशून्य जीवनांत जेणे करून मी क्रान्तिवीर ठरेन असें एकहि लहान-मोठें कृत्य माझ्या हातून झालें नाहीं ! तसें कांहीं करण्याइतकी कुवतहि माझ्या अंगीं नव्हती ! क्रान्तिकारक विचारांनीं व इंग्रजी सत्तेविषयींच्या तिटकाऱ्यांनीं मी पिसाट झालों होतों एवढेंच काय तें.

सत्य गोष्ट ही कल्पित कथेपेक्षांहि विलक्षण चमत्कारिक असते. एवढें वाचकांनीं ध्यानीं घ्यावें व पुढचें वाचावें.

बंगालमध्यें असतां आमच्या प्रतींच्या तरुण लोकांत आम्ही मिसळलों होतों. बाँब कसे करावयाचे ? आणि शस्त्रें कशीं जमवावयाचीं ? यांचा खल आमच्यांत होई. त्यावेळीं आमच्यापैकीं एका बंगाली वीरानें चंद्रनगरहून एक ( मोडकें तोडकेंच असावें ) लहानसें पिस्तूल मिळवलें होतें व तो त्याचा अपूर्व ठेवा होता ! त्याविषयीं त्याचा ताठा आणखी मोठा होता !

वंगभूमींत डोंगरांचा अभाव आहे पण घनदाट अशीं वेळूवनें मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा एका जंगलांत आम्ही आठ-दहा तरुण जमलों. पिस्तुलाचे मालकच आमचे म्होरके व वंदनीय वीर होते. त्यांनीं पैदा केलेल्या अपूर्व ठव्याचें ते आम्हांला प्रात्यक्षिक दाखविणारे होते ! ब्रिटिशांच्या दुर्दमनीय सत्तेला एकदम मोठा धक्का बसणार होता !

पण नवल असें घडलें. त्या आमच्या धाडसी वीरालाच त्या एवढ्याशा शस्त्रासंबंधीं काडीचें ज्ञान नव्हतें. हें उघड दिसूं लागलें, तें पिस्तुल हाताळतांनाच त्याचा हात लटपटत होता व चेहरा घामानें डबडबला होता ! तरी त्याने वीराचें अवसान आणून बंगाली, हिन्दी इंग्रजी या भाषांची खिचडी केली आणि गंभीरपणें विषय गहन असल्याचें सुनावलें. आम्ही आपसांत डोळे मिचकावीत हंसलों. त्या वीरानें हें हेरलें ! "पोलीस ! " एवढा एक शब्द उच्चारून तो उठला व पसार झाला ! आम्ही त्याचेच जोडीदार. इंग्रजी सत्ता नुस्ती भयावह नाहीं तर मृत्यूंजय आहे हें आम्ही जाणत होतों ! आम्हीहि पांगलों.

पण या प्रसंगानें मीं हदरलों तर खराच; पण सावध व विवेकी झालों. माझ्या क्रान्तिकारक विचारांनीं एकदम एक नवीन वळण घेतलें! इंग्रज इतका बलिष्ट कां ?– तो आमच्या एवढ्या लोकसंख्येला डरत कां नाहीं ? आणि आम्हीं एका शिपुरड्यापुढें नांगी कां टाकतों ? अशा तरतम विचारांकडे मी वळलों.

त्या काळीं आम्हीं जी भटकंती करून भारताच्या विस्ताराचें व लोकस्थितीचें जें अवलोकन केलें त्यांत माझ्या मनाची प्रवृत्ति चांगल्याकडे राहील अशा अनेकानेक गोष्टी घडल्या. त्यांत थोरा मोठ्या लोकांचें दर्शन होणें, कांहींच्या संगतीचा लाभ होणें व त्यांच्याकडून प्रगट अप्रगट असे विचार ऐकण्यास मिळणें आणि त्यामुळें माझ्या ज्ञानांत भर पडणें ही गोष्ट प्रामुख्यानें घडली. भटकंतीमध्यें बंगाली व हिन्दी या भाषांशीं माझा परिचय झाला. हिंदीतर फार चांगलें कळायला लागलें. मग माझ्या डोक्यांत प्रकाश पडला कीं, इंग्रजी भाषा व वाङ्मय यांचा परिचय झाला पाहिजे.

मला जीं थोरमाणसें भेटलीं त्यांची सामान्य व सध्यां आठवते ती नामावली देतों. बेलूर मठातील विवेकानंद स्वामींचे गुरु बन्धुव-हुश: अभेदानद नांव असावें–हे भेटले. त्यानीं आम्हांला आशीर्वाद देऊन सांगितलें, 'तारुण्यांत येतां आहां. परद्रव्य व परकांता यांच्याविषयीं निःस्पृहता ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न करा.''

यानंतरची नांवें सांगायचीं म्हणजे हिंदीचें महान् पंडित महावीर प्रसाद द्विवेदी, सरस्वती या हिंदी मासिकाचे आद्य संपादक, कादंबरीकार देवकीनंदन खत्री व किशोरीलाल गोस्वामी, पंडित मदनमोहन मालवीय, कविश्रेष्ठ मैथिली शरण गुप्त, स्वामी रामतीर्थ इत्यादि. महाराष्ट्रीयांपैकीं पंडित व आज ब्रह्मर्षी पदाला पोचलेले पूज्य सातवळेकर इत्यादि.

माझ्या मनाचें संगोपन होण्यास यांची केवढी मदत झाली असेल, तें काय वर्णन करावें ?–यामुळें मला एका विद्याव्यसनाखेरीज दुसरें व्यसन जमलेंच नाहीं आणि यांतूनच मी केव्हांतरी व कसातरी लेखनाकडे वळलों ! या संबंधींहि मनोरंजक अशा कितीतरी आठवणी आहेत. यांपैकीं एकच ज्यांत हरिभाऊंचा संबंध आहे तेवढी सांगतों व माझीहि लांबलेली चर्पटपंजरी संपवितों.

त्या वेळीं मी राजस्थानांत जयपूर शहरांत होतों. मराठा क्लब नांवाची महाराष्ट्रीयांची एक संस्था होती. जयपुरास एम. ए. पर्यंत शिक्षण फुकट होतें. यामुळें पुष्कळ महाराष्ट्रीय तरुण तिथें येत. यांत होते विष्णु वामन डोळे. हे माझे एक सहानुभूती स्नेहीक होते.

डोळे माझे स्नेही असतां मी सटरफटर असें लिहीत होतों. त्यांचें पहिलें वाचन वि. वा. करूं लागले. त्यांना त्यांत गम्मत वाटली. म्हणून त्यांनी एक लेख– शिकाशकून– असें कांहीं नांव असावें हरिभाऊ आपटे यांच्याकडे स्वतःच्या नांवें पाठविला ! आणि मौज ही तो लोकरच करमणूक पत्रांत प्रसिद्ध झाला. डोळे यांच्या नांवें करमणूकीचा अंकहि आला !

पण यांत हरिभाऊंच्या वतीनें लिहिलेलें एक पत्र व त्याकाळचें प्रसिद्ध दादोबा पांडुरंग कृत लघुव्याकरणहि आलें.

पत्राचा हेतु असा होता—

" लेखाची भाषा बरी आहे. लेखन भारी अशुद्ध आहे. महाराष्ट्रापासून दूर असल्यामुळे भाषा येतें पण ती लिहावी कशी हें लेखकाला कळत नसावें. म्हणून लेखकाच्या सामान्य माहिती करितां सोबत लघु व्याकरण पाठविलें आहे तें चाळावें. "

डोळे यांच्या नांवानें पत्र. पण तें होतें मला ! – मीं पत्र पाहतांच केवडा शरमिंदा झालों असेन, हे सांगत नाहीं. सावध झालों.

आतां या डोळ्यांची ओळख देतों. सध्यांच्या प्रसिद्ध लेखिका स्नेहलता दसनूरकर यांचे ते सख्खे चुलते होते !

● ● ●



# श्री. काशिनाथपंत देवल यांचा
# तेजस्वी जीवनपट

**एस्. ए. कुलकर्णी**

" सर्कस म्हणजे तेज, सर्कस म्हणजे चैतन्य, तारुण्याचा-रगेलपणाचा धुंद जोष, शक्ति, युक्ति अन् धाडसाचा विलक्षण संयोग! सर्कस हें कांहीं येऱ्या गबाळयाचें क्षेत्र नव्हें, सर्कशींमध्यें डान्सिग पार्टर्या, स्त्रीच्या अर्धवट उघडया देहाचें उत्तान प्रदर्शन आणि सर्च-लाईटचा भपका याला महत्त्व नाहीं; रिंगमध्यें जीं अद्‌भुत कामें दाखविलीं जातात यांतच सर्कसचें खरेखुरें वैशिष्टय आहे," असे आवेशपूर्ण उद्‌गार काढणारे श्री. काशिनाथपंत देवल सर्कशींतलें खडतर व धाडशी जीवन ४४ वर्षें जगले आणि १९५५ मध्यें सर्कशी-मधून निवृत्त झाले तरी त्यांच्यातील तेज, चैतन्य, आवेश यांचें उद्‌बोधक प्रतिबिंब आजहि त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येतें. आवेशानें बोलूं लागले कीं, त्यांच्या उद्‌गारांतील तळमळ घडोघडी अनुभवाला येते; त्यांच्या सत्यप्रियतेचा प्रदीर्घ प्रत्यय येतो. ते सर्कशींतले चित्त-थरारक अनुभव सांगूं लागले कीं ऐकणारा गुंगून जातो आणि त्याचें मस्तक नम्र होतें. त्यांची सर्कस होती कशी आणि आदर्श सर्कस असावी कशी याची जवळ जवळ मुद्देसूद व्याख्या, त्यांच्या वरील निःसंदिग्ध उद्‌गारांतून स्पष्टपणें व्यतीत होते.

श्री. काशिनाथपंत देवल सर्कशींत कसें दाखल झाले हें चिंतनीय आहे. देवल सर्कसचे मूळ संस्थापक म्हणजे त्यांचे चुलते श्री. बाबा-साहेब देवल हे होत. त्यांनींहि सर्कस म्हणजे एक पोटभरू व्यवसाय या दृष्टिकोनांतून ती स्थापन केली नाहीं. त्यामागें एक निःसीम ध्येय-धारणा सामावलेली होती. इ. स. १८८० मध्यें एक युरोपियन सर्कस मुंबईला आलेली होती; त्या सर्कसवाल्यांनीं "अशा प्रकारचीं कामें भारतियांना करतां येणें कधींच शक्य नाहीं" अशी इर्षेबाज भाषा वापरली आणि एक प्रकारचें भारताला अप्रत्यक्ष आव्हानच जणूं दिलें. महाराष्ट्राला या बाबतींत मूग गिळून गप्प बसणें परवडण्याजोगें वाटलें नाहीं. मिरज, कुरुंदवाड, कोल्हापूर वगैरे संस्थानिकांना युरोपियन सर्कसचें वर नमूद केलेलें आव्हान झोंबलें होतें. त्यांना तें सारखें बोंचत होतें. तेव्हां श्री. विष्णूपंत छत्रे यांनीं एक सर्कस काढली. कुरुंद-वाडकरांनीं आपला रिसाला छत्र्यांच्या स्वाधीन केला; कोल्हापूरकरांनीं हत्ती दिला. ही सर्कस पुण्याला गेली आणि त्याच वेळीं म्हैसाळचे श्री. बाबासाहेब देवल म्हैसाळ ते पुणें हा प्रवास अक्षरशः पायीं करून सर्कशींत दाखल झाले. प्रथमतः जवळ जवळ १० वर्षें आचारी म्हणून सर्कशींत राहिलें; पण या कालावधींत सर्कशीचें संपूर्ण तंत्र त्यांनीं आत्मसात करून घेतलें. पुढें १८९५ मध्यें तेथून ते निघाले आणि गणपतराव, माधवराव, श्रीपतराव या त्रिवर्ग बंधूंसमवेत त्यांनीं "देवल सर्कस" ची स्वतंत्रपणें स्थापना केली. श्री. काशिनाथपंत देवल हे वयाच्या ११ व्या वर्षी १९११ सालीं या सर्कशींत येऊन मिळालें. त्यावेळीं ते मराठी तिसरींत होते आणि कुटुंबियांचा जबर विरोध असतांहि ते अगदीं जिद्दीनें, हट्ट धरून घरांतून बाहेर पडले. अकरा वर्षांच्या शाळकरी मुलाला सर्कसमध्यें काम तरी कुठलें मिळणार? बाजारहाट, स्वैंपाकपाणी हीं कामें प्रथम त्यांच्या वांटयास आलीं. सर्कसचीं कामें शिकावीत अशी त्यांची जबर इच्छा असायची. परंतु तेव्हांचे ते ट्रेनर मास्तर 'भटजी' म्हणून त्यांची हेटाळणी करीत. मात्र संस्थापक बाबासाहेब देवलांना वाटत असें कीं. सर्कशींतलें काम कोणावांचून अडून राहतां उपयोगी नाहीं. त्यामुळें वारंवार खातीं बदलून ते सर्वप्रकारचें ज्ञान लोकांना सहजगत्या मिळवून देत. या त्यांच्या समयोचित उदार धोरणाचा काशीनाथपंतांना चांगलाच फायदा झाला. ते सर्कसच्या विविध खात्यांमध्यें बिनचूक काम करूं लागले.





देवल सर्कसचे मालकद्वय

श्री. विनायकराव देवल

श्री. काशिनाथपंत देवल

## 'सर्कससिंह' चा किताब

इ. स. १९१३ मध्यें देवल सर्कस ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा, सिलोन वगैरे मुलखांतून हिंडून आली, आणि श्री. काशीनाथपंतांना देशपर्यटनाचा पहिला योग लाभला. १९१४ सालीं म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या प्रसंगीं या सर्कशींत १०० लोक होते. २५ घोडे, ४ हत्ती, ४ वाघ, ६ सिंह असा सर्कसचा पसारा होता. लढाईमुळें देवलांच्यावर महर्गतेची आपत्ती कोसळली; नाना प्रकारच्या अडचणींना त्यांना तोंड द्यावें लागलें. त्यामुळें सर्कस कुर्ग मल्लाड प्रांतांत कशीबशी खेळत होती. १९१९ मध्यें लोकमान्य टिळकांनीं देवल सर्कस पाहिली आणि बाबासाहेबांना 'सर्कस सिंह' हा बहुमानाचा किताब दिला. देवल बंधूंना आपल्या प्रयत्नांचें अखेर चीज झाल्याचें समाधान लाभलें. लोकमान्यांच्या प्रशस्तीनें नवी प्रेरणा मिळाली, नवा उत्साह सर्कसमध्यें निर्माण झाला आणि अशा रीतीनें . स. १८८० मध्यें परदेशी सर्कसनें दिलेलें आव्हान महाराष्ट्रानें स्वीकारून साकार करून दाखविलें !

## सर्कसची कीर्तिपताका आणि गंडांतर

"आपल्या लोकांना सर्व अवघड कामें आलीं पाहिजत" अशी श्री बाबासाहेबांची सतत तळमळ असे. त्यामुळें तात्पुरत्या करारावर युरोपियन कसरतपटु बोलवायचें आणि आपलीं माणसें शिकवून तयार करायचीं ही त्यांची ठरलेली पद्धत असे. मोटर जंप करणारे जॅकर्सन, तसेच फिलिपाईपन्सचे कसरती लोक, जपानी लोक सर्कसमध्यें यऊन गेले आणि म्हैसाळ. मिरज, तासगांव, कागवाडची नवजवान मंडळी बाबासाहेबांनीं शिकवून वाकबगार करून सोडली. तेंच धोरण पुढें श्री. काशिनाथपंतांनींहि अंगिकारलें. १९२० सालीं देवल सर्कस पुनः परदेशांत गेली. परंतु थोर संस्थापक श्री. बाबासाहेब देवल उदररोगानें आजारी झाल्यामुळें परतले आणि सर्कसची सूत्रें काशिनाथपंत व विनायकराव या बंधुद्वयांच्या हातीं आलीं. अर्थात् हे हातहि तितकेच कर्तबगार ठरले. १९२१ मध्यें बाबासाहेब स्वर्गवासी झाले., तेव्हां सर्कस परदेशांतच होती. परदेशचे अनुभव नवीन होते, त्यामुळें सर्कशीला आर्थिक ठोकर बसली. त्यांतच कर्तबगार संस्थापकांच्या मृत्यूनें पोकळी निर्माण झाली. कांहीं घरगुती वादहि याच वेळीं निघाले. तेव्हां काशिनाथपंतांना आपली सर्कस आज्ञातवासांत ठेवून ताराबाई सर्कसमध्यें १५०० रु. पगारावर नोकरी धरावी लागली. ताराबाईंनीं त्यांना कधींहि नोकर म्हणून वागविलें नाहीं. "तुम्हीं सिंहाचे बच्चे आहांत, मालक आहांत, तुम्हीच ही सर्कस चालवा." अशी त्यांनींहि परोपरीनें विनवणी केली; परंतु काशिनाथपंतांचें ध्येयवादी कार्यक्षेत्र त्यांना बोलावीत होतें. कशीबशी एक वर्षभर त्यांनीं नोकरी केली. १९२२ मध्यें देवल सर्कस पुनः नव्या दमानें घरांतून बाहेर पडली. तेव्हां सोलापूरच्या (मेकॅनिक थिएटर) विजापूरच्या (छत्रे थिएटर) बंदिस्त थिएटरमध्यें सर्कशीचे प्रयोग होत. हळूं हळूं सर्कसचा व्याप वाढला. किर्तिपताका फडफडूं लागली. आणि १९२५ पासून देवल सर्कस ही भारतांत अग्रगण्य गणली जाऊं लागली. श्री. काशिनाथपंतांनीं तेव्हांपासून १९५५ पर्यंत अहोरात्र

एक प्रकाराचा निदिध्यास घेऊन सर्कस चालविली, प्रामाणिक निष्ठेनें काम करीत सारें जग पालथें घातलें, दिगंत कीर्ति मिळविली. आणि या क्षेत्रांत महाराष्ट्राला मोठें मानाचें स्थान मिळवून दिलें. ढाली, पदकें यांचा त्यांच्यावर-त्यांच्या गुणावर-अक्षरशः पाऊस पडला. बडोदा, म्हैसूर, त्रावणकोर, कोल्हापूर वगैरे अनेक संस्थानांकडून सर्कशीला वर्षासन मिळालेलें होतें. पांच-सहा तोळ्याचें एखादें सुवर्णपदक, हजार-दोन हजार रुपयांची बिदागी अशा थाटाची हीं वर्षासनें असत.

### श्वापदांच्या सहवासांत

सर्कस म्हणजे एक तहहयात धोक्याचें जीवन असतें. जिवावर उदार होऊन प्रत्येक काम करावें लागतें. परतु काशिनाथपंतांना या धोक्याची कधींच भीति वाटली नाहीं. " खरचटणें, पडणें, जखमा करून घेणें या तर सर्कसवाल्याच्या पाचवीला पुजलेल्या गोष्टी आहेत. जो कुस्ती खेळतो त्याला दुखापती या होणारच-त्यात आश्चर्य काय ? दुखापत झाली नाहीं तरच आश्चर्य ! " अशी बेडर भाषा आजहि त्यांच्या तोंडून ऐकायला मिळते. आपले कितीतरी चित्तथरारक अनुभव त्यांनीं या संदर्भांत सांगितले. रोप डान्सिगचें काम करतांना एकदां तर ते तंबूच्या वरच्या टोंकावरून जे निसटलें ते खालीं रिंगमध्यें येऊन आदळले ; महिनाभर शुश्रुषा करून घ्यावी लागली; परंतु त्याहि परिस्थितीत त्यांनीं आपली सर्कशींतलीं कामें जिद्दीनें चालूच ठेविलीं होतीं. एकदां एका बुलडॉगनें त्यांचा दंड अक्षरशः फोडून काढला. आणि या जखमेचा व्रण त्याच्या दंडांवर स्पष्टपणें दिसून येतो.

एकदां काशिनाथपंतानी म्हैसूरहून चार सिंह विकत आणले.ते वयानें थोडेसे मोठे असल्यामुळें त्यांना शिकविण्याची जबाबदारी स्वीकारण्यास ट्रेनर मास्तर तयार झाले नाहींत. काशिनाथपंतांची मोठी चमत्कारिक परिस्थिती झाली. आपण तर सिंह आणले, चार हजार रुपये खर्चले ; ट्रेनिंग खातें जबाबदारी घेत नाही. काहीं दगाफटका झालाच तर जन्मभर माथ्यावर अपयशाचें खापर फुटणार आणि कंपनीच्या नुकसानीचा आरोपहि आपल्यावर येणार. या विलक्षण कात्रीत ते सांपडले. अखेर या सिंहाना तयार करण्याचें जोखमीचें काम त्यांनीं स्वतःच आपल्या अंगावर घेतलें. पिंजऱ्यांतून सिंह बाहेर पडले म्हणजे रिंगणांत देवलांच्या शिवाय दुसरे कुणीहि असत नसे. एके दिवशीं त्याच्या एका सिंहानें भलतेंच धाडस केलें. बाहेर निसटून जावें या उद्देशानें त्यानें वरती झेंप घेतली व आपल्या पंजानी लोकंडी गजाची वरलीं टोकें धरून ठेवलीं. सिंह बाहेर निसटला असतां तर दगाफटका होण्याचा निश्चित संभव होता. कारण सिंह पुरेपूर माणसाळलेला नव्हता. आणि देवलांखेरीज कुणीहि त्याच्यापुढें जायला धजत नव्हता. त्यातून सिंह तर खूपच चवताळलेला. मागचापुढचा कसलाहि विचार न करतां देवलांनीं त्याच्या शेपटीला खालून धरलें आणि दोन्ही हातानें ओढून आंत पिंजऱ्यात पाडलें. तो त्यांच्याच अंगावर पडला. पण त्याला विलक्षण चातुर्यानें चुचकारून गोंजारून वठणीवर आणले. तोच सिंह पुढें देवलांचा नुसता उजवा हात होऊन राहिला.

वाघ-सिंहांना सर्कशीमध्यें अगदीं पिल्लाच्या अवस्थेंतच आणावें लागतें. परंतु ज्याप्रमाणें लहान मुले दांत येतांना वारंवार आजारी पडतात, कधीं कधीं दगावतात, त्याचप्रमाणें या श्वापदांना दांत येऊं लागले म्हणजे तीं दगवायचा धोका असतो. म्हणून दांत आलेले वाघ, सिंहच सर्कसवाले खरेदी करतात. विकत घेतल्यावर दोन स्वतंत्र, माणसें त्यांना चुचकारून, गोंजारून, कधीं भीति घालून माणसाळविण्यासाठीं ठेवावीं लागतात. या कामाला ' ब ' वर्गाचे ट्रेनर असतात. " श्वापदांना नुसतं मारणं आणि आपल्या ताब्यांत आणणं कधीच शक्य नाहीं. प्रेमानें त्यांच्याशीं वागून त्याचा क्रूरपणा कमी करावा लागतो आणि हीच पद्धत योग्य आहे. " असा आपला अनुभव देवल सांगतात. वाघसिंहांना वेळेवर खायला घातलें, त्यांच्याशी सलगी केली म्हणजे तीं जनावरें अगदीं मऊ नि लोंचट बनतात. त्यांचा पोटाचा प्रश्न बिनबोभाट सुटला म्हणजे ते आपला क्रूरपणा विसरून अगदीं ऐदी बसून जातात. पिंजरा हेच आपलं घर असं त्यांना वाटू लागतं. वाघीण किंवा सिंहीण मस्तीत आली म्हणजे मात्र वाघ-सिंहांमध्यें

## मुली किती ?

सर्कशीकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन कसा बदलला आहे हें सांगतांना देवलांनीं खालील हकीकत सांगितली.

एका गांवीं सर्कसचा मुक्काम पडला. तंबू ठाकठीक झाला आणि गांवांतले चार सुशिक्षित गणले जाणारे जवान आले नि चौकशी करूं लागले, " सर्कशींत युरोपियन किती आहेत ? "

" चार-पांच जण आहेत ! " देवलांनीं शांतपणें उत्तर दिलें.

" सर्कशींत मुली किती आहेत ? ", जवान मंडळींनीं लोचटपणें विचारलें.

" पुष्कळ पंधरा-वीस आहेत; परंतु यंदा त्यांचें कर्तव्य नाहीं ! " देवलांच्या या खंवचट उत्तरानें ती मंडळी शरमिंधी होऊन परतली.

## पाठीवरून घोडा नेला

देवल सर्कस लाहोरला गेली त्या दिवसाचा हा प्रसंग. सर्व सामानसुमान स्टेशनवरून तंबूच्या ठिकाणीं येऊन पडलें. जनावरें बांधलीं. तिकडच्या पद्धतीप्रमाणें घोड्यांच्या पायांत बेड्या ठोकण्यांत आल्या. घोडे चोरून नेणाऱ्या पठाणांची तिकडे प्रसिद्धी आहे. जवळच कॅन्टोनमेंट होतें, तरीपण सर्कसचा एक घोडा लंपास झाला. घोड्याला बेड्या जरी ठोकल्या असल्या तरी तिकडचे चोर घोड्याला अक्षरशः पाठीवर घेऊन पळून जातात.

रीतसर फिर्याद, पंचनामे झाले; परंतु घोड्याचा पत्ता लागला नाहींच.

## ॲक्टर लोकांची गर्दी

देवलांच्या सर्कसमध्यें एका वेळीं (१९४८ सालीं) २०० ॲक्टर ८ हत्ती, ६ सिंह, ४ वाघ, २ झेब्रे, ४ उंट, २ चिंपॅन्झी एवढा व्यापक पसारा होता. सर्कसच्या ६० वर्षांच्या कालावधींत जे ॲक्टर लोक काम करून गेले त्यांची संख्या ८००० हून अधिक भरेल. त्यांत अमेरिकन, जर्मन, इटालियन, रशियन, इराणी, जपानी, चायनीज, ब्रिटिश, आस्ट्रेलियन, फ्रेंच, पोलीश, फिलीपाईन, टर्की, ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा, अफगाणिस्थान या देशाचे लोकहि होते.

## राष्ट्रीय संरक्षण

जर्मनीमध्यें सर्कशीला अतिशय महत्त्व आहे. 'सर्कस कंपन्यांना तिथलं सरकार राष्ट्रीय संरक्षण देत असते. पहिल्या महायुद्धाच्या प्रसंगीं जेव्हां जर्मनीचं अपरिमित नुकसान झालं तेव्हां लोकांच्या जवळचा पैसा संपुष्टांत आला. तेव्हां चार-पांचशें सर्कशी कशा जगणार हा प्रश्न निर्माण झाला. त्यांची उपासमार होऊं नये, त्या बंद पडूं नयेत म्हणून जर्मन सरकारनें या सर्कस कंपन्यांना बोटींत घालून अमेरिका, इंग्लंड सारख्या देशांत नेऊन पोहोंचविलें आणि सांगितलें, " इथें तुम्ही खेळ करून जगा; कला मात्र फुकट घालवूं नका. देशांतील आमची परिस्थिती निवळल्याव पुढल्या वर्षीं परत या ! "

भांडणं सुरू होतात, झटापट होऊं लागते. त्यावेळी ही जनावरें सर्कशीत कामासाठीं न काढता दुसरीं बाहेर काढावीं लागतात. एकदा पुण्याच्या पुरंदरे कॉलनीमधल्या मुक्कामात दोन सिंह पिंजऱ्यामध्यें खेळ चालू असतां रिंगणांतच एकमेकावर तुटून पडून लोळू लागले. रिंग मास्तरला जखमहि झाली. देवलानीं मोठ्या मिनतवारीनें त्याना काबूत आणले. परंतु सर्कसचा खेळ थाबला नाही हेंच देवल सर्कसचें वैशिष्ट्य आहे. कऱ्हाडच्या मुक्कामांतहि एकदां रिंगमास्तर दत्तोपंत देवल यांना जबरदस्त जखमा झाल्या. सिंहानें आपल्या पजानें त्याची पिंढरी रक्तबंबाळ करून सोडली हेंच दत्तोपत आजहि श्री देवलाच्या सान्निध्यात वावरताना दिसून येतात. " जनावर आपल्या जरबेंत पाहिजे आणि शिस्त व आज्ञाधारकपणा त्याच्या अगीं उतरविला पाहिजे ही गोष्ट सर्कसमध्यें फार महत्त्वाची आहे. " असं श्री देवल सागतात. श्रावणकोरला एकदां एक सिंहीण पळालीहि होती. परंतु सर्कशीमधल्या सिंहाना बालपणापासून लोकांत वावरायची, पिंजऱ्यात बसायची आणि मस्त मांस खाऊन पडून रहायची सवय झालेली असते. त्याना जगलाचा संसर्गहि झालेला नसतो. त्यामुळें ही पळालेली सिंहिण जगलातल्या झाडींनें बुझून जाऊन परत सर्कसचा तंबू शोधीत आली. सर्कशीमधल्या बॅंडचीहि त्याना अतिशय सवय झालेली असते. म्हणून पळालेल्या सिंहिणीसाठीं बॅंड वाजत ठेवला आणि त्याच्या अनुरोधानें ती शहाण्याप्रमाणें अगदीं अचूक येऊन पिंजऱ्यांत बसली. श्री. देवलांनीं आपल्या वाघ-सिंहांचीं भोला, राम, सीता, शाहू, अशीं नावें ठेवलीं होतीं. श्वापदाचे पिंजरे एक वेगळी कनात मारून बाजूला ठेवले असतात. त्यास 'शिकारखाना' म्हणतात. श्री. देवल एखाद्या वेळेस कनाती बाहेर कुठेतरी बोलत उभे असले, त्याचा आवाज कानांवर आला कीं वाघ-सिंह डारकून ओरडून हाका मारीत. अखेर देवलांनीं शिकारखान्यांत जावे आणि त्यांच्या पाठीवरून हात फिरवावा—तेव्हां कुठें ते शात होत. असे लळयाचे प्रसंग ते मोठ्या तन्मयतेनें सांगतात. खेळाच्या वेळी देवल वाघ सिंहांसाठीं लायसन्स असूनहि कधीहि पिस्तुल वापरीत नसत. एक चाबूक आणि एक पितळेची काठी हीच साधनें. तशा काठ्यांमध्यें वीज असते. वगैरे समजुती खोट्या असल्याचें देवलानीं सांगितले. जनावर खवळलें कीं त्याच्यापुढे काठी करायची म्हणजे ते काठीवर पजा मारते किंवा तोडात धरते आणि मग दुसऱ्या हातानें चाबूक ओढायचा अशी त्यांची पद्धत होती.

### हत्ती अत्यंत हुषार असतो

हत्ती हा अत्यंत हुषार असतो असं देवलांचं मत आहे. म्हैसूर, मलबारच्या जंगलांतून हत्तीची पिल्लं विकत घेतली जात असत. खड्ड्यामध्यें जंगली हत्तीना ( पिट् फॉल ) पाडून पकडण्यांत येतें व त्या भागांत अशा पकडलेल्या हत्तींची अगोदर भरपूर जाहिरात करून ठराविक दिवशी बाजार भरवून त्याची विक्री केली जाते. त्याचे वयोमानाप्रमाणें वेगवेगळे नंबर असतात व त्याची किंमत ४ ते ५ हजार रु. असते. लॉर्ड आयर्विन या भागात एकदां दौऱ्यावर आले असतां सुमारें १०० हत्ती पिट् फॉल पद्धतीनें त्याना पाडून दाखविण्यांत आले होते ही आठवण श्री. देवलांनी सागितली. या नव्यानें विकत घेतलेल्या हत्तीना झाडाला बांधून ठेवाव लागत. नारळाचीं पानें झाडंझुडपं ते खात असतात. हत्ती आपल्या पायांत नारळ धरून त्याची शेंडी अलगदपणें सोलून आतलं खोबरं खावून करवटी सहजपणे फेकून देतो. बाजारकऱ्यावर हे पकडलेले हत्ती आगगाडीच्या डब्यापर्यंत सोडण्याची जिम्मेदारी असते. सर्कसमधला जुना हत्ती अशा नव्या पिल्लाना ढकलीत ढकलीत आगगाडीच्या डब्यांत आणून सोडतो. त्याला दोरखडानं जखडलं असतं आणि पायात बेड्याहि ठोकलेल्या असतात. अशाहि अवस्थेंत देवलानीं विकत घेतलेल्या एका हत्तीनें रेल्वे डब्याला धडके मारून त्याची नुसती चाळण करून सोडली होती. ( तेरचिल्ली स्टेशनवर हा प्रकार घडला ) त्यांतूनही एक हत्ती पळाला. दिसेल त्या वस्तूला धक्के मारीत तो होता. त्यानें घरें पाडलीं, झाडें पाडलीं आणि अशा पद्धतीनें श्री. देवलाच्या समोर एक मोठी बिकट परिस्थिती निर्माण झाली. दिसेल त्या ठिकाणी त्याच्यावर गोळी घालावी अशीहि त्यानीं कबुली दिली—अधिक हानी कशी वांचवावी हाच त्यांच्यापुढें प्रमुख प्रश्न होता. पण शेवट तसा झाला नाही—देवलानी त्याला पकडलें. एका अरुंद बोळात तो हत्ती शिरला तेव्हां एका बाजूनें सर्कशीतले जुने हत्ती सोडले आणि दुसऱ्या बाजूनें हातात मोठमोठे चुडे घेऊन सर्कसचे लोक त्या हत्ती समोर गेले. अशा रीतीनें तो कोंडीत सांपडल्यावर मधल्या एका झाडावर चढून दोरखंडाचा फांस त्याच्यावर वरून टाकण्यात आला आणि अशा शिताफीनें त्याला पकडलें. एवढा मस्तखोर हत्तीदेखील पुढें माणसाळल्यावर देवलावर स्वतःचा जीव कीं प्राण या भावनेनं

प्रम करीत होता ही हृद्य आठवण ते भावनाप्रधानतेनं सांगतात. त्याचं नांव 'बाजी' असं ठेवण्यांत आलं होतं. माकड, कुत्रा, बोकड, चिंपॅन्झी, वाघ सिंह हत्ती यांना एकत्र खेळविण्यासाठीं त्यांची वाढ एकत्रच करावी लागते. बोकडाचें डोकें समोर असतांना क्रूर सिंह त्याच्याकडे नुसता बघत रहातो प्रसंगीं बोकडच त्याला ढुश्शी मारून निघून जात—इतका त्यांच्यामध्यें एकोपा निर्माण व्हावा लागतो. या संदर्भांत श्री. देवलांनी श्री. दत्तोबा चव्हाण व श्री. नारायण चव्हाण या रिंगमास्तरांचा गौरवानें उल्लेख केला. श्री. नारायण चव्हाण आज जेमिनी सर्कसमध्यें रिंगमास्तर आहेत व त्यांना एक हजार रु. पगार आहे.

### थ्रिलिंग कामें

देवलांच्या सर्कशींत कामाचे शेंकडों प्रकार अस्तित्वांत होते. मोटार जंप, तोफेचं काम, मृत्यूचा गोल इत्यादी कामें देवलांच्या सर्कसमध्यें प्रथमतः आलीं. मृत्यूचा गोल १९३० मध्यें देवलांनीं आपल्या सर्कशींत आणला. आस्ट्रेलियन डॉज ब्रदर्स या कामावर होते व त्यांना दररोज १०० रु. हा पगार होता. कॅप्टन डिलॉय व त्याची पत्नी हें जर्मन दांपत्य तोफेचं अजस्र काम करीत. तंबूच्या टोंकावरून खालीं रिंगणांत यायचं हें स्लॅटिंग वायरचं अत्यंत धाडसी काम फक्त देवल सर्कसमध्यें होतें. घोड्यावरचीं कामें तर देवल सर्कसमध्यें अगदीं बिनतोड स्वरूपाची होतीं. सर्कशींत विदूषकाचें कामहि अत्यंत महत्वाचें व कलापूर्ण असें असतें. तो चांगला हजरजबाबी, खुसखुशीत विनोद पेरणारा आणि सर्वच कामांत तरबेज असावा लागतो. समयसूचकतेवर त्याच्या यशाची मुख्य मदार असते थ्रिलिंग पद्धतीचीं धाडसीं कामें पाहून प्रेक्षकांच्या मनावर जो एक गंभीर परिणाम होत चालला असतो त्याचा ताण कमी करण्यासाठीं विदुषकाला शेवटपर्यंत वावरावें लागते अशी देवलांची भूमिका आहे. "तीन तास रिंग ताब्यांत ठेवायची" यास ते आपलं ध्येय मानीत असत.

### एक थोर संघटक

श्री. काशीनाथपंतांनी व त्यांचे बंधू विनायकरावांनीं सर्कसच्या क्षेत्रांत जें अपूर्व यश मिळविलें तें त्यांच्या संघटना चातुर्याच्या जोरावर. वेगवेगळ्या थरांतील, विविध देशांतील, वेगवेगळ्या समाजरचनेंतील लोक एकत्र आणून त्यांच्याकडून बिनबोभाट कामें करवून घ्यायचीं आणि हा प्रचंड संस्थानी स्वरूपाचा रथ हांकायचा या कामीं त्यांचें आदर्श संघटना-चातुर्य उपयुक्त ठरलें यांत वाद नाहीं. कुंटणखान्याच्या वाटेवर असलेल्या मुलींना विकत घ्यायचें, करारनाम्यानें आपली बाजू कायदेशीरपणें मजबूत करून ठेवायची आणि त्यांना सर्कसमध्यें सामील करून घ्यायचें असा सर्कशींत प्रकार होता. यामधूनच पुढें वयोमानाप्रमाणें प्रेमप्रकरणें उद्भवत. देवलांनीं त्यांचीं लग्नें लावून दिलीं— सहानुभूतीच्या ओलाव्यानें त्यांचे संसार उभे केले. आज हींच कुटुंबें भारतांतल्या वेगवेगळ्या सर्कसमध्यें सामील होऊन जीवन कंठीत आहेत. कुटुंबवत्सल असे अ‍ॅक्टर असल्यास आळीपाळीनें सर्कस त्यांना आपल्या कुटुंबियांना बोलावून घेण्याची परवानगी देत असे. अशा वेळीं जादा फॅमिली भत्ता देण्याची देवलांची वहिवाट होती. 'आपला लंगोट सांभाळा' असा इशारा देऊनहि कांही तरुण अ‍ॅक्टर वाट चुकून जात व आजारी पडत. श्री. देवल त्यांच्यावर वरवर रागावीत; परंतु परमुलखामध्यें त्या बिचाऱ्यांचें



**या अजस्र वाघिणीला खांद्यावर घेणारी म्हैसाळची गुणा चौगुले! परदेशीयांपेक्षां आपलीं माणसें तयार करणें हा देवलबंधूंचा खास उपक्रम.**

दुसरें—तिसरें कोण आहे या सहानुभूतीच्या भावनेनें देवल त्यांच्यावर प्रेमाचं पांघरूण घालीत, त्यांना औषधोपचार देवून बरं करीत. आणि अर्थात्‌च ही मंडळीं देवलांच्यासाठीं प्राणहि धोक्यांत घालायला कांकूं करीत नसत. सर्कस पहायला जमा होणारे लोक हौसे, गौसे आणि नवसे अशा थाटाची असतात— गांवांतल्या गुंड लोकांना पास दिला नाहीं, किंवा इतर कांहीं कुरापत निघाली कीं, कांहीं वेळेला सबंध गांव एकीकडे नि सर्कसवाले दुसरीकडे अशी तटबंदीदेखील निर्माण होत असे— प्रसंगीं मारामारीपर्यंत येऊन ठेपायचें; परंतु सर्कसचें नवजवान देवलासाठीं तळहातावर शीर घेऊन सामन्यास सिद्ध असत. "सर्कस हीं एकटघादुकटचाची नाहीं; तें एक महाकुटुंब आहे, त्यांतल्या प्रत्येक व्यक्तीनं आपापल्या जबाबदारीचा वांटा यथायोग्यपणें उचलला पाहिजे" ही आदर्श विचारसरणी त्यांनीं सर्कसमधल्या प्रत्येक व्यक्तींमध्यें पुरेपुर बिंबवून सोडलेली होती. याच संघटनाचातुर्याच्या जोरावर देवलांनीं आपल्या सर्कसचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचें यश मिळविलें.

### कर्णाचें औदार्य

सर्कस पाहायला आलेला मनुष्य जे चार—आठ आणे खर्चीत असतो त्याला त्याचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे, तो खूष झाला पाहिजे आणि "सर्कस सुंदर आहे बुवा!" असं तो खुषीनें म्हणत बाहेर

## थोडक्यांत बचावले

देवल सर्कसमध्यें मोटार जंपचें काम करणारा किसनसिंग जबरदस्त शक्तीचा आणि बेडर होता. मोटार जंपचें काम करण्यापूर्वी दोन ठिकाणी पेट्रोल भरलं पाहिजे असं तो म्हणायचा— एक मोटारींत आणि दुसरं आपल्या पोटांत— (अर्थात् दारू!)

त्या दिवशी मुंबईमध्यें खेळाला चिक्कार गर्दी होती. श्री. नरीमन पुढच्या रांगेंत येऊन बसले होते. मोटार जंपचा शेवटचा प्रयोग होता

किसनसिंग टेर पिऊन मोटारींत बसला. साठ मैलाच्या वेगानं मोटार आणली आणि फळीवर चढायच्याक्षणीं ब्रेक दावले. मोटार उडाली; परंतु ती फळीवर न पडतां श्री. नरीमन यांच्या डोकीवरून पलीकडे मोकळ्या जागेंत जाऊन आपटली.

मोटारीचा चेंदामेंदा झाला. पण कुणाला इजा झाली नाहीं. श्री. नरीमन यांच्या जीवावर बेतलें होतें — पण थोडक्यांत बचावले.

पडला पाहिजे यांवर देवलांचा अतिशय कटाक्ष असे. त्यामुळें सर्कस चालू असतां तें सहजगत्या प्रेक्षकांमध्यें येऊन बसत आणि लोक काय बोलतात हें मनापासून ऐकून घेत. त्या जोरावर ते कामात फेरबदल करीत आणि म्हणूनच सर्कशीवर अक्षरशः पैशाचा पाऊस पडत राहिला. ह्या लोकांकडून आलेल्या पैशाचा लोकहितासाठीं थोडा-फार उपयोग व्हावा या कर्तव्यनिष्ठ जाणीवेनें सर्कस गावोगाव धर्मादाय खेळ करीत असे. कुठें वाचनालय, कुठें शाळा, धर्मशाळा, अनाथआश्रम, मंदीर तालीम अशा सार्वजनिक संस्थांसाठीं त्यांचे अनेक खेळ होत असत. या पद्धतीनें त्यांनी दोन लाख रुपये कर्णाच्या औदार्यानें विविध संस्थाना देऊन टाकले. मुंबईच्या मराठी ग्रंथालयाला, ब्राह्मण समाजाला त्यांनी फार मोठया देणग्या दिलेल्या आहेत. "मी काय माझ्या घरचं, माझ्या पदरचं थोडंच देत आहे–हा पैसा लोकाचा पैसा लोकहितासाठीं खर्चला गेला तर तें मला भूषणावह व आनंददायी आहे." अशी त्यांची सद्भावना असे. काहीं कांहीं गांवामध्यें तर असे घडून यायचें–"देवलांची सर्कस ना! धर्मादाय खेळाचं तिकीट गळयांत पडणार आहे. मग गडबड कां?" असं हंसत हसत म्हणत लोक सर्कसचे पहिले खेळ पाहण्याचें मुद्दाम टाळीत असत. देवलांच्या या लोकसंग्राहक वृत्तीचें श्री तात्यासाहेब केळकर, श्री. अण्णासाहेब फडके, श्री. ज. स. करंदीकर यांनीं वेळोवेळीं मोठें कौतुक केलेलें आहे. श्री. केळकराचे तर देवल बंधूवर पुत्रवत् प्रेम होतें, कुठलाहि औचित्यपूर्ण प्रसंग असला आणि सर्कसचें निमंत्रण गेलें कीं, साहित्यसम्राट केळकर विनचूक हजर रहात असत.

### स्वभाववैशिष्ट्यें

देवल सर्कसमध्यें विविध देशाचे लोक असल्यामुळें देवलांचा मालक या नात्यानें त्याच्याशी घनिष्ठ संबंध यावयाचा, त्यांत त्यांनी लोकांच्या स्वभावाचे जे विलक्षण पैलू न्याहाळले ते खास उद्बोधक आहेत. तोफेचें काम करणारा जर्मनसाहेब देवल सर्कसवर निहायत खूष होता. वास्तविक तो हेर होता. हिंदुस्थानांतल्या विविध हकीकती तो आस्थेनें समजून घेई आणि दररोज गावाबाहेर मोकळया ठिकाणीं जाऊन मुंबईच्या जर्मन बांधवांना (हे लोक ग्रीन्स हॉटेलच्या तळघरांत रहात.) दूरध्वनीक्षेपकावरून संदेश देत असे. जेवण तयार आहे इथेंच जेवा' असं कितीहि निक्षून सांगितलं तरी तो आपल्या पत्नीला घेऊन जेवण बरोबर घेऊन बाहेर पडायचा. तो हेर आहे याचा थागपत्ताहि देवलांना नव्हता. महायुद्धाला सुरुवात झाली आणि जर्मनसाहेबाने आपला हेरपणा देवलाना सांगितला, तो म्हणाला, "आतां यापुढें माझा उपयोग तुमच्या सर्कसला होणार नाही. मला निश्चित अटक होईल. आमचा देश गरीब आहे. सर्व हेरांना देश पगार देऊं शकत नाही. तेव्हां मी सर्कशीत माझं स्वतःचं पोट भरून जगत होतों, आणि माझ्या देशाची सेवा करीत होतों. आता माझा देश मला तिकडे बोलावीत आहे. मला गेल पाहिजें." असं म्हणून तो सहकुटुंब मायदेशीं निघून गेला. त्याचें व्यक्तिमत्व अद्याप श्री. देवलाच्या चांगल्या लक्षांत आहे. कंपनींत जें इंग्रज लोक असत ते देवलांशीं मालक या नात्यानें वागण्यास राजी नसत. आपण 'जेते' आहोत आणि हे 'जीत' आहेत. ही भावना त्यांच्यामध्यें अनुभवाला यायची. ते चुकूनदेखील देवलाना सलाम करायचे नाहींत उलट जर्मन लोक अतिशय सौजन्यानें वागत. जर्मनसाहेब नेहमी म्हणत असे–"जर्मनींत मिलिटरीच्या खालोखाल सर्कसला मान आहे" पूर्वीं जर्मनीमध्ये ४०० ते ५०० सर्कशी होत्या म्हणतात. 'युरोपमध्यें जर्मनीचें जें महत्व आहे तेंच भारतामध्ये महाराष्ट्राला आहे.' असहि तो नेहमी म्हणत असे. जर्मनसाहेब एकदा रंगात येऊन देवलाना म्हणाला, "तुमचीं हीं सर्व कामें आमच्या देशांतल्या लोकाना माहित आहेत. मात्र वाघ नि बोकड ह्याचं जें एकत्र काम घेता तें अजब आहे. खासे! तुम्ही आमच्या देशांत वाघ आणि बोकड एवढंच घेऊन चला–तुम्हाला अपरंपार पैसा मिळेल. मात्र सूट वगैरे साहेबी पोषाख घालून येऊ नका. तुमचं तें रेशमी वस्त्र (पितांबर) नेसून कपाळावर विभूति लावून तुम्ही काम केल पाहिजें. म्हणजे आम्ही तुमच्या योगसाधनेची मोठी जाहिरात करूं आणि असं लोकांना सागूं" दसऱ्याला मिरवणुकीचे व पुजेच्या वेळीं देवलानी केलेल्या सोवळया पोषाखाच्या आठवणीवरून तो हें बोलत होता. याच ह्या आठवणी घेऊन तो साहेब मायदेशीं परत गेला. आणि कितीतरी दिवस देवलाना 'चुकल्याचुकल्यासारखें' वाटत होतें. ऑस्ट्रेलियन लोक, रशियन लोकहि सर्कशीत होते. ते एकमेकामध्ये स्पर्धा करीत असत. एखाद्याला मुक्काम बदलताना मोटार दिली तर त्याला अगोदर का अशी कुरबूर ते करायचे. एखाद्याला मोठी मोटार दिली कीं, दुसरा त्या मोटारीचे माप काढून म्हणायचा, "आम्हाला लहान मोटार कां?" अशी पोरकट भांडाभांडी देवलाना सोडवावी लागे. इंग्रज ॲक्टर आपल्या नंबरचें काम आटोपले की, आपल्या मुक्कामावर निघून जायचा. जर्मनसाहेब मात्र रात्रभर तंबूत असायचा. एखाद्या वेळी तंबूत कांहीं बरवाईट घडलं तर मालकाला जपलं पाहिजे. त्याला मदत करतां आली पाहिजें या विचारसरणीनें तो भारावलेला असे. एखाद्या खेळाला प्रेक्षकांची टाळी पडली नाही तर

रशियन, इंग्रज यांना कांहींच वाटायचें नाहीं. मात्र जर्मनसाहेब म्हणायचा, "कसले तुमचे भारतीय लोक ? मांडीखालीं हात घालून गप्पगार कसं बसवतं त्यांना ? टाळ्या वाजविल्या पाहिजेत, उत्तेजन दिलं पहिजे—म्हणजे चैतन्य येईल ! हा कसला रडतरावपणा !" देवल आपले हंसून गप्प व्हायचे.

चिनी लोकांबद्दल बोलतांना श्री. देवलांनीं त्यांच्या कामसूपणाची एक चिंतनीय आठवण सांगितली. सर्कस जावा-सुमात्राच्या दौऱ्यावर असतांना एका चिनी सुताराला दररोज ६ रु. पगारावर कांहीं कामासाठीं नेमून घेण्यांत आलें होतें. श्री. देवलांनीं त्याच्याशीं बोलून त्याच्या जीवनाविषयीं कुतुहलानें विचारपूस केली पण तो म्हणाला. "हें पहा, मी आत्तां कामावर आहे मी तुमच्याशीं बोलत राहिलों तर मला मिळणाऱ्या पगाराच्या मोबदल्यांत मीं जरूर तें काम केलं नाहीं असं होईल आणि कदाचित् अनावधतेनं माझ्या हाताला एखाद्या वेळीं जखम होईल." त्याची विचारसरणी किती रास्त होती बरं ! दुसऱ्या दिवशीं तोच चिनी सुतार आपल्या बायकोसह मोठ्या ऐटबाज पोषाखांत सर्कस पहायला आला होता. सुतारकीचें काम करणारा कारागीर आहे हें ओळखणेंहि तेव्हां अशक्यप्राय होतें.

भारतीय अधिकारीवर्ग फुकट पासाची अपेक्षा कशी करीत असतो, कुटाळकी करण्याच्या नादांत कसा असतो याबद्दल देवलांनीं कांहीं बहुमोलाचे अनुभव सांगितले. रेशनिंगच्या काळांत एका सुशिक्षित ब्राह्मण रेशनिंग अधिकाऱ्याकडे रेशन मागायला देवल गेले असतांना 'सर्कस बंद करा; जनावरं विकून टाका" असे कुटाळकीचे उद्गार त्यांनीं देवलांना सुनविले, त्या उलट एका मुसलमान रेशनिंग ऑफिसरनें "तुमच्यासारख्याला रेशन द्यायचं नाहीं, तर कुणाला द्यायचं ?" असे आत्मीयतेचे उद्गार काढले.

सुरतेच्या इंपिरियल बँकेच्या आयरिश मॅनेजरला देवलांनीं पास दिले. त्यांनीं ते घेतले नाहींत. देवलांचं बँकेंतलं काम चटकन करून दिलं आणि सायंकाळीं स्वतः तिकिट काढून तो सर्कस पाहून गेला.

अकोल्याच्या एका युरोपीयन कलेक्टरला देवलांच्या मॅनेजरनें पास दिला. त्यांनीं तेथल्या तेथे आभार मानले. परंतु संध्याकाळीं सपत्निक येऊन तिकीट काढून त्यांनीं सर्कस पाहिली. पास दिला असतांहि असें कां म्हणून देवलांनीं विचारले तेव्हां तो म्हणाला, "मला१८०० रु. पगार मिळतो आहे. मीं फुकट का म्हणून सर्कस पहावी." त्या कलेक्टरला तिकिटाचे पैसे परत देण्याचा प्रयत्न केला तेव्हां नाइलाजानें त्यानें ते पैसे घेतले आणि मद्रासच्या रेडक्रॉस सोसायटीला ते पैसे धाडले. त्याची परस्पर पावती देवलांच्या नांवावर आली. आपले अधिकारी या तुलनेस कधींच मात्र ठरणार नाहींत ! पूर्वीच्या संस्थानांचे दिवाण भरपूर पासेस घेऊन मगच लायसेन्स देत.

## सर्कस धंद्याचें भवितव्य

महर्गतेंत वाढ होत चालली, समाजरूढीनुसार देवल बंधू विभक्त झाले, पूर्वीच्या दर्जानें सर्कशींत कामें होईनाशीं झाली. म्हणून देवलांची सर्कस १९५५ मध्यें मोडली. परंतु देवलांच्या पठडींतच तयार झालेली मंडळी आज निरनिराळ्या सर्कशींतून वावरत आहेत. कुणी स्वतंत्र तंबू ठोकलेले आहेत. परंतु ते सर्वजण एकच म्हणतात. "देवलांच्या सर्कशीनंतर सारें चैतन्यच नष्ट झालेलें आहे." तसं कां वाटू नये हाच मुळीं प्रश्न आहे.



**ही ल्यूसी, टॉमची चौकडी काय लुटुलुटु चालते आहे ! ही प्रेक्षक-वाचकांना गुड-बाय तर करीत नाहीं ना ?**

अठरा-वीस हजाराचा प्रचंड तंबू, शें-दोनशें माणसांची जिम्मेदारी रोजचा हजारों रुपयांचा खर्च, प्रवासाच्या असंख्य अडचणी, जनावरांचा रोजचा प्रचंड आहार या सर्व बाबींचा सखोल विचार केला तर कुणालाहि मान्य करावें लागेल कीं, 'सर्कस' म्हणजे एक प्रचंड संस्थान आहे. तें यशस्वीपणें चालविण्यास देवलांसारखे संघटकच हवेत, निःस्सीम निष्ठेचे निर्व्यसनी मालक हवेत--तरच या गोष्टी शक्य आहेत. आजहि आपल्या देशांत ५०-६० सर्कशी आहेत. परंतु कालमानाप्रमाणें त्यांच्यामध्यें नुसता भपका वाढत चाललेला आहे. त्यांतली जिद्द, त्यांतलें तेज कमी होत चाललें आहे. सरकारनें जर्मनीप्रमाणें सर्कशीकडे राष्ट्रीय खेळ या नात्यानें पाहिलें पाहिजे, त्यांना प्रवासी सवलती दिल्या पाहिजेत, त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे तरच या धंद्याचें भवितव्य उज्ज्वल राहील असें श्री. देवलांना आज वाटतें. या दोन कर्तबगार देवल-बंधूंना दीर्घायुरारोग्य चिंतण्यापलीकडे आम्हां लेखकांच्या हातीं दुसरें आहेच काय ?

●●●





# नेताजींचें महाप्रयाण

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ **पु. ना ओक** ★ ★ ★ ★ ★ ★

अजूनहि नेताजी जिवंत असल्याबद्दलचे तर्कवितर्क चालूच आहेत. श्री. पु. ना. ओक यांनीं या प्रकरणीं निर्णायक प्रकाश टाकण्यासाठीं नेताजींच्या मृत्यूसंबंधींची तपशीलवार साद्यंत हकीकत येथें वाचकांना सादर केली आहे. श्री. ओक आझाद हिंद फौजेंत लेफ्टनंट अ. डी. सी. प्रायव्हेट सेक्रेटरी या हुद्यावर होते.

इ. स. १९४५ ऑगस्ट महिन्याच्या १६ तारखेस न्याहरीनंतर सकाळीं सुमारें ८॥ वाजतां नेताजींनीं सिंगापुरांतील आपलें निवासस्थान सोडलें. विमानतळावर ९॥ वाजतां नेताजी जपान्यांच्या एका बॉंबफेकी विमानांत जाऊन बसले. श्री. निरोशी हे जपानी दुभाषे व तिघे हिंदी सहकारी नेताजींसह निघाले. विमान उड्डाण घेण्याच्या उद्देशानें घोरपडीसारखें जलद पळूं लागलें. पण......घोरपड थोड्याच वेळांत परत फिरली. तानाजीला असाच अपशकून नव्हता झाला कां? पण त्यानें आपले प्राण पणाला लावले होते. तानाजीसारखेच नेताजी... 'काय झालें... माशी कोठें शिंकली' अशीं त्यांनीं चौकशी केली, तेव्हां विमानाच्या ब्रेक्समध्यें ऐनवेळीं कांहीं बिघाड झाल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें होतें. तळावरील यंत्रज्ञ धांवले. सर्वांनीं यंत्राचे कान पिळले. व सकाळीं १० वाजून १० मिनिटांनीं विमान निघालें. विमान आंचके देत देत चढत होतें. दर आंचक्यागणिक विमानाच्या टाकींतील पेट्रोल खळखळून आंतील उतारूंच्या अंगावर उडे. पेट्रोलचा वास सर्वत्र पसरला. लक्षणें कांहीं ठीक दिसत नव्हतीं, विमान पेटायची शक्यता होती. एकानें उठून टाकीच्या नळीचा पेंच घट्ट केला तेव्हां पेट्रोल उडणें थांबलें.

सुमारें तीन वाजतां नेताजी बँकॉकला पोचले. कोणाला अगोदर वार्ता नसल्यानें सुमारें दोन तास नेताजींना बँकॉक येथील विमानतळांवरील इमारतींतच तिष्ठत बसावें लागलें. नेताजी निवासस्थानीं पोंचल्यावर स्वातंत्र्य सेनेच्या व नागरिकी संघटनेच्या अधिकाऱ्यांची नेताजींना भेटण्याच्या उद्देशानें एकच रीघ लागली. आझाद हिंद सरकारच्या दरबारीं असलेले जपानचे वकील श्री. हाचिया यांनीं नेताजींची भेट घेऊन दोन वर्षपर्यंतच्या सहकार्याबद्दल नेताजींचे जपानी सरकारतर्फे आभार मानले. जपानमध्यें थारा पाहिजे असला तर जपानी सरकार सिद्ध असल्याचें कळवलें. पण नेताजींनीं साभार नकार दिला.

रशियानें जपान विरुद्ध युद्ध पुकारलें असल्यानें रशियाशीं वाटाघाटीं करून नेताजींना रशियन हद्दींत सुरक्षित पोचवणें जपान्यांना शक्य नव्हते, सर्वांनुमतें असें ठरलें कीं, विमानानें सायगांवला जावें. तेथें दक्षिण दिशेस असलेल्या जपानी सेनांचें प्रमुख फिल्ड मार्शल टेराउची यांच्या सहाय्यानें रशियन सरहद्दीजवळ पोंचण्याची व्यवस्था होतें काय तें पहावें.

## निरवानिरव

त्या दिवशी इतर अनेक व्यवधानांत स्वातंत्र्य संघटनेच्या तिजोरी-तील संपत्तीचें काय करायचें हा प्रश्न होताच. `यामी सरकारनें केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञतेचें द्योतक म्हणून नेताजींनीं चुलालंकोर्न रुग्णालय व चुलालंकोर्न विश्वविद्यालयाला पंधरा लक्ष बाटाच्या (सयामी रुपयांच्या) देणग्या दिल्या. येथें असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांस तीन-तीन महिन्यांचें वेतन दिले. सिंगापुरहून निघताना नेताजींनी असेच आठ कोटी रुपये काढवून सर्व सहकाऱ्याना पुढील अडचणीच्या काळांत उपयोगी पडावें म्हणून सहा सहा महिन्याचे वेतन दिलें होतें. सयाम हें स्वतंत्र राष्ट्र असून तेथें स्वातंत्र्यसेनेचें विशेषसें मोठें कार्यालय नव्हतें. म्हणून तेथील गंजाजळीत शिल्लक कमी होती.

बँकॉकमध्यें ठिकठिकाणीं असलेल्या स्वातंत्र्यसेनेच्या व नागरिकी संघटनेच्या छावण्यांना व कार्यालयांना नेताजीनीं उभ्या उभ्या भेटी दिल्या. सर्व कार्यकर्त्यांच्या निरोप घेतला. गुडघ्यापर्यंतचे आरी लावलेले चमकदार चामडी बूट, लष्करी तुमान, घट्ट खाकी लष्करी कोट व डोक्यावर घडीची सैनिकी टोपी असाच नेताजीचा पोषाख होता. त्यांची मुद्रा गंभीर झालेली होती. घाईगर्दीची ती निरवानिरव पाहून सर्वांचेच चेहरे खिन्न झाले होते. पुढें सर्वांना गडद अंधःकारच दिसत होता, आपला हा अमोल नेता पुन्हां केव्हा व कोठें दिसेल हाच एक विचार सर्वांना अस्वस्थ करीत होता.

सर्वांच्या भेटीगाठीं झाल्यावर भोजन उरकून बनकची भागातील आपल्या निवासस्थानीं नेताजी रात्रभर स्वातंत्र्य चळवळीबद्दल ३०-४० सेनाधिकाऱ्यांबरोबर ओसरीवर बोलत बसले होते.

रशियांत जाण्यासबंधीं त्यांची इत्थंभूत चर्चा कोणाशींच झाली नव्हती. परंतु त्या कामी जपान्यांची मदत मिळवण्याबाबत व क्वचि पुढील बेताच्या रूपरेषेबद्दल त्यांचें जें आपल्या निकटच्या सहकाऱ्यांशीं बोलणें होई त्यावरून त्याचा बेत असा होता, की जपानी लष्कराच्या मदतीनें पांच-सहा भारतीय साथीदारासह प्रत्यक्ष रशियांत किंवा रशियाच्या पूर्वहद्दीजवळ कोठेंतरी पोंचावे. तेथून जसा साधेल तसा रशियांत प्रवेश करावा. कदाचित् आपणास अटक होऊन मॉस्कोंत रशियन श्रेष्ठींपुढें हजर केले जाईल. तेव्हा भारतास स्वतंत्र करून घेण्याच्या उद्देशानेच आपण रशियांत शिरल्याची आपण त्यांची खात्री पटवूं. कदाचित् काही दिवस त्यांच्या कैदेंतहि रहावे लागेल, पण शेवटी आपण त्यांचें मन जिंकून त्यांच्या सहाय्यानें भारत स्वतंत्र करण्याची खटपट करू असे विचार त्या दिवसात नेताजीच्या मनांत घोळत होते.

ऑगस्ट १६ तारखेस रात्रभर नेताजी जागतच होते त्याची अखेरची भेट घेण्यास आलेल्या भारतीय सहकाऱ्यांशी १७ तारखेस पहाटे पांच वाजेपर्यंत ते बोलत बसले होते, नंतर त्यानी तासभर विश्रांति घेतली सकाळीं सात वाजतां नेताजींसह निघणाऱ्या सर्व व्यक्ती सिद्ध झाल्या. कर्नल हबीबुर रहमान, कर्नल प्रीतमसिंह, कर्नल गुलझारासिंह, मेजर आबिद हसन, देवनाथ दास व अय्यर. बँकॉकच्या विमानतळावर निरोप देण्यास आलेल्या अधिकाऱ्यास निरोपादाखल आलिंगन देऊन हस्तांदोलन करतांनां नेताजीच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. बहुधा आपण यांचा कायमचाच निरोप घेत आहोंत असे त्यांचें मन आंतून सांगत असावें. सूर्याची सोनेरी किरणें विमानतळावर तिरपा प्रकाश टाकत होतीं. नेताजींसह काहीं जपानी अधिकारीहि जात असल्यानें ही सर्व मंडळी दोन विमानांत बसलीं. सकाळी आठ वाजतां दोन्ही विमानानीं एकामागून एक आकाशांत झड्डाण केलें. सबंध चळवळीचा आत्माच उडून गेल्याप्रमाणें सिंगापूर व बँकॉकमधील सर्व भारतीयांना जीवन भकास झाल्यासारखें वाटलें,

## सायगांवचा मध्यंतर

सुमारें १० वाजता विमानें सायगांवच्या विमानतळावर उतरली. चद्रमल नामक भारतीय नागरिकी संघटनेच्या अधिकाऱ्यांस नेताजीच्या आगमनाची बातमी होती, म्हणून ते मोटार घेऊन नेताजीच्या दिमतीस हजर होते. नेताजी व दोघां-तिघा वरिष्ठ जपानी अधिकाऱ्यांमध्यें पुढच्या व्यवस्थेसंबंधी गडबडीच्या वाटाघाटी सुरू झाल्या. जपानचे लष्करी अधिकारी जनरल इसोडा, स्वातंत्र्य सरकारच्या दरबारी असलेले जपानी वकील श्री. हाचिया व आणखी एक जपानी अधिकारी यानी सायगाव जवळील दलात या गावी विमानानें जाऊन फिल्ड मार्शल टेरावूची ह्या दक्षिण प्रदेशातील अत्युच्च जपानी लष्करी अधिकाऱ्याची भेट घेऊन नेताजीच्या पुढील प्रयाणासाठीं काहीं मदत मिळेल कां याचा तपास करावा असें ठरलें. उरलेली मंडळी दोन मोटारीत बसून सायगाव शहराच्या बाहेरील अंगास असलेल्या श्री. नारायणदास याच्या बंगल्यांत वास्तव्यास आली.

नेताजींनीं दाढी व स्नान उरकून वामकुक्षीस सुरुवात केली तेव्हां सूर्य डोक्यावर आला होता. गेल्या रात्रीचें पूर्ण जागरण व गेल्या बरेच दिवसाची चिंतायुक्त गिसाडघाई यांतून आत्ताच जरा त्याना विरंगुळा सांपडून त्याचा डोळा लागला होता ते आपल्या सहकाऱ्यांपासून दूर जात होते ...मृत्युलोकांतूनहि त्याना दूर दूर घेउन जावयाची विधीनें तयारी चालवली होती...

नेताजी जेमतेम अर्धा तास झोंपले असतील नसतील तेवढ्यांत किअॅनो नांवाचा जपानी अधिकारी मोटारीतून लगबगीनें उतरून ताबडतोब नेताजीशी कांहीं महत्वाचें बोलायचे आहे असें म्हणाला, श्री. हसन यानीं त्याला 'काय निरोप आहे !' म्हणून विचारले. तेव्हां कळलें की, एक विमान थोडयांच वेळांत पुढें जाण्यास निघणार होतें व त्यांत एकच जागा होती; तेव्हां नेताजी एकटे जायला सिद्ध होते कां ? हे विचारण्यास तो आला होता. नेताजीना जागें करून हा निरोप सांगण्यांत आला. नेताजीनीं विमान कोठें जात आहे हें विचारलें तेव्हा माहित नसल्याचें त्याने सांगितलें. दलातला सहाय्य मागण्यासाठी गेलेल्या दोघा जपानी अधिकाऱ्यांचाहि काही पत्ता नव्हता. विमान निघण्याची वेळ होत आली आहे, तेव्हां लवकर काय तें ठरवा असे जपानी निरोप्याचें म्हणणें होतें. परतु विमान कोठें जात आहे हें पक्के समजल्याशिवाय त्या विमानानें निघण्याचे नेताजीनी नाकारलें. तो निरोप्या गेला, .

सुमारें अर्ध्या तासानें दुसऱ्या एका मोटारींत दलातला गेलेले वरिष्ठ अधिकारी घाईघाईनें आलें. हस्तांदोलन करून नेताजींनी त्यांना एका खोलीत नेले. हबीबुर रहमाननाहि आंत बोलावलें. कांही वेळ वाटाघाटी झाल्यावर दुसऱ्या खोलींत आणखी कांहीं सहकारी होते त्यांच्याशीं नेताजी व रहमान यानी विचारविनिमय केला. नेताजी अत्यत घाईत होतें. गुलझारसिंग व प्रीतमसिंग यांना शेजारच्या बंगल्यातून बोलावलें. नेताजी अगदी अधीरपणें त्यांची वाट पहात होते. ते दोघे आल्यावर दार आंतून लावलें गेल्यावर नेताजी म्हणाले, "मला तुम्हां सर्वांचें मत दोन-चार क्षणात ताबडतोब कळायला हवें

आहे. आता-पण-कदाचित असें म्हणतस बायला मुळींच वेळ नाहीं... विमानांत फक्त एकच जागा आहे. दुसरी एक तरी जागा मिळाली तर बरें असे मीं त्यांना सांगून पाहिलें, पण तें नाही म्हणतात " तेव्हां मी एकटें जावे कां ?...... बोला तुम्हाला काय वाटतें ?"

कोणीच कांहीं निश्चित सांगेना. आणखी दोन-चार जागा तरी जपान्यांनी द्याव्यात असें जो तो म्हणूं लागला नेताजी घाईनें जरा रागांतच म्हणालें,– " तो प्रश्न नाहीं. जागा एकच आहे, तेव्हां मी एकटा जाऊं का ? "

शेवटी सर्वांनी सांगितलें कीं, इथें राहून कैदी होण्यापेक्षां तुम्हीं एकटं जावं पण शक्यतोंवर आणखी एक तरी जागा विमानात मिळवायचा प्रयत्न करावा. तुमच्या प्रस्थानानंतर उरलेल्यानाहि जपान्यांनीं यथावकाश तुम्ही असाल तेथें पोचविण्याची व्यवस्था करावी....

ती खोली उघडून नेताजी व हबीबुर रहमान जपानी अधिकारी बसले त्या खोलीत गेले जपानी अधिकारी नेताजींचा निर्णय ऐकण्यास अधीर होते. त्यांच्याशीं बोलून विमानांत आणखी एक जागा मिळेल असें ठरलें, त्याप्रमाणें हबीबुर रहमान यांनीं नेताजीबरोबर जावें असे सर्व सहकाऱ्याचे मत पडले नेताजींनीं सांगितलें कीं, आपण सर्वच सामान घेऊन विमानतळावर जाऊंया ऐनवेळीं कांहीं चक्र फिरलें तर जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे. नाहीतर इतरांना सामानसुमान घेऊन परतावें लागेल.

एकच धिसाडघाई सुरुं झाली. हातीं लागेल तें सामान पेटयांत कोंबून मोटारींतून सर्व मंडळी निघाली. विमानतळावर सर्वजण पोचले तेव्हां विमानाचें इंजिन सुरुं व्हायच्या तयारीत होते. ले. जनरल शिडेई हे उच्च जपानी अधिकारी त्याच विमानानें जाणार होते. विमान चालक घाई करूं लागला. विमानांत अगोदरच सामान पुष्कळ होतें. तेव्हां नेताजींना सामान कमी आणण्यास सांगितलें. आपल्याबरोबरच्या जडजवाहिराच्या पेटया घेतल्याशिवाय निघायचें नाहीं असा नेताजीचा आग्रह होता. नको नको म्हणतां दोन पेटया विमानांत कोंबण्यात आल्याच. हबीबूर रहमान शेजारीच एका खोलीत आपलें सामान ठाकठीक करण्यात गुतले होते. नेताजी त्यांच्याकडे बळून म्हणाले, " चला हबीबभाई...चटकन् उरका...हें काय चाललं आहे तुम्हीं ? आपल्याला निघायचय...वेळ झाली. " हबीबूर रहमान आपली पेटी घेऊन विमानाजवळ आले.

नेताजीनी हाचिया व इसोडा या जपानी अधिकाऱ्यांचा निरोप घेतला. सहप्रवासी ले. जनरल शिडेई ह्यांच्याशी हस्तांदोलन केलें. नंतर बरोबर आलेल्या परंतु ज्यांना परत सायगांवलाच रहाणें भाग पडत होते त्या सहकाऱ्यांशीं " आपण लवकरच भेटूं " असें म्हणून हस्तांदोलन केलें. प्रत्येकानें त्यांना " जयहिंद " म्हणत शेवटचें अभिवादन केलें. नेताजी व हबीबुर रहमान दोघेहि विमानांत जाऊन बसले. विमानाच्या यंत्रांची कर्णकर्कश घरघर सुरुं झाली. पंखे वेगानें फिरून सोसाटयाचा वारा सुटला. जमिनीवरून धांवत विमान आकाशांत उडून गेलें. मरणप्राय शरीराचा एकेक भाग गळून पडावा तसे नेताजी सिंगापूर, बँकॉक. सायगांव या गांवाहून पुढें गेले, तसतसा स्वातंत्र्य आदोलनाचा आत्माच निघून गेल्यासारखें वाटलें.

सायगांवहून नेताजींचें विमान १७ ऑगस्ट १९४५ च्या सायंकाळीं ५॥ च्या सुमारास उडालें. निघायला उशीर झाल्यामुळें सरळ फोर्मोसा बेटावर उतरण्याऐवजी इंडोचायनाच्या पूर्व किनाऱ्यावर टूरेन बदरात विमान उतरवून रात्र तेथेंच घालवावी असा विमान चालकानें बेत केला, सुमारें ७॥ वाजतां टूरेनला विमान उतरले. हॉटेल मोरीन येथें विमानातील प्रवाशानीं रात्री मुक्काम केला. विमान चालकाला मात्र विमानातील भार हलका करण्याकडे लक्ष द्यावे लागले शत्रूच्या विमानांवर गोळ्या झाडणाऱ्या १२ मशीनगन्स्, सर्व दारूगोळा आणि इतर सामान बाहेर काढून सुमारें ६०० किलोग्रॅम वजन कमी करण्यांत आलें. दुसरें दिवशी पहाटे ५ वाजतां सूर्य क्षितिजावर येत असतानाच नेताजी, हबीबुर रहमान व इतर प्रवासी मडळीना घेऊन विमानाने टूरेन सोडले. फोर्मोसा बेटातील हेतो, टायहोकू. मांचुरियातील डायरेन अशा तीन ठिकाणीं थांबून विमान टोकियोला जाणार होते.

## विमानांतील बिघाड व दुरुस्ती

विमानाला जोड एंजिनें होतीं. भारी बाँब टाकणाऱ्या त्या विमानात उतारूंनी बसावयाच्या खुर्च्या नव्हत्या. सिंगापुरातील जपानी विमानदलाच्या तिसऱ्या पलटणींचे तें विमान होतें. विमान जुनें झालेलें होतें. सायगावला विमानाची तपासणी झाली तेव्हां त्यांतील एक इंजिन अगदीं जीर्ण वाटल्यामुळें बदलून त्या जागीं दुसरें बसवण्यांत आलें होतें.

सायगावहून निघतांना विमानातील बोजा फार असल्यानें उड्डाणापूर्वी विमानाला तळावर बरेच धांवावे लागले होतें. ऑगस्टच्या १८ तारखेस सकाळीं टूरेनहून निघतांना विमानांतील बरेचसें अवजड सामान काढून टाकण्यांत आल्यानें तें विनासायास उडूं शकलें. हवामान चांगलें असल्याने हेतो येथें न थांबतांना सरळ फॉर्मोसा बेटांतील उत्तरेस असलेल्या टायहोकू विमान तळावरच पहिला मुक्काम करावा असें ठरले. उड्डाण चालू असतानाच बातमी आलीं, कीं रशियन सैन्य पोर्ट ऑथरमध्यें शिरलें होतें व लवकरच मांचूरियातील डायरेन गांवी तें प्रवेश करण्याची शक्यता होती. रशियन सेनांनीं डायरेन व्याप्त केलें असतें तर जपानी विमानाला तेथें उतरणें शक्य नव्हते. म्हणून वेळ वाचवून शक्य तेवढया लवकर डायरेनला पोंचणे अवश्य होतें, माध्यान्हीस विमान टायहोकू तळावर उतरलें. सर्वजण उतरलें व जवळच्या एका तंबूंत गेले. युद्धस्थगित केल्याचा जपानी सम्राटाचा संदेश आघाडीवरील सर्व सेनाधिकाऱ्यांना कळविण्यास एक जपानी राजघराण्यातील खास दूत विमानाने टायहोकूमार्गें दक्षिणेस जाणार होता. त्याचेसाठी तो तंबू उभारण्यांत आला होता. तंबूत बसून सर्वांनीं सँडविचेस् व केळी यांवर दुपारची वेळ भागविली.

विमान चालकानी व तळावरील यंत्रज्ञांनी नेहमीप्रमाणें विमानाच्या यंत्राची तपासणी चालविली. विमानाच्या डाव्या एंजिनमध्यें थोडा बिघाड होता. दहा पंधरा-मिनिटें त्यावर खपून तें समाधानकारक करण्यांत आलें. सुमारें सव्वादोन वाजता सर्व उतारूं त्यात बसले. चालकांसुद्धा एकूण १३–१४ माणसे विमानांत होती. मुख्य विमानचालक मेजर टाकिझावां, उपचालक आयोयागी, नकाशावरून विमानाच्या दिशेचें धोरण ठेवणारे ओकिश्टा व रेडिओ संदेश घेणारे तोमिनागा व एक-दोन यंत्रज्ञ यांचेवर विमानाच्या उड्डाणाची जबाबदारी होती. प्रवाशांत जनरल शिडेइ, लेफ्टनंट कर्नल तादेओ साकाई, लेफ्टनंट कर्नल शिरो नोनोगाकी, मेजर तारोकोनो, मेजर इहाहो टाकाहाशी व कॅप्टन केईकिची आराई असे सहाजण होते. भारतीय दोघेच

होते एक नेताजी व दुसरे हबीबूर रहमान. अशा एकूण १३–१४ व्यक्ति होत्या.

विमानाच्या तोंडाशी उपचालक, रेडिओ संदेश घेणारा व नकाशावरून मार्ग ठरविणारा असे तिघेजण बसले होते त्यांच्या मागे डाव्या हातास चालक बसला होता. त्याच्याच ओळीला उजव्या बाजूस जनरल शिडेई बसले. सायगावहून निघताना आपली जागा शिडेईनीं नेताजीना देऊं केली होती, पण नेताजीनीं साभार नकार दर्शविला होता चालकाचे मागें नेताजी बसले होते. बसण्यास खुर्च्या नसल्यानें विमानाच्या भूपृष्ठावरच सर्व उतारू बसले होते. बसावयाला मऊ असावे म्हणून नेताजीना एक उशी देण्यात आली होती. चालकाच्या व नेताजीच्या मागील बाजूस हबिबूर रहमान बसले होते. इतर सर्व व्यक्ती मागल्या बाजूस बसल्या होत्या.

**अपघात !!!**

मध्यान्ह भोजन व तपासणी उरकल्यावर दुपारी २॥ वाजता विमान तळावरून उडालें. विमान जेमतेम १००–१५० फूट उंच उडालें असेल नसेल, तेवढ्यांत तोफेचा गोळा उडाल्यासारखा धुडुम् असा मोठा आवाज झाला. डाव्या बाजूचें यंत्र व विमानाचा पंखा हे निसटून गळून पडले. विमान पंगु झाल्याप्रमाणें डाव्या कुशीवर वळले. जमिनीपासून फार उंचीवर नसल्याने उरलेल्या एका यंत्राचे जोरावर विमानाचा तोल सांभाळणें अशक्य झालें व सू...अशी भेसूर शीळ घालीत विमान एका क्षणांतच भूमीकडे धाव घेत तोडघशी आदळलें, विमानाच्या पुढच्या भागाला आग आगली. मागल्या बाजूस रचलेल्या पेटचा व इतर सामान गडगडून मागल्या बाजूनें निघण्याचा रस्ता बंद झाला. पुढल्या तोंडाशीं आग व मागल्या बाजूस

# सिंगापुरांतील नेताजींची दिनचर्या

सुभाषचंद्र सिंगापुरांत आले तेव्हां त्यांची दिनचर्या मोठी विचित्र होती. सर्व कामें उरकून पहाटें ३–४ वाजतां ते झोंपी जात ते सकाळी सुमारें दहा वाजता उठत. आन्हिक आटपून ते तेलानं अंगमर्दन करवून घेत. हिंदी स्वातंत्र्य–सेनेतील एक पेहेलवान मराठी शिपाई सुभाषचंद्राना मालिश करण्यासाठीं कायमचा नेमून देण्यात आला होता.

अंगमर्दनानंतर स्नान आणि न्याहारी करून ते जो लष्करी जामानिमा चढवीत तो बहुधा मध्यरात्रीपर्यंत त्यांच्या अंगावर असे. दि. २५ ऑगस्ट १९४३ रोजीं त्यांनी हिंदी स्वातंत्रसेनेचें सरसेनापतीपद स्वीकारले, तेव्हांपासून १८ ऑगस्ट १९४५, त्याच्या मृत्यूपर्यंत बहुतेक ते लष्करी पोषाखातच दृष्टीस पडत

त्याच्या दिमतीला दोन सुंदर मोटारी देण्यात आल्या होत्या. त्यापैकी एकींतून ते सकाळी ११॥ चे सुमारास नागरिक संघटनेच्या कचेरीत जात. या स्वातंत्र्य–संघटनेचें नांव 'हिंदी स्वातंत्र्य संघ' होतें. त्यांच्या मोटारीच्या पुढें दोन अवजड मोटार सायकलीवर स्वातंत्र्य सैनिक निघत नेताजीच्या चमकदार मोटारीवर एक लहानसा तिरंगी झेंडा फडफडत असे. मागें २–३ मोटारीमधून इतर अधिकारी जात,

संघकचेरीत ठिकठिकाणाहून आलेल्या प्रतिनिधीची भेट होई. त्यांच्याकडून निधी, सेनाभरती, कोणाचें गाऱ्हाणें, लष्करी शिक्षणासाठीं आलेल्या सैनिकांच्या रहाण्या–जेवण्याच्या सोयींबद्दल चौकशी नेताजी अत्यंत आस्थेनें करीत.

दुपारी एक वाजता सुभाषचंद्र स्वातंत्र्य–सेनेच्या कचेरीत येत. तेथें सेनेतील शिस्त, नवीन भरती झालेल्यांचें लढाऊ शिक्षण, सेनेची युद्धसामुग्री, आघाडीकडील कूच, नेमणूका, बदल्या अशा बाबतीत सल्ला मसलतीची देवाण-घेवाण चाले.

तदनंतर स्वतःच्या बंगल्यावर जाऊन काही तांतडीचे कागदपत्रें पहायचीं. इतर भेटीगांठीं नसल्यास २॥ ते ३ च्या सुमारास त्याचें भोजन सुरू होई. जेवताना त्यांच्या पंक्तीला हिंदी, जर्मन वा जपानी वरिष्ठ नेते किंवा अधिकारी असत.

भोजनोत्तर बंगल्यावर भेटी–गांठींचें सत्र सुरू होई. निरनिराळ्या दोस्त राष्ट्रांचे प्रतिनिधी, वकील किंवा प्रतिष्ठित नागरिक, सस्थाचे कार्यवाह, स्त्री कार्यकर्त्या वगैरेंच्या भेटीसाठी वेळ नेमून दिलेली असे. नंतर जाहीर भाषणें, संस्थांना भेटी देणें, स्वातंत्र्य सेनेची परेड पहाणें, लष्करी शिक्षणकेंद्राचें काम पहाणें आदीचा अंतर्भाव होई.

हें सर्व होईपर्यंत रात्री बहुतेक ९ वाजत. रात्रीचें जेवण ९ किंवा १० च्या सुमारास होई. मंत्रिमंडळाच्या बैठकी, कागदपत्रावर सह्या करणें इत्यादी काम रात्री १२–१ पर्यंत चाले त्यानंतर नेताजी स्वतःच्या अध्ययनाच्या खोलीत येत. तेथें एक सुंदर सागवानी टेबल, साजेशी खुर्ची, शोभिवंत स्टॅंड, दोन आरामखुर्च्या निवडक पुस्तकाचें फिरतें शेल्फ, पुस्तकांनी भरलेली कपाटें असें वाघ्याच्या रंगाचे, तुकतुकीत पॉलिश केलेलें फर्निचर होतें.

बंगल्यांत सर्वत्र शांतता पसरलेली असे समुद्राच्या लहरीचा गंभीर ध्वनि व पहारेकऱ्याच्या हालचालीचे क्वचित आवाज ऐकू येत. दिवसाची गडबड व रात्रीची निश्चलता यांमधला फरक नेताजीच्या हालचालीमध्यें दिसून येई. दिवसभराच्या कामाचें प्रचंड ओझें मनावरून उतरवून चिंतन, मनन, गीतावाचन आणि इतर अध्ययन यांत ते गढून जात वैयक्तिक व्यासंगासाठी सर्वांत योग्य वेळ. धर्मग्रंथ, देशभक्ताची चरित्रें, तत्वज्ञान व इतर देशांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे इतिहास हेंच मुख्यतः त्याचें वाचन असें. पहाटें ३–४ वाजेपर्यंत शांत चित्तानं वाचन झाल्यावर भारतीय स्वातंत्र्याचा हा महान दूत निद्रेच्या आधीन होत असे.

●●●

सामानाचा ढीग यांच्या कोंडीत नेताजी व इतर उतारूं अडकले. विमान धांव घेतें त्या सीमेंटच्या पक्क्या रस्त्यालगत विमानतळाच्या आवारातच विमान आदळलें होतें.

विमान पडतां पडता आतील पेट्रोल टाकी मेजर कोनो व नेताजी याचे मधोमध येऊन पडली. त्यामुळें विमान आदळल्यावर टाकी पलीकडील नेताजी त्याना दिसूं शकलें नाहींत. विमान चालक मेजर टाकिझावा यांच्या हातीं असलेलें विमानाचें सुकाणूं तुटून त्यांच्या कपाळाला व चेहऱ्याला जखमा झाल्या. आयोगी यांची छाती ठेंचाळून रक्तबंबाळ झाली होती. ते पुढें कललेले आढळले. आग जास्त भडकूं लागून आंच सहन न झाल्यामुळें डोक्यावरील प्लॅस्टिकचें आच्छादन हाताच्या ठोस्यानें फोडून मेजर कोनो विमानाच्या वरल्या भागांतून बाहेर निसटले. डोळ्यांना झळ लागूं नये म्हणून त्यानी हातांनीं डोळे झाकले होते. त्याचे हात, पाय, चेहरा भाजले होते. टाकीतून यंत्राकडे पेट्रोल नेणारी नळी तुटून मेजर कोनोच्या अगावर उडालेल्या पेट्रोलनें पेट घेतल्यानें मेजर कोनो विमानापासून पळत पळत सुमारें १०० फूट दूर गेले व जमिनीवर गडबडा लोळून त्यांनी शरीराची आग विझवली.

विमान आदळलें तेव्हां नेताजीच्या पुढल्या बाजूस विमानाने पेट घेतल्यानें नेताजी मागे वळले तो हबीबुर रहमान म्हणाले, " नेताजी पुढल्या बाजूनें बाहेर निघा. मागें वाटच नाही " सामान गडगडून प्रवेशद्वारापुढें ढीग झाल्यानें ते दार उघडून बाहेर येणें अशक्य होते. शेवटी आगीतून मार्ग काढीत नेताजी बाहेर निघाले. मागोमाग हबीबूरहि आले. सुमारें ४० फुटांवर पश्चिमेकडे तोंड करून, भारताचा मनोमन शेवटचा निरोप घेत नेताजी उभे होते. त्याचे कपडे पेटले होते. हबीबूर रहमान यानीं पुढें होऊन त्यांना कपडे काढण्यास मदत मदत केली. बुशशर्टाच्या पट्टयाचा लोखडी आंकडा लवकर निघेना विजार पेटली नसल्यानें काढावी लागली नाहीं. त्यांच्या डोक्याच्या डाव्या बाजूस सुमारें ४ इंच लांब खोल खोंक पडली होती. डोक्यावरचे केंस जळले होते. चेहरा भाजलेला होता. त्यांचे कपडे काढतांना हबीबुर रहमान याचे दोन्ही हात भाजले होते. त्यानी नेताजींना तेथेंच जमिनीवर निजवले व रुमालानें डोक्यावरील खोकेतून वहाणारी रक्ताची धार थांबवण्याचा प्रयत्न केला.

विमान आदळल्यावर आत भूपृष्ठावरच डोके आपटल्यामुळें हबीबूर रहमान यांच्या कपाळाला खोक पडली होती. उजव्या गुढघ्याचा उजवा भाग कशावर तरी आपटल्यानें दुखावून रक्तानें माखला होता. त्यांच्या वस्त्रानीं पेट घेतला नव्हता. हबीबुर रहमानहि नेताजीच्या शेजारी जमिनीवरच पहुडले. दुखावलेले भाग ठणकत होते. शरीर क्षीण झाल्यासारखें त्यांना वाटत होते. नेताजींनी हबीबूर रहमानना विचारलें, " तुम्हांला जास्त तर नाही ना लागलें ? " हबीबुर रहमान म्हणाले, " मला वाटते मी बरा होईन... पण तुमचें कसे आहे ?"

" तुम्हाला ईश्वर वाचवेल " अशी हबीबुर रहमान यानी आशा व्यक्त केली. तेव्हां नेताजी म्हणाले, " नाहीं, मला तसें वाटत नाहीं "

ले. जनरल शिडेई विमानातून बाहेर निघूच शकले नाहीत ते व विमान चालकापैकीं टाकिझावा आणखी एक व्यक्ति आंतच जळून मेले. बारा जखमी व्यक्तींना घेऊन काही मैलांवर असलेल्या नानमोन (दक्षिणेकडील प्रवेशद्वार) लष्करी इस्पितळात मोटारी, ट्रक व शिडेशा नांवाच्या (विमानाच्या पंख्याना गति देणाऱ्या) वाहनांतून नेण्यांत आलें.

### नानमोन इस्पितळांत

त्या रुग्णालयांत कॅप्टन योशिमी, डॉक्टर त्सुरुटा व आणखी एक असे तिथे डॉक्टर होते. जपानी आणि फोर्मोसातील स्थानिक सुमारें सहा नर्सेस् आणि त्यांच्या हातांखालीं इतर तीस मदतनीस होते.

अपघात झाल्याबरोबर दुपारी २॥ वाजतां विमानतळावरून इस्पितळांत डॉक्टर योशिमीना कळविण्यांत आलें. कीं, अपघातांत जखमी झालेल्या बऱ्याच लोकाच्या उपचारार्थ त्यांनीं सिद्ध असावे. सुमारे पाऊण तासानें जखमी लोकांना घेऊन वाहानें रुग्णालयांत आलीं. नेताजीना आत नेण्यात आलें तेव्हां सर्वांत त्यांची परिस्थिती जास्त चिंताजनक होती. तरीसुद्धां कष्टी स्वरांत त्यांनीं म्हटले, " अगोदर जखमी लोकांकडे लक्ष द्या, सर्वांत शेवटी माझ्या उपचाराकडे वळा. " मनुष्य बेसावध असतांना त्याची खरी वृत्ती कळते म्हणतात नेताजीच्या अन्तःकरणाचीं थोरवी ती हीच. **त्यांची ही हृदयद्रावक आठवण भारतीय चौकशी मंडळाला सांगताना जपानी साक्षीदारांच्या डोळ्यांतील अश्रुधारा व गळ्यांतील हुंदके अनावर झाले होते.**

नेताजीचें सर्व शरीर भाजल्याने त्वचा काळी पडली होती. हृदयापर्यंत आच पोचली होती. चेहरा सगळा सुजला होता. डोळ्यांवर सूज असल्यामुळें डोळे उघडणें मोठें कष्टाचें होत होते. परतु दृष्टि शाबूत होती. रुग्णालयात आणले तेव्हा ते शुद्धींत होते. शरीरात उष्णता ३९ सेंटिग्रेड अश होती. नाडीचे ठोके मिनिटास १२० एवढे वाढले होते. हृदय क्षीण होत चाललें होतें.

डॉक्टर त्सुरुटानी नेताजीच्या भाजलेल्या भागांवर पांढरे मलम फासून सर्वांगाला बॅंडेज बांधले हृदयक्षीणतेवर उपाय म्हणून डॉक्टर योशिमीनी एकामागून एक व्हीटा–कॅंफरची चार व डिगिटॅमिनचीं दोन अशीं सहा इजेक्शनस् दिली नतर पाचपाचशें क्युबिक सेंटिमिटरची रिंगर सोल्यूशनचीं तीन इजेक्शन्स नाडचांत दिली. येवढें ताबडतोब उपचार केल्यावर नेताजींना दोन नंबरच्या विभागांत नेऊन निजवण्यांत आलें. हबीबूर रहमाननाहि त्याच्याच खोलीत उपचार सुरु झाले

अंग फार भाजल्यामुळें रक्त साखळू लागलें होतें. सुमारे २०० क्यूबिक सेंटिमीटर साखळलेलें रक्त बाहेर काढून त्याऐवजीं बाहेरचे दुप्पट ताजें रक्त नेताजींच्या शरीरांत घालण्यात आलें. हें रक्त त्याच दवाखान्यांत असलेल्या एका जपानी सैनिकाचें होतें. सुमारें ४॥ वाजतां हें रक्त दिलें. रक्तप्रवाह दूषित होऊं नये म्हणून सल्फोनोमाइडचें इजेक्शन देण्यात आलें. ह्या सर्व उपायाच्या किंचित् सुपरिणाम दिसतोय् असा भास झाला.

नंतर डॉ. योशिमी जखमी झालेल्या इतराकडे लक्ष देण्यास गेले. जातांना डॉ. त्सुरुटाना नेताजीना दर अर्ध्या तासाने व्हिटाकॅंफरचे इंजेक्शन देण्यास त्यांनीं सांगितलें.

हबीबुर रहमान यांनाहि मलम लावून व जखमांना दूषित होऊं न देणारें औषध लावून बॅंडेज बांधण्यात आलें.

नेताजी अधून मधून किंचित असंबद्ध बोलत होते. त्यांना भयंकर वेदना होत असल्या पाहिजेत असे पाहणाऱ्याच्या लक्षांत येई. नाकामुरा नांवाचे जपानी दुभाष्ये व ले. कर्नल नोनोगाकी त्यावेळी तेथेंच होते. इतर जखमी लोक मोठमोठ्यानें कळवळून ओरडत होतें– " आमच्या यातना कमी करण्यासाठीं आम्हाला विष तरी द्या. " असें कळकळून सांगत होते. परंतु नेताजींच्या वागण्यांत–बोलण्यांत

# शोभेसाठीं स्त्रीत्वाची शोभा–

# नको आहे मला हें ! –

सिंगापुरांत इंग्रजाच्या राजवटींत मेयर नामक एक यहुदी गर्भश्रीमंत व्यापारी असे. जपान्यांनीं हल्ला करतांच हे गृहस्थ सिंगापूर सोडून गेले. शत्रूकडील जी मालमत्ता जपान्याच्या ताब्यात आली त्यात मेयराचा समुद्रकांठचा रमणीय बंगला होता. विस्तीर्ण निळ्या समुद्राच्या पार्श्वभूमीवर ह्या बंगल्याचें सौंदर्य चित्त वेधून घेई.

सुभाषचंद्र जर्मनींतून सिंगापूरला येणार असे ठरल्यावर हा बंगला त्यांच्यासाठीं निश्चित करण्यांत आला. नेताजी तेथें राहूं लागल्यावर वरच्या मजल्यावरील स्वत:चे अभ्यासाच्या खोलीत मेजावर त्याना विजेच्या दिव्याचा एक स्टँड हवा होता. दिवा वाटेल तसा वळवता येईल अशा लवचिक तारदंडावरील दिवा, मध्यरात्रीच्या शांत वाचनाकरतां त्यांना जरूर होता. त्यांनी स्वत:च्या चिटणिसाला तो आणावयास सांगितलें. चिटणिसाने टेलिफोननें सिंगापूरांतील स्वातंत्र्य–संघाच्या कचेरीत ती मागणी कळविली सायंकाळपर्यंत भारतीय दुकानात उपलब्ध असलेला सर्वांत उत्तम स्टँड आला. विजेचें काम जाणणाऱ्या इसमानें तो स्टँड नेताजीच्या मेजावर लावून दिला. व सागितलें काम पूर्ण झालें अशा समजुतीने तो निर्धास्त झाला.

मध्यरात्रीपर्यंत सर्व सरकारी कामें उरकून नेताजी आपल्या अध्ययनाच्या खोलींत गेले खटका दाबून विजेचा दिवा लावला. प्रकाशात नवीन स्टँड न्याहाळून पाहिल्यावर त्याच्या चेहऱ्यावर तीव्र नापसंती दिसली. दुसरे दिवशीं त्यांनीं चिटणिसाला बोलावणें पाठविलें. त्यांनीं विचारलें–" दिवा नीट पाहिला का ? चांगला आहे कां ?"

चिटणीस:–" हो पाहिला की, "

नेताजी.–" पुन्हा पहा बरं जरा, "

चिटणीस घाबऱ्या घाबऱ्या वर गेले ऐनवेळी दिवा बिघडला की काय असे त्यांना वाटले. त्यानीं भीतभीत खटका दाबून पाहिलें तर दिवा व्यवस्थित लागला. त्याना वाटले नेताजींचीच काहीतरी चूक असावी. त्यांनी खालीं जाऊन नेताजीना सागितले–– " दिवा तर ठीक आहे " नेताजी गंभीरपणे म्हणाले— " ठीक आहे काय म्हणता ? त्या दिव्याच्या तळाशीं पारदर्शक दगडाची एक लहानशी, स्त्रीची नग्नमूर्ति आहे ती दिसली नाही तुम्हाला ? शोभेच्या नावाखालीं स्त्रीत्वाची शोभा नकोय् मला. फेकून द्या तो स्टँड. "

चिटणिसाच्या डोक्यांत लख्खकन प्रकाश पडला. दुसऱ्या दिवशी जो दिवा आणला गेला तो अर्थातच नीट न्याहाळून व पारखून आणण्यांत आला. त्यांत तरी नेताजीना काहीं आक्षेपार्ह दिसूं नये अशा काळजीपूर्वक.

---

स्वत:च्या वेदनाचा नामनिर्देशही नव्हता. असें श्री. नाकामुरा व नोनोगाकी यानीं चौकशी मंडळापुढें मोठ्या अभिमानानें व कौतुकानें सांगितलें.

### देशबांधवांना सांगा कीं....

इस्पितळांत नेल्यावर मरण्यापूर्वीं नेताजी एकंदर तीन वेळां बोलले. एकदा सायगावमध्यें मागें राहिलेल्या व्यक्तींची आठवण होऊन नेताजी म्हणाले, " ते लोक दुसऱ्या विमानानें फोर्मोसात आल्यावर त्याच्या राहाण्याची वगैरे नीट व्यवस्था करा..." नंतर " माझे सर्व रक्त डोक्याकडे धांवते आहे. असा मला भास होतो आहे..." असें म्हणाले. तिसऱ्या खेपेस हबीबुर रहमान याना खुणेनं जवळ बोलावून नेताजीनीं सागितलें, " तुम्हीं हिंदुस्तानांत परत जाल तेव्हां आपल्या देशबांधवाना सांगा कीं, माझ्या जिवांत जीव असेंपर्यंत मी भारताच्या स्वातंत्र्यासाठीं लढलों. तुम्हींहि स्वतंत्र होईपर्यंत लढा थांबवू नका. भारत लवकरच स्वतंत्र होईल..."

ऑगस्ट १९४५ च्या १८ तारखेस सायंकाळी ७ चे सुमारास फोर्मोसा बेटावरील नानमोन इस्पितळांत दुसऱ्या नंबरच्या खोलीत मृत्यूच्या साक्षीनं उच्चारलेले ते शब्द म्हणजे सुभाषचंद्रांच्या अवतारी कार्यावरील शिक्कामोर्तब होय.

मृत्यूपूर्वी नेताजीनीं दोन–चार वेळां पाणी मागितलें. त्याप्रमाणें त्यांना दरवेळी थोडे थोडें पाणी देण्यांत आले, सायंकाळीं सुमारें ७॥ वाजता नेताजीची नाडी फार क्षीण होऊ लागल्याचें लक्षात आले. म्हणून डॉ. योशिमीना बोलावण्यात आलें. त्यानीं व्हिटाकँफर व डीगिटॅमीनची इजेक्शन्स् दिली. परंतु काही उपयोग झाला नाहीं. नाडीचे ठोके कमी कमी होऊ लागले. शेवटीं रात्रीं सुमारें ९॥ वाजतां ( १८ ऑगस्ट १९४५ ) हृदय बंद पडून भारताचा हा अद्वितीय देशभक्त सेनानी, अवतारी आत्मा नरदेहांतून निघून गेला. शेवटच्या सुमारें अडीच तासांत ते काहीच बोलले नाहींत.

● ● ●



# कळलें आतां अंतर

## एक ऐतिहासिक कादंबरी

दा.सी.देसाई

## : १ :

मध्यरात्र टळून गेली. वारा पेंगुळला. किती तरी वेळ प्रकाश पाझरून चांदण्यांच्या फिक्क्या कवडचा बनल्या. मावळतीच्या क्षितिजाकडे झुकलेला चंद्रमा अधिक पिकून कांतिहीन झालेल्या फळासारखा आभाळांत लोंबकळत होता. सृष्टीला जाग होती निव्वळ सजीवाच्या श्वासोच्छ्वासाची. निशाचरांचाहि वामकुक्षीकरितां डोळ्याला डोळा लागावा, अशी ती सुस्तावलेली वेळ. रातकिडयांच्या जलशाला मध्यतर मिळाला असावा मघापर्यंत काळोख पीत बसलेले नगरींतले रत्नदीप आता अधःकारानच पचवून टाकले होते; आणि अधारानं काजळवर्णी पांघरुणाखाली अलगद दडवून टाकलीं होतीं सैल सुटलेली आलिंगन अन् गात्र ! नगरींतला राजपथ अजगरासारखा सुस्त अन् गार पडला होता.

ती नीरव शांतता चिरीतच बिंबिसाराचा रथ नगरीत घुसला आणि आपल्या खडखडाटानं राजपथाच्या दोन्ही तीरावरच्या उत्तुग वास्तूना थरकांपवीत राजप्रासादापाशी येऊन ठेपला.

रथ आला केव्हा, महाराज उतरले केव्हां, प्रासादापुढच्या पायऱ्या तरातरा चढून गेले केव्हा ? डोळे चोळत, स्वतःला सावरत उभ्या राहाणाऱ्या द्वारपालांना पत्ताहि लागला नाही. ते सावध झाले रथापाठोपाठ आलेले घोडेस्वार तिथं येऊन थांबले तेव्हां.

एका अश्वावरून महाराणी सुनंदा खालीं उतरली. बरोबरच्या सामतांनी केलेल्या निरोपाच्या वदना स्वीकारण्याकडेहि तिन लक्ष दिलं नाही. महाराजापेक्षांहि अधिक चपळाईन ती महाराजांच्या मागें चालती झाली.

महाराज प्रासादात पोचल्याची वार्ता विद्युत्वेगानं सर्वत्र पसरली. संगीत शाळेंत विसावलेल्या वाद्यांवर नाजूक बोटं हळूवारपणान तारा छेडून वातावरण सुमधुर स्वरानीं दरवळू लागली. बिंबिसार थेट शयनगृहांतच गेला आणि--

प्रतोदाच्या फटकाऱ्यासारखी आज्ञा कडाडली--

“ एकदम बंद करा ते वाद्यांचे गजर ! ”

वाद्यमेळांतून उमटणारे झंकार अखेरीस थरकांपून वातावरणांत विरून जायला निमिषाचाहि अवकाश लागला नाही आणि सारं पुन्हा शांत झालं. एक क्षणभरच.

ती नीरवता कांपीत आणखी एक जळजळीत शब्दांचा बाण सुटला “ कोणी कोणीसुद्धां थांबू नका इथं. चालते व्हा सारे ! ”

त्या शब्दांना मुखापासून कानापर्यंत पोचायला लागेल तेवढाच अवधि-हलक्या पावलांच्या पांच-पचवीस आवाजांत महाराजाच शयन-गृह रिकामं झालं. तिथं उरलें दोनच जीव–बिंबिसार आणि सुनंदा !

मंचकापाशीं उभ्या असलेल्या सुनंदेनं विचारलं,

“ महाराजांच्या आज्ञेतल्या त्या ‘ कोणी कोणीसुद्धां थांबू नका ’ मध्यें माझीदेखील गणना होते कां ? ”

महाराज हसून नकारार्थी उत्तर देतील अशी तिची अपेक्षा होती.

“ तुझीदेखील म्हणजे ? आज्ञा तर मुख्यत. तुलाच उद्देशून होती. माझ्या आज्ञेचे शब्द मुखावाटे सुटतांच तूं सर्वप्रथम आपलं तोंड काळ करशील अशी अपेक्षा होती माझी. ” असं बोलणं बिंबिसाराच्या अगदीं ओठावर आल होत पण त्या संतापाच्या भरातहि त्यानं स्वतःला सावरल आणि ओठांच्या कांठावर आलेल्या त्या कटु शब्दांना परत पोटांत लोटल. मग आवाजांत जराशी सौम्यता कालवून तो म्हणाला, “ देवी, अगदी मनापासून सांगायचं तर तुझी अनुपस्थितीहि यावेळी आम्हाला अधिक पथ्यकारक ठरणार आहे ! ”

अनपेक्षित उत्तरान दचकण्याचा हा आजच्या दिवसांतला दुसरा प्रसग होता. पण त्यावर आवाक्षरहि न काढतां, नुसती मान लववून महाराणीनं तिथून काढता पाय घेतला. ती स्वतःच्या महालाकडे चालती झाली. खरं तर तिला एकाच प्रश्नाचं उत्तर त्यावेळीं मिळायला पाहिजे होतं--

“ महाराज, सारथ्याला मागें बसवून, स्वतःच्या हातीं प्रतोद घेऊन रथ असा सुसाट दामटलात, तो कशासाठी ? ”

तो प्रश्न तसाच मनात घुटमळत राहिला. वेळ ओळखून महाराणी तिथून बाहेर पडली हेंच बर झालं.

मचकाकडे पाठ फिरवून ती जात असतांना तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे महाराज नेहमीसारखेंच बघत राहिले. तिच्या चालीतला डौल ढंगदार होता, मनोवेधक होता. वेड लावणारा, विद्ध करणारा. कोणाचीहि नजर सहजगत्या खिळून रहावी असा. बिंबिसारला जाणवलं, ‘ अतिपरिचयानंहि त्यातली रुचि लवभरदेखील उतरलेली नाहीं. ’

सुनदा डोळ्यांसमोरून चालती झाली तरी बिंबिसारच्या अंतरगांतील उलघाल अजिबात निवली नाहीं. उलट रुतला बाण उपसून टाकल्यावर रक्ताची धार उसळून फवारावी, तशी ती अधिक जोरानं उफाळली, सतावू लागली. त्याला मंचकावर राहवेना. अंगाखालची मृदुमुलायम शय्या मचकासह पेटून आपला देह होरपळूं पाहते आहे, असा भास त्याला होऊं लागला. तो उठला. महालाच्या लांबीरुंदीच्या विविध रेषांची गिचमीड त्याचे पाय अदृश्य शाईंत गिरवू लागले.

महालांतला अंधार एकाकी पिऊं पाहणाऱ्या रत्नदीपाच्या ज्योतीतली आग त्याच्या जळत्या नजरेला सहन होईना. चिडून तो त्या दीपापाशी गेला. पजाच्या फटकाऱ्यानं त्यानं ती निष्पाप ज्योत विझवून टाकली.

प्रकाश लोपला पण कालवाकालव सरली नाही. दाटत्या अधारानं ती अधिक उकळती केली. सुनदेनं जाण्यापूर्वी त्यांच्यासाठी भरून ठेवलेला चषक त्यानं ओठाला लावला. वाटल होतं तें पेय तरी हा दाह तिळभरान शोषून घेईल. पण उलटच झाल. आगीत तेलतूप ओतलं गेल. आणि त्या धडकत्या अग्नीच्या शलाका एकसारख्या साकारूं लागल्या सुनदेच्या रूपांत !

बिंबसारला आता सुनदा नको होती--नकोशी झाली होती. जिला आजवर पट्टराणी म्हणून बहुमानली; लाडकी महाराणी म्हणून मिरवली ती सुनदा आतां त्याला नको होती--या महालांत, प्रासादात,

राज्यांत,जगात सुनंदा कुठेंच राहायला नको होती.–स्वत:च्या डोळ्यांपुढूनच काय, अंत:करणावरूनहि तिची नांवनिशाणी कायमची पुसून टाकतां आली असती, तर तें त्याला पाहिजे होतं. लवकरांत लवकर या गोष्टीचा सोक्षमोक्ष व्हायला हवा होता.

आज त्यांचा विवाहाचा वाढदिवस होता नेमक्या त्याच दिवशी त्याच्या मनांतला सुनंदेविषयीचा द्वेष शीगेला पोंचला होता.

या वर्षी विवाहाचा वाढदिवस साजरा करायचा नाही, असं त्यानं मनाशी योजलं होतं. आज विवाहाचा वाढदिवस आहे, हेंहि तो विसरून गेला होता.

पण भल्या सकाळीच केवढ्या उत्साहानं ती त्याच्या शयनगृहात आली. मचकावरच तो आळोखेपिळोखे देत होता. संगीतशाळेंतून वीणा झंकारत होती. गोड आवाजांत भाट गात होते. त्या सुमधुर सुराच्या गर्द राईतच तो गुतला होता, गुंगला होता, वाटत होतं ही स्वरांची दुनिया कधी संपूच नये. स्वर सारखे बरसत असावेत आणि त्यांत ओलचिंब होत आपण जलसमाधि घ्यावी.

पण सुनंदा आली. दंवबिंदूनी न्हालेल्या नवोन्मिलित पुष्पासारखं तिचा सुस्नात सौंदर्य केवळ विलोभनीय होतं–जितकं पूर्वी तितकच त्याक्षणींहि.तिच्या लावण्याची टवटवी जणूं शाश्वतात कोरली गेलेली होती. सुकुमार राजकुमाराला उष:कालीं पडणारं एक रम्य स्वप्न तिच्या रूपानं समूर्त झालं होतं. फिरत्या ऋतुचक्राच्या प्रत्येक आवर्तनांत वसुधरेची मोहकता अबाधित रहावी, त्यात नवनवतेचे उन्मेष फुलावेत, नव्याची नवलाई आणि ताजेतवानेपणा टुकटुकीत रहावा, तसच अजराचं वरदान सुनंदेलाहि लाभलं होतं

बिंबिसारला वाटे, इतके उन्हाळे येऊन गेले त्याना कसलाच लेप हिच्या सौंदर्यावर कां चढवतां आला नाहीं ? कोसळत्या जलधारा भरभरून घेऊन आलेल्या एकाहि वर्षाऋतूला हिची तकाकी यत्किंचितहि कां धुतां आली नाहीं ? कोणताच हिंवाळा हिच्या सौंदर्यावर एकहि ओचकारा ओरखडू शकला नाहीं, हें कसं काय ? पराक्रमाच्या बळावर सूर्यबिंबाला मार्गे सारूं पहाणाऱ्या बिंबसारालाहि वाढत्या वयाच्या चाहुलीनं बिचकवलं आणि साऱ्या ऋतूंनी त्याच्या सर्वांगावरून आपले हात फिरवले. पण सौंदर्यसम्राज्ञी सुनंदेचा एक केंसहि कुणाला हलवता आला नाहीं.

अशी सुनंदा समोर आली कीं बिंबिसाराच्या मनांतला मत्सर पार कुठल्याकुठें विरघळून जाई. महाप्रयासानं त्याला तो जमा करून सांभाळावा लागे.

ती आली आणि त्याच्या शेजारींच बसली. आपली नाजूक बोटं त्याच्या विस्कटलेल्या केसांतून फिरवू लागली. कुठं बटांची वर्तुळं करायचा खेळहि तिनं केला. किती तरी वेळ नुसती त्याच्या डोळ्यात आपलं प्रतिबिंब बघत आणि ओठांच्या महिरपींचं हास्याला कोंदण करीत, ती त्याला वेडावतच बसली. मग हा अबोला मोडला तिच्या एका साध्या सवालानं–" उगवती केव्हांच उजळली तरी रेंगाळत्या रात्रीची हकालपट्टी या शयनागारातून अद्यापि झाली नाहीं वाटतं ?"

त्यान आपले डोळे विनाकारण झांकले ; आणि उत्तर द्यायचं टाळलं. पण तिनं पिच्छा सोडला नाही. आपल्या डाळींब उकललेल्यासारख्या रक्तवर्णी ओठांचा फुसका चबू फुगवून लटक्या रुसव्यानं तिनं जाणीव दिली, " आपल्याला म्हणते आहे मी !"

मग हसल्यासारखं करून तो उत्तरला, " माझ्या झोपेचा एवढा दुस्वास करतेस–नवी सवत वाटली कीं काय तुला ती ?"

बिंबिसारहि जाणून होता कीं, पांचशें सवती असतांना जिनं कुणाला भीक घातली नाही ती त्यात आणखी एकीची भर पडली म्हणून थोडीच रागावणार आहे ? ती नुसती हसली. मग त्यानंच विचारलं, " इतक्या सुप्रभातीं महाराणींनीं या महालात पायधूळ झाडण्याचे प्रयास कशासाठीं घेतले बरं ? "

तिला हवा होता तोच विषय त्यानं नेमका काढला. मग प्रश्नाचं उत्तर प्रतिप्रश्नानं करीत ती म्हणाली, " ओळखा की तुम्हीच, मी कशासाठीं आली असेन तें !" एवढं म्हणून तिनं आपली वेणी पुढ आणली. भृंगकांति लाबसडक रेशमी केंसांत तिनं उत्फुल्ल नक्षत्रासारखी मोगऱ्याचीं प्रसन्न, शुभ्र फुलं माळलीं होतीं. महाराजांकडून काय उत्तर येणार हें पाहण्यासाठी तिनं आपली दृष्टि त्याच्या नजरेत ओतली होती.

" मनकवडा थोडाच आहे मी !" त्यानं सरळं उत्तर केलं

" आज कोणता दिवस आहे, याचा विसर पडला वाटतं महाराजांना !"

तरीहि कांहींच लक्षात आलं नाहीं, असा निर्विकार चेहरा त्यानं शाबूत ठेवला. तिला थोडासा राग आला. पण रागावून भागण्यासारखं नव्हतं. मग तिनच आठवण दिली, " केंसांत मोगरीची फुलं माळलीत मीं आज !"

ही खूण पटवून घ्यायला हवीच होती. नाहींतर तिनं शेरा फेकलाच असता, " चालयचच; विस्मरणाच्या पताका फडकवीतच वार्धक्य चाल करून येत असत !"

म्हातारपण ! वृद्धत्व ! वाढत वय ! !!

त्याची जाणीव झाली की त्याचा खडखडीत देह पावलाच्या नखापासून केंसाच्या टोकापर्यंत भडकून उठे. प्रतिदिन उगणारा सूर्यनारायण एखाद्या दरोडेखोरासारखा आपल्या आयुष्यातला एक दिवस लुटून न्यायला येतो; एक धक्का देऊन आपल्याला म्हातारपणाकडे रेटतो, असं त्याला वाटायचं. सर्वसाक्षी असून सुनंदा मात्र त्याला दिसत नाही. त्यामुळें तिच्यांतलं आणि आपल्यांतलं अंतर दिवसेदिवस वाढत चाललंय् ही बोच त्याला सलत राही. एका गोष्टीचा त्याला राग होता–वठत्या वृक्षाला त्याची वठण्याची जाणीव असावी–विश्रब्धपणान त्याच्यावर विसावणाऱ्या वेलीनं ती का करून द्यावी !

बिंबिसारला जें खपत नसे, त्याच्यावरच सुनंदा नेमकीं बोट ठेवायची–अजाणतेपणानं, चेष्टेनं ! दहा–बारा वर्षापूर्वी बिंबिसारच्या दाट केसांतल्या एकानं पांढरं निशाण उभारलं, बाकी कोणाच्या डोळ्यांत तें भरण्यापूर्वी पहिल्यांदा तें खुपलं सुनंदेला ! त्यावेळी मोठ्ठी शिकार केल्याच्या अविर्भावात तिनं तो केंस आपल्या बोटांच्या चिमटीत पकडून उपटला आणि त्याच्या डोळ्यांपुढें नाचवत म्हणाली, " महाराज, गाडा उतरणीला लागला म्हणायचा ! पण मी मुळींच जाऊं द्यायची नाहीं त्याला–अशी निपटून काढीन तें म्हातारपण !"

त्यावेळीं तिनं तो पांढरा केस दूर कुठें तरी फेकून दिला–आणि ती चेष्टाहि ती विसरून गेली. पण बिंबिसारच्या हृदयांत मात्र त्यानं खोल खोल आपली मेख रुतवलीच. केंस फेकला म्हणून येणारं वार्धक्य थोडंच पळून जातं ? पट्टराणी यौवनानं मुसमुसत असतांना, सम्राटावर वृद्धत्वाची सावली ?

तेव्हांपासून सुनंदेची बिंबिसारवरची माया दाटत गेली. त्याला जपण्यासाठीं तिची धडपड वाढत राहिली.

एखाद्या नकळत्या लेंकराला सांभाळावं, तशी ती त्याच्यावर लक्ष ठेवायला लागली. त्यानं वेळच्यावेळी जेवण घ्यावं, भोजनांतहि कोणते पदार्थ किती खावे इथपासून बारीकसारीक गोष्टींवर तिची नजर असे. संगीताच्या नादब्रह्मांत त्याला काळवेळाची शुद्धबुद्ध उरत नसे. मग ती त्याला सुनवायची. "पुरें झालं तें संगीत. आता झोपलं पाहिजे आपल्याला!"

गायीपासून वासराला तोडावं, तसा निर्दयपणा ती करते असं त्याला वाटे. पण तिचं मन मोडण त्याला साधलं नाहीं—तसं कांहीं करावं, असहि पूर्वी कधी त्याच्या मनांत आलं नाही. पण आतां तो उलटा फिरला होता वर दाखवलं नाही तरी अंतरात त्याला या वागण्याचा राग येई. तिनं घातलेला विक्षणवारहि त्याला आता उष्ण लागे. आपल्या प्रत्येक हालचालीवर या बयेची एखाद्या गुप्तचरासारखी पाळत काय म्हणून? प्रेमापोटी तिनं घेतलेल्या काळजीचं रूपांतर त्याच्या अंतःकरणातला मत्सराग्नि चेतविणाऱ्या इंधनात होत होतं. तिला तें कधींच उमजलं नाहीं. वरून शांत दिसणाऱ्या पर्वताच्या पोटांत घुमसलेल्या आणि पेटलेल्या आगीची आच तिला कधीच लागली नाही. पण त्याला हें सारं असह्य होऊ लागलं होतं ही कोंडी फोडायची होती. मुळावर घाव घालून हें सारं समाप्त करायच होतं. पण दिवा मालवायचा म्हणून हाताच्या मुठीत ज्योत पकडायची नसतें की तिला तोंडात कोंडून गुदमरवून गारद करायची नसते. हाताच्या पंजानं हलवा किंवा तोंडाने फुंकर घाला, मधली हवा हलली तरी काम भागतं.

वाढत्या वयाची जाणीव झाली कीं या साऱ्या विचारांचं काहूर त्यांच्या मस्तकांत उसळी मारे. तो कसंबसं त्याचं शातवन करी. मनांतल्या कोलाहलांचं प्रतिबिंब चेहऱ्यावर पुसटसुद्धां उमटू नये, म्हणून आटापीटा करी.

ही सारी व्यथा लपविण्यासाठी मोगरीच्या फुलांची खूण त्याला पटवून घ्यायला पाहिजे होती. खोटाच उत्साह दाखवत तो म्हणाला, "मोगरीची फुलं! माझं लक्षच नव्हतं इतका वेळ!"

"आता लक्ष गेल्यावर तरी काय बेत आहे?"

"अर्थात् महाराणीचा शब्द शिरसामान्य, हें काय सांगायला पाहिजे?"

"मग गडे, आज मृगयेला जाऊ या ना!"

"मृगयेला?" अनिच्छा दर्शवित बिंबिसारनं विचारलं. मोगरीच्या फुलांचा परवलीचा शब्द कळल्यावर बिंबिसारनं आजवर अशी अनिच्छा कधीं दाखवली नव्हती. मोगरीची फुलं सुनंदा तिच्या केसांत माळायची ती फक्त विवाहाच्या वाढदिवशीं! मग ती खूण बिंबिसारला पटकन् पटायची. त्या दिवशीं बाकीसारीं कामं बाजूला सारली जात. वर्षातला तो एक दिवस महाराजानीं सुनंदेला वाहिलेला होता. सुनंदेनं कोणतीहि इच्छा नुसती प्रगट करायची, बिंबिसार ती झेलायला तयार असायचा. पण आज तो थबकला. आजवरची प्रथा अडखळली.

"मृगयेला?" या त्याच्या प्रश्नांत नावडीपेक्षाहि असमर्थतेची झांक असावी, असा तिला संशय आला. म्हणून तिनं विचारलं, "का? त्रास होईल असं वाटतं?"

"तसं नव्हे; पण प्रतिवर्षी वाढदिवस साजरा करायला मृगयेलाच कां जायला हवं? तेंच तेंच करायचं म्हणजे कल्पनादारिद्र्यच नाहीं. कां? यदा एखादी नवी रीत काढ ना शोधून..."

"खरं सांगूं कां? मृगयेच्या निमित्तानं मोकळेपणीं वनविहार करायला मिळतो, त्यासाठी माझं मन आसुसलेलं असतं. राज्याच्या जबाबदारीची ओझी एका दिवसापुरतीं खालीं उतरवून, राजेपण राणीपणाचे मुखवटे एका दिवसासाठी काढून ठेवून केवळ पतिपत्नीच्या निर्मळ अन् जवळकीच्या नात्यानं वावरायला मिळतं, त्याची भूक असतें मला. मग वर्षभराच्या वाटचालीला पुरत तेवढ पाथेय. वनविहाराचा तेवढ्यासाठीं तर ध्यास!"

"वनविहाराचा की वनवासाचा?"

तिनं महाराजांच्या ओठांवर हात ठेवला; आणि जरा रागातच ती म्हणाली "आजच्या मंगल दिवशी त्या अभद्र वनवासाची कल्पना तरी कां शिवावी मनाला?"

"लोकार्थानं वनवास नव्हे ग!" तिची समजूत काढण्यासाठी तो म्हणाला. आणि जरा हसूनच पुढें म्हणाला,

"खरं सांग बर, वनवासाची हौस नव्हती तुला? अभयच्या वेळची आठवण विसरलीस वाटतं?"

त्या सुखद स्मृतीनं सुनंदा लाजली. अगदी पहिलटकरणीसारखी. अभयच्या वेळी दिवस गेले होते, तो काळ चलच्चित्रपटासारखा तिच्या समोरून झर्रकन सरकला. तेव्हां तिला खरोखरच वनवासाचे डोहाळे लागले होते. लाडक्या राणीचे ते डोहाळे त्यावेळीं बिंबिसारानं मोठ्या कौतुकानं पुरवले होते. त्या आठवणीनं तिचं शरीर आजहि मोहरलं. तसा वनवास मिळता, तर तो तिला अद्याप हवाहवासा वाटला असता. पण तशी वेळ आली नव्हती—येण्याची शक्यताहि उरली नव्हती. महाराणीची वस्त्रं अंगावर चढविलेल्या सुनंदेला तसल्या इच्छाआकांक्षा आतां अतृप्तच ठेवायला पाहिजे होत्या!

महाराजांच्या प्रश्नाला उत्तर द्यायचं म्हणून ती म्हणाली, "मला खूप हौस आहे तसल्या वनवासाची! पण लोकानुरंजनाचं पवित्र व्रत स्वीकारलेल्या प्रजापालकाला केवळ स्वतःच्या पत्नीसाठीं वनविहार करायला फुरसत सापडणार कशी?"

तिच्याच प्रश्नाचा रोख पुढें ओढून बिंबिसारनं चटकन् उत्तर दिलं, "नेमकं हेंच मला आजच्या मृगयेसंबधांतहि सुचवायचं होतं!"

सुनंदाला तें उत्तर झोंबलं. हा अनुभव विपरीत होता. आजवर तिच्या उत्साहाला बिंबिसारकडून असं ग्रहण लागलं नव्हतं. कुठेंतरी बिघडलं. बिनसलं. पहिली ठेंच नेमकी लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशीं. एका नव्याच अनुभवाची गाठ ती मारीत होती. तिचे डोळे खळ्ळ्कन डबडबले. तिनं तोंड मागें वळवलं कोमेजल्या फुलासारखी तिनं मान टाकली.

तिला छेडण्याच समाधान बिंबिसारला मिळालं. मनोमनीं तो सुखावला. तिला कुठेंतरी खुपावं, टोचावं हाच आनंद त्याला हवा होता. मग वरदेखल म्हणून तो हंसला, आपल्या बोटाच्या आधारानं तिची हनुवटी वर उचलून तो म्हणाला, "कशी झाली एका माणसाची गमत! खरं सांगू, तुझा असा लेबाडा चेहरा पहावा, असं मला फार दिवसापासून वाटत होतं! – अग, स्त्री हट्टापुढें राजहट्टालादेखील हात टेकावे लागतात. तू म्हणत असलीस तर—" त्याचं बोलणं तिनं मध्येंच तोडल. गेलेलं अवसान पुन्हा जमा करीत ती पुढें सरसावली आणि म्हणाली,

"तर मग कसलाहि नकार न देतां लगोलग चलायचीच सिद्धता करावी." विलक्षण वेगानं तिच्या हालचाली सुरू झाल्या. दासदासी-

साठी आज्ञा सुटल्या. अन् महाराजांचं मत पुन्हा तिनं विचारलं, " निघायचं ना मग ? "

" आमच्या होकार-नकाराला कुठं वाव असेल तर ना ?"

" खरोखरच तुमच्या मनात आहे तरी काय ? " अगदीं चिडून अखेरचं म्हणून तिनं विचारलं.

इतक्यांत महालाबाहेर कसला तरी गोंधळ उडाला. रक्षकांची धांवाधाव झाली. महाराज ताड्दिशी मचकावरून उठले.

बघता बघता एक माणूस आंत घुसला आणि त्याच्या पाठोपाठ रक्षक धावले. तो माणूस आला तो थेट महाराजांच्या पायानाच भिडला. महाराजाचे पाय धरून रडत रडत तो विनवूं लागला, " महाराज, हातांतली शंभर कामं बाजूला सारा; पण आत्तांच्या आत्तां पिप्पलवनातल्या आमच्या वस्तीवर चला !"

मृगयेच्या आड हें एक नसतं विघ्न उपस्थित झालं, म्हणून सुनंदेला भयंकर चीड आली.

एवढ्यांत रक्षकांनी त्याला बाजूला खेंचला. दोघांनीं त्याचे दंड आपल्या मुठींत आवळून धरले. मान खालीं घालून धोतराच्या सोग्यानं तो आपले डोळे पुसत होता. महाराजांसमोर उभं राह्यचं म्हणून आपली मळकट वस्त्रं नीटनेटकीं करण्यासाठीं तो तेवढ्यांतहि धडपडत होता. महाराजांसमोर उभं राह्यल्यामुळें त्याचे पाय आतां लटपटत होते. कदाचित् लांबचा प्रवास केल्यामुळें ते थकलेलेहि असतील. त्यानं मान जरा वर उचलली. त्याचे डोळे लालभडक होते. चेहऱ्यावर फक्त भयाची कळा होती.

महाराजांनीं त्याला सोडून द्यायला सांगितलं. त्याच्याजवळ येऊन, त्याच्या पाठीवरून हात फिरवून शांतपणानं त्यांनी विचारलं, " कोण आपण ? पिप्पलवनात मीं ताबडतोब येण्याचं प्रयोजन काय ? "

" काय सागूं महाराज, पिप्पलवनात माणसाला जीवन जगणं अशक्य झालं आहे !"

" कां ? आमचे आधिकारी प्रजाजनांवर काहीं अन्याय करीत आहेत ?"

" नाहीं महाराज. "

" त्या भागांत वरुणराजाची अवकृपा झाल्याचहि आमच्या कधी ऐकिवांत आलेल नाही ! "

" तसहि नाही, महाराज."

" मग जिणं अशक्य कां व्हावं ?"

" महाराज, एका वाघिणीचा प्रताप आहे हा सारा. दहा-बारा दिवसापूर्वीची गोष्ट. मी लाकड तोडायला जरा घराबाहेर पडलों होतों. माझी म्हातारी आई घराच्या दारांत बसून केंस विचरत होती. दिवसाढवळ्या ती वाघीण वस्तींत घिरली आणि माझ्या आईवर झडप घालून फरफरट तिला ओढून घेऊन गेली ! अशी माझी आई गेली अन् वर्षापूर्वी म्हातारे वडील—पुरं वर्षदेखील नाही झालं—चार दिवस कमीच असतील. एक दिवस ती राक्षसी माझाहि घांस गिळून टाकील..."

महाराजांनीं त्याला स्वस्थ बसायला सांगितलं. स्वस्थपणानं त्याच्याकडून सर्व हकिगत काढून घेतली. त्याचं दुःख निवारण करण्याचं आश्वासन दिलं. पिप्पलवनांतल्या त्या वाघिणीनं उडवलेल्या हाहाःकाराची त्यानं केलेली भयकारी वर्णनं ऐकून घेतलीं.

पिप्पलवनांतली ती वाघीण गेल्या वर्षभर त्या भागांत धुमाकूळ घालत होती. तिचा धाक असा जबर कीं, सारी वस्ती आपापल्या छपरांचीं कवाडं बंद करून, जीव मुठीत धरून, दिवस ओढत होती. एकट्यादुकट्यान घराबाहेर पडून शेतावर राबायची सोय उरली नव्हती. जरा कोणी धाडस करायचं म्हटलं कीं त्याच्या जीवावर बेतलच म्हणून समजाव.

त्या वाघिणीला माणसाची भीति मुळी कशी वाटेनाशीच झाली होती. वस्तीजवळच्या एका शेतात सात-आठजण राबत होते. शेताच्या बांधावर होत एक आंब्याचं झाड. झाडाखालीं एक पोर पाड गोळा करीत होत. तेवढ्यांत त्या नरभक्षक वाघिणीची झेंप पडली अठरा-वीस डोळ्यादेखत तिनं त्या कोवळ्या जीवाला पसार केलं !

चार सहा सप्ताहाखालची गोष्ट. बाजार करायला वीस-पंचवीस जणांची टोळी निघाली. भर मध्यान्हीचीच वेळ. कोणातरी मनुष्यमात्राच्या करुण किंकाळ्या त्यांच्या कानी आल्या. त्या आवाजानं सगळ्याच्याच काळजात चर्रर्र झालं. खालच्या दरीतून येणारा तो आवाज हळूं हळू त्यांना जवळ जवळ येत असल्याचं समजून चुकलं. भयानं सारेच हबकले. एक बरासा आडोसा त्यानीं बघितला आणि एकमेकाला चिकटून, श्वास रोखून देवाचं नाव मनांत जपत ते बसून राहिले. आवाज अगदी नजीक आला आणि माणसाच्या रक्ताला चटावलेली ती वाघीण दिसली. एका विवस्त्र स्त्रीला ती फरफटावीत होती. वाघिणीनं त्या स्त्रीच्या शरीराचा कमरेजवळचा भाग जबड्यात घट्ट धरला होता. वाघिणीच्या एका बाजूनं त्या बाईचे केस जमीन झाडत चालले होते आणि दुसऱ्या बाजूनं तिचे पाय जमीन खरडीत, सोलून निघत होते. ती बिचारी जोरजोरानं छाती बडवत होती आणि असेल नसेल ती शक्ति पणाला लावून किंचाळत होती. तिला वाचविण्यासाठी धांवून न येणाऱ्या माणसाच्या आणि ईश्वराच्या नावानं आक्रोशत होती. त्या पंचवीस जणांपासून पन्नास पावलावर ही फरपट गेली. सारं स्पष्ट दिसत होतं. डोळ्यांत प्राण आणून नादानपणान ते नुसते बघत राहिले. त्या अबलेला वाचवण्यासाठी पुढं होण्याची एकाला काहीं छाती झाली नाहीं ! तो आवाज अस्पष्ट होत जेव्हा अजिबात येईनासा झाला तेव्हां ते तिथून हलले आणि बाजारहाटाची कल्पना सोडून देऊन जो तो जीव घेऊन आपापल्या घराकडे धांवला !

त्या साऱ्या हकिगती ऐकतांना सुनंदा शहारली...परतु शहारण्यापेक्षांहि तिला या भ्याडांची चीड आली. शंभर—सव्वार्शे माणसं एका वस्तीत असतांना एक वाघीण त्यांना निकालांत काढता येऊं नये ? मरणापूर्वीच हजारदां मरणाऱ्या भित्र्यांचीं संतानं तीं ! हजार निर्जिव प्रेतं एकत्र जमा झाली म्हणून त्यांतून शक्ति थोडीच निर्माण होणार ? पण सुनंदेला राहवलं नाहीं. तिनं अगदी चिडून विचारलं, " तुम्ही वीस—पंचवीस जण नुसते बघत राहिलात ? "

" आम्हां साऱ्याच्या मनात एकच स्वार्थी विचार होता—कशासाठीं आपला जीव धोक्यांत घालायचा ? ती रक्तबंबाळ झालेली स्त्री कोणी वांचवली असती तरी झालेल्या जखमानीं तिची शंभरी भरणारच होती. वाघिणीच्या तावडीतून सुटली असती तरी काळाच्या तडाख्यांतून ती बचावणार नव्हती. जिचं एक पाऊल मरणाचा उंबरठा ओलाडून शून्यांत जमा झालं आहे तिला वांचवण्यासाठीं कशाला आटापीटा करायचा ? नसत्या फदांत पडायचं आणि त्या वाघिणीचा रोख आपल्याकडे वळवून घ्यायचा, कशासाठी ? असेच भित्रट विचार त्यावेळीं आमच्या मनांत आले. "

" छान विचार केलात, भेकडांनो, छान विचार केलांत !" अगदी पोटतिडिकीनं आणि सतापून सुनंदा म्हणाली, " एका अवलेला काळाच्या जवडयांतून ओढून काढायचं मिळालेलं आव्हान तुम्ही ोकरलत ! शेवटी जगता आहांत तरी कशासाठीं ?"

तो इसम भेदरून गेला. चार-दोन क्षण कोणीच कांहीं बोललं नाहीं. मग तो म्हणाला, " महाराणी, माझ्या पित्यानं स्वतःचा जीव माझ्यासाठीं बळी दिला...त्याला नाहीं मी वांचवूं शकलों...तो एका परक्या स्त्री साठीं..." त्याला बोलवेना. त्याचा गळा दाटला वर्षापूर्वी त्या वाघिणीच्या रूपानं यमदुतांनीं त्याचा म्हातारा बाप त्याच्या डोळ्यांदेखत खेंचून नेला होता.

" मी आणि माझे म्हातारे वडील टेकडीवर गवत कापायला गेलों होतों. अगदीच दोघे असं नव्हे, दहा-बारा आणखीहि साथीदार बरोबर होते. टळटळीत दिवसाची वेळ. मी वरच्या अंगाला गवत कापत होतों. बाप असेल तिथून वीस-पचवीस पावलांच्या अंतरवर. पाताळांतून उपटावी तशी अकस्मात् तिथं वाघीण आली. अजिबात चाहूल न देतां. डोंगराची तिथली चढण साधारणपणे घराच्या भिंती-सारखी सरळ उभी होती. त्या रानांतच आमचं जीवन गेलेल-तिथ-लाच वावर. तशा उतरणीवरहि गवतात पक्का पाय रोंवायची सवय झालीय् आतां आम्हांला. चढणीच्या अगदी टोकावरच होतों मी. वाघीणीनं झेप टाकली. तिनं जवड्यात माझा चेहराच पकडला. तिचे खालचे दात माझ्या हनुवटीच्या खाली घुसले आणि वरचे डोळ्यांच्या वर कपाळांत आणि दोन मागें मानेवर. तिच्या जबरदस्त ठोशान मी पाठीवर कोलमडलों होतों. वाघिणीची छाती नेमकी. माझ्या छातीसमोर होती. तिनं पोट आलं होत माझ्या पायामध्यें. माझे हात-पाय मोकळेच होते. उजव्या हातानं मी तिथलं एक रोपटं घट्ट पकडून ठेवलं मी घायाळ झालों होतों, पण बेसावध नव्हतो वेदना होत होत्या, कळा येत होत्या पण त्याहिपेक्षां जीव जगवण्याची ओढ अधिक जबरदस्त होती. तरुण होतों, ताकद होती. मी माझे पाय आत ओढून घेतले, तिच्या पोटावर ठेवले अन् डावा हात दिला तिच्या छातीवर. सारी शक्ति एकवटून तिला जोरान रेटा दिला, रोटपचावरचा हात मात्र पक्का ठेवला होता. उताराचा फायदा मिळून माझा प्रयत्न यशस्वी झाला. तें धूड एकदम मागें फेकल गेल आणि उतारावरून खालीं गडगडलं. मी पळत सुटलों. मला सोडवायला आलेले माझ वडील मात्र तिथंच अडकून राहिले कोसळलेली वाघीण पुन्हां वर आली. ती आतां चांगलीच चवताळली होती म्हाताऱ्याला थोडच धावता येणार ? तो बिचारा तिच्या तावडीत सांपडला. स्वतःच्या जीवाची जपणूक करण्यासाठी मीच जिथें पळत सुटलो होतों तिथं त्याना वाचविण्यासाठीं दुसर कोण धावून येणार ? चिडलेली वाघीण गुरकावत त्यांच्यावर चाल करून आली. पाहतां पाहतां त्याचा पार चेंदामेंदा झाला. माझ्या डोळ्यादेखत तिन त्यांना दोन-एकशें पावल फरफटत नेल. माझी मला लाज वाटली माझ्यावर आलेली काळाची झडप माझ्या वडिलांनीं स्वत वर ओढ-वून घेतली होती-मी मात्र पळत होतों. रक्तात न्हात असतांना मी माघारी फिरलों, वडिलाना मदत करायला. वाघिणीन म्हाताऱ्याला तसंच सोडून दोन झेपा माझ्या रोखानं घेतल्या. माझ्याच जीवावर बेतल तेव्हा म्हाताऱ्याचा नाद सोडून मी वस्तीकडे धूम ठोकली-मी वाचलों. जखमा बऱ्या झाल्या. माझ्या वडिलानी त्याचं आयुष्य मला दिलं. आज ना उद्यां गळून पडणार तें पिकलेलं पान, पोराचा जीव वांचवण्याच्या कामी. आल ; पण माझं उकळत तारुण्य त्याचा जीव वांचवायला पुरं पडू शकलं नाही मीं खूप शोध घेतला ; पण म्हाताऱ्याच्या शरीराचा एक कण हातीं गावला नाही. तरणाताठा पोरगा जिता असतांना बापाची उत्तरक्रिया होऊ शकली नाहीं. राखेचं टिपूस गंगामैय्याला जाऊन मिळालं नाहीं. महाराज, वडिलाचं वर्षश्राद्ध आलं आतां अन् तेवढ्यात आईहि त्याच वाटेनं चालती झाली. त्यांच्या तळमळणाऱ्या आत्म्यांना सद्गति कशी मिळणार ? तें ऋण मी कसं फेडूं ? त्या वाघिणीचा जीव घेतल्याविना त्याचा आत्मा शांत होणार नाहीं-मलाहि सुखाची झोंप येणार नाही. तो सूड घेण्यासाठी मी आपली मदत मागायला आलो आहें. पिप्पलवनाची सुरक्षितता...नाहीं म्हणूं नका...नाही म्हणूं नका..."

पुत्रासाठीं मृत्यूला आलिंगन देणाऱ्या त्या वृद्ध पित्याच्या कहाणीनं बिंबिसार हेलावून गेला. नाही म्हणणं केवळ अशक्यच होत. डोळ्यां-तून उड्या घेणारी आंसवं पुसत तो महाराणीला म्हणाला, " देवी, आज तुमच्या मनासारख होणार ! पिप्पलवनात आज मृगयेला जायच-जशी तुमची इच्छा !"

त्या भारावलेल्या वातवरणातहि महाराणीच्या चेहऱ्यावर प्रसन्नता झळकली. वाढदिवसाच्या दिवशीं नेमकी कसली तरी भानगड घेऊन येणाऱ्या आणि आपल्या योजलेल्या कार्यक्रमात मोडता घालायला आलेल्या त्या तरुणाबद्दल मघाशीं तिला राग आला होता. पण आता तिला समजलं, तो आला म्हणूनच तिची इच्छा तृप्त होत आहे. आनंदाची चमक डोळ्यांत खेळवत तो तरुण त्याचा निरोप घेऊन निघून गेला.

सुनंदेनं विचारल, " मृगयेला आपण दोघानीच जायच ना?' वाढदिवसाची मृगया नेहमी ते दोघंच करीत. अस असताना हा प्रश्न तिनं विचारताच त्याच्या मनांतल सशयपिशाच्च खडबडून जागं झालं.

छद्मीपणानं त्यानं विचारलं, " आणखी कुणाला बरोबर घ्यावं असं तुला वाटतं कां ?"

" माझ्या वाटण्याचा त्यांत प्रश्न येतो कुठें ? वाघीण एवढी जबरदस्त आहे-एका दिवसांत हा प्रश्न निकालात काढायचा म्हणजे आणखी कोणी बरोबर असणं बरं नव्हे कां ?"

" माझ्या सामर्थ्यावरचा विश्वास कमी झाला वाटतं तुझा ?"

" तिळमात्र नाहीं. पण वाढत्या वयाला हो दगदग झेपेल ना ?"

वाढतं वय ! वार्धक्य ! म्हातारपण !

" वाढत्या वयाला ही दगदग झेपेल का ?".

त्या प्रश्नानं बिंबिसारच डोक गरगरल. मृगयेला जायचं का, म्हणून प्रश्न केला तेव्हां नव्हत हें शहाणपण या बयेला सुचलं ? मृगयेच्या नावाखालीं वनात नंगानाच घालायचा असेल हिला म्हणून हिला कोणीतरी बरोबर पाहिजे ! प्रासादाबाहेर पडून दूर जगलात गेल की स्वतःचं राणीपण विसरून बोकाळायला ही मोकळी झाली ! महा-राजांच्या मृगयेसाठीं कोणालातरी बरोबर घेऊन जायच हा नुसता बहाणा ? चार तरण्याताठ्या सामतांसह हिला मनमुराद धुमाकूळ घालायचा असणार तिथ ? म्हणून हिला मृगया हवी-मला साक्षी ठेवून हे खेळ खेळायला-हे चाळे-

महाराजाच्या मनांत चुकचुकली ही पाल ! कितीतरी दिवस हा संशय बिंबिसारच्या मनात सलत होता. पण निव्वळ सशयावरून

प्राणप्रियेच्या जीवावर उठायचं ? डोळयांनीं जर कांहींच बघितल. नाहीं तर केवळ मनातली शंका म्हणून तिला जीवनांतून उठवायचं ? शंभर अपराधी सुटले तरी बेहत्तर पण एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये म्हणून जपणाऱ्या न्यायप्रिय सम्राटान, स्वत.च्या लाडक्या राणीला अस निव्वळ संशयावरून नष्ट करायचं ?

आपल्या संशयाचं खरंखोटेंपण जाणण्यासाठीं तरी आज तिच्या इच्छेप्रमाणें होऊं दे. मनांतली शंका अचूक ठरली तर मृगयेलाच निघालों आहोत-एकादा बाण चुकायला काय हरकत आहे ? असा विचार करून बिंबिसारन सुनदेला उत्तर दिलं, " या वयांत सावज माझ्याहातून चुकायचा बराच संभव आहे–"

बिंबिसारच्या म्हणण्यातला रोख टोलावत सुनदा बोलली, " सावज चुकवण्याबद्दल माझ म्हणणं नाही. टप्प्यांत आलेलं सावज महाराजानी टिपलं नाहीं, अस कधीं झाल नाहीं, होणार नाहीं. महाराजांच्या अचूक लक्षवेधावर माझा पूर्ण विश्वास आहे. पण दडल्या वाघिणीला रानोमाळ भटकून हुडकून काढताना थोडी कां पायपीट करावी लागेल ? त्यापेक्षां चार साथीदार असले बरोबर म्हणजे तेवढच सोयीच होईल, म्हणून सुचवलं मीं–"

कोणतीच खळखळ न करतां बिंबिसार म्हणाला, " महाराणीची सूचना योग्य आहे, मग कोणाकोणाला बरोबर घ्याव, अस वाटतं आपल्याला ?"

" मी काय बाई सांगणार ? आपल्याला माणसांची चागली परीक्षा. असतील विश्वसातले त्यातले घ्या चार जण निवडून !

" तसं कस ? आजतागायत तुझ्या सल्यावाचून आम्ही कोणाची तरी निवड केलीय् कां ? आमच्या नावान भाळी कुंकुमतिलक लावणाऱ्या पांचशें स्त्रियांपैकी एकीची तरी निवड आपल्या पसतीवाचून झालीय् कां ?"

" ती गोष्ट वेगळी अन् ही अगदीच निराळी. मृगयेंत तुम्हाला कोणाची मदत होईल, तें आपणच ठरवा, मृगया आजच्या दिवसात समाप्त व्हायलाच हवी. एका वन्य वस्तीची भयमुक्तता करण्यासाठीं एका दिवसापेक्षां अधिक काळ, अफाट साम्राज्याची धुरा पेलणाऱ्या सम्राटाला कोठून मिळणार ? तेव्हां त्या वाघिणीचा बळी आजच्या आज घेतला जाईल, अशा सिद्धतेन निघा, म्हणजें झाल !"

सुनंदा नाव सांगायची मुद्दाम टाळाटाळ करते आहे, असं बिंबिसारला वाटलं. म्हणून ज्या तरण्याबाड सामताचा बिंबिसारला संशय होता त्याचींच नांव जाणूनबुजून त्यानं सुचवलीं आणि सुनदेनहि अगदीं सहजगत्या " बरं " म्हणून त्यावर आपल्या पसतीच शिक्कामोर्तब केलं.

बिंबिसारला वाटलं, त्या नांवांमुळें सुनदेची कळी अधिकच खुलली !

● ●

सध्याकाळची वेळ. ढगाच्या फटीतून सटकलेले मावळत्या सूर्याचे सौम्य किरण फक्त उच पर्वतशिखरावर रेंगाळत होते. दिवस बुडण्याच्या बेतांत असला, तरीहि काळया ढगानी झाकोळलेल्या आभाळांतून प्रकाश झिरपतच होता.आणखी प्रहरा. दीड प्रहरात मात्र काळाकुट्ट अंधार दाटला असता. सगळी माहिती गोळा करून सावज नेमक कुठें टिपतां येईल, कुठून शरसंधान कराव लागेल याची अटकळ बांधून झाली होती. महाराजासाठी मचाण बाधल होतं–पण तिथं दोनच माणस कशींबशीं बसू शकतील, एवढीच जागा होती, ज्या फांदीवर महाराज बसले होते, तिथूनच खालून एक ओढा खळाळत जात होता. ओढयाच्या पलिकडच्या बाजूला वाघिणीनं काल मारून टाकलेलं आणि अर्धवट फस्त केलेलं भक्ष्य पडलं होत. आज त्या झाडोऱ्यांत वाघीण नक्कीच येणार होती ती नेमकी बिंबिसारच्या बाणाच्या टप्प्यांत येत होती. एकच अडचण होती. मचाण ज्यावर बाधलं ती फांदी म्हणावी तितकी बळकट नव्हती पण तितकी सुरक्षित जागाहि जवळपास नव्हती. थोडासा तोल गेला असतां तरी काम बिनसलं असतं; वरचा माणूस खालच्या पाण्यांत धप्पदिशी आपटला असता, आणि—

बिंबिसारजवळ बसून मृगया बघण्याची सुनदेला फार हौस पण आज तें शक्य नव्हतं. स्थळ काळ पाहतां नसता हट्ट तिनं कारणं, रास्तहि झालं नसतं. कारण दुसरी जागा त्या तरुणासाठीं राखून ठेवायला पाहिजे होती. कारण वाघीण भक्ष्यासाठी तिकडे फिरकली नाही, तर वाघाचा आवाज देऊन तिला बोलवायचं असा डाव ठरला होता. त्या पोराला वाघाचा आवाज हुबेहूब काढतां येई. तेव्हां महाराजांजवळ त्याला ठेवणं क्रमप्राप्तच होतं.

मृगया पाहायला मिळणार नाही, म्हणून सुनंदा मनातून फार निराश झाली. पण चेहऱ्यावर मात्र तिन नेहमीची प्रसन्नता टिकवली. वेळ ओळखून तिन भलता आग्रह केला नाहीं. बिंबिसारला वाटल, आपण इथं अडकून पडल्यावर इतराबरोबर ती काहीहि करूं शकत होती, एवढयासाठीच तिन आग्रह करायच टाळलं. पण तोहि काहीं बोलूं शकत नव्हता, पर्यायच नव्हता दुसरा.

ऐन मोक्याच्या वेळी आपण बिंबिसारला सोडून बाजूला जात आहोंत अस तिला वाटल, आता सतत आपण त्यांच्याजवळ असायला हव, आहोंत, निदान कासविणीसारखी आपली पाखर सदैव त्याच्यावर ठेवायला हवी. याची तिला जाणीव होती त्या झाडापासून हांक–दोन हाकांच्या अतरावर एक गवताच खोपट होतं. तिथं ते सारे बसणार होते. तशीच वेळ आली असती तर मदतीला ते धांवूनहि येऊ शकत होते. शेवटीं ती निघाली. कधीं नव्हे तें पाणी तिच्या डोळयांत तरारल. लहान मुलाचा निरोप घ्यावा तशी ती त्याला सांगत होती, " सांभाळून ह. वाघीण वाचली तरी चालेल. पण वेडया भीडेपायी भलत्यासलत्या सकटात उडी घेऊं नका. "

सकटांत बिंबिसारला एकाएकी सोडायचा हा पहिलाच प्रसंग होता. त्याच्या बाहुबलावर पूर्ण विश्वास असूनहि, तिला वाटत होत. आज कांही अशुभ फडफडतय् ! नेहमीच्या कितीतरी गोष्टी आज राहून गेल्या होत्या. बिंबिसार मृगयेसाठी म्हणून वनांत शिरला त्यावेळीं तोडगा करायचं विसरून गेलं. महाराज वाघाच्या शिकारीला निघाले तरी आधी एखाद्या दुसऱ्या प्राण्याला टिपून मग मृगयेचा आरंभ होई. आज तें राहूनच गेलं राहून गेल म्हणजे साधलं नाहीं.

रानात शिरल्या शिरल्याच महाराजांना एक ससाणा उडताना दिसला. महाराजांनी बाण सोडला ; पण आज तो हुकला. ससाणा सुटला आणि दूर भरारून गेला. बिंबिसारापेक्षाहि सुनंदेला त्याची रुखरुख फार लागली. तिनं विचारलं, " असं कस झाल ?"

उजव्या हाताच्या बोटांतली आगठी चाचपीत बिंबिसार म्हणाला, " या आंगठीनं काहीतरी भानगड केली. नेमकी त्याचवेळीं तिथ खाज आली आणि अवधान सुटलं. वाटतं ही आंगठी फेंकून द्यावी–"

सुनदा म्हणाली, " आगठीचा बापडीचा काय दोष ! खाज उठली

"बोटाला, प्रायश्चित मात्र आंगठीला; हा कुठला न्याय म्हणायचा?"

"हो. आगठीवर राग काढून कसं चालेल?" हंसत हसत बिंबिसार म्हणाला,' आपल्या विवाहाची आंगठी ना ती. शिवाय असू दे...त्यातली हिरकणी कशी तेजस्वी आहे! उपयोग होईल तिचा कधीं तरी—"

सुनदेनं त्याला पुढें बोलू दिलं नाही. विषयांतर करायच म्हणून ती म्हणाली, "कितीतरी दिवसानी प्रासादाबाहेर पडून दूर अस रानावनांत आलं कीं किती मोकळं मोकळं, प्रसन्न वाटतं नाही?"

त्यावेळीं विषय बदलतां आला तरी ती आठवण आता बिंबिसारचा निरोप घेतल्यावर तिला सतावत होती. सगळयाच्याबरोबर ती त्या गवताच्या छपरांत आडोशाला आली खरी, पण तिचं अंतःकरण बिंबिसारभोंवतींच मचाणावर गुतलेलं होत. तिचं मन एका अबोध रुखरुखीन ठणकत होतं आपल्या सदिच्छांच्या कोषांत महाराज सुखरूप असावेत, अशी तिची प्रार्थना होती. आपल्या पुण्याईच संरक्षक कवच बिंबिसारच रक्षण करायला अपुरं तर पडणार नाही, या कल्पनेंन ती धास्तावलं होती.

थोडयाच वेळात पावसाची एक सर जोरांत शितडून गेली. त्या अवेळी वर्षेचा अन्वयार्थ तिला नीटसा जुळवतां आला नाही. हवेत एकदम गारवा आला. पार काळोख होण्यापूर्वी मृगया आटपण्याची आशा सरली. सार रानं काजळी काळोखांत आकठ तुडुबल. जंगली श्वापदाचे आवाज आसपास उमटले नाहीत, तरी रातकिडयाची भयकारी किरकिर त्याची उणीव भासू देत नव्हती.

इतक्यांत दूर कुठं तरी वाघिणीचा आवाज उठला. म्हणजे बिंबिसारच्या मचाणापासून वाघीण अद्याप खूपच दूर होती. किमान कोसभर तरी. वाटेंतलीं जंगलांचीं जाळीं उलगडत, आडव्यातिडव्या अस्ताव्यस्त पसरलेल्या खडकाना तुडवत अपेक्षित ठिकाणीं येऊन पोचायला तिला किती वेळ लागला असता देव जाणें! त्यातून ते लहरी जनावर भलतीकडेच भरकटलं तर सारी रात्र मचाणावर काढूनहि काहीं उपयोग नव्हता! वाघिणीला बोलावण्याखरीज दुसरा मार्गच नव्हता.

पुन्हा एकदा वाघिणीची डरकाळा फुटली. बिंबिसारनं शेजारी बसलेल्या त्या तरुणाला कोपरान ढोसून खूण केली. त्यान तोडाभोंवती हाताच्या पंजाची गुहा उभारली. छातीभर हवा कोंडून धरली. आणि वाघिणीच्या हाकेला प्रतिसाद देणारा आवाज घुमला! छपरांत बसलेल्याना वाटल एक मस्त वाघ महाराजाच्या अगदी आसपास येऊन ठेपला असावा. त्या गर्जनेला वाघिणीकडून पुन्हा साद मिळाली. अर्थात प्रतिसाद दिली गेली

सगळयांची खात्री पटली कीं, वाघीण आता आपल्या प्रियकराच्या आवाजाच्या रोखानं निघालीच असणार. वाघिणीच्या गेल्या दोन दिवसांतल्या हालचालीची जी माहिती महाराजानी मिळवली होती त्यावरून त्यानी निश्चित अदाज बांधला होता की, ही वाघीण वाघाला भेटण्यासाठीं कासावीस झालेली आहे; पागल झाली आहे. साथीदाराची साद मिळताच वेडीपिशी होऊन ती तडफडत येईल. अधून मधून ती आवाज घुमवी, वाघाची प्रतिसाद मिळे. त्या आवाजावरून वाघीण किती अतरावर येऊन ठेपली असावी, त्याचा अदाज मिळे.

वाघिणीचा आवाज जवळ जवळ येऊं लागला. तसतशी सुनंदाची छाती जोरजोरानं धडधडू लागली. एव्हाना आभाळ मोकळं झालं होतं. चतुर्थीचं चादणं बरसूं लागलं होतं अगदी लख्ख नाहीं म्हटल्या तरी ढोबळ मानानं आकृत्यांच्या हालचाली हेरतां येत होत्या.

बिंबिसारची नजर ओढचा पलिकडल्या भक्ष्यावर चिकटून बसली होती. महाराजाच्या इशाऱ्यानुसार पोरानं फिरून एकदां आवाज दिला आणि समोरच्या झाडोऱ्यांत कांहीं घस्स फस्स झाल. अंधाराचा भेद करून एक भली काळी आकृती झुलत पुढें सरकत आली. ती वाघीण नव्हती, खास नव्हती! वाघीण झुलत आली नसती. बेभान झेपावली असती. गुरकावत, डुरकावत झाडोरा कापून उसळली असती महाराजानी नीट न्याहाळल. एक भलं थोरल अस्वल होतं तें. हुंगत हुगत ते वाघिणीच्या भक्ष्यापाशी आल. सगळीकडे नाक फेंदारत त्यानं आजबाजूच्या अदमास घेतला. आणि खुशाल त्या उष्टावलेल्या सावजाला तोंड लावलं.

या उपऱ्या पाहुण्यानं सारं काम नासवून टाकल! त्याचा बळी घ्यावा, तर त्या गडबडीन वाघीण सावध होऊन इकडे फिरकायची नाही. वाघीण येण्यासाठी आवाज काढावा, तर अस्वल खडबडून पचका करणार. अन् आवाज न द्यावा, तर वाघिणीला दिशा उमगावी कशी? सारी मेहनत वाया गेली तरी हात चोळायलासुद्धां वाव नव्हता. थोडीशी चुळबूळहि त्या क्षणीं बाधक ठरली असती.

इतक्यात ओढयांतून वाघीण झपाटयान समोर आली. आवाजाच्या दिशेनं ती नेमकी येऊन ठेपली होती. तिचे डोळे लख्खकन् झळकले. परंतु तिची नजर झाडाकडे वळली नाहीं. प्रियकराच्या दर्शनाऐवजीं आपल्या भक्ष्यावर ताव मारणाऱ्या अस्वलाला बघून ती एकदम सतापली आणि जोरांत गुरकावून तिनं अस्वलावर झेंप टाकली.

ते जनावरहि लुगसुगं नव्हतं. तसच बळकट, तेवढंच बेडर. या अचानक हल्ल्यान तें किंचित् बावरलं. पण लगेच स्वतःला सांवरून झुज द्यायला तेंहि सरसावलं. वाघिणीच्या डरकाळीला त्यानं स्वत च्या भाषेंत जोरदार प्रत्युत्तर दिलं. त्या आरोळीनं दचकून वाघीणहि चार पावलं मागं सरली. मग अस्वलानच मुसडी मारली. मागच्या दोन पावलांवर उभं राहून पुढच्या पंजानं त्यानं वाघिणीच्या जबड्यावर असा जबरदस्त तडाखा लगावला कीं वाघीण खालींच कोसळली ती पुन्हा उभी राहीपर्यंत अस्वलाचा आणखी एक रेटा आला. वाघीण ओढयाच्या पाण्यांत धप्पदिशी जाऊन पडली. केवढा थोरला आवाज उसळला. गुरकावत वाघीण उठण्याचा प्रयत्न करणार एवढयात अस्वल जोरान पुढें घुसलं. आणि क्षणांत महाराजांच्या धनुष्यांतून सुटलेला बाण नेमका त्याच्या जिव्हारीं बसून तें जबर जनावर तळमळत ओढयात कोसळल.

फांदीवरच्या हालचालीनं वाघीण सावध झाली. पाण्याबाहेर पडून तिनं फांदीवर झेंपावायचा बेत रचला. क्षणभर खाली वाकून तिन नखाची खरखर केली; आपल्या आयुधांना धार दिली. नागिणीसारखी वळवळणारी तिची शेपटी आता ताठ लोखंडी कांब बनली. तिचे रसरसलेले डोळे महाराजाच्या डोळयांत आग फेकू लागले. ती बेहाय चवताळली होती. पुढें झेप झोंकण्यासाठीं ती मागच्या पायावर दबली आणि सर्व शक्ति एकटून तिनं उसळी घेतली. महाराजाच्या बाणानेहि प्रत्यंचेचा पाय सोडला आणि सणदिशीं निघून वाघिणीच्या उघडया पोटात तो रप्पकन् रुतला. अवसान खचून ती खालीच आली. तेवढयांत दुसरा बाण डोळयांच्यावर कपाळांत घुसला. तडफडत धडफडत, क्षीण आवाजात गुरगुरत तें मानी जनावर तिथंच लडबडत लोळत लोळागोळा होऊन पडल.

महाराजांची मृगया उरकली. वाघीण पुन्हा उठायचा सुतराम् संभव उरला नव्हता. दोघे झाडावरून खालीं उतरतले. पोराला राहवलं नाही. त्यानं महाराजाचे पाय आसवांनी धुतले. गदगदल्या स्वरांत तो म्हणाला, " महाराज, माझ्या वडिलांच्या मृत्यूचा सूड तुम्ही घेतलात! कसे फेडू तुमचे उपकार ?"

स्वत:च्या मुलाचा जीव वाचविण्यासाठी आत्मार्पण करणाऱ्या पित्याच्या मृत्यूचा सूड आपल्या घेतां आला, या कल्पनेन बिंबिसारला स्वत:लाच कृतकृत्यता वाटत होती. आजवरच्या कोणत्याच मृगयेनं हा अलौकिक आनंद त्याला कदापि मिळवून दिलेला नव्हता !

वाघीण धप्पदिशीं पाण्यात पडली आणि अस्वल-वाघिणीचे आवाज वातावरणांत कानठळू लागले तेव्हां इतका वेळ माटमुटत असलेला सुनंदेचा जीव मुठीबाहेर पडला. वाघिणीखेरीज उमटणारे आवाज तिला माणसाच्या केविलवाण्या किंकाळ्यांसारखे वाटले. न राहवून ती खोपटातून बाहेर सुटली. कोणाच्या अडवण्याला न जुमानतां कोसळणाऱ्या शिळेसारखी ती गडगडली. तीराचा वेग तिच्या पायांत घुसला.

—आणि बिंबिसार समोर दिसतांच तिला राहवलं नाहीं. अगदीं कडाडून तिनं त्याला मिठी मारली. या वयातहि एवढा पुरुषार्थ गाजविण्याऱ्या आपल्या प्रतापी पतिदेवाविषयींचा अभिमान तिच्या उरीं मावेना, तिच्या तोंडून शब्द फुटेना, डोळयांतन खळाळणारं पाणी थबकेना. त्याचा हात घट्ट पकडून ती म्हणाली. "पुरे झाली ही मृगया ! चलायचं आता राजगृहाकडे ! "

महाराजाचे पाय आतां जमिनीला लागले होते. मनात घर करून राहिलेल्या संशयानं पुन्हा फडा उभारला. सुनंदेन केलेलं हें सारं कौतुक मायावी, वरदेखलं आहे, ढोंग आहे असाच बिंबिसारचा समज झाला. आपल्या पश्चात् त्या छरांत त्या तरुण सामंताबरोबर या वयेला मोकळेपणा मिळाला. वस्तींतली इतरहि माणसं होती तिथं त्या सर्वांच्या देखत—

सुनंदेच्याविषयीं मनात असणारा तिटकारा जागा होतांच त्यानं तिच्या हातांतला आपला हात सोडवून घेतला.

निर्भय आनंदांत निथळत ती विजयी सहल वस्तीकडे चालली होती. टाळ्यांच्या तालांत महाराजांचे जयजयकार दणाणत होते. मोकळ्या वातावणांत, मोकळ्या गळ्यानं, मोकळ्या आवाजात गायलेल्या मोकळ्या गाण्यानीं रान दुमदुमून जात होतं या वनात आपल्याशिवाय अन्य कोणाला अस्तित्वच नाही, अशा समजुतींत साऱ्याचा दिलखुलास धिंगाणा चालला होता.

बिंबिसारच्या अंगाला अंग भिडवत सुनंदा पावल टाकत होती, त्याच्या पराक्रमाचं कौतुक करत होती. पण मधूनमधून बजावत होती. " ही शेवटचीच मृगया बरं आपली. मी पुन्हा कधींच असला हट्ट धर णार नाहीं. किती दगदग सोसायची ती ! आणि सांगून ठेवतें, मृगयेसाठीं तुम्हीं एकटयानं जाण तर यापुढें अजिबात बंद "

महाराजाचं मन पेटल होतं एक शिकार साधली पण दुसरी हुकली म्हणून ! एकसारखी वटवट करणारी तिची जीभ कायमचीच बंद करावी, सतत सलणार हें शल्य सदासाठीं निपटून टाकावं यासाठीं तर मृगयेचा बेत आंखला परतु काम साधल नाही पुन्हा कधीतरी—

गाण्याचे ध्वनि घुमत होते जयजयकार गर्जत होते. इतक्यात समोरच्या झाडींतून एक महाप्रचंड वराह भडाडत उटला आणि त्याच्या पाठोपाठ त्याचा बच्चा ! त्या कुरूप जनावराचे टोकदार सुळे चादण्यांत झळकले. संतापून तो त्या बेहोष जमावावर चालून आला. पण मग त्याची चूक त्याला उमगली आणि बिनचूक तो माघारीं फिरला. महाराजाबरोबर मृगयेला आलेल्या सामतांना आज नुसतं स्वस्थच बसायला लागलं होतं. समोर आलेलं जनावर असं सुख जाण त्याना मानवेना. मृगयेची हौस खोपटात बसून भागलेली नव्हती. त्यांच्या फुरफुरणाऱ्या बाहूना समोरच्या वराहान जणू आव्हानच दिलं होतं. महाराजांच्या आज्ञेची वाट न पाहतां ते पुढें घुसले आणि वराहाच्या पाठोपाठ धांवले मृगया बघण्याची हौस असलेली सुनंदाहि न राहवून त्याच्या पाठलागांत सामील झाली. देखतां देखतां पांच—सात भाले चादण्यांत चमकले आणि प्रचंड देहाच्या वराहाच्या कुशींत सपासप घुसले. तडफडाट करीत तें दाडगं जनावर जागच्या जागीं धाडकन् आपटल. एक किंकाळी आभाळ भेदून गेली आणि लालभडक रक्ताच्या थारोळयात वराह गतप्राण झाला. त्याचा बच्चा मात्र निसटून घनदाट अरण्यांत विरून गेला.

बिंबिसारला वाटलं, कुणीतरी कुजबुजलं, " हें बरोबर नाहीं ! " त्यानं आजूबाजूला बघितलं आणि विचारलं, " काय बरोबर नाही ? कोणाच बरोबर नाहीं ? कोण बोललं हें ?"

सभोवारची तोंड गप्प होतीं. वराहाची वाट लावून ते वीर परतत होते. महाराजाना अभिवादन करून ते पुन्हा त्या जथ्यांत सामील झाले. महाराजाचं दुसऱ्या कशातच लक्ष नव्हतं. ते निरखीत होते फक्त राणीच्या हालचाली. अन्वयार्थ लावीत होते तिच्या वागण्याचा. आपल्याबरोबर चालणारी ही बया संधि सांपडतांच त्या चौघांबरोबर पुढें धांवली. त्या चार भाल्यांत हिचाहि एक भाला उसळला होता. हाताला हात लावावा तसा. सामंतांनीं विजयी मुद्रेनं अभिवादनं केलीं तेव्हां हिच्या मुद्रेवर कौतुकाचे भाव झळकले. तें कौतुक नाहीं, प्रेम आहे; निदान तारुण्याची ओढ आहे; आसक्तीची झाक आहे.

बिंबिसारला तीव्रतेनं जाणवलं, " हिच्यांतलं आणि आपल्यातलं अंतर फार लांवत चाललं आहे. आपण उतरणीला लागलो. हिचं यौवन मात्र उफाळतं आहे. पाऊल वाकडं पडण्यापूर्वींच तें तोडून हिची वाट थांबवली पाहिजे. पापाला वाचा फुटण्यापूर्वींच वाचा कायमची बंद केली पाहिजे. हिला जिवंत ठेचायला हवी—जाळायला हवी ! पापाचा श्रीगणेशा होता होतांच इत्यलम्‌च खड्ग त्यावर फिरलं पाहिजे. अंकुरण्यापूर्वींच हें सारं खुडायला हवं "

आपल्या अंत:करणांतल्या जळजळीची धग बाहेर कुणालाच लागूं नये याची दक्षता बिंबिसार घेत होता. सुनंदा नेहमीसारखीं त्याला बिलगून चालली होती. तिचा स्पर्श असह्य असूनहि चार-चौघांत तिला झिडकारणं अशक्य होतं.

अखेर सारे वस्तीपाशीं आले. रथाला घोडे जुंपले गेले. बिंबिसार रथांत चढला. त्याच्या जयजयकारांनी पुन्हा एकवार तें वन दुमदुमलं. राणी रथात चढत होती. काय झालं देव जाणें, वर टाकलेलं पाऊल तिन पुन्हां खाली घेतलं. आणि तिनं सुचवलं, " महाराज, मृगयेनं आपण खूप थकलेले दिसता. आपण सावकाश राजगृहाला परतावं. या चार सामंताना बरोबर घेऊन मी पुढं होते; आणि पुढची सारी व्यवस्था करून ठेवते "

महाराजाच्या संमतीची वाट न बघतां ती एका अश्वावर स्वार झाली आणि टांच मारून ती भरधांव निघाली.

पाठोपाठ महाराजांचा रथ सथपणानं मार्गक्रमण करूं लागला. राणीसह ते चार सामंत दिसेनासे झाले. मागची वस्तीहि खूप मागें

पडली. महाराजांनीं सारथ्याला रथ थांबवायला सांगितला. बिंबिसारनं घोड्याचे लगाम स्वतःच्या हातीं घेतले. प्रतोद फटकावला. त्या अश्वांना चार खणखणीत फटकारे लगावले. जनावरं चौखूर सुटलीं. धुळीच्या लोटांत चार सामंत आणि सुनंदा कधीं मागें पडली, हेंहि उमगलं नाहीं. निर्मनुष्य राजपथावरून दौडत तो बेफाम रथ प्रासादापाशींच येऊन थबकला. मृगयेनं थकलेल्या सम्राटाचं सामर्थ्य अद्यापहि किती तेज आहे, याची चुणूक होती ती !

*बिंबिसारनं थेट शयनगृह गाठलं.* पाठोपाठ महाराणीहि आली. *पण महाराजांना आतां कोणीच नको होतं.* त्याची आज्ञा कडाडली. *आणि शयनगृहांत* फक्त अंधार शिल्लक उरला,

*श्रांत* देह मंचकावर लवंडला. पण पापणीला पापणी भिडेना. तगमग शांतवेना. सुनंदेविषयींच्या संशयाची ठिणगी मनात पडल्या क्षणापासून असंच होत आहे. मुठींत असणाऱ्या झोपेला नव्यानंच पंख फुटले आहेत. ती दूर उडून जाते लावूनच खुणावतें टुकटुकावते पण हवी तेव्हां जवळ येत नाहीं. आली तर पाऱ्यासारखी निसटते. ती आतां हातची राहिली नाहीं. सुनंदेसारखीच ती आता स्वाधीन उरली नाहीं. पारखी झाली. सुनंदेसारखीच--

पेटलेला मंचक सोडून बिंबिसार उठला. येरझाऱ्या सुरू झाल्या, एक आग माथ्यात भडकली.

"कोण आहे रक्षक ?"

अभिवादन करून रक्षक हजर झाला.

"तावडतोब अजातशत्रूच्या महालात जा; आणि निरोप पोचतां क्षणींच असाल तसें महाराजांसमोर त्वरित उपस्थित व्हा, असा निरोप द्या त्यांना."

रक्षक निघून गेला. महाराजांच्या येरझाऱ्या चालूच होत्या. चार तरण्याबांड सुमतांबरोबर हसत खिदळत वावरणाऱ्या सुनंदेची कितीतरी वेगवेगळी हिडीस चित्रं त्याच्या नजरेसमोरून झरझर सरकत होतीं.

•••

## : २ :

काळोखाचा गडदपणा दाखवण्यापुरताच टिमटिमणारा एक दिवा. वाऱ्यानंहि गोठाव अशी थंड शांतता. पाठीशीं येऊन ठेपलं तरी चाहूल न लागावी अशा वाघाच्या अलगद पावलांनीं अजातशत्रू तिच्या शयनमंदिरांत येऊन पोचला. श्वास रोखून त्याचीं चोरपावलं पडत होतीं.

सुनंदा शांत झोपली होती. एखाद्या निष्पाप बालकासारखी बेसावध. निष्कांचन दरिद्री भिकारणीसारखी निश्चिंत. --जणूं दुसरी मृतावस्था ! मगधाच्या महाराणीला अशा प्रगाढ निद्रेच सुख उपभोगायला मिळतं ! त्याला कौतुक वाटलं--हेवासुद्धा.

तिच्या श्वासोच्छ्वासांची ऊब जाणवावी, इतक्या अंतरावर येऊन तो स्तंभासारखा उभा राहिला; तरी तिची झोप यत्किंचितदेखील चाळवली नाही. महाराजानी सोपविलेली कामगिरी उरकून घ्यायला. इतकी अचूक संधि नवस करून सापडली नसती. पित्याची आज्ञा पाळण्याचं पुण्य पदरांत पाडून घ्यायचा विचार त्याच्या मनात सटकन् चमकून गेला अशा गाढ झोपेतच जर कदाचित्...

परंतु तें निद्रिस्त सौन्दर्य कुणाचीहि नजरबंदी करावी, इतकं प्रभावी होतं. उशीवर अस्तव्यस्त विसावलेले काळेभोर मऊसूत लावसडक केंस; कमलनेत्रांना अलगद झाकणाऱ्या मखमली पापण्या; डोळ्यांच्या मर्यादा आखून देणाऱ्या कमानदार भुवया; स्वप्नांशी हितगुज करण्यात गुंगलेल्या अर्धोन्मिलित ओठांच्या महिरपी; साऱ्या सौंदर्यावर कळस चढविणारी सुरेख नासिका; विशाल भालप्रदेशावर झळकणारा सौभाग्यतिलक आणि या स्वर्गीय लावण्यावर कवचरूप बनून राहिलेलें व त्या स्निग्धसंथ प्रकाशांत उजळणारे साध्वीचे सात्त्विक भाव--हें सारं डोळे भरून पिण्याजोगं आहे. पाश फेंकायला सरसावलेला कृतांतांचा हातहि इथं आंखडला जाईल उगवत्या निरसरसत्या तारुण्याला खुणावणार इथं ओतप्रोत तुडुंबलेलं असल तरी तें हातीं घ्यायचा प्रयत्न केला तर पाऱ्यासारखं निसटून पळेल ! वासनाविकारांच्या ओंजळी भरायला गेलं तर इथं मृगजळच हातीं लागेल ! उपभोगाच्या लालसेनं इथं कोणी बोट टेकूं बघेल, तर आभाळासारखं भरारून उचं सटकावणारा झटका इथं मिळेल. छेः ! हें सारं दुरूनच न्याहाळण्याजोगं आहे. नुसत्या स्पर्शानं कोमेजून जाणारे पारिजात इथं फुलले आहेत !

अजातशत्रूनं तिला स्पर्श केला. ती खडबडून जागी झाली. उठून तिनं विचारलं, "कोण आहे ?"

दिव्याची वात पुढें करीत अजातशत्रु उत्तरला, "मी."

त्या उत्तरानं ती बिचकली नाहीं. घाबरली नाही. अजातशत्रूला आश्चर्याचा धक्का बसला.

अंगावरचं वस्त्र सारखं करीत, तिनं अवेळीं शयनमंदिरांत आलेल्या अजातकडे निर्विकारपणें बघितलं. आणि तिनंच विचारलं, "युवराज अशा अपरात्री इथं कशासाठीं आलांत ?"

"युवराज ?" त्या संबोधनानं अजातशत्रु बिचकला. स्वतःची खात्री करून घेण्यासाठीं त्यानं पुन्हा विचारलं, "तू मला युवराज म्हणालीस ?"

"इथ आपल्याशिवाय दुसरं कोण आहे म्हणून मी त्याला उद्देशून हें बोलणार ? तुम्हालाच म्हणाले !" हसत हंसत तिनं उत्तर दिलं. मिटलेली कालिका उमलताना दिसावी, तशी ती अर्ध्या झोपेंतून उठलेली असूनहि लोभस व प्रसन्न दिसत होती.

"मी युवराज कसा होणार ? तो मान तर तुझ्या अभयचा आहे !" अजातशत्रूनं जाणीव करून दिली.

"माझ्या अभयचा ? अन् तू रे कोणाचा ?" हसतच तिनं विचारलं. या प्रश्नाला समर्पक उत्तर त्याच्यापाशी नव्हतं. तो गप्प उभा राहिला. तिच्या अंतरंगाचा वेध घेण्यासाठीं त्यानं तिच्या डोळ्यांत आपली नजर रोखली. सवतीमत्सराचा फणा तिथं कुठं उभारला गेला आहे का, हें त्याला शोधायचं होतं. महाराजानीं सांगितलेला सापत्नभावाचा विखार त्याला तिथं अजिबात आढळला नाहीं. परंतु तिच्या नयनात तेवत होती मायेची ज्योत. अगदीं सहजपणानं तिनं

विचारलं, "जाऊं दे ते. कशासाठी आला होतास या अपरात्रीं माझ्याकडे ? "

त्या प्रश्नाचं उत्तर त्याला टाळायचं होतं. तें उत्तर शब्दानी प्रगट न करतां कृतीन प्रत्यक्षात आणायचा त्याचा बेत होता. विषयातर साधण्यासाठी त्यानं प्रश्न केला, "अशा अवेळीं आपल्या सवतीचा तरणाताठा मुलगा आपल्या शयनगृहात आलेला बघून तुला भीति नाहीं वाटली ? शंका नाही आली कसली ? "

"शका कसली यायची अन् भीति कशाची वाटायची ? स्वत.च्या मुलाला घाबरणारी आई अद्याप जन्माला यायची असेल ! "

"तुझ्या मनांत असणारे भावच माझ्या मनांतहि असतील कशावरून ? तुझ्यातलं सवतेपण झोंपलेलं असलं, तरी माझ्या मनात ती आग धगधगत नसेल कशावरून ? "

"जगातलं भलेपण अखेर विश्वासावरच निर्धारित असतं आणि भलेपणाला कशाचंच भय वाटत नाही. "

"पण या विश्वासानंच दगाबाजी करून भल्याला गारद केलं तर?"

"'परमेश्वराची इच्छा' म्हणायची, दुसरं काय ? "

अजातला या उत्तराचं आश्चर्य वाटलं. राजप्रासादात वावरणारी महाराणी इतक्या विश्रब्धपणानं व्यवहार कशी करू शकते ? तिच्या गाढ झोंपेचं रहस्य यांतच सामावलेलं असणार हें त्याला समजलं. कौतुकानं तो म्हणाला, "आई, किती शांत झोंप असते तुझी ! महाराणीच्या शिरावर एका केसानं टागलेलं खड्ग अष्टौप्रहर लटकत असतं म्हणे ! तुझ्या मुद्रेवर त्याची अंधुक छायादेखील कधीं उमटलेली दिसत नाहीं. "

"बाबा रे, परमेश्वरानं माझ्यावर कृपेचा वर्षाव करताना आपला हात इतका सैल सोडला कीं मीं चिंता करावी, असं त्यानं या जगांत काही बाकीच ठेवलं नाहीं ! खोटं नाही सांगत, अजात, विधात्यानं जेव्हां दु ख, भय वाटलं असेल ना, तेव्हा फक्त आटपाट नगरातल्या नावडत्या राण्याच उपस्थित असाव्यात असा अदाज आहे आपला माझा !" किंचित् हंसून ती पुढें बोलली, " निदान मगधाधिपतीची महाराणी तर निश्चित तिथ हजर नव्हती. तिच्याकडे भिरकवायला दु खाचा कणदेखील उरला नाहीं अखेरीस त्या बिचाऱ्या ब्रह्मदेवा जवळ ! सासरीं काय, माहेरी काय, माझ्या जीवनमार्गावर नुसतीं फुलांची पखरण आहे...काटे टाकायचेच विसरला दयाघन... "

तिचं भविष्य त्याला खुणावत होतं. त्याचा सुगावा देण्यासाठीं त्यानं विचारलं, "पुढचा क्षण परमेश्वरानं अदृष्टात दडवला आहे. तें किती चांगलं झाल नाहीं आहे ?"

"अस कां म्हणतोस ? मला माझं भविष्य, तू आता दिसतोस ना, तितकच स्पष्ट दिसतं, तें भूत आणि वर्तमानाइतकच उजळ आहे. किंबहुना जन्मोजन्मीं यापेक्षां वेगळ काही माझ्या वाटणीला येईल, अशी शकादेखील शिवत नाही मला. आणि ईश्वरान माझ्यासाठीं जें काहीं वाढून ठेवलेल असेल, तें निश्चित माझ्या भलाईसाठी, सुखासाठींच असणार याची खात्री आहे मला !"

तो विश्वास तिच्या शब्दांप्रमाणेंच तिच्या डोळ्यांतूनहि ओसंडत होता.

'परमेश्वर आतां तुझ्यासमोर उभा राहिला तर काय मागणं मागशील तू ?"

तिनं चटकन् उत्तर दिलं, "मी त्याला विचारीन, मला देतांना हातचं काय राखून ठेवलंस म्हणून आतां तुझ्यापुढें मी हात पसरूं ?"

"तरीहि त्यान देण्याचा आग्रहच केला तर ?"

"मेघ बरसायला आसुसलेला तिथ धरती तरी किती वेळ नकार देणार ? मग केवळ त्याचा हट्ट पुरविण्यासाठीच मी मागेन, बाबा रे, जन्मोजन्मीं मला स्त्रीचाच जन्म दे !"

"तू स्त्रीचाच जन्म मागशील आई ? पुन्हा ?

"हो पुन्हा. आणि म्हणेन, महाराज बिंबिसाराची सहचारिणी म्हणूनच मला आयुष्य जगायला मिळू दे. स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या व्यथा, वेदना याची ओळख तरी कधीं झाली आहे कां रे ? अगदीं अभयला जन्म देते वेळींसुद्धां मला वेणाचे कष्ट झाले नाहीत. त्यावेळीं डोळ्यांतून वाहिलं तें पाणी कृतकृत्यतेचं होतं. त्यावेळीं सुखवत होतं मला स्त्रीजन्माचं सार्थक–मातृत्वाची तृप्ति !"

"आई, तुझ्या आयुष्याची वाटचाल अनंत काल यान सुखाच्या मार्गावरून होत रहाणार आहे, असं वाटतं तुला ?"

"हो. नाहीतर त्यांत परिवर्तन काय होणार ? यापेक्षां आणखी परम सुखाची वाट आहेच कोणती तर तिकडे त्याची पावल वळणार?"

तिला दिसत नव्हत, ते तो बघत होता. तिला कल्पना नव्हती, तें तो करायला आला होता. त्याला ठाऊक होतं कीं, वस्त्र नुसत उभ्या धाग्यांनीच विणलं जात नाहीं, त्यासाठीं आडवे धागेहि हवे असतात, हें तिला लवकर कळणार आहे. आजवरचं आयुष्य कुसमकोमल पायघड्यांवरून दौडलं असलं तरी कुठें तरी केव्हां तरी काटेहि बोचणार आहेत हिला. गऱ्याची आंतल्या आठोळ्यांची ओळख, हिची इच्छा असो वा नसो, तिला करून घ्यायची आहे. तशी वेळ येऊन ठेपली आहे पण हिला तर तिची चाहूलदेखील नाहीं !

हिनं मागितलेल्या मागणीला 'तथास्तु' म्हणताना परमेश्वराचीहि जीभ अडखळेल; हिला मात्र वाटेल, लाभलेल्या वरदानानं आपण कृतकृत्य झालों आहोंत ! दिवसाबरोबर रात्र, शुक्लासह कृष्ण आणि शरदवसंतासांगाती शिशिरग्रीष्माची गुंफण करणाऱ्या विधात्यानंच हिची मूर्ति घडवली आहे, हिचं नशीब कोरलं आहे, याची जाणीव हिला होणार आहे.

तिला त्या भविष्यानं केवळ खुणवावं म्हणून पुन्हा एकदां सुचवलं, "आई, ही वाटचाल दु.खाच्या दिशेनं कधीच होणार नाहीं, अस वाटतं तुला ? "

"निश्चितपणानं. आजवर या जगांत मी कधीं कुणाचं, कांहींच अशुभ चिंतिलं नाहीं. केल नाही, मग कुणाच्या शापवाणीनं माझ्यासाठीं या जीवनांत दुःख मांडलेलं असणार ?"

"पण या जगांत चांगल्याची परतफेड नेहमी चांगल्यानंच होते, असं थोडंच आहे ?"

"निदान माझी तरी तशी श्रद्धा आहे, किंवा पाहिजे तर अस समज कीं, परतफेडीची अपेक्षा बाळगून चागलं केलेलं नसल्यामुळें जें कांहीं परत मिळत तें चागलंच वाटत मला. हं. त्या पुण्यातच जर कांहीं हिणकस अश असेल तर तोच त्या पुण्याला मारक ठरतो. नाहीतर त्या पुण्याचा घात करायचं सामर्थ्य केवढ्याहि बलाढ्य पापांत असूं शकत नाही. "

"किती खुळी, अव्यवहार्य श्रद्धा आहे तुझी ! मी इथ कशासाठी आलों आहे आणि पुढच्या क्षणीं काय होणार आहे, याची पुसट कल्पना जरी तुला आली, तरीहि तुझ्या या भव्योदात्त विचाराचा वाळूत उभारलेला ठिसूळ प्रासाद खळ्ळ्दिशीं कोसळल्याविना राहणार नाहीं !"

या सूचनेचीहि प्रतिक्रिया दाखविणारी कोणतीच रेषा तिच्या चेहेऱ्यावर उमटली नाहीं. उलट पूर्वीच्याच श्रद्धेनं ती म्हणाली, "तूं जें कांहीं करायला आला असशील, त्यांतून माझं वाईट, माझा घात करणारं कांहींच निष्पन्न होऊं शकणार नाहीं."

अजातशत्रूला त्या आत्मविश्वासाचं हंसू आलं. ती चर्चा झटकून टाकण्यासाठीं शेवटीं सुतंदेनं सरळ प्रश्न फेकला, "काय काम आहे तुझं ?"

"महाराजांच्या आज्ञेचं पालन करायला आलोंय् मी."

"काय आज्ञा आहे महाराजांची ?"

गंभीर होत हलक्या आवाजांत त्यानं सुनावलं–

"तुझं हें मंदिर पेटवून द्यायचं आणि तुला जाळून भस्मसात् करून टाकायची !"

क्षणभरच शांतता शहारली. अजातनं कल्पिलेले भाव मात्र तिच्या हालचालींत वा मुद्रेंत उतरले नाहींत. पूर्वीच्या थडंपणानं ती म्हणाली, "मग महाराजांची आज्ञा कार्यवाहींत आणायची सोडून तूं माझी झोंपमोड कां केलीस ? अगदीं निमूटपणानं तुझा कार्यभाग तुला उरकून टाकतां आला असता ; आणि मीहि सुखानं चिरनिद्रा उपभोगायला मोकळी झाली असते"

"परंतु पित्याच्या आज्ञेचं पालन करण्याचं पुण्य पदरांत पाडून घेतांना मातेच्या हत्येचं महापातक मला माझ्या माथीं घ्यायचं नव्हतं !"

"युवराज अजातशत्रु, तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती."

"कोणता अपेक्षाभंग झाला माझ्या हातून ?" कांहींच न कळल्यामुळें अजातशत्रूनं विचारलं

"सम्राटाच्या आज्ञेचं पालन करतांना बाकी साऱ्या गोष्टींचा विचार गुंडाळून ठेवायचा असतो. तूं कर्तव्यच्युत झालास. मातृप्रेमाची कोमल भावना मनांत फुलवून पुत्राचं आणि युवराजाचं प्रथम कर्तव्य तूं मागं सारलंस."

"पित्याच्या आज्ञेतील विवेकाविवेक पारखण्याइतकं जाणतेपण आल्यावरसुद्धां त्याच्या आज्ञेतील अक्षरन् अक्षर तंतोतंत प्रत्यक्षांत उतरविण्याचा मूर्खपणा मीं करावा ?"

"पित्याच्या आज्ञेसाठीं चौदा वर्षे वनवास भोगणारे प्रभु रामचंद्र जाणते नव्हतेच म्हणायचे ! वडिलांनीं सांगताच मातेचं मस्तक धडापासून वेगळं करणारे परशुराम तुझ्यालेखीं मूर्खच होते एकूण ! अजात, स्वतःच्या शहाणपणाचीं कवाडं कडचाकुलपांनीं घट्ट बंद केलीं तरच कांटेकोरपणानं आज्ञापालन होऊं शकतं. ज्या आज्ञेला 'कां?' 'कुठें ?' कशासाठीं ?' 'कसं?' अशांसारख्या प्रश्नांचे फांटेउपफांटे फुटतात त्या आज्ञेच्या चिंध्या चिंध्याच होताच; अन् अखेरीस ती आज्ञा देणाऱ्याचीहि तीच गत होते."

"याचा अर्थ मीं खरोखरच हें मंदिर पेटवून तुला जाळून राखरांगोळी करायला पाहिजे होती ?"

"यांत काय संशय ? तुझ्या पित्याची, मगधाच्या सम्राटाची आज्ञा होती ना ती ? सम्राटाच्या हातून कधीं चूक होऊं शकते ?"

"सम्राट हा सरतेशेवटीं एक मनुष्यप्राणीच असतो ना ? राग, लोभ, मद, मत्सर, असल्या रिपूंना हातभर दूर अंतरावर राखणारा तो कोणी साधु तर नव्हे ? त्यांच्याच पोटीं उद्भवलेल्या निराधार संशयाची आग आपल्या अंतःकरणांत चेतवून तो एखादं पापकृत्य करायला प्रवृत्त झाला, तरीहि डोळे झांकून आपण पतिव्रतेप्रमाणं हाताला हात लावायचा ?



"छे ! छे ! मी पायलट किंवा स्पेसमन् नाहीं––पण दिवाळींत मी रस्त्यांतून याच वेषांत फिरतो––"

★

"आज्ञापालनांत या इतर उठाठेवी करण्याची गरज नसते एवढं मला समजतं."

"त्याच आंधळेपणाला बळी पडून मी आज तुझी आहुति अग्निनारायणाला देऊन टाकली असती तर–"

"तर काय वाटेल तें झालं असतं. आकाश कोसळलं असतं. नाहीं. तर पायाखालचं पाताळ दुभंगलं असतं." राणी संतापून बोलत होती, "त्या परिणामाचं उत्तरदायित्व तुझ्या माथीं कोणीं फोडलं नसतं. अजूनहि वेळ गेलेली नाहीं. तुला चूक निस्तरण्याची आणखी एक संधि मी देते. होते तशी मी मंचकावर गाढ झोंपते. पेटवून दे हें मंदीर !"

महाराणीच्या त्या अनपेक्षित पवित्र्यानं अजातशत्रु एकदम गांगरला. पुढें काय करावं तें त्याला समजेना. चांचरतच तो आपली बाजू मांडूं लागला, "आई, हें सारं कशासाठीं करायचं, कोणत्या संशय पिशाच्चानं महाराजांना पछाडलं आहे. याची तरी माहिती करून घ्यायची होतीस."

"मला त्याच्याशीं कर्तव्य नाहीं."

"तुला नसेल पण मला आहे. आज्ञाभंगाचं पातक पत्करायला मी कां तयार झालों हें तुला समजलंच पाहिजे"

"मला तें ऐकायची इच्छा नाहीं. हा महाल पेटवून देऊन मला जाळून टाकण्यांत सम्राटांचा निश्चतच कांहीं उदात्त हेतु असला पाहिजे. या अग्निपरीक्षेंतून माझं सुवर्णच होणार असणार !"

"केवढा वेडा विश्वास आहे. आई तुझा ! मला युवराजपद देण्यांत तूं आडवी येशील, तुझ्या मनांतला सापत्नभाव उसळून फडा काढील. म्हणून त्यापूर्वीच ठेचून टाकायचा हा उपाय होता !"

"मग यांत चूक काय आहे ? माझ्यांतला स्त्रीसुलभ सवतीमत्सर जागा होणं यांत अस्वाभाविक काय आहे ? मीहि एक स्त्रीच आहे. माझा अभय तुझ्यापेक्षां वयानं मोठा आहे. युवराजपद हा त्याचा जन्मसिद्ध आणि निसर्गदत्त अधिकार आहे. तो डावलून युवराजपदाचा

किरीट तुझ्या मस्तकावर ठेवलेला मला पहावेलंच याची खात्री काय ?"

"आजवरचं तुझं नि पक्षपाती वर्तन. तू कधीच माझ्यातलं आणि अभयमधलं अंतर जाणवू दिलं नाही; तुला तें कधी जाणवलंच नाहीं. केवळा ठणठणीत नि सबळ पुरावा आहे हा ! "

"स्खलनशील मानवाच्या पूर्वेतिहासावरून त्याच्या भविष्यासंबंधीं रचलेली अनुमानं नेहमी अचूकच ठरतील असं नव्हे तुझंच उदाहरण घे. तुझ्या आजवरच्या कणखर वर्तनामुळेंच तुला युवराजपद द्यावं असं मींच सुचवलं होतं. नीतीअनीतीची, धर्माधर्माची चर्चा करीत बसणारी माझ्या अभयसारखीं तत्त्ववेत्ती माणसं भिक्षु होण्यास पात्र ठरतात; सत्ता गाजविण्यासाठी वज्रासारखी मनगटं आणि मन असणाऱ्या पोलादी पुरुषाची गरज असते. मी तुला त्यांतला समजत होते. पण आजच्या परीक्षेंत तूं सपशेल अपात्र ठरला आहेस. सम्राटाची आज्ञा पाळायची सोडून तूं अभयसारखाच अकर्मण्यवादी बनलास. काय तुम्हां दोघांत अंतर ? आतां माझंहि मन फिरून मीं तुझ्याविरुद्ध कौल दिला आणि तुझ्या युवराजपदाच्या निष्कटक मार्गावर सवतीमत्सरानं पेटून घोड म्हणून येऊन पडले तर काय होईल ? सम्राटांची आज्ञा योग्य होती कीं नाहीं ! अजून सुधार... आणखी एक संधि... पुन्हा नाहीं मिळायची... "

सुनदेनं पुन्हां मंचकावर अंग टाकलं. पांघरूण ओढून घेतलं. डोळे मिटले.

पुढें काय करावं तें अजातशत्रूला सुचेना. सगळंच मुसळ केरांत गेल्यासारखं झालं. महाराणी अशी कांहीं आडमुठी भूमिका स्वीकारील. अशी कल्पनाहि नव्हती. डाव अनपेक्षितपणें उलटत चालला होता, भलतींच प्यादीं वाटेल तशीं हलवली गेलीं होतीं. पुढची सारी सिद्धता वांया जाणार होती. प्रकरण कल्पनेपेक्षां अधिक लावलं

बाहेर चोरवाटेच्या दारापाशीं देवदत्त रथ घेऊन केव्हांच आला असणार. तो जांभया देत असेल. वनांतल्या वस्तीवर वीरभद्र वाट पहात राहील. राणीला चोरवाटेनं इथून बाहेर काढायची अन् मग खुशाल हा प्रासाद धडाडूं द्यायचा...

पण...

सुनदेची समजूत काढत बसायला आतां वेळ कुठं होता ? अजातशत्रूची चुळबूळ जोरांत सुरू होती. त्याच्या मनातली घालमेल, अस्वस्थता त्याच्या हालचालीत प्रतीत होऊं लागली. हा घोळ मिटवायला एकच मार्ग होता कांहीतरी करायला हवं होतं.

मग तो सुनदेला म्हणाला, " आई, हें योग्य कीं अयोग्य या साऱ्याच तात्त्विक चर्वितचरण आपण नंतर करू. यावेळीं केवळ मी सांगतो तशी तू वाग. कृपा करून न बोलतां, माझ्याबरोबर चल. या चोरवाटेनं तुझी पुढची सगळी व्यवस्था करून आलोय मी. तू सुखरूप निसटलीस म्हणजे मग खुशाल धडाडू दे हा महाल. "

सुनदा सावध झाली. अजातशत्रुचं हें कांहीतरी तिरकांगडं कारस्थान आहे असा तिला संशय झाला. सम्राटाच्या नावावर हा कांहींतरी पाताळयंत्र रचत असला पाहिजे.

तिनं निक्षून बजावलं, " अजात, तुझ्या या कारस्थानाला मी बळी पडेन, असं वाटलं तुला ?"

"कारस्थान ?" अजातला त्या आरोपाचा अर्थच उलगडेना. यांत कसलं कारस्थान ? हा कसला विचित्र आरोप ? काकुळतीनं तो म्हणाला, " अ ई, तुझा गैरसमज झालाय्. खरोखरच यात काहीं कारस्थान नाही, देवाशपथ. तुझ्या पायाशपथ. तुझा जीव वांचविण्यासाठीं तर हा सारा आटापीटा चाललाय् "

"अजात, तू युवराज आहेस तशीच मीहि महाराणी आहे." आपली भेदीक नजर त्याच्यावर रोखून ती सुनावू लागली,

"फक्त चोरानाच चोराची पावलं कळतात, असं नव्हे. प्रासादाच्या चार भिंतीत कोंडून ठेवलेल्या राजस्त्रियानाहि राजपुरुषांची पावलं कळतात, बर !"

"पण खरच तसं कांही नाही आई" अगदी तळमळून तो समजावणी करू लागला, " तुला वाचविण्याच्या विशुद्ध उद्देशाशिवाय अन्य कोणताहि हेतु नाहीं या पाठीमागें ! "

"सम्राटाच नाव पुढे करून मला इथून पळवायचं आणि आपला डाव तडीस न्यायचा, हा तुझा बेत न कळण्याइतकी मी दुधखुळी नाहीं. सम्राटाची ओळख तुझ्यापेक्षां मला अधिक आहे महाराज बिंबिसाराचं माझ्यावर किती प्रेम आहे हें मला ठाऊक आहे. आकाशपाताळ एकमेकाला भिडेल, पण महाराज माझ्या जीवावर कधीच उठायचे नाहीत. कितीहि फसवायचा प्रयत्न केलास, आणि माझ्या हितासाठी सारं करीत असल्याचा बहाणा केलास, तरी या ढोंगाने मी फसायची नाही. अभयला डावलून तुला युवराज करायचा आग्रह मी महाराजाना केला, त्याच हेंच फळ वाटतं ? तूच असा उलटलास माझ्यावर ? "

"नाही, आई, यांत खरोखरच माझा काही अपराध नाही. परवां मृगया आटपून तुम्हीं परत आलात. नंतर सम्राटानीं मला बोलावून घेतलं आणि त्यानी मला ही आज्ञा केली कीं..."

" तुला गोष्टीहि चांगल्या रचता येतात म्हणायच्या ! हीहि कला अवगत आहे वाटतं ? मग खड्ग मोडून लेखणीच कां हाती घेत नाहीस ? "

कल्पित कथा ! आता मात्र कमाल झाली. त्या रात्रीची महाराजांची भेट त्याच्या मनाच्या पडद्यावर क्षणार्धात सररकन् उलगडली.

महाराजाचा निरोप घेऊन सेवक अजातशत्रूच्या महालात आला तेव्हां तो अगदी गाढ झोपलेला होता. एक भयाण स्वप्न त्यावेळी त्याला पडत होतं. आभाळांतून एक देवता मृत्युलोकावर येऊन कोसळत होती. तारकेप्रमाणें झगमगणारं तिचं तेज अंतराळात एक रेघ ओढून अंधारात लुप्त झालं. उल्केसारखीच शिळा बनून ती पृथ्वीवर आदळणार होती आणि स्वतःच्या ठिकऱ्या उडणार या कल्पनेनं भयभीत होऊन तो जीव तोडून किंकाळचा फोडत होती......

स्वप्न इथंच भंगलं आणि सम्राट बिंबिसाराची आज्ञा पाळण्यासाठी अजातशत्रू डोळे चोळत निघून आला.

"सम्राटाचा जयजयकार असो !"

बिंबिसारच्या येरझारा संपल्या. रक्षकाला त्यानं बाहेर निघून जायला सांगितलं. अजातशत्रूच्या खांद्याला धरून त्यानं मंचकापाशीं नेलं. अगदी जवळ बसवून घेतलं आणि हलक्या आवाजांत बोलणं सुरू झालं.

त्याचा संवाद त्या दोघाशिवाय अंधारालाच ऐकायला मिळाला. त्याच्या शेवटी महाराजानी विचारलं होतं," अजात, यासाठी एक काम करशील ?"

"महाराजानीं नुसती आज्ञा करायची !"

"बघ हं, मागचापुढचा विचार न करतां ती चोख पाळायला पाहिजे."

'यांत महाराजांना शंका कां यावी ?"

त्या उत्तरानं प्रसन्न होऊन महाराजांनीं त्याची पाठ थोपटली आणि सांगितलं, "अजात, त्या तुझ्या सावत्र मातेला या जगांतून नाहींसं करण्याची कामगिरी मी तुझ्यावर सोंपवत आहे. सुनंदा माझी प्रियतमा असली तरी साऱ्या राज्याच्या कल्याणाकरतां मी तिच्या जीवावर तुळशीपत्र ठेवायला तयार आहे. ती प्रियतमा असल्यामुळें तिचा जोव घ्यायला माझे हात धजावणार नाहींत. पण तें व्हायला हवं आहे. अन् तुझ्याशिवाय तें कोण करणार ?"

अजातशत्रु दचकला. बिंबिसारपासून जरा बाजूला सरकला. महाराजांना तें जाणवलं. आज्ञापालनापासून तो विचलित होणार, असा संशय आला. ते किंचित् संतापले. थोडासा आवाज चढवून म्हणाले, "अजात, याबाबतींत तुझं पाऊल मार्गे पडतां कामा नये. मीं सांगितलेलं काम तुला केलंच पाहिजे—पित्याची आज्ञा म्हणून. मगधाच्या सम्राटाची आज्ञा म्हणून! आज्ञापालनांत कुठं नखभर फरक पडला तर तुझी आयुष्यघटिका भरली म्हणून समज. आजपासून सात दिवसाच्या आंत, एका रात्रीं महाराणी सुनंदेचा महाल पेटवून दे—जाळून टाक तिला. राखेचं टिपूसमुद्धां कोणाच्या हातीं लागतां कामा नये. पुढं काय करायचं ते मी बघेन. समजलं ?"

अजातनं निर्जीवपणानं नुसती मान डोलावली. बिंबिसारचं समाधान झालं नाहीं. अजातच्या हातीं खड्ग देऊन त्यानं प्रतिज्ञा घ्यायला लावली. अंतरंगांत भलतंच कांहीं योजत महाराज सांगतील ते शब्द तो शुष्कपणानं उच्चारत होता. ती प्रतिज्ञा पाळावी असं ती करतांनाहि त्याच्या मनांत नव्हतं त्याच्या सदसद्विवेक बुद्धीला तें पटत नव्हतं. योग्य वाटत नव्हतं. ती प्रतिज्ञा मोडण्यांत त्याला तरी कोणतं पाप दिसत नव्हतं. म्हणून तर देवदत्ताच्या सल्ल्यावरून त्यानं हा पुढचा बेत आंखला होता.

क्षणाक्षणाचे पंख फडफडवीत काळ लगबगा उडत होता. सुनंदेची धाव उलटचा दिशेकडे होती. योजलेलं फिस्कटत होतं. जिचा जीव वांचविण्यासाठीं सारी धडपड, तीच मुळावर घाव घालायला निघाली होती.

पण आणखी थांबायला फुरसत नव्हती. समजूत पाडायला वेळ नव्हता; समजूत काढायची ती वेळहि नव्हती. प्रासादाबाहेर प्रतीक्षा करीत असलेल्या देवदत्ताच्या सहनशक्तीला किती ताण देणार ? अन् काम हुकलं या कल्पनेनं तो तिथून चालतां झाला तर...?

प्रसंगावधान राखून तोड काढायला हवी होती. बोलण्यांत वेळ दवडणं निरर्थक होतं. विचारांच्या भोंवऱ्यांत सांपडण्यापेक्षां अविचारानं कांहींतरी करून प्रवाहाची धार तोडायला हवी होती

मग निमिषार्धांत त्यानं अंगावरचा शेला काढला आणि सुनंदेच्या तोंडांत कोंबून तिला घट्ट आवळली. आपल्या बळकट हातांनीं तिला जखडून, त्यानं तिला उचलली. मोकळचा हातांनीं ती त्याला बदडत होती, तिकडे त्यानं दुर्लक्ष केलं. कोणाहि पहारेकऱ्याच्या ध्यानांत यायच्या आंत राणीच्या शयनगृहांतलो चोरवाट त्यानं गांठली. भुयाराचं तोंड उघडून तो आंत घुसला. पुन्हां दार बंद केल्यावर त्याचा जीव भांड्यांत पडला.

आतां पाठलाग होणार नव्हता. तिच्या आरडाओरडीनं वा



—शरद अभ्यंकर

**"दूर अंतरावर एखादा सिंह कदाचित जिभल्या चाटीत बसलेलाहि दिसेल—"**

हालचालीनं कोणाला जाग येणार नव्हती कोणी मदतीला धांवून यणार नव्हतं. तरी हा वेळ वांचविण्यासाठीं तो धांवत सुटला. भुयारांतून राजगृहाबाहेर आला.

संकेतस्थळीं देवदत्त त्याची वाट बघत होता. त्या दोघांनीं सुनंदेला रथांत कोंबली. तिच्या तोंडांत गच्च बोळा कोंबला. रथांत तिला जखडून बांधलं.

मग अजातशत्रु देवदत्ताला म्हणाला, "देवदत्ता माझी आई तुझ्या स्वाधीन केली आहे सुखरूपपणानं तिला नियोजित स्थळीं पोंचविण्याची तुझी जबाबदारी आहे. अति विश्वासानं हें काम तुझ्यावर-टाकलं आहे"

देवदत्तानं ते बोलणं ऐकलं न ऐकल्यासारखं केलं अजातशत्रुच्या भोळेभाबडेपणाचं त्याला मनांतल्या मनांत हसू आलं. इतक्या सरळ मार्गी माणसाला राजसिंहासनावर चढविण्याचं साहस आपण करूं पहात आहोंत, ही एक पश्चात्तापाची बाब तर ठरणार नाहीं. असाहि एक चमत्कारिक विचार त्याच्या डोक्यांत चमकून गेला.

"किती खुळा आहे ! अजातशत्रु !" देवदत्त मनांल्या मनांत स्वतःशींच बोलत होता "यांच्या मार्गांत धोंड्याप्रमाणें येऊन पडणाऱ्या या राणीला उलथून टाकण्याची कामगिरी प्रत्यक्ष बापानं याच्यावर सोंपविली असतांना, हा तिला वांचवायला बघतो ! किती निर्बुद्ध आहे ! राजकारण लढवायचं तर अशी आलेली संधि वांया दवडून चालत नसतं ! त्या खुळ्याला हें उमजलं नाहीं, तरी मला ही वेळ गमावून चालणार नाहीं ! विश्वासानं यानं तिला माझ्या हातीं सुपूर्त केली आहे—सुरक्षित स्थळीं पोंचविण्यासाठीं ! आपण तिला कायमचीच सुरक्षितता मिळवून देऊं ! बायकांची लहर कधीं, कशी फिरेल, थोडंच आधीं सांगतां येतं ? आज आपल्या अंतःकरणांत सापत्नभावाचा लवलेश नाहीं असं वरवर ही दाखवत असते. पण त्या गहन अंतःकरणाच्या तळाशी कोणते भाव खरोखरच दडून बसले असतील. याचा थांगपत्ता कोणाला लागणार ? उद्यां हिचं अंतःकरण ढवळून निघालं आणि

बुडाचे भाव वर तरंगायला लागले तर...? छे. आपण त्याला संधीच देतां कामा नये. नागिणीची शेपूट हातीं सांपडली आहे तीवरच तिला गरगर फिरवून आपटली पाहिजे...ठार मारली पाहिजे...अशी दैवदत्त संधि हुकवणं म्हणजे राजकारणातली दिवाळखोरीच ठरायची!"

त्या निश्चयानं त्यानं ओठ आवळले. अजातशत्रु काही सूचना देत होता. निरोप सांगत होता. ते शब्द त्याच्या या कानांतून आंत शिरत आणि त्या कानानं बाहेर वाऱ्यावर उडून जात. तो पोकळ हुंकार देत होता. अजातशत्रूच बोलणं आटपलं तेव्हां तो म्हणाला, "संपलं तुझं सांगणं? निघूं आतां? तुला कशाचीहि काळजी नको. जें काय करायचं आहे, ते मी व्यवस्थित करतों. तुझ्या या मातेविषयी तुझ्या काय भावना आहेत. याची मला कल्पना नाहीं असं वाटत तुला? मी सगळं ठीक करतों. योग्य आहे तें तडीस नेतो. तू निश्चित रहा. आईच्या विचारात तुझे हात रेंगाळते राहिले नाही म्हणजे झालं! तुझी पुढची कामगिरी तुझी वाट पहात आहे...तिकडे त्वरित जा... आणि ती चोख पार पाड...जाऊं दे आम्हांला... काळजी नको..."

अजातशत्रूनं इशारा दिला. चाबूक कडाडला. तल्लख घोडे तुफानासारखे निघाले.

"जितक्या जोरानं रथ पिटाळतां येईल तेवढ्या वेगान दामट. विलंब झाला आहे. वीरभद्र वाटच बघत असेल" या अजातशत्रूच्या सूचना ऐकूं येण्यापूर्वीच देवत्ताचा रथ दृष्टिआड झाला आणि सुटकेचा निःश्वास सोडून अजातशत्रु प्रासादांत परतला.

देवदत्तानं अशा वेगात रथ हाणला होता की मागें बांधलेल्या सुनंदेची काय अवस्था झाली आहे इकडेहि त्याच लक्ष नव्हत. तो अश्वाना फटकारीत होता. जोरान उत्तेजन देत दौडवत होता. रथाची चाकं तरी जमिनीला टेकत होती कीं नाही कोण जणें!

त्या रथासारखेच देवत्ताचे विचारहि सैरभैर दौडत होते.

करकचून बांधल्यामुळें सुनंदेचा सुकुमार देह अवघडून गेला होता. हालत्या रथामुळें हेंदकाळून तिची बंधन हळूं हळूं शिथिल होत होतीं. तिला जरा जरा मोकळं वाटत होतं. देवदत्ताच्या नकळत तिला थोडीफार हालचालहि करता येऊ लागली. त्या दोऱ्यांच्या बंधनांतून एकेक अवयव मोकळा होऊ लागला. ती नुसती पडून राहिली. तरी ती आतां मोकळी होती. देवदत्ताला पत्ताहि नव्हता.

तिनं मान थोडीशी उंच केली. अंधाऱ्या रात्रीमुळें मागें पडणारा रस्ताहि काळोखात हरवून जात होता. पण क्षितिजावर खूप दूर दूर राजवाड्याच्या दिशेकडे आभाळ उजळलेलं दिसल. अवेळीच उगवती जागी झाली होती. सतापान लाल झाल्यासारखी दिसत होती. नुसतीच लाल नव्हे–पिवळी–निळी–हिरवी–

बघतां बघतां लळलळत्या भडक ज्वाळांनी अग्निनारायण आभाळाला लागलेल ताऱ्यांच मोहोळ जाळू लागल्यासारखा दिसला. प्रचंड आग पेटली होती–प्रलयकाळचा अग्नि धडाडत होता–

देवदत्ताचे घोडे पुढे पुढें दौडत होते. राणीचे डबडबलेले डोळे त्या पेटत्या आभाळाची आग विझवूं पहात होते

रथांत मागें काहीतरीं खुडबूड झाली. धाड्दिशी काहीतरी कोसळल देवदत्तानं मागें बघितल.

रथ मोकळा होता! नुसत्या दोऱ्या थडाथडा उडत होत्या लगाम खेचून त्यान घोडे थांबवले.

रथाखालीं उडी घतली आणि पळत तो मागें आला वेगानं दौडणाऱ्या रथातून उडी झोकल्यामुळें जोरात आदळलेली राणी पन्नास शंभर पावलांवर पडलेली होती, चांदण्याच्या अंधुक प्रकाशांत देवत्तानं तिच्याकड बघितलं. जबरदस्त मार बसल्यामुळें ती मूर्च्छित होऊन पडली होती.

ती बेभान होती. देवदत्ताचा बेत तडीस न्यायला हीच योग्य वेळ होती. त्याचा निश्चय पक्का झाला. ओठ पुन्हा आवळले गेले. हात कमरेपाशीं शस्त्राजवळ गेले–

अंधार थरकांपत होता, मिणमिणत्या चांदण्याची लुकलूक क्षणभर गोठली होती. वाऱ्याचहि पाऊल अडलं होतं!

●●●

## : ३ :

भगवान् बुद्धदेवांच्या चरणावर अभयकुमाराला वाहून सम्राट बिंबिसार राजधानीकडे परत येत होते. सदानस्वचिंतेंत गढून गेलेला आपला हा ज्येष्ठ पुत्र ऐहिक सुखोपभोगांची लालसा न बाळगता आज ना उद्यां भिक्षूंच्या संघांत सामील होणार. अशी अटकळ बिंबिसारानं पूर्वीच बांधली होती. राजवस्त्रांचा याला मोह नाहीं. सत्तेच्या अभिलाषेपासून तो अलिप्त आहे. याची पावल पायाखालच्या जमिनीला स्पर्श करणारीं नाहीत. हें त्याच्या वर्तनावरून कुणीहि जाणल असतं. केवळ वडिलकीच्या योग्यतेमुळें अशा तत्त्ववेत्त्याला राजसिंहासनावर नेऊन बसवलं, तरी रडतराऊताला घोड्यावर चढवण्यानं जे घडेल तेंच त्याचं होणार, हें बिंबिसारानं ताडलं होतं. म्हणून तर अजातशत्रुला युवराजपद बहाल करण्यांत आल होत.

समर्थ सत्ताधारी म्हणून अजातशत्रूपेक्षा वरचढ ठरू शकेल, अशा तोडीचा अन्य पुत्र आपल्याला नाहीं हें अनेक परीक्षांवरून बिंबिसारला कळून चुकल होत अभयकुमार, मेघकुमार, हल्ल, वेल्ल– छे,! एकालाहि अजातशत्रूची सर नव्हती! प्रत्येकजण कुठें ना कुठें थिटा भासत होता.

संस्कृत तत्त्वज्ञानाच अवलोकन करून प्रकांड पांडित्य संपादन केलेला अभयकुमार अखेर जगतातील नीरसता जाणून बौद्ध मतवादाकडे झुकला होता. त्यांतून आपल्या पुण्यशील मातेवर ओढवलेला तो अपघाती अतत्यानं तर त्याच्या कोमल काळजाच पाणी पाणी करून टाकल. अशाश्वताकडे पाठ फिरवून शाश्वताचा शोध घेण्यासाठी भिक्षु बनण्याचा अट्टाहास त्यान स्वीकारला. आणि पित्याच्या हस्तें स्वतःच्या जीवनाच उदक भगवान् बुद्धदेवाच्या पायावर सोडण्यास त्यान भाग पाडल.

महावीराच्या शिकवणीनं भारावलेल्या मेघकुमाराच अंतःकरण शिरीषकुसुमाहून कोमल होत. राजपुत्राच्या शिक्षणांतला एक भाग म्हणून त्यान धनुष्य उचलल, प्रत्यंचा जोडली; पण त्यान लक्ष कधीच साधल नाहीं. हिंस्त्र श्वापदांचे बछडे बघितलें की त्याचं लोण्याहून मऊ असणार मन वात्सल्यान तेव्हांच विरघळून जात असे.

लोकमातेच्या निर्मळ प्रवाहांत साधूंनीं आणि चोरानीं दोघांनींहि आपली तृषा शांतवावी. ती विशालता मेघकुमारच्या मूठभर हृदयांत सामावलेली होती. दुष्कृत्य करायला तो कधींच धजावला नसता. राजकारणाच्या बिकट गदारोळांत त्याचा अगदीं चोळामोळा झाला असता.

या उलट अजातशत्रूची तडफ होती. बाणासारखी वेगवान् अन् भेदक. समर्थ आणि निर्भय. सुनंदाचं अस्तित्व या जगातून पुसून टाकण्यात त्यानं प्रगट केलेलं कौशल्य तर त्याच्या सर्व गुणांवर कळस चढविणार होतं! आपल्या पश्चात् राज्याची चिंता करण्याचं तिळमात्र कारण नाही, असा विश्वास त्यामुळेंच बिंबिसारला वाटत होता. त्याच्या युवराजपदांत ती आडवी येणार, अस खोटं सागून वस्तुतः आपल्या मार्गांत सलणारा कांटा आपण निखंदून टाकला, हें एका परीनं बरं झालं, अस बिंबिसारला वाटत होतं. पापाला कोंब फुटून आपली दुष्कीर्ति होण्यापूर्वीच पाप बीजरूपांत असतानाच–ठेचल गेलं होत. त्या तरुण सामंताकडे लक्ष ठेवत आपल्या मधुर स्वप्नांचा उपभोग घेत असतानाच तिच्यासह तिची स्वप्नं जळून भस्मसात् झाली ! आणि अजातनं ही कामगिरी या कानाचं त्या कानाला कळणार नाही, इतक्या गुप्ततेनं अन् कुशलतेनं शेवटास नेली. तेव्हांपासून बिंबिसारचा त्याच्यावरचा विश्वास शतपटीन वाढला होता.

अभयच्या इच्छेनुसार बिंबिसार त्याला भगवान् बुद्धदेवाकडे घेऊन गेला. भगवानाची प्रकृति ठीक नव्हती. योग्य वेळीं दर्शन झालं आणि आशीर्वाद मिळाले, यातच त्याला धन्यता वाटत होती. भगवानाच्या सेवाशुश्रुसेसाठी राजवैद्य जीवकाला मार्गे ठेवून, बिंबिसार आतां राजगृहाकडे परत येत होते,

मार्गांत गंगातीरावर कसलीशी गडबड दिसली महाराजांची स्वारी स्वतः त्या ठिकाणीं उपस्थित झाली. तीरावरच्या नावाड्यांनी अभिवादनं केली. महाराजानीं त्याचा सहर्ष स्वीकार केला.

कांठावर पांच-पन्नास बौद्धभिक्षू उभे होते. त्यानीं तक्रार केली, "हें नावाडी आम्हाला पैलतीरावर न्यायला तयार नाहीत !" स्वाभाविकच महाराजांनी कारण विचारल. ते म्हणाले,

"हे बौद्ध आहेत म्हणून अडवून धरतां आहात ?"

"बिलकूल नाही." नावाड्याच्या प्रमुखानं सागितल.

"मग आडकाठी कोणती ?"

"आमच्याजवळ द्रव्य नाहीं." भिक्षूचा प्रमुख उत्तरला.

"भिक्षूजवळ धन असणार कुठल ?" महाराजानीं हंसत विचारल.

"त्याला आमचा काय उपाय ?" एक नावाडी म्हणाला,

"या जगांत काही गोष्टी परोपकार म्हणून कराव्यात आणि पुण्य गांठीं बाधावं," बिंबिसारनं सदुपदेश केला.

"ठीक आहे. पोट भागलं की पुण्याची सोय करतां येते." अनपेक्षितपणें उत्तर मिळालं.

"उदरभरणाची चिंता करावी, इतकी दैनावस्था आहे तुमची ?"

"नदी पार करणारे उतारू न भेटले तर दुसरं काय होईल ? तशी अवस्था आहे म्हणूनच ना या महंतानाहि आम्ही द्रव्यासाठी अडवून धरल ?" नावाड्यांचा प्रमुख प्रश्न विचारत होता. तो पुढें म्हणाला–

"महाराज, गरीबाना परोकाराचे धडे देतां येतात. स्वतःच्या पायांखालीं काय जळत कधीं बघितलत ?"

"म्हणजे, तुझ्या बोलण्याचा काय अर्थ समजावा मी ?"

"जिथं युवराजांना महाराज होण्याची उतावीळी झालेली असतें त्या राज्यांत ज्यानं त्यानं स्वतःचा स्वार्थ साधला तर त्यात वावगं काय ?" नावाड्यानं सरळच प्रश्न फेकला.

पण बिंबिसारला यांतली काहीच कल्पना नव्हती. न राहवून त्यानं विचारलं. "सांगा तरी काय घडलं तें."

आणि काय घडलं सागायचीहि आवश्यकता उरली नाहीं. पलिकडच्या तीन नावा या तीरावर येऊन पोंचल्या. त्यांत महाराजांचे सैनिक होतें. पंतप्रधान होते. आणि साखळदंडात जखडलेले दोन कैदी होते.

महाराजांनी त्यांच्याकडे निरखून बघितलं आणि विचारल, "अजातशत्रू, तु ? आणि देवदत्ता, तू ? म्हणजे ?"

या सगळ्यामार्गे काय भानगड असावी, याचा निश्चित उलगडा महाराजांना झाला नाहीं. नावाड्यांच्या प्रमुखानं सांगितलेलं कारण त्यांच्या मनाला पटत नव्हतं. त्याहिपेक्षां त्याना भय वाटत होत, तें त्याच्याच अंतःकरणातल्या पापाच. सुनंदेच्या मरणासंबंधीचा तर कांहीं सुगावा राज्यांत लागलेला नाही ? मग नेमके हेच दोघे कसे कैद झाले ? महाराजानीं प्रधानजीना विचारलं, "काय प्रकार आहे हा ?"

"महाराजांचा जयजयकार असो ! सागायला अतिशय खेद होतो. पण महाराजांची तशी आज्ञा झाल्यामुळें सांगतो. आपण राजधानीतून आठ-दहा दिवसांकरतां बाहेर गेला आहांत, या संधीचा फायदा घेऊन आपल्याला अधिकारच्युत करण्याचा कट या दोघांनी रचला होता. युवराजपदावर आपण ज्यांची विश्वासान नियुक्ति केली तेच आपले सुपुत्र या कारस्थानाचे अध्वर्यु होते. आणि त्याचे जिवश्चकंठश्च मित्र त्यांचे साथीदार–देवदत्त." प्रधानानं खुलासा केला.

अजातशत्रु आणि देवदत्त दोघेहि खालीं माना घालून उभे होते.

सुनंदेच्या मृत्यूसबंधांत याना पकडण्यांत आलेल नाहीं, हें कळल्यावर महाराजांनाहि हायसं वाटल.

मात्र अजातशत्रूच्या बंडाचा हा दुसरा धक्का जबरदस्त होता. अगदींच अकल्पित. ज्याच्यावर विश्वासानं पूर्ण विसबून राहण्याचा त्यांचा मनोदय होता. तीच व्यक्ति त्यांना राजसिंहानावरून खाली खेंचण्याचा डाव खेळेल ही कल्पना स्वप्नातहि त्याच्या मनाला शिवलेली नव्हती. त्या अचानक धक्क्यान मनातून ते हबकले. पण सारवासारव करून हें सारं निभवायला हव होतं. एका सुपुत्राला भगवान् बुद्धांच्या पायीं अर्पण केलं. बंडाचा झेंडा उभारला म्हणून दुसऱ्या कर्तबगार पुत्राला स्वर्लोकीं धाडायचं ? मग आपल्या पश्चात् या राज्याचे स्वामी काय कोल्हाकुत्री होणार ?

दूरदर्शीपणानं हें प्रकरण हाताळायला हव होतं म्हणून आवाज चढवून महाराजानी पंतप्रधानानाच खडसावल, "प्रधानजी, बंडखोर युवराजांना राजधानीला कारागृहातच डाबून ठेवायचं सोडून त्यांची धिंड अशा अवस्थेंत इथपर्यंत काढलीत ?"

"महाराजांचो गैरसमज झालेला दिसतो." विनम्रपणान प्रधानजी उत्तरले, "महाराज, या कारस्थानाची प्रत्यक्ष कार्यवाही होण्यापूर्वी याना कैद केलेलं आहे. कटाची कुणकुण लागतांच मी विश्वासाचीं चार माणसं बरोबर घेऊन काल रात्रीच ही सारी कारवाई उरकली. राजधानीत या गोष्टीचा कुणाला पत्ताहि लागणार नाहीं अशीं पूर्ण दक्षता घेतलेली आहे.

"मग नावाड्यांना या गोष्टीची माहिती कशी कळली ?"

प्रधानाजवळ.याच उत्तर नव्हतं. नावाड्यांचा प्रमुख कांहीं बोलणार होता; पण तेवढ्यांत त्यानं अजातशत्रूकडे बघितलं. त्या स्थितीतहि अजातच्या नजरेन त्याला असं कांहीं दटावलं की, तो बिचारा आवाक् झाला. उघडलेल्या ओठांतून आवाज उमटायच्या आंतच ओठ मिटले. त्यामुळें कोणालाच कांही संशय आला नाही.

उत्तर मिळालं नाही. तेव्हां महाराज *अस्वस्थ* झाले. त्यानी पुन्हा विचारलं, "या दोघाना पकडून माझ्यासमोर आणण्याच प्रयोजन काय ?"

"मींच तशी विनती केली, महाराज" अजातशत्रु खालच्या आवाजांत बोलला.

"कारण ?"

"आपल्या अनुपस्थितींत हे प्रधानजी आमच काय वाटेल तें करून टाकतील, असं भय वाटलं मला."

"तें कशावरून ?"

"कारण आम्हांला पकडण्यांत आलेल आहे तेंच मुळी अन्यायान. आमच्या हातून काही घडण्यापूर्वीच, आम्हीं अमुक अमुक करणार आहोंत या स्वतःच्या कल्पनेनं आम्हालां कैदी करण, कितपत न्यायाच आहे ?"

"मग काय बंड झाल्यावर तुम्हांला धरायचं ?" संतापून मन्त्र्यांनीं विचारलं, "महाराज, गुप्तचरांकडून हाती आलेल्या माहितीच्या आधारावरच खऱ्याखोटयाची नीट पारख करून नतर हा निर्णय आम्हीं घेतलेला आहे युवराजांशी आमच वैर कधीच नव्हतं आणि नाहीहि. पण राजधानीत महाराज नसताना त्यांच्या पश्चात् असं काही घडाव हें मला खपणार नाही. आपण मोठ्या विश्वासान माझ्यावर सारी जबाबदारी सोपवून गेला होताल. तेव्हां ती नीटपणानं पार पाडण हें माझ कर्तव्य होतं, अस मीं मानतो. केवळ कर्तव्यभावनेनच निष्ठुर बनून मी युवराजांना बदी बनवलं आहे. यावर कोणता न्याय द्यायचा हें सर्वस्वीं महाराजांच्या मनावर अवलवून आहे."

मन्त्र्यांनाहि दुखवायच नाही आणि युवराजानाहि आपलसं करायच, असे एका दगडात दोन पक्षी मारायचे कसे हा महाराजापुढें पेंच होता. तारेवरची कसरत जमवायची होती. पण उभं आयुष्य राजकारणाच्या रणधुमाळीत घालवलेल्या बिंबिसाराला ती गोष्ट तितकीशी जड नव्हती.

त्यानी मंत्र्यांना म्हटलं, "मुख्यमत्री, आपल्यावर मीं जो विश्वास टाकला होता, तो यथार्थ होता हें आपण कृतीनं सिद्ध करून दाखवलं आहे. असा मुख्यमंत्री मला लाभला, हें मी माझ परमभाग्य समजतों. इतकी चोख शासनव्यवस्था असल्यावर राजसिंहासनावर कोणी कां असेना त्याला चिंता करायच काहीं कारणच उरणार नाहीं. मला सगळ्यात जर कोणत्या गोष्टीचा आनद झाला असेल तर तो याचा कीं, प्रत्यक्ष युवराजाच पाऊल वांकड पडतांच आपण त्याला उचित शासन दिलत, त्याच्याविरुद्ध कृति करण्यात कोणत्याहि प्रकारची कुचराई केली नाहीत, असल्या कर्तव्यदक्ष प्रधानांचा आम्हांला नेहमींच अभिमान वाटेल."

मग अजातशत्रूकडे बघत बिंबिसारनं सांगितलं, "मुक्त करा त्याना"

अजातशत्रु, देवदत्त आणि प्रधान सारेच या आज्ञेनं आश्चर्यचकित झाले. युवराज आणि देवदत्त यांना जखडून टाकणाऱ्या बेड्या सोडविण्यात आल्या. साखळदंडातून सुटका केली गेली. अजातशत्रूच्या पाठीवरून हात फिरवत महाराज म्हणाले,

'युवराज, राज्य उलथण्याच्या कटाचं नाटक आपण फार सुरेख पार पाडलं, म्हणायचं ! मी सागत नव्हतो कीं, राज्याचा बदोबस्त असा पक्का आहे कीं, इथं प्रत्यक्ष युवराजानाहि जरा इकडचं तिकडं करणं साधायचं नाही ? आता तरी पटलं ?" आणि मंत्र्यांकडे बघत हसत हसत त्यानं सांगितल. "प्रधानजी, हा सारा बनाव मीच रचलेला होता ! या दोघांना राज्य उलथून टाकण्याचा खोटा कट करण्याचा आदेश मीच दिला होता !"

बिंबिसार आपल हें वाक्य उच्चारताना अजातशत्रूकडे बघत होते. या सगळ्या प्रकारान तो गोंधळला होता. अजात आणि देवदत्त याची दृष्टादृष्ट झाली. यातल्या कशाचाच पत्ता आपल्याला लागत नाहीं याची कबुली त्या दोघानीहि त्या नजरभेटींत देऊन टाकली.

आयुष्यातल्या उरलेल्या थोड्याच घटकांच गणित इतका वेळ ते जुळवीत होते. परतु त्याना जिवदान मिळालं. सिंहासन उलथण्याच्या प्रयत्नाबद्दल देहान्त प्रायश्चित्त मिळणार, ही त्याची कल्पना ! निव्वळ संशयावरून स्वत.च्या परमप्रिय पत्नीला जाळून टाकण्याची शिक्षा ठोठावणारा हा सम्राट, राजद्रोहावरून आपले राईराईएवढे तुकडे करायला मागें पुढें बघणार नाही, ही त्याची समजूत, पण या साऱ्या प्रकरणाला एक अगदी विचित्र वळण मिळालं. मृत्यूच्या जबड्यात शिरून त्याच्या दाढा मोजून सुखरूप बाहेर येण्यासारखं हें भयकर दिव्य ठरल ! वज्राघाताची अपेक्षा करावी आणि पुष्पवर्षाव व्हावा, त्यातलाच प्रकार !

मुक्त झालेला अजात आणि देवदत्त पुढें झाले. डोळ्यांतून पाणी वहात होत. त्यांनी बिंबिसाराचे पाय धरले. खादे धरून त्यानं त्या दोघाना वर उभं केल. त्या दोघांजवळ बोलायला शब्द नव्हते.

अखेर महाराज बिंबिसार म्हणाले, "प्रधानजी, आमच्या बरोबरच्या सर्व लोकासह आपण राजधानीकडे परत जा, आम्ही आणि युवराज आजचा दिवस गंगाकाठी घालवणार आहोत. दोघच. उद्या सकाळीं आम्ही राजगृही परत येऊ"

नावाड्याच्या नावा सज्ज झाल्या. भिक्षूसह सैनिक नावेत बसले. महाराजाचा जयजयकार करीत नावा भागीरथी पार करीत होत्या. बिंबिसार-अजातशत्रु ही पितापुत्रांची जोडी त्या धार कापणाऱ्या नावाकडे बघत होती. नावाड्याची वल्ही सपासप पाणी तोडीत आंत-बाहेर करीत नावेला पुढें घेऊन जात होती. नावा पलिकडच्या तीरावर पोचल्या. महाराजाच्या नावान झालेले जयघोष नदीच्या प्रवाहावरून लोळत अलिकडच्या तीरावर आले. अनेक हात उभारले गेले.—हलवले गेले. समोरच्या गर्द झाडींत सारी मंडळी गुप्त झाली. तेव्हां पुतळ्यासारख्या स्तब्ध असलेल्या अजाताला महाराजानी हस्तस्पर्शानं ताळ्यावर आणलं आणि डोळ्यानं खुणावून स्वतःबरोबर चलायला सांगितल.

"युवराज, हा कट खरा होता ?" जातां जाता महाराजानीं विचारलं

"हूं" आवाज उमटतो ना उमटतो इतक्या हलक्या आवाजातला होकार.

"कां ? कशासाठी मावळत्याला वेळेपूर्वीच क्षितिजावर लोटण्याचा हा उपद्व्याप कशाकरिता ?"

या प्रश्नाला उत्तर नव्हतं अजात गप्प होता बिंबिसारच्या डोळ्यांत पाणी तरारलं. भरल्या आवाजांत तो सांगू लागला, "अधिकार असूनहि राजपद मला सहजासहजीं मिळू शकलं नाहीं...वडिलांची इच्छा

असूनसुद्धां अनेक विघ्नासूर मधें उपस्थित झाले...पितामह भीष्माचार्यांप्रमणें आयुष्यभर राजसन्यास भोगायचं ललाटी कोरल जाणार होतं... पण अनेक दिव्य करावी लागलीं... परीक्षा द्याव्या लागल्या तेंव्हा हा किरीट शिरावर आला...पण राजपद मिळण्यासाठी मी कधीच उतावीळ झालों नाही. आपल्याकडे स्वतःच्या पायानीं राजवैभव चालून येत असताना त्याला समोर जाण्यासाठीं चार पावलं पुढं टाकायचे प्रयास कशासाठी घ्यायचे ?"

बिंबिसार थांबला. वर चढलेल्या सूर्याच्या किरणांनी आतां तापायला आरंभ केला होता. समोरच्या विशाल वटवृक्षाकडे बोट दाखवून महाराजानी सुचवलं ' चल, तिथ जाऊन जरा विश्राती घेऊं. राजप्रसादाच्या भिंतींनाहि कान असतात. इथं आपण दोघेच मोकळेंपणानं बोलून घेऊं."

ते दोघे तिथं गेले. महाराज आडवे झाले. अजात शेजारीच बसून होता. महाराजांच्या डोळ्यासमोर तरळत होते त्याच्या परीक्षेचे प्रसंग...शब्द त्यांना आकार द्यायचे प्रयत्न करीत होते. अजात शांतपणे श्रवणभक्ति करीत होता.

महाराजानी त्याला विचारलं, "अजात, राजप्रासाद पेटू लागला तर त्यातल्या कोणत्या वस्तु वाचविण्याची तू शिकस्त करशील ?"

"राजमुकुट, राजदंड आणि राजसिंहासन !" अजातनं लगोलग उत्तर दिलं.

"शाब्बास युवराज !" आपण पूर्वी दिलेल्या उत्तराची आठवण वण होऊन बिंबिसार म्हणाला ' आज उपश्रेणिक महाराज जिवत असते तर नातवाचें हें उत्तर ऐकून मुलगा बरोबर बापाच्या वळणावर गेला म्हणायचा मोह त्यांना झाला असता !"

उपश्रेणिकानं घेतलेल्या दुसऱ्या परीक्षेचीहि बिंबिसारला आठवण झाली.

सारे राजपुत्र जमा झाले होते. भोजनासाठीं सिद्धता होती. सर्वांची पानं माडलीं गेली. नुसत्या वासानहि भूक मरून जावी अशा पक्वान्नांवर सगळ्याचे हात जोरात चालू लागले. इतक्यात चारी बाजूनीं भोः भोः भुंकत कुत्री जमा झाली. त्याचे भयानक आवाज आणि अक्राळविक्राळ जबडे बघून सारे राजपुत्र भयभीत होऊन पळत सुटले. बिंबिसार मात्र तिथच थांबला. उठून गेलेल्या राजपुत्राचीं पानं त्यानं त्या भुकेनं वखवखलेल्या प्राण्यापुढें फेकलीं. ते प्राणी त्या ताटांवर तुटून पडले. बिंबिसार आपलं भोजन आरामांत उरकत राहिला. त्याच्या युक्तीवर सतुष्ट झालेले उपश्रेणिक कौतुकान म्हणाले "बाळ श्रेणिका, याहि परीक्षेंत तूंच जिंकलंस !"

एक...दोन...तीन...अशा कितीतरी परीक्षा दिल्या. तेव्हां राजदंड बिंबिसारच्या हाती आला, त्या मानान विचार करतां अजातशत्रूला स्पर्धा जवळ जवळ नव्हतीच. फार मोठ्या कसोटचांनाहि त्याला उतरावं लागलं नाहीं. बिंबिसारला नेमकी हीच गोष्ट खुपत होती.

"अजात, जें पिकल्यावर तुझ्याच हातीं पडणार आहे, तें फळ दगड मारून पाडण्याचा प्रयत्न कशासाठी केलास ? तुझ्या दगडाचा मार बसलेल, फुटलेल फळ हाती लागाव, अशी तुझी इच्छा होती ? दिवस बुडाल्यावर अंधाराचं राज्य सुरू व्हाव किंवा रात्र निमूटपणें निघून जात असतांना प्रकाशानं पुढच पाऊल टाकावं, इतक्या सहजगत्या जी गोष्ट घडावी अशी माझी अपेक्षा, त्यासाठीं हा आततायीपणाचा मार्ग तूं कां स्वीकारलास ?"



—शरद अभ्यंकर

**"यावर्षी आपण प्रामाणिकपणें धंदा करून पाहूं—"**

किती तऱ्हांनी आणि किती वेळा हा प्रश्न विचारला तरी अजातशत्रूजवळ त्याचं काय उत्तर होतं ?

अखेर अजातशत्रूनंच विचारलं, "महाराज, तुम्हाला सिंहासनावरून खेंचण्याचं साहस मीं केल. मी अयशस्वी झालों. पापकर्म हातून घडण्यापूर्वीच तुमच्या हातीं सांपडलों. बदी म्हणून. राजद्रोही, तुमचा घातकी म्हणून. तरीहि तुम्ही मला मुक्त कां केलंत ? अपराधाचं प्रायश्चित्त न देताच, उलट मला पाठीशी घालण्याच्या हा विचित्र पविश्रा कां घेतलात ? निखाऱ्यावर पाऊल ठेवलं कीं पोळायचच असा निसर्गनियम असतो; मग राज्य उलथूं पहाणारा शासनाविना मुक्त का व्हावा ?"

बिंबिसार किंचित् हसला. अजातशत्रूच्या मुद्रेकडे बघत बसला. आणि शातपणें उत्तरला, "अजात, आज नाही तुझ्या प्रश्नाच उत्तर देत. तूहि कधी तरी कुणाचा पिता होणार आहेस. त्यावेळीं तुला हें कोड आपोआप उलगडेल. मी कितीहि समजावून दिल तरी प्रत्यक्ष अनुभवाचून तुला तें आज नीट समजणार नाही !"

हें बोलत असताना बिंबिसारला आठवत होता अजातशत्रूच्या बारशाचा दिवस.

त्या इवल्याशा लालबुद गोंडस बाळाला मांडीवर घेऊन सुनदा बसली होती तिचा मान होता तो. मगधाची महाराणी होती ती. महाराज, महाराणी आणि तें नवजात बालक. अगदीं गुप्त ठिकाणीं बसत. मग सायनाचार्य भविष्य वर्तवत. त्या आठ कानांखेरीज नवव्या कानी तें पडत नसे. त्यांतले दोन कान असूननसून सारखेच असत. सायनाचार्यांनीं पत्रिका तयार केली आणि भविष्य सागितलें. बिंबिसारच्या मनात आल तें भविष्य अजातशत्रूला आतां सागून टाकावं. पण तो मोह त्यानं आवरला,

तो धिट्कला गुटगुटीत अजात बिंबिसारच्या डोळ्यांसमोर उभा

राहिला. वळलेल्या मुठी न उघडणारा, किलकिल्या डोळ्यांनीं कधीं-मधी या नव्या जगातल्या नवख्या वस्तूंकडे अगदीं शून्य दृष्टीनं बघणारा. त्याचे हातपाय कां हलत, केव्हां हलत, चेहऱ्यावर लाल रेषांनीं आखलेले आपले ओठ तो कधी उघडी, आणि त्या चिमुकल्या 'आ' कारान कसला घांस गिळायला बघे, तो रडायचा कां अन् हंसायचा कशासाठी, कांहीं समजत नसे, कळत नसे. तरीहि तें सारं कौतुकाचं वाटे, गोड वाटे. चुकून उघडणाऱ्या त्या अति नाजूक चेहऱ्यावरहि एक अपूर्व तेज होतं. कां कोण जाणें, पण पहिल्या दोन मुलांपेक्षा बिंबिसारला हा मुलगा एकदम पसत पडला होता. या लेकरावर त्यान जन्मापासून अतोनात प्रेम केल.

सायनाचार्यांनी सुचवल, "याच नांव 'कुणीक' ठेवा."

सायनाचार्यांचा अभिप्राय मानायलाच हवा होता. परंतु बिंबिसारनं विनती केली होती, "*सायनाचार्य या बाळाच नांव 'कुणीक'* ठेवायला माझा कांहीं आक्षेप नाहीं. पण माझा हा पुत्र इतका सुरेख आहे, मला तो इतका आवडला आहे की, या जगात त्याला कोणीच शत्रु नसावा, असं मला वाटतं. म्हणून याचं नांव 'अजातशत्रु' ठेवलं तर नाही कां चालणार?

सायनाचार्यांनी समति दिली. बिंबिसारचं समाधान झाल. तें बारा दिवसांचं लहान मूल आज वाढतां वाढतां केवढं मोठं झालं? प्रत्यक्ष राजाला त्याच्या सिंहासनावरून खाली खेचण्याची ईर्षा बाळगू लागलं!

खरोखरच आपल्या जिवाचा तुकडा समजून बिंबिसारनं अजातशत्रूला जपलं होतं. त्यानं या मुलाकडून फार अपेक्षा बाळगल्या होत्या. त्याच्या वैभवाचीं, त्याच्या साम्राज्यविस्ताराचीं त्यानं स्वतःच्या उराशीं बाळगली नसतील अशी लोभस बहुरंगी चित्रं बिंबिसारनं स्वतःच्या मनःपटलावर रेखाटलीं होतीं. त्याच मुलानं आज आपल्याला सिंहासनावरून ओढण्याचं षड्यंत्र रचलं!

पण मोठ्या मनानं, उदार हृदयान बिंबिसारनं त्याला क्षमा केली. आणि त्या क्षमेच्या भाराखालीं अजातशत्रूचा जीव दबकून गेला. त्याला वाटत होतं, अपराधाबद्दल कांहींतरी शासन व्हायलाच पाहिजे होतं. पण शासन करणं त्याच्या हातीं नव्हतं!

त्या रानांत कुठेंतरी घोड्यांच्या टापांचा आवाज आला. दूरवरून येणारा तो आवाज मोठा मोठा होत होता. आवाज जवळ येत चालला. आणि पाहतां पाहतां समोरच घोडेस्वार आला. त्याच्या मागूनहि अनेक घोडेस्वार येत होते. घोडेस्वार समोरच आला. तो घोडा त्याला जुमानत नव्हता. विनाकारणच मागच्या पायावर उभा राहून पाठीवर बसलेल्याला खाली पाडू बघत होता. गरगर फिरत होता. कधी पुढचे पाय ताठ करून मागचे पाय उंच करीत होता. पाठीमागचे घोडेस्वार हंसत खिदळत होते. त्या बिचाऱ्या घोडेस्वाराची दुर्दशा बघून त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. जंगलांत वस्ती करणाऱ्या कोणा भिल्ल टोळीपैकींच असावेत ते.

महाराज बिंबिसार आणि अजातशत्रू या दोघांना पाहून ते थबकले, घोड्यांवरून खालीं उतरले आणि अभिवादन करून त्यांच्याभोंवतीं कडे करून उभे राहिले. त्या वेड्या घोड्याचा थयथयाट मात्र थांबत नव्हता. वरचा माणूस आपली पकड सोडायला तयार नव्हता. त्याला जीवानिशीं मरायच नव्हतं. पण अखेर तो फसला. त्याच्या हाताची पकड ढिली झाली. तो धाड्दिशी जमिनीवर कोसळला. घोडा त्याचीच वाट बघत होता. तो माणूस खाली पडल्याबरोबर घोडा त्याच्यावर चालून आला आणि आपल्या टापांखालीं त्या माणसाला तुडवायला त्यानं सुरुवात केली.

अजातशत्रूला ते पहावेना. तो वेगान त्या घोड्याकडे धावला आणि त्यानं त्या घोड्याचा लगाम पकडला. बघतां बघता सफाईनं घोड्यावर उडी घेतली आणि मांडीची पकड आवळली.

सारे भिल्ल "नको नको" ओरडत पुढें धावले "धोकेबाज जनावर आहे, त्याच्या नादी लागू नका. जीव घेतल्याशिवाय सोडणार नाही तें" असें ओरडू लागले पण व्यर्थ! अजातशत्रून त्याच्या कानशिलावर असा जबरदस्त ठोसा लगावला की तें ऐटबाज जनावरहि थरकांपल.

पण क्षणभरच. त्यानं पुन्हा आपला खोडसाळपणा चालू केला. मागचे पाय मागें फेकले; पुढचे पाय ताठ केले. त्याच्या हातचा डाव निरुपयोगी ठरला- मग मागच्या पायावर तो ताठ उभारला. तरीहि अजातची पकड निसटली नाही. अजातनं लगाम सैल सोडला. जनावर तिथल्या तिथं गिरक्या घेऊं लागल. त्यानं लगाम खेंचला तसं तें सुसाट दौडत निघाल.

पहाणारांचे जीव थरारले. बघतां बघतां घोडा पार दिसेनासा झाला.

त्यांतल्या एकानं महाराजाना सागितलं, "महाराज, युवराज परत यायची आशा सोडून द्या आतां!"

"का?" एकदम भयचकित होऊन बिंबिसारनं विचारलं

त्या भिल्लान समजावून सागितल—

तो घोडा मुद्दाम शिकवून ठेवलेला होता. जनावर देखणं आणि उमदं होतं., चालीलाहि तेज होत. पण वर्तनानं बेताल होतं. त्याला सगळ्या उलट्या खोडी होत्या. लगाम खेंचला कीं तें भरधांव दौडे. आणि ढिला सोडला कीं, वरच्या स्वाराला भोंवळ येईपर्यंत गरगरा फिरवी. पाठीवर कुणाला बसूच द्यायचं नाहीं, असा त्याचा पण होता. आणि एनकेन प्रकारेण तो वरच्या स्वाराला खालीं फेकून देई. कोसळलेल्या स्वाराला जबरदस्त मार लागे. तेवढ्यानंहि त्या जनावराचं समाधान होत नसे. पडलेल्या माणसाला स्वतःच्या पायाखाली तुडवलं —चेचून ठार केल की त्या दुष्ट जनावराच समाधान होत असे.

टोळीतल्या कुणीं दुर्वर्तन केल की त्याला प्रायश्चित देण्यासाठीं त्या जनावराला मुद्दाम तस शिकवून तयार केलेलं होतं,

आजपर्यंत त्या क्रूर जनावरानं एकशें तेरा जणांचे बळी घेतलेले होते. आणि एकशे चौदावा स्वार झाला होता स्वतः युवराज अजातशत्रु! जनावराची माहिती नसताना–अगदी–अजाणतां—

अजातशत्रूसह तें तिखट जनावर किर्रर रानात घुसल होत.

राजद्रोहाच्या प्रायश्चितांतून मुक्त केलेला अजात त्याच्याबरोबर निघून गेला होता......

—आणि प्रत्यक्ष मृत्यून लाडक्या युवराजाला डोळ्यांदेखत खेंचून नेलं तरी मगधाचा सम्राट तिकडे नुसता पहात उभा होता!

त्याला गप्प राहवेना. एका भिल्लाचा घोडा त्यानंहि मागून घेतला टाच मारली आणि ज्या दिशेनं अजात गेला, त्याच्याच मागोमाग तीहि त्या गर्द झाडोऱ्यांत घुसला.

●●●

: ४ :

संध्याकाळ केव्हाच टळून गेली होती. आभाळांतला चंद्र सरसर वर चढत आतां निंबोण्याच्या पाठी सोडून केव्हांच त्याच्या माथ्यावर लटकू लागला होता. दिवसबुडीला उमलू लागलेल्या चांदण्या आता चांगल्या फुलल्या होत्या. साऱ्या आभाळभर त्यांची पखरण झाली होती. वायु मंद मंद वहात होता. त्याच्यावर लोळत येत होता निशिगंधाचा आणि रातराणीचा सुगंध.

प्रासादाजवळच्या उपवनात महाराज बिंबिसार येऊन बसले. एकटेच. रात्री अन्न उष्टावलं न उष्टावलं. फारशी भूक नसे. दोन घास पोटात कोंबायचे. अन् मचकावर पडून निद्रादेवीची आराधना करायची. होईल प्रसन्न तेव्हा होईल. वयोमानानुसार स्वत:च्या स्त्रीलाहि आपला तितकासा लोभ उरत नाही; तिथं झोपेनंहि आपला तिटकारा केला तर तिला बापडीला दोष कां द्यायचा? रोजचा हा परिपाठ झाला होता. शयनागारात तळमळत पडायचं. डोळ्याला डोळा लागेपर्यंत जुन्या आठवणी उगाळत बसायच्या. थेट बालपणापासून काल पर्यंतच्या. आता अगदी अंथरुणावर येऊन पडेपर्यंतच्या. काही गोड, कांहीं रम्य काही कटु काही दु:खद कांहीं बोचऱ्या, कांहीं खेळकर, कोणत्या वेळी काय आठवेल, सांगतां येत नाही. पहिला पाऊस पडल्यावर जमिनीतून पंख हलवीत कीटक उठावेत आणि ओल्या वातावरणांत असंख्यानी उडू लागावेत; एखा चोंचीच्या चिमणीनं भुर्रर्र भुर्रर्र करीत किती पकडावेत, किती पचवावेत, तशी बिंबिसारची अवस्था व्हायची. त्या आठवणीशी खेळतां खेळताच झोप येऊन पापण्यांची दारं कधी लोटून घ्यायची पत्ता लागायचा नाही!

या आठवणीतहि सुनंदेचा वांटा मोठा असायचा. कितीतरी वर्षांची तिची साथ होती. सुखाची आणि दु:खाची पण जास्त सुखाचीच. तिच्या सहवासात रंगलेल्या रात्रींना तुलना नव्हती. त्या रात्रीचा आरंभ कधी होई आणि ती संपे कधी, समजत नसे. एखादं रंगीबेरंगी, धुंदफुंद झिरमिरीत स्वप्न!

पण अखेर तिचाहि पाय घसरला. तिच्या स्वप्नी नसेल असं मरण तिला कवटाळायला लागलं, तिची कुसुम कोमल देहलता दाहक अग्नीत होरपळून भस्मसात् झाली. इलाज नव्हता. चारित्र्याचे धिंडवडे निघण्यापूर्वीच चरित्राची समाप्ति झाली, तें ठीक झालं

बिंबिसारला आज तिची आठवण तीव्रतेनं होऊं लागली. ती गेल्यापासून तो या उपवनात कधी आला नव्हता. सुनंदेविना सुनं सुनं वाटणाऱ्या या उद्यानांत जावं अशी इच्छाहि त्याला कधीं झाली नव्हती. पण आज राहवलं नाही. कितीतरी दिवसानी तो तिथं आला; आणि ज्या वृक्षाखाली बसून तो आणि सुनंदा प्रहरोप्रहर गुजगोष्टी करीत, तिथच येऊन विसावला.

वृक्ष तोच; तेंच उपवन. तशीच चांदणी रात्र, तसाच मंद मंद वाहणारा वारा–निशिगंधाचा आणि रातराणीचा तोच प्रसन्न सुवास– पण...पण...

सुनंदा नाही!

त्या वृक्षाखालून बिंबिसारनं प्रासादाकडे बघितलें. उघडीं गवाक्षं दिव्याच्या सध प्रकाशान उजळलेली होती. अधूनमधून काळ्या छाया त्यांतून फिरत जात.

काहीं उजळलेले, काही अंधारे. पलिकडे निरनिराळ्या राण्यांचे महाल होते.

तो कोसलदेवीचा महाल. त्या पलिकडे चेलना. क्षेमाला शृंगाराची फार हौस. अंबापल्लीचा महाल प्रकाशापेक्षांहि उदानं भरलेला असेल. पण यातल्या एकीलाहि सुनंदेची सर नाहीं!

सुनंदेचा महाल जमिनीला मिळाला. आगीनं तिच्यासकट तिच्या महालाची राखरांगोळी करून टाकली. पण त्या आगीतून निर्माण झालं एक दिव्य सुवर्ण-पुष्प. "सुनंदा–सुवर्ण–स्मृति मंदिर."

त्या मंदिराच्या सुवर्ण कळसावर चांदण्याची धार पडत होती आणि ते लखलखत होतें दिमाखान. सम्राटाचं त्याच्या लाडक्या सम्राज्ञीवरचं प्रेम साकार झालं होतं त्या स्मृति मंदिराच्या रूपानं! महागोविंदाची शिल्प आणि वास्तुकला तिथं पणाला लागली होती. एक अप्रतिम सौंदर्यकृति तिथ उभी ठाकली होती. जणूं भावकाव्य गोठलं होतं. महागोविंदाच्या गुणी बोटांनीं त्या निर्मितीनंतर कलासंन्यास घेतला.

बरसत्या चांदण्यांत तर स्मृति मंदिराचं सौंदर्य आणखीनच झळकून उठे. महाराजाना मोह झाला इथून उठाव. राजपण विसराव; सत्तेची धुरा अजातशत्रूच्या शिरावर लोटावी आणि आपण खुशाल या सुवर्ण मंदिरातच बसून राहावं. सारं जीवन तिथंच व्यतीत कराव. सुनंदेचा आत्मा तिथ तरंगत असेल, त्याच्याच सहवासात रमून जाव.

त्याच्या खांद्याला कुणीसा स्पर्श केला. ओळखीचा स्पर्श. त्यानं मागें वळून बघितलं. कोणीच नव्हतं. मग नुसतं हंसणं फुललं. तेहि ओळखीचच. कुणाची तरी हनुवटी त्याच्या खांद्यावर विसावली. लांबसडक मऊसूत केंसाचा स्पर्श त्याच्या कानांच्या पाळधावर आणि गालांवर गुदगुल्या करू लागला. त्या केंसातला सुगंध त्याच्या नाकपुड्यांना सुखवू लागला. मग काकणंहि किणकिणलीं. त्याच्या गळ्याभोंवती नाजूक हाताचा विळखा पडला. हसणं खिदळतच होतं. स्पर्श तर जाणवतो दिसत तर कोणीच नाहीं.

"कशी गंमत होतीय् एका माणसाची!" हसणारी व्यक्ति सुनंदेच्याच आवाजात बोलली.

"सुनंदे, तू?"

"या उपवनात आपल्याबरोबर माझ्याशिवाय दुसरं कोण येऊं शकणार?...कीं मी गेल्यापासून आणतां आणखी कोणाला?"

"नाही ग. तू गेल्यापासून मी इकडे फिरकलोंसुद्धां नव्हतों. आज अगदीं पहिल्यादा इकडे पाय वळले. तेहि तुझ्या आठवणीची माला गुंफीत..."

"मला विसरला होतात ना?"

" मुळीच नाहीं. कसा विसरेन ?"

" मग मी तुमच्या खांद्यावर हनुवटी टेकली तेव्हां बिचकलांत नां ? ओळखला नाहींत माझ्या केसांचा स्पर्श ? तुमच्या गळ्याभोंवतीं पडलेली मिठी परिचयाची नव्हती तुमच्या ?"

" होती ग होती अजूनहि आहे. पण तूं...तूं...या जगांत नाहीस ना ? मग इथ कशी ?..."

" तुम्ही तिथं मी !" हसत ती बोलली. आणि मग त्यांच्या समोरच अगदी मांडीला मांडी भिडवून येऊन बसली. दिसत नव्हती पण बसली.

" पण...पण...तू..."

" बिचकता कां असे ? मी जळून गेले तरी इथं कशी दिसते, असच ना विचारायच तुम्हांला ? कीं जळून गेलेल्या मी पुन्हा तुम्हांला तोंडच दाखवायला नको होत ?"

" तसं नाही ग ! तू ये...नेहमीं नेहमी ये...या इथंच...या तरुतळी...आपला आवडता वृक्ष आहे ना ?...रोज येशील ?...कोणत्या वेळी...?"

" पण मी अशीच येत जाऊ ? पूर्वीसारखी आले तर नाहीं चालणार ?"

" चालायच काय ? तूं पुन्हा मानवी देहानं आलीस तर हवीच आहेस मला. पण तें कस शक्य आहे ?"

" परत कशाला हवी ? जाळून टाकायलाच ना ?" तिचा स्वर बदलला होता. तिचे डोळे पाण्यान भरले होते तिच्या स्वरांत चीड होती.

" नाही ग...तशी चूक मी पुन्हा करणार नाहीं..."

" म्हणजे ती चूक तुमच्या हातून झाली ? तुम्ही जाळलत मला ?"

बिंबिसार अडखळला. नको ते शब्द ओठांतून बाहेर पडले. नकळत अपराधाला वाचा फुटली. अजाणतेपणें पाप उघड झालं. तो कांहीं बोलेना. तेव्हां तिनंच पुन्हा विचारलं, " बोलत का नाहीं ? मागा ना ! तुम्ही पेटवून दिलात महाल ? तुम्हीं राखरांगोळी केलीत माझ्या देहाची ?"

" मी नव्हे...अजातशत्रूनं "

" अजातशत्रूनं हें पापकृत्य केलं, हें ठाऊक आहे तुम्हांला ?"

" हो !"

" हें माहीत असतांना, त्या अपराधाची कोणती शिक्षा दिलीत त्याला ?"

" कोणतीच नाहीं...कांहींच नाही..."

" आपल्या प्रियतम महाराणीला जाळून टाकणाऱ्या खुनी माणसाला कोणतंहि शासन न करतां, त्याला युवराजपदाची वस्त्र दिलींत ? एका खुनी माणसान मगधाचं राजसिंहासन विटाळायचं ? आणि त्याला आपण हातभार लावायचा ?"

बिंबिसारनं मान खाली घातली. काय उत्तर देणार ?

ती जराशी दूर सरली. आणि संतापून म्हणाली–" यालाच तुमचा न्याय म्हणायचा ना ? मला जाळून टाकणारा, स्वतःच्या मातेला पेटवून देणारा मगधाचा भावी राजा होणार ! आणि माझा-अभय तत्त्वचिंतक म्हणून त्याला वनवास भोगावा लागणार ? अधिकार असूनहि ? स्वतःचं बोट धरून तुम्हीं त्याला भगवान् बुद्धांच्या हवालीं केलत ना ?"

" त्याचीच इच्छा तशी होती !"

" केवळ त्याचीच; की तुमचीसुद्धा ? तो ज्येष्ठ पुत्र. युवराज होण्याचा मान त्याचा. तो डालवून तुम्ही त्याला भिक्षूच्या संघांत नेऊन लोटलत कां ?"

" तूं होतीस तेव्हां तूंच मला तसा सल्ला दिला होतास. राज्य चालविण्यासाठीं तत्त्ववेत्ते अपात्र ठरतात, हें तूच मला सांगितलं होतंस."

" पण मातेच्या नरडीचा घोट घेणाऱ्या घातकी पुत्रापेक्षां, तत्त्ववेत्ता पुत्र राजपदाला अधिक शोभून दिसला असता ! अजातला राजपद देण्याचा सल्ला मी दिला, त्यावेळीं अजातच्या हातून असलं पाप घडलेलं नव्हतं."

" पण अजातनं स्वतःहून तें पाप केलेलं नाहीं. त्यानं केवळ आज्ञापालन केलं."

" कसलं आज्ञापालन ?"

" महाल पेटवून तुला भस्मसात् कर, या आज्ञेचं !"

" कुणीं दिली आज्ञा ?"

बिंबिसार अपराधी चेहरा करून निमूटच राहिला तेव्हां उसळून ती म्हणाली, " बोला ना, कुणी दिली आज्ञा ? राणी चेलनेनं ? तिच्यांतला सवतिमत्सर पेटून उठला ?"

" तिनं नाही...तिनं नाहीं..."

" मग कुणीं ?"

अगदीं हलक्या आवाजांत त्यानं कबुलीजबाब दिला--

" मी...मीं...स्वतः !"

विजेचा झटका बसावा तशी ती हादरली. त्याच्यापासून दूर गेली. दृष्टीतून अंगार फेकीत आणि शब्दांत आग ओतून तिनं विचारलं, " कां ? कोणता अपराध झाला होता माझ्या हातून ? मग मलाच एखादं अग्निदिव्य करायला का नाही सांगितलत ?"

" चुकल माझ !"

" न निस्तरता येण्याजोगी चूक करायची आणि चूक कबूल करून स्वस्थ राहाचं ! काय त्याचा उपयोग ?" चूक कबूल करण्याचा मोठेपणा हवा; पण त्याहिपेक्षां चूक न करण्यात अधिक मोठेपणा असतो.

" मग याचं प्रायश्चित्त मीं काय... ?"

" प्रायश्चित्त मी कोण देणार ? आपण सम्राट आहात. या पृथ्वीतलावर न्याय द्यायचा सर्वश्रेष्ठ अधिकार आपला ?" उपहासानं तिन सांगितल.

" मला तुझा सल्ला हवाय."

" मी कोण सल्ला देणार ? नकोशी झाले म्हणून तर जाळून टाकायची आज्ञा दिलीत ना ?"

" नकोशी नव्हे ग...तू हवी होतीस; खूप हवी होतीस मला... अगदीं कल्पांतापर्यंत...पण एक अडचण झाली..."

" कसली अडचण ?"

" तुझ्या सहवासाला मी जितका भुकेला होतों, तितकीच, किंबहुना त्याहिपेक्षां एक मोठी जबाबदारी माझ्यावर होती. आणि ती म्हणजे माझ्या वंशामधें राजपद टिकून राहणं. आणि तें टिकायचं तर अजातशत्रूला राजपद मिळण आवश्यक होतं."

" मीं कधी ही गोष्ट नाकारली होती ?"

" तू नाकारली नाहीस. पण मला भीति वाटली "

" तुमच्या भीतीच प्रायश्चित्त मला ? आणि भीति तरी कसली वाटली ?"

"आज होकार देतेस; परंतु उद्यां तुझं मन फिरलं, सावत्र भाव जागे झाले आणि तूं तुझे शब्द फिरवलेस तर..."

"पण आठवतं तुम्हांला ?" त्याला जाणीव देत ती विचारत होती, युवराज कोणाला करावं याविषयीं आपली चर्चा चालली होती; तेव्हां मीं अभयचं नांव बाजला सारून अजातशत्रूचं नांव सुचवलं होतं."

"तें खरं...पण चंचल स्वभावी नायका केव्हां फितील याचा नेम नसतो, म्हणतात !"

"माझ्या बाबतींत तसा अनुभव आला होता कधीं ?"

"अनुभव नसेल...पण शंका वाटली खरी."

या उत्तरानं तिचं समाधान झालं नाहीं. त्यालाहि तें पुरेसं उत्तर वाटलं नाहीं. पण दुसरं काय सांगणार ? जरा वेळ ती गप्प बसली. तोहि आभाळाकडे टक लावून चांदण्या मोजत बसला.

"आणि एवढ्या संशयावरून तुम्हीं मला जगांतून उठविण्याची शिक्षा दिलीत !" सुस्कारा सोडून ती बोलली.

बिंबिसारला वाटलं या जगांतून चालत्या झालेल्या या जीवाला आतां खरं कारण सांगून टाकायला काय हरकत आहे ? हिच्या मनीं विनकारणच डंख राह्यचा. तिच्या शापानं अनातला विनाकारण ग्रहण लागायचं. त्यानं मनाची तयारी केली. आणि अखेर स्पष्टपणें सांगायचा प्रयत्न केला—

"केवळ तेवढाच संशय नाहीं."

"मग आणखी काय ?"

"आणखीहि एक संशय होता."

"कसला ?"

"सुनंदा, हा प्रश्न तूं विचारूं नयेस, आणि मला त्याचं उत्तर द्यायला भाग पाडूं नयेस, एवढीच माझी इच्छा आहे."

"ती इच्छा मला पूर्ण करतां येणार नाहीं, क्षमा असावी. तो दुसरा संशय कसला होता हें मला कळलंच पाहिजे. उच्चार केल्यानंतर, माझ्या हृदयांत तें शल्य तसंच टोचतं राखून, स्वतःची सुटका तुम्ही करून घेऊं शकत नाहीं."

"सुनंदा, तुझ्या हितासाठीं सांगतो; माझ्या हितासाठीं विनंती करतो; आपले संबंध अबाधित रहावेत म्हणून म्हणतो, तो संशय शब्दांकित करायचा हट्ट धरूं नकोस,"

ती उठली आणि स्मृतिमंदिराच्या रोखानं निघाली. त्यानं तिला अडवलं, "जाऊं नकोस, सुनंदा, जाऊं नकोस. आली आहेस तर हे अप्रिय विषय सोडून बोलायला आपल्याजवळ दुसरं कांहींच नाहीं कां ?"

"खूप आहेत. हा चंद्र, ही चांदणी रात्र, हा सुगंध, हा वारा... पण या साऱ्या गोष्टी मला भडकवणाऱ्या आहेत; माझं अंतःकरण पेटवून देणाऱ्या आहेत. मनमोकळं करून मी बोलायला आले होते पण तुम्हांला कांहीं लपवायचं आहे; राखून ठेवायचं आहे. अशा ठिकाणीं मी रमूं शकणार नाहीं. गळूं ठणकत राहणं मला सोसवत नाही. तें फुटावं; फुटत नसलं तर फोडावं म्हणजे त्यांतली घाण वाहून जाते. मोकळं, माकळं वाटतं लवकर बरं होतं. मला ठणकत ठेवायचा तुमचा बेत आहे. मला तें सोसणार नाहीं..." फडाफडा बोलत ती निघालीच.

आतां पर्याय नव्हता. तो शांतपणें म्हणाला, "सांगतो थांब. जें मला सांगणहि जड वाटतं, तें तुला ऐकायचं आहे. ऐकायचा तुझा हट्ट आहे. हृदय बर्फाचं गोठवून टाक. मेंदू बधीर कर. कानांत शिरणारे शब्द तिथेंच विरून जातील अशी व्यवस्था कर आणि मग काय सांगतो तें ऐक."



"अग, साखर कशांत आहे ?"

"डोळे उघडून नीट बघाल तर दिसेल ! तिथं दाण्याचं कूट म्हणून वर लिहिलेला कोकोचा डबा आहे त्यांत पहा !"

त्यानं आवंढा गिळला. मनाची आणखी तयारी केली. ती पाठमोरीच उभी होती.

"तुझ्या चारित्र्याविषयीं मला संशय आला होता. सुनंदा" भराभरा ते शब्द ओकून त्यानं स्वतःचं मन मोकळं केलं.

ती मागें वळली. त्याची नजर जमिनीवर खिळली होती. तिच्याकडे बघायचं धैर्य आतां त्याच्यांत शिल्लक नव्हतं. तिचाहि संगमरवरी पुतळा बनला होता. तरबेज समशेरबहाद्दरानं तलवारीच्या एका सपाट्यांत लिंबू असं चिरावं कीं त्याचे दोन तुकडे होऊनहि ते दिसूं नयेत. तशी तिची अवस्था होती. शतखंडित होऊनहि तिची मूर्ति एकाकार भासत होती.

"माझ्या चारित्र्याविषयीं, महाराज बिंबसार, आपल्या मनांत संशय आला !" ती पुटपुटली

"मग तुम्हीं मला जाळून टाकलंत तेंच बरं केलंत !

"ज्या क्षणीं पतिव्रतेच्या पतीला तिच्या पावित्र्याविषयीं शंका येते, त्याच क्षणीं तिनं वीज कोसळून भस्मसात् व्हावं, हेंच उचित" अगदीं थंडपणानं ती उद्गारली.

कितीतरी वेळ ते अबोलच उरले चढता चंद्र माथ्यावर आला. तरी ती उभीच होती; तो बसूनच होता.

"येते मी आतां" निरोप घेण्यासाठीं ती म्हणाली.

"किती तरी वर्षांनीं आलीस; घाई कसली जायची ?" तिला थांबवीत तो म्हणाला.

"आता या भेटीत काय अर्थ उरला आहे? एकमेकाची प्रतिबिंब बघायची ज्या डोळ्यांना सवय त्याच्या निष्प्राण कवडया झाल्यावर बघायचं काय? ज्या श्वासानीं एकमेकांत विरून साताजन्माचं अद्वैत निर्मायचं, ते श्वास गोठल्यावर आतां जगायचं कशासाठीं? ऊव सरलेली मिठी, दडे बसलेले कान, नीरस झालेले ओठ...कशासाठीं आपली भेट?...कां भेटलों आपण?..."

तिला उमाळा आवरेना तो जागेवरून उठला. तिच्यापाशी गेला. तिचा हात धरून त्यानं तिला चालती केली. त्या तरुतळीं तो बसला. तिच मस्तक आपल्या मांडीवर घेऊन तो थोपटू लागला. आणि गहिंवरून म्हणाला. "सुनदा...सुनदा ..विसरून जा सारं...विसरून जा... नेहमीसाठीं..."

"काय विसरायला सांगतां?...कस विसरायला सागतां. जिवापेक्षांहि ज्याच जास्त मोल तें कसं विसरू?...महाराज, साध्वीला तिच्या शीलापेक्षां अधिक कांहीं मौल्यवान असू शकत कां?...अन् त्याच शीलाचा तडा गेल्याचा संशय तिच्या प्राणप्रिय पतीनं घेतल्यावर तिनं विसरायचं काय?"

"मी चुकलों, सुनंदे, मी चुकलों. तूं शुद्ध होतीस. मी दूषित होतों. माझ्या डोळ्यांवर चढलेल्या अमंगल पडद्यानं साऱ्या जगाला बरबटून टाकलं होतं. तुझी काहीच चूक नव्हती...तू शुद्ध होतीस, पवित्र होतीस."

"*पण हा संशय यावाच का? पर मिळाल्याशिवाय कां त्याचा* कावळा होत असतो?"

"तसं नाहीं, सुनंदा, परहि कल्पनेंतला, कावळाहि कल्पनेतला. माझी गाडी उताराला लागली. मी घसरूं लागलो वृद्धत्वाची जाणीव मला भेडसावू लागली. त्यापोटी ही संशयाची आग भडकायला लागली. वाटू लागलं, माझी वृद्धत्वानं कमकुवत झालेली ढाल या तरण्याताठ्या लावण्याचं रक्षण करायला अपुरी ठरत असावी.. माझीच भीति...माझाच संशय...माझीच शका. त्यानं मी तुझ्या हालचाली न्याहाळू लागलो...तुझी प्रत्येक कृति मला खिजवणारी, चिडवणारी वाटली. वाटल, तुझं न आटलेलं सौंदर्य मला हिणवतंय. अस्वलासारख्या गुदगुल्या करून हंसवतां हंसवतां मला छळतय्. मला ओचकारण्यांत, मला रक्तबंबाळ झालेलं पाहण्यात, त्याचं समाधान आहे!...केवळ माझीच समजूत. माझ्या हितासाठीं तू माझ्या जेवणावर लक्ष ठेवलंस. मला वाटे, माझ्या वार्धक्याला ही डिवचतीत आहे. मला शांत वाटावं म्हणून तूं पंखा हाती घेऊन वारा घालायला लागलीस कीं तो वारा मला उष्ण लागे. मनांत येई, माझ्या म्हातारपणाला ही डसते आहे. जागरण करण्यावर तू बंधन घातलस की माझी समजूत होई. माझ्या उतरल्या आयुष्याची जाणीव करून देण्यासाठीं ही डाग देते आहे! ... तू कोणा तरुण सामंताचं कौतुक केलस की, *माझ्या मनात आग* भडकायची..."

"हें कधी मला तरी सांगायच होतंत. माझी चूक सुधारली असती मीं."

"तू चुकतच नव्हतीस तर सुधारणा काय करणार होतीस? विकृति होती माझ्यात. बिघडल होत माझं मन. दूषित होतों मी... सारच चुकल... पार चुकल..." हताशपणान त्यान कबुली दिली. पण मन मोकळं झाल स्वच्छ झाल.

"मी जळून गेल्यावर तुम्हीं जो आकात केलात. अश्रुपात केलांत, त्यावरूनच मीं जाणल तुमचं माझ्यावर किती प्रेम होत"

"ढोंग! खोट! बिंबिसार तत्काळ बोलला, "तें सार ढोंग होत सुनदा तुला ठार करण्याच्या कटातला तो अखेरचा भाग होता. ढाळले ते अश्रू खोटे, सोडले ते सुस्कारे खोटे, केलेलं आक्रंदन खोटं... सारं खोटं होतं. तें सार ढोंग होत ते ...त्यातल्या कशांतच जीव नव्हता. उलट तू मेलीस याचा त्यावेळीं मला आनंदच झालेला होता. एक पाप जळून खाक झालं, अशीच भावना होती माझ्या मनांत"

"आणि माझी स्मृति म्हणून हें सुवर्णमंदिर उभारलंत तें?

"तोहि पाप झांकण्याचाच मार्ग होता. सम्राटाचं आपल्या पत्नीवर किती प्रेम होतं, याची साक्ष म्हणून ही वास्तु उभारली गेली असा लोकांचा समज होईल आणि याच सम्राटाच्या हातून तिचा जीव घेण्याची कसाबकरणी झाली असेल, असा संशयहि कुणाला येणार नाही, याचसाठी तुझें स्मारक उभारलं, आमचा हेतुहि साध्य झाला..."

"होय. मी रोज ऐकते. पहायला येणारे प्रेक्षक इथल्या कलेचं कौतुक करीत असतात. शिल्पी महागोविंदाची तोंडभर प्रशसा करीत असतात. आणि गद्गद्त्या आवाजांत आपल्या चिरंतन प्रेमाची स्तुति करीत असतात. मी रोज ऐकतें. आजपर्यंत ऐकत होते. समाधान वाटायच. आपल्या प्रेमाच प्रतीक पाहून गळे गहिंवरले, डोळे ओलावले, शब्द आर्द्र झाले की मनापासून आनद व्हायचा. कला महागोविंदाची पण आपलं प्रेम अमर झालं अस वाटायचं. या क्षणापासून तोहि आनंद लोपला."

"पण या क्षणापासून तो आनंद मी लुटणार आहे मी माझं अंतःकरण तुझ्यासमोर उघडं केल्यामुळं मी आता निष्कलक झालों आहे. ते सुवर्ण मदिर आतां खरोखरच माझ्या तुझ्यावरील प्रेमाचं दृश्य स्वरूप ठरलं आहे,"

त्याला समाधान वाटत होत; तिची सतुष्टता हिरावून घेतली गेली होती. तिच्या सत्यावर दांभिकपणाचा, खोटेपणाचा लेप चढला होता; त्याच्या ढोंगाच्या ठिकऱ्या उडाल्यामुळें त्याचं सत्य निष्कलक झालं होतं.

स्मारकावरून बोलणं चालल होत म्हणून ती म्हणाली, "हें स्मारक बघण्यासाठीं येणाऱ्या केवळ एकाच माणसान स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला होता."

"काय म्हणाला होता तो?"

"तो म्हणाला, पाचश स्त्रिया बाळगणारा बिंबिसार सुनदेवर प्रेम असल्याचा दावा करतो, ही गोष्ट निखालस असत्य आहे. ढोंग आहे, दांभिकपणा आहे."

"त्याच म्हणणं खोट आहे, सुनदा पांचशें स्त्रियातील खरखुरं प्रेम तुझ्याच वाट्याला आल, यांत काहींच संशय नाही. तुझ्या पश्चात तें कोणाच्याच वाट्याला आल नाहीं. पख लागून तें भूर उडालं-कुठंतरी भरकटलं पण निळ्या आभाळात नुसतच पख फडफडवीत भरारत राहिल. तें कुठ बसलं नाहीं. थाबल नाहीं, विसावल नाही. स्थिरावल नाहीं, आज तू आलीस-पुन्हा ते भुईवर उतरल."

"आणखी एकान काय म्हटलं ठाऊक आहे?"

"मी कधीं ऐकल आहे?"

"गरीब होता बिचारा. आपल्या प्रेयसीला जवळ ओढून तो स्मृति मंदिराचा कोपरा न् कोपरा नीट नीरखत होता. एकेका रेषेंतल, एकेका वळणांतल तुकड्यांतल कलाकौशल्य तो डोळे भरून पहात होता. पण त्यानं कौतुकाचा एक शब्द उच्चारला नाही. 'वा! किती सुंदर!' अनुपमेय' असीं शेलकी विशेषणं ऐकायची मला सवय—

पण हा नवखा माणूस अवाक्षर उच्चारेना. त्याची प्रेयसी मात्र भरपूर कौतुक करीत होती. 'किती सुदर आहे नाहीं ?' विचारत होती पण तो मुका होता तिच्या प्रश्नाला तो उत्तर देत नव्हता."

"तो खरच मुका होता. ?

"मुका नव्हता तो. त्याला बोलायच होत तें इतक्या मोलाच होत, कीं नुसत्या वाऱ्यावर आपले शब्द सोडून द्यायची त्याची तयारी नव्हती."

"मग कांहीच बोलला नाही तो ?

"बोलला ना ! सुवर्णमंदिरांतून ते बाहेर आले. प्रवेशद्वारापाशीं जाऊन उभे राहिले. पुन्हा एकदा ही वास्तू डोळयांत सांठविण्यासाठीं बघून घेतली. आणि त्या बिचाऱ्याला हुदका आला."

"हुदका ?"

"हो हुदका !"

"कारण ?"

"तो म्हणाला, "सखे, आपल्या दौलतीच्या दिमाखान, सपत्तीच्या सामर्थ्यानं सम्राट बिंबिसारन आपल्यासारख्या निष्कांचन, दरिद्री गरीबाच्या प्रेमाची हेटाळणी केली आहे ही वास्तु उभारून !"

"त्या बिचारीला त्याच बोलणहि नीट समजल नाही. तिन विचारल, "यात कसली हेटाळणी ?"

"सतापून तो म्हणाला, "हेटाळणी नाहीं ? चेष्टा नाही ? माझ तुझ्यावर काय प्रेम नाहीं ? त्या सम्राटाच सुनदेवर जेवढ प्रेम होतं, तेवढच कदाचित् त्याहिपेक्षां जास्त–माझं तुझ्यावर प्रेम आहे, पण उद्यां तू निघून गेल्यावर आपल्या प्रेमाच प्रतीक काय उरणार आहे ? सपतीचे ढीग ओतता न आल्यामुळें आपल प्रेम चिरजीव होऊं शकणार नाही"

बिंबिसारनं डोळे टिपले. गरीबाच्या अंत करणाला सलावं म्हणून त्यानं ते स्मारक उभारलं नव्हत. ही प्रतिक्रिया त्यानं कधीच अपेक्षिलेली नव्हती.

आभाळात चद्र मावळत्या क्षितिजाच्या कडेवर येऊन बसला होता. तारवटलेल्या डोळयांनी बिंबिसार सुनदेकडे बघत होता. निळ्या नभीचा पाढरा शुभ्र ढग बघता बघतां अतराळीत विरून जावा तशी सुनंदा सभोंवतालच्या वातावरणांत विलयाला जात होती ती गभीर होती. बोलत नव्हती. हालन नव्हती. हलके हलके अधुक होत होती. फिक्कट फिक्कट होता होता ती अखेरीस अदृश्य झाली.

ती नाहीशी होत आहे हें दिसत असूनहि बिंबिसार काही करूं शकला नाही. त्याचे डोळे जड झाले होते. उघडतां उघडत नव्हते. "सुनदा, थाब जाऊं नकोस." असं ओरडून बोलण्याचा त्यान खूप प्रयत्न केला. पण आवाजच फुटेना; जीभच हलेना. जोरांत धांवाव आणि आपल्या बलशाली बाहूनी घट्ट कवटाळून तिला पकडून ठेवावी असा त्यानें बेत केला. पण त्याचे हातपाय जागच्या जागी स्थिरच राहिले. सगळं शरीर दगडासारखं अचेतन झालं आहे आणि आपण एखाद्या जड खडकाप्रमाणें इथल्या जमिनीत रुतून बसलों आहोंत असा भास त्याला झाला. जे घडत आहे तें थोपवतां येत नाही, जें घडणार आहे त्याला शोधण्याची आपली ताकद नाही. हें जाणून तो स्वस्थ पडून राहिला. एक समर्थ सम्राट इतका अगतिक व्हावा, या कल्पनेनं त्याच्या गच्च मिटलेल्या डोळयांत पाणी तरारलं. तरारलं कसलं ? साकळलं !

त्याचवेळी दहा विश्वासू सैनिकाना घेऊन देवदत्त उपवनातल्या त्या वृक्षाखाली आला. तेव्हां मगधाचा सम्राट तिथं उघडावाघडा, बिन अथरुणपांघरुण गाढ झोंपलेला त्याला दिसला.

बरोबरच्या सैनिकांना त्यानं डोळयानं खूण केली. बिंबिसार झोपेंत असतांनाच त्यानीं त्याच्या हातात बेड्या घातल्या. बेड्यांच्या थडगार स्पर्श आणि खळखळ यामुळें बिंबिसार जागा झाला.

पण तो जागा झाला त्याचवेळीं आढळून आलं कीं, आपण बंदिवान बनलों आहोंत !

हें स्वप्न कीं, सत्य हें नीटपणानं बघण्यासाठीं त्याला डोळे चोळण्यापुरतीहि हालचाल करायला मिळाली नाही.

"हा काय प्रकार आहे ?" म्हणून त्यानं दरडालं.

देवदत्तान सागितलं, "एका ब्राह्मण स्त्रीला जाळून ठार करण्याचा कट केला. या अपराधाबद्दल आपल्याला मगध सम्राटाच्या आज्ञेवरून पकडण्यांत येत आहे."

"मगधसम्राटाची आज्ञा ?"

"होय, मगध सम्राटाची आज्ञा !"

"कोण हा मगध सम्राट ?"

"सम्राट अजातशत्रु !"

"हु" म्हणून बिंबिसारनं सुस्कारा सोडला.

मागें जें हुकल, तें आज साधल होत एकूण ! पुत्रवात्सल्यानं ज्याला क्षमा केली, तो पुन्हा उलटला म्हणायचा ! हाती आलेला नाग ठेचल्याविना सोडून दिला–त्याचं प्रायश्चित्त भोगलच पाहिजे निमूटपणान.

शांतपणानं बिंबिसार म्हणाले, "ब्राह्मणस्त्रीच्या वधाचा कट मी केला, म्हणून मी बन्दी ?"

"होय."

"पण न्यायालयांत...माझी काहीं बाजू..."

"सम्राट अजातशत्रु तें बघून घेतील. माझ्या डोक्याला विनाकारण त्रास नको. आज्ञापालन माझं काम." देवदत्तानं बिंबिसारचं बोलणं तोडत सुनावलं.

"मगधाच्या सम्राटाचा हा न्याय ? त्याच्या अधिकाऱ्यांची प्रजाजनाशीं अस फटकून वर्तन ?"

प्रश्नाला उत्तर मिळाल नाही. एक हिसका बसला आणि सैनिका बरोबर चालत व्हावं लागल.

शांतपणान तो स्वतःशींच पुटपुटला, "मगधाच्या अस्तंगत सम्राटाचा जयजकार असो ! मगधाच्या उगवत्या सम्राटाला अभिवादन असो ! ! चल बिंबिसार, तुझी वाट आतां प्रासादाकडून बन्दीशालेकडे!"

●●●

: ५ :

राजधानीतील राजपथ आज माणसांनी तुडुंबला होता. मार्गाच्या दोन्ही बाजूला प्रजाजनांच्या थापीच्या थापी लागल्या होत्या. पात्र सोडून गंगनं काठावरून वाहूं लागावं, तशी राजपथाची अवस्था झाली होती. लोकगंगेला पूर आला होता. पण दोन्ही तीरावर !

महाराणी सुनदा आज नगरींत परत येणार होती. तिच्या स्वागताचा हा सोहाळा होता.

" महाराणी म्हणू नका आतां; राजमाता सुनंदा म्हणा !" कोणीसं सुचवलं.

" बरोबर आहे, बरोबर आहे " हंसत हसत दुसऱ्यानं सम्मति दर्शवली.

" जळून ना मेली होती ही !" कोणी एकीन नवीन शोध लावल्याच्या आविर्भावात माहिती दिली.

" कसलं मेलं ? सगळं खोटं ! हिची दोरी बळकट, ही कां जळून जाणार तसल्या आगीत ?"

" अहो, राजाच्या मनांत ढोंग असलं म्हणून तसं कां घडून येणारे ? शेवटीं ईश्वराच्या मनांत असेल तेंच व्हायच बरं !"

" पण हें कसलं मेलं ढोंग ! त्याची आवडती राणी होती ना ही ? मग यानच तिला जाळून टाकायचा बेत करायचा ? काय बाई तरी ! ऐकावं तें नवलच ! "

" यांना नवरे कसले म्हणायचे ? कसाव हे कसाव !"

" कसाव बरे ! त्यांच्या सुऱ्या कांही बायकांच्या मानेवर चालत नसतात ! "

" धन्य आहे हो महाराजाची ! आपल्या हातान बायकोचा महाल काय पेटवून दिला. तिला जाळून काय टाकली, लोकाना दाखवायला शोक काय केला, भागीरथीला पूर यावा असे अश्रू काय वाहवले, प्रेमाचं प्रतीक म्हणून सुवर्णमंदीर काय उभारलं. कमाल आहे बाई या काळजाची ! दाखवायचे दात निराळे आणि खायचे दांत निराळे !"

" आपल्यासारख्या लुग्यासुग्याची नव्हेत ती काम ! राजेराजवाड्यानाच शोभायचीं तीं ! जातीच्या सुदरांना काहीहि शोभाव तसं राजमुकुट घातलेल्यानीं कांहीहि कराव; योग्यच ठरतं तें !"

" पण आता कसं झाल ? अधारांत पाप केलंत तरी उजेडांत कधीं ना कधीं यायचच तें !"

" आता कसं ? परमेश्वर आहे म्हणतो आम्ही, तें काय उगीच !"

" बाकी युवराजाचं कौतुक करावं थोडंच !"

" युवराजाचं काय म्हणता ? महाराजाचं म्हणा, सम्राटाच म्हणा !"

" त्याचाच अर्थ तो, आणि ह्याचाच अर्थ तो ! "

" नाहीं, न्यायासाठी पित्याचं नातं नाहीं मानलं ! अन्याय होतों म्हटल्याबरोबर प्रत्यक्ष बापाला सिंहासनावरून खेचून कैदेंत टाकल !"

" याला म्हणावं न्यायी राजा !"

" नाहीतर आपले बंदिवान् महाराज ! ज्यानं प्रत्यक्ष स्वतःच्या प्रियतमेच्या नरडीला नख लावायला मागें–पुढें बघितलं नाहीं, त्यानं स्वार्थासाठी प्रजेवर निखारे काय वाटेल तेव्हां ठेवले असतें कीं हो !"

" परमेश्वरानच सोडवल म्हणायच आपल्याला अशा पाशवी राजाच्या कचाट्यांतून !"

" आणि हा म्हणे बुद्धाचा परमभक्त होता ! स्वतःच्या मुलाला यान बुद्धाच्या पायी घातलं आणि बौद्धभिक्षु केलं. हेंच ना तुमचं बौद्धांच अनुयायीत्व ! "

" बौद्ध असा नाही तर वैदिक असा शेवटीं राजांचा तो राजधर्म ! त्याना उपयोगी पडेल असा तो वळवायचा असतो, मोडायचा असतो!"

" ऐकलं तें खरं कां ? अगदी आतली बातमी हं ! "

" काय ?"

" सुनंदा ही ब्राह्मणकन्या. राजानं बौद्धधर्म स्वीकारला अन् यज्ञशाळा मोडून टाकल्या. प्रजेवरहि तो आपला धर्म लादायला लागला. म्हणून म्हणे, सुनंदेन त्याला विरोध केला. त्यामुळें संतापून जाऊन त्यान या ब्राह्मणकन्येला जाळण्याचा कट केला."

" मग यात काय खोटं ? यात कसली आतली वार्ता ? सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे तें ! याच तर अपराधासाठीं अजातशत्रूनं बिंबिसाराला कारागृहांत डाबून ठेवलं आहे ! "

" ब्राह्मणकन्या म्हणून हा राजा स्वत.च्या प्रियतमेला आगींत फेंकायला तयार झाला, तिथं आम्हा वैदिकांची थोड्याच दिवसांत यानं पार ससेहोलपट करून टाकली असती की हो ! "

" तो बरा करेल ! त्याचं स्वामित्व इथें ! पण त्याचाहि सवाई स्वामी आहे ना तिथं वर ! याच पाऊल इथं वाकडं पडतांना दिसलं कीं तो याला ढकलल्याशिवाय थोडाच सोडणार आहे ? "

" राजा चुकत नाही, हें आपण प्रजाजनांनीं म्हणणं ठीक आहे; पण त्या सर्वसाक्षीची दृष्टि त्याच्याहि वर आहे ना ! त्याच्या नजरेंतून काय दडवणार तुम्ही ? डोळे मिटून मांजर दूध पीत असेल पुष्कळ ! पण पहाणाराचे डोळे घड आहेत, उघडे आहेत; त्याच्या हातात मांजराच मानगूट पकडायच बळ आहे, त्याला काय करणार तुम्ही ?"

" ते तुम्ही कांही म्हणा ! आम्हां वैदिकांवर परमेश्वराचा वरदहस्त आहे, हें काही खोट नाही ! "

असे एक ना अनेक प्रवाद उठत होते, त्यांना पुष्टि मिळत होती. कांहीं पुसले जात होते. पण तोंड कोणाचं मिटलेल नव्हतं. या सगळ्या प्रकरणात आपल्याला अगदी अचूक माहिती असल्याच्या आविर्भावांत आणि ती जर आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्याच्या ध्यानात आणून दिली नाही तर आकाश धरणीवर कोलमडणार असल्यामुळें त्या संकटापासुन साऱ्यांना वांचविण्यासाठी जो तो अहमहमिकेनें काहीं ना कांहीं बडबडत होता, ओरडत होता.

राजप्रासादात अजातशत्रु मात्र अस्वस्थ होता. तो देवदत्ताला म्हणत होता, " मित्रा, आजपर्यंत सारं तू म्हणालास तसं घडून आलं. "

" नुसतं बोलू नकोस. प्रत्यक्षात जाऊन ऐक तुझे प्रजाजन काय

बोलतात तें. महाराजांना तूं पदच्युत केलस म्हणून तुझा गौरव होतोय्; स्तुति सुमनांचा वर्षाव होतोय्. आणि बिंबिसार महाराजाच्या निंद्य कृत्याबद्दल त्याची नालस्ती होतेय्, निंदा होते आहे. त्या लोकगर्गेतून तुम्ही दोघें जर आतां जाल, तर तुझ्यावर बरसायला फुल अपुरी पडतील--बिंबिसारवर टाकायला शेणामातीचे गोळे कमी ठरतील--थुकून थुकून प्रजाजनांची तोंडं कोरडी पडतील ! "

" तुझ्या प्रचार-कौशल्याबद्दल मला अजिबात शंका नाही. पण हे खरं नाहीं, देवदत्ता, हें खरं नाही ! एक असत्य गोष्ट किती वेळ सत्य म्हणून प्रजाजनाच्या माथीं मारता येईल ? केव्हा ना केव्हां ओहोटी येणार, आणि हे खडक उघडे पडणार ! "

" तुझ्या भावंडांत सर्वांपेक्षा तूंच श्रेष्ठ सत्ताधीश आहेस, हा महाराजांनीं करून घेतलेला समज साफ चुकीचा होता असं तुझ्या बोलण्यावरून वाटतं ! राजकारणाची वाट अशीच बिकट, धकाधकीची असते. इथली पावलं रोंवून, सामर्थ्यावर विश्वास ठेवून टाकायचीं असतात. सर्व सामान्याचे नियम राजकारणात लागू पडत नसतात. "

मग अजातशत्रूला आठवण देण्यासाठीं तो म्हणाला, " राज्यक्रांतीचा पहिला कट अयशस्वी झाला. तेव्हा किती हताश झाला होतास! पार हातपाय गाळले होतेस ! हें कधी जमणार नाहीं, हें कधी साधणार नाही, फार दिवस झाले नाहीं त्या गोष्टीला. काळ पालटला ना ? लोक तुझ्या पाठीशी उभे राहिले ना ? ज्याला त्यानीं डोक्यावर घेऊन नाचवला, त्यालाच आज पायदळी तुडवायलाहि ते तयार आहेत ना ? आत्मविश्वासानं काळहि फिरवता येत असतो. तुला कमली भीति—मी आहे ना तुला साथ द्यायला. "

" कितीहि सांगितलस देवदत्ता, तरी माझं मन मला खातं. माझं मस्तक उडवून द्यायची संधि आली असतांना, त्यानी उदार अंतःकरणानं मला मुक्त केलं. वेळ येऊनहि आणि शक्यता असूनहि नांगी न ठेवतां सोडून दिलं. "

" त्या नांगीनं योग्यवेळी दंश करावा, अशी ईश्वरी योजनाच असेल तर ?"

" ईश्वरी योजना कृतघ्नपणासाठी असतात ? उपकाराची परतफेड अपकारानं करण्यासाठीं असतात ?"

" ईश्वराच्या योजना अतिम सत्यासाठी असतात. तात्कालिक भल्याबुऱ्याचा विचार त्यामध्यें नसतो. आपण केवळ निमित्तमात्र म्हणून त्यांत सांपडलेले असतो. त्यांतल्या पापपुण्याचीं पुटं आपल्यावर कधीच चढत नसतात. "

" देवदत्ता, तत्त्वज्ञान सार ठीक झाल. पण अशा उदारहृदयी बापाचा घात करायचा, असलं दुष्कृत्य ईश्वर आपल्या हातून घडवतो ?"

" उदार हृदयी पिता !" तुच्छतेनं देवदत्त म्हणाला. चिडून बोलला, " सतरांदा तुझ्या पित्याच्या उदारपणाविषयी बोलत असतोस. तुझा पिता उदार आहे ? निव्वळ सशयावरून आपल्या प्रियतमेला जाळून टाकण्याची आज्ञा देणारा तुझा बाप उदार आहे ? प्रत्यक्ष प्रिय पत्नीचाहि घात करणारा माणूस, तूं मनाविरुद्ध गेला असतास तर तुझा शिरच्छेद करायला मागें सरला असता, अस वाटतं तुला ?"

" हो, वाटतं. पतीचं दुष्ट अंतःकरण वागवणाराच पुत्रासाठी कोमल मन साभाळू शकतो. "

" तुझी समजूत अनाठायीं आहे. "

" मग त्याच्याविरुद्ध शस्त्र उपसलं असतांनाहि त्यानीं मला क्षमा का केली ?"

" तुला क्षमा करणार पित्याचं अंतःकरण नव्हतं ! मुत्सद्दी राजकारणी पुरुषाचा तो स्वार्थी डाव होता. "

" त्यात कसला आला आहे स्वार्थ ?"

" तुला काय वाटतं, महाराज बिंबिसारानीं तुला क्षमा केली ती पित्याच्या उदार अंत.करणामुळें ? अभयकुमार, मेघकुमार, इत्यादी पुत्र तुझ्यासारखे कर्तबगार असते, राज्यशकट पेलायला समर्थ असते तर तुला क्षमा केली गेली असती ? भ्रम आहे तुझा. तुला खुडून टाकला असता तर बिंबिसारच्या राजवंशाच्या मुठींत असलेल्या राजलक्ष्मीचाच गळा दाबला गेला असता त्याच्या रक्तमांसाच्या पिंडाकडे राजसिंहासनाचा अधिकार उरला नसता. म्हणून तुला वांचविण्यांत आलं. तुझ्यासाठीं नव्हे, तुझ्या वशासाठीं ही उदारता प्रगट केली गेली ! त्यामागें राजकारण होतं ; पित्याचं हृदय नव्हें ! "

देवदत्ताच्या त्या सुस्पष्ट तर्कवादान अजातशत्रु भारून गेला. तरीहि त्यानं विचारलं, " आपल्या वशासाठीं महाराजांनी हें केलं म्हणतोस—मग आपल्याच रक्तमांसाच्या जवळच्या नातेवाईकाविरुद्ध माणसं कां उठतात ? त्यांच्या मोठेपणाला त्याच्या उत्कर्षाला हातभार लावायचा सोडून, त्याचे पाय मागें ओढण्यासाठी कां धडपडतात ? '

" भगवान् बुद्ध माझा जवळचा नातेवाईक असताना, त्याच्या धर्मप्रचाराचा वांटा न उचलतां, वैदिकाना त्याच्याविरुद्ध मी कां उठवतो, हाच तुझ्या प्रश्नाचा रोख आहे हें मी जाणतो. "

मात्रा बरोबर लागू पडल्याचा भाव अजातशत्रूच्या मुखावर होता. तर त्याहि प्रश्नाला चोख उत्तर आपल्याजवळ आहे असा आत्मविश्वास देवदत्ताच्या चेहऱ्यावर झळकत होता.

देवदत्त गभीर झाला. तो म्हणाला, " अजात, गौतम माझ्या नात्यांतला असला तरीहि त्याच्यापेक्षां मला वैदिक धर्म अधिक प्रिय आहे. मुलगा कितीहि वाईट असला तरी मातेला तो प्रियच असावा, तसा तो मला प्रिय आहे. वैदिक धर्माच्या सर्व दोषांसकट तो मला प्रिय आहे. माझे आईवडिल, आमचं कुल, माझे पूर्वज या साऱ्यानीं ज्याचं पालन केलं, तें त्याज्य ठरवून त्यावर थुकावं, हें मला पटत नाहीं, रुचत नाही. ज्या देवदेवतांना डोक्यावर घेऊन नाचलों, त्याना निव्वळ पाषाण मानून त्यांच्या ठिकऱ्याठिकऱ्या कराव्यात, हें मला मानवत नाहीं. ज्या यज्ञकुंडांतल्या ज्वालांत स्वार्थाचे हविर्भाग अर्पण करून चिरंतन सौख्याच्या वाटा उजळून घेतल्या, त्या यज्ञशाला मुळापासून उखडून टाकाव्यात,हें मला खपत नाहीं कालमानानुसार आमच्यात कांही दोष आले असतील, तर दोष निखंदून काढावेत. शरीरातला एखादा अवयव दुखूं–खुपूं लागला म्हणून कोणीं आत्महत्त्या करायची नसते. आम्हीं सुधारायला हवं, हें मान्य; पण सुधारणेचा मार्ग आत्मघात हाच केवळ असतो, असं नव्हे. म्हणून मी बुद्धाच्या विरुद्ध आहे. मला माझा वैदिक धर्म जगवायचा आहे. प्राणाचं मोल द्याव लागलं तरी तमा नाहीं—पण त्यासाठीच माझी ही धडपड आहे. सनातन वैदिक धर्माचा ध्वज मगधावर फडफडू लागला की माझे डोळे तृप्त होतील. तोपर्यंत मी असाच धडपडणार-आणि माझ इप्सित साध्य होण्याच्या मार्गात जें जें येईल तें तें धुळीस मिळवणार ! "

"वैदिकांच्या सहिष्णुतेचा डांगोरा जगांत सर्वत्र पिटला जातो; हीच का ती सहिष्णुता ?" त्याला खिजवण्यासाठीं अजातशत्रून विचारलं.

"वैदिकांची सहिष्णुता स्वत्व गमावून सावध नसते; स्वत्वांत साऱ्यांना सामावून घेण्यात तिची थोरवी आहे." गंभीरपणान देवदत्तानं प्रत्युत्तर केलं.

"पण एक राजा बदलून दुसरा राजा आल्यामुळें तुझा हा उद्देश कसा होणार ? राज्यकर्त्यांचा धर्म कोणताहि असो; ती त्याची व्यक्तिगत बाब आहे."

"नाही, अजात, तें खरं नाहीं. 'यथा राजा तथा प्रजा' असा काल आहे सध्यांचा. राजाची इच्छा असो वा नसो राजाचा धर्म प्रजेवर आपोआप प्रभाव करीत जातो, अशी माझी समजुत आहे. म्हणूनच तर बिंबिसारांना बाजूला सारण्याचा हा कट आपल्याला करावा लागला."

"पण महाराजांनीं बुद्धाचं अनुयायीत्व स्वीकारलं म्हणून प्रजाजनावर तशी सक्ति कधीच केली नव्हती. एवढंच काय, राजघराण्यांतल्या आम्हा सर्वांनाच धर्माविषयीं पूर्ण स्वातंत्र्य होतं. महाराणी सुनदा अखेरपर्यंत ब्राह्मणस्त्रीच उरली ना ? मलाहि आजपावेतों बौद्ध मताशी कधींच जुळवून घेता आलेलं नाहीं. बिंबिसारांनी धर्मांत ढवळाढवळ केली, आपलीं मतं लादण्याचा प्रयत्न केला, हें राज्यक्रांतीच्या प्रचारासाठीं आपण लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला, तो यशस्वी झाला, हें सारं ठीक आहे. पण माझ्या मनोमनीची साक्ष मात्र यापेक्षां वेगळी आहे. बौद्धांचा प्रसार करायचा, असं महाराजानीं केव्हांच केल नाही."

"केल नसेल; पण त्याचा अप्रत्यक्ष परिणाम तसा घडत जातो राजाच्या पावलांवर पाऊल टाकणारे आंधळेच या जगांत अधिक असतात. डोळे बांधून ते राजाच अनुकरण करतात. बौद्ध मताचं प्रेम म्हणून नव्हे, राजाच्या आवडीची गोष्ट म्हणून ते नवा धर्म स्वीकारतात. त्यांच्या हृदयांत परिवर्तन होऊन मतमतांतर झाल, संस्कार बदलले. तर त्याला माझा विरोध नाही. परंतु अशा लोकांचा बदल हा वरपांगी असतो. बिंबिसारांच्या पाठोपाठ सहस्त्रानी बौद्ध धर्माचा स्वीकार केला तो निव्वळ आंधळेपणान ! उद्यां तू राजा झाल्यावर जिनेश्वराचा अनुयारी बनलास तर हींच मेंढरं तितक्याच मूर्खपणानं जैनाच्या कळपांत जातील. परवां आणखी कोणी आला—तर त्याचा पाठपुरावा. धर्म ही कपड्यासारखी—केव्हांहि काढावी, केव्हांहि घालावी, केव्हाहि बदलावी इतकी क्षुल्लक बाब बनत चालली आहे. याची मला खत आहे. विचारानं, संस्कारानं माणूस पालटत नाहीं. त्याचा ध्रुवतारा 'स्वार्थ' हा झाला आहे. मानवजातीची वाटचाल स्वार्थाच्या रोखान चालली आहे; हा लोंढा रसातळाकडे जाणारा आहे. निव्वळ स्वार्थापायीं राज्यकर्त्यांचं अनुकरण व्हाव, त्यांच्या शब्दाचे पडसाद घुमवले जावेत, ही भ्रष्टता मला थोपवायची आहे. धर्मान्तरं विचारानं व्हावीत. अंतःकरणाच्या बदलांतून व्हावीत. स्वार्थासाठीं; भ्रष्ट अनुकरणांतून ती होऊं नयेत."

"तू राजा होण्यांत माझा व्यक्तिगत स्वार्थ मीं कोणताच पाहिलेला नाहीं. कदाचित् तुझ्या मनातून मी उतरूनहि जाईन. कारण राजकारणांतली मित्रत्वं हीं क्षणजीवि असतात, याची जाण मला आहे. पण माझं मन तू मला उकलायला लावलंस. मीं तें तुला सांगितलं. मी असलों काय, नसलों काय, तूं मात्र बघ—की निव्वळ स्वार्थापोटीं राज्यकर्त्याचं निर्जीव प्रतिबिंब होऊं पहाणारी पिढी तुझ्या कारकीर्दीत पोसली जाणार नाहीं ! हें वेड वाढणार नाही. मनांची जोपासना सकसतेनं होईल. धर्माची वाटचाल तिच्या ठराविक उच्च पातळीवरून होईल. मेंढरांना तुझ्याजवळ थारा नसावा—उत्तेजन नसावं मला प्रिय असणाऱ्या परंपरागत, सनातन वैदिक धर्माचा ऱ्हास झाला तर त्याची मला खंत नाही—खेद नाहीं. पण कोणाचाहि मृत्यु त्याला साजेसा मिळावा—कृमिकिटाणूनी मृगेंद्राची परवड करूं नये !"

"मान्य आहे मला, पण बिंबिसार जाऊन अजातशत्रु आला म्हणून हा प्रश्न कसा सुटेल ? प्रजा ती प्रजाच राहणार. त्यांचा स्वभाव कसा पालटणार ? सर्वसामान्याच्या मनातल्या स्वार्थी भावना त्यांतून कशा पुसल्या जाणार ?" अजातशत्रूनं अगदीं मूलभूत शंका प्रगट केली.

देवदत्तहि जरा विचारांत पडला, आणि अधांतरी दृष्टि ठेवून म्हणाला, "तूं म्हणतोस तें खरं आहे. नुसता राजा बदलून हें काम होणार नाहीं. शतकानुशतकं लोकांच्या मनांवर नवे संस्कार घडविल्याविना त्यांची मनं बदलणार नाहीत. पण माझा हा प्रयत्न फक्त एकाच गोष्टीसाठी आहे—उतरणीवर गडगडणाऱ्या गाडयाच्या मार्गांत जरा तरी अडथळा यावा एकदाच कां होईना पण हिसका बसावा; थोडीशी गति मंदावेल त्यामुळं ! पण कोणतीच अडचण न येता हें जोरांत असंच गेलं तर कोसळेल, कोलमडेल; तुकडे तुकडे होतील या साऱ्याचे."

थोडा वेळ थांबून मग तो अजातला म्हणाला—

"मृगेंद्राला कृमिकिटक कसे पचणार ?" हंसत हंसत अजातनं विचारलं.

"तें मला ठाऊक आहे. मी म्हटलं कीं, वैदिक धर्माचा ऱ्हास झाला तरी मला ना खत, ना खेद ! तें खोटं आहे. तो टिकवण्यासाठीं तर माझा आटापीटा ! आणि वैदिक धर्म असा थोडाच लुप्त होणार आहे ! समजा, होणार असला, तर ज्याला ही गोष्ट बोचत असेल, त्यानं त्यासाठी पाऊल पुढं टाकलंच पाहिजे. निव्वळ निष्क्रिय बनून निभायचं नाहीं. ईश्वरी योजना अखेर मानवाच्या हातून पार पाडल्या जातात ना ? मी तर हें करणारच करणार, या आत्मविश्वासानं उभा आहे. तुझी साथ आहे तोंपर्यंत तुझ्याबरोबर चालेन. तुझी साथ सुटली म्हणून माझा प्रवास थोडाच संपणार आहे ? तू बरोबर न आलास—तर तुला टाकून...पण मी हे कार्य करणारच आहे...जमेल तसं, जमेल तेवढं..."

देवदत्त थांबला. त्याच्या विचारानं अजातशत्रूहि थरारून गेला. तो म्हणाला, "देवदत्त, तुला मी माझा मित्र म्हणवतों; पण तुझ्या या अंतःकरणाची ओळख यापूर्वीं कधीच झाली नव्हती. राजक्रांतीसाठी कुटिल कारवाया करणाऱ्या तुझ्या अंतःकरणाच्या कठोर खडकाखालीं, उदात्त विचाराचा असा स्त्रोत दडलेला असेल, कल्पना नव्हती मला !" देवदत्ताची अशी स्तुति केल्यावर तो पुढें म्हणाला, "तरीहि देवदत्ता, अजून मला कुठंतरी खुपत. वाटतं, आज ना उद्यां चालून येणारी राज्यलक्ष्मी वळकवण्यासाठी मीं असं पुढें दौडत जायला नको होतं. पित्याला तुरुंगांत डांबून सिंहासनाच्या पायऱ्या चढवण्याचा मार्ग स्वीकारावा लागला नसता तर बरं झालं असतं !"

त्याची समजूत काढण्यासाठीं देवदत्त म्हणाला, "ती गोष्ट मनाला लावून घ्यायला नको. तूं म्हणतोस त्याप्रमाणें सत्ता तुझ्याकडे चालत येत होती. पण तुझ्या म्हातारपणीं कां तिनं तुझ्या गळ्यांत माळ

घालायची होती ? आईवडिलानी ठरवून लग्न केल तरी तें लग्नच. पण तो सामान्यांचा विवाह झाला. पराक्रमी पुरुषानं वधू पुरुषार्थ गाजवून मिळवून आणण्यात भूषण आहे. तेव्हा तुझ्या हातून कांहीं चूकलं असं बिलकुल मनांत आणू नकोस. अरे, शेवटी उपभोगाचा काल तारुण्य [हाच आहे. वय निघून गेल्यावर मिळणाऱ्या राज्याचा. उपयोग काय ? आज बिंबिसार महाराजांच्या हाताखाली राबून तूं हवे तेवढे पराक्रम गाजवले असतेस. पण लोक म्हणाले असते ‘आहे बापाचं छत्र म्हणून आहे याची मिजास’ तुझे पराक्रम शेवटीं बिंबिसारांच्या नावेच पडले असते. साम्राज्यविस्तार झाला असता बिंबिसारांचा ! पराक्रम तुझा. श्रेय त्याचं. त्यापेक्षां झाल तेंच योग्य असं समज. तुझ्या आणि सर्वांच्याच भल्यासाठीं परमेश्वरान या साऱ्या गोष्टी जुळवून आणल्या आहेत, असं मान. ”

अजातशत्रूला तरीहि हें पटत नव्हत. “ पित्याच्या शापाची छाया माझ्यामागें सतत ससेमिरा लावेल. कृतघ्नपणाची काळोखी माझ्या तोंडाला फासलेली राहील. नाही देवदत्ता, असल्या वातावरणांत मला निर्भयपणें वावरतां येणार नाही. तर्कवादानं पटलेल्या गोष्टीप्रमाणें भावनेला मुरड पडेल, असं थोडंच आहे ? मेंदूपेक्षांहि हृदयाची भाषा अधिक जिवत वाटते, जवळची वाटते. तिला मी शब्दांत दाद देणार ?”

देवदत्तानं जोरजोरांत हातवारे केले. पण कशाचा उपयोग नव्हता. समजावून देतांना त्याचं डोकं अगदी सुन्न झालं होत. यापेक्षां अधिक कांहीं समजावून सांगणं त्याच्या कुवतीबाहेरचं होतं.

सरतेशेवटी विषय टाळण्यासाठी तो म्हणाला, “ या विषयासंबंधी बोलायला आपल्याला भरपूर वेळ आहे नतर. शांतपणें झाल्या गोष्टींचा विचार नंतर करूं. जे घडायचं होतं, तें घडून गेलं. तें आपल्याला घडायला हवं होतं त्याप्रमाणें घडलं, हें आपलं सुदैव. त्यात काहीं उणीवा असल्या तर नतर काढून टाकू. पण जें येत आहे, आलं आहे त्याचं यथोचित स्वागत आपल्याला केलच पाहिजे. आतां कर्तव्य म्हणून. तें टाळतां येणार नाहीं, पुढच पाऊल पुढेंच पडल पाहिजे. तेव्हा फार विचार न करतां महाराणी सुनदेचं स्वागत करायला—— ”

“ महाराणीचं स्वागत ? ”

“ चुकलों ! राजमातेचं स्वागत करायला— पुढें हो— मोकळ्या मनानं... सिद्ध हो. ”

सुनंदेच्या जयजयकाराचे लांबवरून येणारे आवाज आतां जवळ जवळ ऐकूं येऊं लागले होते. थोड्याच वेळांत प्रासादाच्या महाद्वारापाशीं ती येऊन पोंचणार होती.

अजातशत्रु आणि देवदत्त तिच्या स्वागतासाठीं महाद्वारापाशीं येऊन उभे राहिले.

देवदत्ताबरोबर झालेली चर्चा अजूनहि अजातशत्रूच्या डोक्यांत घोळत होती. देवदत्तानं सगळं पटवून दिलेल होत. तरीहि त्याचं मन स्वस्थ नव्हतं. वरवर तो समाधान झाल्याचं दाखवत होता. सुनदा येणार म्हणून सतोष झाल्यासारखं दाखविण्याचा प्रयत्न करत होता पण मनात चलबिचल चालूच होती. सारखं वाटत होतं, “ या साध्वीचे पाय प्रासादाला लागले कीं, पित्याला बदिवान करण्याचं पाप पुन्हां आ वासून आपल्याला गिळायला उभं तर राहणार नाही ? या पतिव्रतेच्या शापानें कांहीं भलं बुरं तर घडणार नाही ? ”

देवदत्तानं त्याच्याकडे बघितलं. दोघेहि हंसले. अजातच्या अंतःकरणांतून मात्र धूरच धुमसत होता. ●●●

# : ६ :

नगरीचं महाद्वार ओलांडून सुनंदेचा रथ राजपथावर आला. दुथडी भरलेली लोकगंगा उचंबळून आली. उत्साही नगरवासियांच्या आनंदाला उधाण आलं. रथ जसा पुढें पुढें सरकत होता तसतसा जनसंमर्द हेलावत राहिला.

दृष्टिक्षेप टाकावा तिकडे हजारों हात लवलवत उभे रहात होते. उत्साहानं ताठ फेकले जात होते. मुठीमुठीतून रंग फेंकले जात होते. विविधरंगी शेंकडों इंद्रधनुष्यें उमटत होतीं, पुसलीं जात होती. त्या रंगीबेरंगी पार्श्वभूमीवर चेतोहर पुष्पवृष्टि होत होती. फुलांचा सडा पडत होता. सडासंमार्जनानी निर्मळ झालेल्या मार्गांनीं बहुरंगी रंगावल्यांचीं वसनं ल्यालीं होतीं. त्यांतल्या नाजूक वेलबुट्ट्यांतून कलाकुसरीनं गुंफलेली अक्षरं बोलत होती, “ राजमाता सुनंदा की जय ! ”

त्या विनटलेल्या मार्गावर होणाऱ्या पखरणींनं सतत उलगडत जात होत्या फुलाच्या पायघड्या. त्यांतलीं नाजूक पुष्पं सरसर सरून सुबक अक्षरं रेखाटत होती, “ राजमाता सुनदेचा जयजयकार असो ! ”

सहस्रावधि कंठांतून एकच जयनाद पुकारत होता, ‘ राजमाता सुनंदा की जय ! ” वातावरणांत दुसरा आवाज नव्हता— प्रतिसाद नव्हता. आसमंतांत अन्य शब्द नव्हता. अंतःकरणांत तोच जयघोष निनादत होता. कंठोकंठी तोच जयजयकार दुमदुमत होता. ओठाओठावरून तोच जयध्वनि उडत होता. “ राजमातेचा विजय असो ! ”

“ राजमाता सुनंदा की जय......!

राजमातेचा विजय असो......!!

राजमाता सुनंदेचा जयजयकार असो...... !!!”

निवल्या नयनांतून, चढत्या आवाजांतून, उचंबळलेल्या अतःकरणातून फेकल्या जाणाऱ्या हातांतून, नाचणाऱ्या पायांतून, डोलणाऱ्या मानांतून एकच एक आवाज, एकच एक पुकार, एकच एक नाद ! ”

“ राजमाता सुनदेचा जयजयकार असो ! ”

त्या देवदुर्लभ स्वागतानं सुनदा गलबलून गेली. उरीं दाटलेला गहिंवर दो लोचनातून गंगायमुनेसारखा वाहू लागला हसऱ्या-नाचऱ्या नगरवासियांकडे पाहताना डोईवर झालेल्या पताका-तोरणांच्या गर्दीकडे पाहयला तिला फुरसत कोठें होती ? दोन्ही तीरावरच्या पौरजनाची अभिवादनं स्वीकारतांना लवून नमस्कार करणाऱ्या किती कमानी तिच्या रथावरून मार्गें पडत गेल्या, तिला पत्ताहि लागला नाही ! प्रजाजनांचं अपार प्रेम पाहून तिचं भान हरपलं. कोमल अतःकरण कासावीस झालं. अशा सहस्रधारांनी आपल्यावर बरसणाऱ्या या आपुलकीला इतकी वर्षं आपण वचित कसें झालों, हे तिला उमजेना.

मार्गाच्या दोन्ही तटांवर दाटलेल्या वत्सल प्रजाजनाकडे बघण्यासाठीं तिला एकसारखी मान फिरवावी लागे. पण त्याचा शिणवटा तिला जाणवला नाहीं. नगरीच्या महाद्वारापाशीं तिनं जे हात जोडले ते थेट प्रासादाच्या महाद्वारापर्यंत येऊन पोचेपर्यंत सोडण्याची मोकळीक तिला मिळाली नाहीं. जनसरोवराच्या तरंगावर अलगद हेलकावत एखाद्या ती कमलपुष्पासारखी पुढें पुढें जात होती. आपला रथ प्रासादापाशी केव्हां येऊन पोंचला, हेहि तिला कळल नाहीं.

या साऱ्या आनंदोत्सवात एक गोष्ट मात्र सलत होती. 'महाराणी' सुनंदेचा जयजयकार न होता, सारे प्रजानन 'राजमाता' सुनंदेचा जयजयकार कां करतात? या आनंदाच्या क्षीरसागरांत तिनं तो मिठाचा खडा तळाशीं डांबून ठेवला होता.

रथ प्रासादापाशीं येऊन थडकला. अनेक वर्षांनंतर या वास्तुपुरुषाचं दर्शन तिला होत होतं. मनांत आलं, 'वास्तुपुरुषा, क्षमा कर. इथून गेले तेव्हां तुझा धड निरोपदेखील घेऊं शकले नव्हते. पण तें तू विसरलास आहेस. पूर्वीच्याच मायेनं तू तुझे बाहु पसरून मला आलिंगनासाठीं बोलावतो आहेस खरा... पण...'

धांवत–दौडत जावं आणि त्याच्या मिठींत स्वतःला हरवावं अशी तीव्र इच्छा तिच्या मनांत उद्‌भवली. पण तें तिला शक्य नव्हतं.

ती आतां स्वतःच्या पायावर उभी राहू शकत नव्हती! पाय उरले पण गति नाही! बळ नाहीं! आपलेच पाय, आपल्याला चालतं करायला असमर्थ! असून नसून सारखेच! लुळे पांगळे... सजीवाला केवळ निर्जिवाची जोड... दिखाऊं... दिसण्यापुरतें!

ती उभी राहूं शकत नव्हती, ती चालूं शकत नव्हती, ती उतरूं शकत नव्हती, ती चढूं शकत नव्हती!

या प्रासादातून त्या रात्रीं तिला बळेंच बाहेर काढण्यांत आलं. दूर अरण्यांत देवदत्त तिला पळवून नेत होता. संधि मिळताच तिन भरधाव दौडणाऱ्या रथांतून उडी झोकली... कायमची सुटका होण्यासाठीं तिनं तें अचाट साहस केलं. पण त्या साहसानं तिचे फक्त पाय लुटले. जीव तसाच ठेवला! तिची हालचाल बद झाली.— तिची गति थडावली

आज जिवंतपणीं तिला दुसरे हात उचलूं लागत होते. तिला तें सहन होत नव्हतं, सहन होण्यासारखं नव्हतं, इतका वेळ तिच्या डोळ्यातून झरणाऱ्या गार अश्रूंना आतां ऊन येत चालली–उकळी फुटूं लागली! तिच्यासाठीं खास तयार केलेल्या आसनावर तिला बसवण्यात आलं. याच वास्तूंत तिचे हे पाय भिंगरीसारखे वणवणले होते. इथला कोपरान् कोपरा, भिंत न् भिंत, दगड न् दगड तिच्या परिचयाचा, जिव्हाळ्याचा, तिची आज्ञा ऐकायला तत्पर असे. आज ती त्यापैकीं कुणाजवळ जाऊं शकत नव्हता. सलगीनं हितगुज करूं शकत नव्हती. त्या साऱ्या गोष्टी तिला लावून लावून खुणावत होत्या बोलवत होत्या. "किती वर्षांनीं भेटतेस, ये माझ्याजवळ, बोल ना काहीतरी!" अशा विनवत होत्या. त्या बिचाऱ्यांना ठाऊक नव्हतं कीं, त्याच्याप्रमाणेच तीहि आपले पाय गमावून बसली आहे!

अजातशत्रु पुढ आला. त्यानं तिच्या पायांवर डोकं ठेवलं. त्याच्या वंदनेचा तिन स्वीकार केला. संवय झालेल्या ओठांनीं आशीर्वाद उच्चारले, "उदंड आयुष्मान भव."

त्या आशीर्वादानं तो तृप्त झाला. एक भय सारखं त्याच्या मनांत चुकचुकत होतं. ही प्रासादांत आली कीं, कांहींतरी विपरीत घडणार! पण तिन नेहमींसारखाच आशीर्वाद दिला.

तिला विश्रांती मिळायला हवी म्हणून साऱ्या लोकांना चालतं व्हायला सांगण्यात आलं, तिच्यापाशी फक्त दोन-चार जणच उरले. अजातशत्रु आणि देवदत्त त्यांच्यांत होते.

आता बोलायला हरकत नव्हती. मनाच्या बुडाशीं दाबून ठेवलेली मळमळ तिला आतां ओतून द्यायची होती. तिनं सरळ विचारलं, "महाराज कुठं आहेत? मला उतरवून घ्यायला ते कां आले नाहींत?

त्या थेट प्रश्नान अजातशत्रू बिचकला. देवदत्त मनातल्या मनांत चमकला. पण धीटाईनं तो उत्तरला, "महाराज, स्मृति-मंदिरांत आहेत!"

"स्मृति-मंदिर?" कांहींच पत्ता न लागल्यामुळें सुनन्देनं विचारलं

"हो, स्मृति-मन्दिर!" आपल्या आवाजांत जीव ओतून अजातशत्रु बोलूं लागला. "आई, तुला त्या रात्रीं जाळून टाकल्यानंतर तूं भस्मसात् झाल्यामुळें महाराजाना शोक अनावर झाला. सहा महिने ते प्रासादाबाहेर फिरकलेदेखील नाहीत, तुझी स्मृति चिरंतन रहावी म्हणून तुझ्या जळलेल्या महालाच्या ठिकाणीच सात चौकांचं एक सुरेख सुवर्ण–स्मृति–मन्दिर त्यांनीं बांधून घेतलं. तुझ्यावर अपार प्रेम असल्यामुळें त्यांना तिथच वास्तव्य करून राहणं फार आवडतं."

एवढं बोलून अजातनं देवदत्ताकडे बघून डोळे मिचकावले.

"मला घेऊन चला त्याच्याकडे."

"आत्ता? ताबडतोब?"

"हो. या क्षणीं."

"आत्तां तर तू आलीस. जरा विश्रांती घे. मग तुला तिकडे नेण्याची व्यवस्था आपोआप होईल. इतकी घाई कशाला?"

बिंबिसारला स्मृति–मन्दिराचं कारागार बनवून तिथं डांबून ठेवलं आहे ही वस्तुस्थिती लपवण्यांसाठी अजातशत्रूची एकसारखी धडपड चालली होती.

पण त्या साध्वीला संशयाचा वास आला होता. प्रासादांत पाऊल ठेवल्यावर पतिदर्शनावांचून तिला बरं कसं वाटणार?

तिनं विचारलं, "ते ठीक आहेत ना?"

चांचरत उत्तर मिळालं, "ठीक...हो ठीकच आहेत..."

"वाक्य असं अडखळतच कां फुटत?"

"नाहीं, म्हणजे तसे बरे आहेत...पण..."

"पण बिण नको...त्याचं दर्शन घेतल्याशिवाय मी या प्रासादांत पाण्याचा घोटसुद्धां घेणार नाहीं." सुनन्दानं निश्चयानं सुनावलं.

मग देवदत्त जरा कठोर झाला. दमदार आवाजात त्यानं बजावलं, "राजमातेनं भलता हट्ट करूं नये. योग्य वेळी योग्य गोष्टी होतील. त्याबद्दल विश्वास बाळगावा."

"राजमातेला सुनावणारा तूं कोण?...आणि मला 'राजमाता' कां म्हणता? सारे प्रजाजन माझा 'राजमाता' म्हणून जयजकार कां करीत होते? महाराणी सुनन्देचा जयजयकार कां होत नव्हता?" कढापाठोपाठ कढ उतूं जात होते.

"सत्य फार वेळ लपविता येत नाहीं. आणि लपविण्याची गरजहि नाहीं." गंभीरपणें देवदत्त बोलूं लागला, "राजमाते, प्रजाजनाशीं तुझं नातं आतां महाराणीच उरलेलं नसून राजमातेचच झालं आहे!"

"म्हणजे?"

"याचा सरळ अर्थ एवढाच कीं, बिंबिसार हे आतां सिंहासनाधीश्वर उरलेले नाहीत."

"मला याची थोडीशी कल्पना आलीच. वनवासांत जाण्यापूर्वीच आमचं दोघांचं एकदां बोलणं झालं होतं. वाढत्या वयाची दखल घ्यावी, आणि राज्यसूत्र अजातशत्रूच्या हाती सुपूर्त करून आपण धर्मकार्यांत वहून जावं, असं ते म्हणाले होते. मीहि सम्मति देऊन त्यांच्याबरोबर चलायची सिद्धता केली होती. पण मधें हें विपरीत घडलं. त्यांनी त्यांची इच्छा पूर्ण केली...मला आतां त्यांच्याबरोबर गेलं पाहिजे..."

तशाहि अवस्थेंत सुनन्देनं उठायचा प्रयत्न केला. पण तें कसं शक्य आहे?

सुनन्दा या काळांत कितीतरी पालटली होती. रथांतून उडी झोकली खरी पण ती तिच्या हातापायांना मुकली. खर तर जीवावर बेतलं होतं. देवदत्ताच्या मनांत तिचा बळी घ्यायचा होता. त्याच्या खड्गाचं लखलखतं पात त्यावेळी तिच्या रक्तप्राशनासाठीं जिभल्या चाटूं लागलं, पण तिच्या सौभाग्यानं देवदत्ताचा हात मार्गे खेचला होता. कोणीतरी कान भरून त्याला हंसलं होतं, "वा रे मर्दा! एका बेशुद्ध स्त्रीवर हात चालवतोस? एका निष्पाप अबलेचा वध करण्यांतच तुझा पुरुषार्थ साठवलेला आहे? एका साध्वीच्या पवित्र देहाच्या चिधड्या करून कोणत्या नरकाच्या पायऱ्या तू रचणार आहेस? धिःकार असो तुझ्या बाहुबलाचा! एका साध्वी महाराणीचा खुनी! स्त्रीहत्येचं पातक...स्त्रीहत्येचं पातक..."

देवदत्ताचं खड्ग मागें फिरलं आणि कोषांत जाऊन बसलं. देवदत्तानं हात पुढें केले–तिला अलगद उचलून रथात ठेवली आणि पूर्व योजनेनुसार वनांत जाऊन वीरभद्राच्या ताब्यात दिली.

वनवासांतलीं तिचीं वर्षं अशींतशीं उडालीं पण त्यांनीं तिची झळाळी लुटून नेली. शिशिरांतल्या शुष्क नदीपात्रासारखी बनून ती आज प्रासादांत परत येत होती. कैक वर्षांच अन्तर तोडून काळाशी धून नातं सांधण्याचा प्रयत्न चालला होता. मधला काळ केशवार्पण झाला. अधारांत गेला, कशाचा कशाशीं सबध नाही असा. तें वन, ते वृक्ष, ते पशुपक्षी, तिथले ते जंगली लोक...बाह्य जगाशीं संबंध नाही. बाहेरच्या जगांत मेरूपर्वत माना उंचावून उठले असते किंवा महासागराच्या तळाशी गाडले गेले असते तरी त्याची गंधवार्ताहि तिला मिळाली नसती, असं अलिप्त जिणं जगावं लागल होतं. त्या मर्यादित वनांतहि ती एखाद्या बेटासारखी वेगळी नादत होती. तपःसाधनेत ती गढून गेली. सौन्दर्याच कवच गळून पडल. तपस्विनीच्या सांद्र तेजाची नवी कात तिच्या अंगावर चढली.

अशी तपस्विनी राजप्रासादांत परत आली होती. इथल्या वातावरणांत आल्यावर तिला वाटूं लागलें पुन्हा आपले पाय फुटणार? पण आतां तिच्या वाटण्यावर फारच थोड्या गोष्टी होऊं शकणार होत्या!

बिंबिसारकडे जाण्याचा आग्रहच तिनं धरला तेव्हां देवदत्तानं निक्षून सांगितल, "आपणहून राज्यत्याग करण्याचं पुण्य बिंबिसार महाराजांच्या भाळी लेखलेल नव्हतं. त्याना बाजूला करावं लागलं. जबरदस्तीनं त्यांची इच्छा नसताना."

"कां? कशासाठीं?"

"त्यांचा धर्म प्रजाजनांना छळू लागला म्हणून!"

"त्यांचा धर्म? त्याचा धर्म तर राजधर्म होता–आणि राजधर्मानुसार प्रजेचा मुलाप्रमाणें सांभाळ करणं, हेंच राजाच कर्तव्य होत. तसेच ते वागत."

"पण पुढें ते हे विसरले... राजधर्मापेक्षाहि त्यांचा व्यक्तिगत धर्म त्यांच्या शासनात अधिक लुडबूड करू लागला."

"असंभवनीय. त्यानी बुद्धानुयायित्व स्वीकारलं तरी माझ्या विष्णुपूजेंत कधीच अडथळा आणला नाही. या प्रासादांतून बाहेर पडेपर्यंत मी ब्राह्मणकन्याच होते. वैदिक धर्माची उपासना करीत होते. तरीहि मी त्याची महाराणी होते."

"हीच गोष्ट त्याना खपत नव्हती. म्हणून तर तुझा काटा काढण्यासाठीं त्यांनीं तुला जाळून टाकण्याचा मार्ग स्वीकारला. तू बुद्धाची अनुयायी होणं कालत्रयीं शक्य नाही, याची जाणीव असल्यामुळेंच त्यानीं तुला नाहीस करण्याचा हा मार्ग स्वीकारला. धीटपणान तुझा वध करण्याच मनोधैर्य त्याच्या अंगी नव्हत. म्हणून सवतिमत्सराची मायावी भीति उभी करून अजातशत्रूकडून तुला नामशेष करण्याचा मार्ग त्यानी पत्करला. परतु मीं हा डाव ओळखला. अजातशत्रूच्या डोळ्यात वेळीच अंजन घातलं. म्हणून तुला वाचविण्यांत आलं"

"हे खोट–निखालस असत्य आहे!"

"तू म्हणून भागणार नाही. लोकांच्या ओठाओठावर हेंच सत्य चालतबोलतं झालं आहे. तें त्याच्या मेंदूत कोरल गेलं आहे तूं तें नाकारून काय उपयोग? रस्त्यावरच्या कोणाहि सामान्य नागरिकाला विचार- तो सागेल की, बिंबिसारनं आपला धर्म लादून वैदिकांचा समूळ नायनाट करण्याचा चग बाधला. त्यात प्रत्यक्ष स्वतःच्या पत्नीची –ती केवळ ब्राह्मण म्हणून आहुति द्यायलाहि त्यानं मागेंपुढें बघितलं नाहीं. म्हणून केवळ धर्मासाठी– अजातशत्रूला स्वत.च्या पित्याला कारागृहात डाबावं लागलं आणि वैदिक धर्म वाचवावा लागला..."

सुनंदेला ऐकवेना. बिंबिसार अशा उतारवयांत कारावासात खितपत पडावा, त्याची अंधुकहि कल्पना इतक्या दिवसांत आपल्याला मिळू नये–आपण मात्र सत्कार स्वीकारत, आनंदोत्सवात सामील व्हावं. छे. छेः! आपल्याला ताबडतोब गेलच पाहिजे आणि देवदत्तानं उच्चारलेल्याची शहानिशा करून घेतलीच पाहिजे!

तेवढ्यांत देवदत्तानं बजावलं, "जे लोक बोलतात, तेच राजमाते, तुलाहि बोललं पाहिजे. त्यासाठी तर तुझी सुटका केली आहे तू ब्राह्मणकन्या आहेस. वैदिक धर्माच्या टिकावासाठीं तुला हेंच बोलल पाहिजे. तू केवळ ब्राह्मणकन्या होतीस म्हणूनच तुझा वध करण्याचा धाक राजा बिंबिसारन घातला, हें सर्व प्रजाजनासमोर तूं म्हटलं पाहिजेस. नाहीतर बिंबिसारप्रमाणेच तुलाहि एखाद्या स्मृति-मदिरात–"

"त्याच्याबरोबर राहायला मिळणार असेल तर माझी खुशाल तिथं जायची तयारी आहे. आणि केवढ्याहि धमक्या दिल्यात तरी सागून ठेवते, माझी वाचा असत्य वदणार नाहीं. तुम्ही म्हणाल तें, तुम्ही सागाल तें, मी बोलणार नाही. प्रत्यक्ष त्याना भेटून माझी खात्री पटली तरच मी तुम्ही म्हणता त्यावर विश्वास ठेवीन–नाहीपेक्षा मरण पत्करीन. गेली अनेक वर्षं वनवास भोगला– कारावासाच मला यत्किंचित भय नाही!"

सुनदा धर्मनिष्ठ आहे. धर्मावर गदा आणणाऱ्या राजाला ती विरोध करील. आणि याचा आधार घेउन झालेली राज्यक्रांति स्थिर करता येईल, असा देवदत्ताचा अदाज होता. म्हणून तर त्यान तिला जिवत ठेवली होती. आणि ती सुटका करून तिला पुन्हा प्रासादात आणण्यापाठीमागें त्याचा तोच उद्देश होता. परंतु सुनदेच्या या निश्चयानं त्याचा बेत फिसकटला होता. आडाखे चुकले होते. सुनदेला धर्म

निष्ठेवर पतिनिष्ठेनं मात केली होती. पण हुकलं तें हुकलं होतं. यांतून वाट काढायला हवी होती.

इतकावेळ अजातशत्रु गप्प उभा होता. सुनदेला आपल्या बाजूला फितवून घेण्याची कामगिरी देवदत्तानं स्वतःहून अगावर घेतली असल्यामुळें आपण कांही मधें बोलावं असं त्याला वाटलं नाहीं. किंवा काम बिनसल्याचं खापर त्याच्या माथी फोडलं जाण्याचीहि शक्यता नव्हती. त्यामुळें शांतपणें तो देवदत्ताची वकिली ऐकत होता. सुनंदेचा निश्चय ऐकून त्यालाहि मनांत कसंनुसं झालं.

मग देवदत्ताकडे अजिबात लक्ष न देतां सुनंदा अजातशत्रूला म्हणाली, "अजात, मला महाराजाकडे घेऊन चल. उगाच माझा वेळ घेशील, तर मी जागच्या जागीं जीभ हासडून प्राण देईन, ध्यानांत ठेव."

"होय आई, करतो व्यवस्था, तावडतोब तुला तिकडे नेतो." असं बोलून अजातशत्रु तयारीला लागला.

ठण...ठण.ठणाण..ठण...

पलिकडच्या दालनांत कसला तरी आवाज झाला. एकदम गडबड उडाली. धांवाधांव झाली. कोणा पोराची रडारड ऐकूं आली. सुनंदा इथं एकटी आहे, हें विसरून अजातशत्रुहि तिकडे धावला. आणि परत आला तो त्याच्याच मुलाला फरफरटत ओढत.

"काय झालं रे, अजात?" सुनदेनं, विचारलं "कोण हा मुलगा?"

"हे आमचे दिवटे चिरंजीव!"

"दिवटे कां म्हणतोस? सोन्यासारखं लेकरूं तें– अपशब्द का उच्चारावेत?...ये...बाळ, इकडे ये." ती त्या बाळाला बोलवत होती पण अजातनं त्याला घट्ट पकडून ठेवला होता. मुलाला त्या म्हाताऱ्या आजीकडे जावं असं वाटत होतं; बाप मात्र सोडायला तयार नव्हता.

"अरे, धरून कशासाठीं ठेवलं आहेस त्याला? येऊं दे ना माझ्याकडे... या म्हाताऱ्या वयांत या नातवडांच्या देखभालींतच आमचं आयुष्य सरायचं..." कौतुकानं ती म्हणाली.

अजातनं मुलाला सोडल. तो मुलगा सुनंदेकडे आला. आसवांचं खारं पाणी त्याच्या नाजूक गालावर रेषा उमटून गेलं होतं. रडण्यानं त्याचे डोळ कोमजले होते– डोळे चोळून लाल झाले होते. तरीहि नवख्या माणसाकडे जाताना येतो तो बुजरेपणा त्याच्या चिमुकल्या डोळयांत साठलाच होता. अगदीं हळूं हळू पावलं टाकीत तो तिच्याजवळ आला. आणि तिन त्याच्या खांद्यापाशी धरून जवळ ओढीपर्यंत तसाच उभा राहिला.

आजीच्या अपूर्वाईनं त्याच्याकडे बघत सुनंदा म्हणाली, "गरीब पोर तें! रडवलंत कां त्याला? मुलाना कसं फुलासारखं जपायला हव.... बाकी अजात, मुलगा अगदी तुझ्या वळणावर गेलाय– डोळे आणि कपाळ तेवढं सुनवाईच घेतलयन्!"

त्या मुलाला जवळ ओढून तिनं त्याचा मुका घेतला. याच्या रेशमी केंसांवरून मायेन हात फिरवला. आणि ती अजातला म्हणाली—

"का उगाच मारत होतास त्याला?"

"उगाच?" फुस्काटत अजातशत्रु म्हणाला, "दिसायला एवढासा आहे पण महाव्रात्य, खोडसाळ आहे! त्याच्या हातून एखादी गोष्ट चुकूनदेखील घड हाण मुष्किल! आता तूच देवासारखी त्याला तारायला आलीस; नाहीतर राईराई एवढीं खांडोळीं करून टाकलीं असतीं त्याची!"

"ती रे कशासाठीं?"

"कशासाठीं, ?" डोळयांनीं त्या घाबरलेल्या पोरावर आग ओकत अजातशत्रु कडकडला, "उपद्व्यापच तसे आहेत त्याचे."

"केलन तरी काय त्यानं?"

"तुला अभिवादन करण्यासाठीं इकडे यायचं म्हणून मी राजमुकुट काढून ठेवून इकडे आलों. पलिकडच्याच दालनांत जरा उंचावर मीं तो उतरवून ठवला होता. हा गेला तिथं धडपडायला. आत्तांपासून याचा राजमुकुटावर डोळा! हातीं लागेना तेव्हा काठीनं रेटून यानं तो खाली पाडला...असा संताप येतो..."

"शांत व्हावं, अजात. मुलं खोडया करायचींच. तुम्ही काय खोडया केल्याशिवाय एवढं वाढलांत...मनांत कांहीं न आणतां सहन करायचं असतं सगळं..." बाळाला जवळ ओढत सुनदा समजुत घालीत होती.

"शात काय रहावं? मागं भर दरबारांत यानं माझा अगरखा फाडला. ओढून ओढून. सर्वांदेखत माझी नाचक्की, सहन केलं पोरवय आहे म्हणून, आपलाच मुलगा–अज्ञानी, निष्पाप या भावनेन फार सोडलं त्याला...पण तो कांहीहि धडा शिकला नाहीं...आज राजमुकुटावर धाड आली त्याची..."

"त्याचं तरी काय चूक आहे, अजात? वळणाचं पाणी वळणालाच जायचं...त्यांना डोळयांसमोर जें दिसत त्याचंच अनुकरण हीं बापडीं करतात!"

"आई..." जोरांत ओरडून अजातन तिला थांबण्याचा प्रयत्न केला.

"कितीहि ओरडलास तरी मी घाबरायची नाहीं आणि कितीहि डोळे वटारलेस तरी त्यांत मी मावायची नाहीं... या मुलापेक्षांहि तूं लहान होतास तेव्हांपासून बघितलं मीं तुला... आणि असा उनाडपणा केलास तेव्हां तुझ्या वडिलांनीं तुला कसं वागवलं तेंहि आठवतं मला..."

"उगाच काय सांगतेस? मी असा वागलों असतों तर बिंबिसार महाराजानीं माझ्या केव्हांच चिंध्या चिंध्या करून टाकल्या असत्या"

"तुझ्या वडिलांना तूं ओळखलेलं नाहींस!"

"काहीं म्हणालीस तरी मीं या मुलाला क्षमा केली; ज्या पित्याच्या हृदयानं त्याच्याशीं आजपर्यंत वागलों, तसं बिंबिसारांनीं मला कधीच वागवलं नसणार. बिंबिसारच काय, मी आजवर या मुलाशीं कसा वागलों, हें ज्याला ज्याला ठाऊक असेल तो हेंच म्हणेल कीं पिता असावा तर अजातशत्रूसारखा!"

त्याचा अभिमान खोटा ठरावा असं हास्य करून सुनंदा त्याला म्हणाली— "अजात, पोटच्या पोरावर माया कशी करावी, याचे पाठ तुला तुझ्या पित्याकडून घ्यायला पाहिजेत; नसता अहंकार मनांत बाळगू नकोस!"

"महाराज माझ्यावर किती प्रेम करीत होते आणि कां करत होते, हें मला चांगलं माहिती आहे!" आपण अगदीं रोख उत्तर देत आहोंत, अशा ठसक्यात अजातशत्रु बोलला आणि त्यानं देवदत्ताकडे बघितलं. त्यानंहि संमतिदर्शक डोळे मिचकावले.

"आपल्याला सर्व गोष्टी कळतात; आपण सर्वज्ञ आहोंत, हा माणसाचा गर्व साफ खोटा असतो, अजात!" तिनं सांगितलं.

"खोटं काय? महाराजाचं माझ्यावर प्रेम होतं, याला पुरावा

काय ? मी एकदां बंड करून उठलों, याबद्दल त्यांनीं मला क्षमा केली ही एकच घटना ना ? पण महाराजांनीं मला त्यावेळीं कां क्षमा केली हें मी चांगलं जाणून आहे. मला ठार मारलं असतं तर राजलक्ष्मी दुसऱ्या कोणा कुळवंशाच्या हातीं सुपूर्त करावी लागली असती, ती आपल्याच घराण्यांत रहावी, या स्वार्थी हेतूनं महाराजांनीं मला जीवदान दिलं. पुत्रवात्सल्य म्हणून नव्हे, राजकारणातला एक डाव म्हणून ! "

अजातशत्रूला चेव आला होता. हा प्रश्न कधींतरी उगवेल आणि त्याला काय रोखठोक उत्तर द्यायचं, तें त्यानं अनेकवेळां योजून, पक्कं तयार करून ठेवलं होतं. तेच तयार शब्द तो घडाघडा बोलत होता.

" आई, महाराज माझ्यावर प्रेम करीत होते, हें तू मला सांगावंस? जिच्यावर त्यांनीं जीवापलिकडे जीव लावला, तिलाच वेळ येतांच जाळून टाकण्याची आज्ञा करणारा नरपशु आपल्या मुलावर प्रेम करीत होता हें तूं सांगतेस ? "

सुनंदेला राहवलं नाहीं. तिनं कानांवर हात ठेवले. त्याचं बोलणं अडवून ती म्हणाली, " आपल्या पित्याला 'नरपशु' म्हणतांना तुझी जीभ जळून कशी गेली नाहीं ? "

" काय खोटं आहे त्यांत ? "

" काय खोटं आहे ? तें उच्चारायला तूं आज जिवंत उरला आहेस, ही त्यांचीच कृपा आहे, हें ठाऊक आहे तुला ? "

" त्या बंडानंतरहि त्यानीं मला जिवंत ठेवलं, म्हणूनच म्हणतेस ना ? "

" म्हणून नव्हे. तुझ्या बंडाची बातमी मला इथं आल्यावर कळली तोंपर्यंत मला त्यासंबंधी अवाक्षरहि ठाऊक नव्हतं. "

" मग दुसरा कोणता पुरावा ? " अजातशत्रूला दुसऱ्या गोष्टी ठाऊक नसल्यामुळें त्यान साश्चर्य प्रश्न केला.

" एक...दोन...तीन...हवे तेवढे पुरावे आहेत माझ्याजवळ. पण माया दडवून ठेवण्यांतच तिच खरं मोल असतं म्हणून आजवर मीं तें लपवून ठेवलें. आज वेळच आली तेव्हां सागतें. पुत्रावरच्या आपल्या प्रेमाची जाहिरात तुझ्या वडिलांनीं केली नाहीं, याचा अर्थ त्याच्या मनांत तुझ्याविषयी काहींच नव्हतं असं मानतोस तूं ? तुझ्या खुळेपणाची कींवच करावी, झालं ! " सुनंदा तुच्छतेनं त्याच्याकडे बघून बोलली.

अजातशत्रूला मात्र राहवेना. हिच्याजवळ आहेत तरी अशा कोणत्या गोष्टी, त्या ऐकायला तो उत्सुक झाला. मनांत सारखं येत राहिलं, आपल्या वडिलाना वार्धक्यांत कारावासांत डाबण्यांत आपल्या हातून अन्याय तर झाला नाहीं ? त्यानं उतावीळ होऊन सांगितलं.

" आहेत ना तुझ्याजवळ पुरावे, मग सागत कां नाहीस ?"

" तुला ते सांगावेत, एवढ्यासाठीं कां आजवर ते दडवून ठेवले होते. ज्याची त्याची खूण ज्याच्या त्याच्या मनांतच बरी असते. ती उघड करण्यांत त्याची गोडी मात्र उतरत जाते...आणि मी सागितलं म्हणून तूं थोडाच मानणार आहेस ? माझं त्याच्यावर दाट प्रेम म्हणून काहीं कल्पित कथा मी रचून सांगतें आहे, असंहि वाटेल तुला ! तसा खोटेपणाचा आळ येण्यापेक्षां, संशयाला तुझ्या मनात वाव देण्यापेक्षां, न बोललेलंच काय वाईट ? तुझी समजूत तुला लखलाभ असो; माझं समाधान माझ्यापाशी राहो. "

" नाहीं आई, उगाच ताणूं नकोस. सत्य दडवूं नकोस. खरं काय असेल, तें सांग. माझा विश्वास आहे तुझ्यावर. वेळ आली असतांना असं लपवून ठेवून मला विनाकारण धुमसत ठेवूं नकोस. "

" मी सांगीन त्याच्यावर तूं विश्वास ठेवणार, हें खरं ? "

" परमेश्वराशपथ ! "

" आणि त्यांतून तू अपराधी ठरलास तर प्रायश्चित्त काय घेशील ?"

" त्या अपराधाचं परिमार्जन होण्यासाठीं जें काय प्रायश्चित्त घ्यावं लागेल, तें घ्यायची तयारी आहे माझी. "

" हें प्रायश्चित्त कोण ठरवणार ?"

" तूं म्हणशील तेंच प्रायश्चित्त... "

" मी रे बाबा कशाला मधें ?"

" मग महाराज सागतील तें प्रायश्चित्त मी घेईन. "

" ते तर तुला मुक्तच करतात ! "

" माझं मीच योग्य प्रायश्चित्त घेईन ! मग तर झालं ? अगदीं देहांत प्रायश्चित्त घ्यावं लागलं तरीहि— "

सुनंदेनं त्याला थांबवलं. त्याला सागितलं, " भलतं कांहीं उच्चारूं नकोस. पण मी सत्य तुझ्यापुढें मांडलं कीं खरोखरच तुला जाणीव होईल कीं तुझ्या अपराधाची भरपाई, देहांत प्रायश्चित्तानंसुद्धां पूर्णपणें होऊं शकणार नाही. "

मग सुनंदेनं त्याला त्याच्या जन्माची हकिगत सांगितली. अजातशत्रु आणि देवदत्त भारावून ती कथा ऐकत होते. आणि सुनंदाहि एकरूप होऊन तो प्रसंग साकार करीत होती. कैक वर्षांपूर्वी जें घडलं तें जसंच्या तसं तिच्या नजरेसमोर उभं राहत होतं.

राणी चेलना प्रसूत होऊन तिला पुत्र झाला ही वार्ता महाराज बिंबिसारांच्या कानीं आली, तेव्हां ते सुनंदेच्या महालांतच कुठल्यातरी गंभीर विषयावर चर्चा करीत होते. बिंबिसारला हें पहिलं पुत्ररत्न होत होतं, अस नव्हे. अभयकुमार, मेघकुमार हे राजपुत्र त्यापूर्वीच जगांत अवतरलेले होते. असं असूनहि तृतीय पुत्रजन्माची वार्ता बिंबिसारनं पहिल्या मुलाच्या जन्माच्यावेळीं व्हावा तितक्या आनंदानं स्वीकारली. तो गंभीर विषय बाजूला सारून तो उत्साहानं सुनंदेला म्हणाला, " चल सुनदे, आपल्या तिसऱ्या बाळाला डोळे भरून पाहूंया तरी ! "

मग ते दोघेहि उठले. आणि चेलना प्रसूत झाली होती तिथं जाऊन पोंचले. छोटं बालक पाळण्यांत गाढ झोंपलं होत. त्याच्या डोक्यावर केस फारसे नव्हते. इवल्याल्या डोळ्यांवरची भुवईची रेषासुद्धां अगदीं अंधुक होती. त्या बारीकशा जीवाचा श्वासोच्छ्वास भराभरा होत होता. मधूनच तो पाय हालवी; किंवा गच्च मिटलेल्या मुठीनं हवेशीं दगामस्ती करी ! बाळ गोंडस होतं, लालबुंद होतं. पाहिल्यावर डोळे तृप्त व्हावेत अस देखणं होतं. बिंबिसारला तें फार आवडलं.

त्याच्याकडें पहात बिंबिसार म्हणाला, " कसा राजबिंडा दिसतो आमचा नवा राजपुत्र ! "

या नव्या राजपुत्राचं भविष्य ऐकायला बिंबिसार अगदीं उत्सुक होता. हा बाळ नक्कीच चक्रवर्ति होणार याबद्दल त्याच्या मनात बिलकूल संदेह नव्हता. सम्राटाचीं लक्षणं त्या नाजूक मुखड्यावर जन्मताच उमललेली होतीं. ऐकायचं होतं फक्त या लेकराचीं मनगटं मगधाच्या सीमा लांबवणार तरी कोठवर ? वर कैलासाला जाऊन तो भिडणार कीं खाली समुद्रवसनांपर्यंत ?

बारशाच्या दिवशी सायनाचार्य आले. भविष्य ऐकायला फक्त दोघांनाच परवानगी होती. महाराज बिंबिसार आणि महाराणी सुनंदा यांना. प्रत्यक्ष जन्म देणाऱ्या चेलना माऊलीलासुद्धां नव्हे

सायनाचार्यांनी कुडली मांडली. कुंडलीतल्या ग्रहस्थितीचा ते अभ्यास करूं लागले. त्या आरशांत त्यांना भविष्याचं प्रतिबिंब दिसूं लागलं. बिंबिसारहि गभीर बनला. सायनाचार्य काय शब्द उच्चारतात ते ऐकायला कान अगदी उत्सुक झाले होते. सायनाचार्यांच्या उजव्या हाताची तर्जनी कुंडलीवर फिरत होती. मान अधुनमधून डोलत होती. डोळे लहान होत होते. मोठे होत होते, मधेंच ते अधांतरी दृष्टि फेंकीत, कसलातरी विचार करीत, स्वत:शीच आकडेमोड करीत, ओठ दुमडून होकार देत. अखेर त्यांनीं जोरांत सुस्कारा सोडला आणि आडवी मान हालवून गभीर स्वरांत सांगितलं—

"महाराज, रागावणार नसाल तर सांगतो; पण या मुलाचं जातक मला वर्तवायला सांगू नका."

महाराजाच्या श्वासाचा घोट गळघाशीं आला. त्यांनीं तो गिळला आणि कातर स्वरांत विचारलं, "कां ?"

"का, काय सांगूं ? पण नको हेंच खरं !"

सुनंदा बोलली, "जीव असा टागणीला नका लावू, सायनाचार्य, जें असेल तें तुम्ही सांगा. त्याचं भविष्य काहीं तुम्ही घडवणार नाहीं; परमेश्वरानं जें भाळी लिहिलं असेल तें सांगून टाका. त्यांत तुमचा दोष कांहींच नाहीं. तें बदलण्याचं सामर्थ्य तुमच्यांत नाहीं—कोणाचं नाहीं. तुम्हीं सांगितलं नाहीं म्हणून तें बदलणार आहे थोडंच ?"

"खरं आहे, महाराणी. आजवर भविष्य सांगतांना अडलों नाहीं, आज नकार देतो, तो तसंच कांही कारण आहे म्हणून ना ? जें घडायचं आहे, तें चुकणार नाहीं; पण जें अदृष्टांत आहे, भयानक आहे, त्याची जाणीव आजच कशाला करून द्यावी ?"

बिंबिसारला राहवेना तो ताण सहन होईना. थोड्याशा त्रासिक आवाजांतच त्यानं आज्ञा केली, "सायनाचार्य, जें असेल तें सांगून टाका. कितीही कां भयानक असेना, तें पचवायची माझी सिद्धता आहे. महाराज म्हणून तुम्हाला आज्ञा करतो कीं, या बालकाचं भविष्य सांगून टाका."

'जशी आपली आज्ञा" असं म्हणून सायनाचार्यांनीं सांगायला सुरुवात केली—"या बालकाच्या ठायीं सर्व राजलक्षण आहेत. तो महापराक्रमी, उत्कृष्ट शासनकर्ता, धर्मनिष्ठ, नीतिमान्, पापभीरू सम्राट होणार आहे. त्याच्या पराक्रमाच्या तेजानं चंद्रसूर्यहि लाजतील. त्याच्यावर पुष्पवृष्टि करायला नक्षत्रांचीच फुलं देवांना हातीं घ्यावी लागतील."

बिंबिसारचा चेहरा उजळला. सुनदेचाहि. तिनं सायनाचार्यांना विचारलं, "मग यात भयानक काय आहे ? उगाचच जीवाला चुटपुट लावून ठेवलीत."

किंचित् थांबून सायनचार्य म्हणाले, "तरीहि मला तुम्हांला प्राप्त कर्तव्य म्हणून सागितलं पाहिजे कीं, या बालकाला तुम्ही जिवंत ठेवू नका !"

संगीताची धुंदी चढली असता वीणेच्या तारा खळळकन् तुटाव्यात तशी स्थिति झाली. बिंबिसार आणि सुनदा यानीं श्वास रोखले. सायनाचार्य सथपणें बोलत राहिले, "हें बालक लहान आहे तोंपर्यंत त्याच्या नरडीला नख लावून त्याच जीवित मिटवून टाका. धीर होत नसेल तर कुठेंतरी रानावनांत त्याला सोडून द्या. पण कांहीं झालं तरी त्याला तुमच्याजवळ राहूं देऊं नका."

"पण कां ?"

"महाराज, हें बालक मूळ नक्षत्रावर जन्माला आलं आहे. तें तुमच्या मुळावर आहे. तुमचा घात केल्याशिवाय तें सोडणार नाहीं. तो पराक्रमी सम्राट होईल, पण सिंहासनाच्या पायाशीं तो तुमचा बळी देईल ! तुम्हाला जपण्यासाठीं त्याचा जीव जाणं हाच एक मार्ग आहे. एकाचवेळीं तो आणि तुम्ही जिवत राहणं तुमच्या दृष्टीनं धोक्याचं आहे !

बिंबिसारचा कसला तरी निश्चय झाला. त्याच्या डोळ्यांत विलक्षण पाणी चमकलं. त्या कोवळ्या जीवाकडे तो टक लावून बघत होता. वेड्यासारखा. सुनंदेच्या मनातहि विलक्षण खळबळ माजली होती. सायनाचार्यांचा सल्ला प्रत्यक्षांत आणावा कीं नाहीं याबद्दल तिचंहि मन निश्चित भूमिका घेत नव्हतं.

बिंबिसारनं विचारलं "सायनाचार्य, तुम्हीं मांडलेली कुंडली पुन्हा एकदां तपासून बघा. त्यात काहीं चूक तर नाहीं ?"

सायनाचार्यांनी पुन्हा कुडली तपासली आणि ती अचूक असल्याची ग्वाहि दिली.

"पुन्हा एकदां विचार करून नीट सांगा"

सायनाचार्यांनीं पुन्हा डोकं खाजवलं. पण त्यांतून वेगळं कांहींच निष्पन्न होईना.

काहीं निराळ नाही अशा अर्थाची मान त्यानीं डोलावली ?

"निश्चित ?" बिंबिसारचा ठाम प्रश्न आला.

"हां ?" तितकंच पक्कं उत्तर आलं.

मग सुनदेकडे बघत बिंबिसारनं सायनाचार्यांना सांगितलं— "सायनाचार्य, तुम्हीं दिलेला सल्ला मीं मान—"

"काय बोलणार आहात ?" त्याला अडवत सुनंदानं विचारलं.

"मी हा सल्ला मानणार ना...हीं..."

सायनाचार्य बघतच राहिले. सुनदेच्या डोळ्यांत समाधान तरंगलं.

"हा मुलगा पराक्रमी आहे ना ? तो सम्राट होणार ना ? चक्रवर्ति सम्राटाचीं लक्षणं त्याच्या ठायी दिसतात ना ? मग केव्हां तरी समाप्त होणाऱ्या माझ्या आयुष्याच्या लालचेनं या निष्पाप कळीला आत्ताच खुडून टाकण्याच पाप मी करणार नाहीं. त्याच्या मार्गात माझी धोंड असेल तर ती त्यानं जरूर बाजूला फेंकून द्यावी, मी त्याच्या वाटेवर येणार नाही...मी त्याला टाकणार नाहीं...मी त्याला मारणार नाहीं..."

सुनंदेनं सागितलेली ती कथा ऐकताना अजातशत्रु आणि देवदत्त यांचे निर्जिव पुतळे बनले. गोष्ट सरली तेव्हां ते भानावर आले.

अजातशत्रु एकदम उभा राहिला. त्यान आपलं खड्ग उपसलं आणि सुनदेला तो म्हणाला, "आई, आत्ताच्या आत्ता जाऊन मी महाराजाना मुक्त करतो. माझंच खड्ग त्याच्या हातीं सुपूर्त करतो आणि काय या देहाला प्रायश्चित्त देणार असाल तें खुशाल द्या, म्हणून विनवतो."

सुनदा त्याला म्हणाली, "वेड्या मुला, खड्गानं ते तुला प्रायश्चित्त देणार ? जो मुलगा आपला जीव घ्यायला उठणार, त्यानं आपल्याला केवळ कारागृहांत डांबून ठेवलं आहे, याबद्दल मनोमनी ते तुझे आभारच मानत असतील ! अरे, तुला त्यानी जिवत ठेवल एवढंच नव्हे तर तुझ्यासाठी काय वाटेल तें करावं लागलं तरी कधीं मार्गे

पुढं बघितलं नाही. प्रत्यक्ष तुझी आई जें करायला धजावली नसती, तेहि त्यांनीं तुझ्यासाठीं केलं आहे, याची कल्पना तरी आहे कां तुला ?"

ती बोलूं लागली—

"त्यावेळी तूं दोन-अडीच वर्षांचा असशील बघ. भारी उपद्व्यापी आणि बडखोर. तुझ्या हातापायांना विसावा कसा तो ठाऊक नव्हता. चार–चार दासदासी तुझ्या खिदमतीला असायचे. पण सगळ्यांच्या नजरा चुकवून तू त्यांच्या हातावर तुरी द्यायचास. आम्हांला सगळ्यांनाच तुझ्या पुडाईचं कौतुक वाटायचं. गोकुळांतल्या कृष्णासारख्याच तुझ्या खोड्या होत्या. पण त्यामुळेंच पडझड व्हायची. लागायचं, दुखायचं, खुपायचं, दुखणं यायलाहि वेळ नसे आणि जायलाहि. मोठी गंमत असायची. तुला कांहीं होतं आहे म्हणून राजवैद्य जीवकांना निमंत्रण पाठवावं, ते येतील तेव्हां तूं हुंदडत असायचास ! किती वेळा, किती जणांनीं, दृष्ट काढली असेल तुझी, गणतीच नाहीं ! पण एकदां मात्र तुला फार दुखणं झालं. तुझ्या हाताला कांहीतरी लागलं. मधलं बोट सुजलं, पूं झाला. कशामुळें काय झालं पत्ता लागेना. बोटाचं दुखणं उतरेना. सगळा प्रासाद पालथा घालणारे तुझे छोटे पाय अंथरुणाला जखडले गेले. सगळ्यांनाच काळजी लागली. महाराजांची तर झोंपच उडाली ते सारखे तुझ्याजवळ बसून असत. तूंहि एकसारखा रडत, कण्हत होतास. जीवकाचे उपाय थकले. अखेर त्यांनीं सांगितलं, "महाराज, बोट केव्हां बरं व्हायचं असेल तेव्हां होईल, पण त्याच्या वेदना जर कमी व्हायला हव्या असतील तर कुणीतरी त्याचं बोट तोंडांत धरायला हवं," जीवकानं तो उपाय सांगायचा अवकाश महाराजांनीं तुझं बोट स्वत:च्या तोंडांत धरलं. तुला खरंच बरं वाटूं लागलं. तूं शांतपणें झोंपलास, किती तरी दिवसांची झोंप तू पूर्ण करत होतास. महाराज बोट तोंडांत धरून होते–तुझी झोंप चाळवू नये म्हणून त्यांनीं स्वत:च्या डोळ्याला डोळा दिला नाहीं अजिबात !"

अजातशत्रूला पुढं ऐकवेना. ज्या पित्यानं आपल्यासाठीं इतक्या गोष्टी केल्या त्यांची परतफेड आपण मात्र किती कृतघ्नपणानं करीत आहोंत, या जाणीवेनं तो भडकून उठला. त्याला स्वत:बद्दलच शिसारी वाटूं लागली. ज्या हातानीं पित्याला तुरुंगांत बंदिस्त केलं ते हात छाटून टाकावेत, ज्या डोक्यात हा कृतघ्नपणाचा विचार जन्मास आला तें आपल्याच खड्गानं उडवून टाकावं इतका त्याला स्वत:चा संताप आला. पण हें सार करण्यापूर्वी महाराजांना मुक्त करून त्याचे पाय धरायला पाहिजे होते. केल्या पापकृत्याबद्दल क्षमायाचना करायला हवी होती. त्यांना विचारून या अपराधाबद्दल ते सांगतील तें प्रायश्चित्त सोसायला हवं होतं. अजातशत्रूच्या डोक्यांत आतां अन्य विषय उरला नाही तो ताडकन् निघाला. मघाशीं उपसलेलं खड्ग म्यान करण्याचहि भान त्याला उरलं नाहीं. तें नग्न शस्त्र तसच हातीं ठेवून तो सुवर्ण–स्मृति मंदिराकडे धावला.

अजातशत्रू हातीं खड्ग घेऊन स्मृतिमंदिराच्या द्वारापाशीं येऊन पोचल्याची बातमी पहाऱ्यावर असणाऱ्या रक्षकानं बिंबिसारला सांगितली. बिंबिसार चमकला. त्यानं रक्षकाला विचारलं, "अजातशत्रु कशासाठीं इकडे येत आहे ?"

"मला कांहीच कल्पना नाहीं ! पण ते फार संतापलेले दिसतात. त्यांच्या हातीं परजलेलं शस्त्रदेखील आहे !"

सायनाचार्यांच्या भविष्याची आठवण बिंबिसारच्या मनांत जागी झाली. शेवटीं भविष्य सत्य ठरलं म्हणायचं. आपल्या लाडक्या पुत्राच्या हातून आपलं मरण...आपला पुत्र आपल्या निधनाला जबाबदार... पितृहत्येचं पातक शिरावर घेऊन आपला वंशज राजसिंहासनावर चढणार...या पापामुळें त्या सिंहासनाची प्रतिष्ठा धुळीला मिळेल; आजवरची पुण्याई पाताळांत गाडली जाणार ! नाही. या सिंहासनावर पाऊल टाकणारा भूपाल अशा कोणत्याहि पापानं बरबटलेला असतां कामा नये ! या सिंहासनाला कलंक लागतां कामा नये. याची निष्पापता अबाधित राहायला हवी. आपल्याला हें सहन होणार नाहीं...आणि इथलं मागलय आपल्या पोटीं जन्म घेणाऱ्या पुत्राच्या हातून व्हावं ? अशा कुलदीपकाला जन्म दिल्याबद्दलचे शिव्याशाप उच्चारण्याचा प्रसंग आपल्या पूर्वजांवर गुदरावा ? हें पाप थोपवलं पाहिजे...आपली सारी शक्ति एकवटून हा अन्याय थांबवायला हवा...परमेश्वरा, माझ्या या गलितगात्र दुर्बल देहाला तेवढं सामर्थ्य दे ! पुढें पुढें सरकणाऱ्या सागराला रोधण्याचं बळ माझ्या या पिंजून गेलेल्या शरीरांत निर्माण कर ! माझ्या लाडक्या अजातशत्रूचे हात मी त्याला पित्याच्या रक्तात भिजवूं देणार नाहीं ! जिवंत आहे तोंपर्यंत पितृहत्येच्या पापाच्या खातेऱ्यात त्याला लडबडू देणार नाहीं !

मनांत उसळलेल्या या कल्लोळाला फक्त एकाच वाक्यान मुखावाटें बाहेर पडायची संधि मिळाली– "अजात, माझ्या राजा, काय करतोस रे हें ?"

पण वेळ थोडा उरला होता. स्मृति–मंदिराच्या पहिल्या चौकांतला दरवाजा उघडला गेला होता. आतां केवळ सहा चौक ओलांडायचे राहिले होते. ते सहा अडसर खोलले गेले कीं, अजातशत्रु अगदीं बिंबिसारच्या खोलीतच येऊन ठेपणार होता.

आपल्याला कोंडणाऱ्या चार भिंतींत बिंबिसारनं आपली नजर फिरवली. त्याला कांहीतरीं हवं होतं; तो कांहींतरी धुंडाळत होता. परंतु हातीं लागावं असं तिथं कांहींच नव्हतं.

त्यानं रक्षकाला सांगितलं, "तुझं खड्ग दे बर मला !"

रक्षकानं त्याला नकार दिला. त्याच्या हातून तें हिसकावून घेणंहि शक्य नव्हतं कारण लोखंडी गजाआड तो उभा होता. वेळ तर हरणासारखी उड्या घेत जवळ जवळ येऊन ठेपत होती. आणखी दोन दरवाजांचीं कुलपं निखळलीं.

थोड्या वेळानं आणखीहि दोन दरवाजांमागचे अडसर बाजूला रेटले जातील. मग आणखी दोन......

शेवटीं या इथं अजातशत्रु येऊन पोचेल. त्याचं खड्ग वर उंच उचललं जाईल; आणि पापणी लवते न लवते तेवढ्यांत चपळाईनं तें खालीं येईल–होत्याचं नव्हतं करायला निमिषार्धाचीहि उसंत लागणार नाहीं. आपल्या डोळ्यांदेखत आपला लाडका पुत्र पितृघातकी ठरेल. आणि अंगी बळ असूनहि आपण त्याला कसलाच प्रतिकार-प्रतिरोध करणार नाहीं ! सायनाचार्यांचं जातक संतोतंत सत्य ठरणार...... जन्मताच ज्याला मारून टाकायचा सल्ला मिळाला असतांना ज्याला आपण वाचवलं, बडखोरी केली असूनहि ज्याला जिवंत ठेवलं, आपला घात करायचा संभव असतांनाहि ज्याच्यावर केवळ प्रेमच केलं–नव्हे, इतर कोणाहि पुत्रापेक्षां ज्याच्यावर अधिक प्रेमवर्षाव केला, त्याला या अखेरच्या पापांतून वाचवायचा आपल्याला मार्ग सुचू नये कं !

# एक शहाणा शिंपी

एका गल्लींत ओळीनें अशी पांच शिप्यांचीं दुकानें होतीं. त्यांची एकमेकांत नेहमीं स्पर्धा होत असे. एके दिवशीं एका शिंप्यानें ग्राहकाचें चित्त आकर्षित करण्यासाठीं आपल्या दुकानावर पाटी लावली –" शहरांतील सर्वोत्तम शिंप्याचें दुकान.

दुसऱ्या शिंप्यानें ही पाटी पाहिली आणि लगेच आपल्या दुकानावर पाटी लटकावली. "जिल्ह्यांतील सर्वोत्तम शिंप्याचें दुकान "

तिसऱ्या शिंप्यानें दोन्हीं बोर्ड पाहिले आणि विचार केला. " या दोघांपेक्षां मी खास कमी नाहीं. " मग त्यानें दुसऱ्या दिवशीं " प्रांतांतील सर्वोतम शिंप्याचें दुकान " अशी पाटी लावली. तेव्हां चौथ्या शिंप्यानें आपल्या दुकानावर " देशांतील सर्वोत्तम शिंप्याचें दुकान " असा बोर्ड टांगला.

पांचवा शिंपी या प्रकारानें घाबरला नाहीं. आपल्या दुकानावर त्यानें एक पाटी टांगली. त्यावर लिहिलें होतें– " या गल्लींतील सर्वोत्तम शिंप्याचें दुकान. "

–सैनिक समाचार

त्या लोखंडी गजावर डोकं टेकून बिंबिसार विचार करूं लागला. पलिकडच्या दोन–तीन चौकापर्यंत अजातशत्रु येऊन पोचल्याचे आवाज त्याला स्पष्ट ऐकूं येत होते. कांहीं सुचेना. त्या अगतिकतेनं बिंबिसार चिडून गेला. त्या चिडींत त्यानं आपलं डोकं गजावर आपटलं...... आणि मार्ग सुचला.......

अजातशत्रु तिसऱ्या दालनांत येऊन पोंचला होता, दुसऱ्या दालनाचा दरवाजा उघडला जात होता. अडसर मागें लोटला गेला. जाड कडी काढली गेली. ती हेलकावत दरवाज्यावर खळ्ळक खळ्ळक आवाज करीत होती. पावलं झपाट्यानं पुढें सरकत होतीं.

बिंबिसार अवाक्षर न बोलतां त्या लोखंडी गजावर आपलं डोकं दणादण आपटून घेऊं लागला. सारं कपाळ रक्तबंबाळ झालं. असेल नसेल त्या ताकदीनं तो त्या कठीण गजावर धडक देत होता·

रक्षकाला कांहीं सुचेना. त्याची बोबडीच वळली. " महाराज, काय करतां हें ? महाराज,... महाराज......"

लोखंडी गज गुलालानं माखल्यागत लालीलाल झाला. पायाशीं रक्तांचा सडा पडला. रक्त...तांबडं लाल रक्त...एका पित्याचं लालभडक रक्त...दुसऱ्या दालनांतून अजातशत्रु आतां अगदीं नजीक येऊन ठेपला.

बिंबिसारचा हेतू अद्याप साध्य झाला नव्हता. आतां अगदीं घाई करायला हवी होती.

–पण हें डोकं कांहीं फुटेना. ही कवटी भलतीच चिवट ठरली. लोखंडी गजांनाहि ती दाद देत नाहीं.

बिंबिसारचं लक्ष हाताकडे गेलं. हातांत आंगठी होती. सुनंदेच्या विवाहाच्या वेळीं हातांत घातलेली तीच ही आंगठी. तिच्यांत बसविलेली हिरकणी अद्यापहि कशी लकाकते ! ती हंसते आहे— आपल्याला–खुणावते आहे ! शरसंधानांत तीच आड यायची–पण आपण तिला फेंकून दिलं नाहीं. मनांत होतं, आज ना उद्यां, तशीच कधीं वेळ आली तर.........

तशीच वेळ आली आहे ! बाई हिरकणे, तुझ्या उपयोगाची वेळ आली आहे. आतां तुझं काम तूं चोख कर...विनाकारण या देहांत पंख फडफडवीत बसलेल्या प्राणपाखरांची वाट मोकळी कर...हा पिंजरा खुला होऊं दे त्याला.

बिंबिसारनं काडकन् हिरकणी चावली. आणि क्षणाचाहि विलंब न लावतां गिळून टाकली.

बिंबिसारच्या डोळ्यांसमोर आतां प्रकाश दिसत होता...प्रकाश ! कितीतरी रंगीबेरंगी प्रकाश...एखाद्या स्वप्नासारखे...कसलं तरी मधुर संगीत वातावरणांत दरवळत होतं...स्वतःला तोलत तो मंचकापाशीं गेला आणि कांहींच ताठपणा नसलेली ती काया तिथं लवंडली...अजूनहि स्वर घुमत होते...प्रकाश दाटत होता......

खळाळ् खळाळ्.........

गजांच्या दरवाजाची शेवटची कडी उघडली गेली... अडसर मार्गे सरला, अजातशत्रु येऊन पोंचला......

त्याच्या वाटेंत रक्तानं सडासंमार्जन केलेलं होतं. लोखंडी गज तांबडेलाल होऊन त्याच्याकडे बघत होते.

तो मंचकापाशीं येऊन पोचला...जोरांत ओरडला, " महाराज, मी आलोंय्– सोडायला...... तुम्हांला...... मुक्त करायला..."

बिंबिसारला फक्त संगीत ऐकूं येत होतं. रंगीबेरंगी वातावरण अंधुक होत चाललं होतं. काळोख दाटत होता. लक्षावधि नक्षत्रं चमचमूं लागलीं होतीं. आणि त्या अंधारांत एक सोनेरी पक्षी आपले पंख फडफडवीत आभाळाच्या रोखानं वर वर भरारत होता.

फड...फड...फड...फड...

महाराजांचे ओठ हालत होते. त्यांना कांहींतरी बोलायचं असावं. अजातनें आपले कान त्यांच्या ओठाजवळ नेले.

" अजात. माझ्या लाडक्या मुला, अखेर...मीं...तुला वांचवलं... पित्याच्या... हत्येचं...पातक...तुझ्या...माथीं...नाहीं...सायनाचार्य चुकले...अजात ...तूं... निष्पाप..."

अजातनं महाराजांना मिठी मारली. डोळ्यांतून अश्रूंचे लोट येत होते. गालांवरून वहात तोंडांत शिरत होते. त्यांत भिजलेलें केविलवाणे खारट शब्द ऐकूं येत होते.......

" महाराज काय केलंत हें ? कां केलंत ? तुमचं अंतरंग मला कधींच कळलं नाहीं.... आणि आज जेव्हां तें कळलं तेव्हां महाराज......"

बिंबिसारचे निर्जिव डोळे शून्याचा भेद करीत होते.

जराशा विलग झालेल्या त्यांच्या ओठांतून बाहेर पडणारे कोणालाच ऐकूं न येणारे शब्द अजातशत्रूला ऐकू येत होते---

" अजात, माझ्या लाडक्या मुला, तूं निष्पाप आहेस. "

● ● ●



# शनवारवाड्यांतील शमादान....

ब. मो. पुरंदरे ( पृष्ठ २० वरून चालू )

अगदीं संथ सरळ, साध्या शब्दात श्रीमत म्हणाले. आप्पांच्या जिभेवर कडक शब्द आले अन् परत गेले ! बाहेर पडलेच नाहीं !

पण आप्पानीं ठरवलं की, एकदा रावाना बोलायचच. ते विचार करीत होते. बाबा पुरंदरेहि नाराजीनें घुमसत होते. पुण्यांतील ब्रह्मवृंदहि जरा जास्तच बेचैन झाला होता. पण अजून "आणखी काहीं" विपरीत दिसलेलं नव्हत, म्हणून शांत होतं सारं !

आप्पा श्रीमंताशी बोलणार होते. पण शनिवारवाड्यांत गडबड उडाली. नगारे, चौघडे वाजूं लागले ! आप्पाना मुलगा झाला ! श्रीमंतानाहि अतिशय आनद झाला. श्रीमत 'काका' झाले ! आणि ह्या आनंदात मस्तानीचा कडू विषय उडून गेला !

मुलगा झाला, पण पाचव्या दिवशीं आप्पांची बायको मरण पावली ! दु खाचा केवढा आघात !

आणि ह्याच दु.खी वातावरणात दोन महिने गेले. मस्तानीचा विषय आप्पांच्या डोक्यातून गेलेला नव्हता पण तोंडून बाहेर पडेना. दु खांत दुःखी वातावरण नको म्हणून.

दसरा झाला. श्रीमतांच्या फौजा निघाल्या. खुद्द श्रीमत निघाले. आप्पाहि निघाले. श्रीमंत बाईसाहेबांच्या महालात निरोप घेण्यासाठीं आले. दोघींनीहि श्रीमताना म्हटलं,

"विजयी होऊन यायच हं ! लौकर यायचं ! आम्ही दोघी वाट बघतो आहोत !"

"विजयी होऊन येऊ ! पण लौकर येऊं कीं नाहीं तें नाहीं सांगता येत !"

"हं ? मग आम्हांलाहि साथ साथ घेऊन चलावं ना ?" मस्तानी म्हणाली,

"पुन्हा केव्हा तरी !"

आप्पाहि वहिनीचा निरोप घ्यायला आले. बाईसाहेबांनीं दहीसाखर आप्पाच्या हातावर घातली. मस्तानी दूर उभी होती. निघते वेळीं आप्पानी बाईसाहेबाना नमस्कार केला.

"भावजी, उदड विजयी होऊन या !"

आप्पाची जळजळीत दृष्टि मस्तानीकडे गेली. ती दुरूनच आपलीं बोटें आप्पावरून ओवाळीत कानावर मोडीत होती. आप्पाची 'दृष्ट' काढीत होती ती !

आप्पा गेल्यावर ती बाईसाहेबाच्या जवळ आली. तिनें आपली मान त्यांच्या खांद्यावर टाकली अन् रडवेल्या शब्दात म्हणाली,

"आप्पासाहेब माझ्यावर नाराज आहेत ! माझ्याशी बोलतसुद्धां नाहीत !"

आता काय बोलणार बाईसाहेब ? त्यानीं तिच्या पाठीवरून हात फिरवला.

बाईसाहेबाचा मुलगा नानासाहेब हळूं हळूं मोठा होत होता. मस्तानी नानासाहेबावर फार प्रेम करी. चिमाजीआप्पाहि त्याच्यावर अतोनात प्रेम करीत काकाचा तो सर्वांत लाडका होता. फारस काही कळत नव्हत, पण नानासाहेबाच 'मत' मस्तानीबद्दल चागल नव्हत ! मस्तानी 'चागली' नव्हती ! का ? चिमाजीकाका म्हणतात म्हणून !

● ●

जवळ जवळ सहा-साडे सहा महिन्यानी श्रीमत ढभईच्या स्वारीवरून परत आले. बाईसाहेबाचा आणि मस्तानीचाहि महाल आनदानें भरून आला. श्रीमंत दोघींच्याहि महालात गेलें. दोघींनाहि त्यानीं आपल्या कुशीत झाकून टाकल.

पावसाळा आला. भुईला अंकुर फुटूं लागले ! सरी वर सरी बरसत होत्या. अंकुर हळू हळू मोठे होऊ लागले. धरणीच्या मुखावर कांहीं वेगळीच कांति फुलू लागली..

अन् एके दिवशी श्रीमंताना बाईसाहेबाच्या महालांत असतांना काही तरी सशय आला ! ते काहीच बोलले नाहीत त्यानीं अत्तराचा फाया बाईसाहेबाच्या हातावर लावला ते हसले. बाईसाहेबाना काहीं अर्थच कळेना. श्रीमत हंसत हंसत उठून गेले.

अन् अगदी थोड्याच वेळांत हंसत खिदळत. मस्तानी बाईसाहेबांच्या महालांत आली आणि तिनेहि हंसत हसत कानातला फाया बाईसाहेबाच्या हातावर चोळला ! हंसतच राहिली ! बाईसाहेबानीं कुतूहलाने विचारलं,

"अग पण कां ? कशाबद्दल ? काय झाल ?"

"आम्हीं ओळखल !"

"इश्श ! पण काय ?"

"स्वारीच आखिर तुमच्यावरच खरं प्रेम आहे ! सचमुच !"

"कशावरून ?"

"बाईसाहेब, तुमचे डोळेच सांगताहेत !"

"म्हणजे ?"

"हुजूरनी नवीन 'देणगी' दिली आहे म्हणे तुम्हांला !"

"मस्तानी, तुझ हें कोड्यातल बोलण मला काही कळत नाहीं बाई ! स्पष्ट बोलना !"

छोटस बाळ हातावर घेतल्याची नक्कल करीत मस्तानीनें बाईसाहेबाच्या पोटाकडे बोट करीत हसायला सुरुवात केली.

"इश्श !"

"अ-अ-अ-अ-हंऽऽऽ ! कसं पेहचानलं ?"

आणि मग मात्र बाईसाहेब लाजल्या. खरच होतं ! बाईसाहेबाना दिवस गेले होते ! कितीतरी दिवसानी ! मस्तानी खट्याळपणे हसत होती. बाईसाहेब तिला हळूच म्हणाल्या,

"तुलाहि मिळेल बर 'देणगी' !"

दुपारीं श्रीमत बाईसाहेबाच्या महालात विडा खायला आले. श्रीमताना विडा देत देत बाईसाहेब थट्टेने हसत हंसत म्हणाल्या,

"मस्तानी रुसलीय् स्वारीवर !"

"हं ? का ?"

"तिला 'देणगी' हवीय् !"

"कसली ? देणगी कसली ?"

"तिलाच विचाराव !"

बाईसाहेब हसत होत्या. श्रीमत खरोखर उठले. सदरेवर गेले. नतर कागदाचे दप्तर बंद घेऊन मस्तानीच्या महाला न गेले.

"तुला देणगी हवीय ना ?"

"कुणी सांगितल ?"

"मला 'हिने' सांगितलं कीं, मस्तानीला देणगी हवीय !" हें ऐकतांच मस्तानीला अर्थ उमगला. ती हंसूं लागली. लाजली, फार लाजली.

"हं, ही घे देणगी !"

ते कागदाचे दोन बंद तिच्या हातांत देत श्रीमंत म्हणाले.

"केंदूर आणि पाबळ हीं दोन गांवं तुला इनाम म्हणून दिलीं आहेत ! देणगी ही !"

मस्तानी ही देणगी पाहून गोंधळली. ती म्हणाली,

"मला वेगळीं गांवं कशाला हवीं ? मी आपलीच आहे ना सर्वस्वीं ?"

"शंकाच नाहीं !"

"मग घरांतल्या घरांत वेगळं इनाम कशाला ?"

"कांहीतरी देणगी द्यायची, म्हणून गांवं दिलीं !"

"जर बाईसाहेबांना हें समजलं तर त्या हंसायला लागतील !"

"अग, मग 'देणगी' म्हणजे काय ?"

"मला नाहीं बाई ठाऊक ! विचारावं बाईसाहेबांनाच !"

मस्तानी लाजली होती. हंसत होती. श्रीमंत गोंधळून उठले. ते बाईसाहेबांच्या महालांत आले. त्यांनीं बाईसाहेबाना विचारलं,

"काय ग ? देणगी म्हणजे काय ? तुझ्या सांगण्यावरून मस्तानीला देणगी द्यायला गेलो ! केंदूर आणि पाबळ ह्या दोन गांवाच्या इनामी सनदा तिला देणगी म्हणून दिल्या तर ती हसायलाच लागली !"

बाईसाहेबहि हसूं लागल्या. श्रीमंत जास्तच गोंधळले. तेव्हां बाईसाहेब श्रीमतांच्या कानांत हळूच पुटपुटल्या. आणि श्रीमंत एक-दम मोठ्यानें हसूं लागले. अन् म्हणाले,

"छान ! तुमच्या एकमेकींच्या थट्टेंत आमचीच शोभा झाली !"

दिवस हंसत, खेळत चालले होते. बाईसाहेबांचं आधींच कमी अस-लेलं हिंडणं-फिरणं आणखीच मदावलं. सातवा चालूं होता ! तेवढ्यांत मस्तानीची तबियत नादुरुस्त झाली. काय झालं म्हणून बघायला बाई-साहेब गेल्या. तिला मळमळत होत ! चक्कर येत होती ! ओकाऱ्या येत होत्या ! आवळेंचिचा खाव्याशा वाटत होत्या ! बाईसाहेबांनीं ओळखलं ! मस्तानी लाजून चूर झाली होती. बाईसाहेब तिच्याकडे बघून मिस्किलपणें हंसत होत्या. मस्तानीलाहि आनंद होत होता. पण बायका हा आनंद कधी निमूटपणें कबूल करतात कां ?

दोघींहि आनंदल्या होत्या. भारावल्या होत्या.

श्रावण आला. पावसाळा झिमझिमत असतांना बाईसाहेब माहुली येथें प्रसूत झाल्या. मुलगा झाला ! शनिवारवाडा आनंदाने हिंदोळला. बारस थाटात झालं; बाळाचं नांव ठेवण्यात आलं, रघुनाथ ! आप्पांना आनंद झाला.

चार-साडेचार महिने भुरभुर गेले आणि एके दिवशीं मस्तानी 'आई' झाली. मुलगा झाला ! शनिवारवाडा शांतच होता ! उत्सव नाहीं, नगारे नाहीं, तोफा नाहीं, कांहीं नाहीं ! कोण कौतुक कर-णार ? आनंद झाला मस्तानीला, श्रीमंताना आणि बाईसाहेबांना मस्तानीच्या बाळाच नाव ठेवलं, 'समशेरबहादूर'

समशेर आणि रघुनाथ हळू हळूं मोठ होऊं लागले. रांगूं लागले.

चिमाजी आप्पांचा मुलगा सदाशिव हा चार वर्षांचा झाला होता. हीं मुलं एकत्र खेळूं लागलीं. बाईसाहेबांचा थोरला मुलगा नानासाहेब आतां चौदा वर्षांचा झाला होता.

ह्यावेळीं आप्पांची मोहीम जंजिऱ्याच्या सिद्दीवर चालू होती. श्रीमं-तहि वारंवार बाहेरच मोहिमेवर असत. नानासाहेबहि आप्पाबरोबर अधूनमधून स्वारीवर जाऊं लागला होता.

समशेर आणि रघुनाथ थोडे मोठे झाले. मुलं सव्वा, दीड वर्षांचीं झालीं.

बाईसाहेब आणि मस्तानी ह्या दोघींना नेहमीं वाटायचं कीं, आपण मोहिमेंतहि श्रीमंतांबरोबर असावं ! काही कांहीं वेळीं पूर्वी श्रीमंतांनीं बाईसाहेबानाहि नेलहि होतं. कधीं कधीं तें मस्तानीलाहि नेत. पण खूप दूरच्या मोहिमेवर जातांना त्यांनीं कधींच कोणाला नेलं नव्हत.

पण एक दिवस श्रीमंत आनंदानें मस्तानीला आणि बाईसाहेबानाहि सांगत आले,

"स्वारीवर निघायचं ! तुम्हां दोघींनाहि घेऊन ह्यावेळीं जायचं ठरवलंय आम्ही !"

केवढा आनंद दोघींना, पण स्वारी कोणत्या मुलखावर ?

"स्वारी, हिंदुस्थान प्रांतांत !"

स्वारीची तयारी सुरू झाली. मेणे सजले. बाईसाहेब आणि मस्तानी मेण्यांत बसल्या. फौजा उत्तरेकडे चालूं लागल्या. ठिकठिकाणीं मुक्काम पडत होते. रोज नव्या नद्या, नवीं गावें, प्रदेश दिसत होते. नवें वारें अंगावरून वहात होतें. श्रीमंतांच्या प्रेमळ, थट्टेखोर आणि दिलदार स्वभावामुळें प्रत्येक क्षण सुख उधळीत जात होता. श्रीमंतांच्या सान्नि-ध्यांत स्वर्गसुखाचा हजारपट गोड संवेदना त्या दोघींना होत होत्या.

उदयपूर, जयपूर आणि अशीच सुंदर सुंदर शहरं बघत ही मुशाफरी चालली होती. श्रीमंतांचीं राजकारणं चालूंच होती. राजेरजवाड्यांच्या गांठीभेटी, मानसन्मान आणि पाहुणचार होत होता. बाईसाहेब पायाचं दुखणं जणूं विसरल्या होत्या.

जवळ जवळ सात–आठ महिन्यांची ही मुशाफरी संपवून स्वारी पुण्यात आली.

आप्पाहि सिद्दीवरची मोहीम फत्ते करून आले होते. दोघाहि भावांना अपयश कुठं येतच नव्हतं. सदा यशवंत !

आप्पा, बावा पुरंदरे, राधाबाईसाहेब आणि आतां नानासाहेबहि मस्तानीबद्दल नाराजीनें कुजबुज करीत असत. पण नेमकं बोट ठेवून शाप किंवा शिक्षा द्यायला मस्तानीचा गुन्हा त्यांना गवसला नव्हता, म्हणून ते कोणीहि तीव्रतेनें बोलत नसत.

श्रीमंत पुन्हा बुंदेलखंडांत जाणार होते. गारपिरावर छावणी पडली होती. वेळ रात्रीची होती. श्रीमंत तंबूमध्यें एकटेच होते. आप्पा वर्दी न देतांच एकदम श्रीमंतांच्या तंबूत शिरले ! आणि धक्काच बसला. त्याना ! श्रीमंत गुंगून पडले होते ! जवळच तबकांत एक सुरई व एक प्याला होता ! आप्पांनीं जवळ जाऊन प्याल्याचा वास घेतला ! भप्पकन् उग्र वास नाकांत शिरला. त्यांना शिसारी आली ! काळजावर निखारे पडल्याप्रमाणें वेदना झाल्या त्यांना. रावसाहेब दारू पिऊं लागले ? बाजीराव पेशवे मद्यपी बनले ? माझा राव दारूबाज झाला ? कोणीं लावला हा घातकी छंद ? दुसरं कोण ? मस्तानी— आप्पांची खात्रीच झाली. पुराव्याशिवायच खात्री झाली !

आप्पांना अतोनात दुःख झाल. ते निघून गेले. सारी रात्र बेचैन स्थितींत गेली त्यांची. श्रीमंत 'पिऊं' लागले होते. हा छंद त्यांना कसा आणि कोठून लागला होता. कोण जाणे ! हिंदुस्थान प्रांतीं गेलेले असतांना तिकडच्या रंगेल राजेरजवाड्यांच्या बैठकींत श्रीमंतांना ही गोडी लागली असावी. आप्पांना वाटत होतं मस्तानीमुळेंच!

दुसऱ्या दिवशीं आप्पा एकटेच श्रीमंतांना भेटावयास गेले. त्यांनीं काळीज कठोर केलें आणि म्हणाले,

" राव काय मांडलयंत हें ? मद्यपान करूं लागलांत ? मिळविलेली कीर्ति, यश आणि दौलत धुळीला मिळविण्याची ही कला कोणीं शिकवली तुम्हांला ? राव, स्पष्ट बजावतो तुम्हांला ? हें व्यसन सोडा ! आणि—आणि मस्तानीलाहि सोडा ! "

श्रीमंत मनांत चूर झाले होते. आपण कांहीं तरी पाप करीत आहोंत हें त्यांनाहि समजत होतं. मस्तानीला सोडा असं आप्पांनीं सांगताच ते कळवळले. ते व्याकूळ होऊन म्हणाले,

" आप्पा, आप्पा मला क्षमा कर ! एक वेळ शिक्षा कर !—पण मस्तानीला दूर नेऊं नकोस ! तिच्यावांचून मी जगूं शकणार नाहीं ! "

आप्पांचा जीव कळवळला. एका बाजूला घराण्याची आणि दौलतीची काळजी, दुसरीकडे प्राणप्रिय भावाची काळजी. काय करावं तें त्यांना समजेना. पण त्यांना हीं सारीं चिन्हें ठीक दिसेनात. त्यांना खोकल्याची उबळ आली. ते निघून गेले.

वरून शांतता पण आंतून असंतोष, तिरस्कार, राग आणि चिंता घुमसत होतो.

बाईसाहेबांच्या आणि मस्तानीच्या डोळ्यांतून आसवं ओघळूं लागलीं.

तेवढ्यांत फिरंगाणांत फिरंग्यांनीं जुलुमाची सीमा गांठली. ठाणें वसई प्रांतांतील लोक हवालदिल झाले. श्रीमंतांची आणि आप्पांची एक दिलाची बैठक झाली. ठरलं ! वसईवरची स्वारी मुक्रर झाली. आप्पा फौजा घेऊन बाहेर पडले. श्रीमंतहि खानदेशाकडे कूच करून गेले. आठवडे आणि महिने उलटूं लागले.

पुण्यांतील ब्रह्मवृंदांत एक दिवशीं खात्रीलायक बातमी पसरली कीं, श्रीमंत 'पितात' ! आणि 'खातातहि' !

दोन्हीहि खरं होत ! बाबा पुरंदऱ्यांना तर स्पष्ट दिसत होतं, अखेर त्यांनींहि एके दिवशीं श्रीमंतांचा निषेध केला ! अन् पुण्यांतील शास्त्रीपंडितांच्या बैठकींत ह्या पापांचा पाढा वाचला जातोय, हेंहि त्यांनीं श्रीमंतांना सांगितलं आणि स्पष्ट बजावलं,

" ह्याचा परिणाम ठीक होणार नाहीं श्रीमंत ! "

" काय करूं बाबा ? सार समजतंय ! कळतंय पण वळत नाहीं ! "

" आधीं त्या मस्तानीला—मस्तानीबाईसाहेबांना दूर घालवून द्या ! "

" बाबा ! अशक्य आहे तें ! तिनें काय केलं बिचारीनें ? "

" हे छंद कोठून आले ? "

" तिच्याकडून नाहीं ! माझ्याच चवचाल जिभेनं शोधून आणले ! "

" कसं पटावं श्रीमंत ? "

न कळत श्रीमंतांच्या विरुद्ध आणि मस्तानीच्या विरुद्ध आभाळांतील आणि भुईवरील विरोधी ग्रह एकत्र येऊं लागले. दोष कोणाचा होता ? असेल श्रीमंतांचा. कदाचित् मस्तानीचाहि असेल पण दोघांबरोबर निष्पाप काशीबाईसाहेबांनाहि चटके बसूं लागले होते. श्रीमंतांचं व्यसन चालूच होतं.

वसईची मोहीम फत्ते झाली. फिरंगाण काबीज झालं आप्पांचं निशाण वसईवर लागलं. आप्पांचीं विजयाचीं पत्रें छत्रपति महाराजांना, ब्रह्मेंद्रस्वामींना, श्रीमंतांना गेलीं आणि एक पत्र बाईसाहेबांनाहि आलं. आप्पांनीं वहिनींना लिहिलें होतें.

" वहिनीं, येथें (वसईस) तुम्हीं समुद्रस्नानासाठीं यावं अशी फार इच्छा आहे. तुमचा पाय कसा आहे ? "

वहिनींच्या पायाच्या जोडीला आतां त्यांच्या अंतःकरणालाहि वेदना होत होत्या. समुद्रस्नानानें कां त्या निवणार होत्या ?

आप्पा पुण्याला आले. अन् पुण्यांतील मंडळींकडून रावांच्या वर्तनाबद्दल एक एक बातमी त्यांच्या कानीं पडूं लागल्या.

" श्रीमंत थेऊरला गेले होते ! धुंदींतच होते ! परततांना वाटेंत पाटील भेटायला आले तर श्रीमंतांनीं पाटलाला कोंबडी मागितली ! "

" श्रीमंतांना फार छंद जडला आहे ! सदोदित गुंगींतच असतात ! "

" मद्य, मांस आणि मस्तानी ! श्रीमंतांना विसरच पडत नाहीं ! "

आप्पा खवळले ! पुण्यांतील भटजी मंडळी खवळली, राधाबाईसाहेबहि रागावल्या. पण रावाला फार त्रास दिला तर तो जिवाचं कांहीं बरंवाईट करून घेईल ही भीति त्या आईला वाटत होती.

बाईसाहेबांनीं आणि मस्तानीनें श्रीमंतांना फार फार सांगून पाहिलं. पण तेवढ्यापुरतं कबूल करीत. पुन्हा रात्रीं ओठाला प्याला लागे !

आप्पांनीं ठरवलं मस्तानीला मारूनच टाकायचं ! पण प्रश्न होता " नंतर श्रीमंतांच कसं होईल ? " आप्पांचा हा बेत, तर नानासाहेबांचा बेत असा कीं, तिला धनगडावर नेऊन कैदेत टाकावं ! धनगड पुण्याच्या पूर्वेला वीस कोसांवर घनदाट जंगलांत व डोंगरांत आहे ! पण नानासाहेबांनीं आधीं आणखी एक शक्कल काढली. ते मस्तानीला भेटले.




निवडक कैऱ्या अन् उंची पदार्थ वापरून बनविलेलें **बेडेकरांचें** आंबा लोणचें तुमच्या **रोजच्या** जेवणांत उपयोगांत आणा. अन् मग त्याच जेवणाची लज्जत किती वाढते तें पहा !

बेडेकर मसालेवाले
मुगभाट, मुंबई-४
ठाकुरद्वार, दादर, फोर्ट, परळ

गोड हसले. गोड बोलले. तिला हा अमृतयोग पाहून परमावधीचा आनंद झाला. नानासाहेब तिचा सदैव राग राग करीत असत. त्यामुळे त्यांचं हें प्रेमाचं वर्तन पाहून तिचं मन आनंदानं फुललं. चार–दोन दिवस ते मस्तानीकडे अशाच मधुर प्रेमानें वागले. नानासाहेबांना वाटत होतं. की, मस्तानी म्हणजे एक बोलून चालून रखेली ! तिला जर कांहीं अमिष दाखवून भुलवलं तर ती त्या मोबदल्यांत श्रीमंतांना सोडून जाईल ! पण लौकरच मस्तानीच्या लक्षांत नानासाहेबांचा हेतू आला. ती म्हणाली,

" बाळ नाना, आतां मला स्वारीपासून दूर करण्याचं बळ फक्त मरणांत आहे !"

फसलं राजकारण नानासाहेबांचं ! मस्तानीला कैद करणंहि त्यांच्यानें होईना !

शनिवारवाड्यांत इतकं कडू कडू वातावरण भरलं कीं, श्रीमंतांनीं वाड्यांत रहाणंहि सोडून दिलं. ते छावणींत राहूं लागले.

श्रावण आला. गोकुळ अष्टमीचा उत्सव शनिवारवाड्यांत मोठ्या थाटांत साजरा होई. कृष्णजन्माचं कीर्तन सुरू झालं. बाईसाहेब कीर्तनाला येऊन बसल्या होत्या. कीर्तन संपलं आणि मस्तानी तेथें आली. ती आली ती पायांत पैंजण बांधूनच ! पैंजण रिमझिमूं लागले. ती नाचू लागली. देवापुढं ती घटकाभर तल्लीन होऊन नाचली. नाच संपला आणि ती धावत येऊन बाईसाहेबांपाशी बसली, अन् म्हणाली,

" बाईसाहेब, नाना कुठं आहेत सध्यां ?"

" अग, तो आणि भावजी कोकणांत अलीबागेकडे गेले आहेत !"

" नानाचं पत्र आलं कां काहीं खुशालीचं ?"

" हो ! आलं ! खुशाल आहे तो !"

" फार बरं वाटतं ऐकून ! पण तुम्हांला पाठवलं तसं पत्र मला मात्र नाहीं ते कधीं पाठवीत ! मी काय पाप केलं ? मीं कोणीच नव्हे का त्यांची ?"

" अग, पाठवील कधीं ना कधीं ! एवढं वाईट काय वाटून घेतेस ?"

ह्या वेळीं दोघींच्या मागें नानासाहेबांचा एक कारकून उभा होता. त्याच नाव बाबूराव गणेश. ह्या बाबूरावानें ही तिची मायेची बोलणीं नानासाहेबांना लिहून कळविलीं. अन् त्यानें त्या पत्रात शेवटीं लिहिलं,

" एक पत्र ( मस्तानीला ) पाठविल्यानं काय नुकसान होतं ? तिला एक पत्र लिहावं !"

नानासाहेबाच तिला पत्र आलं नाहीं ! कधींच आलं नाही !

श्रीमंतांना मस्तानीची आतांशा इतकीं ओढ लागली कीं, सदैव तिच्याच सहवासात ते राहू लागले.

लौकरच आप्पा आणि नानासाहेब पुण्याला आले. आप्पांचा सदाशिव आता लग्नाला झाला होता. दहावं वर्ष लागलं होतं ना ! तसाच श्रीमंतांचा रघुनाथहि आता मुंजीच्या वयाचा झाला होता. राधाबाईसाहेबांचीं आणि इतर नातलगांचीं हीं बोलणीं शनिवारवाड्यांत सुरु झालीं होतीं. आप्पांना आणि नानासाहेबानांहि ही कार्यं थाटामाटाच लौकर व्हावीत असं वाटत होतं. बोलणीं चाललीं होतीं.

एवढ्यात दारूचा भडका उडावा तसा भडका पुण्यांतल्या शास्त्री पंडितांत उडाला ! पेशव्यांच्या भ्रष्ट वर्तनामुळें शनिवारवाड्यावर बहिष्कार घालायचा, पेशव्याच्या कोणत्याहि कार्याला जायच नाहीं, असं त्यांनीं ठरवलं !

आप्पांना ब्राह्मणांची ही चीड समजू शकत होती. पटत होती. पण उपाय काय ह्यावर ? ब्राह्मणांनीं स्पष्ट सांगितलं,

" श्रीमंतानीं गंगोदकानें स्नान करून, प्रायश्चित घ्यावे आणि मस्तानीचा त्याग करावा !"

आप्पा श्रीमंतांकडे गेले. आपलं चुकतंय हें श्रीमंतांना पटत होतं. गंगोदकस्नान आणि प्रायश्चित घ्यायला ते तयार होते. व्यसन सोडावयासहि 'हो' म्हणत होते पण मस्तानीला क्षणभरहि सोडावयास ते तयार नव्हते ! तेव्हां आप्पा रागावले, बाबाहि रागावले. पण उपाय काय ? आप्पांचे ओठ दाबले गेले. ह्या मस्तानीचाच कांटा काढला पाहिजे, अशी त्यांच्या मनाची खात्री झाली !

आप्पा रागारागानें शनिवारवाड्यांत आले. त्यांनीं गुप्तपणें मस्तानीच्या महालावर चौक्या पहारे बसविले !

ही बातमी श्रीमंतांना समजली. त्यांचं डोकं भणाणलं ! त्यांनीं छावणी उठविली आणि पुण्याहून दौंडजवळच्या कुरकुंभ नांवाच्या गावाकडे देवदर्शनाला म्हणून ते चालते झाले !

शनिवाड्यांत ही बातमी आली. मस्तानी नजरकैदेत आणि श्रीमंत पुणें सोडून निघून गेले. मस्तानीची व श्रीमंतांची ताटातूट करण्याच्या राजकारणात बाईसाहेबांच्या अंतःकरणाला मात्र भेगा पडत होत्या. कांहीहि गुन्हा न करता ह्या साऱ्या गोष्टींच्या दारुण वेदना त्यांना सहन कराव्या लागत होत्या.

मस्तानीच्या मनाची व्याकूळ अवस्था झाली होती. पिंजऱ्यांत कोंडलेल्या तहानलेल्या पांखरासारखी तिच्या मनाची तडफड चालू होती.

पुण्यांत ह्या घटना सर्वांच्या तोंडीं घोळत होत्या. कारभारी, मुत्सद्दी नातलग आणि आप्पा विचारांत पडले होते. दुसऱ्याच दिवशीं आप्पा आणि नाना बोलत होते, " हिला ठार मारावं की घनगडावर डांबून टाकावं ?"

मस्तानीच्या महालांत मस्तानीचा विलक्षणच उद्योग गुपचूप चालू होता. तिने पायात सुरवार चढवली होती. अंगात चुणीदार अंगरखा पेहेरला होता. कमरेला शेला बांधला होता डोक्याला मंदिल बांधला होता. अठरा–एकोणीस वर्षांच्या राजबिंड्या तरुणासारखी ती दिसत होती. पुरुषी थाट झाल्यावर ती पहारेकऱ्यांची नजर चुकवून सरळ बाहेर पडली ! वाड्याबाहेर निघून गेली. ! कुठून कोण जाणे, पण तिने घोडा मिळवला ! कदाचित् तिनें पैसे दिले असतील कुणाला. पण घोड्यावर स्वार होऊन वाऱ्याच्या वेगात तिने श्रीमंतांच्या दिशेने घोडा पिटाळला ! एकटीच ! तुफान दौडत सुटली ! गेली, गेली, गेली !

आप्पा आणि नाना राजकारणं करीत होते ! खल चालला होता, मस्तानीचं काय करावं ह्याचा !

चार–पाच तासानीं शनिवारवाड्यात एकच गलबल उडाली ! 'मस्तानी पळाली ! मस्तानी पळाली !' धावाधाव, शोधाशोध सुरू झाली. कुठं शोधायचं ? मस्तानी दुसरीकडे कुठं असणार ? एक श्रीमंतांच्या कुशींत नाहींतर मृत्यूच्या कुशींत !

बाजी पुरंदरे, मोरशेट काका आणि इतर काहीं मातबर मंडळी श्रीमंतांच्या रोखानें दौडत सुटली.

मस्तानी श्रीमतांच्या कुशींत अल्लाद विसावली होती ! पुण्यापासून अठरा कोसांवर श्रीमतांच्या छावणींत ती केव्हांच जाऊन पोहोंचली होती.

आप्पा आणि नाना मस्तानीच्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. अखेर आसवें गाळीत, ह्या बड्या बड्या कारभाऱ्यांच्या गराड्यांतून मस्तानी पुण्यांत आली ! आणली गेली ! शनिवारवाड्यांतील महालांत तिनें पुन्हा मुसमुसत प्रवेश केला. आतां तिला पुण्यांत प्रेमाच्या विसाव्याचं एकच स्थान होत. काशीबाईसाहेब !

साताऱ्यास छत्रपतींना पुण्यांतील ही सारी गडबड समजली. त्यांचं श्रीमंतांवर फार प्रेम होतें. श्रीमंतांचे दोषहि त्यांना माहीत होते पण त्यांना श्रीमंतांची योग्यता आणि मोलहि समजत होत. त्यांच मत असं होतं,

" रावाचें व्यसन मस्तानीमुळें नाहीं ! तिला जबरदस्तीनें ठेवून घेऊ नये ! तिला रायाकडे पाठवावी ! "

ह्या सूचनेची कुणीहि दखल घेतली नाहीं !

पण 'राया' आतां एकदम निजामावर चालून निघाला होता ! श्रीमंतांना निजामाच्या कुरापतींची बातमी आली. ते सतत स्वतःला कसल्या तरी धांवपळींत गुंतवून ठेवण्याचा यत्न करू लागले होते. मस्तानीचा विरह विसरण्याकरितां ! फौजा घेऊन ते गोदाकिनाऱ्याकडे दौडत चालले होते.

आप्पांनीं मस्तानीला महालांत ठेवलें, कैद केलें नाहीं. चौक्यापहारे बसवले नाहींत. एके दिवशीं तिनें कळवळून आप्पांना निरोप पाठविला,

" मला स्वारीकडे पाठवा ! मला त्यांची प्रत्यक्ष भेटहि होऊं दिली नाहीं तरी चालेल. जिथें दासीबटकी झोंपत असतील तिथें मला झोंपवा ! मी तिथें सुखानें झोंपेन. स्वारींच्या इमारतींत मला कुठेहि ठेवा ! स्वारी त्या इमारतींत आहे, एवढं सुख मी पुरेसं मानीन ! "

ह्या निरोपाचा कांहींहि उपयोग झाला नाहीं !

श्रीमंत पुण्यांत नसतांनाच रघुनाथाची मुंज उरकून घेण्याचा घाट घालण्यास सुरुवात झाली ! बापाच्या गैरहजेरींत मुलाची मुंज ! हं ! म्हणजे ब्रह्मवृंदाची तक्रार नको ! श्रीमंत स्वारीवर असतांनाच त्यांना बातमी आली कीं, रघुनाथाची मुंज आणि सदाशिवाचें लग्न पुण्यांत पार पडलें ! घरांत मंगलकार्य आणि घरचा कर्ता पुरुष घोड्यावरून वणवण दौडत फिरतोय रानोमाळ ! श्रीमंतांना फार वेदना झाल्या. निमूटपणें त्यांनीं त्या वेदनांचा घोट घेतला.

आणि बाईसाहेब ? आतां तर बाईसाहेब म्हणजे मूर्तिमंत वेदना ! मूर्तिमंत कारुण्य ! मस्तानीची भेटहि अवघड झाली त्यांना.

नानासाहेबांना भीति वाटूं लागली कीं, कदाचित् ही मस्तानी पुन्हा पळून जाईल ! ही काळजीच नको म्हणून त्यांनीं पर्वतीबागेंत तिला बोलावून घेतलं आणि एकदम कैद केलं ! मस्तानी कैदेंत पडली !

श्रीमंतांची आणि निजामी फौजांची गोदाकांठीं लढाई जुंपली होती. झटापटी चालू होत्या. अखेर श्रीमंतांनीं निजामी फौजांना जबरदस्त झोडपून काढलें. श्रीमंतांची अस्मानी फत्ते झाली. मुंगी पैठण येथें तह झाला.

लढाई संपली ! तलवारीचें थैमान संपलं. श्रीमंतांच्या डोळ्यांपुढें पुन्हा मस्तानी येऊं लागली ! अहोरात्र ! विसरायचं तरी कसं ?

तेवढ्यांत दिल्लींत इराणचा नादिरशाह घुसल्याच्या बातम्या आल्या.





**"बाबा, रंगीत कागद सारखे कापायच्या आधीं दुसऱ्या कशावर तरी कांपून बघ असं तुम्हींच नाहीं कां म्हणालांत ?"**

दिल्लीची नादिरनें दाणादाण केली. कत्तली आणि लुटी दिल्लीच्या रस्तोरस्ती अहोरात्र चालू होत्या. कोणी वाली उरलां नाहीं !

नाहीं कसा ? श्रीमंताना ह्या बातम्या मिळताच त्यानीं तावडतोब उत्तरेकडे घोडे फिरवले पुन्हा दौड सुरू झाली. तेवढाच निदान मस्तानीचा विसर पडूं लागला !

श्रीमत गोदातीरावरून नर्मदातीरापर्यंत त्वरेनें येऊन पोहोंचलें. नर्मदेच्या काठीं रावेरखेड येथें श्रीमंतांचा तळ पडला. तेवढ्यांत दिल्लीहून खबरा आल्या कीं, नादिरशहा दिल्लीतून इराणकडे झपाटयानें चालता झाला !

शिकार गेली ! आतां दिल्लीस जाण्याची काय निकड ? मग कुठं जायचं ? पुण्याला ? नको नको ! त्या पुण्यांतल्या जिभाचे फटकारे नको. त्यापेक्षां मरणाच्या वेदना सहन करणं फार सोपं.

पण मस्तानी तिथं आहे ना ? बाईसाहेब तिथं आहेत ना ? समशेर, रघूनाथ, वगैरे सारी मंडळी मुलं नाहीत का घरीं ? तीं चिमणी-पांखरं वाट बघत असतील नाही ?—पण नको नको घरीं जाणं नको.

श्रीमंताच्या डोक्यांतली दिल्लीची मोहीम थांबली. अन् ती थांबतांच मस्तानीचीं पावलं त्याच्याकडे धांवत येताना भासूं लागली कस विसरायच ? किती विसरायच ? एक, दोन, तीन दिवस गेले. चौथ्या दिवशीं श्रीमंताना जरासा ताप आला. श्रीमत उठले. निघाले, कुठें ? पोहायला बरोबरचे लोक सांगत होते, 'श्रीमंत नको, अंगांत ज्वर आहे' पण तरीहि श्रीमंतांनीं नर्मदेंत उडी घेतली. मस्तानीला विसरायच ना ? कुठं तरी मन गुतवून नको ठेवायला ? मनसोक्त पोहले. बाहेर आले. थंडीनें हुडहुडी भरली, ते कपडे बदलून तबूंत आले. थंडी वाजतच होती. पांघरुणं अंगावर घेतली फणफणून ताप भरत होता श्रीमंतांना.

दुसरा दिवस उजाडला. ताप उतरलाच नाहीं ! उपचार चालूंच होता ! पुण्याला तांतडीनें साडणीस्वार दौडत निघाले.

पुण्यात बातमी आली श्रीमंत अतिशय आजारी आहेत. ताप उतरत नाहीं ! फारच काळजी आहे.

शनिवारवाडयांत धांवपळ उडाली, कारभाऱ्यांनीं तावडतोब मेणा तयार केला. बाईसाहेबांना कळलं कीं स्वारी फार आजारी आहे. त्यांच्या जिवाची उलघाल उडाली. त्यांना असं वाटलं, पांखरासारखं उडून स्वारीपाशीं जाव ! कारभाऱ्यानीं मेण्यांत बाईसाहेबांना बसवलं स्वार शिपाई दिले, मेणा निघाला.

आणि मस्तानी ?

मस्तानी कैदेंत होती ! आप्पांच्या किंवा नानासाहेबांच्या परवानगीशिवाय तिला कसं पाठवायचं श्रीमंतांकडे ? आणि कशाला पाठवायचं ? घाईघाईनें बाईसाहेबांना तेवढं पाठविलं.

आप्पा आणि नाना पुण्यांत नव्हते ! ते कोंकणांत गेले होते.

बाईसाहेबांचा मेणा दौडत निघाला.

मस्तानीला कैदेंत ही बातमी समजली. मासळीसारखी तळमळूं लागली ती.

बाईसाहेबांचा मेणा रावेरखेडला पोहोंचला. श्रीमतांची प्रकृति अत्यवस्थ होती ! अखेरच्या घटका संपत आल्या होत्या. त्या श्रीमतांच्या उशाशीं आल्या. त्यांचा जीव श्रीमंतांची ती स्थिति पाहून कासावीस झाला. एक शब्द तरी श्रीमतानी बोलाव म्हणून त्या डोळे आणि कान टवकारून श्रीमताकडे व्याकूळतेनें पाहत होत्या. पण पण— व्यर्थ ! अखेरचा निश्वास श्रीमतानी सोडला ! प्राण निघून गेला ! बाईसाहेबांनीं धाडकन अंग टाकलं !

पुण्यास बातमी निघाली.

मस्तानीलाहि रावेरखेडला पाठवायचं असं पुण्यांत अखेर ठरलं. कारण छत्रपतींची सूचना पूर्वीच आलेली होती. शिवाय श्रीमताची प्रकृति फार बिघडलेली होती. मस्तानीला क्षण क्षण युगासारखा वाटत होता. तिला अतिशय ओढ लागली होती. तिचा मेणा निघाला. दौडत दौडत निघाला.

केंदूर-पाबळपर्यंत मेणा आला. ती भोयांना घाई करीत होती केव्हा एकदां श्रीमतांच्या उशाशयथ्याशी पोहोचेन असं तिला झालं होत. तेवढ्यांत समोरून साडणीस्वार येताना दिसले. स्वारानीं साडणी थांबवल्या. मेणा थांबला. मेणा थबकलेला पाहून मस्तानीने अधीरतेनें बाहेर पाहिलं. साडणीस्वारांनीं बातमी सांगितली.

"श्रीमत सरकार गेले ! रावसाहेब गेले !"

मेण्यांत किंकाळी फुटली ! स्वार शिपाई धांवले. मस्तानी निचेष्ट पडली होती ! ती पोहोचली होती ! श्रीमताच्या बाहुपाशात पोहोंचली होती !

शनिवारवाडयाच्या दरवाजाशी मेणा आला. दरवाजा उघडला गेला. मेणा आंत गेला. अंगणांत थाबून भोयानी मेणा खाली ठेवला. आप्पा, बाबा पुरंदरे आणि मुजूमदार माना खाली घालून उभे होते. सुन्न शांतता होती. मेण्यावरचा पडदा दूर झाला. तांबड अलवण नेसलेली एक विकेशा विधवा मेण्यांतून तोड झाकीत बाहेर आली आणि पायऱ्या चढून आंत गेली. समोर भिंतीवरच्या शमादानांत त्या विकेशा विधवेच प्रतिबिंब तरळत होत. त्या विधवेनें तोंडावर झांकलेले हात बाजूला केले. आसवानी ओलावलेला तो पांढरा फटक चेहरा शमादानांत दिसत होता—गंगा भागिरथी काशीबाईसाहेब !

●●●



सौ. सुधा करमरकर

# बालांच्या मेळाव्यांत रमलेल्या

# सौ. सुधा करमरकर

वसंत भालेकर

“ करी मनोरंजन जो मुलांचें जडेल नातें प्रभुशीं तयाचें” असं पूज्य साने गुरुजी म्हणत. आणि उभी हयात ही माउली बालांच्या मनोरंजनासाठीं नि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठीं झटण्यांतच चंदनाप्रमाणं झिजली. पण असं बालांच्या उन्नतीसाठीं, त्यांना कांहींतरीं चांगलं देण्यासाठीं, त्यांच्यापुढं वेगळं नि तितकंच सात्त्विक, सकस असं कांहीं ठेवण्यासाठीं आज कितीसा प्रयत्न होत आहे? बालमनाची दखल घेऊन त्यावर योग्य ते संस्कार करण्यासाठीं काय केलं जात आहे? “मुलं म्हणजे फुलं, ती राष्ट्राची फार मोठी संपत्ति आहे!” असं सभा-संमेलनांतून टाळ्या मिळविण्यासाठीं बोलणं निराळं नि या पुष्पांची तितक्याच हळूवारपणं हाताळणी करणं, त्यांच्या बालमनाची योग्य रीत्या बूज राखणं वेगळं.

“हल्लींची पोरं फार बिघडलीं आहेत हो, शिची रात्रंदिवस सिनेमा पहातात, सिनेमाचीं गाणींच पाठ करीत बसतात नि नट-नटींची माहिती मिळविण्यांत गुंतलेलीं असतात!” असे त्राग्याचे उद्गारहि अनेकदां कानी पडतात. त्यांत अतिशयोक्ति अशी कांहीं नाहीं, कीं त्यांचं म्हणणं असत्यहि नाहीं. आजच्या छोट्या छोट्या मुलांच्याहि तोंडीं घोळत असलेलीं, ओठावर नाचत असलेलीं सिनेमा—गीतें ऐकलीं कीं, मन विषण्ण होतं.

“याऽहू!” अशी आरोळी ठोकून डम् डम् डिगाच्या ठेक्यांत इना मीना डीगा करीत नि लाल लाल गाल चोळीत बसलेला, अय्यो य्यो सुकू सुकू असलीं अर्थहीन बडबड करणाऱ्या नि “तेरी प्यारी प्यारी सुरत को किसोकी नजर ना लगे” असलीं प्रौढांच्या तोंडींहि न शोभणारीं गीतें आवडीनें चघळत बसलेल्या बाल जीवांना सुसंस्कृत बनविण्यासाठीं असे प्रयत्न तरी कितीसे होत आहेत? बालांना चांगलं वळण लागलं पाहिजे. ही राष्ट्राची संपत्ति नीट जोपासली गेली पाहिजे. राष्ट्राच्या या भावी आधारस्तंभाची वाढहि तितक्याच सकसपणें झाली पाहिजें हें कबूल. पण एकीकडे समाजरचनाच पोखरून चालली आहे नि दुसरीकडे या भावी संपत्तीकडे दुर्लक्ष होत आहे तोंवर अशी ओरड करण्यांत काय अर्थ आहे?

आमच्या मुलांपुढं कसले चांगले आदर्श आहेत? त्यांना करमणूक वाटावयाची झाली तर त्यांच्यासाठीं निर्भेळ असं काय केलं जातं? नाटक सिनेमा पहायचे तेदेखील त्यांनीं आपल्या पालकांबरोबर त्यांच्या आवडीचे नि मग अशा नाटक सिनेमांतील जें कांहीं त्यांनीं पाहिलें असेल त्याचा परिणाम या बाल जीवांवर, त्यांच्या बाल मनांवर झाला तर त्यांत दोष कुणाला द्यायचा? मुलं म्हणजे बोलून चालून ओली माती, जसा आकार द्याल तसा त्यांना आकार येईल. त्यांच्यापुढं चांगलं ठेवल तर त्यांतून चांगलंच निघेल पण त्यांच्या पुढं चांगलं, त्यांना उपयुक्त असं, त्यांचं चारित्र्य बनेल, अभिरूचि चांगली नि तितकीच चोखंदळ बनेल असं फारस कांहीं येतच नाहीं.

## एक नवी दृष्टि

आणि म्हणून बाल रंगभूमीच्या पुरस्कर्त्या सौ. सुधाताई करमकर यांचं कार्य मला लाख मोलाचं वाटतं. बालांच्या सर्वांगीण विकासासाठीं गेलीं कांहीं वर्षे त्या तन्मयतेनं, तन मन धनानं झिजून जें कार्य

करीत आहेत तें मला तरी महान राष्ट्रकार्य वाटतं. बाल रंगभूमि त्यांनीं येथें रूजू घातली. तिचीं पाळमुळं खोल पसरवलीं नि आता हें रोपट हळू हळू बाळसंहि चांगल घेऊं लागलं आहे. बालांनाहि वेगळी करमणूक हवी. त्यांनाहि मन आहे, त्यांनाहि काहीं तरी निराळं भव्य, दिव्य नि तितकच त्यांच मन रिझवील, असं कांहीं पहावसं वाटतं, ही नवी दृष्टि महाराष्ट्राला तरी सुधाताईंनींच दिली आहे. अहोरात्र खपून, घरोघर हिंडून, शाळा शाळांतून फिरून नि पदराला खार लावून उत्तमोत्तम नाटयकृति बालरंगभूमीवर त्यांनीं आणल्या आहेत.

त्याचा परिणाम आज एवढा झाला आहे कीं, जनमनांत या दृष्टीनं थोडीफार जागृति होऊं लागली आहे. पालकाचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. लोकांत बाल रंगभूमीविषयी नवं आकर्षण निर्माण होऊं घातलं आहे नि लोकमान्यतेबरोबर त्याच्या या कार्याला सरकार-मान्यताहि मिळूं लागली आहे. महाराष्ट्र सरकारपासून केंद्रिय मंत्र्या-पर्यंत बालरंगभूमि असावी, तिच्यासाठी वेगळं नाटयगृह असावं अशी भाषाहि सुरू झालेली आहे. सुधाताईंनीं आजवर सोसलेल्या अपार कष्टांचच हें दृश्य फल आहे असं मी समजतें. 'आधीं केलें नि मग सांगितलें' असं समर्थ म्हणतात. सुधाताईंनीहि ही समर्थ उक्तीचं दृष्टीसमोर ठेवलेली आहे. त्यांनीं गाजावाजा न करतां बालरंगभूमि सुरू केली नि तिचं महत्व पटू लागतांच तिच्या प्रचाराला त्या पुढं सरसावल्या.

सौ सुधाताई करमकर यांचं बालपण रंगभूमीवरच गेलं. नाटय-कलेचं वेड त्याना बालपणापासूनच लागलं. नि शाळा कॉलेजांत शिक्षण घेत असतांना त्यांच अभिनयकलेचं शिक्षणहि सुरू झालं होतं. नाटयसृष्टींत त्यांचं नाव आकाराला येत होतं. पण त्याचबरोबर बाल रंगभूमीकडं त्यांचं मन अधिक आकर्षित होत होतं. पाश्चिमात्य देशां-तील नाटयविषयक विपुल साहित्य त्यांनीं वाचून काढलं नि त्यांतू-नच त्यांचा बालरंगभूमीविषयीचा वेगळा दृष्टिकोन बनत चालला. बालांसाठीं आपणहि काही करावं अशी त्याच्या मनाला वेगळीच टोंचणी लागूं लागली नि याच वेळी त्यांच अमेरिकेला प्रयाण झाल्यानं त्याच्या या पुसटत्या कल्पनेला आकार आला. तेथील रंगभूमीचा त्यांनीं बसून अभ्यास केला नि त्यातच त्याना बालरंगभूमीचं विशेष ज्ञान प्राप्त झालं.

अमेरिका काय, रशिया काय किंवा ब्रिटन काय या युरोपिय देशां-तून बालाच्या विकासासाठीं वेगळा, प्रयत्न केला जातो. शासन सस्थांच या बाबतीत जागृत असते नि म्हणूनच तिकडील बालरंग-भूमि समृद्ध झालेली आहे. बालाच्यासाठीं प्रत्यहि नवीं नवी नाटकं येतात, त्यांच्यासाठीं स्वतंत्र नाटयमंदिरं असतात नि ही बालाचीं नाटकं मोठयाचीहि भरपूर करमणूक करतात. बालाच्या या नाटकाना बालाइतकीच अनेकदां त्याहूनहि अधिक मोठयांचीहि गर्दी होत असते.

सौ. सुधाताईंचं शिकागोला वास्तव्य असताना त्यानी हें सारं प्रत्यक्ष पाहिलं. खूपशीं बालनाटयें पाहिली. नाटक बसविण्याची पद्धति डोळयाखालून घातली नि या नाटकांच्या वेळचा एकंदर थाटमाट, वेशभूषा, नेपथ्य, प्रकाश योजनानीहि त्यांचे डोळे दिपवून गेली आणि त्याच्या मनाचा ठाम निश्चय झाला—आपल्या मराठी भूमीत, मराठी मातींत, मराठी बाल विश्वात आपण असा प्रयत्न करावयाचाच.

काहीं करण्याचा संकल्प सोडणं वेगळं नि तो संकल्प प्रत्यक्षांत आणणं वेगळं. बालाच्या नाटयाच्या बाबतींत येथें काय होतं ? कांहीं नव्हतं. अमेरिकेस जाण्यापूर्वी संघ मंदिराच्या वतीनं त्यांनीं बाल रंग-भूमीचं सुतोवाच केलं होतं. नि १९५७ सालच्या नाटयोत्सवात त्यांनीं बालांचा संपूर्ण साडेतीन तासांचा कार्यक्रमहि सादर केला होता. पण १९५८ साली अमेरिकेला गेल्यावर नि तेथून आल्यावर त्यांना बालरंगभूमीची वेगळी दृष्टि लाभली होती नि या वेगळया दृष्टिकोनातूनच या रंगभूमीच्या विकासाला त्यांनीं प्रारंभ केला.

पण हें कार्य म्हणजे महा कठीण. शून्यातून विश्व निर्माण करण्या-इतकं कठिण, कारण बालांची रंगभूमि म्हणजे बाल कलाकारानीं बाल प्रेक्षकांसाठीं कांहींतरी करणें. एवढाच ढोबळ नि तितकाच चुकीचा समज येथें पसरलेला. प्रौढच कलावंत, पण बालासाठीं वेगळं कांहींतरी सादर करतात हें लोकांच्या मनावर बिंबविण्यांत त्यांचा अधिक काल खर्च झाला नि अधिक श्रमहि त्याना पडले

## यशस्वी धाडस

सुधाताईंनीं रंगभूमीवर प्रथम आणली 'मधुमंजरी !' मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहकार्यानं त्यांनीं हें धाडस केलं. त्या पाठो-पाठ अंकुराला 'जादुचा वेल' या दोन्ही नाटयकृतींच चागलच स्वागत झालं, बालगोपाळांना त्या नाटकांमधील निर्मितीमूल्यांनीच आकर्षित करून घेतलं. दोन्हीं नाटयकृति म्हणजे बोलून चालून परीकथाच. इंग्रजी भाषेंतून रुपांतरित केलेल्या निर्मितीसाठीं खर्चहि भरपूर आला. पण एकंदर वातावरण भारावून टाकणारं, बालमनाला मंत्रमुग्ध करणारं होतं.

पुढं सुधाताईंनीं आणखी एक धाडस केलं. १९५९ सालीं त्यांनीं स्वतःच लिटल थिएटर ( बालरंगभूमि ) ही सस्था स्थापन केली. त्याद्वारें पहिल्या दोन नाटयकृतींबरोबर 'कळलाव्या कांद्याची कहाणी' 'अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा' व 'राजा शिवछत्रपति' अशा आणखी तीन नाटयकृति रंगभूमीवर आणल्या. बालमनाची त्यांनीं चागली पकड घेतली. पालकानीहि त्याच स्वागत केलं. या सर्व प्रयोगाचें एकत्रिक असे १०० प्रयोग आणि 'कळलाव्या कांद्याची कहाणी' आणि 'अल्लाउद्दीन व जादूचा दिवा' याचे स्वतंत्र रौप्य-महोत्सव करण्याचें भाग्य सुधाताईंना लाभलें हें त्याच्या चिकाटीचें यश फार मोलाचें होय,

पण कौतुक खूप झालं. सुधाताईंच्या धाडसाचीहि तारीफ खूप होत आहे नि बालरंगभूमीच्या पुरस्कर्त्या म्हणून त्याना महाराष्ट्राचा मानाचा मुजराहि मिळत आहे. पण ही प्रशंसा, हें कौतुक ही कीर्ति नि हा लौकिक यामुळं त्याना पुढच कार्य करण्याला फक्त उत्साह मिळेल. चालना देण्यास त्याचा उपयोग होत नाही. त्याला आर्थिक पाठबळहि तसंच हवं हें आर्थिक पाठबळ मिळविण्यासाठीं नि बाल-रंगभूमि तगविण्यासाठी सुधाताईंना 'चंद्र नभीचा ढळला' अशा सारख वेगळ नाटक प्रौढासाठी रंगभूमीवर आणून त्यापासून पैसा मिळविण्याचा खटाटोप करावा लागला आहे. यातच त्याना बालरंग-भूमीपायी किती आर्थिक झळ बसत आहे याचं रहस्य लपलेल आहे.

बालांचीं नाटकं जितक्या खर्चाचीं तितकं त्याच उत्पन्न येत नाहीं. बालांसाठीं स्वस्त करमणूक हवी नि सर्वसामान्य लोकानाहि त्याचा फायदा मिळावा म्हणून त्यानी तिकिटाचे दर कमी केले नवा प्रयत्न, नवा प्रयोग, तेव्हा लोकात आकर्षण निर्माण होण्यासाठी, बालाना त्याची गोडी लागण्यासाठी नि बाल रंगभूमीविषयी अनुकूल जनमत बनविण्यसाठीं त्याना असं करणच भाग होतं. शिवाय सर्वसामान्य



‘कळलाव्या कांद्याची कहाणी’मध्यें—म्हातारीच्या वेषांत सौ. सुधा करमरकर



छत्रपती शिवाजी मध्यें....
शिवाजी : वामनराव पटवर्धन भवानीमाता : कुंदा पाठारे

माणूस चार मुलांबाळासह आपलं नाटक पहायला यावा अशी त्यांची अंतरीची इच्छा. मग अशा वेळीं त्यांचं येणं त्यांच्या खिशाला परवडणारंच हवं. नि म्हणूनच त्यांनीं आपली सारीं वैभवसंपन्न बालनाटचें लोकांना स्वस्तांत दाखविण्याला प्रारंभ केला.

पण नाटच निर्मितीच्या खर्चांत कांहीं कमी झालं नाहीं. बालांचीं नाटकं, बालांना रिझवतील, त्यांना त्यांत रस वाटेल, त्यांचे डोळे दिपून जातील, आणि कांहींतरी वेगळं, आगळं, वैशिष्टचपूर्ण पहात आहोंत, अद्‌भुतरम्य आपल्याला दिसत आहे असं त्यांना वाटण्यासाठीं नाटकंहि तेवढ्याच थाटांत, तितक्याच वैभवांत सादर करावयास हवींत. नि त्यासाठीं मग भव्य देखावे, प्रकाशयोजनेच्या नानाविध करामती, पोषाखाचा झगझगाट नि रंगभूषाहि चमकदार आलीच. पार्श्वसंगीतहि तितकंच चमत्कृतिजन्य हवं. बालमनच अधिक शंकेखोर, अधिक कल्पक नि तितकंच नाविन्याचं अधिक भोक्तं असतं. या बालमनाची आंस भागवायची, इच्छातृप्ति करायची तर असं कांहींतरी भव्य दिव्य करणंच भाग होतं. मग त्यासाठीं खर्च हा आलाच. जादूचा वेल रंगभूमीवर अवतरणार, चंदामामाचा झोपाळा आकाशांत चांदण्यांसह झुलणार, जादूचा दिवा पेटणार, धूरच धूर होणार नि त्यांतून राक्षस येणार! बापरे! हें काय थोडं झालं? त्यांत कल्पकता आहे, वेगळी करामतहि आहे पण त्याला खर्चहि तितकाच आहे.

नाटकाच्या थिएटरचं भाडं कांहीं बालनाटचांना कमी होत नाहीं. जाहिरातींत सवलत मिळत नाहीं. गाडीखर्च कमी होत नाहीं कीं छपाईला वेगळा दर आकारला जात नाहीं. हा सारा खर्च आहे तोच आहे, उलट उत्पन्न मात्र कमी.

सुधाताई कांहीं पैसे मिळविण्यासाठीं कांहीं हा धंदा उघडून बसल्या नाहींत. पण या बालरंगभूमीची सकस वाढ व्हायची तर त्यासाठीं पैसा हवाच. महाराष्ट्र सरकारचं वर्षासन लाभतं, नाहीं असं नाहीं. पण तेंहि अपुरं.

बाल रंगभूमि हवी, बालांसाठीं वेगळी करमणूक हवी. त्यांच्या मनाची चांगली वाढ होईल, त्यांची बुद्धि चौकस होईल, त्यांच्या हक्काचं, त्यांच्या मनासारखं कांहींतरी पहायला मिळायला हवं ना? मग तें सादर करणाऱ्याला प्रोत्साहनहि तसंच मिळायला हवं. नुसत्या घोषणा नकोत, फुकाच्या शुभेच्छा नकोत कीं तोंडभर आशीर्वादहि नकोत. आज या कार्याला हवा आहे सक्रिय पाठिंबा!

## एकांडी धडपड

मला विशेष वाटत तें सौ. सुधाताईंचं. त्यांचा हा एकांडचा शिलेदारासारखा प्रयत्न पाहून तितकाच अभिमानहि वाटतो. नि बालमनाचा कानोसा घेऊन त्यांनीं चालविलेलें हें कार्यहि अनमोल वाटतं. तसं पाहिलं तर त्यांना नांव कमवायला, पैसे मिळवायला, वैभवशिखरावर चढण्याला नाटचक्षेत्र होतंच कीं! त्या सुविद्य आहेत, सुसंस्कृत आहेत. विधात्यानं त्यांना शरीरसंपदाहि प्रमाणबद्ध नि तितकीच आकर्षक दिली आहे, चेहेरेपट्टीहि गोंडस नि व्यक्तिमत्वहि तितकंच मनाला भुरळ पाडणारं आहे. नि त्यांत अभिनयाचं उत्तम अंग आहे. कोणतीहि भूमिका, मग ती रंभासारखी बालीश असो, ‘तुझं आहे तुझं पाशीं’ मधील गीतासारखी गंभीर असो, ‘भाऊबंदकी’-तील दुर्गासारखी कांहींशीं जहांबाज असो, ‘सुंदर मी होणार’ मधील दीदीराजेसारखी सोशिक प्रवृत्तीची असो, नाहीतर ‘चंद्र नभींचा ढळला’ सारख्या पोषाखी नाटकांतील सुवर्णासारखी वेगळ्याच प्रकृतीची असो, कोणत्याहि भूमिकेंत त्या कल्पकतेनं नि तितक्याच जिद्दीनं रंग भरतात, नि म्हणूनच त्यांनीं नाटचसृष्टींत स्वतःसाठीं असं वेगळं स्थान मिळवलं आहे. त्यांनीं मनांत आणलं तर चित्रपटसृष्टींतहि त्या नांव नि संपत्तीहि मिळवूं शकतील. माझ्या माहितीप्रमाणं अनेक निर्मात्यांनीं त्यांच्यापाशीं सिनेमांत काम करण्याबद्दल विचारणाहि केली होती. श्री. सुधाकर करमरकर यांच्यासारख्या सुविद्य नि तितक्याच रसिकवृत्तीच्या पतीचंहि त्यांना भरपूर पाठबळ आहे. असं असूनहि त्या बालरंगभूमीच्या विकासासाठींच धडपडत आहेत. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा नि कांहींतरी वेगळं नि तेंहि समाजोपयोगी करावं अशी त्यांच्या मनाची झालेली धारणा. आणि म्हणूनच मी पुन्हां पुन्हां म्हणतो सौ. सुधाताई आज जें कांहीं बालरंगभूमीसाठीं करीत आहेत तें एक महान राष्ट्रकार्यच आहे.

परवांच सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक वसंतराव देसाई सौ. सुधाताईंच्या कार्याची तारीफ करतांना मला म्हणाले-“सुधाताई बालांसाठीं कांहींतरी करीत आहेत हें अत्यंत महत्वाचं आहे. मराठी मुलांची घडण चांगली झाली पाहिजे. त्यासाठीं चांगलं साहित्य, चांगल्या नाटचकृति, चांगले चित्रपट नि चांगल्या व्यायाम-शाला निघाल्या पाहिजेत. केवळ बालांसाठीं असा वेगळा प्रयत्न व्हायला हवा. आज पालकांबरोबर बालक करमणूक स्थानीं जातात. त्यांच्यापुढं वेगळंच येतं

त्यांची अभिरुचि त्यानं कांहीं संपन्न होत नाहीं. कारण बालांचं मत प्रौढांबरोबर फरपटत जातं. त्यांच्यासाठीं वेगळं असं कांहीं होत नाहीं. सौ. सुधाताईंनीं बालरंगभूमीची निर्मिति करून हें चांगलं कार्य आरंभिलं आहे. नव महाराष्ट्राची चांगली नि स्वतंत्र बांधणी करण्याच्या कामीं ना. चव्हाणांचं सरकार प्रयत्न करीत आहे. सौ. सुधाताईंचं हें कार्य चांगलंच पोषक ठरेल नि त्यासाठींच त्यांच्या या प्रयत्नाला भरपूर प्रोत्साहन मिळावयास हवं. ना. पाटील यांनीं बालांसाठीं नाट्य मंदिर उभारून देण्याचं आश्वासन दिलं आहे. मा. पाटील यांचं आश्वासन कधीं पोकळं नसतं तें– अंमलांत आलं कीं या कार्याला अधिक चालना मिळेल. कारण बालांच्या सत्तेचं असं स्वतंत्र थिएटर असेल."

## मधुमंजिरी ते राजा शिवछत्रपति

सौ. सुधाताईंनीं आजवर जीं नाटकं बाल रंगभूमीवर आणलीं त्यांतील चार तर रूपांतरितच आहे. 'अल्लादीन व जादूचा दिवा' आणि 'जादूचा वेल' हीं नाटकं त्यांनीं स्वत: लिहिलीं आहेत तर 'मधु मंजरी' व 'कळलाव्या कांद्याची कहाणी' श्री. रत्नाकर मतकरी यांनीं लिहिलीं आहेत. एकच नाटक त्यांनीं श्री. कमलाकर नाडकर्णी यांच्याकडून लिहून घेतलं, तें म्हणजे 'राजा शिवछत्रपति' या बाबत त्या मला म्हणाल्या, "शिवाजी महाराज ही आम्हांला वंद्य व्यक्ति आहे. महाराजांचं चरित्र, त्यांच्या जीवनांतील महत्त्वाचे प्रसंग बालकांच्या पुढं सादर करावे. नि या नाटकाद्वारें महाराजांचं स्फूर्तिदायक जीवनदर्शन त्यांना घडवावं याच उद्देशाधं मीं श्री. नाडकर्णी यांच्याकडून शिवबांच्या जीवनावर हें स्वतंत्र नाटक लिहून घेतलं. पुण्याचे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. ब. मो. पुरंदरे यांनीं लिहलेल्या दहा विभागांतील राजा शिवछत्रपती या पुस्तकाचा आम्हीं कसून अभ्यास केला नि त्या पुस्तकांवरून हें नाटक उभं करण्यांत आलं. त्यामुळं महाराजांचं संपूर्ण नि यथार्थ जीवन दर्शन बालांना होतं.

"अशाच तऱ्हेच्या आणखीहि कांहीं वंद्य पुरुषांची, राष्ट्र पुरुषांची, थोर नेत्यांचीं चरित्रें नाटकाच्या रूपानं सादर करण्याची माझी योजना आहे नि त्यादृष्टीनं मी प्रयत्नालाहि लागलें आहे."

सौ. सुधाताई जितक्या प्रेमळ, मन मिळावू, तितक्याच धडाडीच्या निर्मात्या आहेत. त्यांनीं आजवर जें जे हातीं घेतलं त्याचं सोनं झालं आहे. तेव्हां त्यांचे पुढील प्रयत्नहि सफल होतील. यांत शंकाच नाहीं. त्यांना अलीबाबा चाळीस चोरांसह रंगमंचावर आणायचा आहे, जाड्या व रड्यालाहि बालमित्रांपुढं सादर करायचं आहे. श्रीकृष्ण जीवनांवरील गंमतीदार नि तितक्याच उद्बोधक, स्फूर्तिदायक अशा श्री. केशव केळकर लिखित. 'असा कसा देवांचा देव बाई छकडा' या पौराणिक नाटकाचीहि त्या तयारी करून राहिल्या आहेत. सुधाताईंचा कामाचा उरक दांडगा, दिग्दर्शन कौशल्यपूर्ण, कल्पक नि स्वत: बरोबर इतरांच्या भूमिका उत्कृष्ट सजविण्याकडे बारीक नजर यामुळं हीं नाटकंहि जनमनाचीं निश्चित पकड घेतील यांत संदेह नाहीं.

●●●






# धन्य तूंचि कांता

वि. स. खांडेकर
एस. एम्. जोशी ★
केशवराव भोळे
अशोककुमार ★
य. गो. जोशी
मनमोहन ★
अमर वर्मा
उद्योगपति गोगटे ★
वसंत जोगळेकर
खंडू रांगणेकर ★

विविध क्षेत्रांतील प्रथितयशांना 'माणूस'नें हें एक सांकडेंच घातलें होतें. 'आपल्या पत्नीविषयीं आपल्या भावना काय आहेत? आपल्या यशस्वितेंत तिचा वांटा किती व कोणता? आपल्या सांसारिक सुखाची वाटचाल कशी झाली?' या किंवा अशा स्वरूपाच्या प्रश्नांविषयीं मौनच धारण करण्याची आपल्याकडे वृत्ति आहे. अनेकांना विषय आवडला, पण तो प्रकटपणें मांडणें त्यांना प्रशस्त वाटेना; अनेकांना विषयच अवघड वाटला; ज्यांना तो रुचला त्याचें हें मनमोकळें आत्मकथन...



## वि. स. खांडेकर

एकोणिसशे एकोणतीस सालीं मनू मणेरीकर उषा खांडेकर होऊन आमच्या घरीं आली. त्यावेळीं शिरोड्याजवळच्या आरवली या खेड्यांतल्या दरमहा दीड रुपया भाड्याच्या एका छोट्या कौलारू घरांत मी रहात होतों. आपलें तें नवें घर पाहून तिला काय वाटलें, याची मला कल्पना नाहीं. पुढच्या एकोणतीस वर्षांच्या सहजीवनांत. थट्टेनें कां होईना, तिला हें विचारण्याचा धीर मला झाला नाहीं! तिनेंहि कधीं ती गोष्ट काढली नाहीं. तांदुळानें भरलेल्या ताम्हनांत मीं "उषा" हें नांव आंगठीनें काढलें त्यावेळी माझा एक बालमित्र उद्गारला होता. "या नांवाला ग्रंथाधार आहे हं!" त्याच्या त्या उद्गाराचें कांहींना हंसू आलें, अनेकांना त्याचा कांही बोध झाला नाहीं. त्याचा रोख होता माझ्या "रंकाचें राज्य" या नाटकावर! आदल्याच वर्षी तें रंगभूमीवर आलें होतें. त्यांतल्या नायिकेचें नांवहि "उषा" होतें.

त्या मित्राची ही कोटी त्यावेळीं उषेला कळली नसेल. पण तिनें आरवलीच्या आपल्या चिमण्या घरट्यांत पाऊल टाकलें तेव्हां लवकरच एक गोष्ट तिच्या लक्षांत येऊन चुकली. ती म्हणजे त्या घराला मुख्य आधार ग्रंथाचाच होता! सर्वसामान्य संसाराला लागणाऱ्या अनेक गोष्टींची तिथें उणीव होती मात्र पुस्तकें भरपूर होतीं. ओसरीवरच्या लहानशा खोलींत कोणींहि सहज डोकावून पाहिलें असतें, तर तिथें एखादें मोफत वाचनालय असावें, असा त्याला भास झाला असता!

उषा एका खेडेगावांतच लहानाची मोठी झाली होती! पण कांहीं झालें तरी ती तिथल्या इनामदारांची मुलगी होती! तिचें माहेरचें घर चांगलें प्रशस्त व दुमजली होतें. संसाराला लागणाऱ्या सर्व वस्तूंनीं तें परिपूर्ण होतें. उलट आमचें घर त्या मानानें पुष्कळ लहान व ओकें-ओकें होतें. लग्नापूर्वीचीं नऊ वर्षें शिरोड्याला मीं माझ्या चिमुकल्या ध्येयाच्या धुंदींत काढलीं होतीं. संसाराचा गाडा पैशाचें वंगण नसलें तर पावलोपावलीं कुरकूर करूं लागतो, या कटु सत्याचें त्या धुंदींत मला कधीं स्मरणच झालें नव्हतें! माझ्या बहिणीनें आपल्या मायेचें पांघरूण घालून माझ्या दोषांप्रमाणेंच माझें दारिद्र्यहि कधीं कुणाला दिसूं दिलें नव्हतें. मला तर त्याची शुद्धच नव्हती! मी एका काल्पनिक जगांत स्वच्छंद भटकत होतों. जिद्दीनें शाळा चालवायची. शाळेच्या अगर अशाच दुसऱ्या सार्वजनिक कामांचा शीण आला की तो लेखन-वाचनाच्या पेल्यांत बुडवून टाकायचा, या पलिकडे माझा वास्तव जगाशीं फारसा संबंधच नव्हता.

मी शाळेचा हेडमास्तर होतों खरा; पण माझा पगार त्यावेळीं पंचवीस-तीस रुपयांपेक्षां अधिक नव्हता! घरांत मी आणि माझी बहीण यांशिवाय एक शिकणारा पुतण्या होता. मुद्दाम शिक्षण देण्या-करिता आणलेली एका स्नेह्याची बालविधवा बहीण होती. नववधूला फुलवील, हर्षित करील असें माझ्या त्या मोडक्या संसारांत कांहींच नव्हतें. पण घरांत पाऊल टाकल्यापासून उषा माझ्या दरिद्री संसाराशी समरस होऊन गेली. पुढें दोन-तीन वर्षांनी मी कादंबरीकार झालों. त्यानंतर चित्रपट कथालेखक झालों. मला चार पैसे मिळूं लागले. पण त्यांतले बहुतेक पैसे माझ्या पुतण्याच्या कॉलेज शिक्षणांत आणि गरीब विद्यार्थ्यांना किंवा गरजू आप्तमित्रांना मदत करण्यांत खर्च होत असत. उषेच्या सुग्रणपणाला, सौंदर्यदृष्टीला आणि गृहिणी या नात्यानें तिच्या अंगीं असलेल्या अनेक गुणांना पूर्णपणें उमलायला शिरोड्यांतल्या त्या पहिल्या नऊ वर्षांच्या संसारांत फारसा अवसर मिळाला नाहीं.

मग तिची स्त्रीसुलभ दागदागिन्यांची हौस किंवा वस्त्रप्रावरणाचा सोस यांना तिथें वाव कुठून मिळणार? कर्नाटकाच्या सीमेवर वाढल्या-मुळें कीं काय, तिला चमकीची हौस होती! तिनें चमकीसाठीं लहान-पणींच डावी नाकपुडी टोंचून घेतली होती! तिची एक तरी हौस आपल्या हातून पूर्ण व्हावी म्हणून त्यावेळीं मीं नव्वद रुपयांची एक चमकी तिच्यासाठीं घेतली. पण त्या चमकीमुळें पुढच्या एका वर्षाचें माझें बजेट तुटीचें झालें! तुटीचें अंदाजपत्रक करून सरकार लोकांवर कर बसवूं शकतें. पण माझा पेशा पडला शिक्षकाचा आणि लेखकाचा! या दोन्ही व्यवसायांत जें पदरांत पडेल त्याच्यावर माणसाला समाधान मानावें लागतें. त्याला कमींतकमी देण्याकडेच समाजाची नेहमीं प्रवृत्ती असतें, कारण तो कुणाचीहि अडवणूक करूं शकत नाहीं किंवा कसलाहि काळाबाजार करूं शकत नाहीं.

पण चारी बाजूंनीं आर्थिक मर्यादा असलेल्या हा प्रपंच सुंदर करून दाखविण्यांत उषा रमून गेली. माझ्या ध्येयवादाशीं तिला कांहीं कर्तव्य नव्हतें. मी लेखक असलों तरी लेखनाचीं गोड फळें त्यावेळीं तिला चाखायला मिळत नव्हतीं! असें असून अगदीं हंसतमुखानें क्षणभरहि कुरकूर न करतां कोड्यांचा मांडा करून तिनें त्या चिमु-कल्या संसाराला सहज रमणीय रूप कसें दिलें हें मला आजहि नीट सांगतां येणार नाहीं! लेखक म्हणून माझी मिळकत त्यावेळीं अल्प होती. पण साहित्याच्या जगांत स्नेहसंबंध आणि ऋणानुबंध पुष्कळ वाढले होते त्यामुळें श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नरसिंह चिंतामण केळकर, माधवराव पटवर्धन, यशवंतराव पेंढरकर, कवि बोरकर यांच्यासारखी मंडळी अधूनमधून त्या कोपऱ्यांतल्या खेड्यांत याव-याची आणि चार दिवस काव्यशास्त्रविनोदांत घालवून परत जावयाची. ही सारी मंडळी उषेच्या पाहुणचारावर खूष असत. तिची टापटीप, स्वयंपाकघरांपासून माझ्या लिहिण्याच्या खोलीपर्यंत ज्या चार गोष्टी घरांत असतील त्या आकर्षक रीतीनें ठेवण्याची हातोटी. साध्या

भाकरीपासून पुरणपोळीपर्यंत प्रत्येक पदार्थ एखाद्या कलाकृतीप्रमाणें सारा जीव ओतून करण्याची धडपड, इत्यादि गोष्टी पाहून मला फार बरें वाटे. मी अनेकदां थट्टेनें तिला म्हणें, 'हात लावला कीं सोनें' या गोष्टींतल्या राजासारखी जादू तुझ्या हातांत आहे!'

तिच्या या उपजत संसार-कौशल्यामुळे पिठामिठाच्या भानगडींत फारसें लक्ष न घालणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला हायसें वाटलें असलें, तर त्यांत नवल नाहीं. या प्रसन्न संसारामुळें व तो चालविणाऱ्या गृहिणीमुळें १९२९ ते १९३८ या काळांत माझ्या लेखनाला विलक्षण गति आली. या अवधींत 'हृदयाची हांक' 'कांचनमृग', 'उल्का', 'दोन ध्रुव', आणि 'हिरवा चाफा' या कादंबऱ्या मीं लिहिल्या. याच काळांत जवळजवळ शंभर लघुकथा, पांचपन्नास-लघुनिबंध, 'गडकरी—व्यक्ति आणि वाङ्मय' हा टीकात्मक प्रबंध असें नानाविध लेखन मीं केलें. पण त्या लेखनाचा माझ्या मनावर मुळींच ताण पडला नाहीं. लग्न झाल्यानंतर माझ्या वहिनीनें तिला सांगितलें होतें, 'माझा हा हट्टी, छंदिष्ट भाऊ आज मी तुझ्या हवालीं करीत आहे. त्याच्या डोक्यांत जें वेड येईल त्याच्याप्रमाणें तो धांवत सुटेल! त्याला ताब्यांत ठेवणें मोठें कठीण काम आहे. जेवतांना जेवणावर त्याचें लक्ष नसतें, वाचायला बसला म्हणजे तो वाचीतच बसतो, फिरायला गेला म्हणजे चार चार तास फिरत राहतो! आतांपर्यंत मीं त्याला सांभाळलें. आतां तूं त्याला सांभाळायला हवंस?"

हे शब्द जणूं कांहीं उषेच्या मनावर कोरले गेले होते. मला प्रसन्न मनःस्थितींत ठेवायचें आणि लिहावाचायला व सार्वजनिक कामांना पूर्ण अवसर द्यायचा, अशा धोरणानें ती त्यावेळीं वागत असे. शिवाय व्यवहारज्ञान माझ्या अंगीं फार बेताचें असल्यामुळें संसारांत निर्माण होणाऱ्या चहाच्या पेल्यांतल्या वादळांतून तिलाच मला निभावून न्यावें लागे! अशाच एका प्रसंगाची आठवण अजून मला होते आणि हंसूं कोसळतें. तें झालें असें—१९३७ सालीं कांहीं कट्टर गांधीवादी कसल्यातरी प्रचाराकरितां शिरोड्यांत येऊन दाखल झाले. त्यांत एक बडे देशभक्त होते. एक हरिजन गृहस्थहि होते. ही मंडळी कॉंग्रेसचे एकनिष्ठ अनुयायी असलेल्या एका सुखवस्तु सद्गृहस्थांच्या घरीं उतरण्याकरितां गेली. पण पाहुण्यांत एक हरिजन आहे, हें लक्षांत येतांच त्या कार्यकर्त्यांनीं त्यांना दारांतच रजा दिली! शेवटीं 'चुकलें माकलें गुरुं धामापूरचा तळ्यांत' या न्यायानें हा जथा आमच्या घरीं आला! पाहुणे पडले कट्टर गांधीवादी, त्यांनीं लगेच हातसडीच्या तांदुळांचा भात आम्हांला हवा, दही पाहिजे पण तें गाईच्या दुधाचेंच असलें पाहिजे इत्यादि इत्यादि हुकूमवजा विनंत्या मला केल्या! त्या ऐकून माझ्या तोंडचें पाणी पळालें. ज्या शिरोड्यांत तान्ह्या मुलाला गाईचें दूध हवें म्हटलें तरी मिळणें अशक्य होतें तिथें पांच-सहा गांधीवाद्यांना लागणारें गाईच्या दुधाचें दही कुठून आणावें तें मला कळेना. मीं हताश मुद्रेनें हें सर्व उषेला सांगितलें. क्षणभर ती गोंधळली, पण 'मी सगळी व्यवस्था करतें' असें तिनें मला सांगितलें. तिच्या शब्दांचा कांहीं अर्थ कळत नसूनहि मी गप्प बसलों. स्पेशल टॅक्सी करून सावंतवाडीला जावें आणि तिथून हातसडीचे तांदूळ व मिळाल्यास गाईच्या दुधाचें दही आणावें हा विचार मीं सोडून दिला. दुपारीं जेवतेवेळीं पाहतों तो पाहुणे भातावर खूष होते. दही तर त्यांना फारच पसंत पडलें! ते गेल्यावर, 'हें सारं कुठून पैदा केलंस?' असें मीं तिला विचारलें. ती उत्तरली, "सारं आपल्या घरांतलंच होतं!" मी अधिकच आश्चर्यचकित झालों, तेव्हां ती हंसत



कै. सौ. उषाताई

म्हणाली, "कादंबऱ्या लिहून हें कळायचं नाहीं! घरांतल्या तांदुळाचे मीं हातसडीक तांदूळ बनविले. मीं वाढलेलं दही तर म्हशीच्या दुधाचंच होतं! त्या तांदुळांवर आणि दह्यावर तिनें जे रासायनिक प्रयोग केले होते, त्यांचें रहस्य मला नंतर कळलें असले तरी तें इथें सांगणें योग्य होणार नाहीं.

१९३८ सालीं आम्हीं कोल्हापूरला आलों. आलों कसले? दिग्दर्शक विनायक यांनीं जवळजवळ आम्हांला पकडूनच आणलें. शाळा सोडून कोल्हापूरला येऊन राहायला माझें मन तयार होत नाहीं, हें पाहतांच ते एके दिवशीं आपली 'हाफ़्टन्' गाडी घेऊन माझ्या घरांपुढें उपस्थित झाले आणि उषा व अवि, मंदा हीं मुलें यांना बरोबर घेऊन निघून गेले! त्यामुळें सुई मागून दोरा जावा त्याप्रमाणें कांहीं काळ मीं कोल्हापूरला राहण्याचें ठरविलें. १९३८ पासून १९४३ पर्यंतचें माझें इथलें वास्तव्य दिग्दर्शक विनायक व 'हंस' कंपनींतील अनेक सहकारी यांच्यामुळें माझ्या कुटुंबाला सुखदायक व माझ्या लेखनाला उपकारक झालें. गृहिणी या नात्यानें उषेच्या अंगीं असलेल्या सर्व गुणांचा फुलोरा यायला हा काळ अनुकूल होता. तसा तो आलाहि. केवळ साहित्य आणि चित्रपट यांच्याशीं संबंध असणारे पाहुणेच माझ्या घरीं येत असत असें नाहीं. पण जयप्रकाशजी घरीं उतरल्यामुळें दहा-वीस पाहुण्यांची उठावस करावी लागे अथवा कुठल्यातरी संमेलनाला गेलेला साहित्यिक दहा-वीस पाहुण्यांची फलटण घेऊन मध्यरात्रीं उपस्थित होवो; त्यांचा सर्व प्रकारचा आदरसत्कार व पाहुणचार करतांना उषेच्या तोंडावरलें हसूं कधीं मावळलें नाहीं!

उलट पाहुणे जेवढे अधिक तितका तिचा काम करण्याचा उत्साह वाढे. तिची संसाराची सजावट आणि त्यांत दिसून येणारी सौंदर्यदृष्टि पाहून दिग्दर्शक विनायक अनेकदां म्हणत, 'स्टुडिओंत स्वयंपाकघर व माजघर मांडण्यापेक्षां वहिनींच्या घरीं यावें आणि दोन घटकांत शूटिंग करून जावं!" गृहस्थाश्रम सफल व्हायला गृहिणीच्या अंगीं ज्या ज्या गोष्टी लागतात, त्या त्या तिच्या ठिकाणीं उपजतच होत्या.

पुरुषानें नुसतें स्वयंपाकाचें चांगलें साहित्य घरीं आणून पदार्थ कांहीं रुचकर होत नाहींत ! पाकशास्त्रावरल्या पुस्तकांच्या मदतीनें पाकसाधना करणाऱ्या आजकालच्या कांहीं बायका पहिल्या आणि त्यांच्या सुग्रणपणाची चव चाखली म्हणजे उषेनें माझ्या अस्ताव्यस्त प्रपंचाची एक केवढी मोठी बाजू किती कुशलतेनें संभाळली होती, याची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. किंबहुना, त्या काळांत माझ्या हातून चित्रपट, कादंबऱ्या लघुकथा, लघुनिबंध, असें सर्व तऱ्हेचें जें विपुल लेखन झालें त्यांचे मुख्य कारण पैसे मिळविण्याशिवाय संसाराचा कुठलाहि भार माझ्या अंगावर नव्हता हें होय. मनसोक्त लिहावें –वाचावें, चर्चा करावी, व्याख्यानें द्यावीं– कांहीहि करावें ! या सर्व गोष्टींना मला मुबलक वेळ मिळत होता. त्यामुळें सर्पदंशानं प्रकृतींत अनेक विकृति निर्माण केल्या असूनहि माझ्या लेखनांत सहसा खंड पडला नाहीं.

पण १९४३ नंतर हें गाडें बदललें ! अधूनमधून उपेला होणारा 'स्प्रू'चा त्रास बळावला. विनायक १९४७ सालीं अचानक दिवंगत झाले. माझ्या विशिष्ट प्रकारच्या कथा पेलणारा दुसरा दिग्दर्शक दृष्टिसमोर नसल्यामुळें आणि हलकेफुलके व नाचगाण्यांनीं भरलेलें चित्रपट लिहिण्याची इच्छा नसल्यामुळें मीं त्या सृष्टीकडे पाठ फिरविली. त्यानंतर लवकरच उपेला रक्तदाबाचा त्रास सुरू झाला. पांच–सात वर्षे माझी आर्थिक ओढाताण झाली. जवळ जे थोडे पैसे होते, ते माझ्या स्वभावाप्रमाणें मीं कुणालातरी आधींच देऊन टाकले होते. ते लवकर परत मिळण्यासारखें नव्हतें ! वाङ्मयाच्या किंवा चित्रपटाच्या बाजारांत बसून पानपट्टीचें नाहींतर किराणमालाचें दुकान उघडण्याची माझी उच्छा नव्हती ! साहजिकच, तिच्या शेवटच्या दुखण्यांत मीं तिची शक्य तितकी सेवा केली असली तरी केवळ पैशानें




मिळणारीं जीं अनेक सुखें असतात तीं मला तिला फारशीं देतां आलीं नाहींत. उलट, माझें परोपकाराचे प्रयोग नित्य सुरू असल्यामुळें तिच्यावर या काळांत थोडा अधिकच ताण पडला. पण तिनें तो आनंदानें सोसला.

उदाहरण म्हणून एकच आठवण सांगतो. एके दिवशीं रात्री सात-आठ वाजतां खानदेशचा एक गरीब मुसलमान विद्यार्थी दत्त म्हणून माझ्या घरांत येऊन उभा राहिला ! त्याची स्थिति पाहून त्याला विन्मुख पाठविणें माझ्या जिवावर आलें. घराचा गाडा पूर्ववत सुखवस्तुरीतीनें चालण्यासारखी परिस्थिति नव्हती. उषेची प्रकृतीहि ढासळलेली होती. पण त्या विद्यार्थ्याला ठेवून घेण्यासंबंधी तिनें माझी इच्छा लक्षांत येतांच पांच मिनिटेंहि आढेवेढे घेतले नाहींत ! तो मुलगा लवकरच घरांत रुळला. तिला 'आई' म्हणून हांका मारूं लागला ! मॅट्रिक पास होऊन गेला; नोकरीला लागला.

हें किंवा असेंच कांहीं लहानसहान चांगलें माझ्या हातून घडलें असेल तर त्यांत तिचा वांटा पुष्कळ आहे. तसें पाहिलें तर तिच्या–माझ्या स्वभावांत साम्य फार थोडे होते. ती संसारी गृहिणी होती; मी संसार करणारा, पण अत्यंत अव्यवहारी वृत्तीनें वागणारा एक छांदिष्ट मनुष्य होतों ! माहेरीं ती परंपरागत वातावरणांत वाढली होती. माझ्या घरीं जातपात या शब्दाला अर्थ नव्हता. गरीब–श्रीमंत या भेदाला किंमत नव्हती ! शिवाय तिचा स्वभाव तापट होता. माझ्या आवडीनिवडी, आचारविचार यांच्याशीं सहज जुळवून घेणें तिला कठीण होत असे. माझ्या हातांत पैसा आला तरी तो घरांत टिकत नसे. तिच्या अनेक लहानमोठ्या सांसारिक इच्छा वेळेवर कधींच पुऱ्या होत नसत. त्यांतल्या कांहीं कांहीं तर शेवटपर्यंत अतृप्त राहिल्या ! मी मात्र 'अ'ला मदत केल्याचें आणि 'ब'च्या उपयोगीं पडल्याचें श्रेय पदरांत पाडून घेतलें ! माझ्या या संसारदृष्ट्या चुकीच्या वागणुकीचा तिला पुष्कळ त्रास होत असे. पण तिनें मला कधींहि विरोध केला नाहीं. माझ्यासाठीं असल्या सर्व गोष्टी-त्यांतल्या अनेक स्वतःला पटत नसूनहि तिनें केल्या.

अशा अनेक आठवणी आज माझ्या मनांत जाग्या होत आहेत. त्यांतला मध गोड आहे; पण मृत्यूच्या मधमाशीचा दंश असह्य आहे. संसार हा काव्य नाटकांतल्या प्रेमकल्पनांप्रमाणें कधींच साजरा होत नाहीं. त्यांत तडजोड आहे, देवाण–घेवाण आहे; सुखदुःखांचा काला करून आणि एकत्र बसून तो खाण्यांतली मौज आहे; हंसतमुखानें आत्मयज्ञ करण्याचा आनंद आहे ! तो आनंद उषेच्या सहवासांत मला मिळाला. म्हणूनच तिच्यावर पडलेले मृत्यूचे पाश आतां सैल होणें अशक्य आहे. याची जाणीव ज्या क्षणीं मला झाली, त्या क्षणीं व्याकुळ झालेल्या मनानें 'धुकें' ("वनदेवता") ही कथा मी लिहून गेलों. तिचा शेवट असा आहे––

"छे ! तूं माझ्यापाशीं नाहींस. या राक्षसी धुक्याच्या लाटांनीं तुझी माझी ताटातूट केली आहे. त्या आपणा दोघांना एकमेकांपासून दूर–फार दूर–नेत आहेत. पण–पण या समुद्रांत मी कुठेंहि असलों–– अगदी त्याच्या तळाशीं गेलों–तरी मी तुला विसरणार नाहीं."

हा प्रलय कांहीं काळानें ओसरेल ! मग पुन्हा निर्मळ, निळसर धुकें सर्वत्र नाचूं लागेल. त्या धुक्यांत तुला जी पहिली हांक ऐकूं येईल ती माझीच असेल !

त्या हांकेला तूं ओ देशील ना ? देशील ना ?

●●●



श्री. एस्. एम्. जोशी



सौ. ताराबाई

प्रियतम तारा,

परवां महानगरपालिकेच्या निवडणुकीला मी उभें रहायचें ठरवलें तेव्हां तूं अगदीं अस्वस्थ झालीस. खूप रागावलीस. "एक पाठोपाठ दिव्यें करायला लावतां तुम्ही. लग्न झाल्यापासून चार महिने निश्चिंतपणें सुखांत घालवलेले आठवत नाहींत मला—" असें कांहींसें तूं म्हणालीस. तुझे ते उद्गार ऐकून माझें मनदेखील प्रक्षुब्ध झालें. मनावरचा ताबा सुटूं लागला. तेव्हां मुद्दामच गाडीला उशीर असूनहि मीं स्टेशनचा रस्ता धरला. गाडींत बसल्यावर वर्तमानपत्रांत लक्ष गुंतवण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! मनाला स्थिरता नव्हती. कालवाकालव होत होती. वर्तमानपत्र बाजूला सारून मी विचार करूं लागलों. गतायुष्याचा चित्रपट मनःचक्षूंपुढें सरकूं लागला. एकामागून एक घटना घडतांना पाहिल्या. आणि तुझ्या उद्गारांतील खरेपणा मनाला जाणवूं लागला. आपल्या वैवाहिक जीवनांतील कांहीं प्रसंग आठवून तर किंचित् मौजहि वाटली. आपल्या वैवाहिक जीवनाची विशेषता कशांत आहे म्हणून विचारायचें तर मी म्हणेन कीं, घटना कशाहि घडल्या तरी तुला त्यामध्यें क्लेश झालेच पाहिजेत. जणूं तें तुझ्या पांचवीला पुजले आहेत.

आपला प्रपंच पाहून तुझी एक महाविद्यालयीन मैत्रिण काय म्हणाली तें लिहिलें होतेस. रविवारचा दिवस होता. शाळेला सुट्टी असल्यामुळें तुला नोकरीवर जावयाचें नव्हतें म्हणून तूं कॉटवर पडून कांहींतरी वाचीत होतीस. तारानें एका देशभक्ताशीं लग्न केलें आहे. तिचा प्रपंच कसा काय चालला आहे तें पहावें म्हणून तुझी मैत्रिण तुझ्याकडे आली. तिनें जेव्हां पाहिलें कीं, आपल्या घरांत कॉट आहे, कॉटवर गादी आहे, खोलींत टेबल-खुर्ची आहे, आणि टेबलावर विजेचा दिवा आहे तेव्हां ती उद्गारली, 'अय्या, तुझ्याकडे सर्व कांहीं आहे. अगदीं इतरांच्यासारखा संसार थाटला आहेस कीं—!" तिचीं हीं मुक्ताफळें ऐकून तुझ्या अंगाचा भडका उडाला. पण माझ्यावर तूं कडाडतेस तशी तिच्यावर कडाडून पडूं शकलीं नाहींस. "मग व्हा कीं देशभक्ताची बायको" हा लेख लिहून तूं आपल्या मनाचें दुःख हलकें केलेंस. बिचारी मैत्रिण ! केवळ सुखाचीं साधनें असलीं म्हणजे सुख मिळत नाहीं हें तिच्या लक्षांत आलें नाहीं. कारण नवरा तीन तीन वर्षें तुरुंगांत राहिला म्हणजे त्याच्या पत्नीला काय काय सोसावें लागत असेल याची तिला कल्पना नसावी. तुला तर गरिबींत दिवस काढावे लागत होते. नोकरी करून प्रपंच चालवावा लागत होता. तूं कमवायचें आणि उडाणटप्पू नवऱ्याची देशभक्ति संपादून न्यायची. आपला अजय त्यावेळीं अगदीं लहान होता. तूं शाळेंतून परत येण्याआधीं तो बालकमंदिरांतून यायचा. दरवाजाला कुलूप पाहून खट्टू व्हायचा. एकदां तर असाच आईची वाट पहात पहात तो दरवाजांतच झोंपून गेला होता—म्हणून तूं मला लिहिलें होतेस. तें वाचून माझें मनहि कासावीस झाल्याचें मला स्मरतें, मग तो देखावा प्रत्यक्ष पहाणाऱ्या मातेच्या अंतःकरणाला ज्या वेदना झाल्या असतील त्याची कल्पनाच केलेली बरी.

आपण विवाहबद्ध व्हायचें ठरवलें त्यावेळीं माझ्या खडतर जीवनाची मीं तुला कल्पना दिली होती. तुझ्या मोठ्या बंधूंनीं मला विचारलें तेव्हां मीं चक्कच सांगून टाकले होतें, कीं आपण नोकरी वगैरे कांहीं करणार नाहीं, सार्वजनिक कार्यच करीत राहणार ! त्यांना चिंता वाटत होती कीं, आर्थिक दृष्ट्या आपला प्रपंच कसा चालणार ? आर्थिक अडचणी दूर केल्यानें तुला सुख लाभेल अशी त्यांची कल्पना होती. माझ्याशीं जिचा विवाह संबंध येईल तिला क्लेशच मिळतील हें त्यांना त्यावेळीं कसें कळावें ? आपलें लग्न झालें आणि दहा बारा दिवसांतच दुसरें महायुद्ध पेटलें. मी किती दिवस बाहेर राहीन याची चिंता उत्पन्न झाली. युद्धविरोधी चळवळींत भाग घेऊन मला तुरुंगांत जावें लागणार हें ठरलेलेंच होतें. जितके दिवस बाहेर असेन तितके दिवस अधिकाधिक सहवास लाभावा असा हव्यास तुझ्या ठिकाणीं निर्माण व्हावा हें स्वाभाविकच होतें. परिणामतः दुसरीं माणसें आलीं म्हणजे तुला राग येई. आणि मग मला तुझा राग येई. माणूसघाणी म्हणून मी तुला नांवें ठेवी. आणि त्याचा परिणाम नेमका उलटा होऊं लागला. अशा जीव टांगणीला असलेल्या परिस्थितींत नऊ-दहा महिने गेले.

अजयचा जन्म झाला. तू त्यावेळीं आपल्या वडील बहिणीकडे होतीस. त्याचा जन्म होऊन चवदा दिवस झाले आणि मला अटक करण्यांत आली. तुरुंगांत जाण्याआधीं मी तुला भेटण्यासाठीं आलों. अजयला झोंपवून तूंहि विश्रांति घेण्याच्या विचारांत असशील आणि मी येऊन पोंचलों. इतक्या रात्रीं, साडे अकरा-बाराच्या सुमारास मी आलेला पाहून तुला आश्चर्य वाटलें. माझ्या येण्याचें कारण तुला कळलें तेव्हां बाळाकडे पाहून रडू लागलीस. मी स्वतःला कसें तरी सावरलें आणि तुझा निरोप घेतला.

मी एक वर्षानंतर तुरुंगांतून परत आलों आणि कांहीं महिने गेले नाहीं तोंच बेचाळीस साल उगवलें. भारताच्या राष्ट्रीय जीवनातील ‘ चलेजाव ’चा तो रोमांचकारी चमत्कृतिपूर्ण समर प्रसंग सुरू झाला. आम्हीं भूमिगत झालों. गोळीबार, बॉंबस्फोट, लाठीमार, मोर्चे प्रतिसरकारच्या घोषणा सर्व कांही अद्‌भुतरम्य. तूंहि प्रथम त्यांत समरस झाल्यासारखी दिसलीस. परंतु हळूंहळूं त्यांतील दाहकता तुझ्या अनुभवास येऊं लागली. अखेरीस माझें नाव फरारी म्हणून सरकारकडून जाहीर झालें आणि त्याच दिवशीं आपल्या घरावर नोटीस चिकटवण्यांत आली— ‘ अमुक तारखेपर्यंत एस्. एम्. जोशी पोलिसांच्या स्वाधीन झाले नाहींत तर त्यांची सर्व मालमत्ता जप्त होईल. तशी दौंडीदेखील पिटवण्यांत आली. शाळेंतून परत आलीस आणि दारावर चिकटवलेली ती नोटीस तू वाचलीस त्यावेळीं तूं अगदीं घाबरून गेलीस. तुझ्या तोंडचे पाणी पळालें. या घटनेनंतर तूं मला लिहिलेल्या पत्रांत तुझी मनःस्थिति प्रतिबिंबित झाली होती. तुझें तें पत्र मला अजूनहि आठवतें. पत्र वाचून मला मात्र हंसू आवरलें नाहीं. आपली काय मालमत्ता होती अगर आहे ? आणि हें ती जप्त करून ठेवणार कोठें— ? कोणालाहि जप्त करतां येणार नाहीं असें धन प्राप्त करून घेण्यासाठी आम्ही प्राणपणानें लढायला निघालों होतों. स्वातंत्र्यलढ्याची मस्ती आमच्या नसानसातून संचारली होती. परंतु तुझी भावना अगदीं निराळी होती. आज मला त्यांतील रहस्य थोडें-फार उमगल्यासारखें वाटतें. पुरुष आणि स्त्री यांच्यातील हा फरक आहे. पुरुष हा एका दृष्टीनें उडाणटप्पू असतो. परंतु स्त्री ही माता आहे. ती आपल्या घरटयाला चिकटून रहाते. कारण तिला आपला मातृधर्म संभाळायचा असतो. त्याच प्रेरणेनें तू आपलें तें लहानसें कपाट व बारीकसारीक चीजवस्त आपल्या बहिणीकडे नेऊन ठेवलीस. अर्थात विशेष कांही घडलें नाहींच. एक वेळ पोलीस आले. त्यांनीं कसून झडती घेतली पण ती निराळया कारणासाठी. आपली मालमत्ता जप्त करण्यासाठीं ते आलेच नव्हते.

शेवटीं पोलिसानीं मला व माझ्या सहकाऱ्यांना पकडलें. आतां काय होईल ? पोलीस मारहाण करतील कां— ? शिक्षा किती होईल ? अशा अनेक चिंतांनी तुझें मन होरपळून निघालें. आणि तूं सरळ मुंबईला धांव ठोकलीस. त्या पोलीस अधिकाऱ्याला भेटलीस. तोहि एक भला मनुष्यच होता. त्यालाहि मुलेंबाळें होतीं. ज्यावेळीं मला प्रश्नोत्तरासाठीं पोलीस स्टेशनवर आणण्यात आलें त्यावेळीं तुला त्यानें बोलावून घेतलें. आणि इमान अली नूरभाई हा एक मुसलमान तुझ्यापुढें उभा करून हाच तुझा नवरा काय ? म्हणून विचारलें. त्यावेळीं तुझ्या चेहऱ्यावर जे भाव उमटले त्याचे वर्णन करणें माझ्या शक्तीबाहेरचें आहे, असो !

असे दाहक प्रसंग आपल्या जीवनामध्यें एका मागून एक आलेत. मधूनमधून तुला आनंद व्हावा अशा घटना घडतात. परंतु त्याचें सुख क्षणिकच असतें मी तुरुंगांतून सुटून आलों, सर्वत्र आनंद होता. तुलाहि धन्य वाटलें, परंतु माझा पाय घरात टिकत नव्हता. आणि तुझा स्वभाव अधिकाधिक चिडखोर बनत चालला. तुरुंग, सप, उपोषणे, निवडणुकी, लोकमित्रासारखीं कर्जबाजारी करणारीं साहसें त्यामुळें तुझें जीवन कसें भाजून निघत आहे ! केंद्रिय नोकराच्या संप प्रकरणीं मी बेमुदत उपोषण करणार आहे ही बातमी वर्तमानपत्रांतून तुला वाचावयास मिळाली. त्याबाबतीत मी तुझा सल्लाहि घेतला नाहीं, म्हणून तुझें अंतःकरण स्वाभाविकच दुखावलें. पण तें कसे अशक्य होतें हें मीहि तुला समजावून देऊं शकलो नाहीं. उपवासासारखे निर्णय कां सल्लामसलतीनें करायचे असतात ? आणि उपोषणाला कुणी अनुमति देऊ शकेल काय— ? त्यातहि पत्नी पतीला तशी अनुमति देणें सुतराम शक्य नाहीं. उपोषणाच्या निर्णयानें तुला किती वेदना होत असतील ह्याची मी कल्पना करूं शकतों. तूं मला लिहिलें होतेस तें आठवतें. " तुरुंग, गरिबी, क्लेश, उपहास सारें मी सहन करीन. पण त्यासाठीं तुम्हीं जिवंत रहावयास पाहिजे ना— ?" तुझें म्हणणें खरें आहे, पण माझी ऊर्मी ही मला स्वस्थ बसूं देत नाहीं. त्या उर्मी चुकीच्या आहेत असेंहि वाटत नाहीं. माझ्यासारख्या ऊर्मिप्रधान आणि महत्त्वाकांक्षी माणसाला आपला जीवनसाथी निवडल्या कारणानें तुझी थोडी-फार केविलवाणी अवस्था होते. जीवन सरितेवर उभारणाऱ्या ह्या ऊर्मीमुळें तुला पुनः पुनः गटांगळ्या खाव्या लागून तुझा जीव कासावीस होतांना मी पहातों. तूं माझ्यावर क्रुद्ध होतेस; तडातडा बोलतेस. त्यामुळें मीहि वैतागून जातों. जीव नकोसा होतो. तुला माझी कदर नाहीं असें वाटून कित्येक वेळां मी टाकूनहि बोलतो. तरीपण माझ्या पश्चात् इतराच्याजवळ तू माझें जें गुणगान करतेस तें माझ्या कानावर आलें म्हणजे माझी मलाच लाज वाटते.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनांत सहकाऱ्यांच्या प्रेरणेनें मी शुक्रवार पेठेंतून निवडणूक लढण्याचें ठरवलें. त्यावेळी तू किती रागावलीस—तें मला स्मरते. तीन दिवस माझ्याशीं बोललीदेखील नाहीस. दगडावर डोकें आपटून घेण्याचा हा उपद्व्याप मीं आरंभला आहे असें तुला वाटत होतें. अर्थात् तू एकटीच कांहीं त्या विचाराची नव्हतीस. अनेक मित्र आणि चाहती मंडळी मला तसें सांगत होती. शेवटीं मतदान झालें. आणि दुसऱ्या दिवशी सकाळीं मत मोजणीसाठीं जाण्यास मी तयारी करूं लागलों. सकाळी चहा घेताना मी म्हणालों, " पराभव झाला तरी वाईट वाटून घेऊं नकोस " माझ्या मनांतील आशय तू ओळखलास आणि तुझ्या डोळ्यातून अश्रू वाहूं लागले. पण मी निवडून आलों. तूं मला भेण्यासाठी पानघटी चौकात आलीस. लोकानी मला खांद्यावर घेऊनच तिथें आणले आणि टेबलावर ठेवले. तू खालीं बसली होतीस. मी तुझ्याकडें पाहिले आणि तुझा हात हातात घेतला. विवाहबद्ध होण्याचें ठरलें आणि मीं तुझा हात धरला त्याहिपेक्षां अधिक उत्कटता यावेळी मला आढळून आली. पण थोड्याच वेळांत माझ्या डोळ्यात गाठीचे पदक घुसून तो दुखावला. तुझ्या आनंदावर विरजण पडलें. मला एकाच डोळ्यानें चागलें दिसतें. आणि नेमका तोच डोळा दुखावला. रात्रभर झोंप आली नाही. कमालीचें दुखत होतें. माझी ती तगमग बघून तुझें मन दुःखी झालें. साऱ्या आनंदावर विरजण पडले. स्तुतिसुमनाचा वर्षाव होत होता.

( पृष्ठ १४३ वर चालू )



★ ★ ★ ★ केशवराव भोळे

गृहिणी सचिवः सखीमिथः
प्रियशिष्या ललिते कलाविधौ

नाटक, सिनेमा, संगीत, नर्तन, वादन या पेशांत पडलेल्या माणसांच्या जीवनाबद्दल सर्वसाधारणपणें कुतूहल असतें. नियतकालिकांमध्यें त्यांच्या मुलाखती प्रसिद्ध होतात त्यांत त्यांचें वैवाहिक जीवन अतिरंजित असें रेखाटलेलें बहुशः आढळतें. पण लोक हें विसरतात कीं, हीं व्यवसाय करणारीं त्यांच्याप्रमाणेंच माणसेंच असतात. त्यांचे असे स्वभाव असतात त्यांत गुण-दोषहि असतात. त्यांना संसार चालवितांना ते गुणदोष समजून घ्यायचे असतात. त्यांच्याशीं जमवून घ्यायचें असतें. स्वतः करतां, एकमेकांकरतां आणि आपल्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबियांकरतां ! हा विचार सर्वांनाच सर्वांच्या सुखाकरतां दुःखाचें निवारण करण्याकरतां करावयाचा असतो. तो एक–दोन दिवस करायचा नसतो तर रोजच करायचा असतो. तो स्त्रीपेक्षां पुरुषानें आधीं करावयाचा असतो आणि जास्त करायचा असतो. प्रेमविवाह असला तरीहि करायचा असतो. वैवाहिक जीवन म्हणजे चोवीस तासांची जिवंत घासाघीस असते असें कोणीतरी म्हटले आहे तें खरें आहे असें अनुभव मला सांगतो आहे. एक प्रेम असलें म्हणजे वैवाहिक जीवन सुखकर झालेंच पाहिजे असें मळींच नाहीं. त्या प्रेमाला इतर गुणांची जोड असावी लागते तरच तें जीवन सुखमय करण्यास समर्थ होते. हा अनुभव आहे. हें सर्व जाणूनच मीं गाणाऱ्या मुलीशीं लग्न केलें. त्यापूर्वी जवळजवळ दीड वर्ष आमचा खूप परिचय झाला होता. सहवास झाला होता. संगीताचा व्यासंग आम्ही तासन्‌तास करीत होतों. शिकवावें, खूप मेहनत करावी त्याचाच आनंद लुटावा अशा व्यासंगाच्या धुंदींत आम्ही मशगुल होतों. तिची ग्राहकशक्ति तीव्र– आवाज असाधारणपणें गोड, मेहनती स्वभाव आणि आपण खूप मेहनत करून गायिका व्हावें अशी तिची महत्त्वाकांक्षा असल्यामुळें मेहनतीला ती कंटाळली आहे असा अनुभव मला कधींच आला नाहीं मीं शिकवावें. तिनें शिकत रहावें. अनेक राग, त्यांतील तऱ्हेतऱ्हेच्या चिजा, नाटकांतलीं पदें, भावगीतें, हिंदी, मराठी भजनें, मीं तिला शिकविलीं, रोज कमीतकमीं एका बैठकींत सहा तास मेहनत होत होती, आमच्या थोरल्या मेहुणी म्हणायच्या, "आतां ती दमली असेल–– आतां उद्यां बसा "––पण तिनें स्वतः असें उद्गार कधींच काढले नाहींत. आजहि तीच वृत्ति कायम आहे. असेंच जीवन चालूं असतांना लग्नाचा विषय निघाला. तेव्हां मीं मनांत विचार केला–– ही माझ्याशींच लग्न कां करूं इच्छितें ? आमच्या या सततच्या व्यासंगांत तिनें जाणलें असेल कीं, आपण यांच्याशीं लग्न केलें तर आपली संगीताची महत्त्वाकांक्षा यांच्या सहवासानें, यांच्या साहाय्यानें पुरी होईल. दोघांचीहि आवड एकच आहे आणि मीं उत्तम गायिका व्हावें असें यांना पण नक्की वाटतें. हें तिचें निदान बरोबर होतें. ही तिची महत्त्वाकांक्षा पुरी करायची जबाबदारी मीं घेतलीच पाहिजे, त्यांत आड येणाऱ्या अडचणींचा, संकटांचा निरास केला पाहिजे, आणि तो कर्ता पुरुष या नात्यानें मींच ! तरच लग्न करावें नाहीं तर तें न केलेलेंच बरें असा पक्का निर्धार मीं केला आणि मगच लग्न केलें. लग्न करतांना उभय कुलांतल्या आर्थिक जबाबदाऱ्या आम्हीं स्वीकारल्या तिच्या भावंडांचें शिक्षण, माझ्या पुतण्याचें शिक्षण, या सर्वांचें लालन पालन करायचें असें आम्हीं वडिलधाऱ्यांना वचन दिलें. लग्न करण्यापूर्वींच नोकऱ्या धरल्या, आल्या त्या ! हळूंहळूं संसार चुली वैलापासून (आतां स्टोव्हपासून) जमा करूं लागलों. स्वयंपाकपाणी तिनें करावें. पण तालीम देणारा गवई आला कीं तिनें तंबोरा हातीं घ्यावा. मी पेटी हातीं घ्यावी. रियाज संपला कीं, आमचें जेवणखाण मजेंत व्हायचें–पण संभाषण रागरागिण्यांवर, त्यांच्या स्वरूपावर. नव्या नव्या चिजा गोळा करण्याचा माझा छंद आतां वाढूं लागला. कांहीं गवई केवळ प्रेमानें यायचे. नव्या चिजा शिकवायचे, त्यांचे कायदे आम्हीं चिजांच्या बांधणीवरूनच शोधून काढायचे आणि विस्तार त्या शोधानुसार करावयाचा. संगीतावरील पुस्तकांची मदत खूप व्हायची. आमचा संसार म्हणजे स्वैंपाकघर आमच्या संगीत व्यासंगाच्या आड तिनें कधीं येऊं दिलें नाहीं. मुलें झालीं तेव्हां त्यांचें खाणेंपिणें झालें कीं, संभाळणाऱ्यांच्या जवळ त्यांना देऊन रोजच्या मेहनतीला आम्हीं बसावयाचें–चांगले गवई ऐकायचे. त्यांच्यांतील वैशिष्ट्यें उचलायची मुलांचे लाड व्यासंगाचे वेळीं करावयाचें नाहींत

मुलांनी लाड होत नाहीत हें ओळखलें. आणि तीहि आमच्या मेहनतीच्या आड कधीं आली नाहीत. उलट आपल्या खेळांत स्वतंत्रपणें दंग रहायची. त्यानाहि स्वातंत्र्याची सवय लागली. आईवडिलांच्या अति मायेपासून तीं अलिप्त राहिली. स्वावलंबी बनत चालली आणि मोठेपणीं स्वत:च्या पायांवर उभें रहाण्याचें सामर्थ्य त्याच्यात आलें तें या लहानपणीं मिळालेल्या स्वातंत्र्यानें. अर्थात आमचें लक्ष त्यांच्यावर सतत् असायचें. बोलण्या-वागण्याच्या चांगल्या संवयी त्यांना लावल्या. अभ्यासाच्या सवयींबरोबर मोकळ्या हवेंत क्रिकेट, हॉकी खेळण्याचेंहि त्याना शिकविलें. त्याचे स्नेही, मित्र कोण याची चौकशी आम्ही जातीनें करायचे. हा वैवाहिक जीवनाचा आवश्यक भाग आहे. एक शिस्त लावायला गेला तर दुसऱ्यानें त्याची कुचेष्टा करूं नये, हेटाळणी करूं नये. आईपासून मुलांनीं हळुवारपणा, माया, कामसूपणा, टापटीप, कष्टाळूपणा शिकायचा असतो. तसेच वडिलांपासून धाडस, पराक्रमी वृत्ति, महत्वाकांक्षा, कर्तृत्व शिकावयाचें असतें. मुले सात-आठ वर्षांपर्यंत आईच्याच सहवासात जास्त असतात. हें वय सर्वांत जास्त संस्कारमय असतें. आईच्या बोलण्या, चालण्याचा-वागण्याचा मुलांवर जास्त लवकर परिणाम होतो. लवकर उठण्यापासून वेळेवर झोपेपर्यंतचा सर्व दैनिक कार्यक्रम आईच्याच देखरेखीखाली होत असतो. आई शिक्षित असेल तर मुलाची अभ्यासातली प्रगति पहात असते, त्यांच्या अभ्यासात त्यांना मदत करते. निदान मुलांनी लवकर उठून आधीं अभ्यास, गृहपाठ करून मगच खेळायला बाहेर पडावे, जेवण नीट चवीनें जेवावें, फारशी नावें न ठेवतां! नतर व्यवस्थित पोषाख करून नीट पाटी दप्तर घेऊन शाळेंत जातात की नाहीं तें पहायचें असतें. माझी नोकरी दहालाच सुरू होत असल्यानें त्या सर्वांवर तिची नजर असे आणि मार्गदर्शनहि असे. अभ्यासात मदत माझी असे. मुलांना क्रिकेट हॉकीची आवड मी निर्माण केली त्यांना क्लबात घाडून शिक्षणहि देवविलें. खेळांत आमच्या मुलांनीं प्रगति उत्तम केली. तशी वागणुकींत, जाणत्यांचें मन व अभिप्राय उत्तम घेतला यात बरेंच तिचें श्रेय आहे. कार्यक्रम आंखला गेला असल्यानें आई नाटकाकरतां अगर गायनाच्या कार्यक्रमाकरतां परगावीं गेली तरी मुलांची शिस्त कधींच बिघडली नाहीं. मुलांच्याकडून चांगलें वाचून घेणें, त्यांना उपयुक्त पुस्तकें विकत घेऊन त्यांचा पुस्तकसंग्रह निर्माण करण्याचें कामहि मीं केलें. चांगल्या श्रवणीय सर्व प्रकारच्या रेकॉर्डसचा संग्रहहि आम्हीं याच हेतूनें केला.

आमचें लग्न झाल्यावर नाट्यमन्वंतर वर्षानें स्थापन झालें. 'आंधळ्यांच्या शाळें'त तिनें काम करावें असें श्री. दाते व वर्तक यांनी आग्रहास म्हटलें. तिला आपण नाटकात काम करूं असे कधीहि वाटलें नव्हतें. तसे स्वप्नसुद्धा तिला कधी पडलें नव्हतें पण 'प्रयत्न करून पहा' असें मीं खडा टाकून पहावें या हेतूनें म्हटले. तेव्हां तिने कबूल केले तालमी सुरू झाल्या. पंधरा दिवस होत आले. तिची नक्कल लवकर आणि चोख पाठ झाली. पण नुसती नक्कल घडाघड म्हणणें म्हणजें काम करणें नव्हे. अभिनय, कृति या गोष्टी तिला जमेनात केवळ भिडस्तपणानें, लाजेनें! हो, तमाच त्यावेळी तिचा स्वभाव होता-हें कोणाला खरेंहि वाटायचें नाहीं. त्यावेळी ती हसतमुख होती-पण फारशी कोणाशीं बोलायची नाही. मंडळींत बसे पण ऐकण्याचें काम जास्त करी! एक दिवस दात्यानी फर्माव्ले "उद्यां पहिली एंट्री नीट झाली नाहीं तर पहा-" (बिचा घाईनें आनंदात घरी येतें आणि धांदरटपणें पर्स, छत्री कुठें तरी टाकते-) तेव्हां तिनें निश्चय केला की, आज भीड मोडून हें सारें नीट करायचेच-आणि केलेहि! झालें. एकदाची भीड चेपली आणि पुढील काम सुरळीत होऊ लागलें, इतकेच नव्हें पण काम करण्यांत तिला गोडीहि वाटूं लागली. म्हणजे तिच्यांतली नाट्याची सुप्त आवड उफाळून आली. आणि मलाहि बरें वाटलें. तिच्यातला हा पैलूं चमकूं लागला म्हणून. आंधळ्यांच्या शाळेंतील ही पहिलीच भूमिका इतकी गाजली कीं कुलीन स्त्रिया व रंगभूमि हा वाद त्या काळीं जो गाजला होता त्याला आपोआपच उत्तर मिळालें. स्त्रियांना पुरुषासारख्या नाट्याभिनययुक्त भूमिका करतांच येणार नाहीत असें कांहीं पुरुष नटाचे (स्त्रियांच्या भूमिका करणारे) अभिमान होते व अजूनहि आहेत. त्यांची समजूत कोण घालीत बसणार आहे म्हणा! असोत बिचारे! आतां तर पुष्कळच स्त्रिया रंगभूमीवर चांगलीं कामें करीत आहेत.

रेडिओंत आणि मैफलीत तर ती गातच होती म्हणा. पण आम्ही पुण्याला आल्यावर पुण्यांतील माझे एक गवई स्नेही तिला तालीम देण्यास ठेवले. त्यांनी पहिल्या दिवशी हिंडोल रागाची तालीम द्यायला सुरुवात केली. पण दुसरे दिवशीं ते आलेच नाहींत. पण त्यांनीं सकाळी कांही मटणाचे प्रकार शिकवायला सुरुवात केली आणि तीहि रागरागिण्यांऐवजी मटणाचे प्रकार शिकली. बाकी संगीतसृष्टींत गवयानें शिष्यिणीला गायनाऐवजी स्वयंपाकाचें धडे द्यावेत हा प्रकार पहिला अन् बहुतेक शेवटचाच असावा, असें मला वाटतें; ही तालीम मात्र फार आस्थेवाईकपणें त्या गवयानें दिली हें त्याचे उपकारच झाले म्हणायचे! कारण या क्षेत्रांत तिचे कौशल्य असामान्य आहे असे माझे खवैय्ये स्नेही म्हणतात! गवैय्या खवैय्या असतो हें खरें एकूण! एके दिवशी सकाळीच कै. काकासाहेब लिमये आले तेव्हां ही चटणी वाटीत होती. तेव्हां चकित होऊन ते उद्गारले "म्हणजे काय? तुम्हीं हेंहि करतां कीं काय?"

"मी गृहिणी नव्हे कीं काय आपल्या मतें?"

झालें. ज्ञानप्रकाशात न येतांहि गांवभर तिच्या सुगरणपणाची प्रसिद्धि झाली. याच सुमाराला आमची धाकटी मेहुणी आमच्याकडे येऊन राहिली. तिला स्वैंपाकाची आवड फार! मग काय घरांत रोज निरनिराळे पदार्थ होऊं लागतो. वहिणीची साथ मिळाली ना? दोघीहि निरनिराळे खमंग पदार्थ करूं लागल्या. परिणाम? आम्हांला येणाऱ्या डब्यात घरांत होणाऱ्या प्रयोगाचे नमुने येऊं लागले. प्रभातमध्यें आमच्या डब्याकडे स्नेह्यांचे विशेष लक्ष जाऊं लागलें. त्यांत शांताराम आठवले, राजा नेने, वसंत ठेंगडी, मा. कृष्णराव विशेष आस्था दाखवीत. ठेंगडी स्वत: स्वैंपाक करीत असल्यामुळें त्या पदार्थाचें विश्लेषण करीत तेव्हां पाकक्रियेची तात्विक बाजू आम्हां इतरेजनांना अनायासें मिळूं लागे. कित्येकदा आम्हांला ठेंगडीच्या डब्याचा आश्रय घ्यावा लागे. इतके ते आमच्या डब्यावर तुटून पडत. यामुळें या दोघांना फार हुरूप चढे. एकंदरीत ही आतां गायिका, नटी, आणि आता सुगरण म्हणून प्रसिद्ध होऊं लागली. 'धन्य तूचि कान्ता' हें आताच म्हणणें उचित. उगीच उशीर कशाला? आजहि संगीताबरोबर ही तालीम चालूंच आहे, कारण मुलांना व सुनेला स्वयंपाकाचे पाठ ती विलायतेला लिहून पाठविते. हल्लीं नवे राग शिकणें तसे नवे पदार्थ शिकणें अजूनहि चालू आहे. तिच्या हातचें मुगाचें वरण आजहि इतके खपतें कीं तिलाच खायला उरत नाहीं. मी तर म्हणतो कीं,

यमनविहागासारखे मामुली राग गायला जेवढें कौशल्य लागतें तेवढेंच मुगाचें, तुरीच्या डाळीचें वरण, साधें पिठलें या मामुली जिनसा करण्यांतहि लागतें. हें राग जसे तिच्या गळ्यावर चढले आहेत तसेच हे पदार्थाहि तिच्या हातावर चढले आहेत असें आमच्या संगीताच्या परिभाषेंत म्हणतां येईल.

संगीताचा व्यासंग चालूच होता. नवे गवई आले. त्यांनीं अनवट राग सांगायला सुरुवात केली. त्याचप्रमाणें प्रचलित रागांतल्या खास-ढंगाच्या, वेगळ्या बंदिशीच्या चिजा ते देत गेले. रेडिओवर दर कार्य-क्रमांत नाविन्य यावें यासाठीं तिची ही धडपड होती. अर्थात् माझा चिजा गोळा करण्याचा छंद उपयोगी पडत होता. चांगलीं पुस्तकें, चांगल्या रेकॉर्डस् आम्ही घेत होतों. हळूहळू मी चांगली मासिकें तिच्यासमोर ठेवूं लागलों. तशाच चांगल्या कादंबऱ्याहि. तिला शरच्चंद्राच्या कादंबऱ्या आवडूं लागल्या. मीहि त्या आणीत गेलों. देवदास विप्रदास, चरित्रहीन तिला फारच आवडूं लागल्या. विप्रदास तर तिनें दोनदां वाचली. त्यांतली वंदनाच तिनें आमच्या घरांत आमच्या मुलीचें तेंच नांव ठवून कायम केली व आमच्या बंगल्याचें नांव प्रथम वंदनाच ठेवलें. मागून त्याला स्वराचें अवगुंठन केलें, आतां तर ती पुष्कळच पण निवडक वाचते. पाश्चिमात्य नाटककारांच्या नाटका-संबंधानें मी व माझे बंधु तिला नेहमीं सांगत असतों. त्यांतलीं उत्तम कथानकें, स्वभावचित्रण, त्यावरहि टीका, चर्चा तिला सांगतों. डॉल्स् हाऊसमध्यें काम करण्याची तिची महत्वाकांक्षा तशीच राहून गेली. कारण दात्यांनीं तें नाटक दोन वेळां बसविण्यास घेतले—पण तें तेव-ढेंच राहिलें ! तें कधीं पुढें सरकलेंच नाहीं. ती इच्छा अतृप्त राहिली !

नाटयनिकेतन स्थापन झालें. आणि त्या संस्थेंत तिनें एकोणीस वर्षें निरनिराळ्या भूमिका केल्या. त्यांतल्या बहुतेक गाजल्या. देवयानी राधामाई, सीता या भूमिकाहि तिनें जीव ओतून केल्या. या सीता-माईचें दुर्दैव बिचाऱ्या नाटकालाहि भोंवलें. आज त्यांतली गाणींच म्हटलीं जातात. तेवढेंच त्या नाटकाचें संस्मरण. पण कुलवधूनें तिचें नांव अजरामर केलें. बिंबाप्रमाणें ही भानुमतीची भूमिका तिनें खूपच गाजविली ! या नाटकाचे हजारावर प्रयोग झाले—त्यामुळें ना. निकेतन, ज्योत्स्ना भोळे, रांगणेकर, मा. कृष्णराव यांना अपूर्व लोकप्रियता मिळाली. कांहीं विकृत टीकाकारांनीं तर कुलवधू केवळ ज्योत्स्नाबाईंचें एकटीचें यश आहे असें पराकोटीचें—विधान केलें. पण एरव्ही हेच लोक नाटक हें 'टीमवर्क' आहे असें विधान करतात तेव्हां त्यांच्या वरील विधानाची आपोआपच विल्हेवाट लागते. कुलवधूंतील गाणीं नवगायक-गायिका मैफलींत रेडिओवर गाऊं लागल्या. फक्त 'बोला अमृत बोला' हें पद म्हणण्याचा प्रयत्न मात्र अजून केला गेला नाहीं. निदान आम्हीतरी अजून ऐकलें नाहीं. कुणीं नाटकांत काम केलें असेल तिनें म्हटलें असेलच पण इतरत्र ऐकलें नाहीं ! पण हिला मात्र तें पद मैफलींत गाऊन घेतल्याशिवाय सोडलें नाहीं ! अजूनहि चालूं आहे. मैफलीचा शेवट या गाण्यानें होतो. कांहीं नाटकांतून ( एक होता म्हातारा, कोणे एके काळीं, विद्याहरण ) तिनें तालाला अवघड असलेलीं गाणींहि सहजपणें म्हटलीं. विद्याहरणांतील 'दिसतं न कशी ममता' 'कविवाला' हीं गाणीं फार चांगली गाऊन जाणत्या श्रोत्यांना खूप केलें. दहा—बारा नवे राग ती शिकली तर मधम दसारंग शुद्धपटियार, गोरखकल्याण, जलधरकेदार, भोम, यांसारखे कांहीं राग खास बसविले आहेत, व आपला खास हक्क त्यांवर प्रस्थापित केला आहे. भावगीतें भजनें यांसंबंधानें लिहिण्याची आवश्यकताच नाहीं. काणेकर, काळे, अनिल, शुक्ल, मा. जूलियन बोरकर, रांगणे-कर, माधव काळे, संजीवनी मराठे, पाडगांवकर, माडगूळकर इत्यादि नामवंत कवींची भावगीतें तिनें म्हणून या क्षेत्रांत असाधारण असें मानाचें स्थान मिळविलें आहे. भावगीत प्रकार लोकप्रिय करण्यांत तिचा हिस्सा फारच मोठा आहे—तसेंच तिचें स्थानहि अढळ आहे. रेडिओवरील सर्व केंद्रांवर ती गायली आहे व गात आहे, तशीच संगीतपरिसंवादांमध्यें ! चीनमधील तिचा दौराहि प्रसिद्ध आहे.

हें सर्व करीत असतांना आपलें स्वतःचें घर असावें. तें आपल्या आवडीनें आपण सजवावें हें स्वप्नहि आम्हीं साकार केलें आहे. पण सजावटीचें काम तिनें घेतलें आहे. यांत गायनाच्या मेहनतीची अशी

कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर यावें काय ?
हा वाद तेव्हां माजला.
त्याला ज्योत्स्नाबाईंच्या रंगभूमी-
प्रवेशानें परस्परच उत्तर दिलें गेलें.
केशवराव दाते
ज्योत्स्नाबाई
[ नभोवाणीवर ]



खास जागा आहे. रेडिओग्रॅम, रेकॉर्डिंग मशीन हीं सारी अद्यावत साधनें आहेतच. रेकॉर्डस् व पुस्तकांचा सग्रह मीं केला आहे. माझा व तिचा नाद जवळ जवळ सारखाच ! चांगले ऐकायचें, चागलें गायचें, चांगलें वाचायचें तसेंच लिहायचें– हें आमचें दोघांचें व्रत चालूच आहे. तिने चांगलेसें शिजवायचें आणि आम्ही तें चवीनें खायचें अशी आमची खातें–विभागणी आहे. मी शोभेच्या वस्तु कमीच आणतो, संसारोपयोगी वस्तु आणतो, ती दोनहि आणते. आमच्या अभिरुचीमध्यें साम्य–विरोध आहे पण तिच्या खात्यात मी सहसा ढवळा ढवळ करीत नाहीं, मैत्रिणींकरितां ती पातळें, कापडें चपला कुठुनकुठून आणते. मी फक्त पुस्तकें आणतो, फुटपाथ, जुन्या बाजारापासून पुण्यामुंबईच्या सर्व पुस्तकांच्या दुकानातून मी दुर्मिळ पुस्तकें जमा केलीं आहेत. त्यांतली बरीच तिनें वाचलीं आहेत. तिनें इंग्रजी शिकण्याचा जारीनें प्रयत्न केला. कामापुरतें ती बोलतेहि. तिचे उत्साही शिक्षक श्री. विठ्ठलराव दीक्षित. ( इंटर्नॅशनल बुक स. चे मालक. ) यांच्या शिकवणीमुळें शेजारच्या बायकाहि केवळ बाहेरून ऐकूनच ज्योत्स्नाबाई-इतकें इंग्रजी शिकल्या असें मूक्ताबाई दीक्षित म्हणतात. काय हें निरपेक्ष ( ज्ञानदान ) !

संसार करतां करतां, गाण्याची मेहनत करतां करतां, वंदनाला गाण्याची तालीम देतां देतां, एकाएकी कुठूनसें एक नाटक तिच्या डोक्यांत घुसलें. चार–दोन दिवस डोक्यांत त्यानें थैमान केलें. आणि तिला तें कागदावर उतरायला लावलें. स्नेह्यांनी तें वाखाणलें, तिनें तें बसवायचें ठरविले. त्या करतां ती मुंबईला आली. नाट्य निकेतन मधील नट निवडले. एका शुभमूहूर्तावर 'आराधना' नाटकाची तालीम सुरू झाली. पद्यरचना, सगीतरचना, दिग्दर्शन तिनें सारे स्वत: केलें. जरूर तेथें आम्हीं साहाय्य केले. पहिल्या प्रयोगाला मुंबई-पुण्याची स्नेही मडळीं, नाटयसृष्टी, राजकारण, समाजकारण करणारीं माणसें होती. केशवराव दाते, कार्णेकर, यशवंतराव चव्हाण यांनी नाटक पाहून धन्यवाद दिलें पण या नाटकातले मुख्यसूत्र ओळखलें फक्त वासुदेवराव भोळे यानी आणि त्या सूत्रानुसार नाटक चागलें लिहिलें गेले आहे असें प्राजलपणे सांगून तिला शाबासकी दिली. मुद्दा सोडून पुष्कळानीं टीका केली.

वसुदेवरावानी तिला नाट्य–लेखनास खूपच प्रवृत्त केले. काहीं विषयाहि सुचविलें. तिनें लिहिलेली 'अडला हरि' ही विनोदी श्रुतिका स्टेशन डायरेक्टर दीक्षितांना फार आवडली. आणि त्यानीं ती रेडियोवर तिच्याकडूनच सादर करविली. पण वासुदेवरावानी दिलेल्या प्रोत्साहनाचें फळ म्हणजे 'घराण्याचा दिवा' ही संगीत प्रवाने नाटिका ती त्यानीं ऐकली मात्र अन् 'दुर्गा एक अक्षराचा फरक नको आहे. रेडिओकरता घेतली ' असे, ते उद्गारले. दीक्षितानाहि त्यानीं ती स्वतत्रपणें वाचायला दिली. त्याना फारच पसंत पडली. तिने रेडिओ सप्ताहात सादर केली. त्यात वसतराव देशपाडे द्वय वदना भोळे, ज्योत्स्ना भोळे यांच्या भूमिका परिणामकारक वठल्या, या नाटिकेचें ध्वनिक्षेपण पुन. नुकतेच पुणयाहून झाले. आणि दिवाळीत मुंबई, नागपूर, पुणे केंद्रावरून पुनः ध्वनिक्षेपित होणार आहे. या नाटिकेबद्दल अभिनदनाची पत्रें तिला आणि रेडिओला पुष्कळ आली. अगदी अज्ञात व्यक्तीकडून. आणखी एका नव्या दालनात पाऊल टाकलें– आणि पुढें ? तें तिचें तिलाच माहीत !

येथील फाईल क्लबचे सेक्रेटरी श्री. श्री. वा. काळे यानीं एके प्रात:काळी येऊन आग्रहाने सांगितलें, "तुम्ही आवडत्या विषयावर क्लबांत बोलावें–"

"पण मला कुठं व्याख्यान देतां येतं आहे !"

"तुमचें नाटक ऐकलें आणि आम्हांला खात्री वाटतें कीं, तुम्ही बोलूं शकाल— "

ती विचारांत पडली.

"तुला सहज बोलतां येईल, पाहिजे तर लिहून काढ- आपल्या अनुभवावर पुष्कळ लिहिण्यासारखे विषय तुझ्याजवळ आहेत." मी म्हणालों,

"ज्याच्याजवळ अनुभव आहेत त्यावर पुष्कळच बोलता येईल, तूं बोललेंच पाहिजेस–" वासुदेवराव.

मग तिनें काळ्यांच्याजवळ मुदत मागून घेतली. तिची अस्वस्थाता वाढू लागली, एक दिवस तिने मला कोरे कागद मागितलें. मीं कोरे कागद नवे आणून दिले. काही विचारलें नाहीं. अशावेळी कांही विचारूं नये हाहि माझा अनुभवच, जेवणखाण झाल्यावर वंदनाच्या टेबलाशीं बसून चाळशी चढवून ती कांहीं खरडूं लागली याची चाहूल मात्र लागली. काहीं प्रगति झाल्यवर तिनें वासुदेवरावांना वाचून दाखविलें "आगे बढो" असें ते म्हणाले. मींहि वाचून पाहिले. 'मला न पडलेली स्वप्नें' हा मथळाच मला आकर्षक वाटला, पण आंतील मजकूर तसाच होता व त्यात स्वाभाविक विनोदाचा मसालाहि होता. मीं मनांत म्हटलें चला, हेंहि प्रकरण मार्गी लागेल. काळ्यांनाहि वासुदेवरावांनी छातीठोकपणें भाषण चागलें होणार म्हणून खात्री दिली. व्याख्यानाचा दिवस, तारीख जाहीर झाली. सभासद कुतूहल पूर्वक आले. कांहीं कसें होईल या काळजीनं पण वरून हंसत आले होते.

व्याख्यान सुरू झालें. प्रस्तावना ऐकूनच बहुतेकानीं समाधानाचा श्वास सोडला. आणि व्याख्यानाला विनोदानें आणि विषयाच्या खुलावटीने रग भरूं लागला. श्रोते रसभरीतपणें ऐकत होते. हास्याच्या लहरी उसळत होत्या. कुतूहलांतून, आनंदाचे, अपेक्षेबाहेर घडते आहे अशा तृप्ततेचें वातावरण निर्माण झालें. व्याख्यान सपलें आणि एकमुखानें प्रशसेच्या, मान्यतेच्या टाळ्या पडल्या. संजीवनी मराठे आदि मडळींनीं प्रश्न विचारले. त्यामुळें रंगांत भरच पडली, शेवटीं मुकुंदराव किर्लोस्कर एकदम उठून म्हणाले, "क्षमा करा, पण मला बोलल्याशिवाय आज रहावत नाही. फॉईल क्लब ज्या हेतूनें स्थापन केला त्या हेतूला सर्वस्वी धरून आजचेंच भाषण झालें. माझी अपेक्षा नव्हती. ज्योत्स्नाबाई इतकें उत्तम बोलतील अशी. पण झालें तें फारच छान झालें हें मुद्दाम सांगण्याकरता मी बोलायला उभा राहिलों." या भाषणावरहि दुप्पट जोरानें टाळ्या पडल्या. सगळ्यांनीं जवळ येऊन अभिनदन केलें. नंतर टेलिफोनवरून, पत्रद्वारें, प्रशसा झाली. आता तर मला उद्यां तिनें इंग्लिश चॅनल पोहून जाण्याचा किंवा बॅडमिंटनमध्यें चॅंपियनशिप मिळविण्याचा विक्रम केला. ( हो ऽ नुकतेच नट्ट न टेकर आमच्याकडे दोनदां येऊन गेले आहेत ) तर मुळींच नवल वाटायचें नाही. कारण तिनेच म्हटल्याप्रमाणें नाकावर माशी बसली तरी न हलणाऱ्या या मुलीनें गायन, अभिनय, आणि भाषण या त्रिविध क्षेत्रात चमक दाखविली याचीं स्वप्नें कोणाला पडलीं होतीं ?

आतां धन्य तूचि कान्ता म्हणण्याची गरज आहे कां !

● ● ●

⚜ ⚜ ⚜ ⚜



# शोभानें माझ्या जीवनांत बहार आणली !

—अशोककुमार

हर हायनेस—

नॉट् ओनली ऑफ् किचन् !

माझ्या कन्येला, भारतीला जेव्हां मूल झाल्याची वार्ता मला कळली तेव्हां मीं चटकन् आरशात पाहिलं, "अरे, खरंच आतां आपण म्हातारे झालों. आतां आपण पति नि पिताच उरलों नाहीं, तर आजोबाहि झालों कीं !" मीं माझ्या केंसांतून दोन वेळां हात फिरविला नि मनमुराद हंसलों. कारण आजोबा झालों तरीहि मी चित्रपटसृष्टींत वावरत आहे तो सदा– सतेज नायक म्हणून !

माझे अनेक चाहते, हितचिंतक नि स्नेहीसोबतीहि मला अनेकदां विचारतात, आपल्या या चिरतारुण्याचं रहस्य कोणतं ? त्यावेळीं मीं मनमुराद हंसतों नि चटकन् सांगून टाकतो. तुम्हांला जो आजहि हा तरुण अशोक दिसतो आहे ना ? ही आहे तुमच्या शोभा भाभीची करामत !

आणि खरंच त्यांत अतिशयोक्ति अशी कांहीं नाहीं. वयाचं अर्ध शतक मीं नुकतंच ओलांडलं. आमच्या मुलांनीं पुढाकार घेऊन आमच्या विवाहाचा रौप्य महोत्सवहि थाटानं साजरा केला. माझीं चारहि मुलं आतां मोठी झालीं. थोरल्या भारतीला दोन मुलंहि झालीं नि माझा मुलगा अरूप एका चित्रपटांत माझ्याबरोबर चमकूनहि गेला. तरीहि मी म्हातारा वाटत नाहीं, माझ्यांतील उत्साह, संपुष्टांत येत नाहीं. कामाचा उरक दांडगा आहे नि प्रतिदिनीं, प्रतिक्षणीं मी नव्या जोमानं ताज्या दमानं चित्रपटांतून कामं करतोंच आहे. नव्या नव्या जबाबदाऱ्या घेतोंच आहे नि चित्रपटांतून कामं करीत असतांनाहि माझ्या आवडी निवडीहि मी भागवून घेत आहेच. या साऱ्यांच्या मुळाशीं आहे माझी लाडकी, सुशील पत्नी शोभाच. सदा हंसरा, सदा सतेज, सदा जवान अशोककुमार जो आज दिसत आहे ती सारी माझ्या शोभाचीच किमया आहे. मी नेहमींच उत्साही दिसावं, ताजा–तवाना रहावं यासाठीं तो माऊली अहोरात्र खपत असते.

गेलीं २६ वर्षे आम्ही संसार करीत आहोंत. सुखा-समाधानानं, आनंदानं आमचं जीवन व्यतित करीत आहोंत. या काळांत अनेक संकटं आलीं नि गेलीं. कित्येक वेळां मी आजारीहि पडलों. पण प्रत्येक वेळीं शोभा खंबीरपणें या प्रत्येक संकटाशीं, प्रत्येक आजाराशी झुंजली. नि मला कधीं कमी पडूं दिलं नाहीं कीं कधीं निराश केलं नाहीं. आजहि ती सारखी खपते आहे, श्रमते आहे, या लक्ष्मीचा हात माझ्या संसारावर फिरतो आहे, प्रत्येक वस्तूवर फिरतो आहे नि त्यामुळंच त्याचं सोनं होत आहे. पण तरीहि तिचा उत्साह कधीं कमी होत नाहीं. कीं, ती कधीं थकत नाहीं, दमत नाहीं. सदा पहावं तेव्हां ही उत्साह मूर्ति चेहऱ्यावर स्मितहास्य विलसवित कामाला तत्पर.

तसं पाहिलं तर आज घरांत नोकर–चाकर आहेत. कांहीं म्हटल्या कांहीं कमी नाहीं. पण त्यानं तिचं समाधान होत नाहीं. आपल्या पतीचं, आपल्या मुला-बाळाचं आपणच पाहिलं पाहिजे असा तिचा आग्रह. माझ्या नाना लहरी न दमतां न थकतां संभाळते. प्रत्यही नव्या जोमानं ती माझ्यासाठीं राबत असते. गेलीं अनेक वर्षं हें तिचं चाललं आहे. मीं एकदां म्हटलं 'शोभा, तूं आतां आजी झालीस. आतां विश्रांति घे कीं !'

"हो आजी झाले. पण तुमची मी पत्नीच आहे नि पत्नी या नात्यानं मला माझ्या पतीचं सारं कांहीं जातीनं पहायलाच हवं !'

आतां बोला, याला कांहीं उत्तर आहे कां ? माझे निकटवर्ति स्नेही तिला नेहमीं गमतीनं म्हणतात, 'हर हायनेस ऑफ् किचन !' कारण तिचा बराच वेळ स्वयंपाकघरांतच वेगवेगळे पदार्थ बनविण्यांत जातो. आपल्या पतीला कोणता पदार्थ आवडतो, कोणता

दार्थ त्यांच्या प्रकृतीला मानवतो नि कोणत्या पदार्थामुळं त्याला भरपूर जीवनसत्त्वं मिळतील हें एखाद्या सराईत डॉक्टरप्रमाणं ती हेरून त्याप्रमाणं ती स्वयपाक तयार करील नि आपल्या हातानं खायला घालील. मला नेहमीच तुपातील खाणं लागतं. आणि तसंच जेवण ती तयार करील. मी बाहेर कुठं खाऊ नये, हॉटेलचे पदार्थ माझ्या प्रकृतीला मानवणार नाहींत याची तिला कल्पना असते नि म्हणूनच ती अगदी या दृष्टीन माझ्यावर लक्ष ठेवीत असते. आपल्या हातचं गरम गरम जेवण मी खावं याकडे तिचा भारी कटाक्ष. आणि मी व्यवस्थित जेवतो कीं नाहीं याकडंहि बारीक नजर. अर्थात आमची शोभा जेवणच इतकं रुचकर बनवितें कीं, या सुगरणीच्या हातच असं चागल ताज जेवण सोडून बाजारी जेवणाकडं कोण लक्ष देईल ?

पण बायकांचा आपल्या नवऱ्यावर विश्वास असेल तर त्या बायका कसल्या ? अनेकदां कामामुळं मला स्टुडिओंतून घरीं जेवायला येणं जमत नाहीं. अशावेळी काय होतं– माहित आहे ? आमची घरधनीण सरळ हातात जेवणाचा डबा घरते नि स्टुडिओचा रस्ता धरते. नोकरा करवी तिनं डबा पाठविला तरी चालण्यासारखा असतो. पण मी धड जेवतो कीं नाहीं हें कसं तिला कळणार ? तिच्या पुढ्यात बसून मी नीट जेवलच पाहिजे असा तिचा आग्रह. माझं जेवण झालं की मग तिच्या चेहऱ्यावर समाधान दिसतं. नि हें समाधान सदैव तिच्या चेहऱ्यावर दिसावं म्हणून मग मीहि सदैव प्रयत्न करीत असतों.

मध्यंतरी माझा रक्तदाब वाढला होता. मी सिगारेट कमी ओढाव्यात असं डॉक्टरकडून फर्मान निघालं होतं. पण आम्ही पडलों चेनस्मोकर. सिगारेटशिवाय आपल्याला चैन पडणार नाहीं बुवा. शोभाला माहित होतं, कीं ह्यांच्या हातात डबा पडला की स्वारीची तलफ काही मोजक्या सिगरेटवर भागणार नाहीं. म्हणून मग तिनं केल काय ? ती दररोज माझ्याबरोबर सेटवर हजर राहूं लागली नि मोजक्याच सिगरेट मला पुरवूं लागली. आतां सांगा असा अहोरात्र जागता पहारा असल्यावर हा अशोक म्हातारा कसा होणार हो ?

मला अनेकदां आश्चर्य वाटतं. सारं ती न चुकता, तत्परत नि वेळच्या वेळी पार पडते तरी कस ? तिच्या मागं नाना व्याप, माझ्यासारखं नुसतं चित्रपटातून काम करणं एवढंच काही तिचं काम मर्यादित नाही. माझ्या सगळ्या गोष्टी पहायच्या, मुलाच खाण-पिणं, कपडे-लत्ते, शिक्षण, आवडी-निवडी इकडं लक्ष द्यायच. घरात काहीं हव, नको, संपलं सवरलं तर तेंहि तिनेच पहायच, पैशाचे हिशेब तिनेंच बघायचे, नोकर चाकरावर लक्ष तिनेंच पुरवायच, त्याचा पगार बिगार सारं काहीं तिनच द्यायचं.

ऽऽऽअबब ! हा व्याप थोडा कां आहे ? माझ एकट्याचंच किती काम असतं. माझा पडला भिडस्त स्वभाव कुणाला दुखविण आपल्या बुवा जिवावर येतं. अशावेळी कुणी भेटायला आल कीं, कामाचं माणूस कोण, उगाच वेळ घेणारं कोण हें ती अचूक ओळखते नि त्याप्रमाण त्याची ती वासलात लावते. माझे फोन घेण, नि फोन करणाऱ्याना योग्य तें उत्तर देऊन मोकळ करण हें कामहि ती तितक्याच सफाईनें पार पाडते नि माझा पत्रव्यवहारदेखील चटकन् डोळ्यांखालून घालून मोकळी होते. यावाबतीत माझ्या खाजगी सचिवाची भूमिका ती खरोखरोच उत्कृष्ट रीत्या पार पाडते.

अनेकदां चित्रपटासाठीं मी माझच कपडे वापरतो. यावेळीं आमच्या शोभाची खरी कसोटी असते. मी एकाच वेळी अनेक चित्रपटात काम करणारा. चित्रपटाचं चित्रण सारखं चालूच असणार नि चित्रपटांत कटीन्यूटी ( सातत्याला ) विशेष महत्त्व असतं. अशा वेळीं शोभाला नुसतं कोणत्या चित्रपटाचं चित्रण आहे हें सागण्याची खोटी. तिनं त्या चित्रपटात मी वापरत असलेले कपडे अचूकपणें काढून ठेवलेच म्हणून समजा. खरंच अशावेळी तिच्या स्मरणशक्तीचं नि बुद्धिचातुर्याचं कौतुक वाटतं मला.

शोभा माझी पत्नी आहे नि एक धर्मपत्नी या नात्यानं ती आपली कामगिरी चोख बजावतेच. पण त्याचबरोबर ती आपण माता आहोंत हें विसरत नाही नि आईच कर्तव्यहि चोख बजावीत असते. न दमतां न थकतां. नि त्यामुळंच माझ्यापासून माझ्या मुलापर्यंत नि माझ्या नोकरा चाकरापर्यंत सगळ्यांनाच आदरयुक्त भीति वाटते तिची. तसा तिनें आम्हां सर्वांवर दरारा ठेवलाच आहे. अत्यंतिक प्रेम करून स्वार्थत्याग करून नि सदा कार्यरत राहून.

तसा आज मी अत्यंतिक सुखांत आहे. घरदार, वैभव, कीर्ति, भावंडाच प्रेम, माता पित्याच छत्र, चार हुषार नि तितकीच चारित्र्यसंपन्न मुलं नि सुशील, सोशिक नि तितकीच प्रेमळ पत्नी. एवढ सारं असल्यावर आपल्याला आणखी काय हव ? हें वैभव, आजची ही एकदर परिस्थिति नि माझ्या वांट्याला आलेलं सुख जेव्हां दृष्टीसमोर आणतो तेव्हां गतस्मृति जागृत होतात. माझं पूर्वीचं सारं जीवन दृष्टीसमोर येतं नि माझ्या जीवनातील शोभाचं पदार्पणहि आठवू लागत. आजचं माझं सार जीवनच शोभामय झालं आहे. शोभा माझी पत्नी आहे. माझ्या भावाची लाडकी वहिनी आहे, माझ्या मुलांची प्रेमळ माता आहे, माझ्या आईवडलांची सर्वांत आवडती सून आहे, माझ्या सुख दु:खाची भागीदारीण आहे. माझ्या सुखात आनंदाश्रु गाळणारी नि दु:खातहि माझ्यासह सहभागी होणार.

आणि मग विचार येतो. शोभानं त्यावेळी नकार दिला असता तर? हो, कारण शोभा पडली एक साधी भोळी खेडवळ केवळ चार–पांच बंगाली बुकं शिकलेली, जुन्या सस्कृतीत वाढलेली मुलगी. नि मी पडलों सिनेमावाला, चित्रपटांत काम करणारा, चित्रपटासारख्या मोहमयी नगरींत अहोरात्र वावरणारा. पण शोभान त्यावेळीं माझ्याशी लग्न केल नि त्या दिवशी जें माझ्या हृदयात स्थान मिळविल तें आजमितीला तिचच अधिपत्य चालतं आहे, माझ्यावर नि माझ्या घरातहि.

लग्नाचा तो दिवस आजहि मला आठवतो. मी तेव्हां बॉम्बे टॉकीज मध्यें काम करीत होतों. नुकताच अभिनेता म्हणून माझा चित्रपटसृष्टींत नावलौकिक सुरू झाला होता. नट म्हणून मला प्रसिद्धी मिळू लागली होती. अशा वेळीं माझ एका ठिकाणी लग्न जमल होत. लग्नाची सर्व पूर्वतयारीहि झाली होती. पण केवळ मी सिनेमावाला म्हणून ते लग्न मोडल होतं नि फिरून मी बॉम्बे टॉकीजमध्यें कामावर रुजू झालो होतों.

एके दिवशी अकस्मात मला खांडव्याहून वडिलाची तार आली. मी घाबरलो, कुणी आजारी तर नसेल ना घरीं ? कारण आईच्या प्रकृतीची नेहमीच कुरबूर चालू असे. मी तसाच मुंबईहून खांडव्याला खाना झाला. गाडी स्टेशनात शिरते तर स्टेशनावर सर्वच हजर. आई, वडिल, भाऊ, नातेवाईक अगदी ट्रंका बॅगासह मी बुचकळ्यांत

पडलों, ही भानगड तरी काय आहे? स्टेशनांवर उतरलों आई-बाबाच्या पायाना स्पर्श करून त्याच दर्शन घेतलं, तेव्हा मला समजलं कीं, ही सारी मंडळी माझ्या लग्नाला चालली आहेत कलकत्याला आणि नवरदेवाची वाट पहात थांबली आहेत स्टेशनात. तेथून तसेच त्यांनीं मला कलकत्याला नेलं नि दुसऱ्या दिवशीं अस्मादिकांच्या डोक्यावर अक्षता पडल्या. नि जिला मी उभ्या आयुष्यात कधी पाहिल नव्हतं अशी एक तरुणी माझी परिणिता बनून माझ्या जीवनांत आली!

नि त्या दिवसापासून शोभा माझं जीवन व्यापून राहिली आहे. माझ्या सुख-दु:खांशीं समरस झाली आहे. तशी ती एक जुन्या सस्कृतीत वाढलेली काहीशीं- खेडवळ तरुणीच. पण तिन मला समजून घेतलं. माझं घरदार, कुटुंब साऱ्याच्या स्वभावाची चटकन पारख केली नि नव्या जमान्याबरोबर तीहि प्रत्यही नवी बनत चालली. आम्हा सिने-कलावतांचें जीवन अस्थिर, बरंचसं लहरी पण हें जीवनहि तिनं पचनीं पाडून घेतलं नि काळाबरोबर मी पुढं जात असतांना तीहि न दमतां, न थकतां माझ्या बरोबर धावत राहिली. आजहि धांवत आहे. कधीं दमछाक अशी झालीच नाहीं. ती समजूतदार आहे. परिस्थितीची तिला चांगली जाणीव आहे. पतीच सुख तें आपलं सुख मानणारी आहे.

शोभाला वाचनाचा भारी नाद. पण तिला वाचन करायला फारसा वेळहि मिळत नाहीं. पण त्यातूनहि ती आपली हौस भागवून घेतेच. पण खरं सांगायचं म्हणजे तिला आतां स्वतःच अस्तित्वच उरलं नाहीं. पतीच सुख तेंच आपलं सुख. पतीची आवड तीच आपली आवड ती मानते नि म्हणून वयाच्या पन्नासाव्या वर्षी मी बॉलरूम डान्स शिकूं लागतांच तीहि माझ्या बरोबर पावलं टाकू लागली. समाजात वावरायच, वेगवेगळ्या प्रकृतीच्या लोकांशीं माझ्याबरोबर भेटायचं तर त्यासाठी बहुश्रुत व्हायला हवं हें तिन हेरल. नि त्याप्रमाण तिन स्वत:चा बदल करून घेतला.

मला मध्यंतरी सायकलिंगचा शोक लागला. शोभान त्यालाहि प्रोत्साहन दिलं. मी मुष्टियुद्ध शिकू लागलों. शोभाला त्यांतहि गंमत वाटूं लागली. मी भविष्याचा अभ्यास सुरू केला. शोभाचहि या कामी सहकार्य लाभू लागलच नि आतां मी निरनिराळ्या भाज्यांच्या रसाचं सशोधन सुरू केल तर ती त्यातहि रस घेऊ लागलीच खरच गमत नि कमाल वाटते शोभाची मला.

मी मध्यतरी चित्रकलेचा अभ्यास सुरू केला होता आजहि तो माझा फावल्या वेळचा छंद आहेच. या कामींहि रग संगतीच कौतुक करायला कुंचला स्वच्छ करून द्यायला नि काढलेल्या कलाकृतीची प्रशसा करून मला नवा हुरूप द्यायला ती सदैव तत्पर, खरंच एका सिनेकलावंताच्या लहरी जीवनांत त्याच्या पावलावर पाऊल टाकून चालायच, पळायच सोप काम नाही. तारेवरची कसरत आहे ती, पण ही कसरत शोभा अगदी तोल साभाळून करते आहे.

शोभा काही झालं तरी स्त्रीच आहे. नि मत्सर तर 'स्त्री' च्या पांचवीला पुजलेला. तेव्हां तीहि मत्सरी असली तर नवल नाही नि म्हणूनच प्रारभी प्रारभी चित्रपटातील माझे प्रणय प्रसंग पाहून तिचाहि मत्सर जागा व्हायचा. पण मग तिला कळून चुकल की, मी जे चित्र-पटांतून प्रणय प्रसग रंगवतो ते नाटकी असतात, खोटे असतात. या पेक्षां जीवंत प्रसग आपल्याच जीवनात घडून येतात! त्यामुळं पुढं पुढं तो मत्सरहि नाहीसा झालाच.

खरंच शोभानं माझ्या जीवनाचा फुलबाग फुलविला आहे. माझ्या जीवनांत सदा वसंत फुलवीत ठेवला आहे. मला सदा चद्राच्या चांदण्याची शीतलाता दिली आहे नि संसाराचा रथ कुशलतेनं हाकत आहे. नि म्हणूनच अशा समजस सालस, प्रेमळ नि तितक्याच कर्तव्य-दक्ष पत्नीचा लाभ झाल्याबद्दल मी स्वत:ला धन्य समजतो.

●●●

---

## एम्. एम्. जोशी

अभिनंदनाच्या तारा, पत्रांचा ढीग पडला होता. कांहीं दिवसानंतर माझा डोळा बरा झाला. परतु नव्या चिंता आणि कलह सुरू झाले. उपहास आणि तोहि स्वकियाकडून—होऊं लागला म्हणजे हृदय स्वत-बंबाळ झाल्याखेरीज कसे राहिल? मी तुलाने हमी सांगे आणि सांगतो की, मी कांहीं फार मोठा माणूस नाही. परतु लोकानीं अवास्तव स्तुति केली तर ती खरी समजण्याइतका भोळाहि नाही. हे मोठेंपण प्रासंगिक आहे. अळवावरच्या पाण्यासारखें विशिष्ट स्थान—महात्म्यामुळें मोत्या-सारखें दिसतें. जमिनीवर पडले की पुन: पाणी. मी तुला एवढेंच सांगत असे कीं, हा जलबिंदू आहे. विषबिंदू मात्र नाही. माझे हें सारें तत्वज्ञान तुला कळतें पण वळत नाहीं पण मला तरी कुठें वळतें आहे—? आपलें जीवन एका दृष्टीने आगळें आहे. सर्वांच्या जीवनात धूपछाव असते. उन्हाळा पावसाळा असतो. पण तुझ्या वाट्याला उन्हच छायेच्या मानानें अधिक. सदा सर्वकाळ उन्हाळाच पाऊस पडतो

(पृष्ठ १३६ वरून चालू)

पण तो वळवासारखा फार थोडा वेळ आणि अनियमित. वळवाच्या पावसाने का कोठें शेतें पिकतात? तुझ्या जीवनाच्या मळ्यांत सुखाचें पीक कसें येणार? पण असे असूनहि माझी खात्री आहे की, कितीहि आपत्ति आल्या, मी कितीहि त्रास दिला आणि क्लेशाची परमावधि झाली तरी माझ्या ह्या वैराण जीवनाअखेरपर्यंत तूं प्रेमानें साथ देण्याचें ठरविले आहेस. लोकाना वाटत असेल कीं, तूं फार सुखांत आहेस, पुढाऱ्याची बायको आहेत, तुला काहीं कमी नाहीं—खरेंच आहे तें—! तसे पाहुलें तर काय कमी आहे?—तूं सुखीच आहेस—पण सुखाच्या तुझ्या आणि त्याच्या कल्पना वेगळ्या इतकेंच!

तुझाच
एसेम.

●●●



## य. गो. जोशी

या विषयावर लिहिणे फार अवघड आहे ! पण या विषयावर लिहिण्याचे कबूल करून बसलो आणि मग या विषयातील अवघडपणा माझ्या लक्षात आला !

पण दिलेला शब्द पाळण्याकरितां आज हें लिहित आहे. आणि या विषयावर लिहिण्याचें ठरविल्यानतर जेव्हां मी माझे गेलें बत्तीस वर्षांचें विवाहित आयुष्य पाहूं लागलों तेव्हां आयुष्यातील ज्या काहीं आठवणी माझ्या डोळयासमोरून सरकून गेल्या त्यातील काहीं आठवणींच्या आठवणी मी या लेखांत देणार आहे

पण त्या लिहिण्यापूर्वी मला एक पवित्र कर्तव्य करायला हवे. आणि तें म्हणजे माझ्या प्रथम पत्नीचें स्मरण. माझें पहिलें वैवाहिक आयुष्य जेमतेम नऊ महिन्याचें–त्या नऊ महिन्यांत माहेरपण वजा जाता मला माझ्या प्रथम पत्नीचा सहवास मिळाला तो फक्त चार–पांच महिन्यांचा. त्या चार–पाच महिन्यांत स्वभावानें आम्ही पुरतें एकमेकांना ओळखलेहि नव्हतें. आणि त्या चार-पाच महिन्यांच्या काळात माझ्या आयुष्यात शांततेचा काळ असा फारच थोडा होता. माझ्या वडिलाचें शेवटचें आजारपण या चार-पाच महिन्यांतच झालें. आणि त्या आजारीपणांतच माझ्या वडिलाचा अंत झाला. तेव्हा त्या माझ्या चार-पांच महिन्याच्या संसारसुखाला काय चव असणार–? आणि वडिलाच्या मागोमाग माझी प्रथम पत्नीहि हें जग सोडून गेली.

तिचें माहेरचें नाव शांता खरे.

तिचें सासरचे नांव सौ. यमुनाबाई जोशी !

आणि आतां तिचें नांव कै. सौ. यमुनाबाई जोशी.

त्यावेळी माझी परिस्थिती अत्यंत वाईट होती. परिस्थितीनुरूप माझें दुसरें लग्न इतक्यात व्हावें अशी आशा करण्याला मला जागा नव्हती.

पण माझ्या आईच्या रूपानें मूर्तिमंत आशेचा कल्पवृक्ष माझ्या घरात नांदत होता !

मी काहीं कामाकरिता सातारला गेलों होतों. त्याचवेळीं मला एक मुलगी सांगून आली. ती माझ्या आईनेंच पाहिली आणि मी परत यायच्या आतच आईनें माझें लग्न ठरवूनहि टाकले.

याहि बाबतींत मी माझ्या आईचा शब्द मोडणार नाहीं असा माझ्या आईचा आत्मविश्वास होता.

आणि आईनें असे धाडस करण्याचें कारणहि थोडें निराळें होतें. आयुष्यात आपले पहिले लग्न फसलें आहे. आपली परिस्थितीहि लौकरच चांगली होईल. अशी आशाळभूतपणें अशा करायलाहि चालू जीवनात स्थान नव्हतें तेव्हा आपण पुन्हा लग्नच करूं नये असा विचार माझ्या मनात तरळत होता. आणि त्या माझ्या विचाराचा वास माझ्या आईला लागला होता.

तेव्हा आईनें धाडस करून माझें दुसरें लग्न ठरवून टाकलें. मीं आईच्या म्हणण्याला मान दिला. कारण माझे वडिल गेलेले; बरं आईचा मी एकुलता एक मुलगा. आईची सुखाची सर्व आशा माझ्यावर. मला लग्नाला 'हो' म्हणणेंच भाग होतें.

त्याहि परिस्थितींत खरें म्हणजे आईला सुख मिळावें, तिच्या हातांखाली सून हवी म्हणून मीं लग्न करून घेतले.

त्या मुलीचें माहेरचें नांव आहे मालती भिडे.

माझी आई कांहीं बाबतीत कमालीची हट्टी होती. असे कधीं कुणी करीत नाही. पण आईनें घरीं आलेल्या नव्या सुनेचें हट्टानें पहिलेच नाव ठेवलें. यमुनाबाई जोशी.

ती सौ. यमुनाबाई जोशी आमच्या घरांत आज सुखानें नांदत आहे.

माझ्या 'शेवग्याच्या शेंगा' या कथेला प्रथम पारितोषिक मिळून लेखक म्हणून एकदम प्रसिद्धी मिळाली ती याच वेळेला ! जणू बक्षिसाची पायघडी टाकूनच माझी द्वितीय पत्नी पायगुणाची ठरली. अजून मला तो अनुभव येत आहे.

माझ्या या द्वितीय विवाहाची पहिलीं काहीं वर्षें अजिबात सुखाचीं गेली नाहीत. आणि याला कारण स्वतः मीच होतों.

माझी नवी पत्नी माझ्या घरात संसारसुखाच्या आशेनें पहात होती.

पण त्याचवेळी माझ्या डोळयांपुढून माझ्या पहिल्या पत्नीचें चित्र नाहीसे होत नव्हतें ! आणि मी भावनाप्रधान असल्यामुळें हें मला उघड बोलून दाखवितां येत नव्हतें. त्यामुळें माझें हें दुसरे लग्न सुरुवातीला सुखाचें नव्हतें.

आणि माझी आई जर नतर काहीं वर्षे जगली नसती तर माझें हें दुसरें वैवाहिक जीवन खात्रीनें सदाचें असुखी राहिलें असतें.

पण आम्हां पतीपत्नीवर आईचा कमालीचा दरारा होता. आणि म्हणूनच आम्हां पतीपत्नींची मनें पुढें एकरूप झाली आणि आतां आम्ही सुखाचा संसार अनुभवीत आहोंत !

आमच्या संसारवृक्षावर पहिल्याप्रथम माझ्या वागणुकीनें असमाधानाच्या कळया उगवायच्या. आणि माझ्या आईनें आपल्या वागणुकीच्या कौशल्यानें त्या असमाधानाच्या कळयातून सुखाचीं फुलें फुलविलीं !

आमच्या संसारांतील पहिल्या असुखी वातावरणाचें कारण माझी प्रथम पत्नीची तीव्र स्मृति. हें मी आतापर्यंत कोणाजवळहि बोललों नाही. तें या लेखात नाईलाजानें लिहित आहे. माझ्या या द्वितीय पत्नीनें जर माझा हा लेख वाचला तर तिलाहि आश्चर्याचा धक्का बसेल. म्हणून इच्छा अशी आहे की, हा लेख माझ्या पत्नीच्या दृष्टीससुद्धा पडूं नये.

या माझ्या दुसऱ्या लग्नाच्या गेल्या बत्तीस वर्षांचें जर मीं सिंहावलोकन केलें तर "धन्य तूची कांता" या सदरात मी माझ्या पत्नीला शंभर टक्के मार्क खात्रीनें देणार नाहीं. अगदीं प्रामाणिकपणे मार्क द्यायचे झाले तर चव्वेचाळीस मार्क देईन ! कारण 'धन्य तूंचि कांता' म्हणून तिला जर मीं कौतुकानें शंभर मार्क दिले तर माझी किंमत शून्य ठरेल. माझें या प्रश्नाचें व्यावहारिक उत्तर असें आहे--तिचें मार्क ४४, माझे स्वतःचे मार्क ५६, एकूण शंभर आणि 'धन्य तूंचि कांता' नव्हे 'धन्यो गृहस्थाश्रमा' या हेडिंगखालीं आमच्या सुखी संसाराचे एकूण मार्क शंभर !

जामातो दशमो ग्रह :
असे कोणी म्हणोत.
परंतु जोशीबुवांचा अनुभव मात्र
वेगळाच.
सहकुटुंब सहपरिवारांत
जोशीबुवा कसे रमून
गेलेले दिसतात !



धन्यो गृहस्थाश्रम :

पण माझ्या आयुष्यांतले कांहीं क्षण मला असे आठवतात कीं, त्या वेळीं या मीं दिलेल्या मार्कांची उलटापालट खात्रीनें करायला हवी.

उदाहरणार्थ, मध्यंतरी माझ्या पत्नीचें ऑपरेशन झालें. मी वृत्तीनें हळवा असल्यामुळें फक्त तिची काळजी करण्याखेरीज त्याप्रसंगीं मीं कांहींहि केलें नाहीं.

पण तीन वर्षांपूर्वी मी जेव्हां काळजी करण्यासारखा आजारी होतों व मला मनुष्य द्वेष आणि अन्न द्वेष झाला होता त्यावेळीं मला माझ्या समोर इतर माणसेंच काय पण माझीं मुलेंबाळें आणि पत्नीसुद्धां यायला नको होती. त्यावेळीं आपला चेहरा हंसरा ठेवून जिनें माझ्या आजारपणांतील कडवट बोलणीं सहन करून मला कसातरी करून चतकोर भाकरीचा तुकडा घालून मला जिवंत ठेवलें. आणि त्या अत्यत काळजीच्या प्रसंगीं आपला चेहरा हंसरा ठेवूं शकणाऱ्या माझ्या या द्वितीय पत्नीला वाटतं, बरं म्हणायलाच पाहिजे !

माझ्या आईच्या आजारीपणांत सर्वजण आईला हॉस्पिटलमध्यें पाठविण्याकरितां सल्ला देत असतां जिनें प्रेमाच्या हट्टानें माझ्या आईची–आपल्या सासूची शेवटपर्यंत सेवा केली–आणि त्यांत कर्तव्य-पालनाचा मधुर आनंद उपभोगिला तिला बरं नव्हें चांगलंच म्हणायला पाहिजे.

माझ्या त्या मोठ्या आजारीपणांत मला अन्नद्वेष एवढा झाला होता कीं, घरांत माझीं मुलें नेहमीचें खाणें खात असतांना मीं पाहिलें कीं मला वाटे "हीं पोरं किती खात आहेत— यांना हें पचणार आहे कां— ?" आणि मी म्हणेसुद्धां— "अरे, बाळांनो किती खातां ?" या माझ्या बोलण्यावर माझी पत्नी माझ्याकडे पाहून फक्त हंसे आणि माझी मुलें खायचें थांबवून पाणी प्यायला लागत !

दिवसेंदिवस माझी प्रकृति खालावत चालली होती. इतकीं कीं, माझीं जिव्हाळ्याचीं परगांवची माणसें मला भेटायला येऊं लागलीं होतीं. पण तरी मी या आजारपणांत दगावणार आहे अशा भावनेचा स्पर्श जिच्या चेहऱ्यावर यत्किंचितहि दिसला नाहीं व जिनें नेहमीं हंसतमुखच ठेवलें त्या माझ्या द्वितीय पत्नीच्या आत्मविश्वासाला काय म्हणावें ?

पण हा आत्मविश्वास माझ्या पत्नीनें कुठून आणला होता— ? एक दिवस दुपारचा मी जागा झालों आणि पत्नीजवळ कांहीं मागण्या-करतां घरांत आलों, पण माझी पत्नी घरांत कुठें दिसेना. माझें सहज लक्ष गेलें, माझ्या कै. आईची खोलीकडे, आईची खोली म्हणून अद्याप मोकळी ठेवली आहे—जिथें माझ्या आईवडिलांच्या तसबिरी लावून ठेवल्या आहेत—त्या माझ्या आईच्या तसबिरीसमोर माझी पत्नी हात जोडून बसली होती. देवासमोर नव्हे. मला वाटलें, माझ्या आईच्या शेवटच्या दुखण्यांत माझ्या पत्नीनें जो 'मुलीसारखी' सेवा केली होती त्याच्याबदला माझी प्रकृति बरी व्हावी म्हणून माझी पत्नी माझ्या आईजवळ आशीर्वाद मागते आहे.

तें भावनेचें अलौकिक दृश्य पाहून मला खोकल्याची उबळ आली. माझा आवाज ऐकून माझ्या पत्नीनें एकदम आपले डोळे पुसले आणि नेहमींच्या सस्मितमुखानें ती माझ्यापुढें येऊन उभी राहिली—! तिनें हंसत विचारलें, "काय पाहिजे आहे ?"

केवळ तिच्या समाधानासाठीं मीं म्हटलें, "मला कांहींतरी आज खावंसं वाटतं आहे !"

तेव्हांपासून मला बरें वाटेपर्यंत मीं पाळत ठेवली होती. माझ्या पत्नीचा दर दिवसाचा तो क्षण माझ्या आईच्या तसबिरीपुढें हात जोडून बसण्याचा असे.

आम्ही— माझें कुटुंब— अशींच भावनेचीं माणसें आहोंत ! या प्रसं-गांत सहज एक प्रसंग सांगून टाकतों, माझ्या आजारपणामुळें घरांत मुलांबाळांनीं उपरी शांतता धारण केली होती. पण माझी थोरली मुलगी सौ. शांता—हिचीं दोन मुलं—माझी नातवंडं—त्या आजार-पणांत एकदां आमच्या घरीं आलीं होतीं. माझ्या मुलीनें त्यांना सांगितलें "गडबड करूं नका—भाऊंना बरं नाहीं हं !"

तीं चिमणी पाखरंहि गप्प बसलीं.

पण नंतर सात–आठ दिवसांनीं माझा नातू श्रीकांत हळूंच माझ्या अंथरुणाजवळ आला व म्हणाला, "भाऊ, आतां तुम्हांला बरं वाटतं ना ?"

मीं हंसत हो म्हटलं.

मग श्रीकांतनं आनंदी चेहऱ्यानं मला विचारलं, "मग आम्हीं आतां ओरडूं ?"

मीं परवानगी दिली.

असे प्रसंग आठवले कीं वाटतें, माझ्या पत्नीचे मार्क ५६ आहेत आणि माझे ४४ आहेत. पण एकंदरीत बेरीज शंभराचीच.

शंभर मार्क मी मोठ्या प्रौढीनें सांगतों आहे पण त्याच वेळीं आमच्या संसाराची ईयत्ता कोणती याची मला पूर्ण जाणीव आहे.

वास्तविक ज्या साध्या, नैसर्गिक गोष्टी आहेत त्यांनासुद्धां आतां 'गुण' म्हणावयाची वेळ आली आहे. शेजारपाजारचे संसार पाहून!

माझ्या पत्नीचा एक गुण मला सांगता येईल. दारिद्र, गरीबी, मध्यमस्थिति आणि आताची साधारण बरी स्थिती तिनें सारख्याच समाधानांत काढिली आहे. दारिद्र्यांतहि तिनें आपल्या संसाराचा केविलवाणेपणा दाखवला नाहीं, मला माझ्या दारिद्र्याची जाणीव दिली नाहीं. कारण जें माझें होतें तेंच तिचें होतें. तिच्यांत दुजाभाव नव्हता. आताच्या साधारण बऱ्या परिस्थितींत तिचा हात उदार आहे. पण आजूबाजूला पाहिलें कीं हल्ली हेच आयुष्य 'असामान्य' म्हणायची वेळ येते.

आम्हीं एकमेकांच्या आवडीनिवडी सांभाळतों. कित्येक वेळेला अतिशयोक्तीनें असें म्हणावेसें वाटते—माझ्या रूपानं ती व तिच्या रूपानं मी जगतों आहे.

अर्थात् आमची कधीं बोलाचाली होत नाहीं असें नाहीं. आमच्या दांपत्य सुखाचें झाड सामान्यच आहे. त्याला पानें आहेत. फांद्या आहेत. पण तें झाड फुलें देणारें आहे. आणि तीं फुलें मंद असा सुगंध देणारीं आहेत.

पण या जगांत असें एखादें झाड असेल कां — ? कीं ज्याला पानें फांद्या न येतां फक्त फुलेंच येतात ?

● ● ●

मराठी वाचकांना अपरिचित असलेले अमर वर्मा हिंदी सृष्टींत एक प्रसिद्ध चित्रपटकथालेखक म्हणून ज्ञात आहेत. त्यांनीं हिंदींतून केलेल्या स्वैर वार्तालापाचा हा मराठी अनुवाद.

## अमर वर्मा

सोळा वर्षांपूर्वीची गोष्ट ! पुण्यांतील प्रभात स्टुडिओमध्यें 'आगे बढो' या चित्रपटाचें शूटिंग चालू होतें. लेखक आणि कवि म्हणून माझी नियुक्ति झाली होती. एक दिवस प्लेबॅकसाठीं म्हणून एक अत्यंत साधी दिसणारी मुलगी येऊन उभी राहिली. तिचें गाणें संपताच मी सहज कुणाला म्हटलें, "या मुलीचा आवाज आणि गाण्याचा ढंग खरोखरच चांगला आहे. फक्त हिंदी उच्चार मात्र अतिशय खराब दिसतात." अर्थात् हें इतकेंच राहिलें आणि असेच कांहीं महिने निघून गेले. चित्रपट पुराहि झाला. मी दुसऱ्या चित्रपटांत गुतून गेलों. आणि त्याखेपेसहि पुन्हा तीच मुलगी प्लेबॅकसाठीं म्हणून आली. मात्र तिच्या हिंदी उच्चारांत त्यावेळी कमालीचा फरक आढळला. मी तर आश्चर्यचकितच झालों. मीं तिला त्याचें कारण विचारतांच ती म्हणाली, "आपण पूर्वी काढलेले उद्गार माझ्या कानीं आले तेव्हांपासून हिंदी सुधारण्याचा चंगच बांधला आणि म्हणूनच हिंदी क्लासमध्यें जाऊं लागले. काय प्रगति आहे ना ?" खरोखरच मला तिचें कौतुक वाटलें. मी सहज बोलून गेलेल्या गोष्टीबद्दल राग न मानतां ती अंमलांत आणली याचेंच फार समाधान झालें. ती मुलगी म्हणजेच माणिक दादरकर ! कांहीं दिवसापूर्वींच एस्. पी. कॉलेजमधून बी. ए. पास झाली होती. आणि सध्या शास्त्रीय संगीताचा खास अभ्यास करीत होती. या प्रसंगांतूनच आमची ओळख वाढत गेली. परिचय दृढ झाला.

मी अलाहाबाद युनिव्हर्सिटीमधून बी. ए. झालों. माझे आई-वडिल माझ्या लहानपणीच वारल्यानें माझा सारा सांभाळ माझ्या मोठ्या बहिणीनेंच केला. १९४६ सालच्या अखेरीस 'अपराधी' चित्रपटाचें शूटिंग सुरू झालें आणि एक दिवस माझी बहिण बरीच आजारी असल्याचें वृत्त कानीं आलें. तिला हवा पालटण्यासाठीं ताबडतोब दुसरीकडे नेण्याचा सल्लाहि देण्यांत आल्याचें समजलें. तिला तेथून ताबडतोब हलविणें जरूर असूनहि चित्रपटाच्या कामामुळें मला जाणें अशक्यप्राय ठरलें. काय करावें या विचारांत असतांनाच माणिक नेहमीप्रमाणें प्लेबॅकसाठी स्टुडिओंत आली. येतांच तिनें आपण कलकत्त्याला म्युझिक कॉन्फरन्सला जाणार असल्याचें कळवून टाकलें. मला एकदम एक कल्पना सुचली. मी मनांत म्हटलें, 'हिलाच सांगितलें तर ? हो, येतांना बहिणीला आणणें हिला सहज शक्य होईल !' पण तिला सांगावें कसें ? तिला काय वाटेल ? अनेक शंका मनांत डोकावूं लागल्या. पण पुन्हा विचार केला— मग ओळखीचा फायदा तो कोणता ? आणि सहजासहजीं ती जातेच आहे तेव्हां ?— धीर करून घाबरूनीच तिला विनती केली मात्र ! तिनेंहि कोणतेहि आढेवेढे न घेता हसतमुखानें त्याला मान्यता दिली. तिच्याबद्दलचा माझा आदर अधिकच वाढला.

ठरल्याप्रमाणें माणिक आमच्या घरीं अलाहाबादला गेली. आमच्या घरांतील सर्वांनाच शास्त्रीय संगीताची फार आवड ! आणि माणिक म्युझिक कॉन्फरन्सहून आल्याचें कळलें तेव्हां तर सर्वांना फारच आनंद झाला. ताबडतोब त्या रात्रीं तिच्या गाण्याची बैठक ठरविली. अलाहाबादमध्यें रहाणारे अनेक महाराष्ट्रीय रसिक, स्थानिक संगीततज्ज्ञ, शिक्षकवर्ग आणि अनेक प्रतिष्ठित मंडळी जलशाला जमा झाली

होती. मोहक आणि भावमधुर संगीताची मेजवानीच सर्वांना लाभली. सर्वजण तृप्त झाले. तिच्या अंगच्या कलागुणांचें सर्वांनीं वारेमाप कौतुक केलें. याचबरोबर तिच्या अंगचें इतर गुणांचेंहि दर्शन सर्वांना घडलें. एवढी ग्रॅज्युएट असूनहि रहाणी अत्यंत साधी स्वभाव, अत्यंत सरळ आणि विनम्र. त्याचबरोबर हंसतमुख आणि मिळूनमिसळून वागणारी ! सर्वांनीं तिचें वर्णन तरी किती करावें ? एक दिवस राहिली नाहींतर कुठली कोण अपरिचित मुलगी जणूं घरचीच बनली. घरच्या सर्व मंडळीनीं तिला बारकाईनें पाहून घेतलें. कळत न कळत एक वधूपरिक्षाच झाली म्हणा ना ? माझ्या वहिणीनें तर शंभर-टक्के मार्क दिले. तिला घरीं जाण्यास सांगण्यांत माझ्या मनांत पूर्वी सहज येऊन गेलेला विचार पूर्णतेस पोंचला होता.

आणि मग २१ मे १९४७ चा तो अत्यंत शुभ दिवस उजाडला. कु. माणिक सौ. माणिक वर्मा बनली. माझ्या अलाहाबादच्या घरीं मोठ्या धुमधडाक्यानें लग्न समारंभ पार पडला. शेकडों शुभ कामना आणि शुभाशीर्वाद घेऊन महाराष्ट्राच्या कलावतीनें एक नव्या जीवनांत प्रवेश केला.

विवाह हा प्रत्येकाच्या जीवनांत फार मोठें स्थित्यंतर घडवून आणतो. कलावंतांच्या दृष्टीनें तर तो शाप तरी ठरतो किंवा वरदान तरी ठरतो. कारण, कला आणि संसार या दोन्हीं गोष्टी एकत्र टिकणें फार कठीण असतें. परंतु समजूतदारपणा आणि विचार या दोन्ही गोष्टींच्या योगें त्या एकत्रहि राहूं शकतात आणि मग तें एक वरदानच ठरते. अर्थात् जर त्याचा मेळ जमला नाहीं तर मात्र तो एक शाप ठरतो. माणिकच्या बाबतींत मात्र तें वरदान ठरलें आहे. तिला तिच्या कलाक्षेत्रांत कोणतीहि आडकाठी आली नाहीं. उलट विवाह झाल्यावरच तिला संगीत क्षेत्रांत अखिल भारतीय स्वरूपाची कीर्ति मिळाली आहे आणि हें नमूद करतांना मला साभिमान आनंद होत आहे.

अर्थात् लग्न झाल्यानंतर कांहीं दिवस मात्र जणूं तिच्या परीक्षेचेच होते. कारण आमचा विवाह आंतरप्रांतीय होता. अलाहाबादच्या लोकांना वाटलें-ही महाराष्ट्रीय मुलगी आणि तशांत कलाकार ! घरचा कारभार असा चालवेल कोण जाणें ? आणि तिच्या पुण्याच्या लोकांना वाटे–उत्तर भारतीय माणसांबरोबर हिचें आयुष्य कसें जाईल ? कांहीं लोकांचा समज तर असा होता कीं, माणिक विवाहानंतर गृहिणी म्हणून रहाण्याऐवजीं कलाकार म्हणूनच जगेल. परंतु असें कधींच झालें नाहीं. माणिक कलाकार आहेच तर पण त्याचबरोबर एक गृहिणीहि आहे. दोन्ही जबाबदाऱ्या तिनें सहज पार पाडल्या. कालांतरानें ती माता म्हणूनहि तिसरी जबाबदारी तितक्याच सहजतेनें पार पाडूं लागली. अगदीं विनासायास ! आम्हीं दोघांनींहि एकमेकांच्या भावनांची सदैव कदर केली आणि आजहि करीत आहोंत आणि म्हणूनच आमचा संसार अत्यंत सुखांत चालला आहे.

अर्थात् माणिक खरीखुरी कलावंत आहे. संगीतावरील तिची अपार भक्ति आणि सदैव नवे नवे शिकण्याची जिज्ञासा यामुळें तिनें लग्नानंतरहि सर्व कांहीं संभाळून संगीत आत्मसात् केलें आणि जें मिळविलें तें लोकांपुढें मांडण्यासाठीं तिनें माझी संमति घेतली. आजहि या घटकेला घेत आहे. जरादेखील अहंमन्यतेचा स्पर्श तिला झालेला दिसत नाहीं. अर्थात तिनें कीर्ति मिळवावी, लोकप्रिय व्हावे असें मला वाटत नसलें तरच नवल ! मीं तिला कदापि आडकाठी करीत नाहीं. ती एक सच्ची कलाकार आहे, हें मी प्रथम ध्यानांत घेतों.



श्री. व सौ. वर्मा

माणिक कलाकार असली तरी गृहिणीहि आहे हें मला विवाहानंतर कांहीं दिवसांतच कळून आलें. लग्न होऊन सासरीं गेलेल्या प्रत्येक मुलीच्या कृतीकडे प्रत्येजण बारकाईनें पहात असतो. तिच्या अंगीं कलागुण कोणते आहेत याकडे कोणाचेंहि लक्ष नसतें. माणिकनें हें सारें जाणलें होतें. लग्न होऊन अलाहाबादला येतांच तिनें घरच्या सर्व गोष्टींत मन घालून सर्वांना जिंकून घेतलें. कित्येक दिवस तिची संगीत–साधना बंद होती. शेवटीं जेव्हां घरच्या लोकांनींच प्रेरणा दिली, तेव्हां तिनें पुन्हा तिची संगीत–साधना सुरू केली. मातृपद प्राप्त होताच कलाकार स्त्रीपुढें अनेक प्रश्न उभे रहातात. त्यावेळेस पुन्हा एकदां तिला आपली कला का मुलांबाबतचें कर्तव्य असा प्रश्न पडतो. परंतु माणिकच्या आईनेंच या प्रश्नावर उपाय शोधला. तिनें मुलांचा संभाळ अत्यंत जिव्हाळ्यानें करून माणिकला आवश्यक तेवढी फुरसत दिली. आज मुलं मोठीं झालीं तरीहि तीं आजीजवळच असतात.

एकंदरींत माणिकनें आपली संगीतकला आणि संसार या दोन्ही गोष्टींवर मोठ्या चातुर्यानें विजय मिळविला असला तरी लोकांची एक मोठी तक्रार तिच्याबद्दल असतेच आणि ती म्हणजे ती पुष्कळश कार्यक्रमाला नकार देते हीच ! याचें कारण देतांना ती सांगते कीं, " मुलें पुण्याला असतात त्यामुळें अर्धा जीव पुण्यांत गुंतलेला असतो आणि अर्धा मुंबईत असतो. म्हणूनच मला सारख्या पुण्या-मुंबईच्या वाऱ्या कराव्या लागतात " अर्थात तिला त्यांत त्रास होतोच पण यावरहि तिचें उत्तर आहे. ती म्हणते, " ज्या स्त्रीला कलाकार आणि गृहिणी या दोन्हीं जबाबदाऱ्या यशस्वी तऱ्हेनें पार पाडायच्या असतील तिला इतर स्त्रियांपेक्षां थोडाबहुत जास्त त्रास सहन करावा लागणारच! म्हणूनच ही तारेवरील कसरत माणिक ज्या लीलेनें करतें त्याबद्दल मला आणि इतर सर्वांनाच धन्यता वाटल्यावांचून कशी राहील !

## वसंत जोगळेकर

वऱ्हाडांतील यवतमाळ या जिल्ह्याच्या गांवीं माझं बाळपण आणि शालेय शिक्षण झालं, माझे वडील एक प्रख्यात वकील होते. आणि वडील मुलानं वकील होऊन आपल्या हाताखालीं कामं करावं अशी त्यांची माझ्या बाबतीत अपेक्षा होती. आणि ती चूक होती असं नाहीं म्हणतां येणार. प्रत्येक पित्याच्या आपल्या मुलांविषयीं कांहीं आशा आकांक्षा या असणारच, पण त्यांची ही अपेक्षा पूर्ण झाली नाहीं. कॉलेजांत सायन्सचा विद्यार्थी म्हणून वावरणारा मी सुखस्वप्नं पहात होतों तीं चित्रसृष्टीचींच. आणि म्हणूनच चित्रसृष्टीत प्रवेश मिळावा म्हणून मीं थेट मुंबई गांठली. कारण चित्रपटाची खरी बाजारपेठ इथंच होती.

शाळेतील गॅदरिंगसाठीं बसविलेल्या नाटकांत मीं कांहीं भूमिका केल्या होत्या. नाकीं डोळीं मी नीटस होतों. तब्येत चांगली, भरपूर उंची या भांडवलावर नट बनायला फारसा त्रास पडणार नाहीं अशी माझी अपेक्षा होती. ही माझी माझ्या भवितव्याबद्दलची अपेक्षासुद्धां पुढें पूर्ण झाली नाहीं. कारण आज जवळजवळ बावीस वर्षे मी चित्रपटसृष्टींत वावरूनहि एकहि भूमिका मीं केली नाहीं. ( नाहीं म्हणायला 'कारीगर' मध्यें चौपाटीवर भेळपुरी खाणाऱ्याच्या समूह-दृष्यात मी एकदां मिनिटभर रजतपटावर चमकलों आहे! )

सर्वोत्तम बदामी यांच्या 'चिंगारी' या चित्रपटांत श्री. पृथ्वीराजकपूर यांच्या मित्राची एक छोटीशी भूमिका मला मिळाली होती. पण त्याचं चित्रण व्हायला बराच अवधि होता. मी मात्र दररोज स्टुडिओंत जात असे. आणि एके दिवशीं श्री. बदामी यांचे दोन्ही सहाय्यक दिग्दर्शक आजारी पडले. नि मी त्यांचा सहकारी बनलो अगदीं अचानकपणें ! माझं काम नि काम करतानाचा उत्साह त्यांना आवडला आणि त्यानी माझी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून नेमणूक केली. दरमहा ६० रुपये पगार सुरू झाला. मला मिळालेली नटाची भूमिका माझ्या हातून निसटली आणि दिग्दर्शकाची भूमिका सुरूं झाली. पुढें चित्रपटात भूमिका करण्यापेक्षां चित्रपट तयार करणाऱ्या दिग्दर्शकाची भूमिका मला जास्त आवडू लागली नि गेलीं दोन तपें मी यांतच रमून गेलों आहे. पुढें नट व्हायच्या संध्या अनेक वेळां आल्या. अनेकानीं भूमिका करण्याबद्दल विचारलें. पण योगायोगानें चालून आलेली दिग्दर्शकाची भूमिकाच मी मनोभावे पार पाडीत आहे. त्यांतच मला आत्यंतिक आनंद लाभत आहे.

पण नट व्हायची माझी हौस श्री. अप्पा पेंडसे यानीं लग्नाची बेडी या नाटकात मला डॉ. कांचनच काम देऊन पुरी केली. माणसाच्या मनात एक असतं आणि विधिलिखित मात्र दुसरच ठरलेलं असत. कधीं कधीं मात्र कलावताची लोकप्रियता आणि भरभराट पाहून असं वाटतं कीं, आपण ती मिळालेली पहिली भूमिका केली असती तर? तर कोणास ठाऊक काय झाल असत. मला ती भूमिका मिळाली तो दिवस चांगला आठवतो कारण त्या दिवशीं हिटलरनं लढाई सुरू केली होती !

जवळजवळ दोन वर्षे सहाय्यक दिग्दर्शकाचं काम केल्यानंतर मला १९४१ सालीं स्वतंत्र दिग्दर्शन करण्याची संधि लाभली. सरस्वतीचे मालक कै. दादासाहेब तोरणे आणि त्यांचे मित्र सदुभाऊ गद्रे यांनीं ती संधि दिली. कै. माधवराव जोशी यांच्या कथानकावर आधारित 'किती हंसाल' हा भयंकर चित्रपट मीं दिग्दर्शित केला. आणि या चित्रानें निर्मात्यांना भरपूर पैसा मिळवून दिला. मी त्यावेळीं पुण्याच्या पुरंदरे कॉलनीत रहात असे. आणि शेजारीच एक प्रसिद्ध नटी रहात असे. ही सुविद्य आणि सुस्वरूप मुलगी मला आवडली. ह्या मुलीनें रजत जयंती साजऱ्या झालेल्या दोन-तीन चित्रपटात भूमिका केल्या होत्या. आणि त्या भूमिका लोकप्रियहि झाल्या होत्या. या मुलीन आपल्या चित्रपटांत भूमिका करावी अशी माझी इच्छा होती. आणि म्हणूनच तिला तसं विचारण्यासाठीं मी माझ्या एका मित्राबरोबर एके दिवशीं गेलों. पण माझ्या चित्रपटात भूमिका करायला तिनं साफ नकार दिला. माझी निराशा झाली. अगदीं फजितीच उडाली म्हणाना. पण बायकांचा नकार हा होकार असतो हें तंत्र काहीं त्यावेळीं मला अवगत झालेल नव्हतं, त्यामुळें मी निराशेनंच परतलों. पण मला कल्पना नव्हती कीं, त्यावेळीं मला स्पष्ट नकार देणारी मुलगी दोन वर्षानंतर माझ्या चित्रपटांत नव्हे तर आयुष्यांत एक अत्यंत महत्त्वाची भूमिका करायला होकार देणार आहे म्हणून !

ती सुविद्य आणि सुस्वरूप मुलगी कोण? जाणून घ्यायची उत्सुकता आहे ना? ती सुविद्य कन्यका म्हणजेच ज्ञानेश्वर, थोरातांची कमळा, नवरदेव आणि सूनबाई या यशस्वी चित्रांची नायिका सुमती गुप्ते ही होय !

त्यानतर कै. विनायकरावांच्या प्रफुल्ल पिक्चर्समध्यें दिग्दर्शक म्हणून मला संधि मिळाली. विनायकराव दिग्दर्शित करीत असलेल्या 'माझं बाळ' या चित्रपटांत सुमती एक वेगळ्या तऱ्हेची भूमिका करीत होती. समाजावर चिडलेल्या एका बडखोर मुलीची ती भूमिका होती. चित्रण चालू असतांना मी पुष्कळ वेळां सेटवर जाऊन बसत असे. पण सुमतीशी बोलायची हिंमत मीं त्यावेळी कधीच केली नाहीं. कां कोण जाणे तिला पाहिल्यानतर मला तो नकार आठवायचा नि मी घाबरून जायचा.

मीं दिग्दर्शित केलेल्या "चिमुकला संसार" या चित्रपटाच्या मुंबईतील प्रकाशनाच्या वेळीं पहिल्या खेळाला सुमती आली होती. ती माझ्याशी छान बोलली. चित्रपट चागला केल्याबद्दल माझं तिनं हार्दिक अभिनंदन केलं व अशाच छानदार कलाकृति निर्माण करा अस प्रोत्साहनहि दिलं. पण मी जास्त बोलूं शकलों नाहीं. तिला वाटलं, असावं हा तरुण लाजाळू असावा पण तसं कांहीं नव्हतं. ती समोर दिसली की तिचा नकार आठवून बोलायची इच्छा असूनहि शब्द उमटेनासा होई.

पण थोड्याच दिवसांत तिच्याशीं न घाबरता बोलायची नी तिला दिग्दशन देण्याची संधि मला मिळाली. विनायकराव दिग्दर्शन करीत असलेल्या 'गजाभाऊ' या चित्रांत सुमती काम करीत होती. एक दिवस विनायकरावाना एकदम मुबईला जावं लागल आणि एका गाण्याचं चित्रिकरण करण्याचं काम त्यानी माझ्यावर सोपविलं. आणि आवश्यक त्या सूचना देऊन ते मुंबईला निघून गेले. दुसऱ्या दिवशीं मी

‘ नववसंत वैभव दरवळलें ! ’
आणि
या वसंताचें चित्त
विरघळलें !



सौ. सुमतिबाई, चि. मधू व वसंतराव

सेटवर गेलों. सुमती मेक अप करून तयार होती, आणि गाण्याचे शब्द होते. “ नवं वसंत वैभव दरवळलें ” वसंताची थोरवी मी समजाऊन सांगत होतों आणि सुमती मात्र सारखी हंसत होती. मला बुजल्यासारखं झालं.

“ अहो, असं हंसताय काय ! गाणं संपवायचं आज. ”

“ हो, संपवूंया न्. त्यांत काय आहे एवढं अवघड. ” सुमती पुन्हा हंसली. मी अधिकच बावरलों, नि गप्प राहिलों.

“ छे बुवा, फार मनाला लावून घेता तुम्ही. अहो, तुम्ही वसंताची थोरवी गात होता. मला माहित आहे वसंत, इतकीं कांहीं नको, आपल्याच तोंडानं थोरवी गायला! ” माझ्याकडं पाहून सुमती पुन्हा मनमुराद हंसली. मला जणूं चिडवायचा तिनं विडाच उचलला होता आज.

आणि मग माझ्या लक्षांत आलं कीं, माझं नांवच वसंत असल्यानं तिनं हें एवढं रामायण रचलं होतं. छे, अगदीं बुद्धू आहोंत आपण ! तिच्या बोलण्यांतील ही खोंच माझ्या लक्षांत येतांच मीहि मग दिलखुलास हंसलों. “ वसंत ऋतूचं ” गाणं. साऱ्या सेटवरच वसंतागमनाचा आगळा उत्साह पसरला होता. ! वसंताच्या त्या गाण्यानें आम्ही अगदी जवळ आलों आणि थोड्याच दिवसांनीं अशी एक घटना घडली कीं मात्र एक गाणं आठवलं “ धन्य तूंचि कांता ”-- अजूनहि मी हें गाणं आवडीनं गुणगुणतो.

सुमतीचा चित्रपटसृष्टींतील प्रवेश माझ्यापेक्षा अगोदर झाला होता, त्यामुळं तिच्या मताला वडिलकीचा मान प्राप्त झालेला आहे. पण रंगभूमीवर मात्र आम्हीं दोघांनीं बरोबरच पदार्पण केलं आहे. १९४९ सालीं मुंबई मराठी ग्रंथसंग्राहलयानं घडवून आणलेल्या नाट्यमहोत्सवांत पुष्कळ सिनेमा कलावंतांनीं नाट्यसृष्टींत पहिलं पाऊल टाकलं, त्यांत आम्ही दोघं होतों. ‘ लग्नाची बेडी ’ या नाटकांत कांचन आणि यामिनी या पती–पत्नीच्या भूमिका आम्हीं केल्या होत्या लोकांना त्या आवडल्या. प्रेक्षकांना रंगभूमीवर आम्हीं केलेल्या भूमिकांत जास्त गंमत वाटली. कारण त्यांना आमच्यांतील वैयक्तिक नातं माहित होतं.

सुमतीनं चित्रपटांत सोज्वळ आणि संस्कृति संवर्धक भूमिका केल्यामुळं प्रेक्षकांचा तिच्या बाबतींतला ग्रह अनुकूल आणि चांगला होता. आणि आजतागायत तो तसाच आहे. ती एक कष्टाळू कलावंत आहे आणि तिनें वठविलेल्या सर्व भूमिका स्वाभाविक आणि समंजस झाल्या आहेत. तिचा नवरा म्हणून मी हें लिहित नाहीं. माझ्याप्रमाणें अनेकांचं हेंच मत आहे. बायकोला कुठली गोष्ट तूं चांगली केलीस असं म्हणणं हें नवऱ्याच्या दृष्टीनं धोक्याचं असतं हें माहीत असूनहि मी हा धोका पत्करीत आहे याचं कारण सुमतीनं आजवर केलेल्या सर्वच भूमिका चांगल्या झालेल्या आहेत. तिला अभिनयाचं अंग चांगलं आहे. नि भूमिकेची समजहि तितकीच उत्तम आहे. ‘ऊनपाऊस’ या चित्रपटांत तिनें उभी केलेली म्हातारी म्हणजे तिच्या अभिनयाचा उच्चांक आहे. अगदीं अलिकडे तिनं ‘ क्षण आला भाग्याचा ’ मध्यें देवघर मास्तरांच्या पत्नीच्या भूमिकेंतहि असाच गहिरा रंग भरला आहे. या दोन्ही भूमिका श्री. राजा परांजपे यांच्यासारख्या एका सिद्धहस्त कलावंताबरोबर केलेल्या आहेत याला माझ्या दृष्टीनं अधिक महत्त्व आहे.

रंगभूमीवर सुमतीनं आजवर ज्या भूमिका केल्या व आजहि ती ज्या करीत आहे त्यांत मला अत्यंत आवडणाऱ्या भूमिका दोन. ‘ सौभद्र’मधील रुक्मिणी व ‘ संशयकल्लोळ ’ मधील कृत्तिका. तिची कृत्तिका अगदींच वेगळी आहे. ही सरळ स्वभवाची फटकळ तोंडाची नहांबाज आणि भांडखोरबाई सुमती चांगली रंगवते. अगदीं सजीव, सचेतन स्वरूपांत.

‘ तुमच्या स्वभावधर्माच्या विरुद्ध असलेली ही भूमिका सुमतीबाई तुम्ही किती चांगल्या करतां नाहीं ? ’ असं खूप लोक तिच्याजवळ बोलतात. मलाहि सांगतात. मीं तें ऐकलं आहे. आजहि अनेकदां ऐकतो पण या वादग्रस्त विषयावर बोलणं धोक्याचं असल्यामुळं मी केवळ मान डोलावण्यापलिकडं कांहींच करीत नाहीं. प्रेक्षक म्हणून तिच्या या सर्व भूमिका मलाहि आवडतात. मनाला वेगळा आनंद देऊन जातात, पण त्याहिपेक्षां छान भूमिका ती आमच्या घरीं वठवते आणि



**ही आमच्या सौंची पंचवार्षिक योजना !**

ती म्हणजे गृहिणीची. आणि या तिच्या आगळया भूमिकेवर आपण आजतागायत निहायत खुष आहोंत बुवा !

एकाच व्यवसायांत असून माझ्या चित्रपटांत तिनं फार कमी वेळां काम केलं आहे. एका दृष्टीनं तें चांगलं आहे, त्यामुळं आमच्या कामाला ठराविकपणाची झांक मुळींच वाटत नाहीं. 'साखरपुडा' या चित्रपटांत तिनें मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणीची भूमिका केली होती. तो चित्रपट मींच दिग्दर्शित केला होता आणि समंजस कलावंत, दिग्दर्शकाची जबाबदारी किती तऱ्हेनें हलकी करूं शकतो याचा अनुभव मला सुमतीच्या सहकार्यामुळं आला. लग्न झाल्यानंतर गृहिणी आणि माता या भूमिकांना सुमतीनं प्राधान्य दिलं आणि त्यामुळं तिच्या व्यावसायिक भूमिकांना साहजिकच दुय्यम स्थान प्राप्त झालं.

संसार आणि चंदा, मीरा आणि मधु यांचं संगोपन विस्कळित होऊं नये, माझ्या देखभालींत खंड पडूं नये म्हणून तिनें पुष्कळ चित्रपटांतील आणि नाटकांतील कामं नाकारलीं हें मला ठाऊक आहे. पुष्कळ दिवसांनंतर 'भाग्यलक्ष्मी' आणि 'क्षण आला भाग्याचा' या या चित्रपटांत तिनें भूमिका केल्या आणि त्या भूमिकांचा खूपच बोलबाला झाला आहे. अनेक ओळखीचे लोक 'सुमतीबाई, तुम्हीं काम केलेला प्रत्येक चित्रपट आणि नाटक पाहून आम्हांला आनंद वाटतो, समाधान होतं; तरी तुम्ही आमच्यासाठीं कामं सोडूं नका !' असं सांगतात. यांतच तिची लोकप्रियता नि अभिनयनैपुण्य दिसून येतं

आमचं कौटुंबिक आयुष्य चांगलं आहे. अगदीं दृष्ट लागावं इतकं सुरेख आहे. आणि याचं कारण आम्ही दोघं आमच्या घराबद्दल, मुलींबद्दल आणि आमच्यावर असलेल्या जबाबदारीबद्दल जागरूक आहोंत. वास्तविक आम्हां दोघांच्या स्वभावाच्या ठेवणींत भरपूर विरोध आहे. त्यामुळं कधीं कधीं भांडणांत बायका कुणाला हार जाणार नाहींत पण आम्हां दोघांना शोकांतिकेपेक्षां आनंदी शेवटच अधिक आवडत असल्यामुळं भांडणाचें धुकें क्षणार्धांत वितळून जातें नि फिरून आम्ही मनमोकळेपणानं गप्पांत रंगतो, थट्टा मस्करी करण्यांत गुंगून जातों आमच्या मुलाबाळांसमवेत. चित्रपट निर्मिति आजकाल अतिशय कठिण व दगदगीची होऊन बसली आहे, त्यामुळं पुष्कळ वेळां मी हवालदिल होतों. आणि अशावेळीं माझा सर्वांत मोठा सोबती असतो माझी सुशील पत्नी सुमतीच. तीच मला धीर देते. मी उगाच घाबरून गेलों आहे हें मनोमन पटविते आणि माझं खचूं पहात असलेलं धैर्य पुन्हा माझ्यांत उभं करते, आणि मग उद्भवलेल्या अडचणींना तिच्याच सहकार्यानें पर्याय शोधून मी वेळ निभावून नेतों. फिरून जोमानें कार्याला प्रारंभ करतो. गृहिणी सचिवः मित्रः या उक्तीचा अनुभव मला सुमतीच्या सहवासांत अनेकदां मिळतो.

आमची मोठी मुलगी मीरा यंदा मॅट्रिकला बसणार आहे. ती पुढं शिक्षण चालूं ठेवणार कीं आई वडिलांनीं अंगिकारल्या व्यवसायांत शिरणार याबद्दल आतांच कांहीं सांगतां येणार नाहीं. विश्वविद्यालयीन शिक्षण घ्यायची तिची इच्छा असल्यास आम्ही तिला तें शिक्षण निश्चित देऊं. दुसरी मुलगी माधुरी चित्रं चांगलीं काढते. मुलांच्या आवडी निवडींना प्रोत्साहन देणं आणि त्यांना मदत करणं हें मातापित्यांचं पहिलं कर्तव्य आहे. मुलांच्या अंगीं असलेल्या गुणांना योग्य वळण लागलंच पाहिजे असा त्यांच्या आईचा आग्रह आहे. मुलींच्या संगोपनासाठीं सुमतीनें तिच्या व्यवसाय-क्षेत्राला मर्यादा घातली आहे पण त्या मोठ्या झाल्या, त्यांना समजायला लागल्यावर सुमती आतां पुन्हा चित्रपट-नाटकांतून कामं करायला लागली आहे. कारण, अभिनय आणि नाट्य याबद्दलची तिची आसक्ति अजूनहि कायम आहे. आपल्या वयाला न शोभणाऱ्या भूमिका कलावंतांनीं करूं नयेत असं तिचं प्रामाणिक मत आहे. आणि त्या मताप्रमाणं वागायचा प्रामाणिकपणा ती नेहमींच दाखविते.

पत्नी आणि माता या जबाबदाऱ्या बरोबरच तिच्यावर गृहिणीची मोठी जबाबदारी आहे आमचं कुटुंब आणि मित्र परिवार मोठा आहे. आणि येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अतिथ्यांत कांहींहि कमतरता पडूं नये यावद्दल सुमती अतिशय दक्ष आणि जागरूक असते. आम्हांला नवे नवे पदार्थ करून खाऊ घालण्यांत (अगदीं आग्रह करून) तिला अत्यंतिक आनंद लाभतो. चित्रपट-व्यवसायांतील अनिश्चित, अनियमित, अस्थिर आणि अज्ञात आयुष्यांतसुद्धां सुख समाधान कायम राखण्याचं कठिण काम सुमती आमच्या घरांत, माझ्या जीवनांत अव्याहत करीत असते. एक प्रामाणिक कलावंत, आदर्श माता, कर्तव्यदक्ष पत्नी यापेक्षांहि ती एक समंजस मैत्रिण आहे आणि म्हणूनच १९ वर्षांच्या संसारांत मला आठवलेल्या काव्यपंक्ति अजूनहि माझ्या तोंडीं येतात. "धन्य तूंचि कांता !"



शून्यांतून नवें जग
आकार करणारे
यशस्वी उद्योगपति

## श्री. गोगटे



श्री. गोगटे व सौ. उषाताई

माझ्या सर्व नातेवाईकांची, आणि परिचित व्यक्तींची माझ्याबद्दलची एकच प्रमुख तक्रार असते आणि ती म्हणजे मी त्यांच्या वांट्याला फारच थोडा वेळ येतों-जवळजवळ येतच नाहीं म्हणा ना! आणि ही त्यांची तक्रार खरोखरच रास्त आहे. माझ्या व्यवसायामुळें सतत मला बाहेरगांवीं रहावे लागते. महिन्यांतून जवळ जवळ २५ दिवस मी बाहेरगांवी हिंडत असतो. अशा वेळीं या हिंडण्यांतून माझ्या सर्व महत्त्वाकांक्षा पुऱ्या करण्याचा आनंद मला मिळत असला तरी एक टोचणी मात्र सदैव असते आणि ती टोचणी म्हणजे माझी पत्नी उषा हिच्या मन:स्थितीबद्दल ! अचानक मी बेळगांवला जाऊन उभा रहातो आणि मग उषाला जो कांहीं आनंद होतो त्यांचें वर्णन करणेंच शक्य नाहीं. तिची अगदीं धांवपळ उडून जाते. परंतु त्या आनंदावर अगदीं अल्पावकाशांत माझ्या उद्गारामुळें विरजण पडते. "मला उद्यां दिल्लीला एक अत्यंत महत्वाची मिटिंग आहे. तेव्हां आज रात्रीच्या प्लेननें मला जायलाच पाहिजें !" तिचा चेहरा खर्‌किनी उतरतो. तिला वाटत असते कीं, मी निदान दोन-चार दिवस तरी बेळगांवमध्यें स्वस्थपणानें राहीन म्हणून ! पण छे ! गेल्या आठ-दहा वर्षांत तर मला स्वस्थपणा म्हणून कसा तो ठाऊक नाहीं !! अर्थात अलिकडे माझी ही धांवाधांव सर्वांच्या अंगवळणी पडली आहे. उषाच्या बाबतींतहि हेंच म्हटलें पाहिजे.

पण लग्नानंतर कांहीं वर्षें तर ती अशी रागवायची कीं, कांहीं विचारूं नका ! तिची आणि माझी विवाहापूर्वीपासूनच ओळख होती. मग दोघेहि एकमेकांना अनुकूल असल्यावर अन्य लोकांनीं विरोध केला, आडकाठी केली तरी अडचण ती कोणती यावी ? माझ्यासारख्या एका वकिलाची उषा पत्नी झाली. माझी वकिली जरी बरी चालत असली तरी तेवढ्याच गोष्टीवर स्वस्थ बसणें मला पसंत नव्हतें. कांहींतरी धडपड करून पुढें यावें हीच इच्छा फार जबर होती. अर्थात वकिली करून किंवा नोकरी करून ती सफल कशी व्हावी ? त्यासाठीं धडपड हवी होती, कष्ट हवे होते. कांहीं Risk घ्यायची तयारी ठेवायला पाहिजे होती. आणि उषाला तर या कोणत्याच गोष्टीची प्रथम कल्पना नव्हती. अगदीं निरागस होती ! तिला एवढेंच माहीत होतें कीं, मीं मोठें व्हावें अगदीं खूप मोठें व्हावें ! फक्त त्याचे मार्ग तिला ठाऊक नव्हते. त्यामधील कष्ट तिला कळत नव्हतें. परंतु मीं तें तिला नीट उलगडून सांगतांच साऱ्या गोष्टीला ती बिनतक्रार कबूल झाली. मला तत्काळ पाठिंबा दिला. मग मीं कामानिमित्त परगांवीं जाऊं लागलों. रुसणे तिनें सोडून दिलें. उलट "तुम्हीं खुशाल बाहेर जा मी तुमचीं इथलीं कामें मोठ्या आनंदानें आणि जबाबदारीनें पार पाडीन" असें आश्वासन देऊन माझा त्रास हलका करण्यासाठीं तिनें कंबरच बांधली. मल नवीन नवीन गोष्टी स्वीकारण्यासाठीं उद्युक्त करूं लागली.

त्यावेळीं बेळगांवला खाजगी बस सर्व्हिसचा धंदा जोरांत चालूं होता. मात्र त्यामध्यें एकोपा म्हणा किंवा शिस्त म्हणा कोणतीच दिसत नसे. आपसांतली चुरस आणि हेवेदावे यांमुळें कित्येक वेळां त्यांचा नाशहि होत असे. त्यांनीं माझा वकिली सल्ला घेतला. पण मी त्यांच्यांत भांडणे लावण्याऐवजीं त्यांना एकत्र कसें आणता येईल. हें पाहूं लागलों. मोटार मालकांची युनियन घडविली. त्यामध्यें दोघांचाहि फायदा झाला. त्यामुळें त्यांतूनच 'मोटर ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं.' काढली. दोनहि गोष्टी मोठ्या जोरांत चालूं लागल्या. उषाहि वारंवार मला कामाचा व्याप अधिकाधिक वाढावा यासाठीं उद्युक्त करूं लागली. परंतु माझें हें यश निष्ठुर दैवाला पाहवलें नाहीं. बस कंपन्यांचे आणि विमा कंपन्यांचे राष्ट्रीयकरण झालें. माझा सारा उत्साह नष्ट झाला. मी हतबुद्धच झालों. परंतु माझा एक सहकारी मात्र खंबीरपणें उभा होता. आणि ती म्हणजे उषा! ती मला म्हणाली, "तुम्ही कांहीं व्यसनांत पैसे घालविले नाहींत, किंवा कांहीं शौकहि केला नाहींत ! मग एवढें वाईट कां वाटून घेतां !! दुसरा कांहीं उद्योग शोधा !!" माझ्या खिन्न मनाला पुन्हा एकदा चालना मिळाली.

मीं बर्फाची फक्टरी काढली. त्याची मुख्य निर्यात होती-कारवारला ! परंतु तो कशासाठीं जातों हें मात्र मला कोडेंच होतें अखेर कळलें कीं, मासे गोठविण्सासाठीं याचा उपयोग होतो. माझें लक्ष

तिकडहि गेलें. मीं अधिक विचार करताच इंग्लंडमध्यें असेच कांहीं संशोधन चालू असल्याचें कळलें तेव्हा इंग्लंडमध्यें गेलो. तेथे या धंद्याला यश प्राप्त होणार होतें, तेव्हां मला काय मिळणार? खिन्न मनाने मी परत फिरलो. मात्र येतांना जर्मनीला सहज भेट दिली. घरीं आलों तर तीच खिन्नता! तोच उद्वेग!! उषा मात्र शांत होती पुन्हा तेच उद्गार काढून म्हणाली, "पहा काहीं कल्पना सुचते कां?" आणि मगे मात्र मी एक धाडसी प्रयोग करून पहाण्याचें ठरविलें. जर्मनीत 'क्राचे' कारखाने पाहिले होते. त्याचप्रमाणें "आपणहि काहीं खाणधद्यांत लक्ष घातले तर?" पण मागील सारे पराभव डोळ्यापुढें येत. मन नवीन कार्याला तयार होत नसे. पण लगेच उषाचे ते प्रेरक शब्द आठवत. तिचा उत्साह आठवे. क्वचित मनात येत असे "ह्यापेक्षां नोकरी केली असती तर" पण छें! ती महत्वाकांक्षा, ते मनोरथ! मग एकदम निश्चय करून लोढा वगैरे भागांत मॅंगेनिजच्या खाणी सुरूं केल्या. मग मात्र दैव माझ्यावर प्रसन्न झालें. उषाच्या शब्दाना यश आले. खाणधंदा फायदेशीर ठरूं लागला. माझी सारी जिद्द, महत्वाकांक्षा पणाला लावण्यासाठीं आज हा धंदा कमालीचा उपयुक्त ठरला आहे. माझें कार्यक्षेत्र वाढले आहे. माझी मनीषा पूर्ण झाली आहे.

अर्थात मला त्रासहि तितकाच सोसावा लागला. पूर्वी ज्या धंद्यांत म्हणून मी प्रवेश करीत असे तो धंदा हटकून अयशस्वी होत असे. जरा कुठें आशेचा किरण दिसतो तोच अंधकार पसरूं लागे. दर तीन वर्षांनीं धंदा बदलला. पण उषा मात्र बदलली नाहीं की तिचा हंसरा चेहरा, ते स्फूर्तिदायक प्रेमळ शब्द फिरले नाहीत. कधीहि संताप नाहीं कीं उद्वेग नाही. प्रथम प्रथम वाटत असें की, अशा धंद्यांतील प्रश्नांत ही काय मला सुचविणार? हिला काय कळणार? पण तिची झेप मोठी होती. ती म्हणे, "मी जरुर सारे समजावून घेईन." याच बुद्धीनें मला मोठ्या आस्थापूर्वक बारकाईनें जरूर ती मदत करीत असे म्हणत असे, "ह्या अपयशानें आपणाला नवीन नवीन अनुभव तर येत आहेत? कदाचित् यांतूनच पुढील उत्कर्षाचा पाया असेल? आपण प्रथम श्रीमंत असून मागाहून जर अयशस्वी होतों तर होणारें दु:ख असह्य आहे पण तशी स्थिति कधीच येणार नाहीं," खरोखर माझी स्थिति अर्जुनासारखी झाली होती. हें करावें कां तें करावें हा प्रश्न मला वारंवार पडे आणि अशा प्रसंगीं तिनेंच मला धीर देऊन योग्य मार्गाला प्रवृत्त केलें आणि म्हणून मी आज हे दिवस पहात आहे. एरव्ही नोकरी—छे नकोच तें! माझ्या साऱ्या महत्वाकांक्षेचा सर्वांत मोठा पराजय होता तो! मात्र तो कदापि झाला नाहीं हेंच भाग्य आणि तोसुद्धां उषामुळेंच!

माझ्या धद्यात मला खोट बसू लागली तसे लोक मला हिणवूं लागले, अनेकजण माझ्याबद्दल वाईट बोलूं लागले. अशा वेळीं पुरुषांपेक्षां स्त्रियाच जास्त चिडतात, पण उषानें कधीं कोणाला वाईट म्हटलेलें किंवा तोडून टाकलेलें मला आठवत नाहीं. सर्व लोक जोडून ठेवलें. त्याचमुळें हे टीका करणारे लोकहि आज माझे मित्र बनले आहेत. माझा परिवार वाढला आहे.

लग्नानंतर उषानें आपलें अपुरें शिक्षण पूर्ण केलें असून हल्लीं माझ्या बेळगांवच्या ऑफिसची सारी व्यवस्था तीच पहाते. आला गेला, पै पाहुणा, सर्व व्यवस्था जणू एकाद्या पुरुषाच्या कर्तबगारींतून पहाते. मी बेळगावला जातो तो जणूं काहीं तिचा पाहुणा म्हणूनच! माझ्या ऑफीसमध्यें काहीं गोंधळ असेल, अव्यवस्था असेल अशी काळजी-देखील मला नसते. फक्त जाऊन मी नवीन कामाची तिला सूचना देतों आणि स्वस्थपणा मिळाल्यास राहून परत फिरतो. तेथील सर्व कारभार अगदीं सुरळीत चालू आहे. याच जोडीला ती एक दुसरी व्यवस्था मोठ्या खुबीनें सभाळीत आहे आणि ती म्हणजे मुलांची देखभाल! त्यांचें शिक्षण, त्यांच्या हालचाली या सर्व गोष्टींवर तिचें बारकाईनें लक्ष असतें. म्हणूनच मला घरचीहि व्याधी नाही. त्यामध्यें मी गुरफटलों असतो म्हणजे मला हा व्याप वाढविता आला नसता. त्याबाबतीत मी अगदी निष्काळजी आहे. उषा सर्वांवर योग्य ती नजर ठेवते. दररोज मी कुठेंहि असलों तरी फोनवरून सर्व कामाचा रिपोर्ट सादर करते, पुढील सूचनाहि देते. अशी ही माझी खाजगी चिटणीसच आहे म्हणा ना?

म्हणूनच असे म्हणता येईल की, मी आज जो उभा आहे. त्याला निम्म्याहून अधिक कारण म्हणजे माझी सुविद्य, सुशील पत्नी उषाच होय!

मला सदैव प्रेरणा देणारी उषा स्वत:च्याबाबतहि कांहीं कमी महत्वाकांक्षी नाही. आज माझी पत्नी म्हणवून घेण्यांत तिला जरी धन्यता वाटत असली, ती आनदी असली तरी स्वत:हि कांही नांव घेण्याजोगें कार्य करावें, गोगटे यांची पत्नी म्हणून मान्यवर होण्या-ऐवजी उषा गोगटे या नावानें लोकप्रिय व्हावे अशी तिची जबर इच्छा आहे. त्या दृष्टीनें तिनें मध्यतरी एकटीनेंच जपानचा दौरा केला. तेथें अडचणींत सांपडलेल्या स्त्रियांसाठीं उभारलेल्या वेगवेगळ्या कार्याचा तिनें बारकाईनें अभ्यास केला आहे. अशाच तऱ्हेचें भारतांतहि असेंच कांहीं कार्य करावें असें तिच्या मनानें घेतलें आहे. त्या दृष्टीनें तिनें प्रयत्नहि सुरूं केले आहेत. फुरसतीच्या काळांत स्वस्थ बसण्याऐवजी काहीं लोकोपयोगी कार्य करावें हा त्यामागील हेतु आहे. याचबरोबर तिनें आपल्या अगच्या वक्तृत्व गुणानाहि योग्य तऱ्हेनें वळण लावण्यास सुरुवात केली असून हल्लीं योग्य तयारीनें ती उत्कृष्ट व्याख्यानेंहि देऊं शकतें. तिचा दुसरा उल्लेखनीय गुण म्हणजे गानकला! तिला लाभलेल्या गोड गळयाचा ती फार चांगल्या तऱ्हेने फायदा उठवीत आहे. शास्त्रीय गाण्यांत तिने वाखाणणी करण्याजोगी प्रगति केली आहे. नुकताच माननीय मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या घरीं गणपतीमध्यें तिचा गाण्याचा कार्यक्रम करण्यांत आला. आणि त्याची सर्वांनी फारच वाखाखणी केली होती. याचप्रकारें असेच कांहीं जलसे झाले. तिच्या कार्यक्रमाबद्दल मात्र लोकांची सदैव एकच तक्रार असते. ती सदैव शास्त्रीय संगीताचा आग्रह धरून बसते "लाईट म्युझिक" किंवा लोकप्रिय नाटचगीतें ती कदापि न म्हणत नाहीं. म्हणूनच तें संगीतहि या जोडीला तिच्या गळ्याबाहेर पडले तर आम्हाला तिच्याबद्दल खचितच धन्यता वाटेल.

असा हा माझा जीवनाचा जोडीदार आहे. समजूतदार, समाधानी पण तितकाच महत्वाकांक्षी. मीं सदैव नव्या नव्या उद्योगात गुरफटून घ्यावे असाच तिचा आग्रह असतो. त्यावेळीं मला वाटते, पूर्वी मी जरा कुठें बाहेरगांवी राहिलो, चार नव्या कामांत सतत मग्न झालों तर फुरंगटून जाणारी उषा ती हीच कां? एकदां तिने सर्व परिस्थिती ध्यानात आणली आणि मग तीच रुसणारी फुगणारी, उषा आज माझी स्फूर्तिदात्री ठरली आहे. मग मला धन्य वाटते. आणि मग तिचा वाटा तिला देण्याच्या दृष्टीनें म्हणावेसे वाटतें "धन्य तूचि कांता!"

●●●

## कवि मनमोहन

" कवितेच्या कागदावर शाईच्या रेघोटचा कुणीं मारून ठेवल्यात. अरुण तूं कां ?... उदय तूं असशील...हें काय आहे...? कधीं नव्हें ती मीं कविता लिहायला घेतली...तुम्हांला एवढं कळत नाहीं..."

" बाबासाहेब, तुमच्या लिहायच्या खोलींत कोणी गेले नव्हतें..."

" मग काय या उघडचा गज बसविलेल्या खिडकींतून कुणी उनाड पोरगा..."

" कुठं–काय झालं... बघूं...?"

" हा बघ–" मी माझी मोठी मुलगी पुष्पा हिला तो शाईच्या उभ्या आडव्या, लहानसं कोंबडीचं पिल्लूं नाचल्यासारख्या रेघोटचा उठलेला कागद दाखविला––

" तुमच्याच दौतींत काडचा बुडवून कुणींतरी हा खेळ केलेला दिसतो. ' मग स्वतःची खात्री झाल्यावर ती लहानग्या उदयकडे पहात म्हणाली, " उदय– तूंच केले असशील. बघूं तुझे हात... शाईचे डाग आहेत का त्याच्यावर...नाहींत..." आतां सहा वर्षांच्या उदयला अवहिमी म्हणून सोडल्यानंतर तिनें त्याच्याहून दोन वर्षांनें वडील असलेल्या साधनेला तोच प्रश्न केला. आणि तिचे हातहि पाहिले. साऱ्यांनाच तिनें माझ्यासाठीं असे तपासले. आणि नंतर मला आपला ज्यूरी–निकाल सांगितला. कीं तुमच्या कवितेच्या कागदांवर या ज्या गिचमीड अक्षरासारख्या रेघोटचा उठविल्या आहेत त्याला मुलांपैकीं कोण जबाबदार नाहीं.

मीं सरळ तो डागाळलेला कवितेचा कागद बास्केटमध्यें रागानें टाकून दिला आणि...

आतां मुलें आनंदानें दूर गेलीं होतीं. मीं पुन्हा कविता लिहावयास सुरुवात केली. संध्याकाळ होती. माझें टेबल ज्या खिडकीसमोर आहे तेथून संध्येचे सोनेरी किरण एका सिताफळीच्या झाडाच्या 'हिरव्या' चाळणींतून माझ्या अंगावर, दौतीवर... कागदावर पडत आहेत...

आजची तारीख १५ आहे.

महिना......

तारखेसारखाच माझ्या हृदयावर कोरलेला आहे. डिसेंबर आणि वर्ष......

याला ख्रिस्ताला निर्वाणाला जाऊन १९५५ वर्षें उलटलीं असें म्हणतात.

आधीं लिहून झालेल्या कवितेच्या ओळी मी पुन्हां आठवून किंवा अधिक चांगल्या करून लिहितों आहे. लिहूं पहातों आहे, कविता लिहावयास घेतलेला टाक आतां मोठ्या तोंडाच्या उघडचा दौतींत बुडवतों आहे.

या दौतीचें झांकण हरवलें आहे. रोज या दौतींतली शाई त्यामुळें घट्ट होतें. मी थोडें पाणी सकाळीं टाकतों... मग शाई पातळ होतें... एखाद्या फुलझाडासारखें मग ती माझ्या टाकांत... कलमांत रंग... रस...गंध ओतूं लागते.

आजची कविता...माझ्या मृत पत्नीवर लिहिणार आहे. आज तिला जाऊन बरोबर तिनशेपासष्ट दिवस झाले...एक वर्ष झालें.

एक वर्ष झालें...! बारा महिने झाले...! भावुकतेनें तिच्यावर मी



वृंदावनांतील तुळस जळाली.

कविता लिहितों आहे. आज या सबंध बारा महिन्यांत मी प्रथमच कविता लिहितो आहे.

मी आतां लिहूं लागलों आहे. परंतु थांबतो आहे. टाकावर माझा वजन आहे...धाक आहे... तोपर्यंत मी तो कागदांवर टेकतच नाहीं.

थांबणें कांहीं आतां जाचक होत नाहीं... नुसते खिडकींतून... संध्यारंग दाखविणाऱ्या या क्षितिजापलीकडे पहाणेंदेखील बालकवींची अप्रसिद्ध कविता वाचण्यासारखें आहे. आणि दुधांत साखर असावी तसे गेले चार महिने त्यावर येऊन बसणाऱ्या एका रंगीबेरंगी लहानशा, नाचऱ्या, हंसऱ्या गोजऱ्या चिमणीनें तर डोळ्यांसाठीं अगदीं बहार उडवून दिली आहे.

आतांहि आमच्या परिचित चिमणाराजे तेथें आल्या आहेत. तिचें अंग– पिसें म्हणजे गम्मत आहे. कांचेच्या पैलूदार भिंगांतूनच आपण तिला पाहतों आहों असें मला वाटतें आहे. दोन जाईच्या कळचा, डोकें. पोटावर, जास्वंदीच्या अडीच कळचा कंठावर, गुलाबाच्या पावणेचार कळचा पंखावर, अबोलीच्या सव्वा कळचा चोंचीवर, बकुळीची अर्धी कळी डोळ्यावर असा हा सगळा या मऊ मखमली रेशमी पिसांच्या' बारीक पटकांचा कांगावा आहे. मला वाटतें, इंद्रधनुष्याच्या तुषारांत तर ही आपलीं पिसें बुडवून येत नाहीं ना ?

माझ्या खिडकीकडे ती आतां पाहते आहे. हे रोजचेंच आहे...कांहीं वेळानें ती आतां माझ्याकडे पाहूं लागेल. चोंच उलगडेल...

'मला आपले वाटतें ती हंसते आहे... मागें एकदां रुसलेली मीं तिला पाहिलीं...

टाकावरचा माझा दाब आतां तिच्याकडे पहाता पहाता सुटला आहे...

कागदावर हृदयस्थ पत्नी विरहव्यथेचा नकाशा उलगडूं लागली आहे...

लिहिलें जात असतांना मी हळूंच त्या चिमणीकडे बघतो आहे.

ती नाचते आहे...लाजते आहे...या डहाळीवरून त्या डहाळीवर खेळत आहे...

*डोळयांतल्या बाहुल्यानींच* रंगपंचमीचा खेळ मांडल्यासारखे ती इकडची तिकडे उडाली कीं, ' बारिक आकाराची राधा ' नाना रंग मिश्रणानें भरलेली पिचकारी कुणालातरी 'मारो' म्हणते असें वाटतें आहे. आणि तिकडून इकडे उडाली कीं, इवलासा श्यामच आपल्या शुभ्र शालीवरले सप्तरंगांचे शिडकावे दाखवत लहानग्याच राधेला 'पिचकारीचा खेळ पुरे आतां' असें विनवीत आहे असें भासत आहे...

चच्या भाषेखेरीज, चिंवचिवण्याखेरीज तिला काहीं येत नाही असें वाटतें. अनुभव तरी असा आहे. कविता कशी आहे ती आतां मी स्वतःच भयग्रस्तपणानें वाचतो आहे. मनांतल्या मनांत वाचायला सुरुवातहि केली आहे...ध्रुवपद तर ठीक आहे....चागलें आहे... वेस्ट पेपर बास्केटमधली याच विषयावरलीं पहिलीं चमत्कारिक टिंबें... ठिपके...रेघोट्या रेखाटल्यामुळें मीं फेंकून दिलेली कविता...या कवितेपुढें ती कविताच नाहीं असें वाटतें...

मी मनांतल्यामनांत त्या पहिल्या कागद खराब करणाऱ्या अज्ञात व्यक्तीचे आभार मानतो आहे. हा खोटा मोठेपणा प्राप्त झाल्यापासून कवितेला ' लहानपणा ' सांगायला कोणी चांगलीं माणसें धजत नाहीत बऱ्याच वर्षांच्या संबंधांमुळें संपादक मला आपल्या घरांतलाच माणूस समजतात...

मी मनांतल्या मनांत वाचूं लागलेलें या सुरगी चिमणीला रुचत नाहीसें दिसतें. उन्हांतला जिन्नस सांवलींत पहावा तसें तिचें, क्षणापूर्वीं सतेजतेनें, पिसापिसांवर स्वतःच एका तर्रर्रर्ररपणानें वागडत आहेत असें वाटणारे गर्द हिरवे पिवळे रंग एकदम निस्तेज झाल्यासारखे आतां दिसत आहेत. मनांतल्या मनांत काय आणि पुटपुटणें काय सारखेंच. मीं आतां पुटपुटूं लागले आहे... तिचे अंगरंग आतां पुन्हा ग्रहणांतुन 'वेधाचे' छायेचे बारीक शर पिसापिसारून झटकून टाकल्याप्रमाणें झळाळू लागले. आतां डहाळीवरच ती डोलू लागली आहे. माझ्या दोन ओठाच्या हालचालीनंतरच ती लंबकासारखी डोलूं लागली...मी आतां पुटपुटण्यापेक्षां पुष्कळच मोठ्या आवाजांत कविता वाचत आहे. तिला ऐकूं जाण्यास आतां कांहीच प्रत्यवाय नाहीं. मुशायऱ्यांत माझा हा आवाज वीस-पंचवीस फुटांपर्यंत नेटका ऐकूं जातो. ही सुरगी...चिटुकली...मिटुकली...चिटुकली चिमा चर चाचच चुटाचर चाहे...

वरील शेवटलें वाक्य मी कांहींतरी चुकीचेंच चोललों चाहे.

चिचणी चाचते आहे...चिमणी चाचते आहे...चिमणी नाचते आहे...ठीक ठीक हें असें खुळे केलें आहे...चिमणीमय मन होऊन चेले ची चसें चोतें...असेंच होतें...मी चचिता चोठ्यानें चणतो आहे ची-चैचते चाहे...ती ऐकते आहे... ठीक...चविता चो...कविता मोठ्यानें... म्हणतो आहे..ठीक...ती ऐकते आहे...ठीक जमलें.

परतु या अधराची चोंच नाही झाली म्हणजे मिळवली...

ती आतां आपले पंख पालवत खिडकीच्या गजाच्या खोबणीवरच येऊन बसली. कटाळवाण्या स्वप्नातल्या थकल्या उंटाचे पाय जागृतींतल्या कलिंगडाच्या वेलीत सापडावें तसें...

चाय चोचन चाय-चोबण-काय-चोमन काय मोहन...तिची चोंच हलते आहे. ती आतां माझ्याकडे पहात आहे. तिच्या नख्यांना आतां शाई लागलेली मला दिसते आहे.

या बाईसाहेब खिडकीतून चात चाल्या वाचि चाझी चिविता चराब चरून चेल्या.

मीं मुलावर उगीचच सशय घेतला. हीच खिडकीतून आली आणि कविता खराब करून गेली. परंतु केलें तें रसिक टीकाकरानें कवीबद्दल आस्था वाटून करावें तसेंच केले...अजाणतां केले काय ?

आतां तर तिने खिडकीहि सोडली आहे...ती आतां माझ्या तळहातावरल्या कवितेच्या कागदावर येऊन बसली आहे...अगदीं कांटेकोर सागायचें म्हणजे तिच्या बसण्यानें झांकलेले शब्द ' वृन्दावनांतील तुळस ' असें आहेत. ध्रुपदांतला जळाली हा शेवटला शब्द मला दिसतो आहे...खालच्या ओळींपैकी तिच्या मानेखालीं अंतऱ्यांतल्या बारीक तीन ओळीतलें ' घर उरलें ' श्वसन उरे, ' उरांत माझ्या ' हे शब्द झांकले गेले आहेत...

" वी चाचून चाखऊ चाय ? " मी तिला विचारतो आहे. वाचून दाखविली तर अशा हुशार पांखराला न समजण्यासारखें या विरहगीतांत कांही नाहीं...

" चाचव ! चाचव ! " तिच्या डोळयांत आतां कौतुकाचें स्निग्ध हासू आहे...

*माझे ओठ आतां हलूं लागलें...*

वृंदावनांतील तुळस जळाली...
मागें उरल्या दगड विटा ।। ध्रु ।।
घर उरलें पण फुटे उंबरा
श्वसन उरे पण थिजला वारा
उरांत माझ्या तुटल्या तारा
अर्घ्या आभाळांतुनि अवचित । मागें फिरला कां सविता ? ।
वृंदावनांतील तुळस जळाली । मागें उरल्या दगड विटा ।। १ ।।
अर्घ्य उचलतां प्रीत तिरांतुनि !
हाय ! किनारा जाइ दुभंगूनि
पापणिच्या या लक्ष भुजांतुनि
भरते हिरवे विल्वर काळिज कासारिण आतां ।
वृंदावनांतील तुळस जळाली । मागें उरल्या दगड विटा ।। २ ।।
एकच होता एकच होता
माझ्या या कवितांचा श्रोता
जीवनांत या जीव न आतां
छाया ठेवूनि आगे मागें प्रकृतीला कां ये जाता ? ।
वृंदावनांतील तुळस जळाली । मागें उरल्या दगड विटा ।। ३ ।।

" सपली. " मी तिला म्हणालो.

" चेवच होता ना ! "

" होय एकच होता...! तीच एकटी खरा श्रोता होती. सूतापुढें शौनकादिकानें असावें तसे...ती होती... "

" एकच...एकच होता... " चोच हलली.

" होय... "

" मीच... "

" काय... ? "

" होय मीच... "

" तूं... ? "

यावर उत्तर द्यायच्याऐवजीं तिनें कवितेच्या कागदावरून माझ्या मानेवर उडी घेतली. आणि चोंच माझ्या ओठांवर ठेवली.

" शोभा... ? "

"काय... ?"

हळूवार...नाजूक हातानें मी माझ्या ओंजळींत तिला स्वतःचाच पापण्यांच्या सैल पणाने निसटलेला डोळा धरावा तसें अलगद धरले.

"उदय–" मी ओरडलों. "पुष्पा–" मी ओरडलों..." प्रमोद" मी ओरडलो— साधना..." मी ओरडलों...

या प्रत्येक नामोच्चाराबरोबर ती हर्षभरीत होऊन पखाची उघड-झांप करे.

मुलें खेळायला गेली होती...दूर होतीं...कुणी आलीं नाहींत...

"मी रोज पहाते...भेटते...तीं मला ओळखतात. मी त्यांना ओळखतें.. फक्त तुलाच माझी ओळख पटायला इतके महिने जावें लागलें. खुळा आहेस तू..."

"आहे खरा...आहे...खरा" नतर मी तिच्या डोळ्यांना डोळे चिकटवून म्हणालों,... "होतीस तशी आली असतीस तर...तर..." मीं माझे ओठ तिच्या चोंचीवर ठेवले... "काय तरी!... मी पुटपुटलों...पुन्हा तिचा मुका घेतला..." काय दिवस गेले...एक वर्ष झालें...

"बरोबर वर्ष झाले..."

"बरोबर वर्ष झाले.." दुसरें कांहीं बोलायला सुचेना... "वर्ष झाले" मी पुन्हा पुटपुटलों.

"भरलें घर भरलेलें आहे......"

"रिकामें आहे......"

"भरलेलें आहे...पालवी वाढते आहे...माझी सात..."

"मुलें वाढत आहेत..."

"तुझ्या इवल्या पखांच्या सांवलीत...?"

"मग काय तर—?"

"आतां तूं इथेंच रहाणार ना...?"

"निजतांना उशीवर ठेवणार काय मला—?"

"हृदयावर—"

"हृदयांत—"

"बरं—! हृदयांत ठेवीन—"

"त्यापेक्षां लग्न कर कीं—"

"काय म्हणतेस—"

"लग्न कर म्हणते—"

"कविता ऐकलीस ना मघांशी—जीवनांत या जीव न आतां..."

"कळलें—?"

"मग—?"

"तुझंहि खरं आहे. चांगली मिळाली तर ठीक— नाहीतर मुलांचे हाल व्हायचे—?"

"शोभा—?"

"काय—?"

"जवळ आहेस पण..."

"काय—?"

"जवळ नाहींस—"

"आहे की..."

"हीं सप्तरंगी पिसें कुठलीं...?"

"तुझ्या कवितेचीं...!"

"या रंगांच्या विविधतेच्या खटाटोपापेक्षां पुन्हा आपले पाहिल्यासारखे...दोन हात...दोन पाय..."

"तुला काय हवे आहे तें मला कळतें आहे..."

"हसू नकोस..."

"हसू नको तर काय करू...?"

"तें जाऊ दे— पण आता तू रहाणार कशी—? तुझ्या माहेरीं जाऊन आपण सांगून यायचे का– ?तुझ्या आईला, वडिलाना, भावाना बहिणीना किती आनंद होईल...!"

"इदू भेटली होती... ताई पण... गंगू पण भेटली.. नाना तर रोज भेटतात... दादा भेटतो... आई भेटते... मधू जरा रागात दिसला.... सदूभाऊच ठीक चाललय...आणि काशीनाथ... त्याला या दिवाळीला मी चांगलं ऊन ऊन ऊन पाण्यानी न्हाऊ घालणार आहे. तुम्हाला पाडव्याला... चांगले पाटावर बसा. तेल लावून घ्या माझ्याकडून— तुमची नेहमीची घाई असते मी कष्ट घेऊ नये म्हणून .. जरा..."

"शोभा.."

"काय मोहन—?"

"रडू कां ग ...?"

"रड. मी भुकेली आहे. तुला रडायला मिळालंय कुठं...मुलांना दिसू नये म्हणून रडलाच नाहीस... आतल्या आत — आतल्या आत..."

"रडतो..."

"थांब मी डोळ्यांपाशी येते... नाकावर बसते म्हणजे दोन्हीं डोळ्यातलें सांडणारे पाणी मला टिपतां येईल... हें काय... मला गर्दीच करायला हवी... घळाळा वहायला लागलें..."

"शोभा..!"

"तुला वाटलें, मला आतां बोलता येणार नाही... मला आंसवें टिपायची आहेत..."

"शोभा, मी वरती आल्यावर तूं भेटशील ना..."

"बोला—"

"शोभा, आपली हीं चिल्लीं पिल्ली..."

"बोला——"

"त्यांचें चालेल.. तीं वाढतील.. मोठीं होतील... त्यांचे संसार मांडले जातील———

"बोल! — बोल!"

"परंतु शोभा..."

"माझें कांहीं नाहीं——"

"बोला—"

"तू गेलीस.."

"बोला —"

"आणि मी सरलों—"

"थांबा आता–! डोळ्यांतून पाणी का ल तर माझी शपथ आहे तुम्हांला—"

"नाही सांडत.."

"मी आणि तुम्हीं समरसतेच्या पैलतीरावर गेलों— आणि हीं राजहंसे निर्माण केली... मी एकटी गेले परंतु या मागें ठेवलेल्या सात मुलांत मी सात होऊन उरलें आहे. जोपर्यंत त्याच्या चौदा डोळ्यात माझी प्रतिबिंबें खेळत आहेत तोपर्यंत... जोपर्यंत तुमच्या हृदयात—"

"शोभा–!

"आतां मी येते—!"

"कां– ?"

"सूर्य मावळायला लागला—"

"अंधार पडू लागला—"

"दिवा लावा—"

"आज तूच दिवा लाव—— !"

"हा घ्या लावते– ही अशी ! लागला दिवा . . विजेचं बटन दाबण्याइतकी शक्ति या नाजूक पायांतहि आहे. . पटलं ना . . ?"

"पुन्हा . . !"

"काय पुन्हा—— ?"

"कुठें भेटणार——?"

"सात ठिकाणीं भेटणार. आणि एका ठिकाणीं रहाणार. चौदा डोळयांनीं पहाणार आणि दोन ओठांनीं खाणार...काय तर ?"

"शोभा– !"

"काय—— ?"

"मघांशी मी मुलांनाच बोललों... कवितेचा कागद खराब केला म्हणून..."

"मग काय चुकलं——?"

"तूंच केलास ना——?"

"तरीहि उत्तर तेंच——"

"लबाड आहेस——"

"पहिल्यापेक्षां दुसरी कविता चांगली झाली आहे ना——?"

"झाली——"

"पण एक बदल हवा——"

"काय हवें तुला——?"

"जळाली असे म्हणूं नकोस—— वैजयंती कधीच जळत नसते."

"वैजयती म्हणजे तुळस की काय——?"

"चांगली तुम्ही काय कीं मी——?"

"शोभा——"

"आतां पुरे...हें घ्या...ठीक...आतां जरा मला हृदयाशीं धरा... माझीं पिसें गारठली आहेत. अंग गारठलें आहे...छान...अगदीं छान...गोड...छान...ही ऊब अशी आहे...जास्वंदासारखी...जितकी मी या उबेच्या आंत जाते आहे तों तों वेगळे वेगळे रंग दिसताहेत. खोल खोल रंग तर नारिंगासारखा दिसतो...भगवा आणखी आंत... हें काय...मी किती खोल जाऊन पोंचलें...मोहन...आतां मला कुठलें ऐकूं यायला. आतां तर तुझ्यात मी मिसळून गेले आहे...ही पिसेदेखील रक्तांतली रक्त होऊं लागलीं...हे माझे डोळे वेगळे होऊन तुझ्या भिवयांच्या आश्रयाला धांवले...झालें...संपलें...आतां हांक मारायची कुणाला—— आणि ऐकायची कुणीं——आतां त्या सातप्रमाणेंच तूं स्वत: आणि मी स्वत: समरसतेनें एकरूप झालों. बोल ब ं तू आतां."

श्रोता नसल्यामुळें आणि वक्ता नसल्यामुळें कितीतरी घटका मूक्या राहिल्या. आतां कवितेचा कागद मी घडी करून सदऱ्याच्या हृदयाजवळच्या खिशात ठेवून देत आहे.

आतां मी जागेवरून उठतों आहे...खोलींतून बाहेर पडतों आहे. तो खिडकी, तें सिताफळीचे झाड मागें ठेऊन आतां मी अगणांत येऊन पोचलों आहे.

मुलाचा खोखोचा डाव रंगात आला आहे. या वर्षांत मी त्यांच्या खेळात कधीं मिसळलेलों नाही.

"आज आम्हाला खेळायचं——!" मीं पुष्पाला म्हटलें.

त्यावरोबर सारीं मुलें आनंदानें उड्या मारीत म्हणाली– "आज बाबासाहेब खेळायला आले...आले...आले..." प्रसन्न झालेल्या रामसेवकासारखीं मुलें आतां दोन पायावर नाचत आहेत.

अंगणांतला दिवा लावून आम्हीं मनसोक्त खेळत आहोंत.

जेवायची वेळ झाली. मुलें टेबलाजवळ आलीं. खुर्च्या ओढल्या गेल्या.

"माझ्या जागीं आज तूंच बस !" मी रोज वाढण्याचें काम करणाऱ्या पुष्पाला हात धरून तिथें बसवलें. "आज मी तुम्हांला वाढणार आहे..."

""वाढा ! खरंच बाबासाहेब तुम्ही आम्हांला वाढा...!" प्रतिभा म्हणाली.

"आईसारखें..." धाकटा उदय म्हणाला.

"येईल कां पण त्यांना वाढतां तसं ?" अरुणनें शंका प्रदर्शित केली

"येईल–!" हा आवाज माझ्याच हृदयांतून आल्यासारखा मला भास झाला.

"आतां येईल कोण म्हणालं–?" मीं साऱ्या मुलांना विचारलें.

"कुणी नाहीं..." पुष्पा म्हणाली.

"मी नाहीं..." "मी नाहीं" असें आणखी सहा "नाहीं" आसमंतांत घुमले.

"हं बघ तुला भात किती–? तुला...हं तुला...हं तुला...हं तुला...टाकूं नका...जेवायच्या आधी श्लोक म्हणा..."

"आईनें शिकवला होता तो–?"

"हो तो–"

"शुभं करोति कल्याणं..." उदय म्हणूं लागला. त्याला साधनेनें थांबवले...

"अरे ए–वारे वा–आईनें हें शिकवलें कां–?"

"हं...हं! समजलं...वदनिं कवळ घेतां नाम घ्या...!"

आतां साती मुलें तो श्लोक म्हणूं लागलीं आहेत. दोन ओळी होईपर्यंत मी देवाजवळ गेलों आहे. देव्हाऱ्यांतल्या बाळकृष्णाला या वर्षातला माझा पहिला नमस्कार मिळतो आहे. निरांजन...उदबत्ती ...आतां मी पुन्हा वाढायला आलों आहे..."हं ! ! भाजी... सावकाश जेवा ! पाणी कुणाचं संपलंय...?"

मुलांचीं जेवणं झालीं. मग मी जेवायला बसलों...चौदा हात मला आतां आग्रह करून वाढायला उभे आहेत...

"वदनीं कवळ घेतां, नाम घ्या श्रीहरिचें..." मी ही ओळ मोठ्यानें म्हणतांना मनांतल्या मनांत वदनिं कवळ घेतां नाम घ्या शोभनाचें म्हणत आहे.

आतां रात्रीच्या चांदण्यांतल्या गोष्टी संपल्या आहेत. आपापल्या गाद्यांवर मुलें निजायला गेलीत...धाकटा उदय आतां माझ्या कुशींत आला आहे. पांढऱ्या स्वच्छ चादरीच्या पांघरुणांत आम्हीं आपाद मस्तक झाकून गेलों आहोंत. त्याचें मस्तक माझ्या हृदयावर आहे. त्याला मी थोपटतो आहे. माझे ओठ पुटपुटत आहेत...पहिली माझी ओवी...मी उजव्या हातानें त्याला थोपटतो आहे...त्याचे डोळे आतां गुंगीच्या दुआबांतील गलबतें झाली आहेत...पहिली माझी ओवी... पहिला माझा नेम...तुळशीखालीं राम पोथी वाची...उदयचे ओठ आता हलकेच उकलले जात आहेत...तो काहीतरी पुटपुटतो आहे. त्याचे पुटपुटणारे साजूक नाजूक ओठ तो आतां माझ्याकडून दुधाच्या धारेची अपेक्षा करीत टेंकवीत आहे !

आंत...माझ्या हृदयांत आतां रक्तबिंदूंना पिसांचं चांचल्य देणारीं चैतन्यें निर्माण होत आहेत.

उदय आता आपले तृप्त झालेले मखमली ओठ गालावर गुलाबाचे नकाशे उलगडत दूर नेत आहे. आतां तो झोपेत हसतो आहे.

हलक्या हातानी मी त्याच्या दोन्ही डोळ्यावरल्या पापण्या वरती उचलल्या.

आंत ती हंसत होती. खरंच आंत ती हंसत होती, न तुटलेलें आपले मंगळसूत्र हातानें चांचपत ती निर्भर हसत होती. ●●●

## खंडू रांगणेकर



श्री व सौ. रांगणेकर

क्रिकेटच्या माझ्या या छंदानं मला घरापासून दूर ठेवलं.— घरच्या मंडळींपासून, पत्नीपासून आणि मुलांपासूनहि दूर ठेवलं. क्रिकेटच्याच भाषेंत बोलावयाचं झाल्यास अशा या धांवपळींत वयाचं पावशतक साजरं झालं. परंतु यांपैकीं कोणत्याहि गोष्टीबाबत मला खेद वाटत नाहीं. नव्यानं हें सारं आयुष्य जगावयास मिळाल्यास मी याच धर्तीचं आयुष्य पसंत करीन.

मला वाटतं कीं, विमलचंहि हेंच मत आहे. अर्थात्‌च, मी आणखी थोडासा जास्ती शिस्तीनं बांधलेला असावा किंवा माझ्या हालचालीचे लगाम मधूनमधून आपल्या हातीं जास्ती वेळ असावेत असंहि तिला वाटत असेल!... परंतु आमचा छोटा श्रीकांतहि मोठा क्रिकेटपटु व्हावा असं तिला फार फार वाटतं, आणि मी हेंच आमच्या वैवाहिक जीवनाच्या यशाचं प्रतीक मानतो.

हा श्रीकांतहि माझ्या वळणावर गेलेला आहे. क्रिकेटची बॅट पचलून तो खेळूं लागला तो डाव्या हातानेंच. परंतु माझ्याचप्रमाणें तो इतर सर्व खेळ उपजतच उजव्या हातानें खेळतो. त्याला टेबल-टेनीस टेबलवर मीं प्रथम पाहिला, तेव्हांहि त्याच्या उजव्याच हातांत बॅट होती. त्यानं डाव्या हातानं गोलंदाजी करावी म्हणून मीं त्याला सांगून पाहिलं. परंतु या बाबतींत मात्र त्यानं माझं ऐकलं नाहीं.

दिवसांतला माझा बराच वेळ घराबाहेर जातो, आणि घरांतील इतर मंडळींप्रमाणं छोटा श्रीकांतहि माझ्यावर त्यामुळं रागावतो. शक्य असेल तेव्हां मी त्याला माझ्याबरोबर बाहेर नेतो. वडिलांचीं भाषणं किंवा त्यांच्या गळ्यांत पडणारे हार पाहून त्याची तरी चांगलीच करमणूक होते...

त्या मानानं माझा मुलगा शांत आहे. तो कांहींसा अबोलहि आहे. आणि त्या अबोल्यांतूनच तो त्याचा रुसवा व्यक्त करत असतो. तो लहान होता तेव्हां मी क्रिकेटच्या 'फॉर्मा'त होतों. सकाळीं मी ठाणं सोडत असे आणि रात्रीं मुंबईहून परते तेव्हां तो शांत झोंपलेला असे!

### सहा महिने घराबाहेर!

ऑस्ट्रेलियन दौऱ्यासाठीं भारतीय संघाची निवड करण्यासाठीं १९४६मध्यें कलकत्त्यांत झालेला तो सामना मला आठवतो. इंग्लंडच्या दौऱ्यावर गेलेला संघ विरुद्ध हजर स्थानिक खेळाडूंचा संघ या सामन्यांत, मीं इंग्लंडमध्यें गेलेल्या संघाविरुद्ध शतक झळकाविलं. ऑस्ट्रेलियन दौऱ्यासाठीं माझी निवड नक्की होणार याची खात्री तेव्हांच मनोमन पटली. माझ्या आयुष्यांतील तो एक मोठ्या हर्षाचा क्षण होता. परंतु तो आनंद निर्भेळ नव्हता. चार महिने घरापासून दूर जावं लागणार असल्याची जाणीव त्यांत होती ना!

कदाचित् सगळ्याच क्रिकेटपटूंना असं वाटत नसेल. ऑस्ट्रेलियन दौऱ्यावरहि माझ्याप्रमाणें इतर बरेच खेळाडू अपयशी ठरले. त्यांपैकीं सगळ्यांनाच या अस्वस्थतेनं भारलं होतं असं कांहीं सांगतां येत नाहीं. परंतु मी तरी अस्वस्थ झालों होतों, 'होमसिक' झालों होतों. मला घराची ओढ लागली होती आणि त्या दौऱ्यावरील माझी निराशाजनक फलंदाजीहि त्याला कारणीभूत होती. नाहींतरी वाईट दिवसांतच आप्तजनांची आठवण जास्त येते; नाहीं कां?

क्रिकेटपटूचं आयुष्यच असं असतं. क्रिकेटचा मोसम सुरू झाला कीं, मी सकाळीं ठाण्यांतून मुंबईकडे धांवत असे. परत येई तेव्हां रात्र झालेली असे आणि वर्षांतील सहा-सात महिने, क्रिकेट आणि बॅडमिंटनमुळें हाच दैनंदिन कार्यक्रम असे. आणि या ६–७ महिन्यांपैकीं महिनाभर तरी मी मुंबईबाहेर असे. कोठेंतरी दौऱ्यावर असे!

### मोहाचे क्षण जास्तीच

विमलला मी लहानपणापासुन ओळखतों. एक काळ असा होता कीं, तिच्यासाठीं मी नेट-प्रॅक्टिसहि बुडवत असे. परंतु लग्न झालं, विवाह-बंधनानें आमचे संबंध बांधले गेले, आणि गंमतीची गोष्ट अशी कीं त्यानंतर मात्र मी क्रिकेटमध्येंच जास्ती गुरफटलों.

महाराष्ट्र-मुंबई संघांतील त्या ऐतिहासिक सामन्यांत द्विशतक फडकावून मी घरीं आलों आणि लागलीच १–१२–१९४० ला आमचा विवाह झाला. परंतु मी प्रामाणिकपणें कबूल करीन कीं, लग्नानंतर सुरुवातीच्या वर्षांतच मी जास्ती क्रिकेट खेळलों.

क्रिकेटचा खेळ भारतांत किती लोकप्रिय आहे हें कांहीं मी तुम्हांस सांगण्याची आवश्यकता नाहीं. मला वाटतं कीं, सिनेनटाखालोखाल, लोकप्रियतेंत क्रिकेटपटूंचाच नंबर लागत असेल! क्रिकेटपटूंभोंवतीं चाहत्यांचा वर्ग तयार होत असतो आणि त्याचा मित्र-परिवार वाढत असतो. साहजिकच त्याच्या आयुष्यांत मोहाचे क्षण जास्ती प्रमाणात येत असतात. त्याच्या चाहत्यांत पुष्कळदां कांहीं मैत्रिणींचाहि समावेश होत असतो. याचा त्या क्रिकेटपटूच्या पत्नीस मत्सर वाटणंहि तितकंच स्वाभाविक ठरतं. आमच्या वैवाहिक संबंधांतहि या नैसर्गिक समस्येस तोंड द्यावें लागलें.

क्रिकेटसाठीं मी कुठेंहि गेलों तर विमलला त्याचं कधींहि कांहींहि वाटलं नाहीं. परंतु तो विशिष्ट सामना किंवा तो विशिष्ट दौरा संपल्याबरोबर मीं घरी परतावं असं तिला नेहमींच वाटत असे.

कलकत्याचा एक क्रिकेट सामना संपल्याबरोबर मी घरीं परतलों नाही. तेव्हा तिला असाच एकदां अतिशय राग आला होता.

### असेंच आणखी एक वादळ

चहाच्या पेल्यातील अशाच आणखी एका वादळाची आज आठवण होतें. आमच्यापैकीं निदान काहीं क्रिकेटपटूंना तरी कोणतं तरी 'फॅड' असत. शकून-अपशकुनावर त्याचा विश्वास बसलेला असतो. विमलनें सामना पाहाण्यासाठीं याव आणि मीं नेमका भोपळा काढून परतावं असहि घडलेल आहे. शकून-अपशकून मानणाऱ्या माझ्या कांहीं मिस्कील मित्रानी तेव्हां आमची बरीच थट्टा केली आणि विमललाहि ती थट्टा लागली होती.

परतु मीं आधीच सांगितल्याप्रमाणं हीं चहाच्या पेल्यांतील वादळं होतीं. या किंवा अशाच स्वरूपाच्या इतर प्रसगी आमचे जोराचे वाद झाले. सरतेशेवटी हे आयुष्य मला आणि तिलाच बरोबरीनं काढायच आहे, हा निष्कर्ष आम्ही काढला. हे काही वाद, कांहीं गैरसमजूती, काही मतभेद आणि दुराग्रहातून निर्माण होणारा राग हा कांहीं आमच्या संबंधाचा स्थायीभाव नव्हें; ते काहीं घांवते क्षण आहेत. एवढं मी तिला पटवू शकलों.

मधूनमधून असे प्रसग उद्भवत गेले. परतु आमचं प्रेमविवाहाचं बंधन नेहमीच शक्तिमान ठरलं.

### सर्वांत सुखाचें वर्षे

क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतरचीं पांच वर्षं हीं माझ्या वैवाहिक जीवनाची सर्वांत सुखाचीं वर्षं. ही पाच वर्षं मीं इतर कोणत्याहि माणसाप्रमाणं घरात काढलीं. घरातून बाहेर जाण्यास उशीर केला व घरीं परतण्याची घाई केली. कामधंद्याकडे नीट लक्ष दिलं आणि उरलेल्या वेळांत घरी गप्पा मारत बसलों.

परंतु त्यानतर ठाणें नगरपालिकेच्या समाजकारणांत मी शिरलों तेव्हां विमलची प्रतिक्रिया अतिशय तीव्र होती. बऱ्याच वर्षांनंतर जें कांहीं हातीं आल तें पुन्हा सुटतंय असं तिला वाटूं लागलं.

तशी ती फार व्यवहारदक्ष आहे. आर्थिक स्थैर्य, आर्थिक नियोजन यांविषयीचें तिचे विचार फार स्पष्ट आहेत ! त्यामानानें माझं व्यवहार-ज्ञान कमीच. विमलशीं केलेलं लग्न हाच माझ्या व्यवहारज्ञानाचा एकमेव पुरावा...

साहजिकच आजहि नगरपालिकेपेक्षां मीं स्वतःच्या कामधंद्याकडे जास्ती लक्ष द्यावं अशीच तिची अपेक्षा असते. नगरपालिकेच्या राजकारणांत मी जास्ती गुरफटूं नये असं तिला वाटतं. परंतु याहि क्षेत्रांतून मी निवृत्त होतांना, "तुम्ही यापूर्वी निवृत्त का झाला नाहींत ?" आणि "तुम्ही कां निवृत्त होता ? " यापैकी कोणता प्रश्न लोकांनीं विचारावा, अशा साध्या प्रश्नानं मीं विमलला निरुत्तर करीत आलेलों आहे.

### सौ. खंडू रांगणेकर

विमल माझ्या क्रिकेट-आयुष्याचाहि एक महत्त्वाचा भाग असे. शक्य असेल तेव्हां ती माझे सामने पाहावयास आलेली आहे. आणि माझ्या फलंदाजीनें तिला बराच वेळ अस्वस्थ ठेवलं असेल, मी मधेंच बाद होतों कीं काय याविषयीं संदेहांत ठेवल असेल याविषयींहि मला शंका नाहीं ! क्रिकेट तिनं समजावून घेतल तें माझ्यासाठींच. बॅडमिंटनच्या सामन्यांत ती उतरली नाहीं, परंतु ती बॅडमिंटन चांगलं खेळत असे. या दोन्ही खेळांतील माझ्या यशाच श्रेय मी तिलाच देतों—तिच्या समजुतदारपणाला, तिच्या सोशिक वृत्तीला, आणि मोठ्या मनाला.

तसा तिचा स्वतःचाच असाहि जीवनक्रम आहे. ठाण्यांत ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून ती काम करते. हें काम आणि घरकाम यात ती दिवसभर मग्न असते.

तरीहि क्रिकेटपटू खंडू रांगणेकरची पत्नी म्हणून ओळखलं जाण्यांत तिला अभिमान वाटतो. मॅजिस्ट्रेटपेक्षां सौ. खंडू रांगणेकर म्हणून संबोधलं जातांना तिला अभिमान वाटतो. आणि सिव्हिल हॉस्पिटलमधील तिचं काम बघून तिच्याबरोबर हिंडतांना मलाहि ती एक गौरवाचीच बाब वाटतें.

● ● ●


वि. गो. खोबरेकरकृत

गुजराथेंतील मराठी माणसें

मूल्य सात रुपये

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत ग्रंथ

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २.

प्रभाकर इनामदारकृत

विद्यालंकार

भाग दोन

मूल्य दोन रुपये

: विक्री-व्यवस्था :

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २.

# एका सुंदर शरीराची शोकांतिका

रंगा मराठे



मेरेलिन--१९५२

नऊ फेब्रुवारी एकोणीसशें एकसष्टच्या " डेली न्यूज " या सुप्रसिद्ध अमेरिकन वृत्तपत्रांत पहिल्या पानावर जाड मथळ्याखालीं एक बातमी छापून आली. या बातमीनें अमेरिकन जनतेला फार मोठा धक्का बसला. " मेरेलिन मनरो ही आजारी असून न्यूयॉर्क इस्पितळांत–कॉरोनेल मेडिकल सेंटरमध्यें मानसोपचारासाठीं राहिली आहे." या बातमीवर प्रथम कोणाचाच विश्वास बसेना. थोडयाच दिवसांपूर्वी–म्हणजे ३१ जानेवारी रोजी 'Misfits' या तिच्या नव्या चित्रपटाच्या उद्‌घाटनाच्या दिवशीं 'कॅपिटॉल थिएटर' मध्यें पहिल्या खेळाला ती हजर राहिली होती. तेव्हां तिची प्रकृति उत्तम होती. ती उत्साही आणि आनंदी होती. त्यामुळें तिच्या या आजारपणाच्या बातमीनें सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

या बातमीचा नक्की तपास लावण्यासाठीं अमेरिकेंतील साऱ्या बातमीदारांनीं ज्या इस्पितळांत मेरेलिन होती त्या ठिकाणीं एकच भाऊगर्दी केली. आपल्यामागील लोकांचा आणि बातमीदारांचा ससेमिरा टाळण्यासाठीं मेरेलिननें आपलें नांवसुद्धां बदललें होतें. त्या इस्पितळांतील अधिकारी मंडळींनीं या बातमीच्या खरेखोटेपणाबद्दल माहिती सांगण्यास नकार दिला. पण बातमीदार व तिचे चाहते इस्पितळांतून बातमी मिळाल्याखेरीच हालायलाच तयार होईनात. म्हणून शेवटीं मनरोचा सेक्रेटरी जॉन स्प्रिंगर यानें खालील बातमी वृत्तपत्रांना जाहीर केली.

" दिनांक ७ फेब्रुवारी रोजीं मेरेलिन मनरो ही विश्रांती व मानसोपचारासाठीं इस्पितळांत दाखल झाली आहे. गेले वर्षभर लागोपाठ दोन चित्रपटांत काम केल्यामुळें व घरगुती अडचणींना तोंड द्यावें लागल्यामुळें तिला अतिशय थकवा आला आहे."

त्या दिवसापासून वृत्तपत्रबातमीदारांनीं तिच्या आजाराविषयीं इत्थंभूत माहिती मिळविण्यासाठीं इस्पितळाला गराडा दिला. पण तेथील अधिकाऱ्यांनीं कोणतीहि माहिती देण्यास साफ नकार दिला. मेरेलिनचा आजार हा तिच्या आईपासून चालत आलेला अनुवंशिक आजार आहे कीं काय ही शंका अनेकांच्या मनांत डोकावली. मेरेलिनची आई ही वेडयांच्या इस्पितळांत वर्षानुवर्षं खितपत पडलेली होती. आपली मुलगी हीं एक जगप्रसिद्ध सुंदर अभिनेत्री झाली आहे याचीसुद्धां तिला कल्पना नव्हती. तिच्या या आजारपणाचीं मुळं फार खोलवर पसरलेली होतीं.

मेरेलिन मनरोचं बालपण अतिशय खडतर आणि हालअपेष्टांत गेलं. तिचं खरं नांव नॉर्मा जीन बेकर. तिच्या आईचं नांव ग्लॅडिस बेकर व वडिलांचे नांव मोर्टेन्सन. या दोघांचें मेरेलिन हें अपत्य होतें. तरी उभयतांचं रीतसर लग्न झाल्याची नोंद नाहीं. अमेरिकेचा प्रेसिडेंट जेम्स मनरो याच्या घराण्यांत ग्लॅडिसचा जन्म झालेला होता. ग्लॅडिसनें पहिल्या नवऱ्याशीं घटस्फोट घेतला होता व ती आपल्या पहिल्या नवऱ्याच्या मुलीला घेऊन लॉस अँजलसला आर. के. ओ. स्टुडिओंत नोकरी करीत होती. तिथेंच तिचा मोर्टेन्सनशीं परिचय होऊन १९२६ सालीं मेरेलिनचा जन्म झाला. मात्र मेरेलिनचा जन्म होण्यापूर्वीच मोर्टेन्सन मोटार सायकलच्या अपघातांत निधन पावला. मेरेलिनचा जन्म अशा रितीनें अत्यंत गरिबींत झाला. पदरीं एक-दोन मुली व खायची भ्रांत या झगडयांत मेरेलिन तीन वर्षांचीं असतांनाच तिच्या आईला वेड लागलें. तिची आई वेडयांच्या रुग्णालयांत कोंडली गेली आणि दोन मुली माधुकऱ्या मागून दोन वाटेला लागल्या.



पाळण्यावाहेर

एका घरांतून दुसऱ्या घरांत, एक आश्रित-अनाथ मुलगी म्हणून तिला दिवस काढावे लागले, अमेरिकेंत जें कुटुंब अनाथ मुलांचा सांभाळ करते त्याला सरकारकडून आर्थिक मदत मिळते. जोंपर्यंत त्या मुलाचा सांभाळ करणे त्या कुटुंबाला शक्य असते तोंपर्यंत त्या मुलास संभाळावें, अशक्य झालें कीं चर्च त्या मुला-मुलीला दुसऱ्या एखाद्या कुटुंबात पाठवतें. अशाच एका कुटुंबांत रहात असतांना १९३१ सालीं मेरेलिन एकटीच शाळेंत दाखल झाली. पहिल्या दिवशीं मूल शाळेंत जातें तेव्हां तें घाबरलेलें असतें. नवीन विश्वाची भीति त्याला घेरून टाकते. अशावेळीं घरची एखादी प्रौढ व्यक्ति धीर द्यायला असली तर तें मूल लवकर सांवरतें. मेरेलिननें हा प्रसंग फार सुंदर वर्णन केला आहे. ती सांगते--

"मी शाळेंत गेलें तेव्हां माझ्याएवढ्या छोटचा मुला-मुलींची मोठी रांग गलगा करीत होती. सगळीं मुलें धास्तावलेलीं होतीं. पण आपल्याबरोबर आलेल्या वडिल मंडळींच्या आधारानं धीर धरून उभी होतीं. मी मात्र एकटीच होतें.

"तुझ्याबरोबर कोण आलंय ?" एका शिक्षिकेनं माझ्या जवळ येत मला विचारलें. मी दचकलेंच. मी बोलत नाहींसें पाहून ती म्हणाली–

"तुझ्याबरोबर कुणीच कसं मोठं माणूस नाहीं ? तुला कुणी नाहीं कां ?"

"मला नाहीं माहीत !" मी भीत भीत पुटपुटले.

"तुला आई नाहीं कां ?"

"नसेल बहुतेक–" मला आई आठवतच नव्हती तर मी सांगणार तरी काय ?

"तुझे वडील ?"

"ते देवाकडे गेले." हें मात्र मला नक्की ठाऊक होतं.

रांगेतली माझ्या मागची मुलगी तेवढ्यांत म्हणाली,

"अय्या–आई, हिल बघ आई पण नाहीं आणि वडिलपण नाहींत."

मला एकदम रडूं येवूं लागले"

वयाचीं बारा वर्षं पूर्ण होईपर्यंत मेरेलिन बारा निरनिराळ्या दत्तक कुटुंबांमधून हिंडली. एका घरांत तिला संस्कार घडत–"दारू पिणं वाईट–" तर पुढच्याच कुटुंबांत तिला दारूच्या बाटल्या खेळणीं म्हणून मिळत.

ती पंधरा वर्षांची झाली. आणि गोडार्ड कुटुंबात ती रहावयास आली. लॉसएंजेल्सच्या एका उपनगरांत हें कुटुंब राही. परंतु तेथें एक वर्ष राहणं होतं न होत तर त्या कुटुंबानें व्हर्जिनियाला जावयाचें ठरवलें.

मेरेलिनचें आतां काय करावयाचें ? गोडार्ड कुटुंबानें तिचें लग्न लावून द्यावयाचें ठरवलें. दोन घरें टाकून एक बावीस वर्षांचा तरुण त्यांना एकाएकीं लग्नासाठीं सांपडला. त्याला कायम नोकरी होती. चांगला उंच निंच होता, दिसायला वाईट नव्हता. यापेक्षां अधिक तें काय पहायचें ?

तिचें लग्न झालें त्यावेळी तिचें वय सोळा वर्षांचें होतें. जीम डोगेर्टी एअर क्राफ्ट कंपनींतील कामगार होता. मेरेलिन म्हणते, "हा विवाह संपूर्णपणें अयशस्वी होणार याची मला प्रथमपासूनच खात्री होती."

या विवाहाचा आणि बालपणांतील अनेक घटनांचा तिच्या मनावर इतका ताण पडला कीं सोळाव्या वर्षीच तिनें आत्महत्या करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

तिचा पहिला नवरा सैन्यांत दाखल झाला. घटस्फोट न घेतांच मेरेलिन या लग्नबंधांनतून मोकळी झाली. पुन्हा मोकळेपणीं श्वासोच्छवास करणें तिला शक्य होऊं लागलें. याच सुमारास सैन्यांतील लोकांसाठी चालवलेल्या मासिकांत मेरेलिननें आपले फोटो दिले. या फोटोंतला मोहक चेहरा प्रमाणबद्ध अवयव पाहून हॉलिवूड-मधील लोकांचें लक्ष तिच्याकडे गेलें. आतां चित्रपटाच्या कांहीं दृष्यांतून तिला कामें मिळूं लागलीं. एका चित्रणांत गाण्याच्या देखाव्यांत तिला गाणें म्हणावें लागलें. त्यामुळें संगीत दिग्दर्शक कारगर यांच्याशी तिचा परिचय झाला.

कारगर यांनीं आपल्या प्रथम पत्नीपासून घटस्फोट घेतला होता. त्याला एक मुलगी होती. संगीताचे धडे देण्यासाठीं त्याची व मेरेलिनची रोज गांठभेट होऊं लागली. आणि अभावितपणें मेरेलिन त्याच्या प्रेमांत पडली. तिच्या दृष्टीनें एका नवीन आयुष्याची ही सुरुवात होती. पण मेरेलिननें लग्नाची गोष्ट काढतांच या गृहस्थानं तिच्या मागणीला साफ नकार दिला. तो म्हणाला–

"तुझ्यासारख्या स्त्रीशीं मीं लग्न केलं तर माझ्या सहा वर्षांच्या मुलीचें काय होणार ? तुझे संस्कार माझ्या मुलीवर झालेले मला मुळींच आवडणार नाहीं."

या प्रसंगानं मेरेलिनला जबरदस्त तडाखा दिला. तिच्या अंतःकरणांत बहरलेली प्रेमाची वेल अचानकपणें करपून गेली. यानंतरचे

तिचे दिवस फारच हालांत गेले. याच दिवसांत पन्नास डॉलर्सच्या मोबदल्यांत टॉम केली नांवाच्या फोटोग्राफरला तिनें आपले नग्न फोटो दिले. आपल्या सुंदर शरीराचा मॉडेल म्हणून उपयोग व्हावा एवढीच तिची इच्छा नव्हती. आपल्या बुद्धीमत्तेचंहि चीज व्हावं असें तिला वाटत होतें. त्यासाठीं तिची विलक्षण धडपड चालली होती. पण तिला यश मिळत नव्हतें.

विवस्त्र अवस्थेंतील फोटो विकण्यांत तिची जरा घाई झाली. कारण थोडयाच दिवसांत "Love Happy" या चित्रपटांत तिला एक छोटेंसें काम मिळालें. फक्त आठच उब्द उच्चारायचें. परंतु ती भूमिका एका उत्तान मुलीची होती. ती मेरेलिननें अशा ढंगांत केली कीं ती तिच्या यशाची नांदी ठरली.

अमेरिकन वृत्तपत्रांनीं तिच्या या छोटया भूमिकेला इतकी भडक प्रसिद्धी दिली कीं, थोडयाच दिवसांत ती सौंदर्यसाम्राज्ञी म्हणून ओळखली जाऊं लागली.

याच कामावर खूप होऊन डायरेक्टर हस्टन यांनीं तिला " अॅस्फाल्ट जंगल " या चित्रपटांत छोटीशी भूमिका दिली. ही भूमिकासुद्धां उत्तान मुलीचीच होती. या पाठोपाठ 'ऑल अबाउट इव्ह' या चित्रपटांत तिनें भूमिका केली. बेटी डेव्हिस, जॉर्ज सँडर्स यांसारखे कलावंत असूनहि प्रेक्षकांची मेहेरनजर मेरेलिनवरच झाली. मेरेलिनला अधिक वाव द्या असा ओरडा सुरुं झाला.

आतां मेरेलिनला आवरणें चित्रपटनिर्मात्यांना अशक्य झालें. ' अॅज् यंग अॅज् यू फील ', ' लव्ह नेस्ट ', ' लेट अस् मेक इट लीगल ' ' वलॅश बाय नाईट या चित्रपटांनीं तिचा प्रचंड गाजावाजा झाला.

साल १९५२ होतें. याचवेळीं एक स्फोट झाला. ज्या एका नग्न स्त्रीचें कॅलेंडर अमेरिकेंत गाजत होतें ती म्हणजे ' मेरेलिन मनरो ' असें ' जर्नल अमेरिकन ' या पत्रानें जाहीर केलें. एकच गहजब झाला. परंतु मेरेलिननें सांगून टाकलें,

" मी नग्नावस्थेंत टॉम केलीला फोटो काढून दिले ही गोष्ट सत्य आहे. याची मला शरमहि वाटत नाहीं. मी हल्लीं असे फोटो काढून देत नाहीं. कारण आज लक्ष्मी माझ्या पायाशीं लोळते आहे. उद्यां पुन्हा जर माझ्यावर उपासमारीचा प्रसंग आला तर पुन्हा मी तेंच करीन. माझ्या मुला-नातवंडांना ही गोष्ट कळावी म्हणून या कॅलें. डरची एक प्रत मी राखुन ठेवणार आहे "

मेरेलिनचें देहप्रदर्शन, उभार वक्षाची आणि नितंबांची उत्तान हाल-चाल याच गोष्टी लोकांना हव्या होत्या. अशा तऱ्हेच्या अभिनयाला भरपूर वाव राहील अशा चित्रकथा निर्मात्यांनीं निवडल्या. तिचा पुढील गाजलेला चित्रपट ' मंकी बिझिनेस्. ' केरी ग्रँट या नटानें पुरुष भूमिका केली होती. चित्रपटाची कथा काय होती ? एका शास्त्रज्ञाला तारुण्य बहकवील असें रसायन तयार करावयाचें होतें. हें रसायन तयार होतें. परंतु लॅबोरेटरींत एक माकड घुसून तें रसायन पाण्यांत मिसळतें. तो शास्त्रज्ञ तें पाणी पितो. पुढें त्याला मेरेलिन भेटते......अशा कथांमधून प्रेक्षकांना जशी हवी तशी मेरेलिन पडद्या-वर दिसूं लागली.

नंतरचा चित्रपट म्हणजे ' नायगारा ' तिच्या उत्तान चालण्याच्या आणि एकंदर अभिनयाच्या ढंगावर प्रेक्षकांच्या उडया पडल्या. याच सुमारास मेरेलिन मधलें विलक्षण स्थित्यंतर सुरूं झालें.



अतृप्त इच्छा—मातृत्व.

आपण आतां यशाच्या शिखरावर आलों, हॉलिवूडमधील निर्मा-त्यांनीं पूर्वी आपल्याला जी वागणूक दिली तिचा बदला घेण्याची ही संधि आहे, आपली लहर आतां महत्वाची आहे हें तिला उमगलें. तिनें कुणाची पर्वा करण्याचें सोडून दिलें, आतां ती कधीं काय करील याचा नेम नाहीं या धास्तीनं निर्माते, डायरेक्टर अस्वस्थ झाले.

तिचें मन आतां साहित्यांत रमूं लागलें. जिब्रानचें ' प्रॉफेट ' खय्या-मच्या ' रुबाया ' यामध्यें तिला विलक्षण रस वाटूं लागला ' जंटलमेन प्रिफर ब्लोंडस् ' या चित्रपटामुळें तिचा जेन रसेलशी संबंध आला. जेन रसेलनें दहा वर्षे सुखानें संसार केला होता. तिच्या सह-वासांत विवाहाचे विचार मेरेलिनच्या मनांत घोळूं लागले. परिणामीं १९५४ सालीं मेरेलिनचा दुसरा विवाह सुप्रसिद्ध बेसबॉलपट् जो-डी मॅगी याच्याशीं झाला आणि एका वर्षाचें आंत हाहि विवाह अयशस्वी होऊन तिनं घटस्फोट घेतला.

डी-मॅगीशीं लग्न होण्यापूर्वी तिनं जिब्रानचे विवाहविषयक विचार पचवले होते. तिनें खालील परिच्छेद पुनः पुनः वाचला होता—

" आपलीं अन्तःकरणें एकमेकांना द्या पण तीं गहाण टाकूं नका. कारण तीं फक्त जीवनाच्या हातांतच मावूं शकतील. एकमेकांजवळ उभे रहा. परंतु फाजील जवळ नाहीं, देवळाचे खांब दूर दूर असतात. कारण ते फार जवळ आले तर देऊळ कोसळेल––"

तरीहि व्यवहारांत तिला या ज्ञानाचा मुळींच फायदा न होतां अभिनेत्री आणि संसार हें तिचें स्वप्न विरलें. अभिनेत्री म्हणून " हाउ टू मॅरी ए मिलिओनर " व " रिव्हर ऑफ नो रिटर्न " या चित्रपटांनी तिचें यश कायम राखलें. परंतु लग्न कोलमडलें.



मेरेलिनला आवडलेली मन्रो !

या वेळीं तिचें वय अठ्ठावीस होतें. हळूं हळूं तिच्या लक्षांत येत होतें कीं, यश म्हणजे कीर्ति नव्हे. आज ना उद्यां आपल्यापेक्षां अधिक सौष्ठवाची, अधिक धीट, अधिक आकर्षक अशी एकादी मुलगी आपल्याशीं स्पर्धा करूं शकेल. आपण विसरल्या जाऊं. केवळ सुंदर शरीर व आकर्षक चेहरा हें भांडवल फारच अपुरें आहे. आपल्या आयुष्याच्या, यशाच्या मर्यादा कळून येतांच ती अस्वस्थ झाली. ज्या जाणकारांनीं अभिनयाबद्दल पाठ थोपटावी अशी एकहि भूमिका आपण केली नाहीं. एकहि अॅकेडमी अॅवॉर्ड आपल्याला मिळालें नाहीं याची खंत तिला त्रास देऊं लागली.

दुसऱ्या लग्नांतून मोकळी होतांच दोनच दिवसांनीं 'सेव्हन् ईयर्स ईच' या चित्रपटाच्या चित्रणाला सुरुवात झाली. या चित्रपटांतील तिची भूमिकाहि तिच्या नव्या भुकेचें समाधान करणारी नव्हती.

एक वर्षभर मेरेलिन अस्वस्थ होती. आपलें नांव चिरंतन ठेवील, आपलें शरीर वयानुरूप दृष्टीआड झालें तरी त्या भूमिकेचा सुगंध चिरकाल दरवळत राहील अशी भूमिकाच फक्त करायची असा तिनें निश्चय केला होता त्याकरतां दिग्दर्शकापेक्षां, निर्मात्यापेक्षां, जो अशी भूमिका निर्माण करील अशा लेखकाचा सहवास तिला हवा-हवासा न वाटला तरच नवल ! अर्थर मिलर ह्या प्रसिद्ध नाटककाराचा व तिचा परिचय याच काळांत झाला. मिलरचीं नाटकें ब्रॉडवे गाजवीत होतीं. त्याच्यावरोबर मेरेलिन फिरूं लागली. त्याच्यावर तिचा जीव जडला होता कां ? त्याच्यावर म्हणण्यापेक्षां त्याच्या बुद्धिवैभववार ती प्रेम करूं लागली होती. शरीराचें सौंदर्य तिला आतां महत्त्वाचें वाटत नव्हतें. मिलर विवाहित आहे, त्याला मोठीं मुलें आहेत याचीहि तिला पर्वा नव्हती. तो बुद्धिमान होता. नाटकांत अमाप यश मिळवित होता. आणि जें बुद्धिगम्य होतें असें सुख आतां मेरेलिनला हवें होतें.

१९५५ सालांत मिलरनें पहिल्या पत्नीशीं घटस्फोट घेतला. त्याचा व मेरेलिनचा संबंध अव्याहत होताच. याच काळांत मिलरनें आपली 'मिस्फिटस्' ही कादंबरी पुरी केली. याचें लेखन चालू असतांच मेरेलिन— "बसस्टॉप" या चित्रपटाच्या चित्रणांत गुंतलेली होती. मात्र या चित्रपटांत राक हडसन् या नटावरोबर काम करण्यास तिनें नकार दिला. कारण काय तर हडसन् हा उत्तम नट होता. आणि कदाचित् मेरेलिन त्याच्यापुढें फिकी पडली असती. ज्या गर्तेतून बाहेर पडण्याची मेरेलिनची आकांक्षा होती. त्याच गर्तेत पुनः ती रुतत होती.

'बस्-स्टॉप' चित्रपटांतून मोकळीक होतांच जून १९५५ मध्यें मेरेलिननें मिलरशीं तिसरा विवाह केला.

मृत्यूची बंधनें तोडून आपण चिरकाल स्मृतिरूपानें उरावें यासाठीं मेरेलिन कीर्ति देणाऱ्या भूमिकांच्या मार्गे लागली. हा जसा एक भाग, त्याचप्रमाणें मिलरपासून आपल्याला मुलें व्हावीत ही स्मृतिरूपानें मार्गे उरण्याची सामान्य इच्छाहि तिला अस्वस्थ करूं लागली.

परंतु विवाहानंतर लगोलग तिला "दी स्लीपिंग प्रिन्स" या चित्रपटांत सर लॉरेन्स ऑलिव्हर याच्या जोडीनें काम करण्याची संधि मिळाली व ती मिलरसह इंग्लंडला आली, हा चित्रपटपुढें "प्रिन्स अॅन्ड दी शो गर्ल," या नांवानें चित्रित झाला.

इंग्लंडहून परतल्यावर मेरेलिन व मिलर हीं अॅमगनसेट या गांवीं एकातांत राहूं लागली. दोघांचा बाह्य जगाशीं फारसा संबंध नसावा तशी राहूं लागली. मिलरची कादंबरी 'मिस्फिटस्' लिहून होत होती.

याचवेळीं मेरेलिनला दिवस राहिले. ती माता होणार व तिचें अस्तित्व मार्गे ठेवणारी सामान्यांतली सामान्य गोष्ट घडणार, एका सुंदर शरीरांतून नवें कोवळें शरीर जन्म घेणार ही गोष्ट नक्की झाली. वृत्तपत्रांनीं रकाने भरले आणि अचानक मेरेलिनला हॉस्पिटल मध्यें जावें लागलें. माता होण्याचें स्वप्न भंगलें. गर्भपात झाला. मेरेलिनचें हें साधें स्वप्नहि भंगलें.

यथावकाश मन्रो पुन्हा कॅमेऱ्यापुढें दाखल झाली. चित्रपट होता. "सम लाईक इट हॉट" दिग्दर्शक होता बिली विल्डर. चित्रपट अर्धामुर्धा झाला न झाला तोंच मेरेलिन मानसिक आजारानें चित्रपटास येत नाहींशीं झाली. पुन्हा तिला दिवस गेले होते. हॉलिवुडमधील प्रख्यात बातमीदार लौला पारसन् हिनें ही बातमी जाहीर करून टाकली.

अखेर चित्रपटाचें चित्रिकरण संपलें. यावेळीं तिच्यावर जो कामाचा ताण पडला यामुळें म्हणा किंवा दैव खडतर म्हणून म्हणा—यावेळींहि इतिहासाची पुनरावृत्ति झाली आणि पुन्हा गर्भपात झाला.

पाठोपाठ झालेल्या या दोन आघातानीं मेरेलिन हादरली. यानंतर माता होण्याचें स्वप्न कधींच साकार होणार नाहीं या भावनेनें ती निराश झाली. आतां या सुंदर शरीराला चिरकाल स्मृतिरूपानें उरण्यासाठीं एकच मार्ग होता आणि तो म्हणजे—अभिनेत्री म्हणून उदंड कीर्ति ! नटी म्हणून यश नव्हे तर अभिनेत्री म्हणून अमाप कीर्ति !!

याचवेळीं "मिस्‌फिटस्" ही कादंबरी मिलरनें पुरी केली आणि त्यावरून हॉलिवूडनें चित्रपट तयार करण्याचें ठरवलें. या चित्रपटांत रोझालिन टेबर या सुंदर, भावनाप्रधान आणि विक्षिप्त स्वभावाच्या स्त्रीची भूमिका मेरेलिनकडे आली. कदाचित्‌ ही भूमिका लिहितांना मिलरच्या डोळचांपुढें मेरेलिनच असावी. या चित्रपटांत मेरेलिनबरोबर नटश्रेष्ठ क्लार्क गेबल चमकणार होता. यावेळीं तिनं आपलं सारं अभिनयकौशल्य पणाला लावून काम केलं आणि त्यामुळेंच मेरेलिन मन्रो ही नुसती सुंदर शरीराची स्त्री नसून ती एक बुद्धिमान अभिनेत्री आहे असं क्लार्क-गेबलच मत झालं होतं. यामुळें मेरेलिनला अतिशय समाधान झालं. आतां आपल्या गुणांचं चीज होईल अशी आशा तिच्या मनांत निर्माण झाली.

परंतु चित्रपटाचें चित्रिकरण सुरुं असतांनाच तिचे व मिलरचे मतभेद विकोपाला गेले. तिनें त्याच्याजवळ घटस्फोटाची मागणी केली. यापूर्वी ती आजारी होती म्हणून चित्रपटाचें चित्रिकरणच स्थगित झालें होतें. मिलरशी घटस्फोटाचा निर्णय घेतांना तिला विलक्षण मानसिक क्लेश झाले याचा हा पुरावा होता.

ता. १७ नोव्हेंबर १९६० रोजीं हॉलिवूड चित्रपटसृष्टीचा राजा क्लार्क गेबल याचं हृदय विकाराच्या आजारानं अकस्मात्‌ देहावसान झालं. त्याच्या मृत्यूच्या बातमीनं मेरेलिनच्या आयुष्याला अखेरची भोंवळ आली. हा आघात तिला सहन झाला नाहीं. तिच्या सर्व आशा आतां धुळीला मिळाल्या. १९६१ च्या जानेवारींत तिनें मिलरशीं घटस्फोट घेतला.

नोव्हेंबर ६० पासून मिलर व मेरेलिन वेगळीं राहूं लागलीं. त्यामुळें "मिस फिट्‌स्" चित्रपट पुरा झाला तेव्हां मेरेलिन हिची मानसिक अवस्था पुरती ढांसळलेली होती.

३१ जानेवारी ६१ म्हणजे दोन महिन्यांनीं चित्रपटाच्या उद्‌घाटनाला मेरेलिन हजर होती. परंतु मिलर तिथें हजर असूनहि दोघांचें संभाषण होऊं शकलें नाहीं.

चित्रपटावर सर्व बाजूंनीं स्तुतीचा वर्षाव झाला. मेरेलिनचा अभिनेत्री म्हणून प्रथमच गौरव झाला. 'जर्नल अमेरिकन' या पत्रानें लिहिलें–

"Miss Monroe, beautifully photgraphed, handles her first important dramatic assignment effectively."

आपला अभिनयसुगंध दरवळूं लागल्याची चाहूल मेरेलिनला आतां लागली. परंतु आतांपर्यंतच्या वाटचालींत ती मनानें आणि शरीरानें थकत आली होती. हातांतलें खेळणें पडून फुटावें तसें तिचें आयुष्य मोडून तोडून पडलें होतें आणि एकाद्या मुलासारखें तिचें मन आक्रोशत होतें.

९ फेब्रुवारी म्हणजे "मिस्‌फिटस्" चित्रपटाच्या उद्‌घाटनानंतर फक्त आठच दिवसांत मेरेलिन मानसोपचारासाठीं दवाखान्यांत दाखल झाली त्याचा हा असा इतिहास होता.

प्रसिद्धीच्या शिखरावर असतांना, कीर्तिसुगंधाची निश्चित चाहूल लागलेली असतांना, असामान्य शरीरसौष्ठव लाभलेल्या मेरेलिनला बाहेरच्या जगांतील ताण सुसह्य न झाल्यामुळें तिनें मानसिक उपचारासाठीं आपण होऊन रुग्णालयांत दाखल व्हावें ही घटना थोडीशी आश्चर्यकारकच म्हणायला हवी. परंतु ज्यानें मेरेलिनच्या जीवनाची वाटचाल लक्षपूर्वक पाहिली असेल त्याला या घटनेनें कुतुहल वाटलें तरी धक्का बसण्याची शक्यता नाहीं.



अर्थर मिलर––रोझालिनच्या शोधांत.

मेरेलिनच्या आयुष्यांत ज्या दोन महत्त्वाच्या घटना पाठोपाठ घडल्या त्या म्हणजे–गेबलचा मृत्यू आणि मिलरशी तिनें घेतलेला घटस्फोट! या घटनांचे आघात तिच्या मानसिक आजाराचें तात्कालिक कारण असलें तरी जीवनाचा अर्थ शोधण्यांत तिनें जी मोठी गफलत केली त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

श्रद्धाहीन जीवनाचें, मेरेलिनचें जीवन हें उत्तम उदाहरण होतें. अर्थात्‌ याला स्वतः मेरेलिन कारणीभूत होती. त्यापेक्षां परिस्थिती अधिक कारणीभूत झाली ही गोष्ट विसरतां येणार नाहीं. एखाद्या सुखी–समाधानी कुटुंबांत तिचें बालपण गेलें असतें तर जीवनाच्या झगडयासाठीं आपलें सुंदर शरीर वारंवार उघडें करण्याची गरज तिला नसती अशा संशयाचा फायदा मेरेलिनला अवश्य मिळतो.

यश–कीर्ति यांच्यामागें लागणें ही कांहीं जगावेगळीं गोष्ट नव्हती. परंतु यश ही भोगण्याची वस्तू आहे आणि कीर्ति ही मरावें परी––उरण्याची वस्तु आहे. यांतला फरक लोकांना कळत नाहीं. मेरेलिनच्या सुंदर जीवाची हीच शोक-कथा होती. हॉलीवूड निर्मात्यांनीं तिच्या शरीराची आणि आत्म्याची फारकत केली. आणि तिनें ती करूं दिली श्रीमंत माणसाला ज्याप्रमाणें सतत एक शंका जाळीत असते कीं, आसपासचे गरीब लोक–सामान्य लोक हे आपल्यापेक्षां आपल्या पैशावर प्रेम करतात, तशीच भावना या सौंदर्यसाम्राज्ञीला ग्रासीत असावी.

या चित्रपट निर्मात्यांची प्रसिद्धीच्या लखलखाटांत आपल शरीरसौष्ठव, आपलं सौंदर्य तेवढं बाजूला काढलं आणि आज जी मेरेलिन गाजते आहे ती फक्त या शरीराची प्रतिकृति आहे, असा विचार मेरेलिनला अस्वस्थ करीत असला पाहिजे.

एक मोठा अनुभव तिच्या पदरीं होता. जोंपर्यंत तिच्या शरीरांत तारुण्यानें प्रवेश केला नव्हता तोपर्यंत या जगानें तिचे हालच केले. कुणीं असें म्हटलें नाही की– किती सुंदर अर्भक आहे हें! आपण याचा प्रेमानें सांभाळ करावा. ज्या क्षणीं शरीर म्हणून तिची किंमत वाढली आणि त्या शरीराकडे नग्नावस्थेंत पहाण्याचें सुख तिनें लोकांना वांटले त्यावेळीं तिच्या आर्थिक यातना संपल्या. परंतु त्याक्षणीं मनाच्या यातना सुरू झाल्या असल्या पाहिजेत. या घटनेनंतर तिला यशानें अशी घेरी आणली की या यातनाची चाहूल न लागल्याचें नाटक तिनें अनेक वर्षे अखडपणें केलें.

तिनें यशाचं टोंक गाठीपर्यंत शरीरसौंदर्य राबविलें. लोकांनीहि तेंच सुख पुनः पुनः हवेसें वाटत होतें. या दुष्ट चक्रांतून बाहेर पडण्याची तिची धडपडहि सुरूच होती.

आतां तिच्यापुढें दोन मार्ग होते. यशाच्या शिखरावरून मार्गे फिरून एकाद्याशी सुखानं संसार करणें किंवा यशाच्या मार्गे जायचें सोडून फक्त कीर्ति मिळेल अशाच भूमिका करणें, कारण ज्याला आपण यश म्हणतो ते खरें लोकांचेंच असतें. कीर्ति मात्र आपलीच असतें. लोकाची भीडमुर्वत तिला फारशी नसते.

तिचा पहिला विवाह हा तिला रहावयास एकादें घर मिळावे अशा साध्या व्यावहारिक भूमिकेवरून झाला. नव्हे, उरकण्यांत आला मेरेलिननें या विवाहातून आपली मान सोडवली. तिचा दुसरा नवरा डी–मॅगी आणि ती–दोघांचेंहि एकमेकावर प्रेम होतें. परंतु नुसते प्रेम असून भागत नाही त्यासाठीं फार सोसावे लागतें. यासाठीं मेरेलिनची तयारी नसावी.

मिलरशी तिचें लग्न चार वर्षे टिकलें. कारण त्याने आपल्या केवळ शरीरावर भुलून लग्न केलें असें तिला वाटत नव्हतें. मिलर हा अमाप कीर्ति मिळालेला नाटककार होता. यशाचें वलयहि त्याच्यामागें होतें. माणसाचे गुतागुंतीचे स्वभाव त्याला नीट समजत होते. तो आपल्यापेक्षां कांही क्षेत्रांत निश्चित श्रेष्ठ आहे याची मेरेलिनला जाणीव होती. म्हणून चार वर्षे ती मिलरशी रमू शकली.

परंतु मिलरनेंसुद्धां एक कुतुहल म्हणूनच आपल्याकडे पाहिलें कीं काय? असा तिला संशय आला असावा. 'मिस्फिट्स्'मधील नायकेच्या स्वभाव हा मेरेलिनच्या स्वभावाशी ततोतंत जुळतो असें टीकाकार सांगू लागले. रोझालिन टेंबर ही नायिका म्हणजे मिलरनें मेरेलिनचा केलेला गौरवच होय असे लोक म्हणू लागले. रोझालिन निर्माण झाली. मिलर आतां आणखी एकाद्या कुतूहलाकडे कशावरून वळणार नाही हा विचार तिला सतावत नसेल ना? मिलरनें त्याला समजलेलें तिच्या आयुष्याचें रहस्य 'मिस्फिट्स्' मध्यें उघडें पाडलें.

स्वतःच्या अस्तित्वाविषयीं उबग निर्माण झाला की मानसिकदृष्ट्या एकादी व्यक्ति कोलमडण्यास किती वेळ लागणार! मिलरपासून मेरेलिननें घटस्फोट घेतला आणि सासारिकदृष्ट्या सुखी होण्याचा दरवाजाच तिनें बद करून टाकला. अभिनेत्री म्हणून कीर्ति मिळवणें येवढेंच तिच्या हातीं राहिले. गेबलच्या मृत्यूनें तिला कशा प्रकारचा धक्का बसला असेल? ती त्याच्या प्रेमात तर सापडली नाहीं ना? कां कितीहि मोठा अभिनयसम्राट झाला तरी अखेर तोहि मृत्यूला चुकवूं शकत नाहीं या जाणीवनें ती हादरली? कीं गेबलच्या मृत्यूनंतर जी सहानुभूतीची लाट उसळली, जी हळहळ निर्माण झाली, जी स्तुतिसुमनें उधळली गेली त्यातलें आपल्या वाट्याला काय येणार या विषादानं ती गांगरून गेली? यांतलें काहीहि शक्य होतें.

पाच मार्चे १९६१ ला मेरेलिननें मानसोपचार केंद्र सोडलें. परतु गेलेला तोल तिला कधीच संभाळता आला नाहीं असें पुढील घटनावरून म्हणावेसे वाटतें.

गेले सुमारें वर्षभर कोठल्याहि गोष्टीला उशीर करायचा हा मनरोचा स्वभावधर्मंच बनला होता, तिचा निष्काळजीपणा अगदीं पराकोटीला पोचला होता. समारंभाला किंवा चित्रपटाच्या सेट्सवर जाण्याचें ती टाळत असे. हा सारा वेळ ती एकांतवासांत घालवीत असे. गेल्या कांही महिन्यांत तिचा हा अनियमितपणा तासांवरून आठवड्यावर आला होता. "Somethings got to give" या चित्रपटाच्या चित्रिकरणाच्या वेळीं बत्तीस दिवसांत फक्त बारा वेळां ती हजर राहिली आणि या वेळांत तिची फक्त साडेसात मिनिटांची फिल्म चित्रित करतां आली. या अनियमितपणाबद्दल "ट्वेंटिएट सेञ्चुरी फॉक्स" या चित्रपट कंपनीनें तिच्यावर साडे सात लाख डॉलर्स नुकसानीचा दावा माडला होता व तिचें चित्रपटाचें काम रद्द केलें होतें. यावर मेरेलिननें फक्त तार करून दिलगिरी प्रदर्शित केली होती.

मेरेलिनच्या या वाढत्या निष्काळजीपणाचं–अनियमितपणाचं कारण म्हणजे आयुष्यभर लाभलेलं वैफल्य आणि त्यांतून निर्माण झालेला तिचा आजार. ती गेले कित्येक दिवस एकांतवासात काढत होती. इस्पितळांत राहून, उपचार, करवून घेऊनसुद्धां रात्रीच्या रात्रीं तिला निद्रेची आराधना करावी लागत होती. ही जगाची सौंदर्यसम्राज्ञी प्रसिध्दीच्या शिखरावर पोचली होती. सुख मिळविण्यासाठीं तिने केलेली सर्व धडपड व्यर्थ ठरली होती. तिच्या उघड्या, विवस्त्र, सुडौल, आणि बांधेसूद देहाला लक्षावधी पुरुषांच्या विषारी विषयवासना डंख मारत होत्या. त्याचा त्रास तिला आतां सहन होत नव्हता. पुरुषाची कामवासना जागृत करणं हीच जगाच्या दृष्टीनं आपल्या देहाची किंमत हें तिला ठामपणें कळून चुकलं होतं. सौंदर्यसपन्न पण बुद्धिमान अभिनेत्री, एक आदर्श माता आणि पत्नी म्हणून जगायची तिची आशा पार लोपून गेली होती. या वैफल्याच्या जाणीवेनंच तिचा निष्काळजीपणा, जगाबद्दल संशयित वृत्ति बळावत चालली होती. मैत्री, करार वगैरे बंधन तिनं बेछूटपणानं मोडून टाकली होती. या मानसिक व्यथेनं ती आंतल्या आंत फार कटाळली होती, घाबरली होती. मानसोपचारांचा तिला आधार वाटत होता.

मोठमोठ्या समारंभांना तिला जेवणासाठीं बोलावणं येत असे तें शोभेच्या वस्तूच प्रदर्शन करण्याच्या हेतूनंच हा तिचा समज झाला. तो अक्षरशः खराहि होता. जेवणानतर पिॲोना वाजवून जशी लोकाची करमणूक करण्यांत येते तेवढंच महत्त्व मेरेलिनच्या अस्तित्वाला असे. तिच्या व्यक्तिमत्वाला जगातलं सर्वांत सुदर खेळणं एवढाच अर्थ होतं.

मेरेलिन म्हणते, "प्रसिद्धी हीं कांहीं चिरकाल टिकणारी आणि सदोदित आनद देणारी वस्तु नाहीं. तो आनंद अगदीं तात्पुरता असतो असं माझ्यासारख्या बेवारशी–अनाथ मुलीलासुद्धा वाटतं. मला आयुष्यांत फारसं सुख कधींच मिळालं नाहीं. तें मिळेल अशी आशाहि मीं बाळगली नाहीं. मी सर्वसामान्य अमेरिकन मुलींपेक्षां फारच निराळी

**१९५६ सालीं मेरेलिनचा ऑर्थर मिलरशीं विवाह झाला. त्या प्रसंगीं तिचं व मिलरचं जें छायाचित्र घेतलं होतं त्याच्या मागें मेरेलिननें लिहून ठेवलं होतं, "Hope-Hope. ( आशा ! आशा ! ) "**

आहे. सर्व सामान्य मुलीची भावी आयुष्य सुखाचं जावं म्हणून जोपासना केली जाते. पण माझा जन्म जणुं कांहीं सुख न मिळण्याकरितांच झाला. "

वृत्तपत्रांतून मेरेलिनविषयी ज्या निरनिराळया बातम्या बाहेर पडत, त्यामुळें मेरेलिनचे लक्षावधी चहाते भारावून जात असत. 'जंटलमेन प्रिफर ब्लोंड' ( १९५२ ), " नायगारा " ( १९५२ ), "हाऊ टु मॅरी अ मिलिओनर " ( १९५३ ), " सेव्हन इयर्स इच " ( १९५४ ), " बस स्टॉप " ( १९५६ ), " सम लाइक इट हॉट " ( १९५८ ), " मिस फिट्स् " ( १९६१ ) हे मेरेलिनचे अतिशय गाजलेले चित्रपट. तिचं खदखदून, लकाकणाऱ्या विजेसारखं हास्य आणि उंच टीपेला पोहचलेला भावनोत्कट आवाज लोकांच्या स्मृतींतून कधींच पुसला जाणार नाहीं.

मेरेलिनला संपूर्ण आयुष्यभर अतिशय जोराचा संघर्ष द्यावा लागला. या झगड्यामुळें तिला होणाऱ्या मानसिक क्लेषांकडे कुणींच आत्मीयतेनं पाहिलं नाहीं. त्यामुळेंच तिचं सुंदर शरीर ही एक शोकांतिका ठरली.

२ ऑगस्ट १९६२ ला वृत्तपत्रांतून एक अशी बातमी प्रसिद्ध झाली कीं, जगांतील लक्षावधी चित्रपट शौकिनांना आश्चर्याचा धक्का बसला. जगप्रसिद्ध सौंदर्यसम्राज्ञी मेरेलिन मनरो हिच्या आत्महत्येची बातमी होती. मानसिक आजारानं त्रासून, कंटाळून झोपेच्या गोळयांच्या सहायानं ती मृत्युच्या मिठींत कायमची विसावली. तिचं सौंदर्य तसूभरहि कमी झालं नव्हतं.

आयुष्याचा तिचा शेवटचा दिवस तिनं खेळकरपणानं घालवला. त्या दिवशीं तिनं सूर्यस्नान घेतलं. एका नव्या पटकथेवरून ओझरती नजर फिरवली. कापडी खेळण्यांशीं जरा वेळ खेळली. आणि रात्रीं लौकरच ती आपल्या झोंपण्याच्या खोलींत गेली.

रात्रीं बराच उशीर झाला तरी तिच्या खोलींतून दिव्याचा प्रकाश येतो आहे असं तिच्या खालच्या खोलींत झोंपणाऱ्या तिच्या मोलकरणीच्या लक्षांत आलं. तिने डॉक्टरांना बोलावलं. खिडकीचीं तावदानं



" मिस्फिट्स् "—१९६१.

फोडून डॉक्टरांनीं तिच्या खोलींत प्रवेश मिळवला तेव्हां तिचे प्राण केव्हांच तो देह सोडून गेल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. तिच्या उशाशी झोपेच्या गोळयांची एक रिकामी बाटली होती. तीन दिवसांपूर्वीं तिनं जेव्हां ती विकत घेतली तेव्हां त्यांत पन्नास गोळया होत्या. तिचा एक हात टेलिफोनवर होता व दुसऱ्या हातांत अंगावर घेतलेल्या पांघरुणाचे एक टोंक धरून तो हात तिनं आपल्या हनुवटीवर टेकवला होता. आयुष्यभर सुख-दुःखांचे हेलकावे खाणारं तिचं श्रांत मन आणि शरीर आतां शांतीचा अनुभव घेत होतं. झगडा संपला होता. अपेक्षा नाहींशा झाल्या होत्या. हें सर्व संपवायला, मिटवायला तिला मृत्यूकडेच धांव घ्यावी लागली. तोच अखेर तिचा धन्वंतरी ठरला !

●●●



“ जरा हे लाडू खाऊन पहा हो ! ”



“ अरे राम ! हा काय लाडू आहे कां अॅटम ?
फुटता फुटत नाहीं ! ”



!!!



“ बरं झालं, लाडू नाहीं मारलान् ! ”

— शरद अभ्यंकर.

# राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २

## आमचेकडे मिळणारीं निवडक पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | १.२५ |
| सहा साहसें | दा. सी. देसाई | २.०० |
| ग्रामदानाची प्रयोगभूमि | श्री. ग. माजगांवकर | २.५० |
| आम्ही विष्णुदास | " | ०.५० |
| स्वराज्याचे युगमंत्र | " | ०.२५ |
| विद्यालंकार | प्रभाकर इनामदार | १.३० |
| झांशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १.०० |
| हेमा सात बुटके | भालचंद्र भिडे | १.२५ |
| रक्षाबंधन | गो. नी. दांडेकर | १.५० |
| सावित्री | ब. मो. पुरंदरे | ०.५० |
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २.०० |
| गुजरातेंतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७.०० |
| मडकोबा | भा. रा. भागवत | १.०० |
| बडबडमामा | लीलावती भागवत | ०.७५ |
| दयाळ | यदुनाथ थत्ते | २.०० |
| स्वैरविचार | ग. त्र्यं. माडखोलकर | ३.५० |
| वाङमयविलास | " | ५.०० |
| भारत आणि चीन | रा. कृ. पाटील | ८.०० |
| पायवाट (काव्य) | बाबा मोहोड | ३.२५ |
| त्या तिथें पलिकडें | रॉय किणीकर | २.५० |
| असिधारा | दे. गो. उदापुरे | ३.०० |
| आम्ही भगिरथाचे पुत्र | गो. नी. दांडेकर | १०.०० |
| आनंदवनभुवन | " | ६.०० |
| पूर्णामायचीं लेकरं | " | ४.०० |
| कुऱ्हाडीचा दांडा (नाटक) | " | ०.५० |
| शितु ( " ) | " | २.०० |
| पवनाकांठचा धोंडी ( " ) | " | २.५० |
| उद्धव ( " ) | मंगेश पत्की | २.०० |
| मराठ्यांचें सिंहासन ( " ) | गो. कृ मुंगशीकर | २ ०० |
| गांजलेले जीव भाग १ ते४ | भा. रा. भागवत | १२.०० |
| शिंगी | " | २.५० |
| पाताळलोकची अद्‌भूत यात्रा | " | ३.०० |
| चिटोऱ्याचा प्रताप | " | २.०० |
| हिंमतवान जासूद | " | ६.०० |
| कोल्होबाची करामत | वऱ्हाडपांडे | १.०० |
| जमिनीवरचीं माणसें | शांताराम | ३.५० |
| ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३, | भवानीशंकर पंडित | १.५० |
| सत्तावनचा सेनानी | वसंत वरखेडकर | ४.०० |
| राजपुत्र | " | २.५० |
| डोंगर माथ्यावरील दिवा | ना. रा. शेंडे | ३.०० |
| संतसमागम | भ. श्री. पंडीत | ३.५० |
| वसंत फार दूर नाहीं | अंबादास अग्निहोत्री | ३.०० |
| जळातील मासा | जयवंत दळवी | ४.५० |
| पतंगप्रीत | म. वि. कुलकर्णी | ४.०० |

Telephone :- 29130
रजिस्टर्ड ट्रेड मार्क
REGISTERED TRADE MARK
Grams "SACHEWORK" Bombay-Dadar

# एस्. एच्. केळकर आणि कं. (प्रा. लि.)

एसेन्शियल आईल्स — अरोमटिक केमिकल्स रेझिनॉइडस्
इत्यादि बनविणारे
**पहिले भारतीय कारखानदार**
आमचे प्रख्यात व उच्च प्रतीचे "नाग छाप"
सुगंधी अर्क सौंदर्य प्रसाधनांत सर्वत्र वापरले जातात.

३७, मंगळदास रोड, मुंबई नं. २.

ही दिवाळी व नूतन वर्ष आमच्या सर्व ग्राहकांस व हितचिंतकांस सुखाचें व समृद्धीचे जावो !

## आमचीं उपयुक्त प्रकाशनें

**भारत रेकनर :** ( इंग्रजी. दुसरी आवृत्ति. किं. रु. ६. टपालखर्चासह रु. ७ ) लेखक : **श्री. वा. रा. वर्तक**
बँका, विमाकंपन्या इ. व्यापारी संस्थांना उपयुक्त.

**नव्या पैशांत व्याज आकारणी :** ( मराठी. दुसरी आवृत्ति. किं. रु. १—५० टपालखर्चासह रु. २—२५ न.पै. )
सहकारी सोसायट्यांना व्याज आकारणीसाठीं अत्यंत उपयोगी.

आगामी : **जमिनीवरले थेंब** ( कथासंग्रह )
लेखक : **वा. शा. कुंभोजकर**
जानेवारी ६३ च्या पहिल्या आठवड्यांत विक्रीस तयार. पृष्टें अंदाजें १४० किंमत रु. ३ टपाल खर्चासह रु. ३—७५ न.पै.

**प्रशान्त प्रिंटिंग प्रेस व प्रकाशन** ४६१।१ टिळक रोड, पुणें २.



# लोणी · तूप
# सामंत ब्रदर्स
दादर स्टेशन समोर. मुंबई-२८


गोगटे
भावी
प्रगतिपथावरील
प्रकाश...
TOM & BAY / GM / M-1/62
खाणी व खनिज द्रव्यें म्हटले म्हणजे गोगटे माईन्स हे नांव डोळयासमोर उभे राहते. खाण धंद्यावरोवरच रेडी- जि. रत्नागिरी येथील खाणीतून काढलेल्या कच्च्या लोखंडाच्या जमिनीवरील व जलवाहतुकींत त्यांनी अत्यंत अल्प काळांत नेत्रदीपक कामगिरी केली आहे.
गोगटे माईन्सचा स्वयंप्रकाशित तारा स्वतःला व इतरांनाही त्यांच्या भविष्यकाळांतील प्रगतीसाठीं प्रकाश देण्यास सदैव सिद्ध आहे.
खाणी, खनिज द्रव्यें व जलवाहतुक
गोगटे माईन्स, टिळकवाडी, बेळगांव.

Regd. No. 9304


आमच्या असंख्य ग्राहकांस ही दिवाळी व
नूतन वर्ष सुखसमृद्धीचें जावो

वायल, चीट, पलंगपीस, चादरी,
पडद्यांचीं कापडें इत्यादीसाठीं

# फोनिक्स मिल्स लि.

विविध नंबरी सूत, शिवणकामाचा दोरा, गंजीफरॉक्स, मोजे वगैरे करितां

# डॉन मिल्स कंपनी लि.

शर्टिंग, कोटिंग, लॉंगक्लॉथ, धोतरें व
हरतऱ्हेच्या सर्वांगसुंदर कपड्यासाठीं

# ब्रॅडबरी मिल्स लि.

★ एजन्टस् ★

# रामनारायण सन्स प्रायव्हेट लि.

स्टेट बँक बिल्डिंग, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १


संपादक – मुद्रक – प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर : प्रकाशनस्थळ : राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.
मुद्रणस्थळ : प्रशांत प्रिंटिंग प्रेस, ४३१ सदाशिव, पुणें २. कव्हर छपाई : आशा प्रिंटरी : मुंबई ४.